म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. 2955
REFBK-0018169

टिळक स्मारक ग्रंथ-माला

पुस्तक १ लें

गीता धर्म मंडळ, कल्याण

# लो. टिळकांचीं धर्मविषयक मतें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर

प्रकाशकः—न. चिं. केळकर

चिटणीस टिळक स्व. संघ–स्मारक ट्रस्ट.

REFBK-0018169

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

किं. १ रु.

प्रकाशकः—नरसिंह चिंतामण केळकर,
चिटणीस टिळक स्व. संग्र–स्मारक ट्रस्ट.

मुद्रकः—केशव रावजी गोंधळेकर,
जगद्धितेच्छु छापखाना, ९०७ शनवार पेठ, पुणें.

# प्रस्तावना

लोकमान्यांविषयीं उत्तम निबंध लिहिणारास बक्षिस देण्याकरितां म्हणून रत्नागिरी येथील एका भगिनीनें १२५ रु. रक्कम १९२४ च्या एप्रिलमध्यें मजकडे पाठवून दिली. निबंधाच्या विषयाबद्दल या भगिनीनें, स्वतः कांहीं सूचना न करितां, तो ठरविण्याचें काम मजकडेच सोंपविलें होतें. लोकमान्यांच्या राजकारणविषयक मतांची चर्चा आजपर्यंत पुष्कळ झालेली आहे व पुढेंहि प्रसंगानुसार ती होत राहणार. तेव्हां ' लोकमान्यांची धर्मबुद्धि व धर्मविषयक मतें ' या विषयावर साधार व सप्रमाण असा व केसरीचे निदान १० रकाने भरतील इतका मोठा निबंध मागविण्याचें मीं ठरविलें. असें ठरविण्यांत, एक तर बक्षिस रक्कम देणाऱ्या व्यक्तीची धार्मिक भावना व लोकमान्यांविषयींची पूज्यबुद्धि यांस अनुरूप असाच हा विषय होईल, असा एक विचार होताच, पण शिवाय या विषयासंबंधानें लोकांत अनेक गैरसमज व भिन्न भिन्न कल्पना प्रचलीत आहेत, तेव्हां यासंबंधीं लोकांना साधार व सप्रमाण असें विवेचन वाचावयास मिळालें तर फार चांगलें होईल असाहि एक विचार होता.

धार्मिकपणा म्हणजे काय यासंबंधीं आपल्या जुन्या ठरून गेलेल्या कांहीं कल्पना आहेत. त्या दृष्टीनें पाहूं गेल्यास लोकमान्य धार्मिकतेच्या कसोटीस पूर्णपणें उतरणार नाहींत. जुना आचारधर्म यथासांग पाळणें हीच खरी धार्मिकता होय, असली कर्मठपणाची दृष्टि स्वीकारून लोकमान्यांना नास्तिक किंवा धर्मलंड ठरविणारे कांहीं जुने लोक अजूनहि समाजांत वावरत आहेत. उलट सामाजिक सुधारणेच्या वादांत त्यांनीं पुराणमताभिमान्यांची बाजू उचलल्यामुळें सुधारक लोक त्यांना कट्टे पुराणमतवादी किंवा ' ऑर्थोडॉक्स ' ठरवितात, आणि नीतिधर्माच्या दृष्टीनें विचार करणारे लोक त्यांच्या नैतिक शुद्धतेमुळें व स्वार्थत्यागपूर्वक कर्मयोगाच्या आचरणामुळें त्यांना आधुनिक काळांतले एक महान् संत समजतात. त्यांच्या आयुष्यांत त्यांना ठिकठिकाणीं एखाद्या धार्मिक संताप्रमाणें लोक मान देत असत आणि त्यांच्या मूर्तीची पूजा करणें, स्तोत्रें गाणें, आरती करणें, नवस करणें इत्यादि सर्व साधूच्या बाबतींत होणारे शुद्ध भाविकपणाचे प्रकार त्यांच्या आयुष्यांत घडून आले व अजूनहि कित्येक ठिकाणीं चालू आहेत !

आमच्या मतें या निरनिराळ्या कसोट्यांपैकीं नीतिधर्माची कसोटीच श्रेष्ठ मानली पाहिजे. लोकमान्य सर्वच जुने आचारधर्म अगदीं कडकपणें पाळीत नसले तरी, ते पाळणाऱ्या लोकांबद्दल त्यांस अत्यंत आदर वाटे. जुन्या सरका-रांत, परंपरेंत व आचारधर्मांत कालानुरूप सुधारणा व्हावी असें त्यांचें मत

असलें तरी जुनी परंपरा शक्य तोंवर राखली पाहिजे व तिचा अभिमान बाळगला पाहिजे असेंच त्यांचें मत होतें. त्यांची आस्तिक्यबुद्धि आरंभापासून अखेर-पर्यंत जाज्वल्य होती आणि तिच्या जोरावरच ते प्रचंड लोककार्य करूं शकले व संकटांतून उत्तीर्ण झाले. त्याचप्रमाणें नैतिक आचारशुद्धतेच्या बाबतींतहि त्यांचें आचरण नमुनेदार व सर्वांना कित्ता घेण्यासारखें होतें, आणि 'तुका म्हणे तोचि संत । सोशी जगाचे आघात' या अनुभविक वचनाप्रमाणें त्यांनीं लोकांकरितां तुरुंगवासादि अनेक कष्ट सोसले. या सर्व गोष्टींवरून त्यांना संत किंवा विभूति मानण्याची प्रवृत्ति लोकांत उत्पन्न झाली व या विशिष्ट दृष्टीनें ती सर्वस्वी योग्य अशीच होती.

लोकांपुढें संदिग्ध स्वरूपांत असलेल्या या महत्त्वाच्या विषयाची साधार व सप्रमाण चर्चा व्हावी या हेतूनें ता. २९ एप्रिलच्या केसरींत जाहीर रीतीनें निबंध मागविले. लोकमान्यांच्या पुण्यतिथीला बक्षिसाचा निकाल जाहीर होऊन उत्तम ठरलेला निबंध केसरींत प्रसिद्ध व्हावा अशा बेतानें ता. ३० जूनचे आंत निबंध मागितले, व त्याप्रमाणें एकंदर १६ निबंध आले. या विषयावर इतक्या अल्पावधींत इतके निबंध येतील अशी अपेक्षा निदान आम्हीं तरी केली नव्हती. निबंधांचें परीक्षण करण्याकरितां प्रो. करमरकर, वे. शा. सं. सदाशिवशास्त्री भिडे, श्री. वामन मोरेश्वर पोतदार व ग. वि. केतकर यांची कमीटी नेमण्यांत आली व कमीटीनें दिलेला निकाल ता. २२ जुलैच्या केसरींत प्रसिद्ध करण्यांत आला. परीक्षकांनीं या सोळा निबंधांपैकीं एकंदर सहा निबंध उत्तम ठरवून त्यांपैकीं पहिल्या दोन निबंधांस अनुक्रमें ७५ रु. व ५० रु. याप्रमाणें १२५ रु. चें बक्षीस विभागून द्यावें असें ठरविलें. या निबंध-लेखकांचीं नांवें अनुक्रमें पुढीलप्रमाणें:—(१) प्रभाकर वासुदेव बापट बी. ए. पुणें. (२) गणेश सदाशिव आळतेकर एम्. ए. एल्‌एल्. बी. कऱ्हाड. (३) श्रीनिवास नारायण बनहट्टी एम्. ए. पुणें. (४) शंकर दामोदर पेंडसे एम्. ए. एम्. ओ. एल्. पुणें. (५) श्रीपाद शंकर नवरे बी. ए. प्राज्ञपाठशाळा वाई. (६) काशिनाथ रघुनाथ वैशंपायन, शिक्षक टिळक विद्यालय, येवलें.

याच वेळीं टिळक-स्वराज्यसंघ-स्मारकाच्या ट्रस्टींची सभा होती. ट्रस्टच्या उद्देशांत टिळकांच्या तत्वज्ञानाचा प्रसार हा एक असल्यामुळें परीक्षक कमीटीनें हे निबंध छापून काढण्याबद्दल ट्रस्टला विनंति केली व त्याप्रमाणें ता. २२ जुलै १९२४ ला झालेल्या सभेंत ट्रस्टनें या कामाकरितां ५०० रु. मंजूर केले. अशा रीतीनें स्वतंत्रपणें निबंध छापून निघण्याचीच व्यवस्था झाल्यामुळें ते केसरींत छापले नाहींत. सहाहि निबंध छापून काढण्याची शिफारस कमीटीनें केली याचें कारण असें कीं, प्रत्येक निबंधांत कांहींतरी वैशिष्ट्य आहे. उदाहरणार्थ बापट यांच्या निबंधांत टिळकांच्या धार्मिक मतांचा ऐतिहासिक दृष्ट्या

विचार केला आहे, श्री. आळतेकर यांनीं टिळकांच्याच विचारसरणीस पोषक अशीं कांहीं नवीं प्रमाणें दिलीं आहेत, बनहट्टी यांची भाषासरणी सर्वोत्कृष्ट असून त्यांत जुनी शास्त्रीय दृष्टि ठेवलेली आहे, श्री. पेंडसे यांनीं बौद्ध, मीमांसक व शंकराचार्य यांच्या दृष्टीनें टिळकांचें धार्मिक इतिहासांतील महत्त्व चांगलें दाखविलें आहे, श्री. नवरे यांची चिकित्सक बुद्धि व वैशंपायन यांची भावनाप्रधान विवेचनपद्धति यामुळें त्यांचेहि निबंध वाचनीयच आहेत. यांत विषय एकच असल्यामुळें कांहीं गोष्टींची पुनरुक्ति होणें अपरिहार्य असलें तरी प्रत्येकाची विवेचनपद्धति व मांडणी निराळी असल्यामुळें त्यांचा कंटाळा येत नाहीं.

विशेष अभिमानाची गोष्ट ही कीं, हे सहाहि निबंधलेखक वयानें तरुण आहेत. धर्माचा अभ्यास तरुण लोकांनीं अवश्य केला पाहिजे, अशी इच्छा लोकमान्यांनीं गीतारहस्याचे प्रस्तावनेंत प्रदर्शित केली आहे. त्याचा परिणाम महाराष्ट्रीय तरुणांचे मनावर होत आहे असें यावरून अनुमान करण्यास हरकत नाहीं. या पुस्तकाचा आकार आतांपर्यंत प्रसिद्ध झालेल्या चरित्र, आठवणी व लेखसंग्रह या टिळकविषयक ग्रंथांप्रमाणेंच ठेविला आहे. आठवणींच्या पुस्तकांप्रमाणेंच या निबंधांचाहि चरित्र–लेखकास पुष्कळ उपयोग होण्यासारखा असून, टिळकांचें हें एक धार्मिक चरित्रच आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

पुणें, ता. ५।१।२५. } न. चिं. केळकर,
चिटणीस टि. स्व. संघ स्मारक ट्रस्ट.

# अनुक्रमणिका

**निबंध पहिला........................................पृष्ठें. १ ते ५६**

ले.—प्र. वा. बापट, बी. ए.

धर्मबुद्धींत होणारा फरक–विवेचनाची ऐतिहासिक पद्धति–विकासाचीं सामान्य कारणें (पृ. १–३), टिळकांचें बाळपण–पुण्यांतील विद्यार्थीदशा—तेथील धार्मिक परिस्थिति–त्यांच्यावर शिक्षणाचा झालेला परिणाम–समाजसेवेच्या ध्येयाचा स्वीकार (४–८), आचारात्मक हिंदु धर्माविषयीं मत व प्रवृत्ति–आचारात्मक प्रवृत्तीचीं चार कारणें (८–१२), आगरकरांबरोबर तुलना–समाजसेवेच्या आरंभकालची मनाची अनिश्चयात्मक अवस्था–स्वामी विवेकानंदांचें उदाहरण–समाजसुधारणेच्या कायद्यास विरोध-त्याची मीमांसा (१३-१९), मधील काळांत धर्माकडे पाहण्याची त्यांची राष्ट्रीय दृष्टि–तिचीच पुढें लोकसंग्रहरूपानें परिणति–धर्माचें द्विविध स्वरूप–धर्माचा चिकित्सक पद्धतीनें विचार—विचारबुद्धीचा हिंदुधर्मांतील श्रेष्ठ तत्वज्ञानाकडे कल (२०–२६), धार्मिक बुद्धीचा उदय–त्याचा पुढील आयुष्यावर परिणाम–राजकारणांतील ध्येयवाद—धर्मविषयक व्याख्यानें–धर्माविषयीं मत (२६–३३), हिंदु धर्माविषयीं मत–हिंदुधर्माचें लक्षण–परस्पर सहिष्णुता–धर्माचें व्यक्तिगत स्वरूप–हिंदुधर्म स्थायी नसून प्रगतिपर आहे–प्रवृत्तिमार्ग–आचार तत्त्वज्ञान (३३–३८), धर्मसुधारणेविषयीं मत–१९०० सालानंतरची धार्मिक बुद्धीची वाढ–टिळकांना भक्तिमार्ग शक्य नसल्यामुळें ते कर्मयोगाचे साधक झाले–१९०८ सालचें संकट–गीतारहस्य–संस्कारावरील लेख–धर्मसुधारणेची इच्छा–१९१४ सालानंतरची पूर्णावस्थेला पोंचलेली धार्मिक बुद्धि (३८–४७), सत्यादि नियम कर्मयोगसाधकांनीं किती पाळावेत–साध्य आणि साधन–आध्यात्मिक योग्यता–धार्मिक मतें–लोकभ्रमावरील अविश्वास–धार्मिक बुद्धीचे दोन प्रकार–टिळकांची बुद्धि 'तात्त्विक' (४७–५०), त्यांचें धार्मिक इतिहासांतील त्रिविध महत्त्व–हिंदुधर्माचे संरक्षणकर्ते–हिंदुधर्माचे उपदेशक–हिंदुधर्मांतर्गत प्रवृत्तिपंथाचे संस्थापक–त्या मार्गाचें महत्त्व–त्यांचें इतिहासांतील स्थान–प्रवृत्तिमार्गाचें महाराष्ट्र धर्माच्या परंपरेंतील स्थान–त्यांची चिरस्थायी धर्मवाङ्मयात्मक कामगिरी (५०–५६).

**निबंध दुसरा**........................................पृष्ठें. ५७ ते ९५

ले.—ग. स. आळतेकर, एम्. ए.

उपोद्घात ( ५७–५८ ), हिंदुधर्माचीं लक्षणें ( ५९–६४ ), प्रार्थना समाजादि पंथ ( ६४–६६ ), चातुर्वर्ण्य ( ६६–६८ ), अस्पृश्यता (६९–७१), परिस्थित्यनुरूप आचारांत फेरफार ( ७१–७९ ), धार्मिक शिक्षणाची आवश्यकता ( ७९–८१ ), गणेशोत्सव (८१–८४), ये यथा मां प्रपद्यन्ते ( ८४–८७ ), कार्याकार्यव्यवस्थिति ( ८७–९२ ), वेदांत पंगूपणा आणतो काय ? ( ९२–९४ ), उपसंहार ( ९४–९५ ).

**निबंध तिसरा**........................................पृष्ठें. ९६ ते १४४

ले.—श्री. ना. बनहट्टी, एम्. ए.

प्रास्ताविक–एक मूलभूत गैरसमज–आस्तिक्ययुक्त धर्माभिमान हाच जन्मस्वभाव ( ९६–१०१ ), हिंदुधर्मच सर्व धर्मांत श्रेष्ठ- वैयक्तिक आचरण, नित्य धर्माचारांकडे दुर्लक्ष–बाह्य संस्कार व विधि यांची धर्मास आवश्यकता (१०१–६ ), निरनिराळ्या धर्मविषयक चळवळी–तेजीयसां न दोषाय वन्हेः सर्वभुजो यथा । –स्वाभिमानाच्या पायावर उभारलेली धर्मबुद्धि–केसरीद्वारां व व्याख्यानद्वारां धर्मजागृति–( १०६–११ ), धर्मदूषकांचा खरपूस समाचार–आर्तत्राणाय मे शस्त्रं न प्रहर्तुमनागसि । –धर्मचालना व धर्मनियमन–पीठस्थ शंकराचार्यांबद्दल आदरभाव ( १११–१७ ), पतितपरावर्तन व परधर्मीयांचें अभ्यावर्तन–धर्माचे दोन विभाग–टिळकांचें तत्वज्ञान–गीतेचें तात्पर्य–तत्वज्ञानविषयाचा एक कोशच–धर्मांत आचाराचें प्राधान्य ( ११७–२४ ), समाजविषयक आचार, चातुर्वर्ण्य व जातिभेद–अस्पृश्यता–कोंकणस्थ, देशस्थ, कऱ्हाडे–गृह्य संस्कार; वेदोक्त संस्कारांबद्दलचा वाद ( १२४–३० ), विवाहविषयक सुधारणा; पुनर्विवाह–पारमार्थिक आचार ( १ ) श्रौत यज्ञयाग ( २ ) उपासना ( ३ ) भक्ति ( १३०–३५ ), अखंड ईश्वरभक्ति–अलौकिक यश व कीर्ति हाच ईश्वरी प्रसाद ( १३५–३८ ), इतर थोर पुरुषांची धर्मबुद्धि–विष्णुशास्त्री चिपळूणकर–न्यायमूर्ति रानडे–आगरकर–जिनसीवाले व टिळक ( १३८–४३ ), अवघे देखे जन ब्रह्मरूप (१४४).

**निबंध चौथा**........................................पृष्ठें. १४५ ते १७९

ले.—शं दा. पेंडसे, एम्. ए. एम्. ओ. एल्.

मतवैचित्र्य–हिंदुधर्माचें लक्षण–व्यावर्तक लक्षणावरील आक्षेप (१४५–९), धर्माचे दोन विभाग–आध्यात्मिक मतें–शंकराचार्य व टिळक–निष्ठा व मार्ग–

मूर्तिपूजा–भक्तिमार्गावरील जुना आक्षेप–भक्तिमार्गावरील नवा आक्षेप (१४९–५७), स्मार्त आणि भागवत–कर्मयोग–प्रवृत्तिस्वातंत्र्य–वासनाक्षय–यज्ञचक्र आणि निष्काम कर्मयोग (१५७–६४), संस्कार–चातुर्वर्ण्य–वेदोक्त–व्यवहार(१६४–७० ), स्वधर्मप्रसार–टिळक आणि रामदास–टिळकांची धर्मबुद्धि–टिळकांची ईश्वरनिष्ठा ( १७०–७५ ).

**निबंध पांचवा............................पृष्ठें. १७६ ते २०२**

ले.—श्री. शं. नवरे, बी. ए.

टिळकांचीं धार्मिक मतें समजून कां घ्यावयाचीं ?–धार्मीक मतांत सामाजिक मतांचाहि अंतर्भाव करावा लागेल–विषयाचीं साधनें ( १७६–७ ), टिळकांच्या धर्मबुद्धींत युक्ति व श्रद्धा या दोहोंचा मिलाफ होता–अद्वैतवेदान्ती–निष्काम कर्मयोगी–वैय्यक्तिक मोक्षापेक्षां सामाजिक मोक्ष श्रेष्ठ–कर्मयोगी कसा असावा–धर्मशास्त्र व नीतिशास्त्र यांचा परस्परसंबंध–सिद्ध मनुष्याचें व्यावहारिक वर्तन–विश्वबंधुत्व ( १७७–८३ ), टिळकांचें हिंदुधर्माचें लक्षण–'वेदप्रामाण्य' म्हणजे काय ?–साधनानामनेकता–उपास्यानामनियमः–हिंदु विधि व संस्कार ( १८३–८७ ), आर्यसमाज, ब्रह्मसमाज 'हिंदु' आहेत काय ?–पतितपरावर्तन–धर्मसंघटना–चातुर्वर्ण्य व जातिभेद ( १८७–९० ), जातिभेद–आश्रमव्यवस्था–वेदोक्त–अस्पृश्यता ( १९०–४ ), टिळकांची चळवळीची दिशा–हिंदु रिवाज–बालविवाह, विधवाविवाह, मिश्रविवाह, ब्राह्मण पोट जातींत विवाह इ.–सुधारणा कशी घडवून आणावी ( १९४–८ ), टिळकांचा गृहाचार–त्यांच्या आचरणाविषयीं आणखी माहिती–टिळकांचीं मतें बदलत गेलीं काय ?–धर्मसुधारणेचा मार्ग–आर्यधर्मीयांचें भावी कर्तव्य ( १९८--२०२ ).

**निबंध सहावा...........................पृष्ठें. २०३ ते २२६**

ले.—का. र. वैशंपायन.

उपोद्घात–आलोचन–सप्रमाण मतविवेचन--मूर्तिपूजा--संस्कार व आचार ( २०३--९ ), राष्ट्रप्रगति व धर्मशिक्षण–धर्मैक्य-विद्यार्थी व धर्मशिक्षण–धर्म आणि नीति (२०९-१५), सामाजिक आणि धार्मिक (२१५-२३), आख्यायिका–उपसंहार–पुरवणी, लोकमान्यांचीं ओजस्वी वचनें ( २२३–२६ ).

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वकक्ष
नमुना ...५७०२९... दि: ...[illegible]...
क्रमांक ...२१५५... नों. दि. ...२।८।८७

# लो. टिळकांची धर्मबुद्धि
# व
# धर्मविषयक मतें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १८१६०
शाखा (स्थळ प्रत)

## निबंध पहिला

( ले. प्रभाकर वासुदेव बापट, बी. ए. )

"Ever work unattached. The works of Vidyasagar are good, because he tries to be self-less......None can escape work. Therefore work, but dedicate its fruit to god."

भगवान् श्रीरामकृष्ण.

व्यक्तीच्या आयुष्यांत इतर पुष्कळ बाबतींत जसा फरक होत जातो तसा तो त्याच्या मनाच्या वृत्तींत व कल्पनांतहि पडत जातो. नवीन नवीन गोष्टी त्याच्या अवलोकनांत येतात, नवीन नवीन अनुभव त्याला येत असतात, त्याचें परिशीलन वाढत जातें, याच्या योगानें त्याच्या बुद्धीचा जसजसा विकास होत जातो, तसतसा त्याच्या विचारांत व कल्पनांत बदल होत जातो; जुन्या कल्पना नाहींशा होऊन पुष्कळ वेळां अगदीं नवीनसुद्धां त्या जागीं येतात किंवा पूर्वींच्याच अव्यक्त स्वरूपांत असलेल्या व्यक्त स्वरूपांत येतात. याप्रमाणें मनुष्याच्या बुद्धीचा सारखा विकास होत असल्यामुळें, ती आयुष्याच्या आरंभापासून शेवटपर्यंत एकच स्थिर नसून निरनिराळे वेळीं निरनिराळ्या वृत्तीची असते. ही गोष्ट सामान्य माणसाच्या बाबतींत जर एकपटीनें खरी असली तर थोर व विचारी लोकांच्या बाबतींत किती तरी जास्त पटीनें खरी आहे. साधारण मनुष्याची दृष्टि, त्याच्या स्वतःच्या व्यवसायांत व परिस्थितींतच विशेष गुंतून राहिली असल्यामुळें, सभोंवतालीं घडणाऱ्या बारीकसारीक तर राहोच, पण मोठाल्या गोष्टींचाहि तिच्यावर परिणाम होत नाहीं. पण मोठ्या माणसांची दृष्टि स्वभावतः विचारी, अवलोकनशक्ति जास्त सूक्ष्म, बुद्धि जास्त प्रगल्भ व परिशीलनाहि जास्त खोल असल्यामुळें, त्यांच्या बुद्धींत हा फरक—ही नवीन अनुभवांची जुन्या कल्पनांशीं जुळणी ( adjustment )—सतत सुरू असते.

इतकेंच नव्हे, तर मोठ्या लोकांचीं चरित्रें एका दृष्टीनें याचमुळें मनोवेधक व आदर्शभूत होतात. विशेषतः धर्म व तत्त्वज्ञान याविषयींच्या विचारांत व कल्पनांत तर हा फरक फार मोठ्या प्रमाणांत होत असतो. थोरो, इमर्सन्, रस्किन् या पाश्चात्य तत्त्वज्ञान्यांचीं चरित्रें लक्षपूर्वक पाहिलीं असतां ही गोष्ट चांगली दिसून येते. साधूसंतांच्या बाबतींतहि ही गोष्ट खरी आहे. त्यांच्या बुद्धीची परिणति आरंभापासून क्वचित् ठिकाणींच असून, अनेक साधनांनीं मानसिक प्रगति करीत करीत मगच शेवटीं त्यांनीं उच्च आध्यात्मिक अवस्था प्राप्त करून घेतलेली असते; व म्हणूनच स्वामी शारदानंदजींनीं म्हटल्याप्रमाणें, साधुसंतांच्या शेवटच्या परिणतावस्थेच्या इतिहासापेक्षां त्यांनीं पूर्ववयांतच ईश्वरप्राप्तीकरितां प्रचंड प्रयत्न करून स्वतःची कशी उन्नति करून घेतली, त्यांना आपल्या आशा-निराशांशीं कसें झगडावें लागलें, आपले दोष व अडचणी यांवर त्यांनीं कसे जय मिळविले याचा इतिहासच त्यांच्या भक्तांना व अनुयायांना जास्त मार्गदर्शक झाला पाहिजे. याच सर्वसाधारण नियमाप्रमाणें, लोकमान्य टिळकांच्या धर्मविषयक बुद्धींत व मतांत फरक पडलेला दिसून येतो; व म्हणूनच त्यांच्या धार्मिक बुद्धीचा व मतांचा विचार करतांना ही गोष्ट आपण लक्षांत ठेवली पाहिजे. अशाच ऐतिहासिक दृष्टीनें या निबंधांत त्यासंबंधीं विचार करण्याचें योजिलें आहे. परंतु टिळकांच्या धार्मिक बुद्धींत व धर्मविषयक मतांत हा फरक होत गेला ही गोष्ट जरी निःसंशय असली, तरी त्यांचें सर्व आयुष्य राजकारणादि इतर व्यवसायांतच गेल्यामुळें, व धर्मावरील आपल्या विचारांना त्यांनीं फारशी परिस्फुटता न दिल्यामुळें, त्यांच्या आयुष्यांतील त्यांच्या धर्मबुद्धीचा हा विकास सूक्ष्म दृष्टीनें आपल्या नजरेस येणें शक्य नाहीं. तरी पण ऐतिहासिक दृष्टीनें केलेल्या विवेचनाखेरीज दुसरी जास्त समर्पक व योग्य पद्धति नसल्यामुळें, आपल्याला जशी माहिती मिळेल तशी घेऊन, त्यावरून स्थूलरूपानें व अनुमानाच्या साहाय्यानें आपणास जे सिद्धांत काढतां येतील ते काढून, त्यावरच समाधान मानण्याखेरीज दुसरा मार्ग नाहीं. या निबंधांत याप्रमाणें टिळकांच्या धार्मिक बुद्धीचा व मतांचा त्यांत होत गेलेल्या बदलाच्या दृष्टीनें विचार करावयाचा असल्यामुळें, आधींच धर्म म्हणजे काय, धार्मिक बुद्धीचे प्रकार किती आहेत, वगैरे चर्चा करण्याऐवजीं टिळकांच्या बुद्धीचा विकास पहातांना वेळोवेळींच त्याचा विचार करणें योग्य होईल.

प्रत्येक मनुष्याच्या बुद्धीचा विकास, त्याच्या कल्पना किंवा विचार हीं जितकीं त्याच्या स्वतःच्या विचारशक्तीच्या कर्तबगारीवर अवलंबून असतात, तितकीच त्याच्या भोंवतालची परिस्थिति, लहानपणीं त्याच्यावर घडलेले संस्कार, व ज्या कालांत तो आपलें जीवितकार्य करतो तो काळ, यांवर अवलंबून असतात; व थोर मनुष्य आपल्या बुद्धीच्या जोरावर स्वतंत्र विचार करून, ह्या भोंवतालच्या

परिस्थितीला व काळालाहि नवीन वळण देऊं शकतो व देतो, किंबहुना ह्यांतच त्याचें श्रेष्ठत्व असतें ही गोष्ट खरी असली, तरी त्याला सुद्धां या मर्यादांचें सर्वस्वी अतिक्रमण करतां येत नाहीं. उलट त्यांचाहि ठसा त्याच्या बुद्धीवर व कार्यावर उमटलेला असतो म्हणून त्याच्या बुद्धीचा व कामगिरीचा विचार करतांना ह्या परिस्थिति आदिकरून गोष्टी लक्षांत घेणें जरूर असतें. ह्या दृष्टीनें पाहिलें असतां, टिळकांच्या धार्मिक बुद्धीचा व सभोंवतालच्या परिस्थितीचा निकट संबंध आपणास दिसून येतो. टिळकांचें लहानपण अगदीं जुन्या प्रवृत्तीच्या व जुन्या समजुतीच्या धार्मिक माणसांत गेलें. त्यांच्या घरची मंडळी, विशेषतः आई, हीं अशा तऱ्हेनें जुन्या वळणाचीं असल्यामुळें त्यांच्यावरचे संस्कार तशाच प्रकारचे झाले. 'मुंज होण्यापूर्वींच ब्रह्मकर्माचा बहुतेक भाग पाठ झाला होता.'+ दहा वर्षांपर्यंत टिळकांचें आयुष्य रत्नागिरीस अशा जुन्या वातावरणांत गेलें. व ह्याच आयुष्याच्या काळांत मनावर चिरस्थायि संस्कार होत असतात. या लहानपणच्या कोंवळ्या बुद्धींत, धार्मिक आईच्या सहवासांत त्यांच्या मनावर जो धार्मिक संस्कार उठला असेल तो किती जोराचा असेल त्याची कल्पना आपणास सहज करतां येईल. कार्लाईलनें एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, धर्म-मंदिरांत, माझ्यासमोर प्रार्थना करतांना, माझ्या आईच्या डोळ्यांतून सद्गदित होऊन जे अश्रु बाहेर पडले त्यांचा परिणाम आमरण माझ्यावर टिकला. दहाव्या वर्षींच टिळक पुण्यांत आले. पुणें हें आतांप्रमाणें, तेव्हांहि बुद्धीचें व शिक्षणाचें आगर असून, तेथें सर्व तऱ्हेच्या मतांचे पुढारी लोक होते व म्हणून शिक्षण घेण्यास पुण्यास आल्यावरच टिळकांच्या खऱ्या 'बौद्धिक आयुष्यास' सुरुवात झाली, असें म्हणण्यास हरकत नाहीं. टिळकांची बुद्धि जात्या फार तीक्ष्ण असल्यामुळें पहिली पांच सहा वर्षें जरी या वातावरणाचा त्यांच्यावर विशेष दृश्य परिणाम झाला नसला तरी निरनिराळे संस्कार होतच असतील, व पुढें टिळकांच्या कॉलेजमधील अभ्यासक्रमास सुरुवात होण्याचे वेळेपासून पुण्यांतील विविध प्रकारच्या नवीन विचारांची त्यांच्यावर जोराची प्रतिक्रिया सुरू झाली असली पाहिजे, व अशा तऱ्हेची वस्तुस्थिति असल्याचें खुद्द टिळकांनींच पुढें एका व्याख्यानांत सूचित केलें आहे. पण ही प्रतिक्रिया व तिचे परिणाम सांगण्यापूर्वीं आपणास या नवीन विचारांचें स्वरूप थोडें पाहिलें पाहिजे, म्हणजे टिळकांच्या धार्मिक मतांचें स्वरूप कळण्यास अडचण पडणार नाहीं. महाराष्ट्राची धार्मिक परिस्थिति यावेळीं फार चमत्कारिक झाली होती. तिचें वर्णन सुदैवानें आपणांस तत्कालीन वाङ्मयांत पहावयास सांपडतें. परंतु तिचें सर्व वर्णन न करितां त्यापैकीं जिचा टिळकांच्या मनावर परिणाम होणें शक्य

+ टि. च. पा. २१

होतें व तो तसा घडला, त्या सुशिक्षितांतील धार्मिक परिस्थितीविषयीं थोडा विचार केला तरी आपलें काम भागण्यासारखें असल्यामुळें तेवढ्याचाच येथें थोडक्यांत विचार केला आहे.

टिळकांच्या विद्याभ्यासाचा हा काळ म्हणजे हिंदुधर्माला सर्वांत अवनतीचा काळ येऊन गेल्यावर थोड्या वर्षांनंतरचा होय. एका बाजूस सर्व चेतना नष्ट झाल्याप्रमाणें मृतप्राय होऊन अत्यंत अवनतीस पोंचलेला हिंदुधर्म, त्याचे दुर्बल व कर्तव्याधिकारच्युत धर्माधिकारी, व त्याच्यावर हल्ला करणारे परधर्मीय मिशनरी, तर दुसऱ्या बाजूस इंग्रजी विद्येचा प्रसार झाल्यामुळें, पाश्चात्यांकडील बुद्धि व प्रत्यक्ष प्रमाण याला श्रेष्ठ मानून तदनुरोधानें आपल्या कर्तव्याचा विचार करणाऱ्या तत्त्वज्ञान्यांचे अनुयायी बनल्यानें, धर्माविषयीं उदासीन असणारे सुशिक्षित, यांमध्यें हिंदुधर्माची स्थिति फार भयंकर झाली होती. या वेळीं सुशिक्षित लोकांस नवीन विचारांच्या योगानें हिंदुधर्माच्या अवनत स्वरूपांत ज्या वाईट चाली रूढ होत्या त्यांचा तिटकारा उत्पन्न होऊन पाश्चात्य धोरणानें त्या सुधारण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू होता. पण हे सर्व प्रयत्न पाश्चात्य सुधारणेचें अंध अनुकरण करणारे आणि पूर्वपरंपरा, हिंदुतत्त्वज्ञान, व हिंदुसंस्कृति यांना अजीबात सोडून असल्यामुळें, हिंदुधर्माच्या आधींच असलेल्या मुमूर्षु स्थितींत त्याला आणखी एक धक्का बसला. हिंदुधर्म बुडतो कीं काय अशी स्थिति उत्पन्न झाली व ही भीति पुढेंहि पुष्कळ वर्षें कांहीं लोकांस वाटत होती. धर्माला राष्ट्रदृष्ट्या कांहीं एक महत्त्व आहे, ही गोष्ट कोणाच्याच लक्षांतहि नसल्यामुळें, धर्माचें राष्ट्रीयत्व नाहींसें होऊन, पाश्चात्य अंध अनुकरणाच्या भरांत सुशिक्षित लोकांस कांहीं धरबंधच उरला नव्हता. परमहंस सभा हें एक त्याचें उत्कृष्ट उदाहरण आहे. पण लंबकाच्या एका बाजूच्या गमनाच्या शेवटल्या स्थितींतच जसा उलट गतीचा प्रारंभ होतो, तशी स्थिति सामाजिक आंदोलनाची असल्यामुळें, लवकरच प्रतिक्रियेला सुरुवात झाली व धर्माच्या तत्कालीन अवनत स्थितीची सुधारणा करण्याकरितां पंजाबांत आर्यसमाज व बंगाल्यांत ब्राह्मसमाज स्थापन झाले. Sir Valentine Chirol यांनीं आपल्या प्रसिद्ध पुस्तकांत, तत्कालीन हिंदुधर्मविषयक परिस्थितीचें व तींतून हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन करण्याचे जे 'अनंतस्वरूपा'त्मक प्रयत्न झाले, त्यांचें उत्कृष्ट चित्र रेखाटलें आहे. महाराष्ट्रांतील प्रतिक्रियेला मात्र सर्वांत उशीरां म्हणजे टिळक पुण्यांत आल्याच्या दुसऱ्या वर्षी प्रार्थनासमाजाच्या रूपानें सुरुवात झाली. धर्माचें राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्व, व त्याची व्यक्तीच्या उन्नतिकरितां, त्याला अनेक कुमार्गांपासून व स्वैराचरणापासून परावृत्त करून सन्मार्गाकडे खेंचून धरण्याचें साधन, या दृष्टीनें योग्यता, ही रा. ब. रानडे, डॉ. सर भांडारकर, वगैरे तत्कालीन पुढाऱ्यांच्या नजरेला येऊन, त्यांनीं धर्माचा प्रसार करून हिंदी राष्ट्राची उन्नति करण्याकरितां प्रार्थनासमाज स्थापन

केला. "प्रार्थनासमाज स्थापन होण्यास वास्तविक कारण म्हटलें असतां, या देशांतील इंग्रजी विद्येचा प्रसार हें होय. या विद्येचा प्रसार झाल्यापासून सुशिक्षित लोकांमध्यें सत्यासत्य, योग्यायोग्य, कर्तव्याकर्तव्य, याविषयीं विचार करण्याची शक्ति वाढत चालली. लोकरूढीस अनुसरून व धर्माच्या नांवानें ज्या गोष्टी आपण नेहमीं करतों त्यांत कित्येक अगदीं निरर्थक आहेत व कित्येक तर हानिकारक आहेत, याकरितां त्यांचा त्याग केला पाहिजे व कित्येक गोष्टींचा प्रचार आपणांत नाहीं, पण त्यांची फार आवश्यकता आहे, याकरितां त्या चालू केल्या पाहिजेत असें कित्येक सुशिक्षित लोकांस वाटूं लागलें."× या समाजांच्या उत्पादकांचा उद्देश, बंगालांतल्याप्रमाणें नवीन पंथ स्थापावयाचा नसून, हिंदुधर्मांतच राहून त्याची राष्ट्रीय धर्म या दृष्टीनें सुधारणा करण्याचा होता, हा एक वरील इतर समाजांपेक्षां यांत विशेष होता. याप्रमाणें सुधारणेच्या खऱ्या मार्गांपैकीं एक अंग त्यांनीं आपल्यांत जास्त आणलें होतें, तरीहि ही धर्मस्थापना करतांना त्यांनीं हिंदुधर्माच्या परंपरेकडे लक्ष दिलें नाहीं. त्यामुळें हिंदुधर्माच्या सुधारणेला त्याचा फारसा उपयोग झाला नाहीं. या समाजावर बंगाल्यांतील ब्राह्मसमाजाप्रमाणेंच प्राटेस्टंट ख्रिस्ती धर्ममताची धार्मिक आचार व तत्त्वज्ञान या दोन्ही बाबतींत छाप पडली आहे. टिळकांनीं पुढें एकदां वर्णन केल्याप्रमाणें* "सर्व धर्मांतील सार घेऊन या नवीन धार्मिक प्रवृत्तीच्या इंग्रजी सुशिक्षित लोकांनीं प्रार्थनासमाजादि पंचरसी नवीन धर्म बनविले; पण एकंदरीनें या मंडळींनीं धर्माच्या परंपरेचा उच्छेद केल्यामुळें बहुजनसमाजापासून ते दूर राहून जास्तच फुटाफूट झाली." असें जरी आहे तरी प्रार्थनासमाजानें धार्मिक आकांक्षा जाग्रत करण्याचें महत्त्वाचें काम केलें; पण हा काळ प्रार्थनासमाजाच्या आरंभाचा असल्यामुळें असे प्रार्थनासमाजिस्ट सुशिक्षित लोकहि थोडे होते. बहुतेक सुशिक्षित लोक धर्माविषयीं पूर्ण उदासीन होते. १८८१ च्या सुमारासमुद्धां डॉ. सर भांडारकर वगैरे प्रार्थनासमाजाचे अध्वर्यूंनीं जीं व्याख्यानें दिलीं आहेत त्यांवरून ही गोष्ट स्पष्ट होईल. तत्कालीन सुशिक्षितांची धर्माविषयीं उदासीनता, हीच गोष्ट त्यांच्या प्रत्येक व्याख्यानांत ध्रुवपदाप्रमाणें पुनः पुनः आढळते. सुशिक्षित लोकांची ही स्थिति जशी समाधानकारक नव्हती, तशीच किंबहुना त्यापेक्षांहि अधिक असमाधानकारक इतर लोकांची होती. 'थोडेंसें शिक्षण मिळवून नोकरींत शिरणाऱ्या वर्गास धर्मशिक्षण मिळण्याची संधीच नव्हती. हिंदुधर्माचें नांवहि त्यांच्या कानावर विशेषसें येत नव्हतें; आलें तर तें मिशिनरी शाळांतून परधर्माचें

---

× स. पां केळकरकृत 'मुंबई येथील प्रार्थनासमाजाची हकीकत.'

* टिळकांचें व्याख्यान "पंढरीची जत्रा." [या निबंधांत स्पष्ट नमूद केले नसेल तेथें बहुतेक सर्व अवतरणें टिळकांचीं व्याख्यानें व लेख यांमधील आहेत.]

येत असे. यामुळें हा वर्गहि उदासीन व बहुतेक श्रद्धाहीन बनला.'* बाकीच्या अगदीं अज्ञजनांनीं मात्र आपली धर्मपरंपरा कायम ठेविली होती. 'व साधुसंतांनीं घालून दिलेला मार्ग आपल्या ऐहिक व पारलौकिक कल्याणाचा आहे अशा दृढ श्रद्धेनें त्यांनीं तो अव्याहत कायम ठेवला.'* अर्थात् या लोकांस तात्त्विक बुद्धि नसल्यामुळें, धर्माचें खरें रहस्य कळून न येऊन, त्यांनीं साधुसंतांनीं उपदेशिलेला मार्ग व अनेक बरेवाईट रूढाचार व समजुती यांचें मिश्रण असलेला तत्कालीन हिंदुधर्म, जशाचा तसा, आंतील अतिहानिकारक गोष्टींसह, जुनें तें सर्वच सोनें, असें मानून अंधश्रद्धेनें जतन केला व कोणत्याहि सुधारणेला धर्मावरील हल्ला समजून, वाईट चालीहि न सोडण्याचा आग्रह धरिला. टिळक विद्याभ्यास करीत असतांना, महाराष्ट्रांतील धार्मिक परिस्थिति स्थूलमानानें वरीलप्रमाणें होती, व ही खालील विवेचन वाचतांना लक्षांत ठेविली पाहिजे. या पार्श्वभूमिकेवरच टिळकांचीं धार्मिक मतें व कामगिरी यांचें चित्र उठावदार दिसून येऊन त्यांतील रहस्य कळून येईल. टिळक या परिस्थितींतूच निर्माण झाले असल्यामुळें त्यांच्या धार्मिक मतांचा व कामगिरीचा हिच्याशीं निकट संबंध आहे. एवढें विवेचन केल्यानंतर आपण आतां पुन्हां टिळकांकडे वळूं.

टिळक पुण्यास आल्यानंतर, जसजसे इंग्रजी 'वाघिणी'चें दूध पिऊन सशक्त होऊं लागले, तसतसा त्यांच्यावरहि इंग्रजी विद्येचा, वरील सुशिक्षितांप्रमाणेंच परिणाम होऊं लागला. टिळकांची बुद्धि पहिल्यापासून फारच तीक्ष्ण, चिकित्सक व स्वतंत्र बाण्याची होती. कॉलेजमध्यें गेल्यावर त्यांच्यावर कोणाचाहि दाब नव्हता, व त्यामुळें पाश्चात्य विद्येच्या अभ्यासानें व परिशीलनानें त्यांची आधीच स्वतंत्र असलेली बुद्धि, जास्तच संशयी आणि चिकित्सक बनली. 'टिळकांची अभ्यास करण्याची पद्धतहि विवेचक बुद्धीची असे'+ व स्वतंत्रपणा तर इतका होता कीं, त्यांना आवडणाऱ्या स्पेन्सरविषयीं सुद्धां 'स्पेन्सर असा कोण होता ? त्याचें म्हणणें मला पटलें तरच मी मान्य करीन. ईश्वरानें मनुष्याला विचार करण्यालाच बुद्धि दिली आहे.' असें ते म्हणत. आगरकरांप्रमाणेंच टिळकहि 'तर्कऋषीला'च पहिला मान देत. व त्यांची तर्कबुद्धि इतकी तीक्ष्ण होती कीं, आगरकर टिळकांना 'उपजत नैय्यायिक' म्हणत असत. त्यांच्या मनांत नैसर्गिक श्रद्धेचा अंश फार कमी होता, व हें त्यांनीं स्वतःच पुष्कळवेळां बोलूनहि दाखविलें आहे. तेव्हां हिंदुधर्मातील शास्त्राज्ञांना किंवा हिंदुधर्माचें परिपालनव्रत ज्यांच्यावर पडलें आहे त्या अज्ञ पुरोहितांच्या म्हणण्यास, केवळ शास्त्राज्ञा किंवा धर्माज्ञा म्हणून टिळक मान देतील हें संभवत नाहीं. कॉलेजमध्यें असतांनाच वादविवाद करतांना त्यांनीं आगरकरांना 'माझे

---

* टिळकांचें व्याख्यान 'पंढरीची जत्रा.' + टि. च. पा. ४१.

या विषयावर अजून पक्के विचार तयार व्हावयाचे आहेत. तुम्ही सांगितलेले सर्व विषय खरोखरच विचार करण्यासारखे आहेत व याचा विचार आजच्या सुशिक्षित तरुणांनीं करावयाचा आहे'+ असें सांगून टाकिलें होतें. अशा तऱ्हेची बुद्धीला प्रधान मानणारी व श्रद्धेचा अंश फारच कमी असणारी अशी, त्यांची मनोरचना असल्यामुळें, यावेळीं त्यांच्यावर तर्कालाच प्रधान मानून जीविताची चर्चा करणाऱ्या इंग्रजी तत्त्ववेत्त्यांची साहाजिकच छाप पडली असली पाहिजे. यावेळीं त्यांनीं गीताहि वाचिली होती व थोडें आणखीहि पौर्वात्य धार्मिक वाङ्मय वाचलें असेल. पण यांचा किंवा लहानपणच्या धार्मिक संस्कारांचा त्यांच्या बुद्धीवर फारसा पगडा बसला नाहीं. इंग्रज लोकांची तर्कशुद्ध विचारसरणी, व त्याच्यावरच अवलंबून त्यांनीं आयुष्यांतल्या नेहमींच्या गोष्टींची केलेली व्यवस्था, त्यांचा उज्ज्वल इतिहास, स्वदेशाच्या स्वातंत्र्याकरितां त्यांनीं केलेले अपूर्व स्वार्थत्याग व त्यांच्यामधील मानवजातीच्या उद्धारार्थ झालेले प्रयत्न यांचा टिळकांच्या बुद्धिप्रधान मनोभूमिकेवर चांगलाच परिणाम झाला असला पाहिजे. व तसा तो झाल्याचें त्यांनीं स्वतःच कबूल केलें आहे. मिल्, आणि स्पेन्सर यांनीं सांगितलेलें 'मानव जातीच्या कल्याणाकरितां स्वातंत्र्याचे' ध्येय त्यांच्या विवेकबुद्धीला पटून आवडूं लागलें, व यांतच या सुमारास देशाच्या उन्नतिविषयीं महाराष्ट्रांत व इतर हिंदुस्थानांत चाललेल्या चळवळींचाहि परिणाम होऊन, दैन्यावस्थेंत पडलेल्या दुर्दैवी हिंदुस्थानच्या उन्नतीकरितां आपल्याला परिश्रम केले पाहिजेत असे विचार त्यांच्या मनांत घोळूं लागले. हें पाश्चात्य शिक्षणानें उत्पन्न केलेलें नवीन समाजसेवेचें ध्येय व हिंदूंच्या धर्मशास्त्रांतील मोक्षप्राप्तीचें ध्येय यांबद्दल त्यांचे मनांत द्वंद्व उत्पन्न होऊं लागलें. टिळकांनीं त्यावेळच्या आपल्या मनःस्थितीचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे. ते म्हणतात,:—

"When I was quite a boy, I was told by my elders, that strictly religious and really philosophic life was incompatible with the humdrum life of every day, If one was ambitious enough to try to attain मोक्ष the highest goal a person could attain, then he must divest himself of all earthly duties and renounce the world. One could not serve two masters, the world and the God. This set me a-thinking. The question that I formulated for myself to be solved was "does my religion want me to give up this world and

+ टि. च. पा. ४४–४५

renounce it before I attempt to or in order to be able to attain the perfection of manhood?"+ टिळकांनीं हें स्वतःच्या त्यावेळच्या मनःस्थितीचें रेखाटलेलें शब्दचित्र फार महत्त्वाचें आहे. कारण हें ज्याप्रमाणें, त्यावेळच्या त्यांच्या कल्पनांचें सूचक आहे, त्याप्रमाणेंच ह्यांतच त्यांनीं पुढें केलेल्या धार्मिक कामगिरीचें बीज आहे. कारण त्यांनीं केलेली मोठी धार्मिक कामगिरी म्हणजे याच प्रश्नाचें त्यांनीं सोडवलेलें उत्तर होय; याचा पुढें विचार होईलच; सध्या आपणास एवढेंच पहावयाचें आहे कीं, त्यावेळीं त्यांचे मनांत या दोन ध्येयांबद्दल झगडा चालू होता, व विवेकबुद्धीवर विश्वास ठेवून त्यावेळेपुरतें तरी त्यांनीं पौर्वात्य ध्येय मागें सोडून पाश्चात्य समाजसेवेचेंच ध्येय मान्य केलें, व आपल्या मातृभूमीच्या उद्धाराकरितां जीवित वेंचण्याचें ठरवून प्रथमच 'स्वतःच्या देशाचें शिक्षण स्वतःच्या हातांत घेण्याचें ठरविलें.' आगरकरांनीं, 'डोंगरींतील १०१ दिवसांत,' त्यांच्या व टिळकांच्या डेक्कन कॉलेजांत होणाऱ्या वादविवादाचें जें चित्र दाखविलें आहे, त्यावरून टिळकांच्या त्यावेळच्या मनःस्थितीची कल्पना येऊन, धर्मापेक्षां राष्ट्राच्या सर्व बाजूंच्या संवर्धनाकडेच त्यांचें सर्व लक्ष कसें वेधून राहिलें होतें हें स्पष्टपणें दिसून येतें.

जीवनोद्देश व मनुष्याचें येथील श्रेष्ठतम कर्तव्य याबद्दल टिळकांनीं इंग्रजी विद्येनें शिकविलेलें ध्येय पसंत केलें, तरी ते स्वतःस हिंदुधर्माचे म्हणवीत असल्यामुळें आचारात्मक हिंदुधर्म त्यांस सुटत नव्हता, म्हणून त्यासंबंधीं त्यांचीं मतें आपणांस पाहिलीं पाहिजेत. हिंदुधर्मांतील वाईट चालींची हानिकारकता व त्यांतील कांहीं गोष्टींचा फोलपणा, इतर सुशिक्षितांप्रमाणें टिळकांच्याहि नजरेस आला असलाच पाहिजे, कारण हे सर्वहि एकाच शिक्षणसंस्कृतीचे वारसदार होते. शिवाय त्यावेळीं त्यांचें वातावरणहि तसेंच होतें. आगरकरांसारख्या बुद्धिमान्, स्वार्थत्यागी व टिळकांवर वजन पाडूं शकणाऱ्या जिवलग मित्राच्या तर्कशुद्ध कोटिक्रमानें, त्यांच्या स्वभावतः विचारी प्रवृत्तीवर निःसंशय परिणाम झाला असला पाहिजे; व मुळांत लहानपणची धार्मिक बुद्धि असली, तरी रूढ हिंदुधर्मांतील विलक्षण संकुचितपणा, धर्माच्या नांवाखालीं उघड उघड होणारे हजारों अन्याय, त्यांतील भेदबुद्धीमुळें राष्ट्रीय ऐक्याला होणारा विघात, व या सर्वांपेक्षां त्यांतील तत्त्वज्ञानविषयक चुकीच्या कल्पनेनें एकंदर आयुष्याविषयीं पसरलेला निराशावाद, यांमुळें त्यांच्या मनांत धर्माविषयीं अश्रद्धा उत्पन्न झाली असल्यास नवल नाहीं. तसेंच हिंदुधर्माच्या आचारांचें व्यक्तिशः परीक्षण करतांना, त्यांतील कांहीं अगदीं निरर्थक, कांहीं

---

+ उमरावती येथील व्याख्यान १९१७, B. G. Tilak; Writing and speeches p. 231 Ganesh & Co.

विपर्यस्त स्वरूपांत असल्यामुळें अगदींच हास्यास्पद, तर कांहीं खऱ्या धर्माच्या दृष्टीनें पाहतां अधार्मिक व अनीतिमान्, व फार थोडे चांगले, मूळच्या शुद्ध स्वरूपांत आहेत, व बहुतेक सर्वच ठिकाणीं मूळचा उद्देश विसरून जाऊन नुसतें बाह्य स्वरूप मात्र राहिल्यामुळें, अज्ञ समाज हे आचार योग्य भावनेशिवाय, सामान्य धर्मभावनेनें एकाद्या पोपटाप्रमाणें करीत असतो, हें त्यांच्या शोधक व व्युत्पन्न बुद्धीस आढळून आलें असेल. इ.स. १८८५ सालीं, कीर्तन्यांच्या हिंदुधर्मावरील निबंधावर टीका करतांना, केसरीकारांनीं अशा तऱ्हेची अश्रद्धा तत्कालीन ' प्रत्येक ' सुशिक्षिताच्या मनांत उत्पन्न होत असे असें म्हटलें आहे. याप्रमाणें हिंदुधर्माच्या रूढ स्वरूपांतील दोष कळून आल्यावर, अशा अवनत हिंदुधर्मांत सुधारणा होणें अत्यंत अवश्य आहे असें आगरकरां-प्रमाणें त्यांचेंहि मत असावें, व असें मत त्यांनीं वेळोंवेळीं आपल्या भाषणांतून व लेखांतून पुढें प्रगटहि केलेलें आहे; फक्त त्यांच्यात व आगरकरांत सुधारणा कशी व केव्हां करावी याबद्दलच मतभेद होता. हिंदी जनतेच्या स्थितीवर टीका करतांना, ' टिळक, तुमची आमची गोष्ट निराळी आहे ' अस आगरकर म्हणत असत, असें उपासनींनीं प्रसिद्ध केलें आहे. याप्रमाणें हिंदुधर्माबद्दल व त्यांतील अचाराबद्दल तात्त्विक दृष्ट्या त्यांचीं मतें होतीं व त्यांत सुधारणा करणें त्यांना इष्ट वाटत होतें, तरी स्वतः हिंदूंचे सर्व धार्मिक आचार ते पाळीत असत. खाजगी धार्मिक आचरणाचा प्रश्न एका दृष्टीनें स्वतंत्र असल्यामुळें येथेंच त्याचा विचार केल्यास सोयीचें होईल, म्हणून तसें केलें आहे.

टिळक रत्नागिरीस घरीं असतांना किंवा पुण्यासहि कॉलेजांत शिरेपर्यंत जुन्या वळणानेंच वागत असतील हें सांगण्याची जरूरी नाहीं; पण पुढें स्वतंत्रता मिळाल्यावरहि कॉलेजांत असतांना 'त्यांच्या वागणुकींत धर्मनिष्ठपणा दिसून येत असे.'+' सोवळें परिधान करण्याचा हा किरकोळ प्रकार आहे, न केल्यास भयंकर पाप लागतें असें नाहीं,' असें जरी त्यांचें मत होतें, तरी ते कधींहि न चुकतां सोवळें नेसत, व त्यांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें ते त्याचें समर्थनहि करीत. या वेळेला त्यांना आचारामध्यें कांहीं विशेष आहे, किंवा आचार हाच धर्म आहे असें वाटत असेल असें वाटत नाहीं. उलटपक्षीं त्यांना तसें वाटत नसावें, असेंच अनुमान काढण्यास आपणास जागा आहे. पण पुढेंहि, पाश्चात्य तत्त्वज्ञान व हिंदुधर्म यांचा तत्त्वदृष्ट्या खोल अभ्यास केल्यावर धर्माचें रहस्य कळून येऊन, आचार व धर्म यांचा परस्परसंबंध समजल्यावरहि, ते सर्व आचार पाळीत असत. वयाच्या शेवटापर्यंत ते सोवळें नेसत होते, इतकेंच नव्हे, तर इतरांनीं तसें करण्याबद्दल त्यांचा कटाक्ष असे. टिळकांनीं धार्मिक हिंदूंचा

---

+ टि. च. पा. ४०

कोणताहि आचार सोडला नाहीं. ते आपल्या मुलांची पांचवी सहावीसुद्धां पुजीत. येरवड्यास असतांना किंवा इतर प्रसंगांत जानवीजोड तुटण्याच्या आधीं मुद्दाम मागून घेत व तुरुंगांतून किंवा परदेशांतून आल्यावर त्यांनीं हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें प्रायश्चित्तेंहि घेतलीं. श्राद्ध आदिकरून नैमित्तिक कर्में ते कधींहि अंतरू देत नसत. ग्रामण्य प्रकरणांत भिक्षुक न मिळाल्यामुळें त्यांनीं आपलें कृत्य चटांवर उरकून घेतल्याचें प्रसिद्ध आहे. १९०२–३ चे सुमारास त्यांचे चुलते वारले, तेव्हां त्यांच्या क्रियेबद्दल प्रश्न निघाला असतां त्यांनीं ती स्वतः आस्थेनें केली. तसेंच शेवटपर्यंत श्रावणी वगैरे धार्मिक कृत्येंहि ते करीत. मुलांच्या लग्नकार्यांत आधुनिक याज्ञिकीप्रमाणें सर्व कृत्यें त्यांनीं यथासांग केलीं. यावेळीं संस्कारावर एक लेख लिहून त्यांचे धार्मिक जीवनांतील स्थान त्यांनीं स्पष्ट केलें होतें, व सर्व हिंदूंना एकच संस्कारपद्धति असावी, इकडेहि त्यांचा कल झुकत होता. त्यांनीं ह्या आचारांपैकीं केली नाहीं अशी एकच गोष्ट म्हणजे संध्या ही होय, व याबद्दल मला संध्या करण्याची जरूरी नाहीं असें ते बोलून दाखवीत. अशा तऱ्हेनें पहिल्यापासून शेवटपर्यंत, त्यांनीं आचारात्मक हिंदुधर्माचें परिपालन केलें आहे. पण यावरून असें म्हणतां येणार नाहीं कीं, ते 'आचारमार्गी' होते. त्यांच्या आचरणामध्यें श्रद्धेचा भाग फार थोडा होता. त्यांच्या मनाचा कल कर्ममार्गापेक्षां तत्त्वज्ञानाकडे जास्त होता, व शिवाय त्यांची भेदक बुद्धि, विद्वत्ता व शास्त्रीय अध्ययन यांमुळें त्यांना प्रचलित आचारांचें स्वरूपहि स्पष्टपणें कळून आलें होतें; म्हणून सामान्य लोकांची श्रद्धा त्यांचे ठिकाणीं असणें शक्यच नव्हतें. हे सर्व आचार पाळणें आपलें कर्तव्य म्हणून ते पाळीत. त्यांना त्याविषयीं विचारलें असतां हे आचार शिस्त ('discipline') म्हणून पाळले पाहिजेत, असें ते उत्तर देत. आपल्या एका लेखांतहि त्यांनीं हें मत प्रकट केलें आहे. 'धार्मिक किंवा सामाजिकरीत्या आपला विशिष्टपणा कायम राखण्याकरितां कांहीं प्रसंगीं अडचणहि सोसावी लागते व अशा प्रकारच्या अडचणी सोसण्यास लोकांस तयार करणें, हें धर्मशिक्षणाचें एक अंग आहे.' त्यांनीं प्रायश्चित्तें घेतलीं तीं पापशुद्धिकारक आहेत अशी त्यांची कल्पना नव्हती, कारण पाप घडलें असेंच त्यांना वाटत नव्हतें; पण इतर संस्कारांप्रमाणें हिंदू धर्माचा एक संस्कार म्हणून त्यांनीं तीं घेतलीं. अशा तऱ्हेचे त्यांचे विचार असल्यामुळें या आचारांविषयीं ते फारसे जपतहि नसत. प्रो. जिनसीवाले वगैरे मंडळी, टिळकांविषयीं प्रेम व आदर असून सुद्धां, त्यांच्याबरोबर जेवण्याचा प्रसंग आल्यास, या 'धर्मभ्रष्टाचें पान वेगळें मांडा' असें (विनोदानें कां होईना) म्हणत, यांतील बीज हेंच होतें. तसेंच दुसरीहि एक गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे कीं, जरूरीच्या प्रसंगीं त्यांनीं या आचारात्मक धर्माची काडीइतकीही किंमत बाळगिली नाहीं, व दुसऱ्यानें बाळगूं नये असा त्यांचा जोरा नसला, तरी ठाम मत होतें;

व या त्यांच्या अतिक्रमणाबद्दल, इतर बाबतींत ते सहसा समजाला दुखवीत नसल्यामुळें, समाजहि त्यांना त्रास देत नसे.

या त्यांच्या वर्तुणकीचा वरवर पहाणाराला उलगडा होत नाहीं, व त्वेषाचे भरांत टिळकांचे प्रतिस्पर्धी त्यांना भोंदू म्हणून नांवेंहि ठेवतात. पण थोडा खोल विचार केला तर या त्यांच्या विरोधी भासणाऱ्या वर्तनाचीं कारणें आपणांस दिसून येतील. त्यांपैकीं पहिलें कारण टिळकांच्या स्वभावांत सांपडतें. आधींच हिंदु लोकांचा स्वभाव स्थितिशील (Conservative) आहे, पण त्यांत सुद्धां अरविन्द बाबूंनीं म्हटल्याप्रमाणें टिळकांच्या मनाची ठेवण जास्तच स्थितिशील होती. होतां होईल तों जुनें न सोडण्याकडे व परंपरेला मान देण्याकडे टिळकांच्या मनाची स्वाभाविक ओढ असे. हा त्यांचा स्वभाव त्यांच्या इतर सर्व विचारांतहि प्रतिबिंबित झाला आहे. पण याबद्दल त्यांना नांवें ठेविण्याचें कारण नाहीं. हल्लींच्या आपल्या आधुनिक सुशिक्षितांकडे नजर फेंकल्यास आपल्यास तेंच आढळून येईल. समाज थोडा पुढें गेला असतांना सुद्धां, बहुतेक सर्वच ठिकाणीं विचार व आचार यांत पुष्कळच अंतर असून, अगदीं विचाराप्रमाणें वागणारा मनुष्य मिळणें दुरापास्त आहे, व या दृष्टीनें विचार करितां टिळकांस नांवें ठेविण्याचा कोणालाच नीतिदृष्टया अधिकार नाहीं. हिंदी लोकांचा स्वभावधर्म हें कारण वर सांगितलेंच आहे, पण अशी स्थिति थोड्याफार अंशानें प्रत्येक देशांत असते. मनुष्य हा स्वतंत्र व स्वयंपूरक ( Self-sufficient ) घटक नसून समाजाचा तो एक अवयव असतो, व अशा तऱ्हेनें समाजांत राहण्याची त्याला आवश्यकता असल्यामुळें, तेथें त्याच्या मनावर निरनिराळ्या दिशेनें बहुविध परस्परविरोधी आघात होत असतात; व सिस्टर निवेदिता यांनीं म्हटल्याप्रमाणें आयुष्यांतील सर्व व्यवहार तडजोडीनेंच चालले असल्यामुळें, इतर बहुविध नातीं कायम राखण्याकरितां त्याला पुष्कळवेळां स्वतःच्या इच्छेच्या व तत्त्वाच्या विरुद्धहि वागावें लागतें.

टिळकांच्या आचरणात्मक प्रवृत्तीचें दुसरें महत्त्वाचें कारण त्यांची लोकसंग्रहात्मक बुद्धि होय. कॉलेजांत विद्यार्थी असल्यापासून समाजाचा बुद्धिभेद करूं नये अशा प्रकारचीं त्यांचीं मतें होतीं. धार्मिक आचार हें एक सामाजिक बंधन आहे म्हणून दुसरें नवीन बंधन आणल्याशिवाय पहिलें तोडल्यास अनवस्था होईल असें त्यांना वाटत असे. त्यांच्या जुबिलीच्या प्रसंगीं टिळक दुसऱ्या एका विद्वान् शास्त्र्याजवळ बोलत असतांना खालीं मंत्रपठणांत कांहीं अननुरूप मंत्र म्हटले जात होते. ते शास्त्री, ब्राह्मणांस त्यांची चूक दाखविण्यास निघाले असतां, टिळकांनीं 'निष्कारण त्यांचा बुद्धिभेद करूं नका, त्यांच्या मार्गानें त्यांना जाऊं दे' असें म्हणून त्यांना थांबविलें. समाज सुव्यवस्थित ठेवण्याकरितां कांहीं बंधनें घातलेलीं असतात व तीं एकाद्या व्यक्तीला कितीहि निरर्थक वाटलीं

किंवा त्रासदायक झालीं तरी, तीं अनीतीचीं नसतील तर पाळलीं पाहिजेत. ही जबाबदारी सुशिक्षितांवर विशेष रीतीनें पडते कारण तेच समाजाचे नेते असतात. प्रत्येक समाजांत कांहीं रूढाचार (Social conventions) असतात व ते सर्वांनीं पाळण्यांतच त्याचें स्वतंत्र अस्तित्त्व व वैशिष्ट्य असतें.

याचें तिसरें कारण त्यांच्या राजकीय पुढारीपणांत आहे. पुढाऱ्याची समाजावर जशी सत्ता चालते तशी उलट समाजाचीहि पुढाऱ्यावर असते. पुढाऱ्याचे व अनुयायांचे परस्परसंबध कसे असावेत हा प्रश्न व्यापक म्हणून सोडून दिला, तरी सुधारणांचा इतिहास पाहतां पुष्कळ कार्यकर्त्या समाजनेत्यांना, समाजाला आपल्या बरोबर घेऊन जाण्याकरितां, स्वतःचें मतहि सोडून द्यावें लागल्याचें आढळून येतें. किंबहुना पुष्कळ वेळां सुधारणा यशस्वी करण्याचा हा एकच व्यावहारिक मार्ग असतो. राजकीय बाबतींत टिळकांनीं फार पुरोगामी धोरण स्वीकारल्यामुळें समाजाला आपल्याबरोबर नेण्याकरितां इतर बाबतींत त्यांची स्वतःची इच्छा असतांना सुद्धां त्यांना समाजाच्या पुढें जातां येईना.

पण या तीन कारणांशिवाय आणखी एक चवथें महत्त्वाचें कारण आहे. टिळकांचें घरचें वर्तन, विशेषतः त्याच्या हातून अबुद्धिपुरःसर घडून येत असलेले आचरण, ज्यानें सूक्ष्म रीतीनें पाहिलें असेल त्याला, त्यांच्या ह्या प्रवृत्तींत लहानपणीं त्यांच्या मनावर घडलेल्या धार्मिक संस्कारांचा कांहीं अंश असावा, असें वाटल्याशिवाय राहिलें नसेल. त्यांच्या विचारी बुद्धीनें, ‘ आचार म्हणजेच धर्म ’ असली त्यांची श्रद्धा उडवली असली, तरी तिला, त्यांच्या मनावरील ह्या संस्कारांचा पगडा कधींच घालवितां आला नसावा. पुष्कळ वेळां त्यांच्या हातून, न कळत, स्वाभाविक मनःप्रवृत्तीनेंच एकाद्या सामान्य धार्मिक माणसाप्रमाणें आचरण होत असे. अर्थात् याबद्दल टिळकांना दोष देणें योग्य होणार नाहीं. रोपट्याला कोवळेंपणीं मिळालेलें वळण पुढें कितीहि प्रयत्न केले तरी जात नाहीं. अशीच स्थिति बाळपणच्या संस्काराबद्दल असते. वर कार्लाईलचें जें वाक्य दिलें आहे त्यांतील बीज हेंच होय. मनुष्याच्या बुद्धीला भोंवतालची परिस्थिति व बाळपणाची शिकवण यांनीं जें वळण मिळतें तें सहसा जात नाहीं, इतकेंच नव्हे तर तारुण्यांत एकादे वेळीं बुद्धीच्या जोरामुळें अगर इतर व्यवसायामुळें तें मागें मागें पडलें तरी तो जोर कमी झाल्यावर पूर्वसंस्कार पुन्हां जागृत होतात. आपल्या इकडील व पाश्चात्य देशांतील विद्वान लोकांचीं चरित्रें पाहिलीं असतां अशी वस्तुस्थिति पुष्कळ ठिकाणीं दिसून येते. म्हणून टिळकांच्या विचारशक्तीचा त्यांच्या बालपणच्या धार्मिक बुद्धीवर फार परिणाम होऊं नये यांत त्यांचा दोष नसून तो मानवी बुद्धीच्या वाढीचा एक प्रकार आहे, एवढेंच आपणांस म्हणतां येईल.

या बाबतींत टिळकांची एका बाजूस आगरकर व दुसऱ्या बाजूस अण्णासाहेब पटवर्धन यांच्याशी तुलना केल्यास त्यांच्या वर्तणुकीवर जास्त प्रकाश पडेल. आगरकरांवर पूर्व संस्काराचा पगडा नव्हता व स्वभावतःहि 'रोम्यान्टिकपणा' मुरलेला, तेव्हां नवीन विचार पटल्याबरोबर एकदम बोलून दाखविण्यास व त्याप्रमाणें वागण्याचा उपदेश करण्यास ते तयार झाले. उलटपक्षीं अण्णासाहेब पटवर्धनांचीं पुढील आयुष्यांत धार्मिक मतें टिळकांच्या प्रमाणेंच होतीं व आचार हें धर्माचें बाह्यस्वरूप आहे वगैरे आचार-तत्त्वज्ञान जरी त्यांस पटलें होतें तरी ते सर्व आचार निष्ठापूर्वक पाळीत. याला कारण पूर्वसंस्कारांचा जोर व स्वभावांत तत्प्रतिरोधक चिकित्सक बुद्धीपेक्षां श्रद्धेचा भाग अधिक हें होय. अण्णासाहेब प्रथम आचारमार्गी होते; पुढेंहि ते आचारमार्गीच राहिले. टिळक या दोघांच्या मध्यें होत हें सांगण्याची जरूरी नाहीं. साधारणपणें एकाच विचाराच्या, संस्कृतीच्या व शिक्षणाच्या समान दर्जाच्या माणसांत याप्रमाणें जो फरक पडतो त्याला याप्रमाणें त्या व्यक्तींच्या स्वतंत्र विचारशक्तीबरोबरच त्यांचा विशिष्ट स्वभाव, लहानपणीं घरच्या शिक्षणामुळें व विशिष्ट परिस्थितीमुळें मिळालेले संस्कार व नंतरची सभोंवतालची परिस्थिति हीं कारणें असतात. कोणत्याहि देशांतील एकाच काळच्या थोर पुरुषांच्या चरित्रांचा अभ्यास केल्यास हें स्पष्टपणें दिसून देईल. टिळकांच्या आचारवियषक प्रवृत्तीच्या स्वरूपाचें याप्रमाणें विवेचन झाल्यावर आतां आपण आपल्या पूर्वीच्या विषयाकडे वळूं.

कॉलेजचें शिक्षण घेत असतां टिळकांच्या मनांत ध्येयाबद्दल झालेला कलह, हिंदुधर्माविषयीं थोडीशी मनांमध्यें उत्पन्न झालेली अश्रद्धा, वगैरेंचा पूर्वी उल्लेख केलाच आहे. समाजसेवेचें ध्येय मान्य करून स्वदेशाच्या उन्नतीकरितां खटपट करण्याचें ठरविल्याप्रमाणें त्यांनीं व आगरकरादि इतर मंडळींनीं उद्योग सुरू केले व लोकांना शिक्षण देऊन त्यांच्यांत जागृति करण्याकरितां केसरी वगैरे पत्रें काढलीं. ह्यावेळेस टिळकांचें सर्व लक्ष या उद्योगांतच गुंतून गेलें होतें. पण इंग्रजी विद्येनें त्यांच्या जुन्या वळणाच्या लहाणपणाच्या धार्मिक बुद्धीस धक्का बसला व त्यांनीं समाजसेवेचें पाश्चात्य ध्येय मान्य केलें तरी त्याच्या मनांतील कलह पूर्णपणें मिटला नव्हता, म्हणून ह्या विषयाचा खोल अभ्यास करण्याकरितां व स्वभावतः वाङ्मय वगैरेचा ऐतिहासिक दृष्ट्या चिकित्सक पद्धतीनें अभ्यास करून शोध लावण्याची आवड असल्यामुळें, त्यांनीं फुरसुतीच्या वेळीं हिंदुधर्मग्रंथांचा अभ्यास चालविलाच होता; व ह्याचाच परिणाम त्यांच्या आयुष्यावर पुढें झाला. पण आरंभीं मात्र त्यांच्या मनाला जी अनिश्चितता प्राप्त होती ती तशीच होती. ही अनिश्चितता उत्पन्न होणें, हा पाश्चात्य शिक्षणाचा एक नैसर्गिक परिणाम होतो. विवेकबुद्धीला व प्रत्यक्ष प्रमाणाला श्रेष्ठ मानून विचार करण्यास सुरुवात केल्यावर नाना प्रकारचे प्रश्न पुढें येऊन उभे राहतात, व त्याचें उत्तर देणें एकदम शक्य

नसतें. हें सभोंवतालीं पसरलेलें विश्व म्हणजे काय आहे ? त्याचा हेतु काय ? यांत मी जन्माला येण्याचा उद्देश काय ? ह्या जगांतील हा भीषण जीवनकलह कशाकरितां ? व 'ईश्वर असेल तर त्यानें हें संकटमय व पापी जग उत्पन्न करण्यांत कोणता दयाळुपणा दाखविला ?' वगैरे प्रश्नांनीं मनुष्य प्रथम भांबावून जाऊन तो साधारणपणें नास्तिक बनूं लागतो. कोणताहि विचारशील धार्मिक मनुष्य घेतला तर त्याच्या आयुष्यांत हा संशयाचा पडदा एकदां येत असतो; व याचें अस्तिपक्षी किंवा नास्तिपक्षी उत्तर दिल्याशिवाय त्याचें समाधान होणें शक्य नसतें. जगांतील सर्व थोर लोकांनीं या प्रश्नांचीं आपआपल्या परीनें स्वतःस समाधानकारक उत्तरें दिल्यावरच मग त्यांस शांति प्राप्त झाली. पुढें अत्यंत प्रसिद्धीस आलेले स्वामी विवेकानंद यांनीं विद्यालयाच्या परीक्षांचा अभ्यास करीत असतांना, मिल, स्पेन्सर वगैरेंचे ग्रन्थ वाचून, बुद्धीचा आश्रय केल्यामुळें, त्यांची सुद्धां दृष्टि अशीच संशयी झाली होती; व ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं शंका येऊन त्यांच्या मनाला सारखी तळमळ लागली. ही मनाची अशांतता सहन न होऊन, त्याचा एकदां पुरा शोध लावण्याकरितां, त्यांनीं प्रथम केशवचंद्र वगैरेकडे जाऊन नंतर श्रीरामकृष्णांकडे धांव घेतली व शेवटीं त्यांनीं त्यांचें समाधान केलें ही गोष्ट प्रसिद्ध आहे. मग हेच प्रश्न टिळक आगरकरांपुढें पडून त्यांच्या मनांत अनिश्चितता उत्पन्न झाली यांत नवल नाहीं. याच अनिश्चिततेंतून आगरकर पुढें पक्के नास्तिक बनून त्यांनीं तर्कबुद्धीनें सांगितलेलें सामाजिक ध्येय हेंच आपलें अंतिम साध्य ठरविलें; पण टिळकांच्या मनांत, आंतून बाळपणची धर्मबुद्धि असल्यामुळें, ते नास्तिक न बनतां तसेच अनिश्चयाच्या स्थितींत राहिले असावेत. सन १८८५ सालीं डेक्कन कालेजांतील वार्षिक समारंभाच्या दिवशीं, डॉ. भांडारकरांच्या व्याख्यानावर आगरकर उत्तरादाखल एकेश्वरीपंथ व सामान्य धर्म यांच्याविरुद्ध बोलले असतां टिळकांनीं त्यांस दुजोरा दिला होता, यामुळें रागावून जाऊन रानड्यांनीं इतरांबरोबर फर्ग्युसन कालेजांतील तरुण शिक्षकहि स्पेन्सर व मिलच्या अध्ययनानें कसे नास्तिक बनत चालले आहेत त्याचें वर्णन केलें आहे. तसेंच याच वेळेला—१८८० ते १८८७—केसरींतून धर्मावर चिकित्सक दृष्टीनें लेख आले आहेत. 'धार्मिक कल्पनांचा उदय, स्थिति व ऱ्हास' 'समाधान हेंच खरें सुख आहे काय ?' वगैरे लेख या सहसंपादकांच्या धर्माबद्दलच्या तात्त्विक कल्पनांचे सूचक असावेत. यांपैकीं १८८७ सालच्या दुसऱ्या लेखांत निवृत्तिमार्गावरच आक्षेप घेतले आहेत व त्यांतील विचासरणीवरून व भाषेवरून तो लेख टिळकांचा असावा असें वाटतें. तसेंच या काळांत रा. रानड्यांनीं 'नवीन विद्येनें नीति खालावत चालली आहे, तेव्हां त्याला आळा घालण्याकरितां शाळेंत धर्मशिक्षण दिलें पाहिजे,' असें प्रतिपादन सुरू केलें असतां, केसरीकारांनीं धर्मशिक्षण व नीति ह्यांचा कार्यकारणभाव नाहीं, शाळेंत

असलें शिक्षण देण्याची जरूरी नाहीं, वाटल्यास पालकांनीं घरीं तें शिक्षण द्यावें असें प्रत्युत्तर दिलें आहे. विषयाचें धार्मिक स्वरूप व महत्त्व लक्षांत घेतां त्यावेळच्या केसरीच्या सर्व संपादकांना व म्हणूनच टिळकांना हें धोरण पसंत होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण याप्रमाणें टिळक आगरकर यांची हिंदुधर्माविषयीं अश्रद्धा उत्पन्न होऊन दोघांचीं मतें नास्तिकपणाकडे झुकलीं तरी आगरकरांप्रमाणें टिळक पुरे नास्तिक बनले नसावे. त्याचें मुख्य गमक म्हणजे कांहीं वर्षांनीं हिंदुधर्माचा अभ्यास केल्यावर ते पुन्हा आस्तिक बनले हेंच होय. रा. ब. कीर्तन्यांनीं हिंदुधर्मावर जो निबंध वाचला त्यावर टीका करतानां केसरींत १८८५ सालीं 'हिंदुधर्माची अवश्य खची' या लेखांत अशाच तऱ्हेचें दुट्टपी वर्तन दिसतें. या लेखाच्या शेवटीं हिंदुधर्माची चांगली सुधारणा केल्यास त्यास सामाजिक ध्येयसाधनाचें स्वरूप येईल असें म्हटलें आहे. याच वेळांत केसरीकारांनां धर्माचें महत्त्व फार वाटत नव्हतें. याचा दुसरा एक पुरावा म्हणजे केसरीकारांनीं त्यावेळींच प्रार्थना समाजावर टीका करतांना 'नवीन धर्मस्थापनेशिवाय राष्ट्रांत एकी करण्याचे पुष्कळ उपाय आहेत अशी आमची पक्की खात्री आहे; हिंदुधर्मात कांहीं आचार वेडेवाकडे आहेत, पण त्यास न दुखवितां जशाचा तसाच चालू दिल्यानेंच आपलें कल्याण होणार आहे' असे उद्गार काढले आहेत.

तात्विकदृष्ट्या याप्रमाणें टिळक–आगरकरांचीं धर्मासंबंधाचीं मतें जरी जवळजवळ सारखीं होतीं तरी धर्मसुधारणा कशी व केव्हां करावी याच्याबद्दल त्यांच्यांत मतभेद होता. केसरीच्या आरंभींच्या दिवसांत, केसरीची धर्मसुधारणेची दृष्टी तात्विक नव्हती व होतां होईल तों जुन्या धर्मग्रंथांनाच अनुसरून कांहीं तरी युक्तीनें सुधारणेचा प्रश्न सोडविण्याचा केसरीनें प्रयत्न केला आहे. १८८१ ते १८८५ पर्यंत धार्मिक विषयावर केसरींत फार लेख आले नाहींत. कारण टिळक–आगरकरांना धर्माचें थोडें वावडेंच होतें असें मागें दिलेल्या कारणावरून म्हणण्यास हरकत नाहीं. 'न्हाणवलीचा शास्त्रदृष्ट्या विचार' यासारखे लेख वरील धोरणावरच लिहिलेले आहेत. पण लवकरच दोघांनाहि धर्मात लक्ष घालावें लागलें व हा प्रश्न धर्मसुधारणेचा असल्यामुळें त्यांच्यामधील पूर्वीचे मतभेद बळावले. यावेळीं टिळकांचीं धर्मसुधारणेवरील मतें प्रगट झालीं तीं आपणास पाहिलीं पाहिजेत.

हा नवीन प्रसंग, मलबारींनीं कायदा करून संमतिवय वाढविण्याची चळवळ केली त्या वेळचा होय. टिळक व आगरकर यांना जरी धर्माशीं त्यावेळीं कांहींच करावयाचें नव्हतें व त्याशिवाय त्यांचीं इतर ध्येयें साध्य होणारीं होतीं तरी आगरकरांची सामाजिक सुधारणेकडे जास्त प्रवृत्ति असल्यामुळें, समाजामधील एक अन्याय दूर करणारा हा कायदा त्यांना हवा होता व स्वतः पक्के नास्तिक

असल्यामुळें धर्माचा विचार करण्याचें त्यांना कारण नव्हतें. पण टिळक जरी अनिश्चित व धर्माविषयीं थोडे उदासीन असले तरी धर्म हें एक राष्ट्राचें प्रधान अंग आहे आणि त्या दृष्टीनें व स्वतः धर्माच्या दृष्टीनें कोणत्याही धर्मांत संबंध येणाऱ्या सुधारणेचा विचार केला पाहिजे असें त्यांचें मत होतें.

टिळकांना सुधारणा हवी होती पण ती जुन्या राष्ट्रीयत्वाच्या पायावर हवी होती. टिळकांचें जीवितकार्य राष्ट्रीय उन्नति हेंच होतें. पुढें रँ. परांजपे यांना दिलेल्या उत्तरांत यावेळच्या आपल्या मतांचें समर्थन करतांना, टिळकांनीं "आम्हाला सुधारणा पाहिजे, पण खरा राष्ट्रीय विचाराचा मनुष्य स्वतःच्या पायावरच स्वतःची इमारत बांधतो" असें म्हटलें आहे. राष्ट्र व धर्म यांचा परस्परसंबंध आहे व धर्माचा विचार करतांना त्या दृष्टीनें तिकडे पाहिलें पाहिजे. रा. ब. न्या. रानड्यांनीं सुद्धां टिळक-आगरकरांना लिहिलेल्या पत्रांत National press व national education याबरोबरच National church चीहि जरुरी आहे असें म्हटलें होतें. पण धर्माचें हें राष्ट्रीयत्व कायम राहण्यास धर्माचें वैशिष्ट्य कायम राहिलें पाहिजे. प्रत्येक धर्माला एक परंपरा असते व तिच्यांतच त्याचें वैशिष्ट्य असतें. "निरनिराळ्या धर्मांत जो भेद आहे तो या परंपरेंतच आहे, म्हणून कोणतीहि सुधारणा ही परंपरा कायम ठेऊनच केली पाहिजे. असें जर केलें नाहीं तर धर्माचें वैशिष्ट्यच नाहींसें होतें व त्यामुळें राष्ट्रीयत्वाची हानि होते." मलबारींच्या या नवीन चळवळीनें हिंदुधर्माच्या परंपरेवर आघात होण्याचें दुःश्चिन्ह त्यांना दिसूं लागलें. कारण हिंदुधर्माच्या तत्कालीन स्थितीकडे लक्ष पुरविल्यावर त्यांना एक गोष्ट प्रामुख्यानें दिसून आली ती ही कीं, सुशिक्षित लोकांत धर्माविषयीं अभिमान किंवा आदर नसल्यामुळें, ते सामाजिक ध्येयें साध्य करण्याकरितां, धर्माचा होम करण्यासहि तयार होते. म्हणून मलबारींनीं सुचविलेली सुधारणा त्यांना मान्य होती तरीहि, त्यांची पद्धति त्यांना पसंत नसल्यामुळें त्यांनीं तिला विरोधच केला. धर्माची परंपरा राखण्याचा उत्तम मार्ग म्हणजे या सुधारणा लोकांकडूनच करवून घेणें हा होय. बहुजनसमाजाला 'उदाहरण व उपदेश' या दोन साधनांनीं सुसंस्कृत केल्यावर त्याच्याकरवींच या सुधारणा करवाव्या म्हणजे धर्माचें राष्ट्रीयत्व कायम राहून त्याच्यांत सुधारणा होईल. हिंदुधर्मांत वाईट गोष्टी आहेत तशाच चांगल्याहि आहेत, व कमीअधिक प्रमाणानें प्रत्येक धर्मांत अशी स्थिति आहे, तेव्हां या वाईट गोष्टींबद्दल चिडून जाऊन धर्मावर व जनतेवर कोरडे लगावून धर्माविषयीं सुशिक्षितांत अश्रद्धा व तिरस्कार, व अशिक्षितांत गैरसमज उत्पन्न करण्यापेक्षां, लोकांना शिक्षण देऊन, त्यांचा स्वतःच्या धर्माचे ठिकाणचा अभिमान वाढवून, त्यांतील वाईट गोष्टी त्यांच्याकडूनच टाकविणें यांतच खरी राष्ट्रीय दृष्टीची धर्मसुधारणा, असें टिळकांना वाटे. यांत आणखीहि एक फायदा होणार होता. तो म्हणजे धर्माभिमानाची वाढ

होऊन राष्ट्रीय भावनेचाहि विकास होणार होता. सुशिक्षित समाजांत असलेली स्वतःच्या राष्ट्राबद्दलची उदासीनता, व पाश्चात्यांची अवास्तव स्तुति करून स्वाभिमान नष्ट करणारी बुद्धि, हीं राष्ट्रोन्नतीला विघातक आहेत. उदयोन्मुख राष्ट्राच्या रोमारोमांतून स्वावलंबन, स्वतःच्या कर्तबगारीवर व स्वतःच्या सांस्कृतिक मोठेपणावर आत्मविश्वास व भवितव्याविषयीं आशावादित्व हीं असावीं लागतात; व प्रत्येक राष्ट्रोद्धारकाचें कर्तव्य राष्ट्रदेहावर सांचलेली घाण घालविण्याचें जितकें आहे, तितकेंच असा स्वाभिमान उत्पन्न करण्याचें आहे. मग हा अभिमान थोडा अवास्तविक असला तरी हरकत नाहीं. चिपळुणकरांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांनीं जो निबंध वाचला, त्यांत विष्णुशास्त्र्यांच्या कामगिरीचें वर्णन करतांना हाच मुद्दा त्यांनीं मांडला आहे. हें सर्व लक्षांत घेतां, उदाहरण व उपदेश या दोन मार्गांनींच धर्मसुधारणा झाली पाहिजे, व इतर देशांचा इतिहास पहातां ती याच पद्धतीनें झाली आहे, असें 'लोकप्रवर्तन' या लेखांकांतून केसरीकारांनीं आपलें मत प्रदर्शित केलें आहे. याशिवाय टिळकांच्या धर्मसुधारणेच्या विरोधाला आणखीहि दोनतीन कारणें देतां येतील.

टिळक पहिल्यापासून समाजाला फार मान देत असत; व त्यांच्या विचारांत १८ व्या शतकांतील फ्रेंच तत्त्वज्ञान्यांप्रमाणें लोकसत्तेला फार प्राधान्य असे. ह्या त्यांच्या स्वभावधर्माचें वर्णन करतांना, महात्मा गांधींनीं 'He was a born democrat. He believed in the rule of the majority that fairly frightened me,' असें म्हटलें आहे. समाजाला काय पाहिजे हें त्याचें त्यानें स्वतः ठरविलें पाहिजे असा त्यांचा सिद्धांत होता; व म्हणूनच लोकांवर येणारीं बंधनें लोकांनीं स्वतःच घातलीं पाहिजेत, मग तीं कितीहि चांगलीं असलीं तरी मूठभर लोकांनीं घालतां कामा नयेत, असें त्यांना वाटत असे. समाजांतील या शहाण्या सुशिक्षित लोकांनीं फक्त लोकशिक्षणाचेंच काम केलें पाहिजे, म्हणजे समाजाला सुसंस्कृत करून त्याला आपलें म्हणणें मान्य करायला लावल्यावर तो आपण होऊन तें बंधन घालून घेईल. या सुधारणा फारच इष्ट असून लवकर व्हावयास पाहिजे असल्यास, उदाहरणानें त्यांचा चांगुलपणा पटविण्याकरितां, समाजाच्या इच्छेविरुद्ध त्यांनीं त्या स्वतः आचरणांत आणाव्यात, व त्याकरितां समाजानें त्याला त्या मान्य होईपर्यंत दिलेला त्रास निमूटपणें सहन करावा. सामाजिक सुधारणेचा खरा मार्ग हाच होय. "अशा रीतीनें लोकप्रवर्तनाचें काम आज हजारों वर्षें ब्राह्मण करीत आलें आहेत."* अशा तऱ्हेच्या मताचें त्यांनीं प्रतिपादन केलें आहे. टिळकांच्या समाजसुधारणेच्या या मार्गाला, "सामाजिक सुधारकांचें विनयशील बंड" असें एक

---

* टि. च पा. २५६.

अन्वर्थक नांव रा. केळकरांनीं एका व्याख्यानांत दिलें होतें. याच तत्त्वाला अनुसरून सरकारनें या बाबतींत कायदा करूं नये असें त्यांचें मत होतें. अशा तऱ्हेनें सक्तीनें समाजावर बंधन घालण्यांत त्यावर अन्याय होतो असें त्यांना वाटे. समाजावर कायद्यानें पडणारें नियन्त्रण, हें लोकसत्तेच्या तत्त्वाप्रमाणें, त्यांनीं निवडलेल्या प्रतिनिधींनींच, व तें सुद्धां त्यांच्या संमतीनेंच घातलें पाहिजे. टिळकानां मलबारींची सुधारणा तत्त्वतः मान्य होती, व म्हणून ती घडवून आणण्याकरितां, ती पाळण्याचें बंधनें स्वतःस घालून घेण्यास ते तयारहि होते. "माझें मतहि सुधारणेस अनुकूलच आहे; परंतु ज्यांचे विचार सुधारले नाहींत त्यांच्या गळ्यांत सुधारणा कायद्यानें बांधणें मला अगदीं प्रशस्त वाटत नाहीं. इतकेंच नव्हे, तर तें अन्यायाचें व जुलमाचें कृत्य आहे. तेव्हां ज्यांना सुधारणेची खरी कळकळ आहे त्यांनीं सुधारणा अमलांत आणण्याबद्दल स्वतःस बांधून घ्यावें."* कायदाच पाहिजे असल्यास, ज्या लोकांना तो मान्य आहे तेवढ्यापुरताच त्यांनीं तो मागून घ्यावा, असेंहि त्यांनीं सुचविलें आहे. पण असें करण्यांत विशेष कांहींच साधत नाहीं. शिवाय यापासून होणारा दुसरा एक वाईट परिणाम म्हणजे, परकी सरकारला आपल्या धार्मिक व सामाजिक बाबतींत हात घालण्याचा अधिकार, आपण होऊन, आपणच या आपल्या कृत्यानें देतों. याचा फायदा पुढें एखाद्या वेळेस सरकार घेईल अशी त्यांना भीति वाटत होती. म्हणूनच सरकाराचें हें कृत्य राणीसरकारच्या जाहीरनाम्याला विरोधी आहे असा एक मुद्दा त्यांनीं आणला होता. 'टिळक सुधारणा नको असें कदापि म्हणाले नाहींत. सरकारी कायद्याच्या जोरावर सक्तीची सुधारणा त्यांस नको होती, आणि तेवढ्याच पुरता त्यांचा संमतिवयाच्या कायद्याच्या प्रसंगीं पुढाकार होता.'+

याहीपेक्षां, टिळकांच्या धर्मसुधारणेच्या विरोधाला आणखी एक कारण होतें. अशा प्रकारच्या समाजाच्या इच्छेविरुद्ध कायद्यानें केलेल्या सक्तीच्या धार्मिक सुधारणेनें अज्ञानी बहुजनसमाजांत गैरसमज उत्पन्न होऊन ते एकदां विरोधी बनले कीं, त्यांच्याच शक्तीच्या व चैतन्याच्या जोरावर जें राजकीय राष्ट्रकार्य टिळक आगरकर करणार त्याला त्यांचा विरोध होणार होता. "आधीं राजकीय कीं आधीं सामाजिक," या वादांतील बीज हेंच आहे. या वादाला प्रथमदर्शनीं वाटतें तितकें तात्विक स्वरूप नसून त्याला व्यावहारिक स्वरूप बरेंच आहे. ह्या व्यावहारिक धोरणाला अनुसरूनच टिळकांनीं आधीं राजकीय या मताचा पुरस्कार केला. प्रसिद्ध इटालियन देशभक्त जोसेफ मॅझिनी यानें इटालियन राष्ट्राच्या उन्नतीची व राजकीय स्वातंत्र्याची

---

* टि. च. पा. २५३.

+ न. र. फाटक 'टिळकांची समाजसुधारणा'—अरविंद, आगस्ट १९२१

चळवळ करतांना हेंच धोरण स्वीकारलें होतें. राजकीय सत्ता हातीं आली म्हणजे कोणतीहि सुधारणा करणें सोपें जातें. टर्कीचा गेल्या थोड्या वर्षांतील इतिहास पाहिला तर हें तत्त्व पुष्कळच खरें आहे असें दिसून येईल. म्हणून इतर सुधारणा करण्याच्या भरीस पडून, राजकीय स्वातंत्र्याच्या चळवळीला विरोध उत्पन्न करण्यापेक्षां, त्यांपासून तिला अलग ठेवून, तिच्यामागें एकनिष्ठपणें लागणें हेंच योग्य असें टिळकांनीं ठरविलें. सामाजिक परिषद् काँग्रेसच्या मंडपांत भरूं न देण्यांत, काँग्रेससारख्या राजकीय संस्थेला सामाजिक वादाचा उपसर्ग पोचूं नये हाच उद्देश असावा. टिळकांचा ह्या दूरदर्शी धोरणाचा परिणाम, पुढें काँग्रेसनें सुधारक, दुर्धारक, जुने, नवे, थिऑसफीस्ट, नास्तिक, अज्ञेयवादी, ब्राह्मो, वगैरे सर्व तऱ्हेच्या मतांच्या लोकांस, एकाच ठिकाणीं गोवून केलेल्या कामगिरींत पहावयास सांपडतो. टिळकांनीं धर्मसुधारणेला केलेल्या विरोधाचीं कारणें अशा प्रकारचीं आहेत. त्यांना सुधारणा नको होती असें मुळींच नसून, तिच्या पद्धतीविषयीं मात्र त्यांचा मतभेद होता. याच वेळीं केसरींत त्यांनीं बालविवाहाच्या विरुद्ध स्फुटें लिहिलीं आहेत.

वरील कारणांमुळें, संमतिवयाच्या बिलाच्या वेळीं तात्त्विकदृष्ट्या धर्मसुधारणा इष्ट होती, तरी टिळकांनीं सुधारणेच्या कायद्याला विरोध केला, व ते क्षणभर धर्मसुधारणेचे* विरोधी झाले; परंतु या त्यांच्या वर्तणुकींत 'आश्चर्य' वाटण्याजोगें कांहीं नसून, त्यावेळीं 'त्यांच्या केसरीनें धर्माभिमानाची नकली आयाळ लाविली होती,' असेंहि समजण्याचें कारण नाहीं. वरील विवेचनावरून टिळकांचे त्यावेळचे स्वतःचे धर्मविषयक विचार, व त्यांचें वरील धर्मसुधारणेच्या पद्धतीबद्दलचें धोरण, यांमध्यें विरोध नसून, तीं त्यांच्या धर्मसंबंधीं मनोवृत्तींत एका सुसंगत धोरणानें निगडित झालीं आहेत, असेंच दिसून येईल. त्यांच्या हिंदुधर्माविषयींच्या विचारांत फरक पडला नव्हता, व सुधारणाहि पूर्वीइतकीच त्यांना इष्ट वाटत होती. फक्त ज्या स्वरूपांत व ज्या पद्धतींत ती येत होती, ती पसंत नसल्यामुळें, त्यांनीं तिला विरोध केला. टिळकांची स्वतःची धार्मिक अनिश्चितता व त्यासंबंधीं त्यांचे विचार चालूच होते; त्यांची चिकित्सक बुद्धीहि अबाधित होती. पण याचा पुढें विचार करण्यापूर्वीं, टिळकांनीं धर्माकडे नवीनच ज्या राष्ट्रीय धोरणानें पहाण्यास सुरुवात केली होती, त्याच्यासंबंधानें थोडें विवेचन केलें पाहिजे.

---

* हिंदुस्थानांत सामाजिक गोष्टींचाहि धर्मातच अंतर्भाव केला गेला असल्यामुळें, धर्मसुधारणा व समाजिकसुधारणा यांचा पुष्कळदां घोटाळा उडतो. परंतु संमति वयाच्या बिलाचा समाजरूढीबरोबरच धर्माशींहि खरा संबंध येत असल्यामुळें त्याला दुहेरी स्वरूप होतें; व म्हणूनच खऱ्या धर्मसुधारणेचाहि प्रश्न त्यावेळीं काढला गेला होता.

संमतिवयाच्या बिलाला केलेल्या विरोधाला, टिळकांची धर्माकडे बघण्याची राष्ट्रीय दृष्टि हें एक कारण वर दिलें आहे. या वेळेपासून धर्माचें राष्ट्रीय जीवनांतील महत्त्व त्यांच्या पूर्णपणें लक्षांत येऊन, पुढें १८९६ पर्यंत टिळकांनीं त्यांच्याकडे मुख्यतः याच दृष्टीनें पाहिलें; व नंतरहि ही दृष्टि त्यांनीं केव्हांहि सोडली नाहीं. १८९२–९३ सालीं व पुढेंहि जातिभेदाचा विचार करतांना, त्यांनीं हीच दृष्टि ठेविली होती. ‘ जातिबंधनें पूर्वींच्या इतकीं कडक राहणें शक्य नाहीं; इतकेंच नव्हे, तर त्यांपैकीं कांहीं बंधनें अवश्य नाहींशीं झालीं पाहिजेत ’* असें जरी त्यांचें मत होतें, तरी राष्ट्रदृष्टया विचार करतां तीं उन्नतीच्या आड येणार नाहींत असें त्यांनीं प्रतिपादिलें आहे. या लेखांतून, जातिभेदादि सामाजिक व्यङ्ग्यें सुधारल्याशिवाय राष्ट्रीय उन्नति होणार नाहीं, याच मताचें निरनिराळ्या देशांचें उदाहरण देऊन त्यांनीं प्रामुख्यानें खण्डन केलें आहे. या काळांत राष्ट्रीय उन्नतीचेंच ध्येय त्यांनीं आपल्यापुढें ठेवलें होतें, व त्या दृष्टीनेंच इतर सर्व गोष्टींचा ते विचार करीत. १८९३ सालीं, दादाभाई पार्लमेन्टचे सभासद झाले त्यावेळीं लिहितांना ते म्हणतात, ‘ हिंदुस्थान ही आमची मातृभूमि आणि देवता, हिंदुस्थानवासी हेंच आम्हा सर्वांचें बंधुत्वाचें नातें, आणि वस्तुस्थिति लक्षांत आणून आमची राजकीय व सामाजिक परिस्थिति सुधारण्याचा एकनिष्ठपणानें स्वार्थाकडे लक्ष न देतां सतत परिश्रम करणें हाच आमचा धर्म हें दादाभाईच्या चरित्रावरून पूर्णपणें व्यक्त होत आहे; व त्यांस हल्लीं जो सन्मान मिळत आहे त्यावरून या नूतन राजधर्माचा हिंदुस्थानभर लवकर प्रसार होईल अशी आमची खात्री आहे.+ ’ या उताऱ्यावरून त्यांच्या विचाराचा ओघ, एकठोक राष्ट्राच्या अभ्युदयाकडे कसा वाहात होता हें दिसून येतें. १८९४ सालीं टिळकांनीं श्रीगणेशोत्सव सुरू केला. हा उत्सव सुरू करण्यांत त्यांचा उद्देश मुख्यतः राष्ट्रीयच होता, व १८९६ सालानंतर त्याच्यांत शुद्ध धार्मिक उद्देशाचा समावेश झाला, तरीहि मूळ राष्ट्रीय हेतूचा लोप केव्हांच झाला नाहीं. १८९५ सालीं या विषयावर त्यांनीं लिहिलेल्या लेखांत त्याचें राष्ट्रीयत्व स्पष्ट केलें आहे. “ कोणत्याहि लोकांत ऐक्याची बुद्धि होण्यास जीं अनेक साधनें असतात त्यांपैकीं एक उपास्य दैवत असणें हें एक कारण आहे. एक धर्म, एक राजा, एक भाषा हीं राष्ट्रीयत्वाचीं प्रधान अंगें आहेत. उपासनेपासून चित्तशुद्धि होते असें जें आपल्या जुन्या ग्रंथकारांचें म्हणणें आहे तें अगदीं यथार्थ आहे. कोणत्याहि देवतेचें सर्वांनीं एकनिष्ठपणें आराधन करणें यानेंच उपासकांच्या मनास एक प्रकारचें वळण लागून त्यांच्यामध्यें उपासकबंधुत्वाची बुद्धि जागृत होते. मन व बुद्धि

---

* केसरी १६ मे १८९३, लो. टि. आ. व. पान २००

+ लो. टिळकांचें केसरींतील लेख भाग १ पा. २५९

अशा तऱ्हेनें संस्कृत झाल्यावर त्यांचा उपयोग तशाच रीतीनें अन्य ठिकाणीं ठेवण्यासहि अडचण पडत नाहीं. स्वधर्माच्या श्रेष्ठत्वाचा ज्यास अभिमान नाहीं त्यास स्वराष्ट्राच्या श्रेष्ठत्वाचा तरी अभिमान कोठून असणार ? धर्मोन्नतीचा व धर्माभिमानाचा राष्ट्रीय अभ्युन्नतीशीं जर कांहीं संबंध असला तर तो याच प्रकारचा होय. " ह्या उताऱ्यावरून, टिळकांची गणेशोत्सवाकडे बघण्याची दृष्टि उत्तम रीतीनें दिसून येते. राष्ट्रसंवर्धनाच्या कामांत, याप्रमाणें धर्माचा व धर्माभिमानाचा उपयोग निश्चित झाल्यावर, अशा तऱ्हेचा अभिमान उत्पन्न करणाऱ्या धर्मशिक्षणाची त्यांनीं तरफदारी करण्यास सुरुवात केली. १८८१ ते १८८५ पर्यंतच्या काळांत 'केसरीनें' शाळेंतून धर्मशिक्षण देण्याच्या विरुद्ध लेख लिहिले असल्याचें मागें सांगितलेंच आहे. १९०३ सालीं प्रो. जिनसीवाल्यांच्या मृत्युलेखांत राष्ट्रहिताकरितां धर्माभिमानाची कशी जरूरी आहे हें त्यांनीं स्पष्ट केलें आहे. याचवेळच्या आणखी एकदोन गोष्टी त्यांच्या धर्मासंबंधाच्या राष्ट्रीय दृष्टीवर प्रकाश पाडणाऱ्या आहेत. मागें, राष्ट्राच्या कामगिरींत जरूर लागल्यास ते धार्मिक आचरणाची खातर ठेवीत नसत, असें सांगितलें आहे. तशाच प्रकारची वृत्ति हिंदुधर्मांतील रूढ चालीरीतींविषयीं या काळांत त्यांची होती. हिंदुधर्मांतील पुष्कळ रूढाचार हे हानिकारक आहेत, ते शिक्षणानें आणि उदाहरणानेंच जाणार व ते जोंपर्यंत आपल्या राजकीय उद्दिष्टाच्या आड येत नाहींत, तोंपर्यंत जनतेला दुखवून आपल्या मार्गांत व्यर्थ अडथळा आणूं नये, असें त्यांचें मत होतें, व त्याप्रमाणें त्यांचें स्वतःचें वर्तनहि असे. परंतु या गणेशोत्सवांत, त्यांनीं राष्ट्रीय ऐक्याच्या भावनेला विघातक म्हणून जातिभेदबंधनाची पर्वा ठेविली नाहीं. 'साळी, माळी, सुतार, रंगारी, तांबोळी, ब्राह्मण, व्यापारी, मारवाडी, चांभार देखील या सर्व जातींनीं क्षणभर आपला जातिमत्सर सोडून देऊन परस्परांशीं एका दिलानें, एका धर्माभिमानानें मिसळलें व या सर्वांनीं हातभार लावल्यामुळें सर्व समारंभ शेवटास गेला हा आनंद मानण्यासारखा परिणाम झाला.' पूर्वीं उल्लेखिलेल्या लेखांत रा. फाटकांनीं म्हटल्याप्रमाणें, "१८९४ सालीं गणेशोत्सवांत चांभारांनीं भाग घेतला म्हणून धर्माच्या स्पर्शास्पर्शाच्या कल्पनांना प्राधान्य देऊन टिळकांनीं त्यांचा हिरमोड केला नाहीं, उलट त्यांस उत्तेजनच दिलें; व ही गोष्ट तिऱ्हाइतांनीं चव्हाट्यावर आणलेली नसून खुद्द टिळकांनींच जाहीर व्याख्यानांत लोकांचे कानावर घातलेली आहे. परंतु त्यामुळें टिळकांचा कोणी निषेध केल्याचें ऐकिवांत नाहीं. टिळक म्हणत असत कीं, 'आपल्या कार्यांत ज्या धार्मिक विधींची लोकांना अडचण असेल ते विधी सोडण्यास बहुजनसमाज आपोआपच तयार होईल. " अशा तऱ्हेनें राष्ट्रीय हिताकरतां शास्त्र धाब्यावर टांगल्याच्या पुष्कळ गोष्टी रा. फाटकांनीं आपल्या लेखांत सांगितल्या आहेत. टिळकांची ही धर्माबद्दलची राष्ट्रीय दृष्टीनें पाहण्याची बुद्धि शेवटपर्यंत होती. पुढें हिंदुधर्माचा खोल अभ्यास करून

त्यांनीं आपलें सिद्धान्त बनविल्यावर, त्यांच्या मनामध्यें तात्विक धर्मबुद्धीचा उदय झाला असतांनासुद्धां, त्यांनीं ही दृष्टि सोडली नाहीं. १९०१–०२ सालीं पुनः एकदां, "राष्ट्रीयत्वाची कल्पना सिद्ध होण्यास कारणीभूत अशा गोष्टींमध्यें स्वधर्म, स्वभाषा, स्वदेशाभिमान व पूर्वेतिहासस्मरण ह्या होत." "स्वभाषेची वृद्धि, स्वराज्याच्या इतिहासाचा स्वकीय दृष्टीनें अभ्यास व मनन, स्वधर्मश्रद्धा इत्यादि गोष्टी राष्ट्राच्या उत्कर्षास कारणीभूत होतात," असें लिहिलें आहे. हीच गोष्ट १९०४ सालांत, मद्रासच्या हिंदुसभेवर लिहितांना पुन्हां स्पष्टपणें सांगितली आहे, "कोणत्याहि सुधारणेचा मुख्य उद्देश म्हटला म्हणजे विशिष्ट राष्ट्रीयत्वाचा अभिमान जागृत करणें हा होय." धर्माची सुधारणा करतांना ही राष्ट्रीय दृष्टि नेहमीं ठेवली पाहिजे. १९१४ सालानंतर झालेल्या व्याख्यानांत व गीतारहस्यांतहि याचा निरनिराळ्या दृष्टीनें त्यांनीं उहापोह केला आहे. इतकेंच नव्हे, तर ही राष्ट्रीय दृष्टि, टिळकांच्या विचारांचें एक प्रधान अंगच बनून, गीतारहस्यांत प्रतिपादलेल्या धार्मिक तत्त्वज्ञानांत, लोकसंग्रहरूपानें परिणत झाली. या सर्वांविषयीं येथें साधकबाधक चर्चा करणें शक्य नाहीं, कारण टिळकांची धर्मासंबंधीं राष्ट्रीय दृष्टि हा एक स्वतंत्र निबंधच होऊं शकेल. येथें फक्त त्यांच्या ह्या विचारांचें उत्कृष्ट प्रतिबिंब पडलेला, व ज्यांत राष्ट्रधर्म व अध्यात्मधर्म याची त्यांनीं बेमालूम सांगड घालण्याचा प्रयत्न केला आहे, असा एक उतारा देऊनच संतुष्ट राहिलें पाहिजे. भारत–धर्ममंडळांत, काशीच्या पुण्यक्षेत्रीं, १९०६ सालीं, हिंदुधर्मावर व्याख्यान देतांना टिळकांनीं काढलेले उद्गार फारच उदात्त व मननीय असून धर्माचा खोल अभ्यास करणाऱ्या हिंदुस्तानच्या पहिल्या प्रतीच्या राष्ट्रपुढाऱ्यास साजेसेच आहेत.

"Hindu religion as a whole is made up of different parts connected to each other as so many sons and daughters of one great religion. If this idea is kept in view and if we try to unite the various sections it will be consolidated in a mighty force. So long as you are divided amongst yourself, so long as one section does not recognise its affinity with another, you cannot hope to rise as Hindus. Religion is an element in nationality. The word Dharma means a tie and comes from the root *dhri* 'to bear or hold.' What is there to hold together? To connect the soul with God, and man with man. Dharma means our duties towards God and duty towards man.

Hindu religion as such provides for a moral as well as a social tie."*

हे राष्ट्रभावनेनें ओथंबलेले व स्फूर्तिदायक उद्गार वाचून स्वामी विवेकानंदांची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. टिळकांचें हें सर्वच व्याख्यान अतीशय उत्तम, व त्यांच्या विचारावर व ध्येयावर प्रकाश पडणारें असल्यामुळें, फार महत्त्वाचें आहे, व म्हणूनच त्याचा पुनः एकदोनदां उल्लेख करावा लागणार आहे. तरी आतां आपण हा विषय सोडून त्यांच्या धार्मिक बुद्धीकडे वळूं.

पाश्चात्य तत्त्वज्ञानाच्या अभ्यासानें टिळकांच्या धार्मिक बुद्धीस धक्का बसून त्यांच्या मनांत अनिश्चिततेची खळबळ उडाली होती, व स्वामी विवेकानंदांसारख्या थोर गृहस्थांच्या अनुभवावरून ही स्थिति प्रत्येक विचारी माणसाच्या जीवनक्रमांत प्राप्त होणें कसें अपरिहार्य असतें हें आपण पाहिलेंच आहे. तसेंच १८८५ ते ९२ चे दरम्यान टिळकांनीं धर्मसंबंधीं सुधारणेला केलेल्या विरोधाची मीमांसा केली आहे त्यावरून टिळकांनीं केलेल्या सुधारणाविरोधाचा त्यांचीं मतें बदललीं असा अर्थ करणें चुकीचें असून, त्यांचीं धार्मिक मतें आणि धार्मिक अनिश्चितता कायम होती व त्याविषयीं त्यांचा अभ्यास चालला होता हेंहि पूर्वीं सांगितलेंच आहे. हा टिळकांचा अभ्यास त्यांच्या फुरसुतीच्या वेळीं पुढेंहि चालू होता. " हिंदुधर्मशास्त्र हा टिळकांचा मोठा आवडता विषय होता. म्हणून हिंदुधर्मशास्त्राचें मुख्य धर्मग्रंथ व त्याजवरील टीका वगैरेंचा अभ्यास टिळकांनीं फार लक्षपूर्वक केला होता ". सुधारणेच्या वादांत हा त्यांचा अभ्यास जास्तच झाला असेल. शिवाय गीता, शांकरभाष्यें इत्यादि तत्त्वज्ञानात्मक ग्रंथांचेंहि त्यांचें परिशीलन चालूं असलें पाहिजे. "टिळकांना पहिल्यापासून टेबलावर बसून ग्रंथ लिहिण्याची आवड." टिळक हे सरस्वतीच्या मंदिरांतलेच खरे उपासक; परंतु दुर्दैवी मातृभूमीच्या अवनत स्थितीकडे पाहावेना म्हणून आपले आवडीचे विषय सोडून राजकारणांत पडले तेव्हां फावल्या वेळांत ते त्यांचा अभ्यास करीत असतीलच व असें त्यांनीं आपल्या Orion च्या प्रस्तावनेंत व पुढें गीतारहस्याच्या प्रस्तावनेंतहि दिग्दर्शित केलें आहे. शिवाय या वेळचे त्यांचे कोणचेहि लेख पाहिले तर त्यांत जुन्या संस्कृत ग्रंथांतील शब्द, अवतरणें, दृष्टान्त वगैरे पाहावयास मिळतात यावरूनहि त्यांचे त्या वेळीं या ग्रन्थांचें परिशीलन चाललें असावें, असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं. हा अभ्यास करतांना मात्र, त्यांनीं पाश्चात्य चिकित्सक बुद्धि स्वीकारली होती. जुन्या धर्मग्रन्थांत पूर्वींच्या ऋषींनीं त्रिकालाबाधित सत्यें सांगितलीं आहेत, व तीं श्रद्धा ठेऊन जशींच्या तशींच मान्य केलीं पाहिजेत, अशी त्यांची भावना नव्हती हें त्यांच्या Orion ग्रन्थावरून स्पष्टपणें दिसून येतें. पुढें हिंदुधर्माच्या लक्षणांत 'प्रामण्य-

---

* B G Tilak, His writings and speeches p. 36, Ganesh & Co.

बुद्धिवेंदेषु' हें पद त्यानीं घातलें असलें, तरी त्यांची स्वतः वेदाला प्रमाण मानण्याकडे प्रवृत्ति नव्हती; इतकेंच नव्हे, तर वेद व ब्राह्मण यांचा, मानव जातीच्या इतिहासांतील एका काळाचें प्रतिनिधीभूत वाङ्मय याच दृष्टीनें विचार करून, त्यांतून काय निष्पन्न होतें हें शोधण्याचा त्यानीं आपल्या पुस्तकांत प्रयत्न केला आहे. वेद, ब्राह्मणें व पुराणें यांच्यामधून चालत आलेल्या अद्भुत गोष्टी व धार्मिक कल्पना यांना दंतकथा (Mythology) समजून, व त्यांचा ऐतिहासिक दृष्ट्या विचार करून त्यांतून इतिहाससत्य शोधून काढण्याचा युरोपियन विद्वान् प्रयत्न करीत असतात; तशाच प्रकारची प्रवृत्ति टिळकांनींहि स्वीकारली आहे, व तसें त्यांनीं स्पष्टपणें आपल्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे. ऋग्वेदाच्या प्राचीनत्वाच्या टिळकांनीं काढलेल्या नवीन मर्यादेला घाबरणाऱ्या लोकांना उद्देशून टिळक म्हणतात,— "Fears like these are out of place in a historical and scientific inquiry, the sole object of which is to search for and find out the truth. The method of investigation followed by me is the same as that followed by Bentley." याप्रमाणें हिंदूंच्या जुन्या धार्मिक वाङ्मयाचा ऐतिहासिक व शास्त्रीय दृष्ट्या विचार करणाऱ्या शोधकाचा पेशा त्यांनीं स्वीकारला होता. धार्मिक कल्पनांचा एकदां अशा पद्धतीनें अभ्यास सुरू केल्यावर, त्यांतील धार्मिक भावानें दिलेला गंभीरपणा व सत्यपणा यांचा लोप होऊन, त्यांना मनुष्याच्या बुद्धीच्या विलासांचें स्वरूप येतें. ही दृष्टि अर्थात् हिंदुधर्मनिष्ठेला साजेशी नव्हती, व म्हणून शास्त्री मंडळींचा त्यांच्यावर रोषहि झाला होता. परंतु टिळकांनीं आपला मार्ग सोडला नाहीं. हिंदुधर्माच्या आचारांची त्यांनीं अशाच ऐतिहासिक दृष्टीनें छाननी केलेली आहे. १८९१ सालीं डेक्कन कॉलेजांत टिळकांचें 'मौंजीबन्धन व जानवें' या विषयावर व्याख्यान झालें. त्यांत त्यांनीं अंतरिक्षांतल्या नक्षत्र रचनेवरून जानव्याची कल्पना निघाली असावी, व पुढें तिच्यांत फेरबदल होतां होतां त्यांस हल्लींचें स्वरूप प्राप्त झालें असावें, असें प्रतिपादिलें आहे. तसेंच, या सुमारास हिंदुधर्मांतील जातिभेदाची मीमांसा करतांना, जातींची उत्पत्ति, हिंदु कल्पनेप्रमाणें विराट पुरुषाच्या अवयवापासून नसून, तिचा उगम नवीन लोकांचें आगमन, वर्णभेद व गुणकर्मविभाग यांत आहे; व जातिभेदांची आवश्यकता असलीच तर ती सामाजिक असून त्यांत धर्माचा संबंध नाहीं, आणि जातीचीं बंधनें पूर्वींइतकीं कडक रहाणें शक्य नाहीं व तसें होणें इष्टहि नाहीं, असें आपलें मत त्यांनीं प्रगट केलें आहे. या उदाहरणांवरून टिळकांची धर्म व धार्मिक कल्पना यांच्याकडे बघण्याची दृष्टि कशी चिकित्सक विचारपद्धतीची होती हें दिसून येतें.

परंतु याप्रमाणें त्यांच्या स्वतंत्र विचारबुद्धीनें या कल्पनांबद्दलची त्यांची धार्मिक भावना जरी नाहींशी केली असली, तरी त्याच विचारबुद्धीच्या योगानें हिंदुधर्माचा खोल अभ्यास केल्यावर, त्यांतील अद्वैत भक्ति वगैरे उच्च तत्त्वें त्यांना या मध्यंतरीच्या काळांत हळुहळु पटूं लागलीं असावीं. श्रीगणेशोत्सवावर लिहिलेल्या लेखांतून मधूनमधून अशी उच्च प्रकारची धार्मिक भावना दृष्टीला पडते. श्रीगणेशाच्या मिरवणुकीच्या केलेल्या वर्णनांत क्षणभर भक्तिभावनेचा ओलावा आढळून येतो. तसेंच "आमच्या समाजाचें मुख्य स्थळ जें मराठेमंडळ त्यास कांहीं एक धक्का न पोंहोंचून आमचा स्वधर्मप्रेमा जशाचा तसा अजून कायम आहे हें जेव्हां आपल्या चक्षूंनीं पाहिलें, तेव्हां आम्हांस फार कौतुक वाटलें. आपल्या घरांत एखादी चीर पडलेली पाहून पोटांत धस्स व्हावें, पण पायाचे दगड व ओसरीचे खांब शाबूद आहेत असें पाहून जसें स्वस्थ चित्त होतें तद्वतच आमच्या मनाची स्थिति झाली" असें त्यांनीं एके ठिकाणीं लिहिलें आहे. १८९४ सालींच टिळकांचीं कर्मयोगावर मतें बरीच पूर्णतेला पोंचून त्यांना तो पटूं लागला होता असें रा. बोडसांनीं प्रसिद्ध केलें आहे. १८९६ सालच्या लेखांतूनहि हिंदूंच्या उच्च धार्मिक तत्त्वज्ञानाचा पगडा टिळकांच्या मनावर बसत चालला होता असेंच दिसून येतें. श्रीशिवाजीमहाराज अवतारी पुरुष होते, असें केसरींतून लिहिलें गेलें असतां सुधारकांनीं त्यावर टीका केली, त्याला उत्तर देतांना टिळकांनीं आपल्या लेखांतून ईश्वराच्या अस्तित्वाचें तर्कदृष्ट्या समर्थन केलें आहे. थोर पुरुषांचा जन्म व त्यांच्या कर्तबगारीचा कांहीं अंश हीं ईश्वरी कृपेनें होतात असें म्हणून ते पुढें लिहितात, "आमचे सुधारक असल्या गोष्टींस 'अज्ञेयाच्या' अगर 'अदृष्टाच्या' कोटींत घालून सदर दोन शब्दांतील पहिला 'अ'कार फार मोठ्या अक्षरानें लिहून आपलें समाधान करून घेतील हें आम्हांस माहीत आहे. पण आम्हीं त्यांस असें विचारतों कीं, असल्या समाधानांत आणि या गोष्टी ईश्वरकृपेनें होतात असें म्हणण्यांत अंतर तें कोंणते? ईश्वरच जर अज्ञेय आहे असें वेदान्तशास्त्र म्हणतें, तर वरील सर्व गोष्टी ईश्वरी कृपेनें घडतात हें म्हणणें केवळ लौकिक नव्हे, तर साधार व शास्त्रोक्त आहे असें थोड्या विचारांतीं सुधारकांखेरीज कोणाच्याहि लक्षांत येईल." "झाडांचीं पानें हलण्यासहि ईश्वरी सत्ता लागत नसते असें नाहीं. पुण्याच्या पश्चिमेस सुधारकांनीं लाखों भाते लावले तरी हल्लीं हलतात त्याप्रमाणें पुण्याच्या झाडांचीं पानें त्यांच्याच्यानें हालवविणार नाहींत." तसेंच दुसऱ्या एका ठिकाणीं, थोरपुरुषांच्या चरित्राविषयीं लिहितांना, "तात्विकदृष्ट्या विचार केला असतां ईश्वरी कृपेचें त्यांत कांहींहि अंग नाहीं असें कधींहि म्हणतां यावयाचें नाहीं," असें त्यांनीं म्हटलें आहे.

हें समर्थन करतांना, टिळकांनीं हिंदुतत्वज्ञानग्रंथ व इतर धर्मग्रंथ यांच्या आधारें आपलें म्हणणें सजविलें आहे. तसेंच ' ईश्वर पुनः पुनः अवतार घेतो ' ही पुढें टिळकांना अत्यंत प्रिय असणारी कल्पनाहि यांत आली आहे. यापेक्षां पुढें जाऊन, या लेखांतून टिळकांनीं प्रार्थनासमाजिस्ट सुशिक्षितांनीं, गणेशोत्सवापासून दूर राहण्यापेक्षां, त्यांत मिळून सामान्य लोकांचा पुढाकार घेऊन त्यांना धर्मशिक्षण देणें जास्त राष्ट्रहिताचें आहे, व तें आपलें कर्तव्य त्यांनीं बजवावें, अशी कळकळीची विनंति केली आहे. भजनी मेळ्यांचीं भक्तिरसानें थबथबलेलीं पदें ऐकून पांडुरंगचरणीं लीन झालेल्या श्रोतृसमुदायास, आपल्या प्रासादिक वाणीनें सामाजिक व धार्मिक उपदेश करण्यास नेहमीं तयार असलेल्या तुकोबांचें किंवा एकनाथांचें उदाहरण डोळ्यापुढें ठेवून, प्रार्थनासमाजांत किंवा घरीं ईश्वराची प्रार्थना करण्यापेक्षां लोकांच्या उत्सवांत येऊन, त्यांची धर्मबुद्धि जाग्रत करून राष्ट्रीयत्त्वास बळकटी आणण्यांतच जास्त पंढरीनाथाची सेवा आहे असें त्यानीं म्हटलें आहे. उत्सवांतून याप्रमाणें धर्मशिक्षण देण्याचें जें ध्येय त्यांनीं सुशिक्षितांपुढें ठेवलें, तें त्यांच्या बदललेल्या मनोवृत्तीचेंच द्योतक असले पाहिजे. १८८५ सालीं व तत्पूर्वी धर्माच्या व धर्मशिक्षणाच्या विरुद्ध बोलणारे टिळक, १८९६ सालीं सुशिक्षितास लोकांना भक्तीचीं व धर्माचीं रहस्यें समजावून सांगण्याचा उपदेश करीत आहेत, हा या काळांतील त्यांनीं केलेल्या हिंदुतत्त्वज्ञानाच्या अभ्यासामुळें त्यांच्या बदललेल्या मनोवृत्तचा परिणाम असावा. हिंदूंचें धार्मिक तत्त्वज्ञान फार उच्च प्रकारचें आहे असें त्यांना स्वतःस पटूं लागल्यावर, त्याचें लोकांना शिक्षण दिल्यास धर्मजागृति होऊन लोकांच्या धर्मविषयक गैरसमजुती दूर होतील, व धर्माचीं मूलतत्वें एकदां समजून, खऱ्या धर्माची ओळख पटली व हिंदुधर्माचें खरें ज्ञान झालें, म्हणजे त्यांचें धार्मिक जीवन शुद्धतर होऊन इष्ट त्या सुधारणा सुलभ रीतीनें घडून येतील, असे धर्मशिक्षणाचे विचार त्यांच्या मनांत येऊं लागले असावे. याप्रमाणें टिळकांचें मन पुनः हिंदुधर्माच्या शुद्ध स्वरूपाकडे झुकूं लागलें यांत टिळकांच्या मूळच्या धार्मिक संस्कारांचाहि थोडाफार अंश असेल, परंतु विचारबुद्धीला पटल्यामुळेंच त्यांचा हिंदुधर्मांतील उच्च तत्त्वांवर विश्वास बसूं लागला, हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. विचारप्राधान्य हेंच टिळकांच्या बुद्धीचें मुख्य स्वरूप आहे, व तें त्यांच्या आयुष्यांतील सर्व व्यवहारांत प्रतिबिम्बित झालेलें आहे. म्हणूनच टिळक याप्रमाणें हिंदुधर्माकडे वळले तरी त्यांनीं त्यांतील रूढ धार्मिक समजुतींना आपल्या बुद्धींत कधींहि थारा दिला नाहीं. ही गोष्ट त्यांनीं पुढें प्रसिद्ध केलेल्या Arctic Home of the Vedas मध्यें व नंतर गीतारहस्यांतहि स्पष्टपणें दिसून येते. Orion मधील हिंदूंच्या धर्मग्रंथाबद्दलची चिकित्सक बुद्धि या ग्रंथांतूनहि तितक्याच प्रखरतेनें प्रगट झाली आहे.

टिळकांच्या धार्मिक मनोवृत्तींत यामप्रमाणें फरक पडत चालला, पण त्याचा उगम अजून बुद्धींतच होता. ईश्वराचें अस्तित्व, भक्तिमार्गाची उपयुक्तता, हिंदूंचे श्रेष्ठ अध्यात्मिक मार्ग यांना फक्त त्यांच्या बुद्धीनें मान्यता दिली. बुद्धीनें म्हणण्याचें कारण त्यांच्या विवेचनांतून अद्यापि दृढ प्रत्ययाचे सूर निघत नाहींत; व अजूनहि त्यांच्या हातून 'ईश्वराला कमी दर्जाचा जोडीदार खपत नाहीं' अशीं वाक्यें लिहिलीं जात. ईश्वराविषयीं ज्यांचे अन्तःकरणांत भक्ति उत्पन्न झाली, त्याचें अस्तित्व ज्याच्या हृदयाला पटलें, तो असें कधींहि लिहूं शकणार नाहीं. पण ही डोक्यांतली ईश्वरनिष्ठा लवकरच एका दुःखद प्रसंगानें हृदयांत उतरली. तो प्रसंग म्हणजे त्यांचा दुसरा तुरुंगवास होय.

संकटाची आंच लागल्याशिवाय खरी परमार्थभावना उत्पन्न होत नाहीं. हा तुरुंगवास आला त्यावेळची त्यांची चिंताजनक परिस्थिति, 'थोर लोकांच्या अनिमित्त व निरपेक्ष स्नेहा'मुळें मिळालेली सवलत, व या सर्वांहून, सर्व संकटांतून अनपेक्षित रीतीनें सुरक्षित पार पडणें, यांच्या योगानें टिळकांच्या बुद्धीनें मान्य केलेली ही धर्मभावना त्यांच्या हृदयांत आली व तेथेंच ती अढळस्थान घेऊन बसली. यापुढील सर्व उद्गारांत ही ईश्वरविषयक भावना जास्त जास्त जोरानें प्रगट होऊं लागली, व क्वचित् अद्वैत तत्त्वावर दृष्टि ठेऊन ईश्वराच्या कल्पनेचा त्यांनीं विचार केला, तरी ही तावून सुलावून निघालेली ईश्वरनिष्ठा, त्यांच्या आयुष्याच्या शेवटापर्यंत, त्यांच्या हृदयांतून कधींहि हलली नाहीं. ईश्वरनिष्ठेचा येथें उल्लेख करण्याचें कारण, ईश्वरविषयक कल्पना हेंच धर्माचे जीवन आहे, व धार्मिक भावनेची वाढ पहातांना या गोष्टीकडे लक्ष पुरविलें असतां पुरें होतें. याच वेळीं हिंदुतत्त्वज्ञानावरची त्यांचीं मतें ठाम झालीं. हीं त्यांचीं मतें पूर्ण विचारांतीं बनलीं असल्यामुळें, त्यांच्यांत पुढें फरक पडला नाहीं; उलट जसजसें ह्या विषयांचें अध्ययन वाढत गेलें, तसतसा त्यांचा विविध अंगांनीं विचार होऊन, त्यांमधील अनेक नवीन नवीन गोष्टींचा उलगडा झाला व तीं जास्तच ठसलीं.

यामप्रमाणें टिळकांच्या आयुष्यांत त्यांचा दुसरा तुरुंगवास, हा धार्मिक दृष्टीनें दुसरा महत्त्वाचा काळ होय. विद्याभ्यास करीत असतांना, विचारबुद्धीच्या पहिल्या धक्यानें हिंदुधर्मकल्पनांबद्दल संशयाची अश्रद्धता उत्पन्न होऊन, मनाची जी

---

* हा लेख लिहून झाल्यानंतर वरील गोष्टीचें खुद्द टिळकांच्या तोंडूनच निघालेल्या उद्गारांनीं अकल्पित रीतीनें समर्थन झालें. रा. महादेव धोंडो विद्वांस यांनीं, खुद्द टिळकांना 'तुमच्या विचाराची परिणति केव्हां झाली' असें विचारलें असतां, टिळकांनीं '१९०० सालच्या सुमारास माझ्या विचारास स्थिरता प्राप्त झाली' असें उत्तर दिलें होतें. [ याच सुमारास ईश्वरनिष्ठेच्या उदयाच्या पहिल्या उमाळ्यांत ते देवावर गंधफूल वाहून मगच जेवावयास बसत असें कळतें. ]

अनिश्चित अवस्था झाली होती, ती मधील हिंदुधर्मग्रंथाच्या विचारानें व परिशीलनानें जाऊन या सुमारास त्यांचे धार्मिक विचार परिणत झाले, व हिंदूंच्या धार्मिक तत्त्वज्ञानावर त्यांचा विश्वास बसला. तुरुंगवासांतून सुटून आल्यावर लिहिलेल्या पहिल्याच लेखांत त्यांनीं ईश्वराचें अत्यंत कृतज्ञतापूर्वक स्मरण केलें आहे. टिळकांनीं पुढें जे जे लेख लिहिले, किंवा जीं जीं भाषणें केलीं, त्यांत पूर्वींप्रमाणें ईश्वराविषयीं बुद्धीवर अवलंबून असणारा विश्वास दिसत नसून श्रद्धेची भावना दृष्टीस पडते. "परमेश्वरावर विश्वास ठेवा. त्याच्यावर विश्वास ठेवून आपलें कर्तव्य करीत राहिल्यास तो खचित यश देईल. श्रीकृष्णाचें असें स्पष्ट आश्वासन आहे." अशा तऱ्हेचे उद्गार, येथून त्यांनीं पुढें लिहिलेल्या सर्व लेखांत व दिलेल्या सर्व व्याख्यानांत, काळाच्या वाढीबरोबर वाढत्या क्रमानेंच, सर्वत्र आढळून येतात. तसेंच 'आर्यांचें उत्तरध्रुवाकडील वेदनिर्दिष्ट मूलस्थान' या पुस्तकांतहि जरी त्यांनीं वेदांचा व धर्मकल्पनांचा चिकित्सक पद्धतीनेंच विचार केला आहे, तरी प्रस्तावनेच्या शेवटीं ईश्वरविषयक निष्ठा दृष्टीस पडते. "I little thought that I could bring to this stage my investigation into the antiquity of the Vedas but it has pleased providence to grant me strength amidst troubles and difficulties to do the work, and with humble rememberance of the same, I conclude in the words of the well-known consecratory formula ॐ तत्सद् ब्रह्मार्पणमस्तु ।" 'वेदाच्या प्राचीनत्वाविषयीं शोध' या पुस्तकाच्या प्रस्तावनेच्या शेवटाशीं याची तुलना केल्यास, व त्यावेळची त्यांची परिस्थिति व त्याच वेळचे त्यांचे इतर उद्गार व लेख लक्षांत घेतल्यास, हें त्यांचें लिहिणें औपचारिक नसून, टिळकांच्या हृदयांत नवीन उत्पन्न झालेल्या ईश्वरनिष्ठेचें द्योतक आहे असेंच दिसून येईल. या त्यांच्या हृदयांत उत्पन्न झालेल्या धार्मिक भावनेचा त्यांच्या इतर जीवनावरहि परिणाम झाला असेल, स्वामी विवेकानंदांनीं म्हटल्याप्रमाणें, मनुष्याच्या सर्व आचारविचारांवर, किंबहुना मनुष्यजातीच्या सर्व भावी इतिहासावरहि ताबा चालविणारी धर्मासारखी दुसरी सामर्थ्यवान् शक्ति नाहीं. म्हणूनच विचारामुळें उत्पन्न झालेली अश्रद्धता गेली, व हिंदुधर्मांतील तत्त्वज्ञानावर बुद्धि स्थिर होऊन, जसजशी धार्मिक भावना टिळकांचे हृदयांत खोल जात चालली व त्यांच्या बुद्धींत पूर्णपणें ठसून त्यांच्या मनोरचनेचा एक घटक झाली, तसतसा त्यांच्या आचरणावर तिचा दृश्य परिणाम होऊं लागला. त्यांच्या राजकीय कार्यांत अशा तऱ्हेचा परिणाम झाल्याचें दिसून येतें. १९०५ सालापासून पुढें टिळकांच्या राजकारणांत ध्येयवादाची छाप पडली असें एके ठिकाणीं रा. केळकरांनीं म्हटलें आहे. टिळकांच्या त्यावेळच्या एकंदर मनःस्थितीकडे सूक्ष्म दृष्टीनें पाहिल्यास, त्याचा उगम

राजकीय वातावरणापेक्षां मुख्यतः टिळकांना अन्तःकलह मिटून, मिळालेल्या मानसिक शान्तीमध्यें आहे, असें दिसून येईल.

रूसोजपानी युद्धांत, लहानग्या एशियाटिक जपाननें युरोपांतील रशिया-सारख्या मोठ्या बलाढ्य राष्ट्रास जेरीस आणलें त्यायोगानें सर्व एशियाटिक राष्ट्रांत एका नवचैतन्याची लाट उसळली होती, परंतु ती लाट थोपविण्यास हिंदुस्थानांत त्यावेळीं खंबीर मनाचे, बुद्धिवान् लॉर्ड कर्झन हे व्हाइस्‌राय होते व त्यांनीं कोणतीहि दडपशाहि करण्यास मागें पाहिले नसतें. तेव्हां नुकताच तुरुंगाचा खडतर अनुभव घेऊन आलेल्या टिळकांना ध्येयवादा बनावण्यास ही गोष्ट पुरेशी नव्हती. बंगालची वंगभंगाची चळवळ हें कारणहि नैमित्तिकच मानलें पाहिजे. परंतु यावेळीं त्यांच्या मनाला निराळीच शक्ति प्राप्त झाली होती. समाजसेवेचा आरंभ करतांना त्यांच्या मनांत जो मानसिक कलह उत्पन्न झाल्याचें मागें सांगितलें आहे तो या मधील काळांत सर्वस्वी गेला नव्हता, व मधून मधून त्याची जाणिवहि त्यांना होत असेल. विशेषतः १८८७ पासून पुढें कांहीं वर्षें त्यांच्या मनावर जी एक निराशेची छाप पडली होती त्या काळांत हा कलह जास्तच तीव्र भासला असेल.* पण पुढें १८९४ सालापासून कर्मयोगाचा मार्ग त्यांच्या बुद्धीला पटावयास लागल्यावर, त्यांचा कलह कमी होत चालला होता, व १९०० सालांत तो पूर्णपणें गेला. हिंदुधर्मानें सांगितलेलें मोक्षरूपी ध्येय किंवा जीवितसाफल्य मिळविण्यास, जगाला टाकून निवृत्त बनण्याची जरूरी नाहीं; इतकेंच नव्हे, तर स्वतःच्या बुद्धीनें दिलेला कौल मान्य करून आपण पूर्वीं जो निस्वार्थ देशसेवेचा मार्ग पत्करला, तो या मोक्षाच्या साधनांपैकीं एक प्रधान साधन हिंदुधर्मांतच मानला गेला आहे; व याच मार्गाचा पुरस्कार श्रीमद्भगवद्गीतेसारख्या हिंदुधर्मांतील सर्व आचार्यांस व सामान्य लोकांस मान्य असलेल्या, व सर्व सुशिक्षित जगास वंद्य ठरलेल्या, प्रस्थानत्रयींतील एका ग्रंथानें केला आहे अशी खात्री पटल्यामुळें, टिळकांच्या स्वभावतः जुन्याकडे ओढ घेणाऱ्या मनास मोठाच आधार सांपडून अतीशय आनंद झाला असेल! यामुळें त्यांच्या मनांतील कलह संपून त्यांना एक प्रकारची शान्ति लाभली होती, व आपण करीत असलेलें कार्य, हें जीवितसाफल्याच्या मार्गांपैकींच एक असल्यामुळें, तें करण्यांत ईश्वराचीच सेवा असून यास हिंदुधर्माचा पाठिंबा आहे, व म्हणूनच ईश्वर आपल्या बाजूला आहे अशी खात्री पटून, त्या भावनेनेंच टिळक त्यांत द्विगुणित उत्साहानें पडले. टिळकांच्या राजकारणांतील ध्येयवादास, त्यास मिळालेलें धर्माचें अधिष्ठान हेंच महत्त्वाचें कारण झालें असावें.

---

* ह्या काळाला अनुलक्षून बोलतांना पुढें ‘ आम्ही निराशेंतूनच जगतों ’ असे उद्गार त्यांनीं एकदां काढले होते.

महाराष्ट्राचा पूर्वीचा इतिहास किंवा जगांतील इतर कांहीं प्रसंग व थोर लोकांचीं चरित्रें यांजकडे नजर फेंकल्यास वरील विधानाची शक्यता पटेल. याप्रमाणें, टिळकांच्या राजकारणांतील ध्येयवाद हा त्यांच्या मनांत नवीन उत्पन्न झालेल्या धार्मिक भावनेचा एक पुरावाच समजण्यास हरकत नाहीं. परंतु हें जरी मान्य केलें नाहीं तरी त्यामुळें आपल्या सिद्धांतास बाध येत नाहीं.

ह्या वरील सर्व कारणांमुळें, १९०० सालांतच टिळकांच्या धार्मिक मतांस निश्चितता आली असें समजणें उचित होय. टिळकांच्या या परिपक्व धार्मिक बुद्धींत पुढें फरक झाला नाहीं व हीच त्यांच्या पुढील आयुष्याचें अधिष्ठान बनली. मात्र हिलाव पुढें विचाराचा जास्त जास्त पाठिंबा मिळत गेला. टिळकांच्या धार्मिक भावनेचा यापुढील विकास पहाण्यापूर्वीं येथेंच त्यांना पटलेल्या या धार्मिक तत्त्वज्ञानाचें स्वरूप काय, तें कसें बनलें, व तदनुरोधानें धर्माची सुधारणा करण्याविषयीं त्यांचीं काय मतें झालीं हें आपण पाहूं. टिळकांनीं १८९६सालीं गणेशोत्सवांत त्यांना त्यावेळीं पटत चाललेल्या हिंदूंच्या धार्मिक तत्त्वज्ञानाचें लोकांना शिक्षण देण्याची प्रार्थनासमाजिस्टांना विनंति केली होती. धर्माचें शिक्षण देण्याचे याप्रमाणें त्यांच्या मनांत विचार घोळत होते, तरी स्वतः त्यावेळीं त्यांच्या स्वतःच्या हातून कांहीं झालें नाहीं. १९०० सालापासून पुढें तिसऱ्या तुरुंगवासापर्यंत मात्र त्यांनीं पुष्कळ धार्मिक व्याख्यानें दिलीं. हाच काळ टिळांच्या आयुष्यांत लोकांना प्रत्यक्ष शिक्षण देऊन सुधारणा करण्याच्या बाबतींत फार महत्त्वाचा आहे. कारण तिसऱ्या तुरुंगवासानंतर, राजकीय कामांत पूर्णपणें गुरफटल्यानें, गीतारहस्यप्रकाशन व पांचसहा व्याख्यानें यापेक्षां त्यांच्या हातून जास्त कांहीं झालें नाहीं. या कालांत मात्र टिळकांच्या धार्मिक विचारांना व्याख्यानाच्या रूपानें बहर आला होता, व यांतच त्यांच्या धार्मिक विचारांचें प्रतिबिंब पडलें आहे.

आरंभीं धर्म म्हणजे काय व त्याविषयीं टिळकांचीं मतें काय होतीं हें आपण पाहूं. मनुष्याच्या बुद्धीचा विकास होऊन त्याची विचारशक्ति वाढली म्हणजे त्याच्यापुढें कांहीं महत्त्वाचे प्रश्न उभे रहातात. ह्या जगाची गूढ रचना, त्यांत वावरणारीं माणसें, त्यांचे परस्परविरोधी हितसंबंध याचा अर्थ काय ? या जगाला कोणी एखादा कर्ता आहे काय ? असल्यास त्याचा हें जग उत्पन्न करण्यांत काय हेतु असावा ? माझ्या स्वतःच्या आयुष्याचा उद्देश काय व हें जीविताचें ध्येय मीं कोणच्या मार्गानें साध्य करावें ? अशा तऱ्हेचे हे प्रश्न असतात. यांतच मनुष्याच्या उपजत सुखविषयक प्रवृत्तीची भर पडते. या प्रश्नांना निव्वळ तात्त्विक स्वरूप नसून, मनुष्याच्या नेहमींच्या व्यवहारावर या प्रश्नाचें त्यानें जें उत्तर दिलें असेल त्याचा परिणाम घडत असतो. किंबहुना ह्या उत्तरावरच त्याचें आचरण अवलंबून असतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. या प्रश्नांतच धर्माचें बीज आहे. परंतु साधारण मनुष्याची विचारशक्ति पूर्णपणें विकास पावलेली नसल्या-

मुळें मोठ्या लोकांनीं यावर जीं मतें प्रदर्शित केलीं असतात तींच ते प्रमाण म्हणून मानतात. यालाच धर्म म्हणतात. ह्या 'विश्वाचें हें कोडें' उलगडून त्याचें सत्यस्वरूप जाणून तदनुरोधानें मनुष्याच्या जीवनाचा हेतु ठरवून तें ध्येय साधण्याकरितां मनुष्यांना, या थोर लोकांनीं आचरणाचा जो मार्ग दाखविला त्यालाच धर्म म्हणतात.

"Religion in the true sense of the word means and includes the knowledge of the nature of God and soul and of the ways and means by which the human soul can attain salvation."* आचरणात्मक धर्म हा जीवन ध्येयावर किंवा हें ध्येय ज्याच्यावरून ठरविलें त्या आपल्या विश्वाच्या कल्पनेवर अवलंबून असतो. हिंदुस्थानामध्यें हें धर्माचें स्वरूप फार प्राचीन कालापासून ओळखलें गेलें आहे. या धर्माला आधारभूत असलेल्या विश्वाच्या व त्यामधील मनुष्याच्या जीवितकार्याच्या कल्पनेस तत्त्वज्ञान असें निराळें नांव असलें, व धर्मामध्यें मनुष्यानें इहलोकीं कसें वागावें याचाच प्रामुख्यानें उल्लेख असला, तरी त्यांमध्यें हा संबंध असतो. डॉयसन् यानें हिंदुतत्त्वज्ञानाचा इतिहास लिहितांना, हिंदूंच्या तत्त्वज्ञानसंप्रदाय व धर्मपंथ यांमध्यें फरक नसल्यामुळें मला धर्मपंथाचाहि विचार करावा लागेल, असें म्हटलें आहे. मॅक्समुल्लरनेंहि, हिंदुस्थानांत धर्म व तत्त्वज्ञान एकमेकांपासून निराळीं काढतां येत नाहींत ('In India the two–Religion and Philosophy–are inseparable',) असेंच म्हटलें आहे. हें धर्माचें मूळ आपण नेहमीं लक्षांत घेतलें पाहिजे, व मनुष्याचा धर्म व धार्मिक योग्यता ठरवतांना नेहमीं याच दृष्टीनें त्याचा विचार केला पाहिजे. जगामधील एकाद्या प्रसिद्ध धर्मपंथांचा अनुयायी नेहमीं त्या धर्मानें सांगितलेला मार्ग पाळीत असतोच असें नाहीं. त्याच्या आचरणावरून प्रतीत होणारा धर्म निराळाच असतो. कार्लाईलनें धर्माचें हें रहस्य ओळखून एके ठिकाणीं म्हटलें आहे, "This is not what I call religion, this profession and assertion, which is often only a profession and assertion from the outworks of man, from the mere argumentative region of him, if even so deep as that. But the thing a man does practically believe (and this is often enough without even asserting to himself much less to others) the thing a man does practically lay to

---

* कलकत्ता येथें १९०१ सालीं 'हिंदुधर्म' या विषयावर टिळकांनीं दिलेलें व्याख्यान, लो. टि. आठवणी पा. २३८

heart, and know for certain, concerning his vital relations to this mysterious universe, and his duty and destiny there that is in all cases the primary thing for him and creatively determines all the rest." धर्म याप्रमाणें व्यक्तिगतच असतो. विश्वाच्या घटनेच्या ज्ञानानें ठरलेलें या जगांतील ध्येय ओळखून, तें साध्य करण्याचा मार्ग दाखविणें, हें धर्माचें कार्य होय व हें हल्लीं आपल्याकडील स्वामी विवेकानंद आदिकरून श्रेष्ठ धर्मविचारी पुरुष व कित्येक पाश्चात्य तत्त्वज्ञानी यांनाहि मान्य आहे. टिळकांचेंहि हेंच म्हणणें असून, हें त्यांनीं आपल्या व्याख्यानांत व गीतारहस्यांत अनेक वेळां सांगितलें आहे. विचाराला प्राधान्य देणाऱ्या प्रत्येक माणसाची धर्मविषयक कल्पना याहून निराळी असत नाहीं. या धर्माच्या कल्पनेप्रमाणें धर्माला किंवा थोड्या व्यापक दृष्टीनें बोलल्यास नीतिशास्त्राला तत्त्वज्ञानाचा पाया असला पाहिजे. हिंदुधर्मांत हें तत्त्व प्राचीनकाळीं मान्य होतें हें मागें म्हटलेंच आहे, पण इतर बहुमोल तत्त्वांप्रमाणें हें मध्यें पुष्कळ दिवस लुप्त होऊन धर्माचा पाया धर्मग्रंथ व परंपरा यांचेवरील अंधश्रद्धेतच आला, व यामुळें पुष्कळ गोष्टी ज्या करणांकरितां तात्पुरत्या आस्तित्वांत आल्या त्या त्यांचें प्रयोजन संपल्यावरसुद्धां तशाच राहून, मध्यें गेलेल्या कित्येक शतकांत हिंदुधर्माचें स्वरूप 'वेडगळ व परस्पर विरोधी समजुतीचा भारा' असें झालें; इतकेंच नव्हे, तर हिंदुधर्मांत अनेक परस्परविरोधी धर्मतत्त्वज्ञानें व तदनुरोधानें आचरणमार्ग प्रचलित होते, तरी अज्ञ समाज त्या सर्वांचा एकाच हिंदुधर्म या व्यापक नांवाखालीं समावेश करूं लागला. युरोपमध्येंसुद्धां ख्रिश्चन धर्माचा पाया बायबलमधील तत्त्वज्ञानांत होता पण तें जरी पुष्कळ अपुरें होतें, तरी श्रद्धेमुळें खिस्ती लोक स्वतंत्रपणें त्याचा विचार करण्यास तयार नसल्यामुळें, धर्म व तत्त्वज्ञान यांची फारकत झाली, व डॉग्म्याटिक थिआलजी व फिलॉसफी असे दोन स्वतंत्र भाग झाले. त्याचाच परिणाम पुढें धर्माचें महत्त्व कमी होण्यांत होऊन, हल्लीं पाश्चात्य लोक मनुष्याच्या येथील आचरणाचा विचार धर्माप्रमाणें न करतां, स्वतंत्र रीत्या तत्त्वज्ञानाच्या अनुरोधानें करतात. टिळकांनीं विद्याभ्यास करतांना पाश्चात्य तत्वज्ञान्यांचें हें मत मान्य करून, हिंदुधर्माच्या आज्ञांवर विसंबून स्वतःचा जीवितक्रम न ठरवितां, स्वतःच्या बुद्धीनें, व तत्कालीन जगविषयक कल्पनेप्रमाणें, स्वतःचें आयुष्यांतील कर्तव्य ठरविलें. ही टिळकांची धर्मविषयक कल्पना पूर्णपणें लक्षांत ठेवल्याशिवाय त्यांच्या धार्मिक बुद्धीच्या विकासाचें रहस्य उलगडणार नाहीं. पहिल्यांदां यामुळें जसें त्यांनीं हिंदुधर्मांत सांगितलेल्या मनुष्याच्या ध्येयापेक्षां निराळें ध्येय ठरविलें, तसेंच पुढें हिंदुधर्माचा अभ्यास केल्यावर त्यांतील तत्त्वज्ञान पटूं लागून, तर्कबुद्धीनें व प्रयोगानें पाश्चात्यांनीं आधिभौतिक शास्त्रांच्या सहाय्यानें जे सिद्धांत बांधले आहेत,

ते त्याला विरोधी नसून पोषकच आहेत, हें जेव्हां त्यांनीं ठरविलें, तेव्हांच हिंदुधर्माच्या या शुद्ध स्वरूपावर त्यांचा विश्वास बसला. गीतारहस्यांतील पहिलीं नऊदहा प्रकरणें, त्यांनीं प्रस्तावनेंत म्हटल्याप्रमाणें, गीतेंतील विवेचनाचें पूर्ण मर्म लक्षांत भरविण्याकरितां, व तुलनात्मक विचार करून गीतेंतील सिद्धांत श्रेष्ठ ठरविण्याकरितां असलीं, तरी कोणत्या विचारपरंपरेनें त्यांची हिंदुतत्त्वज्ञानावर श्रद्धा बसली ह्याचेंहि चित्र आहेत. याप्रमाणें सामान्यरूपानें धर्मासंबंधीं टिळकांचीं मतें पाहिल्यावर या दृष्टीनें हिंदुधर्माकडे पाहून त्यांचें जें मत बनलें तिकडे वळूं.

प्रारंभींच, हिंदुधर्म या सदराखालीं जें जें येतें त्याचें स्वरूप अज्ञ समजुतीप्रमाणें एकजिनसी नसून, त्यांत अनेक परस्परविरोधीं तत्त्वज्ञानें व तन्मूलक अनेक पंथ व आचारमार्ग आहेत; व त्यांचे अनुयायी आपापल्या धर्मासच खरें मानून, दुसऱ्याशीं भांडून शाब्दिक कोट्यांनीं किंवा इतर मार्गांनीं त्याचा खरेपणा प्रस्थापित करण्यास पहातात, ही गोष्ट त्यांच्या नजरेस आली. यांपैकीं प्रत्येकजण आपापलाच मार्ग वैदिक असें आग्रहानें ठासून सांगत सांगत असतो. या सांप्रदायिक दृष्टीनें हिंदुधर्माचें फार नुकसान झालें असून, परस्परांच्या भाडणांतील वादाच्या भरांत हिंदुधर्माचीं खरीं मूलतत्त्वें विसरून जाऊन अवान्तर गोष्टींचेंच महत्त्व फार वाढलें आहे. या परिस्थितीचीं मुख्य कारणें म्हणजे आपल्या लोकांची सांप्रदायिक आग्रहाची दृष्टि व अंधश्रद्धा हीं होत. ही सुधारण्यास परराष्ट्रांत जसें धार्मिक गोष्टींचें शास्त्र म्हणून अध्ययन होतें तसें आपण केलें पाहिजे, व धर्माचें खरें रहस्य ओळखून तें देशबांधवांना सांगून, त्यांना विचाराच्या पायावरच त्यांच्या धर्ममतांची उभारणी करण्यास शिकवून, जास्त खऱ्या दृष्टीनें धार्मिक बनविलें पाहिजे. अशा तऱ्हेचा अभ्यास त्यांनीं स्वतः केला, व हिंदुधर्मासंबंधीं आपलीं मतें लोकांपुढें मांडलीं.

हिंदुधर्माच्या स्वरूपांत जरी अनेक पंथ आहेत तरी त्यांत मूलभूत अशीं कांहीं सामान्य तत्त्वें आहेत. हीं सामान्य तत्त्वेंच हिंदुधर्माचा उत्तम भाग असून, विविध पंथांच्या लोकांत एकच भावना उत्पन्न करतात. हीं सामान्य तत्त्वें कोणतीं याचा जरी स्वतंत्र रीत्या एके ठिकाणीं त्यांनीं कोठें उहापोह केला नाहीं, तरी ' हिंदुधर्माचें व्यापक स्वरूप ' किंवा ' हिंदुधर्माचीं लक्षणें ' या व इतर कांहीं व्याख्यानांत त्यांनीं यांपैकीं कांहीं सांगितलीं आहेत. वरील पहिल्या दोन व्याख्यानांत हिंदुधर्माचें जें लक्षण केलें आहे, तें नैय्यायिक पद्धतीनें केलें आहे हें आपण लक्षांत ठेविलें पाहिजे. हिंदुधर्माचें 'व्यावर्तक' लक्षण ठरवितांना इतर धर्मांपासून हिंदुधर्माचें वैशिष्ट्य काय एवढेंच पहावयाचें असतें. हें करण्यांत, या पंथांच्या एकीकरणाकरितां एका सामान्य लक्षणाचा उपयोग होणें शक्य असल्यामुळें, तसेंच सर्व हिंदुधर्मपंथांना लागूं होईल असें लक्षण

मिळेल कीं नाहीं व मिळाल्यास तें कोणतें, याचाच विचार त्यांना करावयाचा होता. याप्रमाणें हें लक्षण एका विशिष्ट उद्देशानें व विशिष्ट पद्धतीनें केलें असल्यामुळें, त्यांत हिंदुधर्माच्या स्वरूपाचें पूर्ण वर्णन नाहीं; पण अर्थात् हिंदुधर्माचें वैशिष्ट्य असलेलीं कांहीं तत्त्वें त्यांत आलेलीं आहेत. 'प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु' हें पद हल्लींच्या हिंदुधर्माचें वर्णन करितांना सामान्य लक्षणांत त्यांनीं घातलें असलें, तरी शास्त्र या दृष्टीनें हिंदुधर्माचा विचारपूर्वक अभ्यास करण्याचें जें त्यांनीं उपदेशिलें होतें, त्याला विरोधी आहे. खुद्द टिळकांची वेदांविषयीं प्रमाणग्रंथ अशी भावना नव्हती; आणि स्वतंत्र विचाराच्या सुशिक्षित लोकांची तशी असणें शक्यहि नव्हतें. उपनिषदांविषयीं मात्र त्यांची भावना थोडी निराळीं होती. प्राचीन ऋषींनीं अत्यंत खोल विचार करून 'सात्त्विक श्रद्धेच्या व निर्मल प्रतिभेच्या जोरावर*' विश्वाचीं गूढ सत्यें ओळखून त्याविषयीं आपले विचार या पुस्तकांत ग्रथित केले आहेत, असा त्यांचा विश्वास होता. परंतु याप्रमाणें उपनिषदें जरी सत्य स्वरूप कथन करणारीं असलीं, तरी त्यांतील वचनेंहि विचाराच्या निकषावरूनच तपासून घेतलीं पाहिजेत, असें त्यांचें मत होतें; व हें त्यांच्या नैसर्गिक विचारस्वातंत्र्याच्या प्रवृत्तीला धरूनच आहे. याप्रमाणें 'प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु' हें सध्याच्या हिंदुधर्माचें बरोबर लक्षण असलें, तरी हिंदुधर्माच्या शुद्धस्वरूपांत तें राहिलें नसतें, किंवा फार तर बऱ्याच संकुचित स्वरूपांत राहिलें असतें. पण या सामान्य लक्षणांतील पुढील दोन पदें मात्र हिंदुधर्माचें लक्षण व मूलतत्त्वें या दोन्ही दृष्टींनीं फार महत्त्वाचीं आहेत. हिंदुधर्मांत अनेक देवता आहेत व त्यांच्या उपासनाहि अनेकविध आहेत. परंतु या सर्वांचा शेवट उपासकांची उपास्यांशीं एकरूपता होण्यांतच होतो; व गीतेंत सांगितल्याप्रमाणें, या सर्व देवतांच्या मुखें एकाच भगवंताची सेवा होते, हें लक्षांत घेऊन या सर्व पंथांनीं आपापल्या देवतांची उपासना केली, तरी सांप्रदायिक दृष्टि धरून इतरांच्या उपासनांना नांवें ठेवूं नयेत, हेंच खऱ्या धर्मदृष्टीनें उचित आहे, व हीच त्यांची शिकवण आहे. ह्या योगानें, या पंथांतील भांडणें कमी होऊन एकी उत्पन्न होईल, व सर्वजण आपापल्या मार्गानें व इतरांच्या मदतीनें आपआपलें ध्येय प्राप्त करून घेतील. हिंदुधर्माचें ऐतिहासिक दृष्ट्या अवलोकन केल्यास, हें परस्परसहिष्णुतेचें तत्त्व त्यांत पूर्वी प्रचलित होतें असें आढळून येते; व स्वामी विवेकानंदांनीं म्हटल्याप्रमाणें, आणखी एकदोन तत्त्वांबरोबर हें तत्त्वच मुख्यतः हिंदुधर्माची इतर धर्मांपेक्षां श्रेष्ठता दर्शवितें. "हिंदुधर्मांत इतर धर्मांहून ज्या कांहीं विशेष गोष्टी आहेत त्यांतील साधनांची अनेकता ही एक मुद्याची गोष्ट

---

* गीतारहस्य पान २५५

आहे; व त्यामुळें इतर धर्मांपेक्षां हिंदुधर्माची योग्यता अधिक आहे असें सहज कळून येईल.*" व म्हणूनच हें मध्यें लुप्त झालेलें तत्त्व पुनः प्रस्थापित केलें तरच हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन होईल. "तूं वैदिक असलास तर केवळ वैदिकत्वाचा अभिमान बाळगूं नकोस, तूं वेदान्ती असलास तर केवळ वेदान्तीपक्षाचा अभिमान ठेवूं नकोस, तूं वैष्णव असलास तर केवळ वैष्णवत्वाचा अभिमान बाळगूं नकोस, अशा प्रकारें सर्व पंथांतील लोकांस उपदेश करून त्यांस सर्वसामान्य हिंदुधर्माचा अभिमान बाळगण्यास सांगणें हेंच खऱ्या हिंदुधर्माचें लक्षण होय; व तसें केल्याबद्दल जर हिंदु कॉलेजास× दोष द्यावयाचा असेल तर कॉलेजच्या आक्षेपकांनीं खुशाल द्यावा. आम्हांस हें मत ग्राह्य नाहीं इतकेंच नव्हे तर खऱ्या, हिंदुधर्माचें रहस्यहि असें नाहीं असें आम्ही साफ सांगतों. हिंदु म्हणजे नुसता शैव नव्हे, नुसता वैदिक नव्हे, नुसता वैष्णव नव्हे, किंवा नुसता भागवत धर्महि नव्हे. एका नदींतून फुटून ज्याप्रमाणें निरनिराळे कालवे जातात त्याप्रमाणें हे हिंदुधर्माचे कालवे आहेत; व या निरनिराळ्या पंथांचीं जीं विशिष्ट लक्षणें आहेत तीं बाजूस ठेवून जें सामान्य स्वरूप राहतें तें हिंदुधर्माचें खरें स्वरूप होय. आणि तें 'प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु । साधनामनेकता ॥ उपास्यानामनियमः । एतद्धर्मस्य लक्षणम् ॥ या नियमास विरुद्ध येत नाहीं; किंबहुना हिंदुधर्माचें हें लक्षण वरील तत्त्वांचा विचार करूनच बांधलेलें आहे असें म्हटलें तरी चालेल. निरनिराळ्या पंथांतील मतभेदांचे तंटे सामान्य हिंदुधर्मसंमत नाहींत ही गोष्ट नव्या पिढीच्या मनांत जितक्या स्पष्ट रीतीनें बिंबेल तितकी बिंबवून देणें हें प्रत्येक हिंदुधर्माभिमान्याचें कर्तव्य होय." या वरील उताऱ्यांत, टिळकांचें मत उत्तम रीतीनें प्रतिबिंबित झालें असल्यामुळें, त्याच्या विस्ताराकडे लक्ष न देतां तो येथें दिला आहे. या पंथांतील ऐक्यभावनेच्या वृद्धीमुळें, आणखीहि एक राष्ट्रीय हित साधण्यासारखें आहे. याविषयीं ते एके ठिकाणीं म्हणतात, "If we lay stress on it ( the common heritage ) forgetting all the minor differences that exist between the different sects, then by the grace of providence we shall be able ere long to consolidate all the different sects into a mighty Hindu nation. This ought to be the ambition of

---

* व्याख्यान 'हिंदुधर्माचीं लक्षणें' लो. टि. आ. व पान २२४

× सेंट्रल हिंदु कॉलेजांतील राष्ट्रीय गीतांवरील आक्षेपकांना उत्तर म्हणून हा लेख लिहिला आहे. लो. टि. आ. व पान २६५

every Hindu."* याप्रमाणें, हिंदुधर्मांतील पंथामध्यें परस्पर सहिष्णुता उत्पन्न झाली पाहिजे; व तसें होणें हेंच धर्माच्या खऱ्या रहस्यास धरून असून राष्ट्रीय दृष्ट्याहि अत्यन्त हितावह आहे, असें टिळकांनीं प्रतिपादन केलें आहे.

या त्यांच्या मतांतच, दुसऱ्या एका त्यांना मान्य असलेल्या तत्त्वाचा अंतर्भाव झालेला आहे. धर्माचा शास्त्रदृष्टीनें अभ्यास करून, पाश्चात्यांनीं Philosophy of religion ह्या नवीन विषयाची ज्ञानांत भर टाकली आहे. त्यांत सर्व धर्मांचा तुलनात्मक दृष्टीनें अभ्यास करून त्यांनीं कांहीं सामान्य तत्त्वें शोधून काढलीं आहेत. त्यांपैकीं धर्म ही व्यक्तिनिष्ठ भावना आहे, हें एक महत्त्वाचें तत्त्व आहे. धार्मिक सत्य एक असलें, तरी त्याकडे जाण्याचे मार्ग प्रत्येक व्यक्तीचे भिन्न असतात, व त्यांतच त्याचें व्यक्तित्व असतें, म्हणून धर्म ही बाब अगदीं स्वतंत्र व व्यक्तिगतच ठेवावी, असें तिकडील विद्वान लोक म्हणूं लागले आहेत. आपल्याकडील स्वामी विवेकानंदांचे गुरु श्रीरामकृष्ण परमहंस यांनीं स्वतः निरनिराळे धर्म स्वीकारून, त्याप्रमाणें साधनें केलीं; व सर्व धर्म एकाच ठिकाणीं जातात असा स्वानुभव घेऊन, "मतें तितके मार्ग; स्वतःच्या मार्गावर निष्ठा ठेवावी पण दुसऱ्या मार्गांची निंदा करूं नये." असा उपदेश केला आहे. टिळकांना हें तत्त्व पूर्णपणें मान्य होतें, व तसें गीतारहस्यांत व इतरत्रहि त्यांनीं प्रतिपादिलें आहे. त्यांचें स्वतःचें आचरणहि ह्या तत्त्वाप्रमाणेंच होतें. टिळक स्वतः अद्वैती असून श्रीशंकराचार्यांप्रमाणेंच भक्ति अगर पातञ्जलयोग ह्यापेक्षां ज्ञानाला श्रेष्ठ मानणारे होते, तरी त्यांनीं दुसऱ्या लोकांची अवहेलना कधीं केली नाहीं. 'विचाराच्या पायावर धर्माचें अधिष्ठान पाहिजे' या तत्त्वांतच वरील तत्त्वाचें बीज आहे. व म्हणूनच टिळक पहिल्यापासून संप्रदायाच्या विरुद्ध होते. संप्रदाय म्हटला कीं, एकांगी दृष्टि, व गतानुगतिकत्त्व आलेंच, व धर्म कितीहि विचाराच्याच पायावर उभा असला, तरी पुढें तो तसा रहात नाहीं. म्हणून पुष्कळांनीं स्वतःचा संप्रदाय स्थापण्याची सूचना केली असतांहि, त्यांनीं ती स्वीकारली नाहीं. बुद्धीचा आश्रय करून प्रत्येकानें तिच्या शिकवणीप्रमाणेंच आपला मार्ग चोखाळावा असें, त्यांचें ठाम मत होतें. याप्रमाणें, धर्माचा विचार करतांना, अंधश्रद्धेचा व समन्वयाचा जो मार्ग हिंदुस्थानांत आज कित्येक शतकें रूढ होता, तो टाकून देऊन, त्यांतही त्यांनीं विचारस्वातंत्र्याचा पाया घातला; व एवढीं एकच त्यांची कामगिरीहि कांहीं लहान नाहीं. टिळक संप्रदायाच्या इतके विरुद्ध होते कीं, राजकारणांतहि त्यांनीं आपला संप्रदाय स्वतः स्थापला नाहीं.

* भारतधर्ममहामंडळामधील व्याख्यान. 'B. G. Tilak His writings and speeches.' Page 36-37. Ganesh & Co.

हिंदुधर्मांतील या परस्परसाहिष्णुतेच्या तत्त्वाबरोबरच त्यांनीं त्यांतील दुसरें एक तत्त्व पुढें आणलें आहे. ऐतिहासिक दृष्टीनें अवलोकन केलें असतां, हिंदु धर्म आरंभापासून आतापर्यंत एकाच स्वरूपांत नसून, त्याच्यामध्यें वेळोवेळीं प्रगति होत गेलेली आहे असें दिसून येतें; व अशी वाढ होणें इष्ट असतें इतकेंच नव्हे, तर त्यावरच धर्माचा जिवंतपणा अवलंबून असतो. ही वाढ अर्थात् साधनांची असते. धर्माचा पाया तत्त्वज्ञानावर असतो, व श्रीशंकराचार्यांनीं म्हटल्याप्रमाणें, हें तत्त्वस्वरूप सर्वस्वी ' वस्तुतंत्र ' असल्यामुळें एकच असतें; व म्हणूनच धर्माचें ध्येय व मूलतत्त्वें हीं सर्व सनातन असून सर्वत्र सारखींच असतात. परंतु हें ध्येय गांठण्याचे मार्ग सांगण्याचें जें धर्माचें दुसरें कार्य आहे, त्यांत प्रगति होत असते. ही धर्माची प्रगति म्हणजे असे नवीन नवीन मार्ग निर्माण होणें हें होय. अशाप्रमाणें धर्माची प्रगति करून त्याची सेवा करण्याचा आपण झटून प्रयत्न केला पाहिजे. असें टिळकांनीं उपदेशिलें आहे स्वतः टिळकांनींहि असा प्रयत्न केला आहे. अशा तऱ्हेची ऐतिहासिक दृष्टि, त्यांच्या सर्व व्याख्यानांतून अंतर्भूत असून कांहीं ठिकाणीं त्यांनीं तसे स्पष्ट उल्लेखहि केलेले आहेत. गीतारहस्याच्या उपसंहारांतहि त्यांनीं हिंदुधर्माच्या इतिहासाचें स्थूल रूपानें विवेचन केलें आहे.

ह्यापेक्षांहि त्यांचें ह्यावेळचें जास्त अमोलिक कार्य म्हणजे हिंदुधर्मांतील जवळ जवळ लुप्त झालेल्या प्रवृत्तिमार्गाचें विवेचन करून त्यांनीं तो प्रामुख्यानें लोकांपुढें मांडला, हें होय. टिळकांच्या स्वतःच्या धार्मिक बुद्धीच्या वाढीचें विवेचन करतांना, त्याचें त्यांच्या स्वतःपुरतें महत्त्व थोडें सांगितलेंच आहे व आणखीहि पुढें सांगण्यांत येईल. तसेंच त्यांच्या ऐतिहासिक महत्त्वाचेंहि निबंधाच्या शेवटीं उपसंहारांत विवेचन करण्यांत येईल. यावेळीं, या प्रवृत्तिमार्गाबद्दल त्यांची खात्री पटून, गीतेच्या आधारें त्यांनीं ह्या विषयावर पुष्कळ व्याख्यानें दिलीं, व लोकांस आपलें म्हणणें पटविण्याचा प्रयत्न केला. ज्या विचारपरंपरेनें टिळकांनीं प्रवृत्तिमार्गाचें समर्थन केलें आहे त्यावर पुष्कळच वाद माजला आहे; पण त्या वादांत शिरण्याचें हें स्थळ नव्हे. येथें फक्त निष्काम कर्माचा फलोद्देश–विरहित–कर्म असा अर्थ करून, असें निष्काम कर्म शक्यच नाहीं, असा जो एक आक्षेप घेतला आहे, तो निष्काम कर्म ह्याचा अर्थ फलोद्देश रहित–कर्म असा नसून, या फलावर आसक्ति न ठेवतां केलेलें कर्म, असा असल्याचें स्वतः टिळकांनीं गीतारहस्यांत स्पष्ट केलें असल्यामुळें निर्मूल आहे, एवढेंच सांगितलें असतां पुरें होईल. मोक्षासाठीं नैष्कर्म्य मिळविलें पाहिजे, व तें नैष्कर्म्य कर्मसंन्यासानेंच मिळतें असें नाहीं, किंबहुना पूर्णपणें कर्मसंन्यास शक्यच नाहीं, तेव्हां ' बंधन हा धर्म कर्माचा नसून मनाचा आहे ' हें ओळखून, निष्काम बुद्धीनें कर्म करावें व असें करणें हेंच पारमार्थिक दृष्टीनें

जास्त सोपें आहे, अशा तऱ्हेची प्रवृत्तिमार्गाची मूलभूत विचारपरंपरा आहे. गीतेनेंहि, आपल्या रूढ समजुतीप्रमाणें, संन्यासमार्गाचा उपदेश केला नसून याच मार्गाचा पुरस्कार केला आहे व अनेक दृष्टींनीं हाच 'गीताधर्म' इतर मार्गापेक्षां श्रेष्ठ असल्यामुळें, त्याचाच आपण स्वीकार करावा, म्हणजे आपलें राष्ट्र पुन्हा ज्ञानाच्या व ऐश्वर्याच्या शिखरास पोंचेल, अशी शिकवण ह्या व्याख्यानांतून त्यांनीं दिली आहे.

याशिवाय सगुणभक्ति, मूर्तिपूजा, व्यवहार व वेदांत, वगैरे हिंदुधर्मांतील अनेक तत्त्वांच्या मूळ प्रश्नांचें, तात्विक व ऐतिहासिक दोन्ही दृष्टींनें विवेचन करून, त्यांचीं रहस्यें त्यांनीं लोकांपुढें उलगडून सांगितलीं आहेत. व अशा तऱ्हेनें हिंदुधर्माचें शुद्ध व श्रेष्ठ स्वरूप लोकांपुढें मांडलें आहे. आचारासंबधानें मात्र त्यांनीं आपलीं मतें स्पष्टपणें मांडलीं नाहींत, पण पुढें त्यांनीं संस्कारावर एक लेख लिहिला आहे, त्यावरून त्यांचें आपणांस अनुमान करतां येईल. धर्माचा हेतु मनुष्याची मानसिक उन्नति करून, त्याला आध्यात्मिक पूर्णावस्था प्राप्त करून देण्याचा असल्यामुळें, धार्मिक भावनेचें खरें रहस्य मनाच्या अवस्थेंत असतें. पण मनुष्याची तहान नुसत्या कल्पनेवर किंवा भावनेवर न भागतां त्यास त्यांचें कांहीं तरी दृश्य स्वरूप समोर लागतें. ह्या मनुष्यप्रवृत्तीचें सामाधान करण्याकरतां, त्या त्या भावना प्रतिबिंबित करणारे, व अशा रीतीनें मनुष्यास त्याच्या ध्येयाकडे नेणारे, आचार धर्मसंस्थापकांनीं सांगितले आहेत. "रविवारीं 'चर्चयार्डमध्यें' किंवा शुक्रवारीं 'मशिदींत' जाण्याचा उद्देश धार्मिक भावना एकत्र जमवून प्रदीप्त करण्याचा आहे," असें टिळकांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे. या आचारांचा मूळ उद्देश जोंपर्यंत लोकांच्या लक्षांत असतो, तोंपर्यंत त्यांचें स्वरूप शुद्ध राहून त्याच्या योगानें धार्मिक उन्नतीस मदत होते; पण कालांतरानें हा उद्देश लुप्त झाला म्हणजे त्याच्या योगानें धार्मिक प्रगतीस विघातच होतो. व म्हणूनच वेळोवेळीं नवीन धर्मोपदेशक निर्माण होऊन, नवीन नवीन आचारांचा उपदेश करीत असतात. आचारांचें हें रहस्य टिळकांनींहि ओळखलें असावें, व हल्लीं हिंदुधर्मामधील आचारांतील धार्मिक भावना लुप्त झाल्यामुळें, ते निरुपयोगी व हानिकारक झाले आहेत, व म्हणून ते नवीन कालानुरूप बदलले पाहिजेत असेंहि त्यांना वाटत होतें. पण जनतेला पटवून मगच त्यांत सुधारणा झाली पाहिजे, नाहींतर आचारांचा समाजबंधनाचा जो दुसरा आनुषंगिक उपयोग असतो तो नाहींसा होऊन अनवस्था माजेल; म्हणून शहाण्या माणसानें लोकजागृतीचें काम करावें, पण लोकांच्या आचारांत एकदम ढवळाढवळ करूं नये, किंबहुना त्यांचा बुद्धिभेद होऊं नये म्हणून, स्वतःला त्याचें महत्त्व नसलें तरी, सुधारणा होईपर्यंत ते पाळावेत असें त्यांचें मत होतें. टिळकांचें स्वतःचें वर्तन असेंच होतें. त्यांनीं आचाराचें तत्त्व ओळखल्यामुळें मात्र ते आचारमार्गी होऊं शकले नाहींत.

याप्रमाणें टिळकांचीं धर्मसंबंधीं मतें पाहिल्यावर धर्मसुधारणेसंबंधींच्या त्यांच्या मतांकडे आपण वळूं. धर्मसुधारणा हिंदुधर्माच्या अवनत स्थितीमुळें आवश्यक होतीच, पण त्यांतहि दोन आगन्तुक कारणांनीं त्याची आवश्यकता फारच जास्त वाढली. हीं दोन कारणें म्हणजे एक परधर्मीयांचे जोराचे हल्ले, व दुसरें, राजकीय स्वातंत्र्याकरितां जी राष्ट्रीय ऐक्याची भावना उत्पन्न व्हावयास पाहिजे, तिला ह्या धर्मसंबंधीं संकुचित आग्रहीपणाचा व भांडणांचा होणारा विघात, हीं होत. शिवाय ह्या धार्मिक अवनतीचा परिणाम मनुष्याची बुद्धि पंगू करण्यांत होतो; व त्यामुळें नैसर्गिक सामर्थ्यानें प्राप्त होऊं शकणारी उच्चता तिला न मिळून, जगांतहि तिचें योग्य स्थान तिला मिळत नाहीं. या सर्व कारणांमुळें सुधारणा करणें अत्यंत आवश्यक झालें आहे, परंतु ती करण्याचे खरे अधिकारी म्हणजे सुशिक्षित, व करण्याचा खरा मार्ग म्हणजे लोकजागृति. हिंदुधर्माची अनवाति झाली असली, तरी हिंदुलोकांच्या "अन्तःकरणांत धर्मश्रद्धा, आणि धर्माबद्दल आस्था व कळकळ अजून आहे;" व "हिंदुधर्माचा सारखा ऱ्हास होत असून, तो लवकरच रसातळास जाणार, अशी ओरड ऐकूं येते, ती वरचि साहसाची व चुकीची" असून, प्रयत्न केल्यास हिंदुधर्म पुन्हां आपल्या पूर्वीच्या श्रेष्ठ स्थितीला पोंचेल असें त्यांना वाटत होतें. पण ही उन्नति करणाऱ्या सुशिक्षितांतच त्यांना धर्माविषयीं उदासीनता व धर्मश्रद्धेचा अभाव दिसत होता. ही धर्माविषयीं आदर बुद्धि व श्रद्धा त्यांच्यांत उत्पन्न करण्यास, हिंदूंच्या धार्मिक तत्त्वज्ञानाची श्रेष्ठता त्यांना पटावयास पाहिजे; व म्हणून बहुजनसमाजाच्या जागृतीकडे लक्ष देण्यापेक्षां, टिळकांनीं या बहुजनसमाजाच्या नेत्यांकडेच जास्त लक्ष पुरविलें. त्यांचीं पुष्कळ व्याख्यानें याच धोरणानें दिलेलीं आहेत, व गीतारहस्य लिहिण्यांतहि त्यांचा हाच प्रधान हेतु होता. सुशिक्षितांमध्यें असलेल्या धर्मासंबंधीं अनास्थेस, पाश्चात्य शिक्षणच कारण असल्यामुळें, त्यांस विद्याभ्यास करतानांच हिंदुधर्मांतील सिद्धान्तांची ओळख करून दिली पाहिजे; व म्हणूनच शाळेंतून धर्मशिक्षण देण्याविषयीं त्यांनीं प्रतिपादन केलें आहे. तसेंच, "शिकलेल्या लोकांवर धर्मतत्त्वांचें वजन पाडण्यास, नव्या तऱ्हेनें त्या विषयाचें प्रतिपादन झालें पाहिजे, व त्यांच्यापुढें पाश्चात्य पद्धतीनें धर्माचें विवेचन करून त्यांचें श्रेष्ठत्व त्यांस पटविलें पाहिजे." या दृष्टीनें थिऑसॉफिकल सोसायटी व बिझान्ट बाई, स्वामी विवेकानंद, स्वामी अभेदानंद, आदीकरून हिंदुधर्माचा अभ्यास करून त्यांची श्रेष्ठता प्रस्थापित करणारी जी थोर मंडळी प्रयत्न करीत होती, त्यांबद्दल त्यांनीं फार गौरवपूर्वक उद्गार काढले आहेत. पण अशा तऱ्हेनें हिंदुधर्माची नवी मांडणी करावयास लागल्यास, त्यांत फेरफार होईल तर तोहि त्यांना मान्य होता. "आमच्या सनातन धर्माचें स्वरूप लोकांपुढें मांडण्याची जी प्राचीन पद्धति आहे, तींत कांहींतरी सुधारणा करून हिंदुधर्माची मांडणी हल्लींचा काळ लक्षांत आणतां निराळ्या तऱ्हेनें करणें जरूर आहे, असें आमचें मत

आहे. आधिभौतिक शास्त्रांच्या प्रसारानें खिस्ती धर्माच्याहि मांडणींत पुष्कळ फेरफार झाला आहे, व तशाप्रकारचा फेरफार हिंदुधर्माच्या मांडणीत होणें जरूर आहे. " ही नवी मांडणी म्हणजे तर्कशुद्ध व शास्त्रीय पद्धतीनें केलेला विचार होय, व टिळकांनीं गीतारहस्यांत हेंच केलें आहे.

ह्याप्रमाणेंच, जुन्या, धर्माचें कार्य करणाऱ्या संस्थांचीहि, काळाला अनुसरून पुनर्रचना करून त्यांना कार्यक्षम बनविलें पाहिजे. शंकरचार्यांचीं पीठें हीं अशाच प्रकाराची संस्था आहे. " जगद्गुरूच्या जागीं नवीन तऱ्हेनें शिकलेला इसम पाहिजे; म्हणजे तो पुष्कळच कार्य करील. त्यांतून हल्लींच्या काळीं अशा मनुष्यास इंग्रजी आलेंच पाहिजे. परिस्थितीप्रमाणें ह्या गोष्टी आतां झाल्याच पाहिजेत. इंग्रजी शिकल्याशिवाय आपल्या धर्माचें वजन चोहोंकडे पाडतां यावयाचें नाहीं. धर्माचें वजन पाडण्यास तुलनारूपानें त्याचें विवेचन केलें पाहिजे; " असें त्यांनीं एका मुलाखतींत* सांगितलें आहे. ह्याच्याच नंतर, हंसस्वरूप व विवेकानंद यांचें उदाहरण देऊन, शिकलेल्या माणसांनीं संन्यास घेतल्यास पंचवीस तीस वर्षांत धर्मक्रान्ति घडवून आणतां येईल असें त्यांनीं म्हटलें आहे.याशिवाय भारत–धर्म–महामंडळापुढें दिलेल्या व्याख्यानांत हिंदुधर्माची सुधारणा करण्यास त्यांनीं हिंदुधर्माच्या विश्वविद्यालयाची कल्पनाहि सांगितली आहे. "The idea of a Hindu University where our old religion will be taught along with modern science is a very good one and should have the support of all. "याप्रमाणें, हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन विचाराच्या पायावर करण्याबद्दल त्यांचा उपदेश आहे.

अशातऱ्हेनें शिक्षणाच्या योगानें लोकांत खरी धर्मजागृति झाली, म्हणजे ते स्वतःच इष्ट त्या सुधारणा घडवून आणतील. धर्माचा पगडा लोकांच्या मनावर फार असतो, व म्हणून त्यांत ढवळाढवळ करून त्यांच्या धार्मिक भावना दुखविण्यानें सुधारणेचें कार्य जास्त बिकट मात्र होईल. तेव्हां त्या हळूहळूच झाल्या पाहिजेत. शंकराचार्यांच्या आज्ञापत्रांचाहि उपयोग, या बाबतींत थोडी लोकजागृति करण्यापलीकडे कांहीं होणार नाहीं. या सुधारणा पुनः पूर्वपरंपरेच्याच धोरणानें झाल्या पाहिजेत. ' निरनिराळ्या धर्मांत जो भेद आहे तो परंपरेंत आहे म्हणून हिंदुधर्माची ही परंपरा कायम राहील तरच हिंदुधर्माची उन्नति व रक्षण होईल. " पुनर्विवाहादि निरनिराळ्या सुधारणा त्यांना मान्य नव्हत्या असें नाहीं, परंतु सुधारणा करण्याचा मार्ग त्यांचा सुधारकांहून निराळा होता. त्यांनीं वर उल्लेखिलेल्या मुलाखतींत तात्काळ करितां येणाऱ्या कांहीं सुधारणा सांगितल्या आहेत. धर्माशीं संबंध असलेल्या सुधारणांनाहि ते प्रतिकूल होते असें नाहीं, परंतु त्या पूर्वपरंपरेला

---

* लो. टि. आ. व. पान २१४

व राष्ट्रीयत्वाला धरून, आणि लोकांच्या संमतीनें झाल्या पाहिजेत असें त्यांना मनापासून वाटत होतें. "समाजामध्यें आज शेंकडो वर्षें ज्या रीतीभाती चालत आलेल्या आहेत व विशेषकरून ज्या रीतिभातींचा धर्माशीं संबंध आहे त्यांत फेरबदल करणें तो जुलमानें न करतां खुषीनें केला पाहिजे."

१९१४ सालीं तुरुंगांतून सुटून आल्यावर, धर्मसंबंधीं सामाजिक सुधारणेवर मत प्रदर्शित करण्याचा प्रसंग, म्हणजे 'पटेलबिल.' परंतु त्यावरील केसरींतील लेख त्यांचे नाहींत. पटेलबिलावर धार्मिक सुधारणा कायद्यानें करूं नयेत हें एक, व त्यामुळें हिंदु दायविभागांत घोंटाळा उडेल हें दुसरें, याशिवाय तिसरी कोणतीहि धर्माची अडचण त्यांस वाटत नसावी. याच वेळेस त्यांनीं लिहिलेल्या संस्कारावरील लेखांत, स्मृतिकालीं अन्तरजातयि विवाह पूर्णपणें प्रचलित होते असें त्यांनीं सांगितलें आहे. याशिवाय १९०१ च्या सुमारासच शूद्रांना वेदोक्ताचा व वेदपठणाचा अधिकार आहे, किंबहुना हल्लींच्या मुद्रणकलेच्या युगांत वेदपठण करण्याचा काळही गेला, अशा प्रकारचीं मतें त्यांनीं बोलून दाखविलीं होतीं. "ब्राह्मणाचें वेदपठण करण्याचें कर्तव्य आतां संपलें. Index झाल्यापासून वेद पाठ करण्याची जरूरी राहिली नाहीं, म्हणून त्यांनीं ज्ञानाची वृद्धि करण्याकडे आतां वळावें." असें त्यांनीं पुढेंहि एकदां बोलून दाखविलें होतें. १९०० ते १९०६ सालांत टिळकांनीं जीं व्याख्यानें दिलीं त्यांत प्रगट झालेले धार्मिक विचार वर सूत्ररूपानें दिले आहेत. यासंबंधीं विशेष गोष्ट सांगावयाची ती हीच कीं, स्वामी विवेकानंद याचीं धर्मविषयक मतें बहुतेक अशींच असून त्यांच्या व टिळकांच्या विचारांत बरेंच साम्य आहे; त्यांचा तुलनात्मक अभ्यास फार महत्त्वाचा व मनोवेधक होऊन त्याच्या योगानें टिळकांच्या धर्ममतांवर जास्त प्रकाश पडेल. पण तो विषय ह्या निबंधाच्या कक्षेंत पडत नाहीं व तो फार मोठा असल्यामुळें स्वतंत्र निबंधाचाच विषय होण्यास योग्य आहे.

टिळकांच्या धर्मविचाराचें स्वरूप पाहिल्यानंतर, पुन्हां एकदां आपणांस त्यांच्या धार्मिक भावनेकडे वळलें पाहिजे. १९०० सालीं टिळकांच्या मनांत ईश्वरनिष्ठेचा उदय झाला, व त्यांचे धार्मिक विचार स्थिर झाले. परंतु धार्मिक भावना येथेंच थांबत नाहीं. धर्माच्या बाबतींत ध्येय कळलें, व विचारानें आयुष्याचें साध्य निश्चित झालें, म्हणजे तें ध्येय मिळविण्याचे परिश्रम करावे लागतात; व ह्यालाच आध्यात्मिक शास्त्रांत साधन म्हणतात. धर्मपंथांतहि आचरण भागांचें मुख्य स्वरूप हेंच असतें. तेव्हां टिळकांनीं आपलें अध्यात्मिक पूर्णावस्थेचें ध्येय गांठण्यास कोणता साधनमार्ग स्वीकारला? 'टिळक हिंदुधर्माचे आचार पाळीत असत तरी ते आचारमार्गी नव्हते.' किंबहुना आचार म्हणजे एक प्रतीक आहे, व त्याचा उपयोग धार्मिक भावनेचा उत्कर्ष करण्यांत व समाजाचें स्थैर्य

राखण्यांत होतो, हें त्यांनीं ओळखलें होतें. टिळक भक्तिमार्गींहि नव्हते. टिळकांच्या मनावर बुद्धीचा पगडा जास्त असल्यामुळें, त्यांना खऱ्या भक्ताची कोमलता येणें शक्य नव्हतें. ईश्वराविषयीं जरी त्यांच्या मनांत पूर्ण निष्ठा असली तरी ईश्वर सुद्धां परमसाध्य नसून या व्यक्त स्वरूपाचा पलीकडे अव्यक्त असें एक परब्रह्म आहे, व तेथें उपास्य व उपासक हा भेद रहात नाहीं हें तत्त्व त्यांच्या बुद्धीवर ठसलें होतें, व त्यामुळें त्यांना ईश्वराची भक्ति करतांना सगुण ईश्वराला अनन्यशरण मानण्याचा भाव साध्य होणें शक्य नव्हतें. त्यांची मनोरचनाच भक्तिमार्गाला विरोधी होती. मागें सांगितल्याप्रमाणें स्वतंत्रता हाच टिळकांच्या विचारबुद्धीचा व मनांचा विशेष (distinguishing) धर्म आहे, व भक्तिमार्गांत तर मनुष्यानें आपलें स्वत्व ईश्वराच्या चरणावर अर्पण करावयाचें असतें. 'मला तुमचा भक्तिमार्ग पसंत नाहीं' असें ते बोलूनहि दाखवीत असत. किंबहुना भक्तीचा मार्ग दुबळेपणाचा आहे असें त्यांना वाटत असे. टिळकांच्या बुद्धीच्या स्वतंत्रतेचें जर अतिशय उत्तम उदाहरण पाहावयाचें असेल तर १९०६ सालीं त्यांनीं 'सैतानाचें साम्राज्य' ह्या विषयावर जें व्याख्यान दिलें तें पाहण्यासारखें आहे. सैतान ज्ञानाचा जनक आहे असें म्हटलें तरी चालेल, सैतान खरें बोलतो हा एक त्याचा विशेष गुण आहे, सर्व धर्मांत या कल्पना आहेत असें सांगून, नंतर हिंदुतत्त्वज्ञानाप्रमाणें पाप व पुण्य हीं दोन्ही ईश्वराचीं आहेतच असें सांगितलें आहे. तसेंच शेवटीं 'इंग्रजींत सैतानाचा इतिहास अशा प्रकारचीं पुस्तकें आहेत तीं वाचून धर्मांतील कित्येक गोष्टींची संगति कशी लावावयाची याचा विचार करा' असा उपदेश केला आहे. ह्या गोष्टीचा गीतारहस्यांतहि उल्लेख केला आहे. या स्वतंत्र बुद्धीच्याच योगानें टिळकांना भक्तियोग साधणें शक्य नव्हतें. भक्ताचें मन एकाद्या खुंटी पिळून बरोबर ताणलेल्या कोमल सतारीप्रमाणें असतें, व त्याच्यावर अत्यंत कुशलतेनेंच वादन करावें लागतें. अशा विचाराचे धक्के त्याला सहन होणें शक्य नसतें. स्वामी विवेकानंदांची मनोरचनासुद्धां बुद्धिप्रधान असल्यामुळें, त्यांना सगुण भक्तीची उपासना करतां येत नसे. पण पुढें श्रीरामकृष्णांच्या कृपाप्रसादानें त्यांना ती साधूं लागली. टिळकांना याप्रमाणें आचारमार्ग व भक्तिमार्ग हे दोन्हीहि जसे स्वभावतःच शक्य नव्हते तसेंच ते त्यांच्या दुसऱ्या राजकीय ध्येयाला विरुद्ध होते. पातंजल योगाचाहि मार्ग त्यांना वरील कारणामुळेंच अनुसरणें शक्य नव्हते. त्यामुळें या कोणाचाच अवलंब न करतां त्यांनीं स्वतःच हिंदुधर्माचा खोल अभ्यास करून शोधून काढलेला कर्मयोगमार्ग स्वीकारला.

यापासून पुढें टिळक कर्मयोगाचे साधक झाले. "ईश्वरावर पूर्ण भरंवसा ठेवून फलाची अपेक्षा न धरतां संसारांतील आपलीं सर्व कर्तव्यकर्मे कधींहि न चुकतां करीत राहणें हाहि मोक्षाचा एक मार्ग आहे" असें श्रीरामकृष्ण नेहेमीं

म्हणत असत. हाच मार्ग टिळकांनीं स्वीकारला. त्यांनीं स्वतः याप्रमाणें भक्तिमार्गाचा अवलंब केला नाहीं, तरी मनुष्याची अध्यात्मिक प्रगति करण्याबद्दलची त्याची योग्यता ते पूर्णपणें जाणून होते; व म्हणूनच गीतारहस्यांत कर्मयोगाला भक्तीची जोड दिल्यास मार्ग सुलभ होतो असें त्यांनीं सांगितलें आहे. यावेळेपासून टिळकांच्या देशभक्तीस निराळाच रंग चढला. या नंतर त्यांच्या देशभक्तींत धार्मिक भावनेची निष्ठा व दृढता दिसून येते. यापुढचा टिळकांच्या धार्मिक बुद्धीचा इतिहास म्हणजे ही भावना उत्तरोत्तर जास्त जास्त दृढ होत जाऊन, त्यांच्या योगानें टिळकांचा आत्मविश्वास व इतर मानसिक शक्ती कशा विकास पावल्या, व त्यांच्या हातून जास्त जास्त जोमानें निस्वार्थ देशसेवेचीं कामें कशीं होत गेलीं, याचाच इतिहास होय. हा कर्मयोगमार्ग चोखाळतांना त्यांच्यावर अनेक संकटें आलीं, परंतु त्या सर्वांतून त्यांनीं मोठ्या धैर्यानें वाट काढली. या काळांत त्यांनीं दाखविलेला दुःखाविषयींची बेफिकीरपणा, व संकटसमयीं सुद्धां बुद्धि ‘ स्थिर ’ ठेवून यत्किंचित्‌हि न डगमगतां कर्तव्यकर्म करीत रहाण्याची शक्ति, याचें शत्रुमित्रांनीं सारखेंच कौतुक केलें आहे. यांपैकीं सर्वांत मोठें संकट १९०८ सालीं आलें, व या वेळीं प्रत्यक्ष प्राणान्तिक आपत्ति समोर असतां त्यांनीं जें वर्तन केलें व जे उद्गार काढले ते कोणत्याहि देशांतील देशभक्तास मार्गदर्शकच होतील. या उद्गारांत जी उत्कट ईश्वरनिष्ठा दिसून येते, तीहि टिळकांच्या धार्मिक भावनेच्या इतिहासाच्या दृष्टीनें लक्षांत ठेवण्यासारखी आहे. “There are higher powers that rule the destiny of things and it may be the will of providence that the cause I represent may prosper more by my suffering than by my remaining free.” १९०८ सालीं टिळक तुरुंगात गेले, पण तेथेंहि आपलें कर्मयोगाचें व्रत अखण्ड चालवून त्यांनीं गीतारहस्य लिहिलें; व या सहा वर्षांच्या दिव्यांतून ईश्वरकृपेनें सुरक्षित पार पडून सुटून आल्यावर, १९१४ सालीं तें प्रसिद्ध करून, आपलें धार्मिक तत्त्वज्ञान त्या रूपानें जगासमोर मांडलें.

गीतारहस्यांत टिळकांनीं आपलें जीवनसर्वस्व सांठविलें आहे, पण त्यांत त्यांच्या स्वतःच्या धार्मिक बुद्धीच्या किंवा मनाच्या वाढीच्या दृष्टीनें नवीन असें कांहींच नाहीं. गीतारहस्यांत सांगितलेलें तत्त्वज्ञान व प्रदर्शित केलेलीं मतें हीं सर्व टिळकांनीं यापूर्वींच म्हणजे १९०० ते १९०५ च्या दरम्यान सांगितलेलीं आहेत. पण त्या सर्व तत्त्वज्ञानाचा आणखी साधकबाधक विचार करून तें सर्व दुसऱ्यांच्याकरतां कोठेंतरी एकत्र सांगणें जरूर होतें व तेंच त्यांनीं गीतारहस्यांत केलें आहे. गीतारहस्याला याप्रमाणें टिळकांच्या दृष्टीनें जरी वैय्यक्तिक महत्त्व नसलें तरी ऐतिहासिक महत्त्व आहे व त्याचा विचार या निबंधाच्या शेवटीं

केला आहे. कर्मयोगाचें आचरण करतां करतां त्यांतील अनेक विषयांचें सांगोपांग अनुभवात्मक ज्ञान झाल्यानंतर, हें तत्त्वज्ञान आत्मविश्वासानें त्यांनीं गीतारहस्यांत मांडलें आहे. पण हें मांडतांना त्यांना दुसऱ्या गोष्टीकडे लक्ष पुरविणें जरूर होतें. गीतारहस्यांत टिळकांना दुसऱ्याला पटविण्याकरतां कर्मयोगाचें विवेचन करावयाचें असल्यामुळें त्यांना प्रथम पाश्चात्य व पौर्वात्य या दोन्ही तत्त्वज्ञानांचें तुलनात्मक विवेचन करून त्यांत पौर्वात्य तत्त्वज्ञानाची श्रेष्ठता प्रस्थापित करावयाची होती, व ही प्रस्थापित झाल्यावर मग त्या तत्त्वज्ञानाशीं कर्मयोगाची उपपत्ति लावावयाची होती. म्हणूनच गीतारहस्यांत त्यांनीं कर्मयोगमार्गाचें आधारभूत तत्त्वज्ञानावरच जवळ-जवळ सगळें विवेचन केलें आहे. त्यामुळें कर्मयोगमार्गावरील प्रमाणभूत अशा ह्या ग्रंथाला टिळकांच्या धार्मिक बुद्धीचा इतिहास पाहातांना फारसें महत्त्वाचें स्थान नाहीं. मात्र गीतारहस्यांत टिळकांनीं पुन्हा एकदां आपली धर्मसंबंधीं मतें निस्सं-दिग्ध रीतीनें सांगितलीं आहेत. धर्माचा पाया तत्त्वज्ञानावर आहे, व तत्त्वज्ञानानें ठरलेलें मोक्षरूपी साध्य किंवा अध्यात्मिक पूर्णावस्था मिळविणें हेंच मनुष्याच्या जीविताचें साफल्य आहे; तें मिळविण्याकरितां मनुष्यानें प्रयत्न करावा व त्या दृष्टीनेंच मनुष्याच्या येथील कर्माच्या नीतिमत्तेचा विचार केला पाहिजे; धर्माचा विचार करतांना राष्ट्रदृष्टि सोडतां कामा नये, व ज्याच्या योगानें इहलोकींचा अभ्युदय व परलोकींचें कल्याण साधेल तोच खरा धर्म होय; मनुष्यास कर्माचें बंधन असलें, तरी त्यांतून सोडविणारें आत्मस्वातंत्र्य आहे, वगैरे विचार टिळकांनीं पुन्हां एकदां येथें सांगितले आहेत. गीतारहस्यांतील एक गोष्ट मात्र त्यावेळच्या टिळकांच्या मनस्थितीची पूर्ण दर्शक असल्यामुळें फार महत्त्वाची आहे. ती म्हणजे त्याची अर्पणपत्रिका होय. टिळकांनीं हा आपला ग्रन्थ जन-तारूपी परमेश्वराच्याचरणीं अर्पण केला आहे. टिळकांच्या मनांत कर्मयोगांतील जनसेवेचें ध्येय किती बाणलें होतें याचें हें सूचक होय.

टिळकांची तिसऱ्या तुरुंगवासानंतरची शुद्ध धार्मिक स्वरूपाची दुसरी काम-गिरी म्हणजे त्यांनीं रा. किंजवडेकर शास्त्री यांच्या 'संस्कारमीमांसे'ला लिहिलेली प्रस्तावना होय. यांत टिळकांनीं संस्कार किंवा विशिष्ट धार्मिक आचार यांचा विचार केला आहे. "निरनिराळ्या धर्मांचा तुलनात्मक पद्धतीनें अभ्यास केल्यास, प्रत्येक धर्माचें कांहीं स्वतःचे असे विशिष्ट संस्कार असतात व ते पाळल्या-शिवाय कोणाहि मनुष्याचा त्या धर्माच्या अनुयायांमध्यें समावेश होत नाहीं असें दिसून येतें. किंबहुना अशा प्रकारचे नियम धर्माच्या पोटपंथांतून आणि धर्माशीं संबंध असलेल्या संघांतून देखील सर्वत्र आढळून येतात." या वाक्यांत प्रथमतःच टिळकांनीं संस्कारांचा विचार करतांना कोणती भूमिका घेतली होती हें स्पष्टपणें दिसून येतें. संस्कारांचाहि त्यांनीं आपल्या नेहमींच्या ऐतिहासिक पद्धतीनेंच विचार केला आहे. या लेखांत प्रत्येक धर्माचें उदाहरण घेऊन टिळकांनीं आपलें म्हणणें स्पष्ट

केलें आहे. ' प्रसिद्ध फ्रेंच पंडित आगस्ट कौंट ह्यानें आधिभौतिक पद्धतीनें विवेचन करून जो सामाजिक धर्म उपदेशिला त्यांतहि अशा नियमांची आवश्यकता मान्य केली आहे.' ' हे आचार किंवा संस्कार ह्यांचा उद्देश कांहींसा धार्मिक व कांहींसा सामाजिक असतो. ' एखाद्या पंथांचा अनुयायी होण्यास एका विशिष्ट पद्धतीनेंच आपला जीवनक्रम अनुसरला पाहिजे असा नियम करण्याचें कारण अशा रीतीनेंच ह्या अनुयायांमध्यें शिस्त राहून समानकर्तव्यत्यामुळें बंधुभाव उत्पन्न होतो. याप्रमाणें समाजनियमनाच्या संस्कारांचा हेतु ठरविल्यानंतर, त्याची उत्पत्ति पहातां ती जुन्या परंपरागत आचारांत व चालीरीतींत आढळते. त्याचा इतिहास पहिला असतां, त्यामध्यें बदलहि झाल्याचेंहि दिसून येतें. याप्रमाणें संस्कार हे अनुयायांचें नियमन करून धर्मांच्या वैशिष्ट्याचें संरक्षण करण्याकरितां ठेवलेले धर्माचें बाह्य अंग आहे, असें सिद्ध होतें. व म्हणून ते प्रत्येकानें पाळले पाहिजेत. संस्काराचें हें स्वरूप लक्षांत घेऊन, हिंदुधर्माच्या ऐक्याकरितां, आपल्या गृह्य सूत्रांचा शोधक पद्धतीनें अभ्यास करून वैदिक धर्माच्या सर्व अनुयायांना एकच संस्कारपद्धति निर्माण करावी अशी इच्छा त्यांनीं या लेखाच्या शेवटीं प्रदर्शित केली आहे. शूद्रांना वेदोक्ताचा अधिकार देण्यास टिळकांची अनुकूलता होतीच.

याशिवाय या काळांत टिळकांच्या मनांत धर्मसुधारणेचेंहि विचार फार घोळत होते, पण विविध व्यवसायांमध्यें त्यांना मुळींच फुरसूत सांपडली नाहीं. नाहीं म्हणायला गीतारहस्याखेरीज पंचागसंशोधनाचें काम त्यांनीं हातीं घेतलें, पण याला धार्मिक सुधारणेचें नांव देणें योग्य होणार नाहीं. सुधारणेच्या पद्धतीविषयीं त्यांचीं पूर्वींचींच मतें कायम होतीं. सुधारणा लोकशिक्षणानें होणार व होणें योग्य; आणि त्याकरितां नव्या पद्धतीवर जुन्या व नव्या संस्थांनीं काम केलें पाहिजे. अशाकरितांच, टिळकांचें लक्ष या वेळेला कीर्तनसंस्थेवर गेलें होतें. " मी आपल्यांतील कीर्तन, पुराणें, प्रवचनें इत्यादि जुन्या संस्था ऊर्जितावस्थेस आणीन, व ह्या धर्मप्रसाराच्या जुन्या संस्था काबीज करून मी आपल्या सुशिक्षित, सुसंस्कृत आणि स्वार्थत्यागी तरुणांना पुराणिक, प्रवचनकार आणि कीर्तनकार म्हणून देशांतील खेड्यापाड्यांमधील सर्व कानाकोपऱ्यांत मिशनरी म्हणून सोडून, सद्यःस्थितीविषयीं लोकांना ओळख करून देईन, व लोकशिक्षणाचें काम करीन. " असे ते एकदां म्हणाले होते. गीतारहस्याचें हिंदुस्थानांतील सर्व भाषांतून भाषांतर झालें म्हणजे त्यावरील सर्व टीकांचा नीट विचार करून त्याची आवृत्ति कायम करण्याचा त्यांचा विचार होता. व अशा तऱ्हेनें गीतारहस्यांत सुधारणा केल्यावर, तें पुस्तक बरोबर देऊन देशभर लोक पाठवून धर्मप्रसार करण्याचाहि विचार त्यांनीं पुष्कळांजवळ बोलून दाखविला होता. याचा उद्देश अर्थात् कर्मयोगाला संप्रदायाचें स्वरूप देण्याचा नसून, गीतारहस्यांतील पद्धती-

प्रमाणें विचाराच्या पायावर धर्माची उभारणी करण्याचें शिकवून, धर्माचें खरें रहस्य समजाविण्याचा होता. परंतु दुर्दैवानें टिळक हें कार्य करण्यास वांचले नाहींत.

१९१४ सालानंतर टिळकांची धर्मबुद्धि आपल्या पूर्ण प्रकाशानें चमकूं लागली. त्यांची बुद्धि जास्त स्थिर होऊन, त्यांच्यावर लहानमोठे दुःखद प्रसंग आले असतांना सुद्धां त्यांच्या मनाची शांतवृत्ति व समता सहसा कधीं ढळली नाहीं. चिरोल केसमध्यें विरुद्ध निकालानें आकाश कोसळलें असतां सुद्धां, त्यांनीं आपल्या मित्रांस जीं पत्रें पाठविलीं तीं त्यांच्या मनोवृत्तीची पूर्ण द्योतक आहेत. "News about my having dejected by the unexpected result of the case is entirely groundless. I am now too old a hand to be upset even if the heavens were to fall down. I would rather utilize the fall of the heavens for my purpose than be dismayed thereby. One must face the facts as they are or turn out to be, and not allow them to rule over you. That has been my motto of work hitherto, and so still." या निकाला नंतर सुद्धां ते इंग्लंडमधील आपलें कार्य, पूर्वीच्याच जोरानें चालवीत होतें. या काळांत त्यांच्यामधील लोकाकर्षणाची शक्तीहि वाढली. एखाद्या श्रेष्ठ दर्जाच्या अध्यात्मिक साधकाप्रमाणें त्यांच्या तोंडून प्रचीतीचे बोल निघूं लागले. त्यांची गीतारहस्यावरील प्रवचनें, व ज्युबिली पर्सफण्ड अर्पणसमारंभ यावेळचीं भाषणें ज्यांनीं ऐकली असतील त्यांना ह्या म्हणण्याचें मर्म कळेल. शेवटीं शेवटीं, आपणांकडून ईश्वर एक विशिष्ट कार्य घडवीत आहे, अशीहि जाणीव त्यांना उत्पन्न झाली. या जीवितकार्याच्या आत्मविश्वासानें त्यांचा उत्साह दुणावला. त्यांनीं इंग्लंडला जातांना केलेल्या भाषणांतून हाच ध्वनि उमटतो. टिळकांच्या मनांत ही देशभक्तीची व कर्मयोगाची भावना किती बाणली होती हें त्यांनीं शेवटच्या बेशुद्धींत काढलेल्या उद्गारांवरून दिसून येतें. ह्या वेळेला सुद्धां त्यांचे सर्व विचार स्वराज्य व काँग्रेस ह्याविषयींच होते. गीतेचें पुस्तक दाखविलें असतां, 'यदायदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत' इत्यादि त्यांचे गीतेंतील अत्यंत आवडते दोन श्लोक त्यांच्या तोंडून बाहेर पडले. टिळकांचें मन याप्रमाणें उत्तरोत्तर जास्त सशक्त व अध्यात्मिक उन्नतीच्या उत्साहानें जास्त, पूर्ण बनत होतें तरी त्यांचें शरीर थकलें होतें, व त्यांचें येथील जीवितकार्यही आटपलें होते, म्हणून त्या शरीराचा त्याग करून, आपला कर्मयोगाचा पुढील रस्ता क्रमण्यास त्यांनीं प्रयाण केलें.

टिळकांच्या धार्मिक बुद्धीचा इतिहास येथें संपला, पण अजून एका महत्त्वाच्या मुद्याबद्दल विचार केल्याशिवाय त्याची परिपूर्ति होत नाहीं. हा मुद्दाच, आयुष्याच्या

शेवटीं, टिळकांच्या म. गांधींच्या बरोबर झालेल्या वादविवादांत अन्तर्भूत झाला आहे. कोणत्याहि धार्मिक साधकानें आपला मार्ग चोखाळतांना, सत्य, अहिंसा वगैरे तत्त्वें अत्यंत कसोशीनें पाळलीं पाहिजेत, असा सर्वसाधारण नियम आहे, व टिळकांनीं हे नियम तसे न पाळल्यामुळें, त्यांची अध्यात्मिक योग्यता कमी आहे असा त्यांचेवर आक्षेप येतो. परंतु वर सांगितलेले नियम साधकांना आवश्यक असले, तरी टिळकांनीं स्वतःच म्हटल्याप्रमाणें सर्वभूतहिताचें ध्येय मान्य करून लोकसंग्रह करणाऱ्या कर्मयोग्यास तें लागू नाहींत. त्यानें हे नियम शक्य तितकेच पाळावयाचे असतात. ह्याचा अर्थ तो स्वेच्छाचरणी असतो असें नाहीं, किंबहुना तो तसा बनणेंच शक्य नसतें. कर्मयोगमार्गातील मुख्य तत्त्व स्वार्थभावनेचा त्याग करून परोपकारार्थ देह झिजविणें हें होय, व जोंपर्यंत स्वार्थाकरितां एखादा या मार्गाचा पुरस्कर्ता हे नियम मोडत नाहीं, तोंपर्यंत त्याचा अधःपात नाहीं. मनुष्याची धार्मिक दृष्ट्या योग्यता किंवा आध्यात्मिक दर्जा, हा ज्याला सर्वसाधारण लोक धर्म म्हणतात तसल्या बाह्य धार्मिक आचरणावर नसून, तो त्याच्या स्वाभाविक मानसिक प्रवृत्तींवर अवलंबून असतो, असा अध्यात्मशास्त्रांतील एक सिद्धांत आहे. टिळकांनींहि गीतारहस्यांत नीतिशास्त्राचें विवेचन करतांना कर्माची योग्यता केवळ कर्माच्या फळावरून किंवा स्वरूपावरून ठरत नसून, त्यांत कर्त्याच्या बुद्धीचा विचार मुख्य असतो असें म्हटलें आहे. Philosophy of religion या पुस्तकांत प्रो. केअर्ड यांनींहि नैतिक आचरणाचा विचार करतांना, 'Moral life may be described as the renunciation of the private or exclusive self and the identification of our life with an ever widening sphere of spiritual life beyond us' असेंच म्हटलें आहे. पं. ईश्वरचंद्र विद्यासागर हे जरी नास्तिक होते, तरी ते 'आपलें कर्तव्यकर्म निष्काम बुद्धीनें करीत असल्यामुळें त्यांची आध्यात्मिक योग्यता फार मोठी आहे' असें श्रीरामकृष्ण म्हणत असत. म्हणून, टिळकांनीं हें सत्यादि नियम इतक्या कांटेतोलपणानें पाळले नसले तरी त्यांनीं ते कोणत्या निःस्वार्थ हेतूकरितां मोडले हें आपण लक्षांत घेतलें पाहिजे. मातृभूमीला परकीय सत्तेपासून मुक्त करण्याचें व्रत घेतल्यावर, त्याकरितां कराव्या लागणाऱ्या राजकारणादि व्यवसायांत, त्यांना हे नियम एखाद्या भक्तिमार्गी साधकाप्रमाणें पाळणें शक्य नव्हतें. दोनशें वर्षांपूर्वी, राजकीय जागृति करतांना, श्रींसमर्थांनीहि 'शठांशीं व्हावें शठ, उद्धटासि उद्धट' अशाच व्यावहारिक नीतिधर्माचा उपदेश केला होता. पाश्चात्य नीतिशास्त्रारांनींहि हे नियम निरपवाद नसून, पुष्कळ वेळां एकाद्या उच्चतर ध्येयासाठीं त्यांचा त्याग करावा लागतो असाच नीतीचा सिद्धांत बांधला आहे. विशेषतः राजकारणी पुरुषांस हे नियम कसोशीनें पाळतां येणें शक्य नाहीं असेंच त्यांनीं आपलें मत दिलें आहे.

शिवाय सत्य, अहिंसा इत्यादि तत्त्वांतच पुष्कळदां लढा होऊन कर्माकर्माचा संशय उत्पन्न होतो, व त्यांपैकीं एक टाकल्याशिवाय कसें भागत नाहीं, याचें सोपपत्तिक विवेचन त्यांनीं गीतारहस्याच्या प्रारंभीं केलें आहे. सत्य आणि अहिंसा वगैरे तत्त्वें किती झालें तरी साधनें आहेत, व म्हणून साध्याकडे नजर देऊन त्यांत फेरबदल करणें इष्ट असतें, व अशाप्रमाणें देवादिकांनीं देखील वर्तन केल्याचा आपल्या धर्मग्रंथांत उल्लेख आहे, असेंहि त्यांनीं गीतारहस्यांत दुसऱ्या एका ठिकाणीं म्हटलें आहे. एकाच सद्गुणाची कास धरून, त्याचें पालन करतांना जरूर तर इतर सर्व सद्गुणांचा त्याग करण्यापेक्षां, सर्व सद्गुणांचें अविरोधानें पालन करणें, हेंच ध्येय उच्चतर आहे. श्रीकृष्णाचेंहि चरित्र अशाच प्रकारचें आहे. सर्व महाभारतांत मला श्रीकृष्ण व भीष्म आवडतात, असें त्यांनीं एका व्याख्यानांत सांगितलें आहे, व महाभारतांतील श्रीकृष्णाचेंच उदाहरण डोळ्यासमोर ठेवून ते वागण्याचा प्रयत्न करीत. साध्याकडे दृष्टि ठेवून साधनाचा विचार करण्याचा व साधनाचाच स्वतंत्र दृष्टीनें विचार करण्याचा अशा या दोन्ही मार्गांचे पुरस्कर्ते मोठाले लोक आहेत, व टिळकांनीं त्यांपैकीं पहिला मार्ग स्वीकारला होता. त्यांच्या हातून प्रसंगीं घडलेल्या वक्राचरणाच्या मागें शुद्ध हेतु व पवित्र कार्य असल्यामुळें, त्या योगानें त्यांची अध्यात्मिक योग्यता कमी ठरत नाहीं.

ही योग्यता ठरविण्यास दुसरें उत्तम साधन म्हणजे त्यांच्या आचरणांत दिसून येणारा त्याच्या मानसिक उन्नतीचा दर्जा होय. त्यांची नैसर्गिक मानसिक प्रवृत्ति त्यागाकडे होती. त्यांनीं स्वतःच्या जिवाची चैन अशी कधींच केली नाहीं. उलट आपल्याला सहज मिळूं शकणाऱ्या सुखसोयींकडेहि त्यांनीं दुर्लक्ष केलें. त्यांचा परोपकारी स्वभाव, व स्वतःकडे लक्ष न देतां निःस्वार्थ दृष्टीनें दुसऱ्याकरितां अविश्रांत परिश्रम करण्याची तयारी, हीं सर्वश्रुतच आहेत. तसेंच प्रचण्ड स्वार्थत्याग, असामान्य धैर्य, दुःखाच्या वेळींहि ध्येयापासून न चळण्याची खंबीरता, व या सर्वांपेक्षांहि त्यांचें निर्मळ शीलचारित्र्य इत्यादि त्यांच्यामध्यें जे अनेक गुण आढळून येतात, ते सर्व मोठ्या अध्यात्मिक दर्जाशिवाय उत्पन्न होणें शक्य नसल्यामुळें, त्यांच्या श्रेष्ठ अध्यात्मिक योग्यतेचीच साक्ष पटवितात.

टिळकांच्या धर्मबुद्धीचें येथपर्यंत विवेचन केलें. धार्मिक मतें हीं धर्मबुद्धीचींच दृश्य स्वरूपें असल्यामुळें, त्यांच्या आयुष्यांत त्यांची धर्मसंबंधीं मनोरचना कशी होती, त्याविषयीं त्यांचे विचार कसकसे बदलत गेले, याचा विचार केला म्हणजे स्वतंत्र रीतीनें त्यांचीं मतें देण्याचें कारण नाहीं. श्रीशंकराचार्यांचें तत्त्वज्ञान एकदां पूर्णपणें कळलें, म्हणजे गीतेंतील श्लोकांचा अर्थ ते कसा लावतील हें जसें आपणास बिनचूक सांगतां येतें, व फरक पडलाच तर तो वाच्यर्थांत पडतो,

पार्यन्तिक अर्थात पडत नाहीं; तसेंच धर्मसंबंधीं मनोवृत्ति एकदां कळली, म्हणजे धार्मिक मतें सहज कळून येतात. यांपैकीं कांहीं वर आलींच आहेत. टिळकांचा कोणच्याहि लोकभ्रमावर विश्वास नव्हता, ही गोष्ट सांगण्यास पाहिजे असें नाहीं. त्यांच्या बुद्धिप्रधान व स्वतंत्र विचाराच्या मनोरचनेवरून हें अनुमान सहज काढतां येईल. कोणत्याहि कामाचे वेळीं कोणी मुहूर्त पाहावयास लागल्यास, "वेळ कसली बघतां ? चांगलेपणा हाच तिचा मुहूर्त आहे" असें ते म्हणत.

धार्मिक बुद्धि ही दोन प्रकारची असते; एक सामान्य जनांना वाटणारी, व दुसरी तात्त्विक. पहिलीमध्यें अंधश्रद्धेचा भाग पुष्कळ असून, ती साधारणपणें आचार, मुख्य मुख्य कल्पना वगैरे रूपानें धर्माचें जें स्वरूप व्यक्त झालें आहे, त्यावरतीच पूर्ण विसंबून राहून त्याच्यापलीकडे जात नाहीं. सामान्य समाज एकाद्याचा धार्मिकपणा ठरवतांना ह्याच आचारनिष्ठ बुद्धीकडे लक्ष पुरवतो. दुसरीच्या योगानें मनुष्य धर्माच्या मूल कल्पना समजावून घेऊन, त्यांच्या योगानें जीविताचें जें ध्येय कळून येतें, तें मिळविण्याचा प्रयत्न करतो. या प्रयत्नांत असतांना, वरील आचरणात्मक धर्माचें उल्लंघन करण्याचा प्रसंग आला तरी तो मागें घेत नाहीं. हिच्यामध्यें विचारबुद्धीचा प्रकार जास्त असतो. सर्व मोठमोठ्या साधु-संत व विचारी पुरुषांची दृष्टि अशीच असते. सर्व धर्मजागृतीचें ध्येय अशी भावना लोकांच्या मनांत उत्पन्न करण्याचेंच आहे, व यानेंच आध्यात्मिक उन्नति जोरानें होत असतें. स्वामी विवेकानंदांनीं अशाच प्रकारची धर्मबुद्धि जागृत करण्याचा प्रयत्न केला. पहिल्या प्रतीची धार्मिक बुद्धी, ही धार्मिक आचार मनाला एक प्रकारचें शिक्षण देण्याकरितांच रचले असल्यामुळें, उपयोगी असते. परंतु तिच्यांत अंधश्रद्धा असल्यामुळें, आचारांचें पूर्वींचें शुद्धस्वरूप नष्ट झाल्यावर ती विघातक होते.

टिळकांच्या मनांत ही दुसऱ्या प्रकारची धार्मिक बुद्धि कधींच नव्हती. तात्त्विक बुद्धीचा उदय होण्यापूर्वीं त्यांच्या मनाची स्थिति अनिश्चयात्मकच होती, पण पुढेंहि ती कधीं आली नाहीं; किंबहुना ती उत्पन्न होणें शक्यच नव्हतें. मागें सांगितल्याप्रमाणें टिळक विचारप्रधान असल्यामुळें, त्यांचा तर्कशुद्ध विचार-सरणीवरील विश्वास कधीं गेला नाहीं. सायणाचार्यांचे वेदांतील अर्थ त्यांनीं सर्वस्वी खरे मानिले नाहींत इतकेंच नव्हे, तर देवयाण व पितृयाण या कल्पनांचा धर्मसंबद्ध अर्थ सोडून, त्यांचा उगम वेदकालीन उत्तरध्रुवानजीकच्या ६ महिने रात्र व ६ महिने दिवस या परिस्थितींत असावा, असें त्यांनीं प्रतिपादन केलें आहे. तसेंच वेद हरविल्याची कथा, इन्द्रवृत्रांचें युद्ध, अश्विनौ वगैरे देव इत्यादि अनेक 'कल्पनांचा' त्यांनीं ऐतिहासिक चिकित्सक पद्धतीनेंच अर्थ बसविला आहे. त्यांना हिंदूंची युगकल्पना मान्य नसून डार्विनचा उत्क्रान्तिवादच पसंत होता. अशा प्रकारें, प्रचलित हिंदुधर्मांतील रूढ कल्पनांवर त्यांचा विश्वास नव्हता. त्यांची

निष्ठा त्यांच्या बुद्धीला सत्य वाटणाऱ्या तत्त्वांवरच होती. हीच गोष्ट लक्षांत घेऊन, स्वतः टिळकांनीं, आयुष्याच्या शेवटीं, एकदां प्रो. रानडे यांना 'तुम्ही मला धार्मिक म्हणाल का ?' असा प्रश्न केला होता व त्यावेळीं रानड्यांनींहि 'होय' असें उत्तर दिलें होतें. टिळकांच्या धार्मिक बुद्धीचें विवेचन याप्रमाणें पूर्ण झाल्यामुळें, या निबंधाचें कार्य आतां संपत आलें आहे, तेव्हां हिंदुस्थानच्या धार्मिक इतिहासांतील टिळकांच्या महत्त्वाविषयीं विचार करून तो पुरा करूं.

टिळकांचें धार्मिक इतिहासांतील महत्त्व तीन प्रकारचें आहे, व तें त्यांच्या आयुष्यांतील तीन काळांत आपणांस वांटून देतां येईल. पण त्याचा विचार करण्यापूर्वीं आपणांस एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, टिळकांचें येथील जीवनध्येय धर्मविषयक नव्हतें. त्यांच्या आयुष्यांतील मुख्य कामगिरी राष्ट्रीय स्वरूपाची आहे. अरविंदबाबूंनीं आपल्या लेखांत टिळकांच्या आयुष्यकर्तव्याचें फार मार्मिकपणें वर्णन केलें आहे. "हिंदी राष्ट्राचें पुनरुज्जीवन करणें, त्याला त्याच्या गतकालाप्रमाणेंच किंबहुना शक्य असल्यास जास्तच वैभवशाली व उज्वल करणें हाच टिळकांचा जीवनोद्देश होता." व "तेवढ्याकरितां त्यांना नुसती राजकीय जागृतीच करावयाची नसून, सुप्तावस्थेंत असलेल्या राष्ट्राच्या आत्म्याला, पूर्वकालावर त्याच्या भविष्यकालाचें अधिष्ठान ठेऊन, खडबडून जागें करावयाचें होतें." "टिळकांनीं आपल्या आयुष्यांत जे जे उद्योग केले, त्याचा साक्षात् अथवा परंपरेनें, ह्या राष्ट्रसंवर्धनाकडेच संबंध पोंचतो." व म्हणूनच त्यांच्या कोणच्याहि कामगिरीकडे या दृष्टीनेंच पाहिलें पाहिजे. राष्ट्राची सर्वांगीण उन्नति करतांना, राष्ट्रीय जीवनाचें एक अंग म्हणून त्यांना धर्माकडे बघावेंच लागलें असतें, व त्यांच्या धर्मसंबंधीं पहिल्या कामगिरीचा, धर्माप्रमाणेंच याच्याशींहि निकट संबंध आहे. या निबंधाच्या प्रारंभीं, टिळकांच्या सार्वजनिक आयुष्याच्या सुरुवातीच्या वेळची धार्मिक परिस्थिति थोडक्यांत दिली आहे. त्यावेळेला, सामाजिक व्यङ्ग्यें दूर करण्याचें ध्येय ठेवणारे, व धर्माची पर्वा न बाळगणारे सुशिक्षित व धर्मावर अंधश्रद्धा असणारे, व सर्वसुधारणेला विरोध करणारे अशिक्षित, यांमध्यें समाज दुभंगलेला होता. या दोघांच्या चढाओढींत, अर्थात् शिक्षण व सरकारी पाठबळ यांचे जोरावर पहिलाच पक्ष यशस्वी झाला असता. परंतु या सुशिक्षितांची दृष्टि एकमार्गी असल्यामुळें, हिंदी राष्ट्राची प्रगति त्यांच्या हातीं असावी तितकी सुरक्षित नव्हती. त्यांच्या एकदेशी सुधारणेनें हिंदुधर्माला आघात पोंचण्याचा व राष्ट्रीयत्वाची हानि होण्याचाहि फार संभव होता, व अशी भीति न्या. रानड्यांसारख्यांनाहि वाटत होती. व म्हणूनच प्रार्थनासमाज काढण्यांत इतर अनेक उद्देशांबरोबरच त्याचा प्रतिकार करणें हाहि एक उद्देश होता. परंतु त्यांतहि परंपरा सुटत होती. म्हणून मलबारीसारख्या परधर्मी माणसानें, कायदा करून हिंदुधर्मांत सुधारणा करण्याचें मनांत आणतांच विशिष्ट

... ग्रंथालय, ...
... ८८०२९ ...
... २१५५ ... ...८८/६/७
१८१६९



सुधारणा त्यांना पसंत होती, व ते स्वतः धर्माविषयीं उदासीन होते, तरी ह्या कृत्याचा दूरवर विचार करून, टिळकांनीं हिंदु अज्ञसमाजाच्या वतीनें तिला विरोध केला. ह्याची कारणमीमांसा मागें केलीच आहे. या विरोधाचा इष्ट तो परिणाम होऊन, या सुशिक्षितांबरोबरच्या झगड्यांत अज्ञ समाजाला टिळकांच्या शिक्षणाचा व तर्कयुक्त कोटिक्रमांचा अतिशय उपयोग झाला; व अशातऱ्हेनें सुशिक्षितांच्या अप्रतिहत गतीस पहिलाच जोराचा अडथळा झाला. टिळकांचें हें पाठबळ अज्ञ समाजास यानंतर पुढेंहि निरंतर मिळणारें असल्यामुळें, त्यांना एक मोठाच आधार सांपडून त्यांची बाजू या वादांत चांगलीच सांवरली. ह्या वेळची ही तिरंगी परिस्थिति लक्षपूर्वक विचार करण्यासारखी आहे. एका बाजूस धर्मावर अश्रद्धा असणारे सुशिक्षित, व दुसरीकडे त्यावर अंधश्रद्धा ठेवणारे अशिक्षित, यांमधून टिळकांच्या ह्या धर्माभिमानी सुशिक्षितांच्या तिसऱ्या पक्षानें वाट काढून, या दोहोंमध्यें कोंडलेल्या सामाजिक जीवनाच्या प्रवाहास मार्ग करून दिला. हिंदुधर्माची व समाजाचीहि परिस्थिति फार अवनत असल्यामुळें सुधारणा होणें अत्यंत इष्ट आहे, असें सुशिक्षितांप्रमाणें ह्यासहि वाटत होतें. पण ती पाश्चात्य धोरणानें व तेवढ्यापुरताच विचार करून न होतां, हिंदु धर्माचीं मूलतत्त्वें व परंपरा यांना धरून, व हिंदूंच्या राष्ट्रीय वैशिष्ट्यास बाध न येईल, अशा तऱ्हेनेंच झाली पाहिजे. कोणच्याहि सुधारणेचा खरा अर्थ म्हणजे जुन्यालाच परिस्थित्यनुरूप नवीन वळण देणें हा होय. नवीनाचा जुन्याशीं संबंध नसल्यास, तें नवबीजारोपणच होऊन, त्यांतील स्वत्त्व नाहींसें होतें. अशा तऱ्हेची सुधारणा करण्याचा उत्तम मार्ग म्हणजे लोकांना शिक्षण देऊन त्यांनाच ती करायला लावणें हा होय. अनेकरोगग्रस्त हिंदी राष्ट्राला, तात्पुरती सुधारणा करण्यासाठीं वरवर उपचार (symptomatic treatment) करण्यापेक्षां, त्याच्या रोगांचें कारण असलेली अशक्तताच घालवून, त्याला कालावधीनें कां होईना, पण निश्चयानें बरें करणें हेंच जास्त हितावह आहे. कारण पहिल्या पद्धतींत जीवितालाच धोका येण्याचा संभव असतो. हिंदु राष्ट्राला शिक्षण दिल्यानें, त्याला त्याच्या पूर्वकालाची, त्याच्या खऱ्या आत्मस्वरूपाची जाणीव उत्पन्न होऊन, त्याचें चैतन्य जागृत होईल, व तें सशक्त होऊन पुन्हां पूर्ववत् तेजस्वी बनेल. थोडक्यांत सांगावयाचें म्हटल्यास, हिंदुधर्माची सुधारणा करण्यास त्याचें पुनरुज्जीवनच केलें पाहिजे, अशा प्रकारचीं या तिसऱ्या पक्षाचीं मतें होतीं. स्वामी विवेकानंदांचीहि मतें अशींच आहेत. ही पुनरुज्जीवनाची कल्पना टिळकांनीं आपल्या सर्वच कार्यांत आंगिकारिली आहे. " टिळकांचें खरें संघटनात्मक कार्य म्हटलें म्हणजे हिंदी राष्ट्राचा अभ्युदय पुनरुज्जीवनानेंच होणार या महासिद्धांताची स्थापना होय.* "

* रा. बोडस 'लो. टिळकांचें राष्ट्रकार्य ' उषःकाल मालेचा टिळक अंक.

टिळकांचा हा तिसरा पक्षच हल्लीं जास्त जास्त प्रभावी होत आहे. हिंदुसभा ह्याच धोरणानें ठिकठिकाणीं काम करीत असून तिला बरेंच यश येत आहे, व ह्याचा योग्य तो परिणाम होऊन, हिंदी राष्ट्र पुनः आपल्या स्वाभाविक तेजानें झळकूं लागेल. मात्र सरकारी कौन्सिलें जास्त लोकमतदर्शक झालीं असल्यामुळें, प्रसंग-विशेषीं राष्ट्राला संमत अशा रीतीनें त्यांचा उपयोग करण्यास हरकत नाहीं, असें अलीकडे वाटूं लागलें आहे. परंतु हें टिळकांच्या तत्त्वाला फारसें विरुद्ध नाहीं; कारण टिळकांचा आग्रह लोकांच्या संमतीनेंच लोकांवर बंधनें घातलीं पाहिजेत, एवढ्या पुरतांच होता. यावेळच्या टिळकांच्या वर्तणुकीबद्दल सर्वत्र गैरसमज पसरलेले आहेत. त्यांच्या ह्यावेळच्या वर्तनाबद्दल टिळकांना champion of orthodox religion असें म्हणतात. यांतील orthodox शब्दांतील खोंच टिळकांना कितपत लागू पडते, हें मागील विवेचनावरून दिसून आलेंच आहे. पण ते हिंदुधर्माचे champion ह्या नांवास मात्र खरोखरीच योग्य होते. हिंदुधर्माच्या परंपरेवर व त्यामुळें हिंदुधर्मावर संकट येण्याचा संभव दिसतांच, स्वतः धर्माविषयीं उदासीन असतांनासुद्धां, बरोबरीच्या सुशिक्षितांच्या निंदेचे आघात सोसून, व शिक्षणाचा दुरुपयोग केल्याचा आरोप पत्करूनहि, ते त्याच्या संरक्षणार्थ धांवले. काळाच्या प्रतिकूल परिस्थितीमुळें जीर्णपल्लव झालेल्या या दिव्य धर्म-वृक्षाला, आंत गोठलेला जीवनरस प्रवाही झाल्याबरोबर खास बहर येणार अशा दृढ श्रद्धेनें, त्याच्यांत चैतन्य उत्पन्न करण्याच्या प्रयत्नाबरोबरच, त्याचें बाह्य उपचारांनीं नकली पालवी उत्पन्न करण्याच्या प्रयोगापासून संरक्षण करण्या-करितां, त्यांनीं कुंपण घातलें हीच त्यांची पहिली मोठी धार्मिक कामगिरी होय.

टिळकांची दुसरी धार्मिक कामगिरी, म्हणजे धर्मोपदेशकाचें त्यांनीं केलेलें कार्य होय. वर सांगितल्याप्रमाणें, आत्मघातकी सुधारणेला नुसता विरोध करून ते स्वस्थ बसले नाहींत. हिंदुधर्मासंबंधीं त्यांची अनिश्चितता जाऊन, त्यांतील श्रेष्ठ तत्त्वज्ञानावर त्यांची श्रद्धा बसतांच, स्वामी विवेकानंदांप्रमाणें त्यांनीं धर्माविषयीं रास्त अभिमान उत्पन्न करून धर्मजागृति करण्याचा प्रयत्न केला. धर्मविषयावर त्यांनीं पुष्कळ व्याख्यानें देऊन व अनेक लेख लिहून हिंदूंच्या धार्मिक तत्त्व-ज्ञानांतील निरानिराळ्या गोष्टी त्यांनीं उलगडून सांगितल्या, व खरी धार्मिक बुद्धि जागृत केली. तसेंच आपल्या धर्मामध्यें वाईट गोष्टी शिरल्या असल्या, तरी त्याचा पाया फार चांगला आहे, हें पाश्चात्य व पौर्वात्य तत्त्वज्ञान यांच्या तुलना-त्मक विवेचनानें सिद्ध करून, त्याच्याविषयीं अभिमान उत्पन्न केला. यामुळें नव्या पिढींतील सुशिक्षित लोकांच्या मनांतील धार्मिक अश्रद्धा जाऊन त्यांचीहि हिंदुधर्मावर श्रद्धा बसत चालली, व अशिक्षित लोकांनाहि खरें तत्त्व कळल्यामुळें त्यांची बुद्धि जास्त विचारी बनून, त्यांच्या संकुचित भ्रामक कल्पना नाहींशा होऊं लागल्या. परंतु टिळकांची ही कामगिरी अतिशय महत्त्वाची असली तरी

तिचें स्वरूप फार मोठें नाहीं, कारण या बाबतींतील त्यांचें कार्य, स्वामी विवेकानंदाप्रमाणें, त्यांच्या आयुष्यांत मुख्य नसून, आनुषंगिक स्वरूपाचेंच होतें. अजून यासंबंधीं पुष्कळच कार्य व्हावयाचें आहे. पण प्रतिक्रियेची ही आरंभावस्थाच असल्यामुळें, पुढील उदयाचा हा उषःकाल आहे हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे.

टिळकांच्या या दोन्ही कामगिऱ्या हिंदुधर्माच्या दृष्टीनें फार महत्त्वाच्या असल्या, तरी त्यांना प्रांतिक स्वरूप बरेंच आहे. शिवाय हेंच कार्य इतर कांहीं थोर माणसें व संस्थाहि करीत असल्यामुळें त्यांत टिळकांचें वैशिष्ट्य नाहीं. त्यांची तिसरी धार्मिक कामगिरी मात्र सार्वराष्ट्रीय स्वरूपाची असून, तिच्यामध्यें त्यांचें वैशिष्ट्य आहे; व ती अजून संपली नसून, तिचा संबंध आज सर्व जगांतच जडवादाच्या विरुद्ध धर्मजागृतीची जी एक प्रचंड लाट उसळली आहे, व जिचेंच स्वरूप थिऑसफिकल सोसायटीसारख्या संस्थांमधून व्यक्त होत आहे, तिच्याशीं पोंचत असल्यामुळें, तिचें तेज उत्तरोत्तर वाढतच जाणारें आहे.

टिळकांची ही सर्वांत मोठी धार्मिक कामगिरी, म्हणजे त्यांनीं केलेली प्रवृत्तिमार्गाची स्थापनाच होय. येथें कदाचित् असें वाटण्याचा संभव आहे कीं, टिळकांनीं यांत तरी पुनरुज्जीवनाशिवाय काय केलें? पण खोल विचार केला असतां, यांत पुनरुज्जीवनापेक्षां स्थापनेचाच प्रकार जास्त आहे हें दिसून येईल. हिंदुधर्माचा इतिहास पाहिल्यास, बौद्ध धर्माच्या उदयापासून आज अडीच हजार वर्षांपर्यंत प्रवृत्तिमार्गाचा लोप झाला होता; व त्याच्यापूर्वींहि जो प्रवृत्तिमार्ग प्रचलित होता तो यज्ञयागादिक ईश्वरोपासनेच्या कर्मापुरताच होता. त्यावेळीं संसार सोडून अरण्यांत जावें, कीं जगांतच राहून धार्मिक यज्ञयागाचीं कृत्यें करावीं, हा वादाचा प्रश्न होता, व त्यांत प्रवृत्तिपर गीतेचें मत, निष्कामबुद्धीनें हीं यज्ञयागादि धार्मिक कृत्यें करीत जावें, असें होतें. त्यांत हल्लींच्या समाजसेवेच्या कल्पनेचा उदय नव्हता. अर्थात् यामध्यें हें यज्ञचक्र लोकसंग्रहाकरितां, व सृष्टीच्या हिताकरितां असल्यामुळें, त्यांत लोकसेवेच्या कल्पनेचें बीज सांपडतें; पण तें इतकें गूढ आहे कीं, टिळकांनीं काढलेला प्रवृत्तिपंथ, हा अगदीं निराळा आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. आजपर्यंत पौर्वात्य व पाश्चात्य समाजांचे जीवनक्रम दोन निरनिराळ्या दिशेनें वाहात होते. एक मार्ग निवृत्तीवर भर देई, तर दुसरा मानवजातीच्या सुखासाठीं धडपड करी. टिळकांनीं हा पाश्चात्य मनुजसेवेचा मार्ग घेऊन हिंदूंच्या तत्त्वज्ञानाशीं त्याची सांगड घातली, व अशा तऱ्हेनें ह्या दोन मार्गांचा मिलाफ केला. पौर्वात्य निवृत्तिपर मार्गानें पारलौकिक हित साधत असलें, तरी ऐहिक उन्नति होत नाहीं; कारण त्यांत त्यांचा त्यागच केलेला असतो. पण धर्माचा खरा हेतु अभ्युदय व निश्रेयस हीं दोन्ही साधण्याचा असल्यामुळें, त्याची एक बाजू लंगडी पडते. उलटपक्षीं पाश्चात्य ध्येयांत ऐहिक उन्नति साधत

असली, तरी आध्यात्मिक उन्नतीकडे दुर्लक्ष होतें. तेव्हां या दोन्ही मार्गांतील अपूर्णता नाहींशी करून आपल्या या नव्या मार्गांत टिळकांनीं या दोन्ही ध्येयांचा सुंदर मिलाफ केला आहे.

"The Gitarahasya takes the scripture which is perhaps the strongest and most comprehensive production of Indian spriturality and justifies to that spirituality by its own authoritative ancient message the sense of the importance of life, of action, of human existence, of man's labour for mankind, which is indispensable to the idealism of the modern spirit."* यांतील शेवटचा भाग फारच महत्त्वाचा आहे. हल्लीं पाश्चात्य ज्ञानाच्या वाढीनें, तर्कबुद्धीच्या सांगण्याप्रमाणें समाजसेवेचें जें ध्येय सर्वत्र मान्य होत. आहे, त्याला ख्रिस्तीधर्मांत जसा आधार सांपडतो तसा हिंदुधर्मांत सांपडत नाहीं; व त्यामुळें हिंदूंचें तत्त्वज्ञान कितीहि उच्च प्रतीचें असलें, तरी आधुनिक विश्वबंधुत्वाच्या कल्पनेच्या युगांत, त्यांत समाजसेवेच्या कल्पनेस वाव मिळाल्याशिवाय त्यास जगांत मान्यता मिळणार नाहीं, हें तत्त्व टिळकांनीं ओळखलें होतें. किंबहुना ख्रिस्ती मिशनरी व तत्त्वज्ञानी यांचा हिंदुधर्मावरील खरा हल्ला याच बाजूनें होत होता. डायसन यानें आपल्या 'उपनिषदांतील तत्त्वज्ञान' या ग्रंथांत, उपनिषदाच्या तत्त्वज्ञानाची उच्चता जरी कबूल केली आहे, तरी तें तत्त्वज्ञान मनुष्यसेवेच्या तत्त्वास त्याची योग्य जागा देत नसल्यामुळें अपुरें आहे, व त्या दृष्टीनें बायबल हें त्याचें पूरक आहे असे म्हटलें आहे. याप्रमाणें, टिळकांनीं गीतारहस्यांमध्यें हिंदी तत्त्वज्ञानाला आधुनिकयुगांत जुळेशी पूर्णता आणली. त्यांनीं गीतेंतील प्रवृत्ति-मार्गाचें बीज स्पष्ट करून, त्याच तत्त्वज्ञानाला निराळा वेष चढविला; व अशा तऱ्हेनें हिंदूच्या धार्मिक मार्गांत भर टाकली. अशा तऱ्हेचे निरनिराळे मार्ग उत्पन्न होणें, यांतच धर्माचि प्रगति आहे असें त्यांनीं व स्वामी विवेकानंदांनींहि म्हटलें आहे. या नवीन मार्गानें, पाश्चात्य व पौर्वात्य ध्येय यांच्या कलहांत सांपडणाऱ्या आधुनिक सुशिक्षितांस आपला मार्ग स्पष्ट दिसूं लागला. स्वतः टिळकांनींहि आपल्या मनांतील आरंभींच्या कलहाचा उल्लेख करून म्हटलें आहे "I have thus solved the question for myself and I hold that serving the world, and thus serving His Will,

* 'An Appreciation by Babu Aurobindo Ghose, in 'B. G. Tilak, His writing's and speeches', pp. 4-5 Ganesh & Co.

is the surest way of Salvation, and this way can be followed by remaining *in* the world and not going away from it."* याच्या योगानें दुसरेंहि एक कार्य साधलें. हिंदूंच्या निवृत्तिपर तत्त्वज्ञानांत राष्ट्रधर्माचा विचार होत नव्हता, तोहि या नवीन मार्गात होऊं लागून, त्याच्या योगानें हिंदी राष्ट्र उदयोन्मुख करणाऱ्या चळवळींना त्यांना लागणारा धर्माचा पाठिंबा मिळाला, व ह्याचा परिणाम हल्लींहि दिसूं लागला आहे. टिळकांनीं कर्मयोगमार्गानें जुन्या धार्मिक विचारांना जें नवीन वळण लावलें आहे, त्याचें महत्त्व सध्यां आपण त्याच्या फार जवळ असल्यामुळें आपणास आज कळणें शक्य नाहीं. पण एवढें मात्र खास म्हणतां येईल कीं, हिंदुस्थानचा इतिहास लिहितांना, भावी इतिहासलेखक गीतारहस्याला युगप्रवर्तक ग्रंथ समजून, त्याच्यापासून एका नवीन विचारपरंपरेला सुरवात झाली, असेंच लिहतील. टिळकांचें धार्मिक इतिहासांतील महत्त्व, याप्रमाणें एका नवीन तत्त्वज्ञान–पंथाचे जनक याच दृष्टीनें राहील. व ही त्यांची कामगिरी इतकी मोठी आहे कीं, स्वतः टिळक हे जरी व्यक्तिगत धर्माचे चाहते असून संप्रदायाच्या विरुद्ध होते तरी त्यांच्या एखाद्या अनुयायानें भक्तिभावानें त्यांच्या मार्गास संप्रदाय समजून त्यांस इतर संप्रदायांच्या उत्पादकांप्रमाणें "कर्मयोगाचार्य" म्हटलें तरी त्यांत कांहीहि वावगें होणार नाहीं.

टिळकांच्या या प्रवृत्तिमार्गाकडे आणखीहि एका दृष्टीनें बघतां येईल. ती म्हणजे महाराष्ट्राच्या धार्मिक इतिहासाच्या परंपरेची होय. महाराष्ट्रीय टिळकांनीं हा नवीन कर्मयोगमार्ग सांगितला हें योग्यच झालें. टिळक हे महाराष्ट्राचे कसे प्रतिनिधीभूत होते हे लिहितांना अरविंदबाबू महाराष्ट्रीय लोकांचें खालील वर्णन करतात. "The mahratta race, as their soil and their history have made them, are a rugged, strong and sturdy people, democratic in their every fibre, keenly intelligent and practical to the marrow, following in ideas, even in poetry, philosphy and religion, the drive towards life and action." महाराष्ट्राच्या पूर्वींच्या इतिहासाकडे नजर फेकली तर वरील वर्णनाची सत्यता प्रत्ययाला येईल. श्री समर्थांनीं अडीचशें वर्षांपूर्वीं राष्ट्रीय कार्य करतांना, 'आधीं प्रपंच करावा नेटका। मग लागावें परमार्थ विवेका॥' असा, त्या काळाला योग्य अशा 'महाराष्ट्रधर्माचा' उपदेश केला, तर टिळकांनीं थोडें पुढें जाऊन, प्रपंचाचा मार्ग आणि परमार्थाचा रस्ता

---

* उमरावती येथील व्याख्यान १९१७, 'B. G. Tilak, His writing and speeches', p. 234-5 Ganesh and Co. मागील पान ७–८ पहा.

यामध्यें भेद करण्याचें कारण नाहीं, प्रपंचच थोडा 'युक्तीनें' केला म्हणजे परमार्थ साधतो, किंबहुना परमार्थाचा हाच सर्वांत सोपा मार्ग आहे, असा नवीन कालाला अनुरूप असा उपदेश करून, महाराष्ट्राच्या धार्मिक इतिहासपरंपरेच्या सांखळींत आणखी एक दुवा गोंवला. स्वतः टिळकांच्या व श्री समर्थांच्या तत्त्वज्ञानांत फारसा फरक नाहीं. 'माझ्या गीतारहस्याचा खुलासा दासबोधांत सांपडेल' असें ते म्हणत असत.

टिळकांचें धार्मिक इतिहासदृष्ट्या महत्त्व अशा प्रकारचें आहे. टिळकांच्या जीविताचें मुख्य कार्य राष्ट्राची जागृति हें होतें, व त्याच दृष्टीनें इतिहासांत त्याचें विवेचन येणें साहजिक आहे. महात्मा गांधी व अरविंदबाबू या दोघांनींहि म्हटल्याप्रमाणें, हिंदुस्थानच्या इतिहासांत त्यानीं केलेल्या अत्युच्च राष्ट्रीय कामगिरीबद्दल भावी इतिहासलेखक, त्यांचा 'नवीन हिंदी राष्ट्राचा जनक' असाच गौरवपूर्वक उल्लेख करतील यात शंका नाहीं. परंतु स्वतः टिळकांनीं केलेल्या चिरस्थायी वाङ्मयात्मक कामगिरीसंबंधानें बोलावयाचें म्हटल्यास, राष्ट्रीय जागृति करण्याकरितां त्यांनीं इतर विषयांवर जे लेख लिहिले, त्यांतील राजकारण कितीहि उच्च प्रकारचें असलें, तरी त्यात तत्कालसंबंधीं अंश पुष्कळ असल्यामुळें, व राजकारणांत खोल अभ्यासापेक्षा समयसूचकता व बुद्धिचापल्य हींच जास्त प्रभावी असल्यामुळें, त्या लेखांपेक्षां त्यांचे धार्मिक लेख व निबंध हेंच पुढील लोकांस जास्त मार्गदर्शक होतील. त्यांचें गीतारहस्य तर, ुढील पिढयांना त्यांच्या धार्मिक आकांक्षा जागृत करून आध्यात्मिक उन्नतीसाठीं राष्ट्राकरतां किंवा इतर मोठ्या कार्याकरतां निष्काम कर्मयोगाची स्फूर्ती देणाऱ्या, गोड, पवित्र व सामर्थ्यवान् ज्ञानाचा अखण्ड वाहणारा जिवंत झराच होईल. म्हणून टिळकांच्या आयुष्यांत त्यांच्या धार्मिक कार्यापेक्षां जरी त्यांचें राष्ट्रकार्य जास्त महत्त्वाचें असलें, तरी राष्ट्रजागृतिचें कार्य आतां होऊन संपलें आहे; पण त्यांच्या धार्मिक कार्याला अशी काळाची मर्यादा नाहीं. व जोंपर्यंत हिंदी राष्ट्राला 'आपल्या भूतकालाविषयीं खरा अभिमान व भविष्यकाळाविषयीं आशा वाटत आहे,' तोंपर्यंत टिळकानीं लिहिलेलें धार्मिक वाङ्मय, आपलें नियोजित कार्य करीत राहून, अनेक भांबावलेल्या जीवांना उन्नतीचा मार्ग दाखवील ह्यांत संशय नाहीं.

ॐ तत्सत् ब्रह्मार्पणमस्तु.

# निबंध दुसरा

( ले.—गणेश सदाशिव आळतेकर एम्. ए. )

## १ उपोद्घात

लोकमान्यांची ' धर्मबुद्धि व धार्मिक मतें ' या विषयांत कोणकोणत्या गोष्टींचा अन्तर्भाव करणें योग्य होईल याचा येथें थोडासा खुलासा करणें जरूर आहे. धर्म या शब्दाचा अर्थ अनेक लोक अनेक प्रकारें करितात; पण या शब्दामध्यें लोकमान्य कोणकोणत्या गोष्टींचा समावेश करीत या विषयाचेंच या निबंधांत विवेचन करणें अधिक प्रशस्त होय. गीतारहस्याच्या तिसऱ्या प्रकरणांत धर्म शब्दाच्या अर्थाचें विस्तृत विवेचन केलें आहे. त्यामध्यें त्यांनीं या शब्दाचे जे मुख्य दोन अर्थ सांगितले आहेत त्यांतील पहिला म्हणजे ' पारलौकिक सुखाचा मार्ग ' हा होय. तुझा धर्म कोणता म्हणून विचारल्यास हिंदु, बौद्ध, खिस्ती, मुसलमानी असें जें उत्तर मिळतें, तें हा अर्थ मनांत धरून होय. तेव्हां या अर्थान्वयें हिंदुत्वाबद्दल लोकमान्यांची काय कल्पना होती त्याचा या निबंधांत प्रथमतः विचार केला आहे.

धर्म शब्द आणखी एका अर्थी आपल्या वाङ्मयांत आणि व्यवहारांत उपयोगांत आणितात. तो अर्थ म्हणजे नीतिबंधन, कर्तव्यकर्म आणि शास्त्रविहित आचार हा होय. प्रजाधर्म, ज्ञातिधर्म, कुलधर्म व चातुर्वर्ण्यधर्म यांत धर्म शब्दाचा प्रयोग या अर्थानें केला आहे. ' धारणाद्धर्ममित्याहुर्धर्मो धारयते प्रजाः । यःस्याद्धारणसंयुक्तः स धर्म इति निश्चयः ॥' म. भा. शां. १०९,१२. या वचनाप्रमाणें समाजाचें धारण करणारा तो धर्म, म्हणजे ज्या नीतिनिर्बंधांनीं समाजाचे परस्परामधील व्यवहार योग्य प्रकारें नियंत्रित होऊन समाजांत विस्कळितपणा अगर बेबंदशाही न होतां त्यास स्थिर स्वरूप प्राप्त होतें तो धर्म होय. ' यतोऽभ्युदयनिःश्रेयससिद्धिः स धर्मः ' म्हणजे ज्यायोगें इह आणि पर सुखाची प्राप्ति होईल तो धर्म; ' आचारप्रभवो धर्मः ' म्हणजे श्रेष्ठ पुरुषांच्या आचारापासून निघणारीं नीतिबंधनें तो धर्म; ' चोदनालक्षणार्थो धर्मः ' म्हणजे अधिकारी पुरुषानें घालून दिलेलीं बंधनें तो धर्म; याप्रमाणें धर्माच्या ज्या निर-

---

**संक्षेपांची सूचिः—म. भा. शां.**–महाभारत शांतिपर्व **आ. व.**–' लोकमान्यांचीं गेलीं आठ वर्षें; ' लेखक रा. अप्पाजी विष्णु कुलकर्णी. **टि. च.**– ' लोकमान्य टिळक यांचें चरित्र; ' ले. श्रीयुत न. चिं. केळकर. **गी. र.**– श्रीमद्भगवद्गीतारहस्य. **Inst. Manu.**–Institutes of Manu—Sir William Jones.

निराळ्या व्याख्या केल्या आहेत त्यांत समाज, कुल, व्यक्ति वगैरेंकरितां घालून दिलेले आचार अगर नीतिनिर्बंध असा धर्म शब्दाचा अर्थ केला आहे. तेव्हां व्यक्तीपासून समाजापर्यंत सर्वांच्या अरत्र आणि परत्र कल्याणाकरितां विधि, संस्कार, आचार इत्यादि रूपानें जे निर्बंध घातले आहेत ते धर्मांत मोडत असल्यामुळें या बाबतींत लोकमान्यांच्या मताचा विचार करणें जरूर आहे.

आमच्या धर्मग्रंथांत तत्त्वज्ञानाचें विवेचन येतें ही गोष्ट खरी असली तरी धर्मशास्त्र म्हटलें कीं, त्यांत विधि, संस्कार, आचार, व्यवहार व प्रायश्चित्त यांचाच मुख्यतः विचार केलेला असतो. शुद्ध तत्त्वज्ञानाचें विवेचन हा सदर्हु ग्रंथांचा विषय नव्हे. तेव्हां धार्मिक मत अगर धर्मबुद्धि यांचा विचार करितांना द्वैत, अद्वैत, विशिष्टाद्वैत, माया, ब्रह्म, क्षराक्षर, क्षेत्र–क्षेत्रज्ञ, सांख्य, योग, सत्कार्यवाद, असत्कार्यवाद, जडवाद, अज्ञेयवाद, इत्यादि तत्त्वज्ञानांतील विषयासंबंधीं टिळकांचें काय मत होतें याची येथें चौकशी करण्याचें कारण नाहीं. मात्र, नीतिनिर्बंध व आचार यांचा पाया शोधितांना तत्त्वज्ञानाचा आधार जितका त्यांनीं घेतला आहे तेवढ्यापुरता तत्त्वज्ञानाचा विचार आपल्यास करावा लागेल. धार्मिक मतांत कोणत्या गोष्टींचा समावेश करावयाचा तें पाहिल्यावर धर्मबुद्धीसंबंधानें निराळा खुलासा करण्याचें कारण नाहीं. धार्मिक मतांवरून धर्मबुद्धि प्रत्ययास येते. परंतु निबंधाचे विषयांत तिचा स्वतंत्रपणें उल्लेख केल्यामुळें ' कार्याकार्यव्यवस्थिति ' या प्रकरणांत धर्मबुद्धीचें विशिष्टत्व जरा खुलाशानें दाखविलें आहे. निबंधाच्या मर्यादित जागेंत मुख्य मुख्य गोष्टींचा जितका विचार करितां येईल तितका करण्याचा प्रयत्न केला आहे.

शेवटीं, या निबंधास आधारादाखल घेतलेल्या पुस्तकांचा व लेखांचा निर्देश करणें जरूर काहे. केसरीमध्यें लोकमान्य लिहीत होते तरी ते पुण्यांत असतांना सुद्धां सर्वच लेख त्यांच्या हातचे नसत. केसरी पाहून असुक लेख लोकमान्यांचा असें खातीनें आम्हांस सांगतां येणार नाहीं. तेव्हां ' आप्तवाक्यं प्रमाणम् ' या न्यायानें श्रीयुत तात्यासाहेब केळकर व श्रीयुत अप्पाजी विष्णु कुलकर्णी यांनीं आपआपल्या टिळकांच्या चरित्रांत जे लेख लोकमान्यांचे म्हणून घेतले आहेत त्यांचाच आम्ही टिळकांचे लेख म्हणून विचार केला आहे. अवतरण चिन्हें घालून सदर्हु ग्रंथांचा आधार दिला आहे तो या ग्रंथांत घेतलेल्या टिळकांच्या भाषणाचा अगर लेखांचा होय. गीतारहस्यासंबंधानें कांहीं सांगावयास नकोच. अस्पृश्यतेवर १९१८ सालीं लोकमान्यांनीं दिलेल्या व्याख्यानाचा समग्र रिपोर्ट आज आमचेजवळ नाहीं. परंतु त्या सालच्या मनोरंजनाच्या सप्टेंबरच्या अंकांत या व्याख्यानांतील उतारे दिले आहेत ते या निबंधांत विचारांत घेतले आहेत.

## २ हिंदुधर्माचीं लक्षणें

काव्याचें लक्षण सांगतांना साहित्यशास्त्रकारांची जशी कधीं एकवाक्यता होत नाहीं, त्याप्रमाणेंच हिंदुधर्माचें लक्षण ठरवितांना विद्वानांचें एकमत झाल्याचें दिसून येत नाहीं. श्रुतिस्मृतिप्रतिपादित सर्व धार्मिक कर्में व आचार यांना प्रमाण मानणारा तो हिंदु, येथपासून तें हिंदु म्हणवून घेणारा तो हिंदु येथपर्यंत सर्व प्रकारचें मतवैचित्र्य पहावयास सांपडतें. या सर्व लक्षणांमध्यें थोड्या फार प्रमाणांत ग्राह्यांश असला तरी त्यांमध्यें अव्याप्ति अथवा अतिव्याप्ति असले दोष आढळतात, आणि कांहीं व्याख्या तर अशा आहेत कीं, त्यांवरून कांहींच बोध होत नाहीं. हिंदुधर्माचीं लक्षणें सांगतांना टिळकांचा हेतु असा होता कीं, त्यायोगें हिंदुधर्माचें सामान्य स्वरूप दाखवितां यावें व " त्यांत हिंदु-धर्मीतील सर्व जातींचा, वर्णांचा आणि पंथांचा समावेश व्हावा; आणि बौद्ध, जैन, खिस्ती किंवा मुसलमान इत्यादि परधर्मीयांचा त्यांत अन्तर्भाव होऊं नये " ( आ. व. २२० ). या विषयावर १९०० सालच्या गणेशोत्सवांत त्यांनीं जें व्याख्यान दिलें त्यांत प्रतिपादन केलेल्या मतांमध्यें त्यांनीं म्हणण्या-सारखा फरक केल्याचें त्यांच्या पुढील व्याख्यानांत अगर लेखांत दिसून येत नाहीं, तेव्हां तें व्याख्यान ( आ. व. २२०–२४ ) मुख्यतः आधारभूत धरून खालील विवेचन आम्हीं केलें आहे.

हिंदुधर्माचीं लक्षणें सांगतांना त्याचें स्वरूप काय आहे हें दाखविण्याचा जरी त्यांचा एक उद्देश होता, तरी या धर्माची अन्य धर्मांपासून व्यावृत्ति कशी करतां येईल हें विशद करून सांगण्याचा त्यांचा हेतु अधिक स्पष्ट दिसतो. हिंदुधर्माचें पहिलें लक्षण सांगत असतांना ते म्हणतात कीं, एका विशिष्ट धर्मवक्त्यावर विश्वास ठेविला तरच मनुष्य तरेल, दुसऱ्या कोणावर ठेविल्यास तरणार नाहीं. अशा प्रकारचीं मतें तर्कशास्त्राच्या कसोटीस कधींच उतरणार नाहींत. परमेश्वर जर दयाघन आहे तर मनुष्यजातीच्या उत्पत्तीबरोबरच तिचें तारण करणारी आपली विभूति त्यानें निर्माण केली असली पाहिजे. तसें न करितां, खिस्ती लोक समजतात त्याप्रमाणें, सृष्टीच्या प्रारंभापासून तों खिस्ताच्या कालापर्यंत अनंत युगें मनुष्यजातीस त्रात्याशिवाय ठेऊन सुमारें दोन हजार वर्षांपूर्वी एक त्राता पाठवून दिला हें म्हणणें सयुक्तिक नाहीं. महंमदानंतर ईश्वरांश पुढें कोणी व्हावयाचा नाहीं हें म्हणणें सुद्धां त्याचप्रमाणें अप्रयोजक आहे. ईश्वरी विभूति पहावयास मिळणें म्हणजे एक महद्भाग्यच होय. अनंत सत्कृत्यें करावीत आणि बरोबर धर्माचरण घडावें तेव्हां असल्या विभूतीच्या दर्शनाचा लाभ व्हावयाचा. महंमदापूर्वी सद्धर्माचा जर उदयच झाला नव्हता, तर धर्माचा गंधहि नसलेल्या लोकांना तेवढें ईश्वरी विभूतीचें दर्शन व्हावें, आणि आतां सद्धर्माचा प्रसार झाला असतां असली विभूति केव्हांच दृष्टीस पडणें शक्य आणि संभवनीय नसावें, हें मत

बरोबर नाहीं. धर्मस्थापनेकरितां ईश्वरी अंश निर्माण होतो असें म्हटलें तरी धर्माच्या ग्लानिचे वेळीं परमेश्वराची विभूति निर्माण व्हावयास पाहिजे, पण वरील धर्म तसें मानीत नाहीं. लोकमान्य म्हणतात "हिंदुधर्मांत जर कांहीं विशेष असला तर तो हाच होय कीं, अशा तऱ्हेनें ईश्वराची करणी किंवा प्रसाद मर्यादित आहे असें आम्ही मानीत नाहीं. सृष्टीच्या प्रारंभापासून आतांपर्यंत ईश्वराच्या नाना तऱ्हेच्या विभूति उत्पन्न झाल्या आहेत, व पुढेंही होतील असें हिंदुधर्माचें कायमचें मत आहे" ( आ. व. २२१–२ ). 'एकमेवाद्वितीयम्' या सिद्धान्ताप्रमाणें परमेश्वर जरी एकच असला तरी 'नान्तोऽस्ति मम दिव्यानां विभूतीनां परंतप।' या भगवद्वचनाप्रमाणें त्याच्या विभूती असंख्य आहेत. "यामुळें हिंदुधर्माची खिस्ती किंवा महंमदी धर्मापासून व्यावृत्ति करण्यासारखें जर लक्षण बांधावयाचे असेल तर विभूतींचें अनन्तत्व आणि ईश्वराचें एकत्व ही आमच्या धर्मांतील विशेष गोष्ट त्यांत घातली आहे पाहिजे" ( आ. व. २२२ ). वैदिक कालांत जसें 'एकं सद्विप्रा बहुधा वदन्त्यग्निं यमं मातरिश्वानमाहुः' ( ऋ. १, १६४, ३६ ) याप्रमाणें अनेक देवता आम्ही मानीत होतों, त्याप्रमाणें 'रुचीनां वैचित्र्यादृजुकुटिलनानापथजुषाम्। नृणामेकोगम्यस्त्वमसि पयसामर्णव इव' यांत म्हटल्याप्रमाणें अर्वाचीन कालीं सुद्धां रुचिभेदानें निरनिराळीं उपास्यदैवतें आम्हीं मानीत आहों. तथापि वरील वचनांतच सांगितल्याप्रमाणें परमेश्वर हा एकच आहे असा सर्वांचा सिद्धान्त असल्यानें त्या सर्व उपासकांना आम्हीं हिंदूच समजतों. 'एक गुरु एक देव। कोठें तरी असावा भाव।' अशी सवड ठेविल्यानें अमुकच देवावर भाव ठेवा असा हिंदुधर्माचा आग्रह नसून, आपआपल्या आवडीप्रमाणें आपलें उपास्यदैवत ठरवून त्याची उपासना करून आपली आत्मिक उन्नति करावी आणि अखेर ईश्वरप्राप्ति करून घ्यावी इतकी उदारबुद्धि या धर्मांत आहे "हाच मार्ग अधिक सयुक्तिक व समंजस होय, हिंदुधर्मांत हाच मार्ग सांगितला आहे, व त्यामुळें उपास्यांचा अनियम हें त्याचें विशेष लक्षण होय" ( आ. व. २२२ ) असें टिळकांचें मत आहे.

उपास्यें अनेक मानल्यानें बुद्ध, खिस्त व पैगंबर यांचेही उपासक हिंदुधर्मांत येतील. पारशी धर्मांतहि अग्नीसारख्या आपल्या कांहीं देवता आहेत व जैनधर्मांत सुद्धां आपल्या कांहीं देवतांचा समावेश झाला आहे. तेव्हां या सर्वांची व्यावृत्ति करण्याकरितां वेदप्रामाण्य हें हिंदुधर्माचें आणखी एक लक्षण लोकमान्यांनीं सांगितलें आहे. खिस्ती आणि महंमदी धर्मांचा तर वेदाशीं कांहींच संबंध नाहीं; पण, बौद्ध व जैन धर्म हिंदुधर्मापासून निघाले आहेत. परंतु, ते वेदास प्रमाण मानीत नसल्यानें त्यांची या दुसऱ्या लक्षणानें हिंदुधर्मापासून व्यावृत्ति होते. "वेद तीन माना किंवा चार माना; मन्त्रब्राह्मणात्मक माना किंवा मन्त्रात्मक माना; पौरुषेय माना किंवा अपौरुषेय माना; ऋषि मन्त्रद्रष्टे म्हणा किंवा मन्त्रकर्ते

म्हणा; जोपर्यंत वेद हे आपल्या धर्माचे मूलभूत आणि प्रमाणभूत ग्रंथ आहेत असें एकदां मनुष्य कबूल करितो तोंपर्यंत तो हिंदु आहे असें म्हटलें पाहिजे" (आ. व. २२३). स्मृत्यादिकांचें प्रामाण्य वेदावरच अवलंबून असल्यामुळें त्यांचा स्वतंत्र विचार करावयास नको असें टिळकांचें म्हणणें आहे.

उपास्यें अनेक मानणें हें जसें हिंदुधर्माचें विशिष्ट लक्षण आहे त्याचप्रमाणें ईश्वरप्राप्तीचीं साधनेंहि या धर्मांत अनेक सांगितलीं असून तीं या धर्माचें विशिष्ट स्वरूप दाखवितात. खिस्ती धर्मांत परमेश्वराच्या भक्तीपेक्षां ती प्रतिपादणाऱ्या खिस्तासच अधिक महत्व देतात. हिंदुधर्मांत भक्तीस अधिक महत्त्व आहेच, पण भक्ति हेंच परमेश्वरप्राप्तीचें एक साधन सांगितलें नाहीं. भक्तीची जरूरी आम्हांस मान्य आहे, पण त्याखेरीज दुसरा कांहींच तरणोपाय नाहीं हें तत्व हिंदुधर्मास मान्य नाहीं. भक्तीखेरीज ज्ञान, कर्म, योग इत्यादि साधनें उपनिषदें व गीता यांत सांगितलीं असून तीं सयुक्तिक आहेत. 'कारण' लोकमान्य म्हणतात, 'सर्वव्यापी ईश्वराकडे जाण्यास ईश्वरानें एकच वाट ठेविली आहे हें म्हणणें ईश्वराच्या घराला रानटी मनुष्याच्या घराप्रमाणें एकच दरवाजा आहे, असें म्हणण्याइतकेंच उपहासास्पद आहे. हिंदुधर्मांत इतर धर्मांहून ज्या कांहीं विशेष गोष्टी आहेत त्यांतील साधनांची अनेकता ही एक मुद्याची गोष्ट आहे, व त्यामुळें इतर धर्मापेक्षां हिंदुधर्माची योग्यता अधिक आहे असें सहज कळून येईल" (आ. व. २२४). उपास्यांची व साधनांची अनेकता हें ध्यानांत ठेविलें म्हणजे 'हिंदु म्हणजे नुसता शैव नव्हे, नुसता वैष्णव नव्हे, नुसता वैदिक नव्हे किंवा नुसता भागवत धर्महि नव्हे. एका नदींतून फुटून ज्याप्रमाणें निरनिराळे कालवे जातात त्याप्रमणें हे हिंदुधर्माचे कालवे आहेत;' असें म्हणून त्यांनीं हिंदुधर्माचें जें व्यापक स्वरूप दाखविलें आहे त्याचीं वर्णन केलेलीं वरील सर्व लक्षणें त्यांनीं:—

**प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु साधनानामनेकता ।**
**उपास्यानामनियमश्चैतद्धर्मस्य लक्षणम् ॥**

या सुप्रसिद्ध श्लोकांत ग्रथित केलीं आहेत.

धर्मग्रंथ, पंथ, जाति इत्यादिकांच्या वैचित्र्यामुळें हिंदुधर्माची व्याख्या करणें अत्यंत कठीण काम झालें आहे. एकाद्या विशिष्ट पंथाचा अगर मताचा पुरा अभिमान धरून जर कोणी लक्षण करूं लागेल तर तेव्हांच अव्याप्ति दोष येईल; व फाजील उदारबुद्धि दाखवून नुसत्या तात्विक गोष्टींचाच तेवढा विचार केला तर अतिव्याप्ति दोष पदरांत पडेल. तेव्हां हीं दोनी टोकें टाळून कोणत्याहि विशिष्ट पंथाचा अभिमान न धरितां, आणि केवळ तर्कशुद्ध व न्यायशास्त्राच्या कसोटीस लागणारा मार्ग कोणता, अशा केवळ तात्विक विचाराचेहि भरीस न

पडतां सर्व पंथांचा व साधनांचा समावेश करून हिंदुधर्माचें विशाल, उदार पण विशिष्ट स्वरूप टिळकांनीं चांगल्या तऱ्हेनें दाखविलें आहे. इतक्या गुंतागुंतीच्या गोष्टींचा व्यापकपणें विचार करतांना किरकोळ बाब सुटली असल्यास त्यांत मोठेसें आश्चर्य नाहीं. प्रार्थनासमाजासारखे पंथ वेदांना प्रमाण मानीत नाहींत; परंतु ते आपल्यास हिंदु म्हणवून घेतात, त्या पंथांतील सभासदांचे रोटी–बेटी व्यवहार हिंदुधर्मातील लोकांशीं होतात. व टिळकांनींहि असल्या समाजांस हिंदुधर्मबाह्य स्वतंत्र धर्म समजले नसून ते निराळे पंथ होत इतकेंच म्हटलें आहे. ( टि. च. ८१ ). अशा परिस्थितींत ते वेदप्रामाण्य मानीत नाहींत म्हणून त्यांना टिळकांच्या व्याख्येप्रमाणें अहिंदु म्हणावें लागेल. पण सामान्य नियमास अपवाद म्हणून कांहीं निघावयाचेच. बायबल प्रमाण न मानणाऱ्या परंतु एरवी कांहीं धार्मिक विधि ख्रिस्ती धर्माप्रमाणें करणाऱ्या स्वतंत्र विचाराच्या मनुष्यास जसें ख्रिस्तीच समजतात त्याचप्रमाणें प्रार्थनासमाजिष्टांसारख्यांना हिंदूच समजलें पाहिजे.

जन्मतः हिंदु असेल त्यासच आपण हल्लीं हिंदु म्हणतो. परधर्मांतील मनुष्य हिंदुधर्माचा कितीहि अभिमान बाळगणारा असला तरी त्यास हिंदु समजत नाहींत. टिळकांच्या व्याख्येमध्यें तर हिंदु मातापितरांचे पोटीं जन्मास येणें हें एक या धर्माचें लक्षण आहे असें मुळींच सांगितलें नाहीं. तेव्हां या लक्षणाचा समावेश वरील व्याख्येंत न झाल्यानें ती सदोष आहे असा गेल्या वसंत–व्याख्यानमालेंत वे. शा. सं. दिवेकरशास्त्री यांनीं आक्षेप घेतला होता. मूळचा हिंदु जर बाटून परधर्मांत गेला आणि त्याच्या संततीस पुढें हिंदुधर्मांत परत येण्याची इच्छा झाली तर तीस योग्य प्रायश्चित्तानें पुनः हिंदुधर्मांत घेण्यास दिवेकरशास्त्र्यांची कांहीं हरकत नाहीं. तर मग जन्मतः हिंदु असणें हें लक्षण अव्यास ठरत नाहीं काय ? पतितपरावर्तन हा अपवाद म्हणून चालावयाचें नाहीं. त्याचा प्रसार सध्या वाढत्या प्रमाणानें होत आहे. एकेवेळीं बुद्धधर्मी झालेला आपला बराच समाज फिरून हिंदुधर्मी करण्यांत आला होता. हिंदु आईबापांचे पोटीं जन्म घेतला तरच तो हिंदु अशी संकुचित भावना हिंदुधर्माच्या उदयकालीं मुळींच नव्हती. वैदिक आर्य हिंदुस्थानांत आल्यावर येथील मूळच्या रहिवाश्यांपैकीं बरेच लोक शूद्र म्हणून कां होईना, पण हिंदुधर्मांत त्यांनीं घेतले ही गोष्ट सर्वश्रुतच आहे. इतकेंच नव्हे तर हिंदुधर्माचा दक्षिण हिंदुस्थानांत प्रसार झाल्यावर द्रविडी लोकांना केवळ चवथ्या वर्णांतच न घेतां श्रेष्ठ वर्णाचाहि अधिकार कांहींना दिला, व त्यायोगानें स्मार्त कालानंतर त्यांच्यांत श्रीशंकराचार्य, श्रीरामानुजाचार्य, श्रीमध्वाचार्य, श्रीसायणाचार्य यांच्यासारखे हिंदुधर्म व हिंदु तत्वज्ञान यांचा परमोत्कर्ष करणारे थोर आचार्य जन्मास आले व हेमाद्रिसारख्यानीं हिंदु संस्कृतींत अधिक भर टाकली ही गोष्ट सुप्रसिद्धच आहे. धर्मप्रसार करणें हें

प्राचीन काळीं हिंदुधर्माचें मुख्य ध्येय असतां अलीकडच्या खालावलेल्या काळांत तें कार्य सुटल्यामुळें जन्मतः हिंदु असेल तरच तो हिंदु असें एक हिंदुधर्माचें लक्षण करून आपले हातपाय निष्कारण बांधून घेणें सयुक्तिक नाहीं व योग्यहि नाहीं. कै० गजाननराव वैद्यांचा पतितपरावर्तनाचा विधि जरी आपल्यास सर्वस्वी मान्य असल्याचें टिळकांनीं सांगितलें नाहीं तरी वैद्यांच्या पतितपरार्तनाचे कार्यास त्यांची सहानुभूति होती. पतितपरावर्तन काय पण 'निदान आशिया खंडांतील शंभर कोट लोक तरी ब्राह्मण धर्माच्या छत्राखालीं आणतां येतील' (आ. व. २८१) अशी आपली महत्त्वाकांक्षा त्यानीं १९०३ सालच्या गणेशोत्सवांतील व्याख्यानांत व्यक्त केली होती.

हिंदुत्व हें जन्मप्राप्तच असलें पाहिजे असें टिळकांचें मत दिसून येत नाहीं-तारिख २९ मार्च १९०४ चे केसरींत तर त्यांनीं असें म्हटलें आहे कीं, 'बीझंट. बाई थिऑसाफिस्ट खऱ्या, पण त्या धर्मानें हिंदु असल्यामुळें हिंदुधर्म हिंदु लोकांस समजाऊन देण्यास त्या पात्र आहेत' (आ. ब. २६४). धर्मानें हिंदु असें बीझंटबाईस म्हणतांना टिळकांनीं हिंदुधर्मीयांत या बाईचा समावेश केला होता किंवा काय हें या एका वाक्यावरूनच सांगणें कठीण आहे. मनानें हिंदु, हिंदुधर्माभिमानी, अगर वेदासंबंधीं नुसती प्रामाण्यबुद्धि असणें एवढ्यानेंच कोणास हिंदु म्हणतां येत नाहीं. हिंदुधर्मातील नीतिशास्त्र अगर तत्त्वज्ञान मान्य केल्यानेंहि हिंदुत्व येणार नाहीं. किंबहुना नीतिशास्त्राचे नियम आणि तत्त्वज्ञानाची बरीचशी चर्चा सर्व धर्मांत सारखीच असल्याचें आढळून येईल. निरनिराळ्या धर्मांत जो भेद आहे तो त्या धर्मांची परंपरा, संस्कार व विधि यांच्या विशिष्टपणांत आहे. हिंदुधर्माचीं लक्षणें सांगतांना टिळकांनीं सदर्हु धर्माची अन्य धर्मांपासून व्यावृत्ति करण्याकडेच अधिक लक्ष दिल्यामुळें एकाद्या धर्माचें स्वरूप पाहतांना त्याचे विधि व संस्कार यांजकडे जितकें लक्ष पुरवावें लागतें तितकें त्यांनीं येथें पुरविलें नाहीं. 'वर्णाश्रमव्यवस्था व तन्मूलक आचार हें हिंदुधर्माचें लक्षण केल्यास चालेल असें कित्येकांस वाटण्याचा संभव आहे,' असें सांगून ते म्हणतात कीं, पूर्वीं चार वर्ण होते त्याचे आतां चारशें झाले आहेत. तर असली अनिश्चित गोष्ट हिंदुधर्माच्या लक्षणांत गोवणें इष्ट नाहीं. अगदीं आरंभींची स्थिति तर 'न विशेषोस्ति वर्णानां सर्वं ब्राह्ममिदं जगत्।' (म. भा. शां. १८६, १०) अशी होती आणि आतां शेंकडों जाति उत्पन्न झाल्या आहेत आणि आचाराकडे पाहिलें तर ते सारखे बदलत चालले आहेत ही गोष्ट खरी आहे. विशिष्ट जातिनिर्बंध आणि आचार हें त्रिकालाबाधित लक्षण होणार नाहीं असें टिळक म्हणतात तें खरें आहे; तथापि हे विधि व संस्कार ज्या तत्त्वावर अधिष्ठित आहेत त्या तत्त्वानुसार थोड्या निराळ्या रीतीनें कां होईना आपले संस्कार व विधि करून घेणें हें एक

धर्माचें मुख्य लक्षण आहे. वेदांसंबंधीं नुसती प्रमाणबुद्धि ठेवल्यानें भागणार नाहीं तर वैदिक विधि आणि संस्कार अगर वेद प्रमाण मानणारीं धर्मशास्त्रें आणि पुराणें यांनीं सांगितल्याप्रमाणें विधि व संस्कार करणें, किंवा परिचित शब्दांत सांगावयाचें म्हणजे श्रुति–स्मृति–पुराणोक्तांपैकीं कोणत्याहि मार्गानें धार्मिक विधि व संस्कार करणें हें एक आपल्या धर्माचें लक्षण करावयास पाहिजे. या लक्षणानें कोणत्याहि विशिष्ट संस्कारास अगर विधीस महत्त्व दिलें न जातां परिस्थित्युनुरूप त्यांत वरील ग्रंथाधारें फरक करण्याची सवड राहील; व शरीरावर आणि मनावर संस्कार करणें हें जें एक धर्माचें प्रधान अंग आहे त्याचा हिंदुधर्माच्या व्याख्येंत समावेश होईल. वेद अगर वेदमूलक स्मृतिपुराणें यांच्या आधारें संस्कार करणें ह्या गोष्टीचा ' प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु , या पदांत समावेश करणें ओढाताणीचें होईल. पण ह्या गोष्टीचें महत्व टिकळांना माहीत नव्हतें असें मात्र नाहीं. ' निरनिराळ्या धर्मांमध्यें जो भेद आहे तो परंपरेंतच आहे ' ( आ. व. २३२ ) ह्या त्यांच्या उक्तीवरून सदर्हु गोष्टीचें महत्त्व त्यांना कबूल असल्याचें उघड दिसतें.

## ३ प्रार्थनासमाजादि पंथ

सनातन धर्मास झिडकारून वेगळे निघून स्वतंत्र पंथ किंवा समाज स्थापन करण्याची कल्पना लोकमान्यांना पसंत नव्हती. प्राचीन परंपरा बेफिकीरपणें मोडणाऱ्या ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज यांसारख्या समाजांबद्दल त्यांनीं आपली नापसंती अनेक ठिकाणीं व्यक्त केली आहे. सन १८३७ ते १८७४ पर्यंत सुशिक्षितांच्या ज्या दोन तीन पिढ्या झाल्या त्यांच्यामध्यें इंग्रजी शिक्षणामुळें साशंकपणा आला व धर्म बंधनांचा आळाहि कमी झाला. नीतिमत्ता, धर्मनिष्ठा, व्यवस्थित आचरण व गृहस्थिति यांचा जो एकमेकांशीं व्यवस्थित संबंध असावा लागतो, व जो असल्याखेरीज विद्वान् लोकांचे हातूनहि पुढारीपण घेऊन राष्ट्राचा उत्कर्ष घडूं शकत नाहीं, तोच संबंध इंग्रजी शिक्षणानें पहिल्यानें तोडून टाकला. या शिक्षणामुळें ते केवळ दोषैकदृष्टि बनले. या सुशिक्षितांपेक्षां ब्रह्मसमाज अगर प्रार्थनासमाज काढणारे सुशिक्षित बरे, कारण " ईश्वर म्हणून कोणी आहे, तो सर्वशक्तिमान् असून आपण पंगू आहोंत, त्याची उपासना करणें जरूर आहे, इतकें त्यांस वाटावयास लागलें " ( आ. व. २३१ ). याप्रमाणें सुशिक्षितांनीं नवीन पंथ काढले पण त्यांचा म्हणण्यासारखा कांहींच प्रसार झाला नाहीं, कारण टिळकांनीं एका संभाषणप्रसंगीं म्हटल्याप्रमाणें ' कळवळा किंवा भक्ति असणारा मनुष्य त्यांत फारसा नाहीं' (आ. व. ४२३). सगुणावर विश्वास नाहीं व निर्गुणाचें आकलन करण्याची प्रज्ञा नाहीं यामुळें ' प्रार्थनासमाजाचे दृश्य मंदिरांत अदृश्य देवाची नेत्रनिमीलनपूर्वक भक्ति करणें अगर निर्गुण परमेश्वरासंबंधानें अगाध अज्ञानसागरांत

साशंक गोते खात बसणें ' ( टि. च. २६२ ) अशी त्यांची शोचनीय अवस्था झाली होती.

ब्रह्मसमाजिष्ट अगर प्रार्थनासमाजिष्ट यांची धर्मभावना याप्रमाणें स्थिरावली नसून स्वतःचेंच धार्मिक कल्याण पूर्णपणें साधण्याची जर त्यांचे ठायीं पात्रता नव्हती, तर समाजाचें धर्मसंरक्षण त्यांचे हातून काय होणार हें स्पष्टच दिसत होतें. मिशनऱ्यांकडून होणारे हिंदुधर्मावरील हल्ले परतविण्याची त्यांची इच्छा असली तरी त्यांचेकडून ख्रिस्तीधर्मप्रसारावर फारशी प्रतिक्रिया झाली नाहीं. ' ब्रह्मसमाज किंवा प्रार्थनासमाज अशा प्रकारचे नवीन धर्मपंथ स्थापून समाज-संरक्षण करूं ही आपली समजूत चुकीची किंवा हास्यास्पद आहे हें त्यांच्या लक्षांत आलें नाहीं. सरकारी मान्यता किंवा थोडेंबहुत इंग्रजी शिक्षण असली चुटपुटती सामुग्री नवीन धर्मपंथ स्थापूं पाहाणारास पुरेशी नाहीं हें त्यांना समजलें नाहीं ' ( टि. च. ८१ ) असें टिळकांनीं एका व्याख्यानांत म्हटलें होतें. आपली प्राचीन परंपरा सोडल्यामुळें व पाश्चात्य संस्कृतीच्या अनुकरणानें त्यांच्यांत व जनतेंत अधिकाधिक फारकत झाली. लोकांचा त्यांच्यावरील विश्वास पार उडाला, व हजारों वर्षांची समाजव्यवस्था चुटकीसरशी उडवून देण्यास तयार झालेल्या या मंडळीचा लोकांकडून उपहास मात्र झाला. आणि ' एकंदरींत या मंडळींनीं धर्माच्या परंपरेचा उच्छेद केल्यामुळें बहुजनसमाजापासून हे दूर राहून जास्तच फाटाफूट झाली ' ( आ. व. २३१ ). सर्व जनसमाज एकीकडे व आपण मूठभर लोक दुसरीकडे असें झाल्यानें त्यांनीं आपणास बहिष्कृतांसारखे करून घेतलें. अशा प्रकारें वेगळें निघण्यापेक्षां, व ' प्रार्थनासमाजाचे भक्तिमंदिरांत भक्तिभावाचे पोवाडे गाण्यापेक्षां, एकाद्या गणपतीच्या मंडपांत भक्तिमहात्म्याचें वर्णन रानड्यां-सारख्यांनीं केलें, अगर चाफळच्या उत्सवांत त्यांनीं रामदासांवर व्याख्यान दिलें तर अधिक कार्य होईल ' (टि. च.) असें टिळकांनीं एका लेखांत सुचविलें होतें.

ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज इत्यादि समाजांसंबंधीं टिळकांनीं वेळोवेळीं काढ-लेल्या उद्गारांवरून त्यांचें या पंथासंबंधीं मत स्पष्टपणें कळून येतें. सगुण मान्य नाहीं व निर्गुण समजत नाहीं यामुळें 'इतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः' अशी या समाजिष्टांची स्थिति होते. क्रमाक्रमानें मुक्तिसोपान न चढतां पहिली व शेवटली यामधील सर्व पायऱ्या गाळल्यानें या समाजांचे उपासनामार्ग कसे अवघड झाले आहेत हें टिळकानीं चांगलें दाखविलें आहे. निरनिराळे पंथ काढूं नयेत असा त्यांनीं कोठेंच आग्रह धरलेला नाहीं, पण कोणताहि पंथ काढला तर तो सनातन धर्मास झुगारून न देतां काढावा. शंकर, रामानुज, मध्व, वल्लभ असे सांप्रदाय, अगर स्मार्त आणि भागवत, शैव आणि वैष्णव असे अनेक पंथ आपल्यांत निघाले पण त्यांपैकीं कोणावर टिळकांचा धर्मपंथदृष्ट्या रोष नाहीं. ह्यांतील कित्येकांचीं मतें त्यांना मान्य नाहींत पण ते अनुचित आहेत असें ते म्हणत नाहींत. कारण,

यांतील कोणताहि पंथ अगर सांप्रदाय वेदबाह्य नसून प्रत्येकजण वेदास प्रमाण मानून आपलेंच मत त्यांत प्रतिपादित आहे असें दाखविण्याची शिकस्त करितो. पण आपल्या प्राचीन वैदिकधर्मपरंपरेचा उच्छेद करणारे पंथ काढणें लोकमान्यांना पसंत नव्हतें. असें करण्यानें बहुजनसमाज व समाजिष्ट यांच्यांत फूट पडून कसलेंच कल्याण साधत नाहीं, व कोणाचाही फायदा होत नाहीं. स्वतः टिळकांना नवीन धर्मपंथ काढावयाचा नसून सनातन धर्माविषयीं अभिमान दृढ करावयाचा होता. कारण, नवीन पंथ स्थापल्यानें आधींच फाटाफूट होऊन विस्कळित झालेल्या समाजांत अधिकच घोंटाळा माजून लोकसंग्रहाऐवजीं लोकविग्रहच होण्याचा संभव अधिक होता.

## ४ चातुर्वर्ण्य

जातिभेदाचा निर्देश हिंदुधर्माच्या लक्षणामध्यें न केल्यामुळें, व पूर्वीं चार वर्ण होते त्याचे आतां चारशें भेद झाले आहेत व त्यामुळें जातिभेद हा अत्यंत अनिश्चित प्रकारचा विषय झाला आहे असें टिळकांनीं ' हिंदुधर्माचीं लक्षणें ' या विषयावरील व्याख्यानांत म्हटल्यामुळें त्यांना जातिभेद संमत होता किंवा नाहीं असा कदाचित् कोणास संशय येण्याचा संभव आहे. धर्माचें लक्षण सांगतांना त्याच्या नित्य स्वरूपाकडे लक्ष द्यावें लागतें. कालांतरानें बदलणाऱ्या गोष्टींचा त्यावेळीं विचार केला नाहीं म्हणून त्या मान्य नाहींत असें अनुमान काढतां येणार नाहीं. प्रथम चारच वर्ण होते असें टिळकांनीं म्हटलें आहे, परंतु त्यापलीकडे जाऊन असेंहि म्हणतां येईल कीं, हिंदुधर्माच्या उषःकालीं ' कुविन्मा गोपां करसे जनस्य कुविद्राजानं मघवन्नृजीषिन् । कुविन्म ऋषिं पपिवासं सुतस्य कुविन्मे वस्वो अमृतस्य शिक्षाः ॥' (ऋ. ३, ४३, ५.) या मंत्रांत विश्वामित्रांनीं प्रार्थना केल्याप्रमाणें लोकांचा नायक, राजा, सोम प्राशन करणारा ऋषि आणि अविनाशि संपत्तीचा मालक यांपैकीं कोणत्याहि पदाची प्राप्ति करून घेण्यास हरकत नव्हती. म्हणजे स्मृतिकालीन ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांच्या ध्येयांची एकदम आकांक्षा करणाऱ्या या मंत्रद्रष्ट्याच्या कालाकडे पाहिलें तर मागें सांगितल्याप्रमाणें ' न विशेषोऽस्ति वर्णानां सर्वं ब्राह्ममिदं जगत् । ' याप्रमाणें वैदिक कालाचे प्रारंभीं वर्णभेद मुळींच नसून समाज एकवर्णच होता असें दृष्टीस पडतें. पण समाजव्यवस्थेचा विचार करितांना सृष्टीच्या प्रारंभीं काय स्थिति होती तें पाहण्यापेक्षां चालू संस्था, त्यांचें प्राचीनत्व व त्यामुळें त्यांना प्राप्त झालेलें स्थैर्य याकडेच अधिक लक्ष द्यावें लागतें. त्याप्रमाणें विचार करून लोकमान्यांनीं ठरविलें आहे कीं, ' चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः ' हा हिंदुसमाजाचा पाया आहे. ( आ. व. १९५ ). वैदिक कालाचे प्रारंभीं नसला तरी अखेरीस चातुर्वर्ण्यविभाग अमलांत आला होता हें ' ब्राह्मणोऽस्य मुखमासीत् ' इत्यादि

सर्वश्रुत ऋचेवरून उघड आहे. तेव्हां प्राचीन कालापासून ही संस्था दृढमूल झाली असल्यामुळें, व स्मृत्यादि धर्मग्रंथांत विधि, संस्कार व आचार यांचा विचार ही वर्णव्यवस्थाच दृष्टिपुढें ठेऊन केला असल्यामुळें, इतकेंच नव्हे तर मनुष्याचें कर्तव्यकर्म सुद्धां वर्णव्यवस्थेच्या भेदावरच ठरविल्यामुळें लोकमान्य म्हणतात, त्याप्रमाणें चातुर्वर्ण्य हा हिंदु समाजाचा पाया झाला आहे, आणि हा पाया कोणत्या तत्त्वावर बांधून काढला याबद्दल त्यांनीं गीतारहस्यांत असें म्हटलें आहे कीं, " समाजाचे सर्व व्यवहार सुरळीत चालावे व कोणा एका विशिष्ट व्यक्तीवर किंवा मंडळीवरच सर्व भार न पडतां समाजाचें सर्व बाजूंनीं संरक्षण व पोषण व्हावें यासाठीं श्रमविभागरूप चातुर्वर्ण्यसंस्था पूर्वींच्या ऋषींनीं घालून दिली होती. " (गी. र. ६६). समाजधारणेच्या कर्तव्याचीं विविध अंगें निरनिराळ्या जातींकडे दिल्यानें त्या त्या बाबतींतील विशेष गुण त्या त्या जातींच्या हाडींमासीं खिळले आहेत; व आपापला व्यवसाय सुरळीतपणें व नियमितपणें केल्यानें नाना संकटांतून व कालाच्या झपाट्यांतून समाज टिकून राहिला आहे. आनुवंशिक संस्कारामुळें ही घडी अनंत काल तशीच राहिल्यानें तें एक आमच्या समाजाचें विशिष्ट स्वरूप झालें आहे. कोणतीहि समाजरचना घेतली तरी ती निर्दोष म्हणून कधींहि असावयाची नाहीं. त्याप्रमाणें चातुर्वर्ण्यसंस्थेंतहि दोष आहेत ही गोष्ट लोकमान्यांस मान्य होती. (आ. व. १९५). चार वर्णांच्या हजारों जाति होऊन अधिक भेद झाले खरे पण या सर्वच जातींची एक जात करावी हें त्यांना मुळींच पसंत नव्हतें (आ. व. १९७). तथापि पोटजातींत, आणि अनेक शतकें परप्रांतांत जाऊन कायमची वस्ती केल्यामुळें सध्यां ज्यांच्याशीं संबंध तुटला आहे अशा स्वजातीयांत शरीरसंबंध होणें हितावह व जरूर आहे असें त्यांचें मत होतें. " पंचद्रवीडांत संबंध होतील तेव्हां होवोत, परंतु आमच्या महाराष्ट्रसमाजांतलि जे लोक तिकडे (तंजावर **प्रांतांत**) गेले आहेत त्यांच्याशीं पूर्वीं होत असलेला संबंध तोडणें किंवा तो पुनः सुरू करण्यास हयगय करणें हें आमच्या समाजास अहितकारक आहे, " असें त्यांनीं एका व्याख्यानांत सांगितलें होतें. (टि. च. ६५१).

सर्व जातींची एक जात करणें टिळकांना पसंत नव्हतें हें वर लिहिलेंच आहे. जातिभेद राष्ट्रीय उन्नतीच्या आड येतो असें म्हणणाऱ्यापुढें ते आयर्लंड व ब्रह्मदेश यांचीं उदाहरणें टाकीत असत टि. च. ६५२; आ. व. १९३). जातिमत्सर आड येतो, जातिभेद आड येत नाहीं असें ते म्हणत. 'बेटीव्यवहाराखेरीज निरनिराळ्या जाति सारख्याच योग्यतेच्या राहू शकतात, हें ब्राह्मण जातींतील पोटभेदांवरून उघड होतें' (आ. व. २००१) तर जातिभेद राष्ट्रकार्याचें आड येण्यास काय कारण ? निरनिराळ्या जातींच्या अंगचे गुण वाढवून त्यापासून राष्ट्राचें हित करून घ्यावें. याप्रमाणें जातिभेद राहिला तरी पूर्वीसारखे जाति-

निर्बंध हल्लीं चालणार नाहींत; अधिक सवलती दिल्या पाहिजेत, नाहीं तर आगगाडींत सुद्धां निरनिराळ्या जातींस वेगळाले डबे करावे लागतील असें त्यांनीं बोलून दाखविलें होतें (आ. व. २१६). "कारकुनी, शिपाईगिरी, व्यापार, शेतकी, इत्यादि जे धंदे आहेत ते तूर्त जातिपरत्वें तसेच कायम ठेऊन धंदा बदलण्याची कोणाची इच्छा असल्यास त्यास तसें करण्याची सवड ठेवावी आणि व्यवहारांत त्याचा मान त्याचे योग्यतेवर व गुणावर अवलंबून रहावा, एवढी सध्यां व्यवस्था होणें इष्ट आहे व शक्यहि आहे." (आ. व. २००). ब्राह्मणांच्या स्त्रिया त्यांना मंत्रांचा अधिकार नसतांहि जर त्या आपल्या जातीच्या पुरुषांहून कमी योग्यतेच्या ठरत नाहींत, तर इतर जातींतील लोकांनीं आपणांस वेदाधिकार नाहीं म्हणून आपली योग्यता कमी होते असें कां मानावें ? "जातीनें अस्सल क्षत्रिय असोत वा नसोत त्यांची (मुसलमानी लाट परतवून हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन करणाऱ्या मराठ्यांची) योग्यता स्नानसंध्या करून धर्म राखणाऱ्या ब्राह्मणापेक्षां कोणत्याहि रीतीनें कमी आहे, असें आम्ही मानीत नाहीं" (केसरी. ता. २९।१०।१९०१). असें सांगून, स्वकर्तव्य चोख बजावल्यानें योग्यता प्राप्त होते; वेदाधिकारानें नाहीं असें 'श्रेयान्स्वधर्मो विगुणः' या भगवदुक्तीवरून त्यांनीं प्रतिपादन केलें आहे. तथापि जातिनिर्बंधांचा कडकपणा काढून टाकला पाहिजे असें त्यांनीं वारंवार सांगितलें आहे. "जातिबंधनें पूर्वींच्या इतकीं आतां कडक राहणें शक्य नाहीं, ही गोष्ट आम्हांसहि मान्य आहे; व त्यांपैकीं कांहीं बंधनें तर लवकरच नाहींशीं झालीं पाहिजेत असें आमचें मत आहे." (आ. व. २००) असें त्यांनीं स्पष्टपणें म्हटलें आहे.

## ५ अस्पृश्यता

पूर्वीइतकीं कडक जातिबंधनें आतां चालावयाचीं नाहींत, व कांहीं निर्बंध तर सत्वर शिथिल केले पाहिजेत असें लोकमान्यांनीं मोघमपणें १६ मे १८९३ चे केसरींत म्हटलें होतें. परंतु १९१८ सालीं मुंबईत श्री सयाजीराव गायकवाड महाराजांचे अध्यक्षतेखालीं त्यांनीं जें भाषण केलें त्यांत अस्पृश्यतेच्या बाबतींत सामाजिक निर्बंध दूर केले पाहिजेत असें त्यांनीं अगदीं असंदिग्धपणें प्रतिपादन केलें. सदर्हु भाषणाचा समग्र रिपोर्ट त्यावेळीं मराठी दैनिकांमध्यें आला होता पण तीं येथें आतां उपलब्ध नसल्यामुळें सप्टेंबर १९१८ च्या मनोरंजनाच्या अंकांत पा. २०६–०९ मध्यें दिलेल्या उताऱ्यावरून सदर्हु मुद्याचें विवेचन आम्हीं करीत आहों.

सर्व मनुष्यें हीं परमेश्वराचीं लेंकरें होत. परमेश्वराचे घरीं अस्पृश्य, चाण्डाळ व शूद्र हा भेद नाहीं, व आपण त्यांना आपले म्हटलें असतां कसल्याहि प्रकारें ईश्वरी आज्ञेचें उल्लंघन होत नसून खऱ्या बंधुभावानेंच वागल्यासारखें होईल.

इतकेंच नव्हे तर याहीपुढें जाऊन लोकमान्य म्हणतात, " जी अस्पृश्यता मेल्यावर रहात नाहीं, जी अस्पृश्यता परमेश्वराचे घरीं जातांना आड येत नाहीं ती अस्पृश्यता आपण आपल्या समाजांत वावरूं देणें म्हणजे परमेश्वराचे घरीं पाप करण्यासारखें आहे. " स्पृश्य असो अगर अस्पृश्य असो, परमेश्वराचे घराचा दरवाजा कोणासहि बंद नाहीं. " जो दरवाजा लावून टाकणारा परमेश्वर तो परमेश्वरच नाहीं असें मी समजेन " असे स्पष्टोद्गार त्यांनीं काढले आहेत. जन्मतः कोणीहि मनुष्य जर इतरांहून स्वभावतः हीन असत नाहीं, आणि मरतांनाहि जर तो इतरांप्रमाणेंच इहलोक सोडतो, कमी अधिक संपत्ति बरोबर घेऊन जाऊं शकत नाहीं तर एकास स्पृश्य व एकास अस्पृश्य असें केवळ जन्मावरून कां मानावें ? परधर्मीयांना स्पृश्य मानावयाचें, इतकेंच नव्हे तर अस्पृश्य मानलेल्या जातींतील ज्या मनुष्याचा आज आपण स्पर्शहि होऊं देत नाहीं त्यानें उद्या धर्मांतर केल्यास त्या धर्मांतराचा अधिक हक्क म्हणून कीं काय, त्यास आपल्या आसनावर बसूं द्यावयाचें या विचित्रपणास काय म्हणावें ? अंत्यज जातींतील लोक हिंदुधर्मांत राहिले म्हणून त्यांना त्यांच्या धर्मनिष्ठेबद्दल अस्पृश्यतेचा आहेर करावयाचा कीं काय ? अशा तऱ्हेची भावना " हा समाजाला लागलेला एक रोग आहे. तो काढून टाकणें हें आपलें कर्तव्यकर्म आहे. " " राष्ट्रीय कार्यांत, सामाजिक कार्यांत, आपण अस्पृश्य वर्गांना आपल्याबरोबर घेतलें पाहिजे हें आतां अपरिहार्य आहे. तिकडें काणा डोळा करून कसें चालेल ? अशी डोळेझांक करणें म्हणजे देशाच्या दृष्टीनें विघातक आहे. " अस्पृश्यतेसंबंधीं आपले याप्रमाणें विचार सांगितल्यावर लोकमान्य स्वतःच्या आचरणासंबंधानें म्हणतात, " मी स्वतः कसा वागतों हें आपणाला सांगितलें आहे. माझ्या घरीं मी अस्पृश्यत्वाचा भेद मानीत नाहीं. चोखामेळा सांप्रदायाचे लोक कांहीं कामानिमित्त माझ्या घरीं आले होते; मी त्या लोकांना घराबाहेर न ठेवितां त्यांना माझ्या बरोबर घरांत बसूं दिलें. " कोणत्याहि दृष्टीनें विचार करा, अस्पृश्यता मानणें अन्यायाचें आहे. " अस्पृश्यता गेली पाहिजे असेंच माझें मत आहे. ही रूढि आहे, ही नष्ट झालीच पाहिजे. "

अस्पृश्यता ही रूढि आहे असें टिळकांनीं स्पष्ट म्हटलें, एवढेंच नव्हें तर अस्पृश्यतेस शास्त्राधार नाहीं असेंहि त्यांनीं सदर्हु व्याख्यानांत म्हटल्याचें आम्हांस आठवतें. जरा विचार केला तर अस्पृश्यतेचे बाबतींत आम्ही रूढीसच अधिक मान देत आहोंत असें सहज दिसून येईल. हिंसाप्रधान ज्यांचा धर्म आहे त्या अन्यधर्मी लोकांस आपण अस्पृश्य मानीत नाहीं. या विधर्मी लोकांपेक्षां अंत्य जाति कोणत्या प्रकारें कनिष्ठ आहेत ? परधर्मीय लोक आपल्याबरोबर जर खुशाल समाजांत वावरतात तर ज्याला आपण आपल्या धर्माचा म्हणतो त्यास परधर्मीयाहून अधिक नाहीं तरी निदान तितके तरी हक्क द्यावयास नकोत काय ?

अस्पृश्य लोकांची राहणी व चाली अमंगळ आहेत ही सबब पुढें करण्यांत कांहीं अर्थ नाहीं; कारण तेच धंदे करणारे परधर्मी लोक शिवले तर चालतें. फार काय सांगावें, मुसलमान गाईकसाई शिवल्यास त्याचा सुद्धां आपण विधिनेषेध मानीत नाहीं. यावरून अस्पृश्यतेचे बाबतींत रूढीचें कसें प्राबल्य झालें आहे तें चांगलें नजरेस येतें. पण अस्पृश्यता ही रूढि असून तिला शास्त्राधार नाहीं या लोकमान्यांच्या म्हणण्याचा थोडा विचार करणें जरूर आहे.

अस्पृश्यतेस शास्त्राधार नाहीं असें म्हणतांना टिळक स्मृतिग्रंथांकडे फारसें लक्ष न देतां वेदाकडे आणि त्यांतही विशेषतः ऋग्वेदाकडे अधिक लक्ष देत आहेत असें दिसतें. ' ब्राह्मणोऽस्य मुखमासीत् ' इत्यादि वर्णन करितांना ऋग्वेदांत फक्त चारच जातींचा उल्लेख केला आहे. त्यांत अंत्यजांचा मुळींच निर्देश नाहीं. त्याचप्रमाणें या वेदांत ' पंचजनांचा ' जेथें उल्लेख आला आहे त्या—' पञ्च जना मम होत्रं जुषध्वम् ' ( ऋ. ८, १, १३,४ ) म्हणजे, पंचजनांनो, माझ्या या होत्राचा स्वीकार करा; व ' अदितिर्द्यौरदितिरन्तरिक्षमदितिर्माता स पिता च पुत्रः । विश्वे देवा अदिति पञ्चजना अदितिर्जातमदितिर्जनित्वम् ॥ ( ऋ. १, ६, १६, ५ ) म्हणजे, द्यौ, अंतरिक्ष, आई, बाप, मुलगा, सर्व देव, पञ्चजन, जें जें निर्माण झालें व होणार तें सर्व अदिति होय—अशा ठिकाणीं ' पञ्चजनाचा ' अर्थ कांहीं लोक ' गन्धर्वाः पितरो देवा असुरा रक्षांसीति ', व औपमन्यव ' चत्वारो वर्णा निषादः पञ्चमः ' असा करितात असें यास्काचार्यांनीं सांगितलें असून ( नि. ३, ८, १ ) सायणाचार्यांनींहि ' निषादपञ्चमाश्चत्वारो वर्णाः ' असा अर्थ केला आहे. निषाद शब्दाचा अर्थ पारधी अगर कोळी असा आहे. पाश्चात्य पंडित पञ्चजनाचा अर्थ निषाद व चार वर्ण असा न करितां पुरु, तृत्सु, द्रुह्यु, अनु व तुर्वसु असे पांच समाज (tribes) अभिप्रेत आहेत असें म्हणतात. कोणताहि अर्थ स्वीकारला तरी अंत्यजांचा वर्ण ऋक्संहिताकालीं असल्याचें दिसून येत नाहीं. व केवळ संहितात्मक वेदप्रामाण्य मानल्यास अस्पृश्यतेस शास्त्राधार नाहीं असें म्हणतां येईल. ब्राह्मणग्रंथांत चाण्डाळाचा उल्लेख सांपडत असल्यानें व मन्वादि स्मृतींत तर असल्या हीन जातीशीं व्यवहार कसे दुरूनच करावेत याबद्दल विस्तृत विवेचन केलें असल्यामुळें अस्पृश्यता पुढें पुढें रूढ झाल्याचें स्पष्ट दिसतें. अस्पृश्यतेचा उगम प्रतिलोम शरीरसंबंधापासून झाल्याचें मन्वादिकांनीं सांगितलें आहे. चातुर्वर्ण्याची स्थापना जर ऋग्वेदकालाचे अखेरीस झाली तर ती दृढ होऊन प्रतिलोम संततीचे वर्ग होऊन ते निषिद्ध व अस्पृश्य मानण्यास बराच काळ लागला असला पाहिजे. स्मृतीमध्यें अस्पृश्यतेस स्थान मिळालें खरें पण तें चण्डालासारख्या अति हीन लोकानांच होय. इतर अंत्यजांची अस्पृश्यता नांवापुरतीच होती. ' रजकश्चर्मकारश्च नटो बुरुड एव च । कैवर्तमेदभिल्लाश्च सप्तैते चान्त्यजाः स्मृताः ॥ ' (अत्रि. १९९.)

म्हणजे परीट, चांभार, नट, बुरुड, कोळी, मेद व भिल्ल असे सात अंत्यज अत्रिस्मृतींत सांगितले आहेत. या अंत्यजांचा विटाळ आचमन करून शुद्ध होण्याइतकाच होता; कारण, 'रजकं चर्मकारं च नटं धीवरमेव च। बुरुडंच तथा स्पृष्ट्वा शुद्धेदाचमनाद्विजः॥ " अंगि. १७ असें अंगिरस स्मृतींत सांगितलें आहे. या वर्गांची अस्पृश्यता केवळ नांवालाच होती. परीट, बुरुड वगैरेंची अस्पृश्यता आतां आपण आचमनापुरतीसुद्धां पाळीत नाहीं. बिचाऱ्या चांभारास मात्र स्मृतीवचनांस मागें सारून चाण्डालाचे जोडीस आपण बसविला आहे. तात्पर्य सध्याच्या अस्पृश्यतेच्या रूढीस स्मृतींचा सुद्धां पुरता आधार नाहीं. ब्राह्मण-कालांत अस्पृश्यता कांहींशी रूढ झाल्यामुळें व स्मृतीमध्यें सुद्धा सध्याचा अस्पृश्यतेस पुरता आधार नसल्यानें आणि संहितेंत तर तिला मुळीं थाराच नसल्यानें टिळकांनीं तिला एकपरीनें शास्त्राधार नाहीं असें सांगून संहितेच्या आधारावर अस्पृश्यतेचा कलंक धुवून काढला पाहिजे असें सुचविलें आहे. अस्पृश्यतेचे बाबतींत इतक्या स्पष्टपणें लोकमान्यांनीं आपलें मत पूर्वीं प्रकट केलें नव्हतें. तथापि असले स्पर्शास्पर्श दोष सामाजिक प्रगतीकरितां टाकून दिले पाहिजेत असें त्यानीं १८९२ सालीं प्रतिपादिलें होतें. त्यावेळीं ते म्हणाले कीं, " खुद्द अग्निहोत्राचा आचार जाणून बुजून टाकून देऊन वर्षांतून एक वेळ श्रावणीच्या वेळीं प्रायश्चित्तानें काम भागतें, तर स्पर्शास्पर्श दोषाबद्दल प्रत्याम्नायद्वारा प्रायश्चित्त करीत गेल्यास सामाजिक प्रगति होऊन शिवाय योग्य धर्माभिमान राहूं शकतो" ( टि. च. २९७ ).

### ६ परिस्थित्यनुरूप आचारांत फेरफार

सध्यां समाजामध्यें प्रचलित असलेले धार्मिक आचार विचार ते केवळ प्राचीन कालापासून चालत आले आहेत एवढयाच मुद्यावर जसेच्या तसे पाळले पाहिजेत ही विचारसरणी टिळकांना मान्य नव्हती. 'पुराणमित्येव न साधु सर्वं ' म्हणजे जुनी गोष्ट म्हणूनच ती चांगली व योग्य, हा कोटिक्रम त्यांना पसंत नव्हता हें अस्पृश्यतेवरील त्यांच्या विचारावरून स्पष्ट दिसतें. समाज म्हणजे कांहीं अचेतन वस्तु नव्हे, कीं जिला एका ठराविक मर्यादेंत ठेविली असतां तेवढ्याच संकुचित जागेंत राहून तिनें इकडे किंवा तिकडे मुळींच हालूं नये. बालपणाचे कपडे जसे तरुणपणीं अपुरे व आंखूड होतात, तसे समाजाच्या प्रारंभावस्थेंतील धर्मनिर्बंध समाजाची सर्वांगीण प्रगति होऊं लागली आणि तो वृद्धिंगत झाला म्हणजे साहजीकच जाचक होतात, व त्यामुळें ते शिथिल करणें जरूर होतें. ज्ञानाचा विकास झाल्यानंतर त्याच्या श्रेष्ठ पायरीवरून जेव्हां पूर्वींचे आचार गौण वाटूं लागतात तेव्हां त्या आचारांचें रहस्य कायम ठेऊन त्यांतील गौण भाग टाकण्याकडे प्रवृत्ति होऊं लागते. श्रौत

यज्ञयागांतील पशुहिंसा जेव्हां उपनिषदांतील सर्वभूतात्मैक्याच्या सिद्धान्तानें अयोग्य वाटूं लागली तेव्हां देवांना संतुष्ट करून तद्वारां आपलें श्रेय संपादन करण्याकरितां निर्माण केलेलें यज्ञचक्र कायम ठेऊन 'अजसंज्ञानि बीजानि छागनो हन्तुमर्हथ।' (म. भा. शां. ३४५,७) यांत सांगितल्याप्रमाणें हवन करण्यास सांगितलें तें धान्य होय, पशु नव्हे, याप्रमाणें युक्तिवाद निघून पशुहिंसा बाजूस टाकून पिष्टमय यज्ञ सुरू केले. स्मृतिकारांनीं चातुर्वर्ण्यव्यवस्थेप्रमाणें सांगितलेल्या कर्मांचा सुद्धां अंतर्भाव यज्ञांत केला. (मनु. ११,२३६). यास्तव लोकमान्य म्हणतात "देशकालानुरूप कांहीं आचार सोडावेच लागतात. कुमारिलभट्टानें किंवा शंकराचार्यांनीं सर्व जुन्या श्रौताचारांचा आग्रह धरिला नाहीं, म्हणूनच हिंदुधर्म जगला; नाहीं तर आम्ही सर्व बुद्ध झालों असतों" (टि. च. २९७). 'भवत्यधर्मो धर्मो हि धर्मोऽधर्मो भवत्युत। कारणाद्देशकालस्य देशः कालस्तु तादृशः' (म. भा. शां. ७८,३२) यांत म्हटल्याप्रमाणें एक वेळीं धर्म्य मानलेली गोष्ट भिन्न परिस्थितीमुळें अधर्म्य होईल व अधर्म्य मानलेली धर्म्य होईल. देशकालाचा असा महिमा आहे, तेव्हां मनूनें सांगितल्याप्रमाणें 'धर्मं चाप्यसुखोदर्कं लोकविद्विष्टमेव च। (परित्यजेत्)' (मनु. ४,१७६). म्हणजे एकादा आचार जर परिणामीं दुःखकारक असला व लोकांना जाचक वाटल्यानें त्याचा तिटकारा आला असला तर तो धार्मिक असला तरी सोडून द्यावा. याप्रमाणें काल जसजसा बदलतो तसतसे व्यावहारिक धर्मांतहि फरक पडत जातात व याप्रमाणें प्रत्येक कालांत धर्म बदलले आहेत असें लोकमान्यांनीं विवेचन केलें आहे (गी. र. ४८).

समाजनिर्बंध अडचणीचे वाटले आणि लोकांना ते आवडेनासे झाले तर तेवढ्याच सबबीवर ते तोडून टाकणेंहि इष्ट नाहीं. कारण, "धार्मिक किंवा सामाजिक रीत्या आपला विशिष्टपणा कायम राखण्याकरितां कांहीं प्रसंगीं अडचणहि सोसावी लागते" (आ. व. २४५). धार्मिक आचार जरा जिकीरीचे वाटतात यावरून जर ते सुटत जाऊं लागले तर अखेर स्वैराचारापर्यंत मजल येऊन आपलें धार्मिक वैशिष्ट्य कांहींच राहणार नाहीं. याकरितां कांहीं निर्बंध जरा त्रासदायक वाटले तरी ते पाळले पाहिजेत. अगदीं साधी सोंवळ्याओंवळ्याची बाब घेतली तर सोंवळें पाळणें म्हणजे कांहीं फार त्रासाचा प्रश्न नव्हे. आपला हा विशिष्ट आचार म्हणून, कांहीं अपवादात्मक प्रसंग खेरीज करून, सोंवळें पाळलें पाहिजे असें लोकमान्यांचें मत ते कॉलेजमध्यें असतांना सुद्धां होतें (टि. च. ४४). या बाबतींत त्यांची शिस्त पाहुण्यांनाहि सांभाळावी लागे. 'सोंवळें नेसून जेवावयास बसण्याविषयीं मात्र त्यांचा कटाक्ष होता, व पंगत बिघडूं नये म्हणून दाजीसाहेब खरे यांचेसारखे मुंबईचे त्यांचे स्नेही सोबती आले तरी ते टिळकांचे घरीं सोंवळें नेसूनच जेवावयास बसत,' असें

श्रीयुत नरसोपंत केळकर यांनीं लोकमान्यांचें चरित्रांत नमूद करून ठेविलें आहे ( टि. च. ६६६ ). नित्यनैमित्तिक कर्मांचें फारसें स्तोम त्यांनीं माजविलें नाहीं; तथापि श्राद्ध, पक्ष, श्रावणी हीं कर्मे ते नियमानें करीत. धर्मनिर्बंधाचा मान ठेवण्याकरितां चहाच्या ग्रामण्यप्रकरणांत त्यांनीं काशीस प्रायश्चित्त घेतलें; आणि विलायतेहून डेप्युटेशनचें काम आटोपून परत हिंदुस्थानांत आल्यावर त्यांनीं प्रायश्चित्त घेतलें. त्यांची राहणी व पोषक जुन्या चालीप्रमाणें असे. तात्पर्य, धर्मवैशिष्ट्याकरितां थोडा त्रास सोसून कांहीं निर्बंध पाळावे लागतात, आणि धर्माचा मान ठेवावा लागतो. पण वर दाखविल्याप्रमाणें समाजाच्या हिताहिताचा संबंध बदललेल्या परिस्थितींत जेव्हां उपस्थित होतो तेव्हां आचारांत फरक करणें जरूर पडतें व तसा आपल्या धर्माच्या इतिहासांत अनेकदां केलेला आहे. परिस्थित्यनुरूप धार्मिक आचारांत फरक करणें जरूर आहे असें दाखविल्यावर कोणकोणते आचार हल्लीं बदलले पाहिजेत याबद्दल टिळकांनीं सांगितलेल्या महत्त्वाच्या गोष्टींचा विचार करूं.

संकेश्वरचे जगद्गुरु श्रीशिष्य शंकराचार्य पुण्यास १९०४ सालीं आले त्या वेळीं त्यांच्याबरोबर आलेल्या शास्त्रीमंडळाबरोबर टिळकांचा संवाद झाला. त्यांत त्यांनीं सध्याचे आचारांत दोन सुधारणा इष्ट आहेत म्हणून सुचविलें होतें. त्यापैकीं पहिली अशी कीं, " लग्नांत सप्तपदी करूं नये. सप्तपदी तशीच ठेऊन ती गर्भधानाचे वेळीं करावी. सप्तपदी झाल्याशिवाय विवाहाची पूर्तता होत नाहीं " ( आ. व. २१६ ). ही सुधारणा घडून यावी असें प्रतिपादण्यांत त्यांचा हेतु असा होता कीं, लग्नांत सप्तपदी झाली नाहीं आणि पुढें गर्भधानाचे पूर्वी जर पति मृत झाला तर विवाहाची पूर्तता झाली नसल्यानें त्या मुलीचा दुसरा विवाह होण्यास शास्त्राची आडकाठी राहणार नाहीं; व यामुळें लग्न होऊन दांपत्य सुखाचा लाभ न मिळतां सर्व जन्म दुःखांत कंठणाऱ्या बालविधवांची संख्या कमी होईल. टिळकांनीं सुचविलेली दुसरी सुधारणा अशी कीं, " ऋतु प्राप्त झाल्यानंतर विवाहास परवानगी द्यावी. हें थोड्या प्रायश्चित्तानें करावें लागेल; पण धर्मशास्त्राच्या कांहीं विरुद्ध नाहीं " ( आ. व. २१६ ). या सुधारणेनें लोकांना चांगली सवलत मिळून पतीचा अजिबात समागम न होतां वैधव्य-दुःखांत पडलेली स्त्री सहसा सांपडणार नाहीं. प्लेग, दुष्काळ अशासारख्या आपत्तीच्या या काळांत ह्या सुधारणा जरूर व्हाव्या असें त्यांना वाटत होतें.

याच्याहि पूर्वी २६ अक्टोबर १८९० रोजीं तुळशीबागेंत जेव्हां सामाजिक गोष्टींत सरकारनें हात घालूं नये असें जाहीर करण्याकरितां सभा भरली त्यांत येणाऱ्या सूचनेस उपसूचना म्हणून रा. रामचंद्र भिकाजी जोशी, विष्णु अनंत पटवर्धन वगैरे लोकांच्या सहीनें जो अर्ज पाठविला त्यावर टिळकांनीं आपली सही देऊन ज्या सुधारणांना संमति दिली त्या खालीलप्रमाणें:—

(१) मुलीचें लग्न सोळा वर्षांचे आंत करूं नये.
(२) वीस वर्षांचे आंत मुलाचें लग्न करूं नये.
(३) पुरुषाचें लग्न चाळीस वर्षांपुढें होऊं नये.
(४) चाळीस वर्षांपुढें लग्न करणें झाल्यास विधवेशीं करावें.
(५) दारू पिणें बंद असावें.
(६) हुंडा घेण्याची चाल अजिबात बंद करावी.
(७) प्राप्तीचा दहावा भाग सार्वजनिक कामाकडे द्यावा.
(८) विधवेचें वपन करूं नये.

या अर्जावर नुसती सहीच न करतां टिळकांनीं अशी एक आपली टीप दिली होती कीं, ज्यांना ह्या सुधारणा मान्य आहेत त्यांनीं त्या अमलांत आणण्याबद्दल स्वतःस बांधून घ्यावें, व त्याप्रमाणें वर्तन न घडल्यास तो अपराध समजून त्याबद्दल कडक शिक्षा ठेवण्याविषयीं सरकारास विनंति करावी, म्हणजे समाज सुधारण्याचा कायदा कोणास पाहिंजे तें खरें कळून येईल ( टि. च. २५२-३ ). टिळकांच्या या मतावरून रा. ब. रानडे सुद्धां म्हणाले कीं, टिळकांनीं सुधारणेची जी पायरी धरिली आहे ती आम्हांविरुद्ध नाहीं, इतकेंच नव्हे तर ते आमच्या पक्षाकडे आहेत असें आतां आम्हांस स्पष्ट समजलें ( टि. च. २५७ ).

प्रगतिपर समाजाची कुचंबणा करणाऱ्या आचारांत सुधारणा केली पाहिजे असें जसें त्यांचें मत होतें त्याचप्रमाणें समाजांत धर्माचे नांवाखालीं रूढ झालेल्या घाणेरड्या चालीहि मोडून टाकल्या पाहिजेत असें ते म्हणत असत व त्याप्रमाणें केसरींत टीकाहि करीत. याचें एक उदाहरण द्यावयाचें म्हणजे प्रचलित गर्भाधान पद्धति होय. गर्भाधान संस्कार हा वैकल्पिक आहे; सूत्रांत प्रचलित पद्धतीचा संस्कार दिलेला नाहीं, म्हणून तो संस्कार कमी केला तरी वैदिक धर्माविरुद्ध आचरण होत नाहीं. निदान न्हाणवल्यांना मिरवत नेण्याची अनिष्ट चाल बंद केली पाहिजे असें सांगून ‘ गर्भादानासारखी शुष्क, निरर्थक, ग्राम्य व आपल्या हातांतील चाल जर आम्हांस सोडवत नाहीं तर बालविवाह वगैरे घोर चाली कशा सुटणार ? ’ असा सवाल त्यांनीं टाकला आहे ( टि. च. १७५ ). सदर्हु लेखांत सामाजिक सुधारणेचे बाबतींत आपलें धोरण मध्यम प्रतीच्या उदारमतवादित्वाचें राहणार असें सांगितलें आहे. प्रचलित चालीरीतींची धर्मशास्त्रास धरून सारासार चर्चा करून लोकसमाजांत जागृति करावयाची व योग्य दिशा दाखवावयाची असें केसरीचें सामाजिक धोरण त्यांनीं आंखलें होतें. मध्यम उदारमतवादित्वाचें धोरण प्रतिपादून आचरण करतांना तें पार विसरून जावयाचें असें त्यांनीं केलें नाहीं. अस्पृश्यतेच्या बाबतींत ते स्वतः कसें आचरण करीत तें मागें सांगितलेंच आहे. बापूसाहेब केतकर हे सुधारक व प्रार्थनासमाजिस्ट म्हणून प्रसिद्ध असतां त्यांचे चिरंजीव विश्वनाथपंत यांना लोकमान्यांनीं आपली मुलगी दिली. समाज-

सुधारणेचे पुढारी म्हणून मिरवणें व वेळ आली असतां त्याप्रमाणें वागणें हें किती अवघड आहे तें, तेलंगांना वडिलांचे आग्रहास्तव आपल्या मुलीचें लग्न तिच्या दहावे वर्षी करणें भाग पडलें, यावरून चांगलें कळून येतें. पण तेलंगांच्या मुलीच्या लग्नानंतर टिळकांना आपल्या मुलीचें लग्न करण्याचा प्रसंग आला तेव्हां तें त्यांनीं तिच्या वयाच्या पंधराव्या वर्षी केलें ही त्या काळाच्या मानानें जरा विशेष गोष्ट होय.

कोणकोणत्या धार्मिक आचारांमध्यें फरक झाले पाहिजेत व बदललेल्या परिस्थितींत ते होणें कसें जरूर आहे, आणि कालानुरूप धर्मविधींत फेरफार करणें हें आपल्या धर्मशास्त्रासहि संमत असल्याचें सांगितल्यावर ह्या सुधारणा कोणत्या तत्त्वावर घडून आल्या पाहिजेत या महत्त्वाचे बाबतींत लोकमान्यांचें मत आतां आपण पाहूं. आपल्या समाजाचे उन्नतीकरितां म्हणून जेव्हां आपण सुधारणा करूं पाहतों तेव्हां आपलेपणाची बुद्धि जर नष्ट झाली तर मग ती आपली सुधारणा कसली? "राष्ट्रीयत्त्वाची दिशा सुटली म्हणजे समाजसुधारणा झाली काय आणि न झाली काय सारखीच होय." असें तारिख १० जानेवारी १९०५ च्या केसरीच्या अंकांत टिळकांनीं म्हटलें होतें (आ. व. २०४). स्वत्व जर नष्ट झालें आणि राष्ट्रीय भावनेचा जर लोप झाला तर इतर प्राण्यांचें जिणें व आपलें जिणें यांत फरक काय राहिला? उच्च संस्कृतीची अविच्छिन्न परंपरा हें राष्ट्राच्या स्वरूपाचें एक अत्यंत उदात्त अंग आहे. 'एतद्वचो जरितर्मापि मृष्ठा आ यत्ते घोषानुत्तरा युगानि' (ऋ. ३. ३३. ८). आमचा हा संवाद पुढल्या युगानुयुगांत दुमदुमून राहो, तो मध्येंच विलयास न जावो अशी नदीमुखानें या सूक्तांत व्यक्त झालेली मंत्रद्रष्टया प्राचीन ऋषींची मनीषा आतांपर्यंत सफल करून आमचें विशिष्ट राष्ट्रीयत्त्व आम्ही राखिलें आहे. हा राष्ट्रीयत्त्वाचा अभिमान कायम राहिला पाहिजे. 'तो अभिमान म्हणजे कोणता धरावयाचा?' अशी पृच्छा केल्यास लोकमान्य निःसंदिग्धपणें उत्तर देतात कीं, 'अर्थात् हिंदुत्त्वाचा होय.' (आ. व. २०५). आम्हाला धर्माची कांहीं परंपरा आहे. त्या परंपरेंत जें ज्ञान आहे तें इतर धर्मांतील ज्ञानाच्या बरोबरीनें किंबहुना त्याहून श्रेष्ठहि आहे; आणि ही परंपरा जर आम्ही सोडून दिली तर आमचें असें म्हणण्यासारखें आम्हास सामान्य बंधन कांहींच नाहीं; या गोष्टी आम्ही नेहमीं लक्षांत बाळगिल्या पाहिजेत.

राष्ट्रीयत्वाचा म्हणजे हिंदुत्वाचा अभिमान कायम ठेऊन प्राचीन परंपरा न मोडतां समाजसुधारणा करावयाची म्हणजे आपल्या धर्मशास्त्रांच्या आधारानें व त्यांतील तत्वांस विसंगतपणा न येईल अशा तऱ्हेनें हें कार्य साधावयास पाहिजे. "धर्मशास्त्राचें उल्लंघन न करितां ज्या गोष्टी आपणास करितां येतील" त्या कराव्यात, व त्या कशा व कोणत्या करावयाच्या याबद्दल ते असें सांगतात कीं, "आपल्या धर्मशास्त्रास अनुसरून कार्याकार्य गोष्टीस विधि, विकल्प व निषेध

अशीं तीन बंधनें घालतां येतील. यांत ज्या गोष्टी निषिद्ध मानल्या आहेत त्या मुळींच करावयाच्या नाहींत. परंतु ज्यांविषयीं विकल्प आहे किंवा प्रायश्चित्त आहे त्या करण्यास जातिभ्रंशाचा प्रत्यवाय येऊं शकणार नाहीं, व तें धर्मसमजुतीच्या विरुद्ध जाणें असेंहि होणार नाहीं " ( टि. च. २५६ ). हीच विचारसरणी अनुसरून त्यानीं मागें सांगितलेल्या सुधारणा सुचविल्या आहेत. मुलीचें लग्न सोळाव्या वर्षापर्यंत ठेवण्यास हरकत नसावी असें जें त्यानीं म्हटलें तें " त्रीणि वर्षाण्युदीक्षेत कुमार्यृतुमती सती । उर्ध्वं तु कालादेतस्माद्विन्देत सदृशं पतिम् ॥" (मनु. ९०–९०) या मनुवचनाधारें होय. ऋतुकालानंतर तीन वर्षांपर्यंत म्हणजे सुमारें सोळाव्या वर्षापर्यंत मुलगी अविवाहित राहिल्यास चालेल, सवत्र मुलीच्या लग्नाची वयोमर्यादा सोळाव्या वर्षांपर्यंत नेण्यास प्राचीन शास्त्र व अर्वाचीन समाजस्थिति या दोहोंच्या विचारें कांहीं हरकत दिसत नाहीं. थोडी धर्मसंबंधीं अडचण दूर करण्यास शान्ति केली म्हणजे झालें. विधवांचें केशवपन करूं नये असें प्रतिपादितांना सुद्धां शास्त्राधार पाहूनच त्यांनीं हें सांगितलें असलें पाहिजे. कारण वशिष्ठ–आपस्तंबादि धर्मसूत्रकार आणि मनुयाज्ञवल्क्यादि स्मृतिकार यांनीं वपन करण्याचा विधि मुळींच सांगितला नाहीं. वृद्धहारीत स्मृतींत ' केशरञ्जनताम्बूलगन्धपुष्पादिसेवनम् ।' (वर्जयेत्) असें सांगितलें आहे. केशरञ्जन करूं नये म्हणजे वपन करावें असा मुळींच अर्थ होत नसून उलट ते ठेवावेत पण नटवेपणा करूं नये एवढेंच सांगितलें आहे. तेव्हां केशवपनाचे रूढीस खरा शास्त्राधार नसल्यामुळें ती रूढि बंद करण्यास कांहीं हरकत नाहीं असें त्यांनीं म्हटलें आहे. एकंदरींत, समाजांतील आचारांत फरक करितांना धर्मशास्त्राकडे कसें लक्ष द्यावें हें वरील विवेचनावरून ध्यानांत येईल.

सुधारणा करितांना ती शास्त्रविरुद्ध नाहीं इतकेंच तेवढें पाहून तावडतोब ती समाजावर लादणें योग्य होणार नाहीं; तर या बाबतींत आणखी एक महत्त्वाची गोष्ट ध्यानांत ठेवावयाची म्हणजे लोक–जागृति ही होय. सुधारणेचें महत्त्व, तिची सशास्त्रता व जरूरी लोकांना प्रथम पटवून दिली व नंतर ती अमलांत आणली तरच फायदा होईल. लोकमतास न जुमानतां हट्टानें सुधारणा केल्यास सुधारणांना जनतेकडून जोराचा विरोध होऊन इच्छित गोष्ट साध्य न होतां उलटी दुःसाध्य होऊन सुधारकांचा वर्ग मात्र निराळा पडतो. सबब " समाजाला बरोबर घेऊन जावें, त्याला सोडून जाऊं नये......हें टिळकांच्या सामाजिक आचारनीतींतलें एक आद्य तत्त्वच होतें. " ( टि. च. ३१० ). पारशी समाजासारख्या सुशिक्षित समाजामध्यें सुद्धां जुन्या चालीरीति कितीहि अप्रशस्त असल्या तरी त्या लवकर सोडून देण्याची तयारी होत नाहीं, " पारशी लोकांत केवळ युक्तिवाद चालत नाहीं, मग हिंदु समाजाची गोष्ट कशाला ? " ( आ. व. १९३ ). याप्रमाणें टिळक म्हणतात

तें कांहीं खोटें नाहीं. पारशांचे करितां प्रेतदहनास सवलतीनें जागा देण्या-संबंधीं मुंबई कार्पोरेशनमध्यें परवां खडाजंगी वाद झाला त्यांत प्रमुख सुशिक्षित पारशी सुद्धां आपल्या जुन्या चालीस किती चिकटून राहतात हें जर आपल्या निदर्शनास येतें तर आमच्या अज्ञ समाजानें जुन्या आचारास झटकन् फांटा देऊन नवीन सुधारणेस एकदम तयार व्हावें असें म्हणणें विचित्रपणाचा कळस होय. सर्व काहीं एकदम साध्य व्हावें असें उतावीळपणानें म्हटलें तरी तसें होणें शक्य नाहीं. तेव्हां अधीरपणा सोडला पाहिजे. सुधारणा ह्या एका तडाक्यासरशी होणाऱ्या नसून त्यास थोडा कालावधि लागतो. अनिष्ट रीतिभाति " खास दूर केल्या पाहिजेत असेंच केसरीनें सर्वकाळ मत दिलें आहे. परंतु, या गृहस्थांचें हळुं हळुं निराळें व आमचें निराळें. यांचें हळुं हळुं म्हणजे एकदम कायदा; आमचें हळुं हळुं म्हणजें ज्ञानप्रसार. " ( केसरी ३१ मे १८८७ ).

धार्मिक आचारांत सुधारणा करितांना लोकमान्यांचें आणखी एक महत्त्वाचें तत्त्व असें होतें कीं, ह्या सुधारणा आमच्या आम्ही केल्या पाहिजेत; कायदा करून सरकारनें आमच्या धर्मांत हात घालतां कामा नये. हें त्यांचें मत कॉलेजमध्यें शिकत असलेल्या दिवसापासून ते अखेरपर्यंत कायम होतें. रा. रा. उपासनी यांनीं कॉलेजांतील कांहीं संवादाच्या आठवणी दिल्या आहेत त्यांमध्यें 'इंग्रजांनीं आमच्या धर्मांत हात घालतां कामा नये' ( टि. च. ४९ ) असें टिळकांनीं म्हटल्याचें नमूद केलें आहे. परकीयांना आमच्या आचारविचारांची कांहीं माहिती नसते. ज्यांचा आमचे धर्माशीं कसलाहि संबंध नाहीं त्यांनीं त्यांत ढवळाढवळ करण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं. मलबारी यांनीं बालविवाह वगैरेसंबंधीं सुधारणांचे बाबींत कायद्याची मदत मिळावी म्हणून खटपट चालविली त्याचा निषेध करण्यास १८८६ सालीं भरलेल्या मुंबईतील माधव बागेच्या सभेस टिळकांनीं सहानुभूति दाखविली त्याचा हेतूहि हाच होय. यानंतर पुढें सर अँड्र्यू स्कोबल यांचेकडून येणाऱ्या संमतिवयाचे बिलाबद्दल जें भयंकर रण माजलें त्यांत टिळकांनीं या बिलाविरुद्ध धोरण स्वीकारलें त्याचें कारणहि हेंच होय. मुलीचें लग्न सोळाव्या वर्षापर्यंत करूं नये असें याच सुमारास प्रतिपादणारे टिळक संमतिवयाची मर्यादा बारा वर्षें असावी या तत्त्वास विरुद्ध नव्हते; तर तसा कायदा केल्यानें कांहीं प्रसंगीं—मग तें अपवादात्मक कां असेनात—सदर्हु कायदा शास्त्रीय संस्काराचे आड येणार, तेव्हां धर्माचे आड येणारा कायदा नको असा त्यांचा या वादांतील मुद्दा होता. या वादाची विस्तृत चर्चा करण्यास स्थलावकाश नाहीं; परंतु टिळकांच्या या विषयावरील सर्व लेखांचें व भाषणांचें तात्पर्य म्हणजे सरकारनें धर्मांत हात घालूं नये हें होय. " माझें मतहि सुधारणेस अनुकूलच आहे; परंतु ज्यांचे विचार सुधारले नाहींत त्यांच्या गळ्यांत सुधारणा कायद्यानें बांधणें मला अगदीं प्रशस्त वाटत

नाहीं " ( टि. च. २५३ ) असें त्यांनीं स्पष्टपणें म्हटलें होतें. सुधारणेबद्दल कायदा करणेंच झाला तर तो कसा करावा याबद्दल त्यांनीं असें म्हटलें होतें कीं, अमुक सुधारणा आम्ही पाळूं; न पाळल्यास कायद्यानें शासन करावें असें आपणास स्वतः होऊन बंधन करून घेऊन जे लोक कायदा मागतील त्यांनाच तेवढें कायद्यानें शासन करावें ( टि. च. २५३ ). कारण, असें करण्यानें सरकारनें धर्मात हात घातला असें होत नसून त्या लोकांनींच तो कायदा करून घेतला असें होतें. यामुळें फक्त खरे सुधारक कोण तेवढेंच समजून येईल आणि समाजसुधारणेचें पाऊल मात्र पुढें जोरानें पडणार नाहीं हें खरें; पण अशा पद्धतीनेंच समाजसुधारणा करावी हें सांगण्याकरितां टिळकांनीं हा उपाय सुचविला नसून कायदा पाहिजेच असेल तर कसा करावा एवढेंच ह्यायोगें त्यांनीं दाखविलें आहे. या गोष्टीवरून सुद्धां सरकारनें आमच्या धर्मात हात घालूं नये हें त्यांचें तत्त्व अधिक स्पष्टपणें कळून येतें.

सामाजिक सुधारणा जर कायद्यानें घडवून आणावयाची नाहीं तर ती कशी घडवून आणावयाची ? राजकीय सुधारणा करावयाची झाल्यास त्यास जशी ती करणारी व अमलांत आणणारी राजकीय संस्था अगर कॉन्स्टिटयूशन असते तशी सामाजिक सुधारणेबद्दल कसली कॉन्स्टिटयूशन आहे ? टिळक म्हणतात कीं, "राजकीय बाबींत सर्व अधिकार राजाच्या किंवा एकाद्या विशिष्ट संस्थेच्या ताब्यांत असतो, तसा हिंदुसमाजांतील सामाजिक बाबतींतील अधिकारहि कांहीं विशिष्ट व्यक्तींच्या व संस्थांच्या ताब्यांत आहे; आणि या संस्था व व्यक्ती हिंदुशास्त्रांत सांगितलेल्या कांहीं नियमांनीं चालल्या आहेत " ( केसरी, ता. १२।१।१९०४ ). या व्यक्ती व संस्थांमध्यें जगद्गुरु व त्यांचीं पीठें येतात. स्मृति व धर्मसूत्रांत सांगितल्याप्रमाणें ' त्रैविद्यो हेतुकस्तर्की नैरुक्तो धर्मपाठकः । त्रयश्चाश्रमिणः पूर्वे परिषत्स्याद्दशावरा ॥' (मनु. १२, १११.) अशी दशावरा परिषद् अगर ' ऋग्वेदविद्यजुर्विच्च सामवेदविदेव च ।' (मनु. १२,११२) यांची त्र्यवरा परिषद् याहि धर्मसुधारणा करणाऱ्या संस्था होत. जगद्गुरु व त्यांचीं पीठें यांचा जसा टिळकांनीं स्पष्ट उल्लेख केला आहे ( आ. व. २१५ ) तसा दशावरा अगर त्र्यवरा परिषदेचा कोठें केल्याचें आम्हांस अद्यापि आढळलें नाहीं; तथापि, हिंदुधर्मशास्त्रांच्या नियमांनीं स्थापिलेल्या संस्था त्यांना मान्य असल्यानें मनु, याज्ञवल्क्य, बोधायन इत्यादि धर्मवक्त्यांनीं घालून दिलेल्या ह्या विद्वत्सभांची गणना त्यांनीं सांगितलेल्या संस्थांमध्येंच होते. या संस्थांमार्फत सुधारणा केल्यानें धार्मिक परंपरा कायम राहून लोकांनाहि त्या विधर्मी वाटत नाहींत; कारण, सशास्त्र पण नवीन गोष्ट सुशिक्षित माणसानें सांगितल्यास सामान्य जनतेस विधर्मी वाटते पण तीच धार्मिक संस्थेनें अगर धर्मगुरूनें सांगितल्यास योग्य व शास्त्रोक्त वाटते. परंतु हे धर्मगुरु आणि धर्म-

संस्था हल्लीं चांगल्या कार्यक्षम स्थितींत नसल्या कारणानें त्यांच्यांत प्रथम सुधारणा झाली पाहिजे व त्यांना ऊर्जित दशेस आणलें पाहिजे. सध्याचे परिस्थितीची बरोबर माहिती, व समाजशास्त्राचें ज्ञान हें समाजसुधारणा करतांना चांगलें अवगत असणें जरूर असल्यानें याबद्दल निर्णय देणारे जगद्गुरु अगर शास्त्रीमंडळ यांना या सर्व गोष्टी माहीत पाहिजेत. याविषयीं एका संवादांत टिळक म्हणाले "जगद्गुरूच्या जागीं नवीन तऱ्हेनें शिकलेला इसम पाहिजे, म्हणजे तो पुष्कळ कार्य करील. त्यांतून हल्लींच्या काळीं अशा मनुष्यास इंग्रजी आलेंच पाहिजे." ( आ. व. २१४ ). नव्या जुन्या विचारांची जोड होण्यास धर्मसंस्थांची सुधारणा तर झालीच पाहिजे पण नव्या सुशिक्षित मंडळीनींहि हें धर्मसुधारणेचें कार्य आपल्या शिरावर घेतलें पाहिजे. "आजच्या मनूंत धर्मकार्याची जबाबदारी शास्त्रीमंडळावर नसून तें काम आमच्या नव्याच मंडळीनें अंगांवर घेतलें पाहिजे, असें माझें मत आहे" ( आ. व. २८० ). कारण, समाजसुधारणेची स्फूर्ति जुन्या मंडळीस होणार नाहीं, व ज्यास स्फूर्ति नाहीं त्याचे हातून धडाडीनें कार्यहि होणार नाहीं. सबब नव्या मंडळीनें हें कार्य हातीं घेऊन, तें नेटानें चालवून, जुन्या मंडळीस पटवून देऊन, आपल्या धार्मिक संस्थांकडून मान्य करवून सुधारणा अमलांत आणल्या पाहिजेत. अशा प्रकारें कार्य केल्यास परिस्थित्यनुरूप योग्य त्या सुधारणा शास्त्रोक्त पद्धतीनें होऊन सर्वमान्य होतील.

## ७ धार्मिक शिक्षणाची आवश्यकता

धर्मसुधारणेचें कार्य नव्या मंडळीनें हातीं घेतलें तर तें अधिक उत्साहानें होईल ही गोष्ट खरी; पण तें कार्य अंगिकारावयाचें म्हणजे धर्माचें यथार्थ ज्ञान व अभिमान पाहिजे. ह्या गोष्टींचें बीज लहानपणींच अंतःकरणांत रुजलें पाहिजे व तें सर्वत्र पद्धतशीर रीतींनें पेरलें जावें म्हणून शाळेंतूनच धार्मिक शिक्षण देण्याची तजवीज झाली पाहिजे. आपल्या काळाच्या नवीन सुशिक्षित समाजसुधारकांसंबंधीं टिळक म्हणतात कीं, त्यांना धर्मशिक्षण मुळींच मिळालें नसल्यामुळें व आपल्या धर्मग्रंथांचें अवलोकन सुद्धां कधीं न केल्यामुळें 'धर्म म्हणजे काय, तो कशाकरितां पाहिजे, राष्ट्राच्या उन्नतीस त्याची कांहीं आवश्यकता आहे किंवा नाहीं, याबद्दल त्यांस कांहीं एक माहीत नसतें' ( आ. व. २४५ ). केवळ एकांगी लौकिक शिक्षणानें साहजीकपणेंच दृष्टि निव्वळ व्यावहारिक बनते. इंग्रजी शिक्षण संपादून आलेल्या सुशिक्षितांची धर्मावरील श्रद्धा बहुतेक उडून गेल्यामुळें आपल्या सामाजिक अगर धार्मिक रीतिभाती जरा कोठें नडूं लागल्या तर त्या बेलाशक झुगारून देण्यास त्यांना कांहींच फिकीर वाटत नाहीं. प्राचीन आर्यसंस्कृतीबद्दल अभिमान नष्ट होऊन मनुशंकराचार्यांपेक्षां

मिल्लस्पेन्सरच अधिक प्रिय वाटूं लागतात. यांचें कारण पाश्चात्य शिक्षण नसून धर्म-शिक्षणाचा अभाव हें होय. तारिख २५।८।१९०३ चे केसरींत प्रो० जिनसीवाले यांचा मृत्युलेख लिहितांना लोकमान्य म्हणतात, "पाश्चिमात्य विद्येचा खिस्ती धर्मांतील विद्वानांवर जर वाईट परिणाम होत नाहीं असें ग्लॅडस्टनसारख्यांच्या चरित्रावरून आम्हांस समजतें तर आम्हावरच तसा परिणाम होण्यास धार्मिक व गृहशिक्षणाचा अभाव वगैरे दुसरीं कांहीं कारणें आहेत अशी त्यांची इतिहासावरून खात्री झाली होती." या लेखांत ते आणखी असें लिहितात कीं, "मीं हिंदु आहे, हिंदु राहीन, हिंदु मरेन, आणि हिंदुत्वानेंच आपला अभ्युदय केव्हांना केव्हां तरी संपादन करून घेईन असा त्यांचा पूर्ण विश्वास होता; आणि तो विश्वास बदलण्यास पाश्चिमात्य शिक्षणाची जी सबब इतर सुशिक्षित लोक पुढें आणतात ती खरी नाहीं, असें त्यांनीं आपल्या आचरणावरूनच सिद्ध केलें होतें." पाश्चात्य शिक्षण आपल्यास अधार्मिक बनवीत नसून धर्मशिक्षणाच्या अभावामुळें सुशिक्षितांमध्यें धर्माबद्दल अनास्था दिसून येते. ज्यांनीं स्वतः होऊन धर्माचें ज्ञान मिळविलें त्यांचे ठिकाणीं धर्माबद्दल पूर्ण आदर आणि उत्कट प्रेम पाश्चात्य शिक्षण मिळवून सुद्धां उत्तम प्रकारें वसत होतें हें लोकमान्य, प्रो० जिनसीवाले वगैरेंच्या उदाहरणावरून स्पष्टच आहे. पाश्चात्य शिक्षण पाहिजे पण त्याबरोबर धर्मशिक्षणहि देण्याची तजवीज जरूर केली पाहिजे असें लोकमान्यांचें म्हणणें होतें. अव्वल इंग्रजींतील पहिली पिढी धर्मशिक्षणाचे अभावीं धर्मशून्य निघाली; तर तसला अनिष्ट परिणाम टाळावयाचा असेल तर धर्मशिक्षणाची सोय शाळांमधून करणें अत्यंत जरूर आहे. सरकार परकी असल्यामुळें ही सोय त्याचे हातून होणार नाहीं; सबब ती आपली आपणच केली पाहिजे. ज्याला आपल्या श्रेष्ठ प्राचीन परंपरेचा अभिमान नाहीं त्याला वर्तमान कालांत तरी कसल्या उदात्त ध्येयाची स्फूर्ति उत्पन्न होणार, आणि भविष्यकालाकडे दृष्टि ठेऊन आपलें चरित्र उज्ज्वल व्हावें असें तरी काय वाटणार ? ज्यास प्राचीन संस्कृतीबद्दल अभिमान वाटत नाहीं त्यानें भावी पिढीच्या आदराची अपेक्षा कां करावी ? धर्मशिक्षणानें प्राचीन संस्कृतीबद्दल आदर वाढेल व जीवनक्रमास उदात्त स्वरूप येईल. "ज्या धर्मशिक्षणानें पुरुषाचा स्वभाव एक प्रकारचा अभिमानी, श्रद्धाळु, कर्तव्यदक्ष व सत्यनिष्ठ बनेल तेंच खरें धर्मशिक्षण होय व तेंच विद्यार्थिदशेंत जरूर आहे" (आ. व. २५०). अशा प्रकारच्या धर्मशिक्षणानेंच सदाचार बाणून कसलेंहि बिकट समाजकार्य अगर राष्ट्रकार्य जबाबदारीनें करण्यास तरुण पिढीचे अंगीं मानसिक धैर्य येईल.

'ईस्ट ॲण्ड वेस्ट' या मासिकांत १९०४ सालीं रँगलर परांजपे यांनीं एक लेख लिहून अशी शंका काढली होती कीं, हिंदुधर्म म्हणजे एक वेडगळ

समजुतींचा भारा असल्यानें धर्मशिक्षणापासून कांहीं फायदा न होतां उलट राष्ट्रीयत्वाची हानि मात्र होईल. यास उत्तर देतांना टिळक म्हणाले कीं, वरील शंका चुकीची आहे. "हिंदु धर्माइतका आग्रहशून्य धर्म दुसरा कोणताच नाहीं. ज्यानें त्यानें आपआपल्या धर्मांत राहून आत्म्याचें कल्याण करावें, असें हिंदु लोक समजतात; आणि असें आहे तर शाळांत हिंदुधर्मशिक्षण दिल्यानें राष्ट्रीयत्वाची हानि होईल असें मानणें असमंजसपणाचें लक्षण होय" (आ. व. २५३). हिंदुधर्म म्हणजे वेडगळ समजुतींचा भारा नसून धार्मिक विषयांचें गूढ व तात्त्विक विवेचन आमच्या धर्मग्रंथांत जितक्या सूक्ष्म रीतीनें व खोल बुद्धीनें केलें आहे तितकें अन्यत्र क्वचितच आढळेल. हिंदु, मुसलमान, पारशी अशा जातींचीं मुलें शाळेंत शिकण्यास येतात तेव्हां अमुक एका धर्माचें पुस्तक सर्वांना प्रिय होण्यासारखें नसलें तरी सर्व धर्मांतील तत्त्वांचें एकीकरण करून तुलनारूपानें या तत्त्वांचें शिक्षण देणें सुद्धां फायद्याचें होईल. "हिंदुधर्मांतील सिद्धांत पुष्कळांना पसंत पडतील, व ते शास्त्र म्हणून शिकविण्यास कांहीं हरकत नाहीं; निदान हिंदु समाज मोठा असल्यामुळें त्यांतील मुलांस तरी त्या धर्मांतील सिद्धांतांची ओळख करून देणें जरूर आहे" (आ.व.२४९).

याप्रमाणें धर्मशिक्षणाची जरूरी, स्वरूप व तें देण्याची पद्धत सांगितल्यावर या बाबतींत आणखी महत्त्वाची गोष्ट ते सांगतात कीं, सदर्हू शिक्षण देण्याचें काम हें परधर्मीयांचे हातीं न देतां स्वधर्मीयांचे हातीं दिलें पाहिजे. मिशनरी शाळेंतील हिंदु विद्यार्थ्यांचे मनावर, तो धर्म आग्रही असल्यानें, अनिष्ट परिणाम होतो. पंडिता रमाबाईच्या शारदासदनाचे वेळीं उत्पन्न झालेल्या वादांत टिळकांनीं हीच गोष्ट प्रामुख्यानें दर्शविली होती. "स्त्रीशिक्षणाचें पांघरूण घेऊन आमच्यांत घुसूं पाहणाऱ्या खिस्ती बाया व त्यांस सहाय्य करणारे व्यवस्थापक—मग ते कितीहि विद्वान् अगर राजविभूषित असोत—यांस आम्ही आपल्या समाजाचे, हिंदुत्वाचे आणि स्त्रीशिक्षणाचे सुद्धां शत्रूच समजतों" (टि. च. ३२५). टिळक स्त्रीशिक्षणाविरुद्ध नव्हते; त्यांनीं आपली मुलगी अन्य मार्ग नसल्यानें पुण्याच्या फीमेल हायस्कूलमध्यें पाठविली होती, पण तेथील शिक्षणक्रम जरी बाडगेपणाचा नसला तरी त्यांत तशी लकब असल्यानें त्यावर त्यांनीं टीका केली होती. तात्पर्य, आपलें धर्मशिक्षण केव्हांहि आपलें हातीं पाहिजे, ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे; त्याशिवाय तें योग्य तऱ्हेनें व समाधानकारक रीतीनें देण्याची तजवीज होत नाहीं.

### ८ गणेशोत्सव

आपल्या धर्माबद्दल अभिमान विद्यार्थीदशेंतच जागृत होण्यास धार्मिक शिक्षणाची शाळेंत सोय केली पाहिजे असें टिळकांचें मत होतें. परंतु नुसत्या

पुस्तकी शिक्षणानें सर्व हेतु साध्य होत नाहींत. धर्मभावना जोरानें उद्दीपित होण्यास सार्वजनिक धार्मिक उत्सवांची जरूर असते; व हा एक हेतु मनांत धरून त्यांनीं गणेशोत्सव सुरू केला. गणेशोत्सवाच्या "ह्या दहा दिवसांत विद्यार्थ्यांचे मनावर जे संस्कार होतील ते शाळेंतील वर्षाच्या शिक्षणाहून अधिक किंमतीचे खास आहेत. अशा उत्सवाचे वेळीं उत्पन्न झालेल्या धर्मबुद्धीचाच सर्व आयुष्यभर उपयोग व्हावयाचा असतो. उदात्त विचार व उच्च मनोवृत्ति ह्याच वेळीं जागृत होतात. ज्यामुळें जिवंत राहण्यांत एक प्रकारचा थोरपणा आहे त्या गोष्टी शिकण्याच्या शाळा हे उत्सव आहेत," असा लोकमान्यांनीं या उत्सवाचा एक फायदा सांगितला होता ( आ. व. २६९ ). केवळ विद्यार्थ्यांचे धार्मिक उन्नतीकरितां त्यांनीं हा उत्सव काढला नसून एकंदर हिंदु समाजांत आपल्या धर्माबद्दल जास्त प्रेम उत्पन्न व्हावें हाहि त्यांतील एक मुख्य उद्देश होता. घरांतील देवाची एकटेंच बसून पूजा करितांना अगर देवलयांत जाऊन नुसतें देवदर्शन घेतांना जो भक्तिभाव अंतःकरणांत उत्पन्न होतो तो सार्वजनिक उत्सवाच्या सात्त्विक ऐश्वर्याच्या भरानें आणि मेळ्यांतील भक्तिरसानें ओथंबलेल्या पदांच्या मधुर आलापांनीं शतपट वृद्धिंगत होऊन चित्तवृत्ति उचंबळून जाऊन त्यावर धर्मभावनेचा ठसा इतक्या चांगल्या तऱ्हेनें उठतो कीं, दीर्घकालपर्यंत तो तसाच राहूं शकतो. गणेशोत्सव हा पूर्वीं घरोघर होतच असे. लोकमान्यांनीं तो कांहीं नवीन शोधून काढला नाहीं; पण त्याला सामुदायिकपणाचें नवीन वळण दिलें. सर्व समाजाला या उत्सवांत भाग घेण्यास लावून, समाजाची एक प्रकारें संघटना करून त्यायोगें धर्मास बळकटी आणावी हाहि एक त्यांचा हेतु उघड दिसतो. "आपल्या राजकीय चळवळीस धर्माचा पाठिंबा असला म्हणजे चांगलें या उद्देशानें हिंदुस्थानांतील अत्यंत लोकप्रिय देव जो गणपति तो आपल्या सर्व चळवळीचें आदिदैवत करण्याची क्लृप्ति टिळकानें लढविली" असें जें चिरोल साहेबांनीं आपल्या प्रख्यात पुस्तकांत लिहिलें आहे त्यांतहि सत्यांश नाहीं असें नाहीं. "सामर्थ्य आहे चळवळीचें। जो जो करील तयाचें। परंतु तेथें भगवंताचें। अधिष्ठान पाहिजे" या श्रीसमर्थोक्तीप्रमाणें राजकीय चळवळीस भगवंताचें अधिष्ठान असावें असें जनतेंतहि जनार्दन पाहाणाऱ्या लोकमान्यांना वाटावें यांत कांहीं आश्चर्य नाहीं. सर्व लोकसमाज या उत्सवास जमत असल्यामुळें ह्या संधीचा फायदा घेऊन त्यांनीं उत्सवांत व्याख्यानांची सुरुवात करून धार्मिक, सामाजिक, राजकीय वगैरे विषयांची चर्चा सुरू केली. राष्ट्रीय भावनेचा प्रसार व्हावा हा या उत्सवाचा एक हेतु होताच. "राष्ट्रीय उत्सव हे राष्ट्राच्या उन्नतीकरितां असतात, व ही उन्नति धार्मिक बाबींतच नव्हे, तर सामाजिक, राजकीय वगैरे सर्व बाबींत झाली पाहिजे," असें त्यांनीं १९०५ सालीं एका

व्याख्यानांत सांगितलें ( आ. व. २७० ). या उत्सवावर प्रथम प्रथम पुष्कळ आक्षेप घेण्यांत आले; पण ते सर्व आपोआप नष्ट होऊन उत्सवास अधिकाधिक बळकटी व राष्ट्रीय स्वरूप येत गेलें. राष्ट्रकार्यांत सुद्धां धर्मभावनेस टिळक कसें प्राधान्य देत हें या उत्सवाच्या स्थापनेवरून चांगलें निदर्शनास येतें व त्यांच्या अंतःकरणांत धर्मबुद्धि कशी वास करीत होती हेंहि स्पष्ट कळून येतें.

लोकमान्यांना स्वधर्माचा पूर्ण अभिमान तर होताच पण सर्व हिंदु समाजानें सुद्धां आपला धर्माभिमान जागृत ठेऊन परधर्मीय उत्सवप्रसंगांत भाग घेऊं नये असें त्यांना वाटत होतें. जे हिंदु लोक ताबुतांची पूजा करितात त्यांना सलोख्यानें वागवून घेण्यास मुसलमान लोक चढेलपणानें तयार नसल्यानें, हिंदूंना ताबुतापासून परावृत्त करावें व उत्साहनिवृत्त केलेल्या या लोकांना स्वधर्माशीं संबंध असलेली कांहीं तरी करमणूक मिळवून द्यावी असा गणेशोत्सव काढण्यांत टिळकांचा बोलून चालूनच हेतु होता ( टि. च. ४२२ ). मुसलमान लोक चढेलपणानें जर आळंदीची पालखी दरग्यावरून जावयाला मज्जाव करितात तर हसन हुसेनच्या थडग्यांच्या प्रतिमांपुढें हिंदूंनीं अल्विदा करीत नाचत कां रडावें ? ( टि. च. ३४८ ). स्वाभिमान सोडून ताबुतांत मिरवणें हिंदूंना लांछनास्पदच होय. मुसलमानांचीं मनें या उत्सवानें दुखावतील तेव्हां हा उत्सव बंद करावा असें म्हणणाऱ्यांना लोकमान्य सडेतोडपणें उत्तर देत कीं, मुसलमानांचा स्नेह आम्हांस पाहिजे पण स्वाभिमान सोडून मात्र नको. "मुसलमानांशीं सलोखा करा, त्यांच्याशीं प्रीतीनें वागा; पण प्रीति दाखवावयाची म्हणजे गणपतीचा उत्सव सोडून द्यावयाचा असा अर्थ करण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं. आपआपल्या धर्मानें वागून एकमेकांचा बहुमान ठेवितां येतो" असें स्पष्ट व चोख उत्तर वरील आक्षेपकांस त्यांनीं दिलें होतें ( आ. व. २६८ ). दुसरा चिडेल या भीतीनें जर आपण प्रत्येक बाबतींत पड खाऊं लागलों, आणि समेट करणें म्हणजे प्रतिपक्ष म्हणेल त्या त्याच्या अटी मान्य करणें व तो सांगेल त्या आपल्या बाबी सोडून देणें असें समजूं लागलों तर असला स्नेह व समेट काय कामाचा ? प्रेमभाव व सलोखा या गोष्टी फक्त समान शक्तीच्या लोकांतच नांदूं शकतात हें हिंदूंनीं पूर्ण लक्षांत ठेविलें पाहिजे असें त्यांचें सांगणें होतें. पूर्व वहिवाटीविरुद्ध जेव्हां वाद्यें वाजविण्याचे बाबतींत मुसलमान हरकत करीत, त्या वेळीं त्यांचें अरेरावीपणाचें म्हणणें हिंदूंनीं मान्य न करितां आपला हक्क बजावला पाहिजे असें टिळक याच तत्त्वास अनुसरून प्रतिपादीत असत. तारीख १० सप्टेंबर १८९५ च्या केसरींत धुळ्याच्या दंग्याला उद्देशून टिळक लिहितात "मुसलमानांचा पक्ष यथार्थ नाहीं. सर्व मशिदींपुढें, सर्वकाळीं, सर्व प्रकारचीं वाद्यें बंद ठेवलींच पाहिजेत हें म्हणणें अगदीं चुकीचें असून त्यास

कोणीहि समंजस मनुष्य आपली संमति देणार नाहीं. मशिदीपुढें वाद्यें बंद करण्याचा हक्क काय तो थोडाबहुत वहिवाटीवरूनच निष्पन्न होतो. " तेव्हां वहिवाटीनें जितका रास्त हक्क असेल तितकाच त्यांना हिंदूंनीं द्यावा. समेटाच्या विचित्र व भ्रामक कल्पनेनें आपली फसगत करून घेऊं नये. आपले न्याय्य असलेले धार्मिक हक्क केव्हांहि दुबळेपणानें घालवूं नयेत. चढाईचें धोरण पत्करून प्रतिपक्षी जर आपल्या धार्मिक अगर नैसर्गिक हक्कांच्या आड आले व त्यांची पायमल्ली करूं लागले तर ' ये यथा मां प्रपद्यन्ते ' या न्यायानें त्यांचा तितक्याच जोरानें प्रतिकार केला पाहिजे.

## ९ ' ये यथा मां प्रपद्यन्ते '

दुसऱ्यास काया, वाचा आणि मनेंकरून कसलेंहि प्रकारें दुःख देऊं नये, व यांतील कोणत्याहि प्रकारचें अल्पसुद्धां दुःख दिल्यास ती हिंसाच होते. " अहिंसार्थाय भूतानां धर्मप्रवचनं कृतम् । यः स्यादहिंसासंयुक्तः स धर्म इति निश्चयः ॥" (म.भा.शां. १०९, १५.) असें धर्माचें तत्त्व वर्णिलें असतां, जशास तसें या न्यायानें विरोध करून स्वार्थप्रवृत्त प्रतिपक्ष्याचा हिरमोड केला तर प्रतिकारानें दुसऱ्याच्या सुखाआड येऊन, वेळीं प्रसंगीं त्यास प्रहार करण्यानें हिंसा होऊन, अर्थात् अधार्मिक आचरण घडतें; तेव्हां धर्मनिष्ठ व्हावयाचें असल्यास असत्याचा प्रतिकार असत्यानें न करितां सत्यानें, आणि हिंसेचा प्रतिकार हिंसेनें न करितां अहिंसेनें केला पाहिजे असें साहजिकच प्राप्त होतें. ' सत्यान्नास्ति परो धर्मः ' म्हणजे ' सत्यापरता नाहीं धर्म ' आणि सत्य हें तर पुनः नित्य आहे; तेव्हां प्रतिकाराकरितां कां होईना असत्याचा आश्रय केल्यास अधर्मच घडतो. तेव्हां हिंसा आणि असत्य यांच्या आश्रयाची व्यावहारिक दृष्टीनें कितीहि जरूरी भासली तरी धर्मदृष्टीनें त्यांचा केव्हांहि आश्रय करणें हें चूक अतएव त्याज्यच होय असा कित्येकांचा पक्ष आहे; आणि दुष्टांच्या प्रतिकारार्थ अनिर्वाह पक्षीं हिंसा अगर असत्य यांचा अवलंब करणें प्राप्त झाल्यास त्यायोगें अधर्माचरण केलें असें होत नाहीं, असें कांहींचें मत आहे. अशा प्रसंगीं लोकमान्यांची धर्मबुद्धि काय होती त्याचा थोडासा येथें विचार करणें जरूर आहे.

अहिंसा, सत्य इत्यादि धर्मतत्त्वें नित्य असून तीं पाळणें हाच आमच्या धर्मशास्त्रांचा अखेरचा सिद्धान्त होय ही गोष्ट लोकमान्यांना मान्य होती. पण स्थितप्रज्ञ झाला तरी त्यास या स्वार्थी आणि अपूर्णावस्थेंतील जगांतच रहावें लागतें हें विसरून चालावयाचें नाहीं. " मनुष्याचें ज्ञान कितीहि पूर्ण व त्याची बुद्धि कितीहि साम्यावस्थेस पोंचली असली, तरी कामक्रोधादिकांच्या कह्यांत सांपडलेल्या अशुद्ध बुद्धीच्या लोकांबरोबर वागतांना अहिंसा, दया, शान्ति, क्षमा इत्यादि नित्य व परमावधीच्या सद्गुणांचाच सर्व प्रकारें सर्वदा स्वीकार

करून त्याचा निभाव लागावयाचा नाहीं " ( गी र. ३७३ ). तेव्हां अशा लोकांशीं वागतांना धर्माधर्मांचा विचार सापेक्षपणें करणें भाग आहे, नाहींतर 'साधुपुरुषास हें जग सोडून द्यावें लागेल आणि दुष्टांचेंच सर्वत्र साम्राज्य होईल.' लोभ व तामसवृत्ति यांच्या आधीन झालेल्या दुष्टांनीं चांगल्या माणसांवर हल्ला करून त्यांना लुबाडण्यास सुरुवात केली असतां जर ते प्रतिकार न करतां गप्प बसले तर दुर्जनांची हिंसा होणार नाहीं व त्यांना समाधान होईल ही गोष्ट खरी; पण या गोष्टीचा जरा खोल विचार करणें भाग आहे. सत्य, दया, अहिंसा इत्यादि उदात्त गुण अबाधित मानावयाचे म्हणजे स्थितप्रज्ञानें आपल्या व्यक्तिविषयक आचरणांत ते आले म्हणजे भागलें इतकाच संकुचित अर्थ घ्यावयाचा, किंवा समाजांत, राष्ट्रांत अगर सर्व जगतांत त्यांचा प्रसार व्हावा व तद्विरुद्ध दुर्गुणांचा नायनाट व्हावा एवढा व्यापक अर्थ समजावयाचा ? वरील दरवडेखोराचेंच उदाहरण जरा सूक्ष्मपणें पाहिल्यास असें दिसून येईल कीं, प्रतिकारार्थ ठोक दिल्यानें अगर गुन्ह्याबद्दल शासन करविल्यानें त्यांना वाईट वाटेल, पण त्यांनीं नागवलेल्या हजारों निरपराधी लोकांना व पुढें लुबाडले जाण्याची भीति असलेल्या सर्व समाजाला सौख्य होईल. बकासुरास भीमानें ठार मारलें यांत एका राक्षसाची हिंसा झाली, पण सगळ्या गांवांतील लोक हिंसेच्या जबड्यांतून सुटले, रामानें रावणाची हिंसा केली पण त्रिभुवन त्याच्या असह्य जाचांतून सुटलें. संकुचित दृष्टीनें पाहिल्यास यांत वैय्यक्तिक हिंसा दिसेल पण तिचा हेतु व परिणाम व्यापक अहिंसा व भूतदया हाच होय. सत्य आणि अहिंसा यांचें साम्राज्य असत्य व हिंसा यांची हिंसा केल्याशिवाय होणें शक्य नाहीं. तेव्हां अहिंसेच्या अनिरुद्ध संचारास जर हिंसा आड आली तर तिचा नायनाट करणें अर्थातच प्राप्त होतें. ही गोष्ट जाणूनच भगवंतांनीं 'परित्राणाय साधूनां **विनाशाय च दुष्कृताम्** । धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे' असें स्पष्टपणें म्हटलें आहे. सत्य, दया, व अहिंसा यांच्या आचरणाचा परिणाम जर त्यांच्याच नाशांत होऊन तद्विरुद्ध दुर्गुणांचा फैलाव होत असेल तर असे प्रसंग अपवादात्मक समजून त्यावेळीं असत्य, अदयता व हिंसा यांचा आश्रय करावा लागेल. अशा वेळीं दुर्जनाशीं अहिंसेनें व सत्यपणें वागल्यास सर्व समाजाचें अकल्याण होईल. 'ज्यानें सर्वांचें नुकसान होतें तें सत्य नव्हे व अहिंसाहि नव्हे.' ( गी. र. ३४ ). सत्यस्य वचनं श्रेयः सत्यादपि हितं वदेत् । यद्भूतहितमत्यन्तमेतत्सत्यं मतं मम ॥ म्हणजे सत्य बोलणें हें प्रशस्त होय; पण सत्यापेक्षां सर्व भूतांचें ज्यांत हित असेल तें बोलावें. सर्व भूतांचें ज्यांत अत्यंत हित आहे तेंच माझ्या मतें खरें सत्य होय, असें महाभारतांत व्यासांनीं सांगितलें आहे ( म. भा. शां. ३१९, १३ ). ज्या ठिकाणीं सत्य बोलण्यानें असत्याचा जय होणार त्या ठिकाणीं असत्याचा अंगिकार करणें भाग पडेल. यास

आणखीहि महाभारतांतील आधार आम्हांस देतां येईल. ‘ भवेत्सत्यं न वक्तव्यं वक्तव्यमनृतं भवेत् । यत्रानृतं भवेत्सत्यं सत्यं वाप्यनृतं भवेत् ॥ ’ ( म. भा. शां. १०९,५.) खोटें बोलण्यानें जेथें खरें होणार व खरें बोलण्यानें जेथें खोटें होणार त्या ठिकाणीं खरें बाजूस सारून खोटेंच बोलावें; कारण त्याचा हेतु व परिणाम खऱ्यांत होणार आहे. पापकर्म करणाऱ्या मनुष्यास हे अपवादात्मक नियम लागू पडत नाहींत, कारण त्याचा उद्देश सत्य व अहिंसा यांचा उत्कर्ष करण्याचा नसून अपकर्ष करण्याचा असतो. चोरापासून स्वतःचें वित्त व जीवित संरक्षण करतांना त्यास दिलेला टोला अपवादांत येतो, पण चोरी करतांना मालक आड आल्यास त्यास चोरानें दिलेला ठोसा स्वसंरक्षणार्थ असला तरी अपवादांत येत नाहीं. स्वतः जो अधर्मानें वागतो त्याचें रक्षण करण्यास धर्म पुढें येत नाहीं. शेंकडों वेळां अधर्म करून आतां धर्माची याचना करतोस तर ‘ क्व ते धर्मस्तदा गतः ’ म्हणजे त्यावेळीं तुझा धर्म कोठें गेला होता ? असा रोकडा सवाल भगवंतांनीं कर्णास टाकला व म्हणाले—

**आतां रक्षील कसा धर्म तुम्हीं वित्तमद्यमत्तानीं ।**
**जो लोटिला दहादां स्वहितहि मानूनि अहित लत्तांनीं ॥**

आत्मानंदाच्या परिपूर्णावस्थेमधून लौकिक व्यवहारांत उतरलें म्हणजे अत्युच्च पायरीचे जे धर्माधर्म आहेत त्यांत स्थितप्रज्ञास थोडासा फरक करावा लागतो. ( गी. र. ३७४ ). ‘ घटासि आणावा घट । उद्धटासि पाहिजे उद्धट । खटनटासी खटनट । अगत्य करी ॥’ (दा. १९, ९, ३०) अगर ‘ ठका ठक बरा... जैशासि तैसा बरा । ’ असें जें श्रीसमर्थांनीं सांगितलें त्यांतील धोरणहि हेंच होय. सर्व राष्ट्राच्या अभ्युदयाकरितां दुष्ट शत्रूचें पारिपत्य करण्याची योजना करावी लागली तर ती बाहेर फुटतां उपयोगी नाहीं, आणि कारस्थानाकरितां स्वतःच्या हालचालीसुद्धां गुप्त ठेवाव्या लागतात, तेव्हां ‘ जातें स्थळ तें सांगेना । सांगितलें तेथें जाईना । आपुली स्थिति अनुमाना । आणूंच नेदी ॥ ’ (दा. ११, १०, १०) असें आचरण करावें लागतें. सरळ मार्गानें जेथें दुष्टांचें पारिपत्य करणें शक्य नसेल त्या ठिकाणीं थोडीशी मसलत नाइलाज म्हणून करावी लागते. भगवंतांनीं सुद्धां ‘ ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् ’ म्हणजे मला जे ज्या भावानें भजतात त्याच भावानें मी त्यांच्याशीं वागतों, असें चक्क सांगितलें आहे. समर्थांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे ‘ जरी भाव असला माईक । तरी देव होतो महा ठक । नवल तयाचें कौतुक । जैशास तैसा ॥ ’ (दा. ३, १०, १४.) समर्थांचा राजकारणाकडे ओढा असल्यानें त्यांचा आधार कोणास निःपक्षपातीपणाचा वाटणार नाहीं. पण, शांतिब्रह्म तुकाराम महाराज यांचेकडे गेलें तरी तेहि त्यांना ‘ दया तिचें नांव भूतांचें पालन ।

आणि निर्दालन कंटकांचें ॥ ' आणि 'नाठाळाचे काठी देऊं माथां ' असेंच उत्तर देतील. 'शठं प्रति सत्यं ' असा ज्यांचा बाणा आहे व अहिंसा हें ज्यांचें ब्रीद आहे त्या महात्मा गांधींनीं सुद्धां तारिख १२।६।२४ च्या यंग इंडियांत 'What am I to say to a Hindu, who lives in the fear of a neighbour if I am not to tell him that he should know how to die in the attempt to defend himself against his neighbour either non-violently by simply standing at his post or violently by returning blow for blow ' असें लिहून स्वसंरक्षणार्थ ठोशास ठोसाहि देण्याची परवानगी दिली आहे.

'व्यवहारांत अत्युच्च पायरीच्या धर्मांत जो फरक करावा लागतो तो अपवादात्मक होय. अबाधित सत्य आणि अबाधित अहिंसा हाच आमच्या शास्त्रांचा अखेरचा सिद्धान्त आहे. व्यापाऱ्यांनीं आपले फायद्याकरितां नेहमीं सत्यच बोलावें असें नाहीं असें सेज्विकनें प्रतिपादलेलें मत आमच्या शास्त्रकारांना कबूल नाहीं. स्वहितार्थ खोटें बोलण्याची परवानगी आमचे शास्त्रकार वाटेल तेव्हां देत नसून संकटकालीं अपरिहार्य प्रसंगींच देतात. लोभी मनुष्यांच्या समाजांत नाइलाज म्हणून नित्य नीतिधर्मांना कांहीं अपवाद आमच्या शास्त्रकारांनीं सांगितले असले तरी त्यासाठीं ते प्रायश्चित्त सांगतात; आणि पाश्चात्य नीतिशास्त्रज्ञ हेच अपवाद उजळ माथ्यानें प्रतिपादितात, असा या दोहोंत फरक असून आमच्या शास्त्रकारांची विचारसरणीच निर्दोष आहे असें लोकमान्यांनीं दाखविलें आहे (गी. र. ३७६). धर्माधर्माचा निर्णय व्यवहारांत कसा करावा या बाबतींतील त्यांचें 'ये यथा मां प्रपद्यन्ते ' हें तत्व शास्त्रीय तर आहेच, पण त्याच्याशीं विरोध करणाऱ्यांना सुद्धां अखेरीस हेंच तत्व, इच्छेविरुद्ध कां होईना, मान्य करणें भाग पडतें हा लोकमान्यांच्या मताचाच विजय होय.

## १० कार्याकार्यव्यवस्थिति

सत्य, दया इत्यादि उच्च तत्त्वांना कारणपरत्वें अपवाद कसे उत्पन्न होतात, आणि व्यवहारामध्यें परस्परविरोधी कर्तव्यें एकाच वेळीं पुढें आलीं असतां त्यांच्या योग्यायोग्यतेचा निश्चय करण्याची जरूरी प्राप्त झाल्यावर तो निर्णय कसा करावयाचा, म्हणजे धर्माधर्म कसे ठरवावयाचे, या बाबतींत टिळकांनीं कोणता मार्ग स्वीकारला होता याचा थोडा विचार केला पाहिजे. कार्याकार्याचा निश्चय करितांना त्याची केवळ व्यावहारिक अगर आधिभौतिक दृष्टीनें ते उपपत्ति लावीत अगर आधिभौतिक पद्धति गौण ठरवून त्याहून श्रेष्ठ अशा एक प्रकारच्या धर्मबुद्धीनें असले प्रश्न सोडवीत हें आपणांस पाहिलें पाहिजे. कर्माकर्माची

उपपत्ति लावण्याचे जे निरनिराळे मार्ग आहेत त्यांच्यांतील गुणदोषांचें तुलनात्मक विवेचन करून त्यांनीं जो मार्ग पसंत केला आहे त्या बाबतींतील त्यांच्या विवेचनाचें थोडक्यांत निरीक्षण केलें असतां आपलें कार्य होण्यासारखें आहे.

या भिन्न मार्गांपैकीं पहिला पंथ म्हणजे निव्वळ स्वार्थसुखवाद्यांचा होय. परलोक, परोपकार वगैरे सर्व झूट असून त्यांचें स्तोम आप्पलपोट्या लोकांनीं स्वतःचे फायद्याकरितां माजविलें आहे. या जगांत जर एखादी खरी गोष्ट असेल तर ती स्वार्थ हीच होय. स्वार्थ साधून आपल्या आधिभौतिक सुखाची ज्या योगानें उत्तम प्रकारें अभिवृद्धि होईल तेंच न्याय्य, प्रशस्त आणि श्रेयस्कर कर्म होय. परमेश्वरच जर मुळीं नाहीं तर त्याच्या आराधनेची काय जरूरी ? आम्ही स्तुति केली तर ती फक्त 'ज्याची खाऊं आम्ही रोटी। त्याची करूं कीर्ति मोठी ॥' हीच होय. मनुष्य मेला कीं सर्व कांहीं संपलें; मोक्ष वगैरे परलोकाच्या कल्पना पार चुकीच्या आहेत. आपण मेलों कीं सर्व कांहीं बुजलें तेव्हां जिवंत असूं तोंपर्यंत चैन करावी. जवळ पैसा नसल्यास कर्ज काढून करावी पण चैन करावी. 'ऋणं कृत्वा घृतं पिबेत्' हें या लोकांचें आद्य तत्व होय. कर्ज काढावें इतकेंच या सांप्रदायाचे अध्वर्यु सांगतात, पण तें फेडावें असें सांगण्याची तसदी घेत नाहींत. कारण तें फेडतांना पुनः स्वार्थास चट्टा बसेल ना ? सर्व कांहीं करावयाचें तें स्वतःच्या शारीरिक आणि मानसिक सुखाकरितां. दान केल्यास स्वतःचे प्रौढीकरितां व यज्ञ केल्यास स्वतःचा डंका सर्वत्र गाजण्याकरितांच होय. सर्व गोष्टींचें केंद्र म्हणजे मी, आणि हृदयांत खेळणारा एकच भाव म्हणजे अहंभाव. 'ईश्वरोऽहमहं भोगी सिद्धोऽहं बलवान्सुखी' हीच एक दृढ भावना. तेव्हां जें कांहीं कर्म करावयाचें तें वरील हेतुकरितांच आणि कर्माकर्माचा प्रश्न उपस्थित झाल्यावर तो याच विचारसरणीनें सोडवावयाचा. आपल्याकडे चार्वाक या मताचें प्रतिपादन करून गेला. लोकांचें कांहींहि होवो, केवळ आपल्या स्वतःचें विषयोपभोगसुख हाच परम पुरुषार्थ मानून नीतिमत्तेला व धर्माला झुगारून देणारी आधिभौतिक सुखवाद्यांची ही अत्यंत कनिष्ठ पायरी कर्मयोगशास्त्रावरील सर्व ग्रंथकारांनीं व सामान्य लोकांनींहि आतां अत्यंत अनीतीची, त्याज्य व गर्ह्य ठरविली आहे. म्हणून लोकमान्य म्हणतात "हा पंथ नीतिशास्त्र किंवा नीतिविवेचन या नांवालाहि पात्र नाहीं" ( गी. र. ७९ ).

आधिभौतिक पंडितांचा दुसरा पंथ म्हणचे दूरदर्शी स्वार्थवाद्यांचा होय. यांचें म्हणणें असें कीं, स्वतःचें सुख अगर स्वार्थ हेंच एक खरें ध्येय असलें तरी तें साधण्याकरितां दुसऱ्या लोकांचा विचार करावा लागतो. स्वार्थाकरितां एकादी गोष्ट करूं गेल्यास ती इतरांच्या सुखाआड येण्याचा पुष्कळ संभव असतो, तेव्हां त्यांनाहि कांहीं सवलती देणें अपरिहार्य होतें. दया, कृतज्ञता, मैत्री इत्यादि सद्गुणांच्या बुडाशीं हे लोक केवळ परोपकारबुद्धि आहे असें

मानीत नसून स्वतःच्याच सुखाकरितां यांची प्रवृत्ति आहे असें मानतात. शेजाऱ्याच्या उपयोगी पडावयाचें म्हणजे प्रसंगीं त्यानें आपल्या उपयोगी पडावें इतक्याचकरितां होय. आई मुलावर प्रीति करिते ती मुलानें आपल्यास उतारवयांत सुख द्यावें म्हणूनच करिते. तात्पर्य, परोपकार, परार्थ हे सर्व भ्रान्तिमूलक विचार असून त्रिकालाबाधित गोष्ट म्हणजे स्वार्थच होय. 'मनुष्य म्हणजे निव्वळ विषयस्वरूप स्वार्थाच्या मुशींत ओतलेला पुतळा' हेंच यांचें मत असून, चार्वाकाच्या मतांत व यांच्या मतांत भेद इतकाच कीं, "दूरवर नजर देऊन दुसऱ्यासहि सुख होईल अशा प्रकारचे नीतिधर्म पाळले पाहिजेत असें या पंथांतील लोक कबूल करितात." इंग्लंडमधें हॉब्स्नें या मताचें प्रतिपादन केलें आहे.

यानंतर तिसरा वर्ग म्हणजे उदात्त स्वार्थवाद्यांचा होय. हॉब्स्‌ची विचारसरणी त्याज्य ठरवून बट्लरसारखे विद्वान् असें प्रतिपादन करितात कीं, मनुष्यस्वभाव कांहीं निव्वळ आप्पलपोट्या नाहीं; स्वार्थाप्रमाणेंच भूतदया, प्रेम, कृतज्ञता वगैरे सद्गुणहि थोड्याबहुत प्रमाणानें मनुष्याच्या अगांत जन्मतःच वास करीत असतात. तेव्हां कोणत्याहि कर्माचा नैतिक दृष्ट्या विचार करितांना निव्वळ स्वार्थ अगर दूरदर्शी स्वार्थ याकडेच न पाहतां, मनुष्याची दुसरीहि जी नैसर्गिक प्रवृत्ति परार्थ म्हणून आहे तिच्याकडे सुद्धां लक्ष देणें जरूर आहे. या पंथाचे लोक स्वार्थ आणि परार्थ यांच्यावर सारखी दृष्टि ठेऊन कार्याकार्य ठरवीत असतात. तथापि स्वार्थ आणि परार्थ दोन्हीहि ऐहिक सुखवाचक होत. ऐहिक सुखाशिवाय दुसरें कांहीं साध्य नाहीं ही दृष्टि या पंथांत कायमच आहे. तेव्हां आपलें ऐहिक सुख साधून दुसऱ्याचेंहि साधतां आल्यास तें करणें आपलें कर्तव्य होय असें हे लोक समजतात. लोकमान्य यांच्यावर टीका करितांना म्हणतात कीं, स्वार्थ व परार्थ यांचा विरोध आल्यास परार्थ श्रेष्ठ ठरवून स्वार्थाचा त्याग करणें आपलें कर्तव्य होय असें मानण्याची यांची तयारी नाहीं. स्वार्थ सोडून सत्यादि उच्च ध्येयाकरितां आत्माहुति देणें तर या पंथांतील लोकांच्या कल्पनेबाहेरची गोष्ट आहे. 'हे तो मध्यम जे निजार्थ करुनी अन्यार्थही साधिती।' या भर्तृहरीनें वर्णन केलेल्या मध्यम कोटींत हा पंथ मोडतो. ( गी. र. ८२–३ )

आधिभौतिक सुखवाद्यांचा चवथा पंथ म्हणजे मिल्लप्रभृतींचा 'पुष्कळांचें पुष्कळ सुख' या तत्त्वाचें प्रतिपादन करणारा सांप्रदाय होय. हे सात्त्विक आधिभौतिक पंडित असें म्हणतात कीं, 'एकाच मनुष्याच्या सुखाकडे न पाहतां सर्व मनुष्यजातीच्या आधिभौतिक सुखदुःखाचें तारतम्य पाहून नैतिक कार्याकार्याचा निर्णय केला पाहिजे.' जी गोष्ट एकास सुखकारक ती इतरांस दुःखकारक होते, तेव्हां जें कृत्य केलें असतां थोड्या लोकांचें अहित

झालें तरी पुष्कळांचें हित साधतें तें कर्म न्याय्य होय असें या पंथांतील लोकांचें मत आहे. पण लोकमान्य म्हणतात कीं, कर्माकर्म ठरविण्याची ही विचारसरणी बरोबर नाहीं. एका सज्जनास लुबाडून दहा दुर्जनांस सुख झाल्यास तें बरोबर होय असें म्हणण्याची आपत्ति या मतवाद्यांवर येते. शिवाय हेतू-पेक्षां कर्म श्रेष्ठ म्हणण्याचा प्रसंग प्राप्त होतो तो निराळाच. कोट्याधीशानें भिडे-खातर दिलेल्या दहा रुपयांची योग्यता सत्कार्यास मदत करावी या बुद्धीनें निर्धनानें शक्तिसर्वस्व खर्चून दिलेल्या चार पैशांपेक्षां अधिक मानण्याची पाळी या विचारसरणीनें येते. अश्वमेध पर्वांतील नकुलाख्यानाचें उदाहरण देऊन लोकमान्य त्यांत सांगितल्याप्रमाणें म्हणतात कीं, कर्माच्या परिणामापेक्षां कर्त्याच्या बुद्धीवरूनच कर्माचें श्रेष्ठत्व ठरवावें लागतें. म्हणूनच ' सहस्रशक्तिश्च शतं शतशक्तिर्दशापि च । दद्यादपश्च यः शक्त्या सर्वे तुल्यफलाः स्मृताः ॥ ' ( म. भा. अश्व. ९०,९७ ) असें व्यास म्हणतात आणि भगवानहि ' पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति । ' असें म्हणून काय दिलें तें न पाहतां कोणत्या बुद्धीनें दिलें तें पाहतात. कर्मापेक्षां बुद्धि श्रेष्ठ ही गोष्ट मिल्ल साहेबांनीं सुद्धां मान्य केली आहे; पण " जोंपर्यंत बाह्य कर्मांत कांहीं भेद होत नाहीं, तोंपर्यंत कर्त्याला तें कर्म करण्याची वासना कशानेंहि झाली असली तरी कर्माच्या नीतिमत्तेंत त्यानें फरक पडत नाहीं " हा सांप्रदायिक आग्रह त्यांनीं सोडला नाहीं, त्यामुळें लोकमान्यांनीं आधिभौतिक पंथांतील हा सर्वांत उच्च पंथ गौणच मानला आहे ( गी. र. ८९ ).

कर्माकर्म ठरविण्याचा आणखी एक पक्ष आधिदैवतवाद्यांचा म्हणून आहे. यांच्या मतें कारुण्य, दया, परोपकार इत्यादि उदात्त मनोवृत्ति स्वाभाविक असून त्या एकदम स्वयंस्फूर्तीनें मनुष्यास जें कर्म करण्यास सांगतात तें सत्कृत्य होय. या उच्च मनोवृत्ति ह्या एक प्रकारच्या देवताच असल्यामुळें त्यांना एकादें कर्म बरें अगर वाईट असें विचारलें तर त्या जो निकाल देतील तोच कार्याकार्याचा निर्णय होय. या श्रेष्ठ वृत्तींनाच सदसद्विवेकबुद्धि म्हणतात. ' सतां हि संदेहपदेषु वस्तुषु प्रमाणमन्तःकरणप्रवृत्तयः ' असें जें कालिदासानें म्हटलें आहे त्यांतील तत्त्व म्हणजे आधिदैवतपक्षाचाच सिद्धान्त होय. ' अपत्रपेन वा येन न तत्कुर्या-त्कथंचन ' ( म. भा. शां. १२४, ६६ ) म्हणजे जें कृत्य केलें असतां मनास लाज वाटते, अगर सदसद्विवेकबुद्धीला मान्य आहे म्हणून जें कर्म उजळ माथ्यानें करितां येत नाहीं, तें अकार्य होय असें या पंथांतील लोकांचें मत आहे. मार्टिनोसारखे तत्ववेत्ते या विचाराचे आहेत. या तत्ववेत्त्यांच्या विचारसरणीनें कर्त्याच्या बुद्धीचा विचार होतो ही गोष्ट खरी असली तरी या मार्गांत एक अशी अडचण आहे कीं, सदसद्विवेकबुद्धि सर्वांची सारखी नसल्यानें सुशिक्षित लोकांतहि भिन्न संस्कृतींमुळें भिन्न प्रकारच्या मनोवृत्ति आढळून येतात. गोवध

केल्यामुळें अत्यंत सुशिक्षित व धर्माचरणी मुसलमानाच्या सदसद्विवेकबुद्धीस लाज वाटणार नाहीं; पण हिंदूची मनःस्थिति निराळी होईल. तेव्हां सदसद्विवेकबुद्धि हें एकच प्रमाण कार्याकार्य ठरविण्यास अपुरें असल्यानें आधिदैवतपक्ष सुद्धां पूर्ण निर्दोष नाहीं असें लोकमान्यांचें मत आहे.

याप्रमाणें सर्व आधिभौतिक शास्त्रज्ञांचे मार्ग आणि आधिदैवतपक्ष यांचें विवेचन करून कार्याकार्यव्यवस्थिति यापैकीं कोणत्याहि मार्गानें सामाधानकारकपणें होत नाहीं असें लोकमान्यांनीं दाखविलें आहे. विषयोपभोगसुख हें कधींहि पुरें न होणारें, अनित्य आणि पशुधर्म असून बुद्धिवान् मनुष्याचें ध्येय यापेक्षां श्रेष्ठ पाहिजे. आत्मबुद्धिप्रसादापासून होणारें सुख तेंच श्रेष्ठ सुख होय; तथापि त्यास ऐहिक गोष्टींची जोड लागते. याकरितां त्यांचाहि विचार करणें जरूर आहे. परंतु, केवळ आधिभौतिक मार्गानें कर्माकर्माची उपपत्ति लागणें शक्य नाहीं हें स्पष्ट आहे. आधिदैवत पक्षामध्यें अडचण येते ती बुद्धीच्या अशुद्धतेमुळें होय. मनुष्यांच्या बुद्धीमध्यें नेहमीं कमी अधिक मानानें वासनातरंग उद्भवतात. सर्वांची बुद्धि सारखीच शुद्ध नसते. तेव्हां ' व्यवसायात्मक बुद्धि शुद्ध होण्यास पातंजल योगांतील समाधीनें, भक्तीनें, ज्ञानानें किंवा ध्यानानें परमेश्वरस्वरूप ओळखून सर्व मनुष्यांत एकच आत्मा आहे हें तत्व बुद्धींत ठसून गेलें पाहिजे. हिलाच आत्मनिष्ठ बुद्धि म्हणतात. या याप्रमाणें बुद्धि शुद्ध व स्थिर होऊन आत्मौपम्य दृष्टीनें तिला साम्यत्व प्राप्त झालें म्हणजे सात्विक कर्माकडे तिची साहजिक प्रवृत्ति होते. ' अध्यात्म दृष्ट्या हेंच सर्व सदाचाराचें मूळ म्हणजे कर्मयोगशास्त्राचें रहस्य आहे ' ( गी. र. १३९ ). आत्मौपम्य बुद्धि होऊन ' सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि ' अशी दृढ भावना झाली म्हणजे पुष्कळ लोकांचेंच काय.पण सर्व प्राणिमात्रांचें कल्याण व्हावें अशीं कर्में साहजिकपणेंच घडतात. तेव्हां " समाजांत एका मनुष्यानें दुसऱ्या मनुष्याशीं कसें वागावें याचा निर्णय करण्यास आत्मौपम्य बुद्धीचें हें सूत्र ' पुष्कळांचें पुष्कळ सुख ' या आधिभौतिक तत्वापेक्षां अधिक मुद्देसूद, निर्दोष, निःसंदिग्ध, व्यापक, स्वल्प व अगदीं अडाणी मनुष्याच्याहि लवकर लक्षांत भरण्यासारखें आहे हें कोणीहि कबूल करील " ( गी. र. ३८७ ). साम्यबुद्धि प्राप्त झालेल्या आत्मनिष्ठ ज्ञानी पुरुषांचें वर्तन हें सर्वांना आदर्शभूत होऊन राहतें. आधिदैविक पक्षांतील बुद्धीच्या कमी अधिक शुद्धतेमुळें सदसद्विवेक बुद्धीच्या साक्षींत येणारा अनिश्चितपणा व वेळीं प्रसंगीं होणारे प्रमाद अध्यात्मिक पक्षांत मुळींच संभवत नाहींत.

आधिभौतिक शास्त्रवेत्त्यांच्या सिद्धान्तांचें परीक्षण करून टिळकांनीं पाहिलें कीं, कर्माकर्म ठरविण्यास तें शास्त्र अपुरें आहे. ऐहिक विषयोपभोग हेंच कांहीं सुखसर्वस्व नव्हे असें त्यांनीं आपलें मत दिलें आहे. कार्याकार्याची व्यवस्थिति

एका अध्यात्मशास्त्रानेंच समाधानकारक रीतीनें लावितां येते असा त्यांचा सिद्धान्त आहे. या बाबतींत जरा खुलासेवार लिहिण्याचें कारण हें कीं, 'समाजांत एका मनुष्यानें दुसऱ्या मनुष्याशीं कसें वागावें' अशा व्यावहारिक गोष्टीकडे सुद्धां लोकमान्य जेव्हां आधिभौतिक दृष्टि सोडून आध्यात्मिक दृष्टीनेंच पाहतात तेव्हां व्यवहारांत देखील त्यांची धर्मबुद्धि कशी जागृत होती हें चांगलें दिसून येतें. कर्माकर्माचा विचार नुसत्या लौकिक दृष्टीनें न करितां धर्मबुद्धीनें केला पाहिजे असें त्यांचें निश्चित मत होतें. लौकिक दृष्टीपेक्षां धर्मबुद्धीचें प्राधान्य त्यांचे ठायीं कसें वास करीत होतें हें या गोष्टीवरून स्पष्टपणें प्रत्ययास येतें.

## ११ वेदान्त पङ्गूपणा आणतो काय ?

कर्माकर्माची व्यवस्थिति अध्यात्मिक दृष्ट्या करावयाची म्हणजे व्यवहाराचा वेदान्तदृष्ट्या विचार करावयास लागतो. परंतु, त्यायोगें समाजास पङ्गूपणा येईल अशी कोणास भीति वाटण्याचें कारण नाहीं. वेदान्तमार्ग म्हणजे सर्व व्यवहार सोडून देणें असें कोणास वाटत असेल तर तें चुकीचें होय असें लोकमान्यांचें मत होतें. "वेदान्ताचा परिणाम आचारावर होऊन तामस वृत्तीचा क्षय व सात्विक वृत्तीचा उदय होण्याकडे त्याचा उपयोग झाला तरच वेदान्ताचें खरें सार्थक होतें" (आ. व. ४४१). असें एका व्याख्यानांत त्यांनीं सांगितलें होतें. तत्त्वज्ञानानें व्यवहार सुटत नसून उलट त्यास तत्त्वज्ञान्यांच्या संपर्कानें जास्त उदात्त स्वरूप प्राप्त होतें असें त्यांनीं स्पेन्सर साहेबांवरील मृत्युलेखांत लिहिलें आहे. (आ. व. २७९). तत्त्वज्ञानाच्या विषयांतील प्रकृतीच्या अप्रतिहत व्यापारास कोणी भेदरून जाण्याचें कारण नाहीं; कारण 'प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति' हें जरी एका दृष्टीनें खरें असलें तरी आत्मा हा स्वतंत्र असून प्रकृतीस वांकविण्याची त्यास शक्ति आहे. 'उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत्' असा वेदान्ताचा सिद्धान्त असून वेदान्त हा पूर्ण प्रयत्नवादी आहे. 'न ऋते श्रान्तस्य सख्याय देवाः' (ऋ. ४, ३३, ११.) म्हणजे थकेपर्यंत प्रयत्न करणाऱ्या मनुष्याखेरीज देव कोणास मदत करीत नाहीं असेंच वैदिक धर्म प्रथमपासून सांगत आला आहे. सांख्य, योग, वेदान्त इत्यादि तत्त्वज्ञानाचें संपूर्ण विवेचन करणारें महाभारत प्रवृत्तिपर असून पूर्ण प्रयत्नवादीच आहे. 'यत्न तो देव जाणावा। अंतरीं धरितां बरें॥' असें श्रीसमर्थांसारखे वेदान्तीच सांगत आहेत. तेव्हां वेदान्तानें आळस फैलाविला असें म्हणण्यापेक्षां वेदान्त समजून घेण्यास आम्हीच आळस केला हेंच खरें आहे. 'कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेच्छतं समाः।' ई. २. असें सांगणारें ईशावास्योपनिषद्, अगर 'कर्म ज्यायोऽह्यकर्मणः' असें सर्वांना कंठरवानें सांगणारी, आणि 'कुर्याद्विद्वांस्तथा-

सक्तश्चिकीर्षुर्लोकसंग्रहम्।' याप्रमाणें ज्ञान्यासहि लोकसंग्रहार्थ कर्म करण्याची शिफारस करणारी श्रीमद्भगवद्गीता हे ग्रन्थ आळस प्रवर्तन करणारे नसून तो घालवून यत्न करण्यास उद्युक्त करणारे आहेत. लोकमान्यांनीं गीतारहस्यांत केलेलें वेदान्ताचें विवेचन येथें सांगत बसण्याचें आपणास प्रयोजन नाहीं; पण त्यांनीं गीता कर्मसंन्यासपर नसून कर्मयोगपर आहे असें साधार विवेचन करितांना वेदान्त हा पङ्गूपणाचा मार्ग नसून प्रयत्नवाद्यांचाच पंथ आहे हें उत्तमप्रकारें दाखविलें आहे, तें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

आत्मज्ञानानें आपलें पारमार्थिक कल्याण साधून घेणें हें जरी मनुष्याचें मुख्य ध्येय असलें, तरी समाजधारणेला आणि त्याचे सर्व व्यवहार सुव्यवस्थेनें चालण्यास ऐहिक गोष्टींकडे दुर्लक्ष करून चालावयाचें नाहीं. मन्वादि धर्मशास्त्रकारांनीं समाजधारणेबद्दल निर्बंध घालून त्याची सुस्थिति व्हावी म्हणून जी काळजी वाहिली ती व्यवहार सोडण्याकरितां नसून तो योग्य प्रकारें शेवटास नेण्याकरितांच होय. 'आमृत्योः श्रियमन्विच्छेन्नैनां मन्येत दुर्लभाम्।' म्हणजे आमरणान्त सर्व प्रकारचें ऐश्वर्य प्राप्त करून घेण्याची महत्त्वाकांक्षा बाळगावी, व तें असाध्य आहे असें समजूं नये असें प्रतिपादन करणारा मनु, अगर 'न पूर्णोऽस्मीति मन्येत धर्मतः कामतोऽर्थतः।' (म. शां. ९२, १२.) याप्रमाणें धर्मार्थकामाबद्दल अल्पसंतोषी न होतां तें अधिकाधिक मिळविण्याचा सदैव प्रयत्न करावा व कितीहि प्राप्त झालें तरी पूर्णत्वानें प्राप्त झालें असें मानूंच नये, असें सांगणारे वेदवेत्ते व्यास हे कांहीं आळस प्रवर्तन करणारे नव्हते. लोकमान्य म्हणतात, "आत्मज्ञान हेंच काय तें या जगांतील साध्य आहे, हा सिद्धान्त, संसार दुःखमय म्हणून तो अजिबात सोडून द्यावा असें म्हणणाऱ्या संन्यासमार्गाचा आहे, कर्मयोगाचा नव्हे; आणि भिन्न भिन्न मार्गांतील हे सिद्धान्त एकत्र करून गीतेच्या अर्थाचा विपर्यास करणें योग्य नाहीं" (गी. र. ११९). वेदान्तांतील अद्वैतमत मान्य असलें तरी कर्मसंन्यास त्यांना मान्य नव्हता. 'तयोस्तु कर्मसंन्यासात्कर्मयोगो विशिष्यते।' या वचनाप्रमाणें कर्मयोगाची मातब्बरी लोकसंग्रहाच्या दृष्टीनें अर्थात् अधिक आहे. कर्म सोडूं म्हटलें तरी कोणास सुटत नाहीं, तर निष्काम बुद्धीनें तें लोकसंग्रहार्थ कां करूं नये? धर्मार्थकाममोक्ष हे सर्व पुरुषार्थ साधण्याची महत्त्वाकांक्षा सर्वांनीं बाळगिली पाहिजे. "नुसत्या ऐश्वर्यापेक्षां नुसतें आत्मज्ञान जरी अधिक योग्यतेचें असलें तरी या जगांत ज्यास रहावयाचें आहे त्यास लोकांप्रमाणेंच ऐहिक समृद्धीहि आपणास किंवा आपल्या देशास प्राप्त करून घेण्याची आवश्यकता व नैतिक हक्कहि असल्यामुळें मनुष्याचें या जगांत परम साध्य काय या प्रश्नास शांति व पुष्टि, प्रेम व श्रेय, किंवा ज्ञान व ऐश्वर्य या दोहोंचा समुच्चय, हेंच आमच्या कर्मयोगाचें शेवटचें उत्तर आहे" (गी. र. ११८). गीतारहस्यांत त्यांनीं

विस्तृतपणें प्रतिपादलेल्या निष्काम कर्मयोगाचा निष्कर्षहि हाच होय. आपआपलें कर्तव्यकर्म निष्कामबुद्धीनें करून व भगवत्प्रसाद मिळवून आपलें ऐहिक व पारमार्थिक कल्याण साधणें हा खरा पुरुषार्थ होय. असें त्यांचें स्पष्ट मत होतें. व्यवहाराची उपेक्षा करणाऱ्या निवृत्तिमार्गापेक्षां प्रवृत्तिमार्ग त्यांना पसंत होता; आणि प्रवृत्तिमार्ग पसंत असला तरी व्यवहार परमार्थदृष्टीनेंच केला पाहिजे असें त्यांचें ठाम मत असल्यामुळें व्यवहारांत सुद्धां ते धर्मबुद्धीलाच कसें प्राधान्य देत होते हें चांगलें ध्यानांत येईल.

## १२ उपसंहार

येथपर्यंत केलेल्या विवेचनावरून लोकमान्यांचीं धार्मिक मतें वाचकांच्या ध्यानांत येतील. धर्माच्या विविध अंगांचा जो येथें विचार केला आहे त्यामध्यें त्यांच्या सर्व धार्मिक मतांचा समावेश केला आहे असें जरी म्हणतां येणार नाहीं तरी मुख्य मुख्य सर्व गोष्टींचा उल्लेख या लहानशा निबंधांत जितका करितां येणें शक्य होतें तितका केला आहे. त्यावरून त्यांचीं धार्मिक मतें कळून येतील व त्यांचें अंतःकरणांत धर्मबुद्धि किती उत्कटपणें वास करीत होती तेंहि निदर्शनास येईल. कॉलेजमध्यें शिकत असलेल्या दिवसापासून ते अखेरपर्यंत ‘ घरांतलें पहिलें स्थान देवाचें ’( टि. च. ४९ )ही त्यांची भावना कायम होती. कोणतीहि चळवळ केली अगर कसलेंहि कार्य अंगिकारलें तरी भगवंताचें अधिष्ठान त्यास पाहिजे असा त्यांचा दृढ निश्चय होता. ‘ अगोदर मन, मग शरीर ’ याप्रमाणें मानसिक उत्कर्षास आगरकरांनीं प्राधान्य दिलें असतां टिळकांनीं ‘ अगोदर धर्म ’ ( टि. च. ४३ ) आणि तो शरीराशिवाय बरोबर होत नाहीं म्हणून त्याचेकडेहि लक्ष दिलें पाहिजे असें सांगून धर्मालाच अग्रपूजेचा मान दिला. व्यक्तीची अगर राष्ट्राची राजकीय, सामाजिक अगर कसलीहि उन्नति धर्माशिवाय होणें शक्य नाहीं असा त्यांचा ठाम सिद्धान्त होता. “ धर्माचा नायनाट करून व सर्व समाज धर्मशून्य बनल्यामुळें राष्ट्रैक्य किंवा राष्ट्रोन्नति झाल्याचें जगांत एकहि उदाहरण नाहीं ’ ( आ. व. २४६ ) असें त्यांनीं १९०४ सालच्या पुण्यांतील गणेशोत्सवांत सांगितलें होतें. सर्व प्रकारचा अभ्युदय धर्मापासूनच होत असल्यामुळें व्यासांनीं महाभारताच्या उपसंहारांत सांगितल्याप्रमाणें ‘ धर्मादर्थश्च कामश्च स धर्मः किं न सेव्यते । ’ असें त्यांचें सांगणें होतें.

आपला धर्म म्हणजे वेडगळ समजुतींचा भारा नसून त्यांत संस्कार आणि आचार यांची अत्यंत उच्च तत्वें उत्कृष्टपणें प्रतिपादिलीं आहेत. मन्वादि धर्मशास्त्रकारांनीं घालून दिलेल्या या उदात्त आचारांबद्दल सर वुइल्यम जोन्ससारख्या पाश्चात्य पण्डितांनीं सुद्धां ‘ These rules breathe a spirit of sublime devotion, benevolence to mankind, and

amiable tenderness to all sentient creatures.' (Inst. Manu Pr. xxi) म्हणजे या आचारनिर्बंधांत उदात्त भक्ति, मानवजातीबद्दल उपकारबुद्धि आणि सर्व प्राणिमात्रांसंबधीं हृदयांत गोड प्रेमळपणा या भावना स्पष्टपणें दृग्गोचर होतात असें म्हणून धन्यतेचे उद्गार काढले आहेत. आमच्या ऋषींनीं ज्या आत्मौपम्यबुद्धीनें हे नियम घालून दिले आहेत त्या आत्मौपम्य बुद्धीचा सिद्धान्त व वेदान्तांतील इतर महत्त्वाचे सिद्धान्त हजारों वर्षांपूर्वीं त्या महाभागांनीं काढले आहेत. पाश्चात्य तत्ववेत्त्यांना यांतील कांहीं तत्वें अलीकडे कोठें दिसूं लागलीं आहेत. "आधिभौतिक शास्त्रांची हल्लीं-इतकी वाढ पूर्वीं झाली नसतांहि वेदान्तांतील सिद्धान्त ज्यानीं अन्तर्दृष्टीनें फार प्राचीन काळीं शोधून काढले, त्यांच्या अलौकिक बुद्धिवैभवाचें आश्चर्य वाटल्याखेरीज रहात नाहीं; आणि आश्चर्यच नव्हे, तर आपणास त्याचा योग्य अभिमानहि वाटला पाहिजे" (गी. र. १४६). हा अभिमान लोकमान्यांचे अंतःकरणांत किती उत्कटपणें वास करीत होता हें त्यांनीं वेळोंवेळीं दिलेल्या धर्मविषयक व्याख्यानांतून व लेखांतून स्पष्ट व्यक्त होतें. राजकीय चळवळ आपल्या आयुष्याचें कर्तव्य म्हणून ठरविल्यावर तत्प्रीत्यर्थ अश्रांत श्रम करतांना सुद्धां वेळांत वेळ काढून व तुरुंगाचें तत्वज्ञानमंदिर बनवून त्यानीं 'ओरायन,' 'आर्यांचें उत्तर ध्रुवाकडील वसतिस्थान' आणि 'गीतारहस्य' असे अप्रतिम ग्रन्थ लिहून आपला धर्म, आपलें तत्वज्ञान व आपली संस्कृति यांचा प्राचीनपणा, महत्त्व व श्रेष्ठत्व प्रस्थापित केलें. संकटांना लोळवून त्यांच्या छातीवर बसून शान्त चित्तानें विचार करण्याचें सामर्थ्य त्यांना धर्मभावनेमुळेंच प्राप्त झालें होतें.

**'धर्मो विश्वस्य जगतः प्रतिष्ठा'**

# निबंध तिसरा

## ( ले.—श्रीनिवास नारायण बनहट्टी एम्. ए. )

सोनें आणि परिमळें। इक्षुदंडा लागतीं फळें।
गौल्य माधुर्य रसाळें। तरी ते अपूर्वता॥
तैसा हरिदास आणि विरक्त। ज्ञाता आणि प्रेमळ भक्त।
वित्पन्न आणि वादरहित। तरी हेही अपूर्वता॥
रागज्ञानी तालज्ञानी। सकळकळा ब्रह्मज्ञानी।
निरभिमानें वर्ते जनीं। तरी हेही अपूर्वता॥
मछर नाहीं जयासी। जो अत्यंत प्रिये जनासी।
चतुरांग जाणे मानसीं। अंतरनिष्ठ॥

श्रीदासबोध.

श्रीकृष्णानें मथुरेस कंसाच्या रंगद्वारांत प्रवेश केला तेव्हां भिन्न भिन्न लोकांस तो कसा भिन्न प्रकारांनीं भासमान झाला याचें सुंदर वर्णन भागवतकारांनीं केलें आहे. मल्लांना वज्रासारखा, सामान्यजनांना नृपश्रेष्ठासारखा, स्त्रियांना मदनासारखा, गोपांना आपल्या आप्तासारखा, दुष्ट राजांना शासन करणाऱ्यासारखा, मातापितरादिक वृद्ध स्त्रीपुरुषांना जणूं काय पुत्रच असा, कंसाला प्रत्यक्ष मृत्यूच, वृष्णींना जणूं आपलें परमदैवतच अशा रीतीनें निरनिराळ्या परिस्थितींतल्या व निरनिराळ्या दृष्टीच्या लोकांना एकाच श्रीकृष्णाचें स्वरूप भिन्न भिन्न प्रकारांनीं कसें प्रतीत झालें हें त्यांनीं मोठ्या हृदयंगम रीतीनें वर्णन केलें आहे.* हा जसा श्रीकृष्णाच्या स्वरूपाचा प्रकार त्याप्रमाणेंच टिळकांच्या स्वरूपाचाहि प्रकार झालेला आहे. टिळकांचें चरित्र व त्यांनीं आजन्म केलेलीं महनीय कृत्यें इतकीं बहुविध स्वरूपाचीं आहेत कीं, एकाच जलबिंदूतून इंद्रधनुष्याचे सातहि रंग चमकावे त्याप्रमाणें निरनिराळ्या दृष्टीच्या लोकांना त्यांच्या चरित्रामध्यें अगदीं भिन्न भिन्न रंगांची छटा दिसून येते. त्यांचे भक्त व प्रतिपक्षी यांच्यामध्येंच केवळ हा रुचिवैचित्र्याचा प्रकार दिसून येतो असें नाहीं. टिळकांच्या कट्टया प्रतिपक्षीयांना टिळक म्हणजे हिंदुस्थान देशाच्या हितविघातार्थ अवतरलेला प्रत्यक्ष कलीच असे वाटत असतात, व त्याचप्रमाणें त्यांच्या भक्तांना ते केवळ स्वर्गलोकींचे देवदूत किंवा या देशाच्या परमकल्याणार्थ प्राप्त झालेले ईश्वरावतारच असे भासतात हें सुप्रसिद्ध आहे. पण यांत कांहीं

---

* श्रीमद्भागवत दशम पूर्वार्ध अ० ४३ श्लोक १७.

आश्चर्य नाहीं. कोणाहि व्यक्तीविषयीं तिचे शत्रु व मित्र यांचीं अशीं अत्यंत विरुद्ध मतें आढळावयाचींच; पण त्यांच्या केवळ चाहात्यांना सुद्धां, आणि त्यांच्या चहात्यांमध्येंच या राष्ट्रांतील असंख्य जनसमाजाचा समावेश होतो हें सांगावस पाहिजे असें नाहीं, त्यांच्या चरितांतील निरनिराळें अंग अत्यंत महत्त्वाचें वाटत असतें हा त्यांच्या चरित्राचा विशेष आहे. कोणी त्यांच्या अतुल विद्वत्तेस्तव त्यांना 'आचार्य' पदवीवर अधिष्ठित करतात; कोणी गीता-रहस्याचे प्रणेते व कर्मयोगाचे प्रतिपादक या नात्यानें भाष्यकारांपेक्षां सवाई अशी त्यांची योग्यता समजतात; कोणी राजकीय कर्तृत्वालाच अग्रस्थान देऊन देशाचा उद्धार करणारें राजकारण हेंच त्यांच्या चरित्राचें सारसर्वस्व समजतात; व कांहीं लोक त्यांना धर्मसंरक्षक व धर्माचे पाठीराखे म्हणूनच मान देतात. त्यांच्या कामगिरीला अनेक पैलू होते व तेजस्वी हिऱ्याप्रमाणें ते सर्वच सारखे चमकदार होते हें त्यांच्या चहात्यांच्या भिन्न भिन्न अभिप्रायांवरून दिसून येतें. श्रीकृष्णाचें स्वरूप ज्याच्या त्याच्या भावनेप्रमाणें प्रत्येक व्यक्तीस भिन्न वाटत असे, म्हणून त्याच्या विषयींचीं सर्वच मतें खोटीं, अगर एक कोणतें तरी खरें व बाकीचीं खोटीं, असें म्हणतां येत नाहीं; तर त्याचीं भासमान होणारीं भिन्न भिन्न स्वरूपें सर्वच खरीं व इतक्या सर्व अंगांचा त्याच्या कर्तृत्वशक्तींत समावेश झाला होता, हेंच म्हणणें खरें ठरतें. तो सज्जनांचा कैवारी होता, दुष्टांचा शास्ता होता, स्वकीयांचें दैवत होता, गोपीजनांचा प्रियकर होता, गीतेंतील उदात्त तत्त्वज्ञा-नाचा प्रणेताहि होता. टिळकांचेंहि तसेंच आहे. लोकोत्तर विद्वत्ता त्यांचे ठायीं वसत होती, गीतेवरील सन्मान्य टीकाकारांपैकीं ते एक खास होऊन गेले, राजकारणांतील पुढारी या नात्यानें सर्व भारतवर्षांत ते अद्वितीय होते व आस्तिक्ययुक्त धर्मभावना त्यांचे ठायीं असून धर्मसंरक्षण त्यांनीं उत्तम प्रकारचें केलें या सर्व गोष्टी सारख्याच खऱ्या आहेत. आपल्याला त्यांच्या कर्तृत्वापैकीं या शेवटच्या अंगाचाच विचार करावयाचा आहे, त्यांची धर्मभावना व धार्मिक मतें हीं कशा प्रकारचीं होतीं व त्यामुळें ते सध्यांच्या धर्माच्या पडत्या काळांत धर्मसंरक्षणाला व समाजधारणाला कसे मदत करूं शकले हें आपल्यास पहावयाचें आहे.

## एक मूलभूत गैरसमज

पण टिळकांच्या धर्मबुद्धीविषयीं विचार करूं लागण्यापूर्वी त्यांच्याविषयीं प्रचलित असलेल्या एका समजाचा, अगर गैरसमजाचा विचार करणें अग-त्याचें आहे. आपल्या सर्व विषयाच्या मुळाशीं जाणाऱ्या अशा प्रश्नासंबंधींच तो गैरसमज प्रचलित आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. टिळक हे जुन्या परंपरेचे व धर्माचे अभिमानी होते व आस्तिक्ययुक्त धर्मबुद्धि त्यांच्यामनांत सदैव जागृत

होती असा पुष्कळ लोकांचा समज आहे. आजन्म परंपरागत धर्माचा कैवार घेऊन सुधारकांशीं विजयपरिणामि असें वाग्युद्ध खेळणारे व प्रसंग पडतांच धर्मरक्षणाचें कंकण बांधून संमतिवयाच्या सारख्या प्रसंगीं सरकारशींहि सामना मांडून आपल्या समरचमत्कारांची पहिल्यानेंच थोडीशी चुणूक सरकारला दाखविणारे असे हे टिळक धर्माभिमान्यांपैकींच अग्रेसर होत असें सामान्य जनांस वाटत राहिल्यास त्यांत नवल नाहीं. परंतु कित्येकांचें, विशेषतः सुधारकाच्या गोटांतील लोकांचें म्हणणें असें पडतें कीं, टिळक हे वस्तुतः हाडाचे सुधारकच होत; त्यांनीं केवळ सवंग लोकप्रियता मिळविण्याकरितां धर्माभिमानाचें सोंग केलें होतें. लोकप्रियता मिळवून येन केन प्रकारेण लोकांचे पुढारी व्हावयाचें ही त्यांची महत्त्वाकांक्षा, व ती साध्य होण्याकरितां लोकांना आवडेल अशा मतांचा स्वीकार त्यांनीं केला आणि लोकाराधनाकरितां धर्माभिमानाची व सुधारणाविरोधाची बतावणी मात्र त्यांनीं केली. वस्तुतः धर्मश्रद्धा त्यांच्या अंगीं फारशी अगर मुळींच नव्हती; आणि मनांतून ते कट्टया सुधारकाइतकेच सुधारणावादी होते " इत्यादि.

अशा तऱ्हेच्या टिळकांविषयींच्या समजामुळेंच टिळकांना पूर्वीं सुधारक लोक " शिंगें मोडून वासरांत शिरणारे " अशी संज्ञा कुचेष्टेनें देत असत. इंग्रजींत म्हण आहे कीं, Scratch a Russian and you will find a Tartar within ( रशियन मनुष्याचें अंग थोडें खरवडून पहा म्हणजे आंत रानटी तार्तर तुम्हांला दिसेल ). तेव्हां " Scratch Tilak and you will find a reformer within " अशा तऱ्हेचे उद्गार टिळकांविषयींहि काढण्यांत येत असत. खुद्द सुधारकाग्रणी आगरकर यांनीं एका लेखांत * धर्माभिमानी लोकांना बजावलें होतें कीं, बाबांनो ! संभाळा ! तुम्ही टिळकांना आपलें पुढारी केलें आहे खरें, परंतु टिळक तुम्हांला केव्हां दगा देतील याचा नियम नाहीं. मग इसापनीतींतल्या गरुडपक्ष्यानें चोंचींतून सोडलेल्या कासवाप्रमाणें तुमची स्थिति होईल व दरींत पडून तुमच्या चिंधड्या उडून जातील. टिळक हे केवळ आपलें कार्य साधून घेण्याच्या उद्देशानें तुमच्यांत शिरले आहेत. ते खरोखर आम्हां सुधारकांचे भाईबंद. तूर्त त्यांना भाऊबंदकीची आवदसा आठवल्यामुळें ते आमचें वैर करतात हें खरें. पण केव्हांना केव्हां तरी ते आम्हांस येऊन मिळाल्याखेरीज राहणार नाहींत ! आतां टिळक हे आपल्याप्रमाणेंच जुन्या परंपरेच्या व धर्मश्रद्धेच्या मुळावर आलेले सुधारणावादी गृहस्थ आहेत व फक्त स्वतःच्या

---

* " हे तुमचे पुढारीच नव्हत " या आगरकरांच्या लेखांत टिळकांविषयीं वर दर्शविल्याप्रमाणें उद्गार काढले आहेत. वरील अवतरणांतील मजकूर त्यांच्या लेखांतील प्रत्यक्ष उतारा नाहीं.

फायद्याकरितां ते धर्माभिमान्यांच्या पक्षांत शिरले आहेत हा आगरकरांचा कयास कितपत बरोबर होता याचा आपण विचार करूंच, पण कोणत्या का कारणानें होईना धर्माभिमानाचा पक्ष स्वीकारून जनतेच्या अंतरंगांत शिरलेले टिळक तेथेंच जास्त रंगत गेले, उत्तरवयांत धर्माभिमान्यांची देखील धर्मश्रद्धा दृढ करणारा गीतारहस्यासारखा ग्रंथ त्यांनीं लिहिला, सश्रद्ध मनुष्याच्या धर्मकृत्यांनाच उपयोगी पडणारी अशी पंचांगशुद्धीची चळवळ हातीं घेतली व कीर्तनसंमेलनासारख्या धर्माभिमान्यांच्या मेळ्यांत अध्यक्षपद स्वीकारून त्यांना पटेल अशी कामगिरी करून दाखविली, व अशा रीतीनें टिळक हे पुनः सुधारक पक्षास येऊन मिळतील हें आगरकरांचें भाकीत त्यांनीं निखालस खोटें ठरविलें.

## आस्तिक्ययुक्त धर्माभिमान हाच जन्मसिद्ध स्वभाव

टिळक हे केवळ सोईकरितां व लोकप्रियता मिळविण्याकरितां धर्माभिमानी बनले असते तर त्यांच्या धर्माभिमानाचा पोकळपणा त्यांच्या आयुष्यांत केव्हांतरी नजरेस आल्याखेरीज राहिला नसता. केवळ बाह्यात्कारीं पांघरलेलें सिंहाचें कातडें किती वेळ लोकांस फसवूं शकेल ? सुधारणेचा पक्ष सोडून संमतिवयाचे वेळेपासून ते धर्माभिमानाच्या पक्षाला जे मिळाले ते केवळ स्वतःच्या सोईकरितां नव्हे. सुधारक म्हणतात त्याप्रमाणें त्यांत ढोंगीपणाचा लेशहि नव्हता. धर्माविषयीं आस्तिक्ययुक्त श्रद्धा हाच त्यांचा स्वभाव होता. सुधारणापक्षाची तरफदारी—ती देखील कांहीं नियमित मर्यादेपर्यंत—ही त्यांची क्षणिक विकृति होती. जन्मतःच त्यांचा पिंड धर्माभिमान्याचा बनलेला होता. त्यांचे वडील जुन्या पद्धतीचे घरंदाज धर्मशील गृहस्थ होते. अर्थात् लहानपणीं टिळकांना जुन्या वळणाचें गृहशिक्षण मिळालें असल्यामुळें आपल्या जुन्या चालीरीतींतील कांहीं दोषांप्रमाणेंच त्यांतील अनेकविध गुणांचाहि त्यांना समक्ष अनुभव आलेला होता. लहानपणीं अशा तऱ्हेचें गृहशिक्षण न मिळाल्याकारणानें बेफाम बहकलेल्या सुधारकांप्रमाणें त्यांची स्थिति होणें शक्यच नव्हतें. डेक्कन एज्युकेशन सोसायटी काढणाऱ्या सुधारक मंडळीमध्येंच त्यांचीं आरंभींचीं कांहीं वर्षें गेलीं, त्यामुळें इतरांबरोबर त्यांचीहि सुधारकपक्षांत गणना होत असे. सोसायटींत त्यावेळींहि थंडे सुधारक व गरम सुधारक असे भेद होतेच. म्हणूनच १८८६–८७ सालीं सुधारणेसाठीं सरकारकडून कायदा मागावा कीं नाहीं हा प्रश्न जेव्हां उपस्थित झाला तेव्हां सोसायटीच्या सभासदांत मतभेद होऊन कायदा मागूं नये अशांचें बहुमत झालें. पुढच्या संमतिवयावरील रणसंग्रामाचीं हीं पूर्वचिन्हेंच होतीं असें म्हणावयास हरकत नाहीं. टिळक यावेळीं अर्थातच कायदा मागूं नये या पक्षाचे होते. परंतु संमति–बिलाच्या वेळेपर्यंत (स.१८९०) त्यांच्या धर्मबुद्धीची खरी पारख होण्याची निकराची वेळ आली नव्हती.

म्हणूनच त्या वेळेपर्यंत मूकसंमतिन्यायानें त्यांच्या सहव्यवसायी लोकांबरोबर त्यांची सुधारणा पक्षांत गणना होत होती. परंतु लोकांच्या धर्मश्रद्धेला धक्का बसणार असें दिसून येतांच त्यांच्या धर्मबुद्धीनें उचल खाल्ली. संमतिवयाचा कायदा ज्या वेळेस सरकारतर्फे पुढें आला त्याच वेळेस टिळकांनीं त्याचें स्वरूप ताडलें. तो कायदा, कांहीं थोड्या व्यक्तींच्या बाबतींत तरी, आपल्या समाजांत धार्मिक म्हणून मानलेला जो अभिगमनविधि त्याच्या आड येणार हें चटकन् त्यांच्या लक्षांत आलें. अशा रीतीनें सरकार धर्मांत ढवळाढवळ करणार ही कल्पना त्यांच्या स्वाभिमानी धार्मिक बुद्धीस सहन झाली नाहीं. ते स्वतः मोठे कर्मठ गृहस्थ होते असें नाहीं. आपल्या समाजाच्या चालीरीतींमध्यें योग्य ती सुधारणा त्यांनाहि हवी होती. विवाहाच्या वयाची मर्यादा व अभिगमन-विधीची मर्यादा पुष्कळशी पुढें जाईल तर त्यांना पाहिजे होती, व त्याप्रमाणें शर्त करून स्वतःस बांधून घेण्यासहि ते तयार होते. संमतिकायद्याच्या निषेधार्थ जी तुळशीबागेंत सभा भरली होती त्या सभेस टिळकांनीं आपली म्हणून जी प्रतिसूचना पाठविली होती त्यांत १६ वर्षांच्या आंत मुलीचा विवाह करूं नये अशी अट नमूद होती. परंतु मोठ्या मी मी म्हणविणाऱ्या सुधारकांनीं या नाहीं त्या सबबीवर टिळकांनीं पाठविलेल्या अटींवर सही करून त्याप्रमाणें वागण्याचें नाकारलें ! टिळकांच्या अटींमध्यें 'दारू पिणें बंद असावें' अशीहि एक अट होती. पण त्यावर एका सुधारकांनीं 'दारू पिणें आपणास सोडवणार नाहीं सबब आपण सही करीत नाहीं' अशा अर्थाचें लाजिरवाणें उत्तर दिल्याचेंहि त्यावेळच्या केसरींत नमूद आहे.* आश्वलायन गृह्यसूत्राप्रमाणें गर्भाधान हा विधि ऐच्छिक आहे तेव्हां तो केलाच पाहिजे असें नाहीं असेंहि टिळकांनीं पूर्वी प्रतिपादन केलें होतें. तात्पर्य, सुधारणा काय करावयाची ती आमच्या धर्मास अनुसरून आम्ही करूं; परकी व विधर्मी सरकारनें त्यांत हात घालावयाची जरूरी नाहीं, व तसा हात घालण्याचा सरकारनें प्रयत्न केल्यास लोकांनीं चळवळ करून तो हाणून पाडला पाहिजे हाच त्यांचा संमतिवयाच्या चळवळींतील मुख्य मुद्दा होता. व याच मुद्याचा पुरस्कार त्यांनीं वारंवार जोरदार रीतीनें केला आहे. त्यांना समाजसुधारणा हवी होती परंतु ती धर्माला अनुसरून हवी होती. गर्भाधानविधीसंबंधानें मिताक्षरादि ग्रंथांचा आधार पाहण्याची त्यांना आवश्यकता वाटली. त्याचप्रमाणें भांडारकरांनीं केलेला आश्वलायनगृह्यपरिशिष्टाचा चुकीचा अर्थ खोडून काढण्याची जरूरी त्यांना वाटली, यावरून धर्मग्रंथांविषयींचा त्यांचा आदरच प्रतीत होतो. धर्माविरुद्धो लोके-

---

* केसरी ता. २८ आक्टोबर सन १८९० (अग्रलेख).

९९९६ ... शाखा (स्थळ प्रत) ... ग्रंथालय, ठाणे ... ७५०२९ ... २७५५ ... ९८।११।७



स्मिन्कामोऽस्मि। (' धर्माला विरोध न करणारी वासना मत्स्वरूपच होय ') या भगवदुक्तींत ज्याप्रमाणें काम अथवा विषयेच्छा धर्माला विरोध करणारी नसावी असें सांगितलें आहे. त्याप्रमाणें सुधारणा देखील धर्माला विरुद्ध नसावी असें त्यांचें तत्त्व होतें. या बाबतींत केसरीच्या ( ता. २५ नोव्हेंबर १८९० ) अग्रलेखांतील पुढील उतारा अतिशय स्पष्ट व निःसंदिग्ध आहे. " परंतु कायदा ज्या गोष्टीकरितां आमचे लोक नापसंत करतात त्याचें कारण निराळें असून फार महत्त्वाचें आहे. तें हें कीं, अभिगमनविधीच्या ज्या मर्यादा हिंदु रूढीमध्यें ठरविलेल्या आहेत त्या धर्माचारांत गुंफलेल्या आहेत व त्यांची धर्मबाह्य दृष्टीनें भवति न भवति करणें हा आमच्या धर्मसमजुतीस जबर धक्का आहे व सरकारनें धर्माच्या कामांत हात घालणें हा अन्याय आहे. याकरितां सुधारक लोक आमच्या मर्जीविरुद्ध हा अन्याय आम्हांवर लादण्याचा घाट घालीत आहेत, हें समाजास अत्यंत अनिष्ट आहे. हिंदु समाजांत सुधारणेचे जे विषय आहेत त्या सर्वांचा धर्माशीं संबंध असल्यामुळें ते परकीय सरकारच्या अमलाच्या बाहेर आहेत, वास्तव त्यांचा विचार विचारी व लोकस्थितीस पूर्ण जाणणारे व धर्मसमजुती संभाळणारे हिंदु लोकांनींच केला पाहिजे. त्याबद्दल इंग्रज सरकाराकडे दाद मागणें हें हिंदु समाजाच्या स्वतंत्रतेस अगदीं इष्ट नाहीं.... आपणास इष्ट अशा ज्या सुधारणा आहेत त्या अमलांत आणण्यास आपल्या धर्मामध्यें योग्य तजविजी दाखविलेल्या आहेत. नास्तिक बुद्धीनें, अनाचार बुद्धीनें सुधारणा करण्याची बिलकूल जरूर नाहीं. " हा लेख पिढीजाद व घरंदाज मित्राकडून आलेला म्हणून दिलेला आहे; अर्थात् तो टिळकांचा नाहीं, परंतु त्याचा आदरानें उल्लेख करून त्याला पहिल्या अग्रलेखाची जागा दिली आहे. यावरून टिळकांना त्यांतील मतें पसंत होतीं याविषयीं शंका रहात नाहीं. याच्याच पुढल्या ( ता. २ डिसेंबर १८९० ) अंकांतील अग्रलेखांत, " त्याप्रमाणें आपणहि हिंदुसमाजाच्या चालीरीतींच्या किल्ल्यावर सुधारलेल्या परंतु विधर्मी लोकांचें मोठे कडाक्याचे हल्ले होत असतांहि आपल्या किल्ल्याच्या महादरवाजाचे कुसवासहि धक्का लावूं देत नाहीं हें आपल्या स्वदेशाभिमानास व स्वधर्माभिमानासाहि मोठें भूषण होय. " याप्रमाणें मजकूर आहे, व हाच त्यांचा धर्मावरील हल्ल्याचा आक्षेप संमतिवयाच्या वादविवादांत एकसारखा त्यांनीं पुढें मांडला आहे.

## हिंदुधर्मच सर्व धर्मांत श्रेष्ठ

जन्मतः प्राप्त झालेला धर्म म्हणून तर त्यांना हिंदुधर्माचा अभिमान होताच, पण शिवाय निरनिराळ्या धर्मांतील तत्त्वांचा तुलनात्मक विचार करून हिंदुधर्मच सर्वांमध्यें उदात्त व श्रेष्ठ असें त्यांनीं विचाराअंतीं ठरविलें होतें. आपल्या

धर्माचें श्रेष्ठत्व प्रतिपादण्याचा एवढासा देखील आलेला प्रसंग त्यांनीं वाया जाऊं दिला नाहीं. गीतारहस्यांत देखील हें श्रेष्ठत्व सुरेख रीतीनें प्रतिपादन केलें आहेच. पण एवढासा गणपत्युत्सवांतील व्याख्यानाचा प्रसंग! तो देखील त्यांनीं रिकामा जाऊं दिला नाहीं. शके १८२२ सालच्या गणपत्युत्सवांत 'हिंदुधर्माचें लक्षण' या विषयावर त्यांनीं व्याख्यान दिलें. तें जणूं काय हिंदुधर्माचें श्रेष्ठत्व या विषयावरचेंच मुद्देसूद व्याख्यान आहे कीं काय असा भास होतो. त्यांत प्रारंभींच ते म्हणतात, "माझा कोणत्याहि धर्माची निंदा करण्याचा उद्देश नाहीं. पण हल्लींची वेळच अशी आहे कीं, निरनिराळ्या धर्मांहून आपल्या धर्मामध्यें विशेष काय आहे हें पाहून त्याच्या रक्षणार्थ आपण प्रयत्न केला नाहीं तर आपल्या धर्मास त्यापासून कमीपणा येण्याचा संभव आहे......आमचा धर्म जुना असून त्यांत सांगितलेल्या मुख्य गोष्टी दुसऱ्या कोणत्याहि धर्मांतील गोष्टींपेक्षां अधिक सयुक्तिक आहेत अशी माझी खात्री आहे." * याच दृष्टीनें इ. स. १९१७ सालीं झालेल्या कीर्तनसंमेलनांत, अध्यक्ष या नात्यानें समारोप करतांना, हरिदासांना केवळ आपल्या धर्माचेंच ज्ञान पुरेसें नाहीं; तर आपल्या धर्माचें श्रेष्ठत्व कसें व कोठें आहे हें दाखविण्यापुरतें इतर धर्मांचेंहि ज्ञान त्यांना पाहिजे असें त्यांनीं प्रतिपादन केलें होतें. (पहा, चित्रमयजगत् जानेवारी १९१८.)

इतकें असूनहि, टिळकांनीं सवंग लोकप्रियता मिळविण्याकरितां धर्माभिमानाचें सोंग घेतलें होतें, अंतःकरणांतून ते धार्मिक बुद्धीचे नव्हते, असा प्रहार करण्यास कित्येक लोक चुकत नाहींत. ज्या गृहस्थाला धर्माभिमानाचें सोंग करून लोकांची वंचना करावयाची आहे तोच गृहस्थ मला धर्मास अनुसरून सुधारणा पाहिजे आहे, मी सुधारणावादीच आहे असें कंठशोष करून सांगत बसेल काय? तो सर्वत्र आपलें धर्माभिमानाचें सोंग कायम रहावें म्हणून धार्मिकपणाचीच बतावणी करीत राहील व सुधारणेविषयीं कधींहि अनुकूल उद्गार काढणार नाहीं. टिळकांनीं आपल्या मतांचा अशा रीतीनें अपलाप कधींहि केला नाहीं. सुधारकांकरितां आपली धर्मबुद्धि त्यांनीं छपवून ठेवली नाहीं किंवा दुर्धारकांकरितां आपलीं सुधारणेचीं तत्त्वेंहि त्यांनीं सोडलीं अगर लपविलीं नाहींत. आपल्या धर्माचा कैवार घेण्याचें त्यांनीं कधींहि सोडलें नाहीं. त्याचप्रमाणें कट्टया पुराणमताभिमानी लोकांच्या नादीं लागून खऱ्या सुधारणेचा पुरस्कार करण्याचेंहि त्यांनीं कधीं वर्ज केलें नाहीं.

---

* (व्याख्यानाचा केसरींतील सारांश—केसरी, ता. १८ सपटेंबर १९००.)

## वैयक्तिक आचरण : नित्य धर्माचारांकडे दुर्लक्ष

धर्मबुद्धि व धर्माभिमान हीं टिळकांच्या मनामध्यें प्रथमपासून शेवटपर्यंत कशीं भिनलेलीं होतीं याचें विवेचन आतांपर्यंत केलें, तथापि त्यांची धर्मनिष्ठा आपण सामान्यतः ज्याला धार्मिकपणा म्हणतों त्या स्वरूपाची नव्हती, व यामुळेंच त्यांच्या रोमरोमीं भिनलेल्या धर्मनिष्ठेविषयीं कचित् कोठें गैरसमज उत्पन्न होण्यास कारण होतें. अहिंसा, सत्य, अस्तेय, इंद्रियनिग्रह वगैरे गुण म्हणजेच धार्मिकपणाची कसोटी मानली तर धार्मिकपणा त्यांच्या अंगीं भरपूर होता. पण धर्मग्रंथांतून सांगितलेल्या व परंपरेनें चालत आलेल्या आचारांचें निष्ठेनें व श्रद्धेनें पालन करणें म्हणजे धार्मिकपणा अशी प्रचलित असलेली समजूत गृहीत धरून जर त्यांच्या आचरणाकडे पाहिलें तर त्यांत धर्मशील म्हणून नांवाजण्यासारखें कांहीं नव्हतें हें सर्वश्रुत आहे. श्रौताचाराविषयीं तर बोलावयासच नको; तो सध्यां अजिबातच प्रचारांतून गेला आहे. बाकी गृह्याचारांकडे पाहिलें तर विवाह, उपनयन वगैरे मोठमोठे संस्कार अर्थातच त्यांनीं टाकले नव्हते. परंतु रोजचें संध्यावंदन, पूजा, ब्रह्मयज्ञ वगैरे धर्माचार ते मुळींच पाळीत नसत. त्याचप्रमाणें श्राद्धपक्ष, हव्यकव्य, व्रतवैकल्य वगैरे नैमित्तिक कृत्यें ते विशेष अगत्यानें करीत असत असें दिसत नाहीं. सोवळेंओवळें, पंक्तिनिर्बंध, इत्यादि बाबतींतहि त्यांचा विशेष कडकपणा होता असेंहि म्हणतां येत नाहीं. घरांत ते सोवळें नेसून जेवावयास बसत असत असें त्यांच्या चरित्रांत लिहिलें आहे. परंतु जेवतांना नेसावयाचें सोवळें म्हणजे सोवळ्याचा कांहीं विशेष कडक प्रकार नव्हे; तें जेवतांना करावयाचें एक तऱ्हेचें वस्त्रांतर होय. तात्पर्य, शेंडी, जानवें वगैरे बाह्य वेषाखेरीज व कचित् कांहीं प्रायश्चित्तार्ह प्रसंगानिमित्त घेतलेल्या प्रायश्चितांखेरीज (परदेशगमन इ. इ.) धर्माचाराचा कोणताहि भाग टिळकांच्या वर्तनांत दिसून येत नसे असें म्हणण्यास हरकत नाहीं. धार्मिकपणाचें सर्वसामान्य लक्षण म्हणून मानलेला जो श्रौतस्मार्त आचार त्या विषयींची ही स्थिति झाली. याखेरीज योगमार्ग किंवा भक्तिमार्ग वगैरेसारखे जे सिद्धि प्राप्त करून घेण्याचे सर्वसंमत मार्ग आमच्या धर्मांत प्रचलित आहेत त्यांकडे टिळकांचें कितपत लक्ष होतें हें पाहिलें असतां तिकडूनहि कांहीं अस्तिपक्षीं उत्तर मिळत नाहीं. टिळक हे योगाभ्यास करीत असत किंवा भजन, कीर्तन, नामस्मरण वगैरे प्रकारांनीं भक्तीचा दिव्य मार्ग चोखाळीत असत असें म्हणण्यास कांहीं आधार नाहीं. भक्तियोगाचें अत्यंत उत्कृष्ट वर्णन गीतारहस्यांत आहे खरें; परंतु तें केवळ प्रज्ञावान् पुरुषानें भक्तांच्या स्थितीची आपल्या कल्पनेनें व विचारशक्तीनें ओळख करून घेऊन ग्रंथावरून लिहिलेलें दिसतें. तो भक्तियोग त्यांच्या आचरणांत येत होता असें दिसत नाहीं. आणि खरोखर पाहिलें असतां त्यांचा सर्व धार्मिकपणा प्रज्ञावान् पुरुषाचा धार्मिकपणा

होता; आचारशील अगर कर्मठ पुरुषाचा धार्मिकपणा तो नव्हता. टिळक हे कर्मयोगी होते असें नेहमीं म्हणण्यांत येतें व एका अर्थानें त्यांनीं आजन्म कर्मयोग आचरिला यांत शंका नाहीं. परंतु वर्णाश्रमधर्मविहित कर्तव्यें उत्कृष्ट रीतीनें करून होणारा कर्मयोग तो नव्हे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. मीमांसकांचा केवळ कर्मकांडवाद तर त्यांना पसंत नव्हताच, म्हणजे श्रौतस्मार्त कर्मानुष्ठानापासूनच मोक्ष मिळतो हें मत त्यांना मान्य नव्हतें. तथापि वेदान्त मताप्रमाणें चित्तशुद्धीकरितां वर्णाश्रमधर्मविहित कर्मे हीं इष्ट आहेत व तीं केलींच पाहिजेत असें त्यांचें तत्त्व होतें. आतां त्यांचें स्वतःचें चित्त शुद्ध होऊन त्यांतील वासनांचा क्षय झाला होता म्हणून त्यांस विध्युक्त कर्में अवश्य वाटत नव्हतीं असें म्हणावें पाहिजे तर; परंतु देशसेवेचें अखंड व्रत स्वीकारल्यामुळें धर्मकृत्यें स्वस्थपणें सांगोपांग करण्यास त्यांस मुळींच अवसर मिळत नव्हता, हेंच त्यांनीं धर्माचार न पाळण्याचें खरें कारण होय असें मला वाटतें. त्यांची धर्मबुद्धीहि सामान्यतः सुप्त स्थितींत असे किंवा देशसेवाबुद्धीच्या अंकित असे असें म्हटल्यास चालेल. झंझावातानें अगाध सागरावर गगनचुंबी लाटा उसळविल्या असतां मत्स्यादिक जंतूंनीं त्यांत मांडलेली क्षुद्र चळवळ ज्याप्रमाणें लोपून जाते त्याप्रमाणें राजकारणी बुद्धीच्या खटाटोपापुढें त्यांची धर्मबुद्धि अकिंचित्कर बनून राहिली होती. किंवा त्यांची धर्मबुद्धीहि त्यांच्या एकंदर स्वभावास अनुसरून लढाऊ स्वरूपाची होती असें म्हटल्यास चालेल. कोठें परकीयांच्या हल्ल्याचा प्रसंग आला कीं मात्र ती जागृत होत असे; एरवीं सुप्तावस्थेंत असलेल्या नागिणीप्रमाणें ती स्तब्ध असे. त्यांचे परम मित्र प्रोफेसर जिनसीवाले हे मोठे कर्मठ व स्नानसंध्याशील होते. त्यांनीं एकदां टिळकांना आग्रहाचा निरोप पाठविला कीं, " आजपासून तुम्ही संध्यावंदन, पूजा, नैवेद्य, वैश्वदेव व त्रिसुपर्ण इतकें केल्याखेरीज अन्नग्रहण करावयाचें नाहीं असा नियम करून टाका. " यावर टिळकांनीं त्यांना उत्तरादाखल असा निरोप पाठविला कीं, "देशाच्या स्वातंत्र्याखेरीज मला रात्रंदिवस कांहींच सुचत नाहीं; तीच माझी संध्या व तेंच माझें अखंड व्रत आहे. " ( केसरी, ता. ३१ जुलै १९२३. सदाशिव विष्णु बापट यांच्या आठवणी). ही केसरींत नमूद झालेली आख्यायिका जर खरी असेल तर टिळकांच्या आचरणाचें रहस्य प्रगट करण्यांत तीं अगदीं बिनतोड ठरेल यांत संशय नाहीं.

## बाह्य संस्कार व विधि यांची धर्मास आवश्यकता

अशा रीतीनें देशोद्धारणव्यवसायामुळें त्यांचा धार्मिकपणा जरी आचाराच्या बाबतींत तिरोहित झाला होता तरी धर्माचरण हें त्यांना पसंत नव्हतें असें नाहीं. त्यांनीं चित्रमयजगताच्या जानेवारी १९१५ च्या अंकांत ' हिंदुधर्माचें

स्वरूपलक्षण ' म्हणून जो लेख लिहिला आहे त्यांत धार्मिक विधि, आचार व संस्कार यांचें सुंदर रीतीनें समर्थन करून त्यांची आवश्यकता प्रतिपादिली आहे. " धर्मानुयायित्व हा केवळ बुद्धिगम्य ज्ञानाचा परिणाम नसून त्याला बाह्य संस्काराची नेहमींच अपेक्षा असते. बाह्य संस्कारावांचून तत्तद्धर्मानुयायित्व पूर्ण होत नाहीं, असें यावरून दिसून येतें. हे आचार किंवा संस्कार आयुष्यांत अनेक वेळां करावे लागत असल्यामुळें दरएक वेळीं मी अमुक धर्मांतला आहे, असें तत्तद्धर्मीयांस कळून येतें, व प्रत्येकाच्या धर्मांतील ध्येय त्याच्या डोळ्या-पुढें येऊन धर्मावरील त्याची श्रद्धा दृढ होत जाते. स्वधर्मावरील श्रद्धा याप्रमाणें दृढ करणें आणि एका धर्मबंधनानें आपण सर्व बांधिलेले आहोंत हें त्या त्या धर्माच्या अनुयायास ज्ञान करून देऊन तत्तद्धर्मीयांची संघशक्ति वाढविणें हेच या आचारांचे मुख्य उपयोग होत.......ही गोष्ट येथें सांगण्याचें कारण असें कीं, धर्म म्हटला कीं, त्याच्यामागें कांहीं विशिष्ट संस्कारांची कल्पना मनुष्याच्या मनांत आपोआप येत असते. जन्म, लग्न, मरण वगैरे विशिष्ट प्रसंगीं, सणावाराच्या वेळीं, किंवा नित्य ज्याला कांहींच स्वधर्मोक्त कर्म विहित नाहीं अगर करावयाचें नाहीं, त्याची गणना, " शिव शिव न हिंदुर्न यवनः " या कोटींतच केली पाहिजे; दुसरा मार्ग नाहीं. " अण्णासाहेब पटवर्धनांसारखे तपस्वी, प्रो. जिनसीवाल्यांसारखे आचारशील कर्मठ ब्राह्मण व महामहोपाध्याय भिमाचार्य झळकीकरांसारखे अगदीं जुन्या पद्धतीचे शास्त्री, या सर्वांबद्दल टिळकांच्या मनांत अत्यंत आदर व प्रेमभाव वसत असे हें सुप्रसिद्ध आहे. सुधारकांपेक्षां धर्माचरणी लोक त्यांना जास्त आत्मीय असे वाटत व सामाजिक मतभेदाचें पुढें राजकीय मतभेदांत व सरते शेवटीं द्वेषांत रूपांतर झाल्यावर तर सुधारकांचें व त्यांचें दर्शन होणें ही क्वचित्च घडणारी गोष्ट होऊन बसली. आगरकरांच्यासारखें नास्तिकपणाच्या वळणावर गेलेलें बेफाम स्वरूप तर त्यांच्या मतांना प्राप्त झालें नव्हतेंच, पण आपल्या धार्मिक चालीरीतींची व धर्मग्रंथांची हेटाळणी करणाऱ्याचा त्यांना उलट संताप येत असे. संमतिवयाच्या वादाच्या वेळीं तेलंगांनीं असे उद्गार काढले कीं, " राजाज्ञेकरितां धर्माज्ञेला बाधच येत असेल तर त्याची निवृत्ति एकाद्या भटाच्या अंगावर चवली टाकून अगर दोन तीन मिनिटें नाक धरून करावी. " आपल्या धार्मिक चालीरीतींविषयींचे तेलं-गांचे हे तुच्छतेचे उद्गार ऐकून टिळकांस संताप आल्याखेरीज राहिला नाहीं. तेलंगांच्या अतिप्रसंगाचा त्यांनीं पुढील शब्दांत निषेध केला. " हिंदु रीति-रिवाजांबद्दल अशा रीतीनें उपहासास्पद लिहिण्याचें धाडस मिशनरी अगर नास्तिक लोकांखेरीज दुसऱ्या कोणाच्याच हातून होणार नाहीं असें वाटतें. इंग्रजी विद्येनें आमची धर्मश्रद्धा उडत चालली आहे असें मानलें तरी, आपल्या पुरातन रीतीभातींचा व त्यांचा ज्यांस अभिमान आहे त्यांचा आपण असा

तिरस्कार करावा हें आमच्या शहाणपणास व सभ्यपणास शोभत नाहीं." (केळकरकृत टिळकचरित्र पूर्वार्ध, पृ. २६०). तेव्हां स्वतः टिळक जरी धार्मिक आचार फारसे पाळीत नसत तरी त्यांबद्दलचा योग्य अभिमान त्यांचे ठिकाणीं सतत वसत होता हें निःसंशय आहे.

## निरनिराळ्या धर्मविषयक चळवळी

टिळकांची धर्मबुद्धि आचारप्रधान नव्हती व ती त्यांच्या देशसेवाबुद्धीच्या अंकित होती हें आपण पाहिलेंच आहे. तेव्हां एका दृष्टीनें पाहतां त्यांची धर्मबुद्धि व धर्माविषयींचा अभिमान हा एकाद्या स्नानसंध्याशील कर्मठ गृहस्थापेक्षां कमी ठरेल. "आचारः प्रथमो धर्मः" या न्यायानें जो धर्माज्ञेनुसार आचरण ठेवतो तो मनुष्य नुसत्या बोलण्यामध्यें धर्माविषयीं आदर दाखविणाऱ्या गृहस्थापेक्षां जास्त योग्यतेचा ठरेल यांत शंका नाहीं. तथापि टिळकांच्या कर्तबगारीकडे पाहिलें असतां त्यांच्या आचारहीनतेवर विशेष जोर देऊन त्याबद्दल त्यांच्यावर टपका ठेवावा असें कोणी म्हणणार नाहीं. खासगी आचरणामध्यें कित्ता घेण्याजोगे धर्मशील व कर्मठ लोक अनेक असतील. परंतु अशा शेंकडों लोकांच्या हातून होणार नाहीं असें धर्मसंरक्षणाचें काम एकट्या टिळकांनीं करून दाखविलें आहे. संमतिवयाचे वेळेस सरकारनें धर्मांत हात घालूं नये म्हणून त्यांनीं न भूतो न भविष्यति चळवळ केली. अखेर सरकारनें कायदा पास केला ही गोष्ट खरी. तथापि टिळकप्रभृति धर्माभिमान्यांच्या चळवळींचा कांहींच उपयोग झाला नाहीं असें म्हणणें चुकीचें होईल. धार्मिक बाबतींत ढवळाढवळ केल्यास लोकमत खवळेल हें या चळवळीमुळें सरकारास चांगलें कळून चुकलें व यानंतर केव्हांहि मलबारी शेटजींसारख्या उपटसुंभाच्या नादीं लागून सरकारनें हिंदु लोकांच्या धार्मिक व सामाजिक बाबतींत ढवळाढवळ करण्याचें मनांत आणलें नाहीं. गणपत्युत्सवामध्यें टिळकांनीं केलेली धार्मिक कामगिरी तर याहून अधिक स्पष्ट व महत्त्वाची आहे. आज तीस वर्षांच्या काळानंतर गणपत्युत्सवाचे फायदे अगर गैरफायदे निःपक्षपाती मनुष्याच्या दृष्टीस कांहींहि भासोत, परंतु या उत्सवाचा टिळकांनीं ज्या वेळेस पुरस्कार केला त्या वेळेस हिंदुसमाजाची स्थिति फारच दीनवाणी झाली होती व त्याला उत्तेजन देऊन स्फूर्ति आणणाऱ्या अशा कांहीं तरी उपायाची जरूरी भासत होती हें आपण लक्षांत ठेविलें पाहिजे. आपण हिंदु म्हणून कांहीं निराळा समाज आहों व आपणाला आपल्या हिंदुत्वाचा अभिमान बाळगून व कांहीं वीरकृत्यें करून आपल्या समाजाचें तोंड उजळ केलें पाहिजे; त्याचप्रमाणें आपल्या समाजावर आंतून व बाहेरून, गुप्त व प्रकट हल्ले होत आहेत, त्यांचा प्रतिकार करून आपलें अस्तित्व कायम ठेवलें पाहिजे अशा तऱ्हेच्या भावना

कांहीं अंशीं तरी लोकांच्या मनांत उत्पन्न करण्याचें कार्य गणपत्युत्सवानेच केलें. शिवाय उत्सवांत दरसाल धार्मिक विषयावर व्याख्यानें होत, त्यामुळें धर्मकल्पनांचा प्रसार होऊन नवीन नवीन विषय चर्चेला निघूं लागले. त्यामुळें धर्मविषयांत विचारविनिमय होऊन प्रगति झाली ती निराळीच. यानंतरची पंचांगशुद्धीची चळवळ हीहि त्यांनीं धर्मभावनेनें हातीं घेतलेली चळवळ होय. शके १८२६ च्या ज्योतिष संमेलनांत मतैक्य होण्याविषयीं टिळकांनीं केलेले प्रयत्न, त्यानंतर केवळ त्यांच्याच प्रेरणेनें भरलेलीं पुणें व सांगली येथील संमेलनें व या सर्वांनंतर त्यांनीं सुरू केलेलें नवें पंचांग हीं सर्व त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष देतात. त्यांच्या नांवावर सुरू झालेलें नवें पंचांग बहुजनसमाजास व कित्येक विचारी मंडळींस अजून पसंत पडलेलें नाहीं, तथापि आपल्या धर्मबांधवांचीं धर्मकृत्यें शुद्ध वेळेवर व्हावीं या हेतूनें त्यांनीं केलेले परिश्रम अत्यंत आदरणीय होते हें कोणीहि कबूल करील. सरते शेवटीं त्यांच्या भव्य यशोमंदिराचें शिखरच असा जो गीतारहस्य ग्रंथ त्याचा उल्लेख करावयाचा राहिला. इतर अनेक दृष्टींनीं त्याचें महत्त्व वर्णन न करितां आधुनिक सुशिक्षित मंडळींची डळमळत असलेली धर्मावरील श्रद्धा दृढ करणारा व नीतीच्या आणि कार्याकार्यविवेकाच्या दृष्टीनें गीतेचें जें महत्त्व आहे तें प्रथमच दाखवून देणारा असा हा एकच ग्रंथ मराठीमध्यें अवतरला आहे एवढेंच येथें लिहिणें बस् होईल.

### तेजीयसां न दोषाय वन्हेः सर्वभुजो यथा ।

तेव्हां अशा तऱ्हेची धार्मिक कामगिरी ज्यानें केली त्याला त्याच्या आचारहीनतेबद्दल दोष द्यावा असें कोणास वाटेल काय ? ‘ तेजीयसां न दोषाय वन्हेः सर्वभुजो यथा । ’ हें भागवतकारांचें वचनच टिळकांसारख्यांना लागू करणें रास्त होईल. आतां स्वतःकरितां नसलें तरी लोकांना धडा घालून देण्याकरितां मार्गदर्शक पुढाऱ्यानें धर्माचार व्यवस्थित रीतीनें पाळावे व अज्ञ जनांचा बुद्धिभेद करूं नये असें तत्त्व गीतेंतच भगवंतांनीं सांगितलें आहे. प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्णांच्या आचारपालनाचें सुंदर उदाहरण महाभारतांत आलें आहे. पांडवांचा निरोप घेऊन कौरवांकडे शिष्टाईला जाण्याकरितां म्हणून वासुदेव निघाले. वाटेंत सूर्याचा अस्तमान होण्याची वेळ आली तेव्हां श्रीकृष्णांनीं रथ थांबवून मुक्काम केला, सवितृदेवतेस अर्घ्य दिले व संध्यावंदन आटोपून विश्रांति घेऊन ते मार्गस्थ झाले. प्रत्यक्ष सूर्य आदिकरून जगताचा जो चालक व प्रेरक त्याला सूर्यास अर्घ्य देणें आवश्यक होतें असें नाहीं, तथापि नेत्यानें जनतेस उदाहरण घालून देण्यासाठीं स्वतः आचार पाळले पाहिजेत हें जाणून श्रीकृष्णानें तसें आचरण केलें.* परंतु लोकांस संध्यावंदन करण्याचे बाबतींत उदाहरण घालून

* महाभारत, उद्योगपर्व अ. ८४ श्लो. २१.

देणारा जो श्रीकृष्ण त्याचेच बाबतींत रासक्रीडेचा अपवाद टाळण्याकरितां वर दिलेल्या वचनानें श्रीकृष्णाचें समर्थन करणें भागवतकारांस भाग पडलें आहे ! एवंच काय, कीं प्रत्यक्ष परमात्म्याचा पूर्णावतार जरी झाला तरी या इहलोकची वस्तीच अशी आहे कीं, त्याचेहि ठिकाणीं सर्वांगपरिपूर्णता व निर्दोषता येऊं शकत नाहीं. मग टिळकांचे ठिकाणीं तरी उगीच तशा तऱ्हेची अवास्तव निर्दोषता आरोपिण्यांत काय अर्थ आहे ? असो; हें विषयांतर झालें.

## स्वाभिमानाच्या पायावर उभारलेली धर्मबुद्धि.

टिळकांची धर्मबुद्धि इतकी कार्यक्षम होऊन त्यांच्या हातून इतकी धार्मिक कामगिरी झाली याचें एक कारण त्यांचें अलौकिक कर्तृत्व हें तर खरेंच; परंतु त्यांची धर्मबुद्धि स्वाभिमानाच्या, आपलेपणाच्या व राष्ट्रीय भावनेच्या पायावर उभारलेली होती म्हणूनच ती इतकी तेजस्वी व कार्यक्षम झाली असेंहि आपल्यास म्हणतां येतें. खासगी आचरणानें अत्यंत पवित्र व धर्मशील परंतु स्वाभिमान व तेजस्वीपणा अंगीं नसल्यामुळें वरिष्ठांच्या हातून अनेक अपमान सहन करणारे असे अनेक लोक सरकारी नोकरींत किंवा इतरत्रहि आढळून येतील. उलट टिळकांची प्रत्येक धार्मिक कामगिरी पाहिली तर स्वाभिमानाच्या, आपलेपणाच्या व राष्ट्रतेजोवर्धनाच्या दृष्टीनें तिचें महत्त्व अत्यंत दिसून येतें. संमतिवयाच्या बाबतींत विधर्मी सरकार आमच्या धर्माच्या बाबतींत हात घालीत आहे याचीच त्यांना अत्यंत चीड आली. सर्व हिंदूंनीं एकत्र होऊन जुटीनें करण्याजोगा आपल्यांत उत्सव नाहीं, त्यामुळें मुसलमान हिंदूंची वारंवार आगळीक करीत असतां देखील हिंदु लोक त्यांच्या ताबुतांत जाऊन मिसळतात असें दिसून येतांच श्रीगणपत्युत्सवाची इतरांच्या मनांत आलेली कल्पना घेऊन तिला टिळकांनीं आपल्या धडाडीनें इतकें विस्तृत स्वरूप प्राप्त करून दिलें कीं, महाराष्ट्रांत न भूतो न भविष्यति अशी जागृति त्यामुळें झाली. आपल्या धर्मांत अमुक एक उणीव आहे व तिचा फायदा इतरांस घेतां येण्यासारखा आहे, ही कल्पना त्यांना सहन होत नसे. त्यांच्या पंचांगशुद्धीच्या चळवळींतहि हेंच रहस्य दिसून येतें. पाश्चात्यांचें Almanac बिनचूक असतें तसें आपलें पंचांग कां असूं नये अशी टोंचणी त्यांच्या मनास लागलेली होती. त्याचप्रमाणें गीतारहस्यांतील प्रतिपादन जर आपण लक्ष देऊन पाहिलें तर त्यांत देखील आपलेपणाच्या व स्वाभिमानाच्या भावनेचें प्राधान्य सर्वत्र आपल्या नजरेस येतें. या दृष्टीनें गीतारहस्याकडे पाहूं लागलें म्हणजे मोठा कौतुकास्पद देखावा दृग्गोचर होतो. पाश्चात्य पंडितांचा आमच्या धर्मावर व प्राचीन वाङ्मयावर मोठा आरोप हा असतो कीं, 'नीतीचें (Ethics) प्रतिपादन तुमच्या धर्मांत अगर तत्त्वज्ञानांत कोठेंच केलेलें आढळत नाहीं.

व्यवहारांत कोणत्या प्रसंगीं कसें वागावें, कार्याकार्य ठरविण्याची कसोटी कोणती, सामान्य नीति कोणची व अपवादात्मक नीति कोणची वगैरे प्रश्नांचें विवेचन जसें जाडेजाडे ग्रंथ लिहून आम्ही करतों तसें तुमच्या बापजाद्यांनीं करून ठेवलें आहे काय ? असल्यास दाखवा, नाहीं तर आपला कमीपणा कबूल करा !' असा पेंच त्या पंडितांनीं टाकला होता. यावर डॉयसन् प्रभृति सोनारांनींच कांहींसे या सर्षपदर्शी पंडितांचे कान टोंचले होते; परंतु हा घातलेला पेंच बिनतोड सोडवून उलट त्यांच्या तंगड्या त्यांच्याच गळ्यांत घालण्याचें खरें काम टिळकांनीं गीतारहस्यांत केलें आहे. आमच्या वाङ्मयांतील भगवद्गीता हाच नीतिशास्त्राबरील सर्वश्रेष्ठ ग्रंथ असून कार्याकार्यविवेकाची कसोटी त्यांतच उत्कृष्ट लावलेली दृष्टीस पडते असें टिळकांनीं सिद्ध केलें आहे. इतकेंच नव्हे तर कार्याकार्याचा विवेक करण्याकरितां आधिभौतिक सुखवाद, उपयुक्ततावाद, जास्तींचें जास्त कल्याण ( Greatest good of the greatest number ) वगैरे ज्या अनेक कसोट्या निरनिराळ्या पाश्चात्य ग्रंथकारांनीं सुचविलेल्या आहेत त्यापेक्षां अध्यात्माची गीतेनें लावलेली कसोटी हीच श्रेष्ठ व निर्णायक अशी असून अध्यात्माच्या पायावर उभारलेलें आमचें ( गीतेंत प्रतिपादलेलें ) नीतिशास्त्रच पाश्चात्यांच्या नीतिशास्त्रापेक्षां निस्संशय वरच्या दर्जाचें आहे असेंहि त्यांनीं गीतारहस्यांत दाखवून दिलेलें आहे. याप्रमाणें तुम्ही म्हणत होतां ती उणीव तर आमच्या धर्मांत नाहींच पण उलट त्या बाबतींत तुम्हीच आमच्यापेक्षां कमी दर्जाचे आहांत असें त्यांनीं सिद्ध केलें व पाश्चत्याचें घोंगडें त्याच्यांच गळ्यांत अडकवून आपण मोकळे झाले. सर्व जन्म ज्यांचा आपल्यांतील उणीवा–खऱ्या अगर आरोपिलेल्या–दूर करण्यांत व आपला वरचढपणा शाबीत करण्यांत गेला त्यांनीं धर्माच्या बाबतींतहि तेंच कार्य न केलें तरच आश्चर्य !

## केसरीद्वारां व व्याख्यानद्वारां धर्मजागृति

संमतिबिल, गणेशोत्सव, पंचांगसंशोधन, गीतारहस्य वगैरेसारख्या कांहीं विशिष्ट बाबींचाच आतांपर्यंत आपण उल्लेख केला. परंतु आपल्या स्वतःच्या उदाहरणानें, केसरीसारख्या पत्रांतून स्वधर्माचा वारंवार जोराचा पुरस्कार करण्यानें व इतरत्रहि लेख व भाषणें यांच्या योगानें, समाजांत धर्मजागृति करून धर्माभिमानाची जी लाट त्यांनीं उत्पन्न केली तिचेंहि महत्त्व फार मोठें आहे. या कामांत त्यांना प्रो. जिनसीवाल्यांसारखे योग्य साथीदार मिळाले होते. परंतु जिनसीवाले १९०३ सालीं व ह. प. भिंगारकरबुवा १९०६ सालीं वारले. तेव्हांपासून ही धर्मजागृतीची कामगिरी त्यांच्याच अंगावर मुख्यतः पडली. हिंदुधर्माचा अभिमान बाळगून व धर्मग्रंथांचें विचारपूर्वक परिशीलन करून बहुजन-

समाजांत धर्मजागृति करणें हें सुशिक्षितांचेंच कर्तव्य होय असें त्यांचें म्हणणें होतें. धर्माभिमानाविषयीं ते म्हणतात—" कोणत्याहि सुधारणेचा मुख्य उद्देश म्हटला म्हणजे विशिष्ट राष्ट्रीयत्वाचा अभिमान जागृत करणें हा होय. तो अभिमान आम्ही कोणता धरावयाचा ? अर्थात् हिंदुत्वाचा होय. आम्हांला धर्माची कांहीं एक परंपरा आहे. त्या परंपरेंत जें ज्ञान आहे तें इतर धर्मांतील ज्ञानाच्या बरोबरीचें किंबहुना त्याहूनहि श्रेष्ठ आहे, आणि ही परंपरा जर आम्ही सोडून दिली तर आमचें असें म्हणण्यासारखें आम्हांस सामान्य बंधन कांहींच नाहीं, या गोष्टी आम्ही नेहमीं लक्षांत ठेविल्या पांहिजेत. " ( ' हिंदुत्व आणि सुधारणा ' अग्रलेख केसरी ता. १२ जानेवारी १९०४ ) यांत धर्माचा अभिमान म्हणजे परंपरारहित केवळ निर्गंध धर्माचा अभिमान नव्हे तर प्राचीन कालापासून चालत आलेली जी परंपरा तिचा अभिमान होय हेंच जोरानें प्रतिपादन केलें आहे. या परंपरेच्या संरक्षणावर त्यांनीं वारंवार जोर दिला आहे. १९०४ सालच्या गणेशोत्सवांत ' पंढरीची यात्रा ' नामक विषयांवर अत्यंत उद्बोधक व्याख्यान त्यांनी दिलें. त्यांत ते शेवटीं म्हणतात—" निरनिराळ्या धर्मांमध्यें जो भेद आहे तो परंपरेंतच आहे. म्हणून हिंदुधर्माचीहि परंपरा कायम राहील तरच हिंदुधर्माची उन्नति व रक्षण होईल. " याच व्याख्यानांत सुशिक्षित लोकांनींच धर्मजागृति व धर्मसंरक्षण कसें केलें पाहिजे तें सुंदर रीतीनें प्रतिपादन केलें आहे.—" कोणत्याहि देशांत सामान्य जनसमूह धर्माचरण केवळ विश्वासानें व श्रद्धेनेंच करतो. धर्मग्रंथांचें विचारपूर्वक परिशीलन करून धर्माची जागृति करणें, त्याचें संरक्षण करणें किंवा त्याची परंपरा कायम राखून त्यास योग्य वळण देणें हीं कामें सर्वत्र व सर्वकाळीं सुशिक्षितांचींच आहेत. ...धर्मावर संकटें कोणकोणतीं आलीं आहेत, या परधर्मांचें स्वरूप काय, त्यांचें खंडन करितांना हिंदुधर्माच्या मांडणींत कोणता फरक केला पाहिजे, धर्मजागृति करून त्या बाबींत या तीन वर्गांचा ( म्ह. सुशिक्षित, मध्यम वर्ग व शेतकरी वगैरे अज्ञ लोक ) मिलाफ कसा होईल, या सर्वांचा विचार करून उपाय योजणें हें सुशिक्षितांचेंच कर्तव्य आहे. " हें जें सुशिक्षितांचें कर्तव्य म्हणून त्यांनीं सांगितलें तें स्वतः त्यांनीं किती उत्कृष्ट रीतीनें पाळलें हें पुनः पुनः सांगण्याची जरूरी नाहीं. किंबहुना स्वतःच्याच वर्तनांतील सार काढून तें त्यांनीं येथें लोकांच्या पुढें मांडलें आहे कीं काय असा संशय येतो. आतां आपल्याच धर्माची जागृति करूं लागल्यास इतर धर्मांविषयींचा विरोध वाढेल अशी शंका कित्येक लोक काढीत असतात. ही शंका काढणारे लोक ज्याप्रमाणें सध्यां आहेत त्याचप्रमाणें पूर्वींहि होते. टिळकांनीं त्यांच्या शंकेवर स्पष्ट उत्तर देऊन ठेवलें आहे. १९०४ च्या गणेशोत्सवांत ते म्हणतातः—" नुसती हिंदुधर्माची जागृति केली तर त्याबरोबर इतर धर्मांबद्दलचा तिरस्कार वाढेल व त्यामुळें

राष्ट्रैक्याचा घात होईल......असें म्हणणारी अजूनहि कांहीं मंडळी आहे. पण धर्माचा नायनाट करून सर्व समाज धर्मशून्य बनल्यामुळें राष्ट्रैक्य किंवा राष्ट्रोन्नति झाल्याचें जगांत एकहि उदाहरण नाहीं......इतर धर्मांबद्दल द्वेष व विरोध वाढूं न देतां हिंदुधर्माची जागृति व उन्नति करून हिंदुधर्मीयांचाच मिलाफ करणें शक्य आहे." इतर धर्मांचे ते कांहीं वैरी नव्हते. परंतु उगीच खोडसाळपणें उभें केलेल्या बुजगावण्यास भिऊन जाऊन धर्मजागृतीचें काम त्यांनीं अंगावाहेर टाकलें नाहीं. टिळक हे मुसलमान धर्माचे शत्रु आहेत, त्यांना मनांतून ब्राह्मणांचें राज्य पुनः स्थापावयाचें आहे वगैरे हरएक तऱ्हेचा गिल्ला त्यांच्या शत्रूंनीं केला. परंतु त्यांस न जुमानतां आपल्या दीन झालेल्या धर्मास वर काढण्याचें व धर्माचा अभिमान जागृत करण्याचें काम त्यांनीं अव्याहत चालू ठेवलें. आज जी धर्मविषयक आस्था समाजामध्यें दिसून येत आहे ती विष्णुशास्त्रांच्या नंतर त्यांच्याच कामगिरीचें मुख्यांशानें फल आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

## धर्मदूषकांचा खरपूस समाचार

धर्मदूषकांचा यथास्थित समाचार घेणें व धर्मविषयक अनास्थेबद्दल कडक शब्दांनीं कानउघाडणी करणें हीं धर्मजागृतीच्याच कार्याचीं अंगें होत व टिळकांनीं आपल्या निर्भीड स्वभावास अनुसरून या अंगांची बजावणी करण्यांत मुळींच कसूर केली नाहीं. इंग्रजी राज्याच्या अव्वल अमदानींत उपस्थित झालेल्या मिशनरी वगैरे धर्मदूषकांची हजेरी घेणारे विष्णुबुवा ब्रह्मचारी नामक तेजस्वी पुरुष होऊन गेले. मिशनरी हे उघड उघड हिंदुधर्मावर हल्ला करणारे परधर्मी निंदक होत. परंतु हळूहळू यांच्या जोडीस, कुऱ्हाडीच्या दांड्याचें अनुकरण करणारा आपल्यांतीलच निंदकांचा, उदासीनांचा व स्वधर्माची लाज वाटून या नाहीं त्या सबबीवर त्यांतून फुटून निघणाऱ्यांचा वर्ग उत्पन्न होऊं लागला, व मिशनऱ्यांप्रमाणें या वर्गाचाहि प्रतिकार करणें धर्मरक्षणाच्या दृष्टीनें अवश्य परंतु अतिशय अवघड काम होऊन बसलें. हें अवघड काम यशस्वी रीतीनें करून दाखविणारा पुरुष म्हणजे विष्णुशास्त्री चिपळूणकर. निबंधमालेंत पाद्री लोक, दयानंद, जोतीबा व समाजिस्ट ही जी चौकडी त्यांनीं पुनः पुनः निर्देशिली आहे ती धर्मदूषकांच्या उपलक्षणात्मकच होय. असो; विष्णुशास्त्र्यांनंतर धर्मदूषकांचा समाचार घेण्याचें कार्य टिळक व जिनसीवाले यांनीं उत्कृष्टपणानें केलें. धर्मांबद्दल शिथिलादर असलेला सुधारक वर्ग, आधुनिक शिक्षणानें पाखंडी बनलेले रँग्लर परांजपे यासारखे विद्वान् व पंडिता रमाबाईसारखे गोतास काळ झालेले कुऱ्हाडीचे दांडे या सर्वांवर टिळकांनीं केसरींतून कारणपरत्वें प्रखर टीका केली आहे. टिळकांची धर्मभावना इतकी हळुवार व जिव्हाळ्याची होती

कीं, तिला एवढासा धक्का बसलेला सहन होत नसे. आपल्यांतीलच कांहीं लोकांनीं स्वाभिमानशून्य बनून धर्माविषयीं अद्वातद्वा उद्गार काढलेले त्यांच्या नजरेस पडले म्हणजे त्यांचा संताप अनावर होत असे व अत्यंत झोंबणारे, प्रखर उद्गार त्यांच्या लेखणींतून बाहेर पडत. रँग्लर प्ररांजपे यांनीं १९०४ सालीं 'ईस्ट अँड वेस्ट' नामक मासिक पुस्तकाच्या मे महिन्याच्या अंकांत 'हिंदुस्थानांत धार्मिक शिक्षणाची आवश्यकता आहे काय ?' या मथळ्याखालीं एक लेख लिहिला होता. धार्मिक शिक्षणाची आवश्यकता आज नाहीं एवढेंच म्हणून ते राहिले नाहींत, तर खुद्द धर्मावरच त्यांनीं आपली गदा उगारलेली होती. हा जो 'अव्यापारेषु व्यापार' रँग्लरसाहेबांनीं केला त्याचा खरपूस समाचार टिळकांनीं केसरींत 'प्रासादशिखरस्थोऽपि काको न गरुडायते' (केसरी, १७ मे १९०४) व 'विवेकभ्रष्टानां भवति विनिपातः शतमुखः' (केसरी, ३१ मे १९०४) या मथळ्याचे दोन अग्रलेख लिहून घेतला. यांतील दुसऱ्या लेखांत अलीकडील शिक्षणानें नास्तिक बनून 'मि. परांजप्यांप्रमाणेंच अद्वातद्वा बहकत सुटणाऱ्या' ग्रॅज्युएट तरुणांचाहि उल्लेख केला आहे. त्याच-प्रमाणें २५ आगष्ट १९०३ च्या केसरींत जिनसीवाले यांच्यावर जो सुंदर मृत्युलेख त्यांनीं लिहिला आहे त्यांत सामान्य प्रतीचे पुरुष इंग्रजी विद्येनें धर्मबाबतींत कसे संशयात्मे बनतात याचें वर्णन करून जिनसीवाल्यांच्या उत्कट धर्माभिमानाचें उदाहरण त्यांच्यापुढें ठेवलें आहे. पंडिता रमाबाईला तर त्यांनीं केसरींतून जी पुष्पांजलि वाहिली आहे तिचें वर्णन करण्याची कांहीं सोय नाहीं. त्या बाईचा दुष्काळांत मुलें धरून आणून तीं बाटविण्याचा, अमेरिकेंत पुस्तकें लिहून हिंदुसमाजाची नालस्ती करण्याचा, वगैरे अनेक तऱ्हेचा घातकी व्यवसाय एकसारखा चालला होता. एकादा विदेशी मनुष्य देखील करण्यास धजणार नाहीं, इतका हानिकारक उद्योग याच देशांत जन्म घेतलेल्या या बाईनें चाल-विलेला पाहून टिळकांस राग कां न यावा ? ह्या रागासरशीं त्यांनीं बाईवर अत्यंत तीव्र टीका केली आहे. * परंतु टिळकांच्या कोपानलाच्या भडकलेल्या या ज्वाळा धर्मरक्षणाच्या शुद्ध व स्वार्थरहित भावनेनें उद्दीपित झाल्या असल्या-मुळें आदरणीय अशाच वाटतात. क्रव्याद अग्नीप्रमाणें अमंगल वाटत नाहीं.

### आर्तत्राणाय मे शस्त्रं न प्रहर्तुमनागसि।

तात्पर्य, रा. ज. स. करंदीकर यांनीं 'लो. टिळकांचें जीवितरहस्य' (चित्रमयजगत्, आगष्ट १९२०) या लेखांत म्हटल्याप्रमाणें 'आर्तत्राणाय मे शस्त्रं न प्रहर्तुमनागसि।' हाच टिळकांचा बाणा होता. हिंदुस्थान देश व हिंदु-

---

* पहा. स्फुटसूचना; केसरी ता. १२ जानेवारी १९०४.

लोक यांच्याप्रमाणें हिंदुधर्म हाहि त्यांना आर्तसा भासला. यामुळेंच त्यांनीं त्याचा जन्मपर्यंत कैवार घेतला. धर्माच्या निकृष्टावस्थेंत जन्मास आल्यामुळें धर्माचा सर्वस्वी उद्धार करण्याइतकें जरी नाहीं तरी स्वधर्माचा मान वाढविण्याचें कार्य त्यांच्या हातून उत्कृष्टपणें पार पडलें. ज्ञानेश्वर महाराजांनीं म्हटल्याप्रमाणें—

**आतां कोंदड घेऊनि हातीं। आरूढ पां इये रथीं।**
**देईं आलिंगन विरवृत्ति। समाधानें ॥ १७९**
**जगीं किर्ती रूढवीं। स्वधर्माचा मान वाढवीं।**
**इया भारापासोनि सोडवी। मेदिनी हे ॥ १९०**

असा परमेश्वराचा दिव्य आदेश त्यांच्या अंतःकरणास जाणवला व त्याप्रमाणें वर्तन करून तो महापुरुष धन्य झाला हेंच खरें !

## धर्मचालना व धर्मनियमन

त्यांच्या धर्मबुद्धीविषयीं सर्व बाजूंनीं विवेचन झालें. आतां त्यांच्या धर्मविषयक मतांविषयीं विचार करूं. कांहीं कांहीं बाबतींतील त्यांचीं मतें निरनिराळ्या संदर्भानें पूर्वींच येऊन गेलीं आहेत, परंतु धर्माच्या निरनिराळ्या अंगांसंबंधीं त्यांचे विचार काय होते हें साकल्यानें परंतु त्रोटक रीतीनें पुढें मांडणें अवश्य आहे. हीं मतें बहुधा त्यांच्याच शब्दांनीं सांगितलीं जातील. त्यांच्या ओजस्वी व निःसंदिग्ध भाषेंतच त्यांचीं मतें न मांडतां स्वतःच्या भाषेंत तीं सांगूं जाणें त्रासाचें होऊन शिवाय वैरस्योत्पादक होईल. शिवाय तसें करण्यानें विश्वसनीयताहि उत्पन्न होणार नाहीं. तेव्हां त्यांचीं मतें विषयवारीनें त्यांच्याच शब्दांनीं सांगून त्यांत स्वतःचा भाग फारच थोडा ठेवण्याचा प्रयत्न केला जाईल. मोत्यांचा अगर रत्नांचा हार तयार करणाऱ्यानें त्यांत स्वतःचें नकली मोतीं तर दडपून देऊं नयेच परंतु हार करण्याचें खरें कौशल्य म्हणजे ज्या सूत्रांत तो ग्रथित केलेला असतो त्या सूत्राचा मागमूसहि कोठें दिसूं नये हें होय; असो.

प्रथम धर्मांत सुधारणा करावी कीं नाहीं, धर्मांत सुधारणा करण्याचा योग्य मार्ग कोणता, समाजनियमन व धर्मधारण यांचा अधिकार कोणाकडे असावा वगैरे प्रश्नांबद्दल त्यांचीं मतें काय होतीं याचें दिग्दर्शन करून मग खुद्द धर्मांत अंतर्भाव होणाऱ्या विषयांकडे वळूं. धर्मांत म्हणजे धार्मिक चालीरीतींत कालमानास अनुसरून सुधारणा करावी कीं नाहीं, या प्रश्नावर त्यांचें मत अस्तिपक्षीं होतें हें सांगावयास नकोच. जुनें रूढीनें चालत आलेलें तेंच सर्व चांगलें आहे, त्यांत कांहींहि बदल करण्याची आवश्यकता नाहीं असें त्यांनीं कधीं प्रतिपादलें नाहीं. उलट धर्माच्या अनेक चालीरीतींमध्यें त्यांनीं स्वतः वेळोवेळीं सुधारणा सुचविल्या होत्या. परंतु धार्मिक चालीरीतींत बदल करावयाचा तो परंपरेला, शास्त्राला धरून असावा व जनसमाजाच्या सहज गळीं उतरेल इतक्या सौम्य स्वरूपाचा

तो असावा असें त्यांचें म्हणणें होतें. "आमचे समाजसुधारक निवळ उपयुक्ततावादी आहेत; धर्मशील उपयुक्ततावादी नाहींत म्हणून त्यांचें आचरण व त्यांनीं सुचविलेल्या सुधारणा समाजास विधर्मी वाटतात."* असें ते म्हणत असत. "जेव्हां एकादी चाल धर्मांत रूढ होऊन बसलेली असते, तेव्हां त्या चालीच्या गुणावगुणांचा विचार धर्मदृष्टि बाजूला ठेऊन कधीं करतां येत नाहीं. धर्माची बाजू युक्तिदृष्टया कदाचित् लंगडी असेल, पण जगांतील सर्व व्यवहार कांहीं युक्तीनेंच होत नाहींत. प्राचीन काळापासून चालत आलेली धर्मपरंपरा युक्तीपेक्षां शतपट प्रबल असते.+"

आतां धार्मिक चालीरितींत, व अर्थात् धर्माशीं ज्यांचा संबंध येतो अशा सामाजिक चालीरितींत, फरक करण्याचा अधिकार कोणाचा आहे हें पाहिलें असतां विधर्मी सरकारला त्या बाबतींत कांहीं अधिकार नाहीं, किंवा असूं नये असें त्यांचें ठाम मत होतें. हें त्यांचें मत संमति बिलावरील वादविवादाच्या वेळीं स्पष्टपणें प्रकट झालें होतें. सरकार हें आपलेंच असेल आणि त्यांतून तें पूर्णपणें लोकमतानुवर्ती असेल तर त्याला कोणच्याच बाबतींत बदल घडवून आणण्याला हरकत नसावी असें अर्थातच त्यांचें मत असलें पाहिजे. परंतु अशा तऱ्हेची उलट बाजू प्रकट करण्याचा प्रसंग त्यांच्या आयुष्यांत आलाच नाहीं. विधर्मी सरकाराप्रमाणें मलबारी शेटजींसारख्या परकीय उपटसुंभालाहि 'परोपदेशे पांडित्यम्' करून दुसऱ्या धर्माच्या चालीरीतींत हात घालण्याचा मुळींच अधिकार नाहीं असें त्यांचें मत होतें. म्हणूनच पारशी समाजांत त्यांच्या प्रेतसंस्काराच्या सुधारणेविषयीं प्रश्न निघाला असतां, त्यावर ४।७।१९०५ च्या केसरींत लिहितांना त्यांनीं स्पष्ट म्हटलें आहे कीं, "पारशी समाजानें हा प्रश्न स्वतः बरा वाटेल त्या रीतीनें सोडवावा, त्यांत मुंबईचा टाईम्स किंवा आम्ही यांच्यासारख्या परक्यांनीं हात घालण्याची मुळींच जरूरी नाहीं." तेव्हां धर्मसंबंधीं चालीरीतींचा प्रश्न ज्या त्या समाजानें स्वतः वाटेल तसा सोडवावा; आपआपसांत एकमेकांच्या संमतीनें सुधारणा अमलांत आणावी; त्यांतूनहि हिंदु समाजाचें नियमन करणाऱ्या कांहीं व्यक्ति व संस्था आहेत व या सर्वांचेंहि नियमन करणारें हिंदुधर्मशास्त्र अस्तित्वांत आहे. तेव्हां सुधारणा करणें असल्यास या नियामक संस्था व हीं शास्त्रें यांच्या द्वारेंच करावी असें त्यांचें म्हणणें होतें. "राजकीय बाबतींत ज्याप्रमाणें सर्व अधिकार राजाच्या किंवा एकाद्या विशिष्ट संस्थेच्या ताब्यांत असतो, तसा हिंदु समाजांतील सामाजिक बाबतींतील

---

* केसरी, ता. १२।१।१९०४.

+ केसरी, ता. ४।७।१९०५. पारशी समाजांतील सुधारणेविषयीं लिहिलेला लेख.

अधिकारहि कांहीं विशिष्ट व्यक्तींच्या व संस्थांच्या ताब्यांत आहे; आणि या संस्था व व्यक्ति हिंदुशास्त्रांत सांगितलेल्या कांहीं नियमांनीं चाललेल्या आहेत. या व्यक्ति, संस्था किंवा शास्त्र यांच्याविरुद्ध उघड बंड केल्यानें कांहीं फायदा नाहीं." ( केसरी, ता. १२।१।१९०४ ) या विशिष्ट संस्था व व्यक्ति म्हणजे जगद्गुरूंचे मठ व त्यांवरील अधिपति शंकराचार्य होत. मठाच्या संस्थेविषयीं व जगद्गुरूंच्या गादीविषयीं टिळकांना अभिमान असून त्यांच्याबद्दल त्यांच्या मनांत आदरच वसत होता. पीठावर बसणाऱ्या व्यक्तींबद्दल त्यांना मात्र सदैव तितकाच आदर वाटत होता असें म्हणतां यावयाचें नाहीं. समाजाचे अधिकारी जे धर्मगुरू त्यांच्यांत सुधारणा झाली पाहिजे असें त्यांचें म्हणणें होतें. पीठावर येणारे स्वामी अत्यंत पवित्र आचरणाचे, इंग्रजी जाणणारे, इतर धर्मांचें तारतम्यज्ञान असून आपला धर्म कोणत्या बाबतींत कसा श्रेष्ठ आहे हें ज्यांना दाखवून देतां येईल अशा तऱ्हेचे असावेत; याकरितां अलीकडच्या शिकलेल्या विद्वानांनीं संन्यास घ्यावा व धर्मप्रचाराच्या आणि धर्मोन्नतीच्या कार्यास वाहून घ्यावें असें त्यांना वाटत असे. हीं सर्व त्यांचीं मतें संकेश्वर पीठाच्या पदरीं असलेल्या कांहीं शास्त्री लोकांबरोबर त्यांचा ता. २३।५।१९०४ रोजीं जो संवाद झाला त्यांत प्रकट झालेलीं असून तीं रा. अप्पाजी विष्णु कुळकर्णी यांनीं आपल्या पुस्तकांत नमूद केलेलीं आहेत.

## पीठस्थ शंकराचार्यांबद्दल आदरभाव

शंकराचार्यांविषयीं टिळकांच्या मनांत मुळींच आदर नव्हता असें विधान कित्येक लोक करीत असतात. अलीकडे संकेश्वर पीठाच्या गादीवर येणाऱ्या कित्येकांची वैयक्तिक योग्यता व वर्तन, ग्रामण्यासारख्या प्रकरणांत पीठाकडून झालेली धरसोड, समाजनियमन, धर्मजागृति, धर्मोन्नति, वगैरे जीं शंकराचार्यांचीं प्रमुख कर्तव्यें त्यांबद्दल पीठस्थ व्यक्तींकडून दाखविली जात असलेली अनास्था, वगैरे अनेक कारणांमुळें पीठावर येणाऱ्या शंकराचार्यांबद्दल टिळकांकडून सर्वस्वी पूज्यबुद्धि दाखविली गेली नसेल. तथापि खुद्द पीठाबद्दल त्यांना फार पूज्यभाव वाटत असे व या धर्मपीठांची सुधारणा होऊन तीं कार्यक्षम बनावींत असें त्यांना मनापासून वाटत असे यांत शंका नाहीं. इंग्रजी जाणणारे, अलीकडील परिस्थितीचें पूर्ण ज्ञान असलेले, धर्मोन्नतीची व समाजहिताची कळकळ असलेले असे आचार्य पीठावर आल्यास त्यांना अत्यंत संतोष होण्याजोगा होता व त्यांचा योग्य मान ठेवण्याची त्यांची तयारीहि होती. करवीरपीठाचे आचार्य महाभागवत कुर्तुकोटि यांनीं स्वतःच टिळकांविषयींच्या आपल्या आठवणी सांगितल्या आहेत, त्यांत आचार्यांचा व पीठाचा मान ठेवण्याविषयीं टिळक कसे जपत याविषयीं अनेक उदाहरणें दाखल केलीं

आहेत. विशेषतः सांगली येथील ज्योतिष संमेलनांत आचार्यांच्या स्नानसंध्येची वेळ वगळून त्यांच्या सोयीप्रमाणें संमेलनाची वेळ नेमणें, काम पडेल तेव्हां व तेवढेंच आचार्यांनीं सभेंत यावें, सभेंत आल्याबरोबर सर्वांनीं त्यांस उत्थापन द्यावें, ते सभेंत आहेत तोंपर्यंत त्यांसच अध्यक्ष समजावें वगैरे टिळकांनीं केलेल्या अनेक योजना पीठस्थ आचार्यांविषयीं त्यांचा पूज्यभावच सुचवितात, व सामान्य व्यवहारांतहि आचार्यांचा योग्य आदर ठेवण्याविषयीं टिळक कसे जपत असत हेंहि त्यावरून उत्कृष्ट दिसून येतें. याप्रमाणें पीठस्थ आचार्यांविषयींचा त्यांचा आदरभाव अनेक वेळां प्रकट झालेला आहे. परंतु अनादर मात्र त्यांनीं कधींहि प्रकट केला नाहीं हें लक्षांत ठेवणें जरूर आहे.

धर्मपीठांबद्दल समाजानें पूज्यभाव राखला पाहिजे, त्याचप्रमाणें पीठांनींहि कालमान ओळखून धर्मजागृतीचें व धर्माला चालना देण्याचें आपलें कर्तव्य बजावलें पाहिजे. धर्मपीठांचा हाच खरा व मुख्य उपयोग होय. टिळकांच्या हयातींत अशा तऱ्हेचा धर्माला चालना देण्याचा उपक्रम कोणत्याहि पीठस्थ आचार्यांकडून विशेषसा झाला नाहीं. सुधारक लोक हे धर्माला न जुमानतां ऐहिक सुखवृद्धीच्या हेतूस अनुसरून जडदृष्टीनें सुधारणा करूं पहात होते, तर धर्माचा अभिमान असलेले कर्मठ गृहस्थ व वैदिक शास्त्री, पंडित वगैरे जुन्या परंपरेचे विद्वान् हे नव्या परिस्थितीकडे ‘ आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेनम् ’ अशा तऱ्हेनें पहात विस्मयानें स्तब्ध होऊन बसले होते. परंपरागत धर्मास व शास्त्रोक्त तत्वांस न सोडतां सुधारणा घडवून आणावी ही जी टिळकांच्या मनींची आस ती पुरण्याचा त्यांच्या आयुष्यांत कधींच योग आला नाहीं. धर्माचारांस चालना देण्याचा प्रश्न इतर कोणीं फारसा हातीं घेतला नव्हता व त्यांना स्वतःला तो हातीं घेण्यास सवडच झाली नाहीं. आतां त्यांच्यानंतर पीठस्थ आचार्य व जुन्या परंपरेचे शास्त्री वगैरे मंडळींनीं हा प्रश्न हातीं घेतल्याचें दिसत आहे. श्रीक्षेत्र काशी येथें कांहीं दिवसांपूर्वी पंडितपरिषद भरली होती. त्यांत आपद्धर्म म्हणून कोणच्या आचारांचा धर्मांत स्वीकार करावा वगैरे प्रश्नांचा विचार झाला. पश्चिम खानदेशांतील कुकुरमुंडें नामक गांवीं राहणाऱ्या एका श्रीमान् धर्माभिमानी गृहस्थांनीं अनेक शास्त्रीपंडितांच्या विचारें धर्माचारांस चालना देऊन जुनें धर्मशास्त्र व अलीकडील आचार यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न चालविला आहे असेंहि प्रसिद्ध झालें आहे. कुर्तकोटि आचार्यांच्या प्रेरणेनें भरलेल्या नाशिक, नागपूर व पुणें येथील तिन्ही हिंदुधर्मपरिषदांमध्यें अस्पृश्यता, पतितपरावर्तन, क्षत्रिय व वैश्य यांचें अस्तित्व इत्यादि प्रश्नांचा उहापोह होऊन सुधारणेस अनुकूल असे ठरावहि पास झाले आहेत. शिवाय ब्राह्मण्यसंरक्षक परिषद, ब्राह्मण मासिक पत्रिका वगैरे इतरहि अनेक प्रयत्न आपापल्या दिशेनें सुरू झाले आहेत. हे सर्व प्रयत्न, जुन्या परंपरेस अनुसरून सुधारणा करण्याची जी दिशा टिळकांनीं

आजन्म प्रतिपादन केली तिला धरूनच होत आहेत. तथापि हे सर्वच विशिष्ट प्रयत्न टिळकांस पसंत पडले असते कीं नाहीं याविषयीं आतां कांहींच सांगतां येण्यासारखें नाहीं. हे सर्वच त्यांस पसंत पडले असते, किंवा यांपैकीं एकाद्याचाच त्यांनीं पुरस्कार केला असता, अगर सर्वांविषयींच केवळ उदासीनता दाखविली असती वगैरे विकल्पांपैकीं कोणतेंच विधान आपल्याला निश्चितपणें करतां येणार नाहीं व तसें करण्याची जरूरीहि नाहीं. अमुक एका अवधीनंतरचे इहलोकांतील सर्व व्यवहार टिळकांची इच्छा, त्यांचें कर्तृत्व व त्यांची बुद्धि यांच्या मदतीशिवाय चालू रहावे असें काळानेंच जेथें ठरविलें तेथें त्यांचें मत किंवा पसंती कोणत्या तरी एकाच बाजूला ओढून घेण्याचा कोणीहि प्रयत्न करूं नये हेंच बरें.

## पतितपरावर्तन व परधर्मीयांचें अभ्यावर्तन.

पतितपरावर्तन व परधर्मीयांचें अभ्यावर्तन या दोन बाबींविषयीं टिळकांचे विचार कशा तऱ्हेचे असावे याचेंहि थोडेंसें दिग्दर्शन करणें येथें अप्रस्तुत होणार नाहीं. यांपैकीं मूळच्या परधर्मीयांना हिंदुधर्माची दीक्षा देऊन त्यांचा स्वीकार करण्याचा प्रश्न प्रामुख्यानें समाजापुढें कधीं आलेला नाहीं, यदाकचित् आला तरी समाजास पसंत पडणें शक्य नाहीं व पसंत पडला तरी हिंदुधर्माच्या सध्यांच्या असहाय व बलहीन अवस्थेंत अशा तऱ्हेच्या प्रयत्नास यश मिळणेंहि शक्य नाहीं. हिंदुधर्माचा प्रसार करूं इच्छिणारी ' हिंदु मिशनरी सोसायटी ' गजानन भास्कर वैद्यांनीं टिळकांच्या हयातीतच काढली होती. तथापि तिच्यासंबंधानें किंवा परधर्मीयांना स्वधर्मांत घेऊन धर्मप्रसार करण्याच्या एकंदर तत्त्वासंबंधानें टिळकांनीं आपलें मत कोठें उच्चारून दाखविलें असल्याचें प्रसिद्ध नाहीं. स्वतः चढाईचें धोरण स्वीकारून परधर्मांवर स्वारी करण्याच्या या प्रश्नाबद्दल एक असो, परंतु स्वधर्मांतूनच एकेकाळीं पतित झालेल्यांना पुनः धर्मांत घेण्याच्या जिव्हाळ्याच्या व निकडीच्या प्रश्नासंबंधींहि टिळकांनीं निश्चित अभिप्राय प्रकट केल्याचें कोठें पहाण्यांत नाहीं. पतितपरावर्तनाचा हा प्रश्न टिळक वारल्यानंतरच जास्त जोरानें पुढें आला आहे हें खरें, तथापि तत्पूर्वी त्याच्या महत्त्वाची जाणीव कोणास झाली नव्हती असें मात्र नाहीं. इतर धर्मांच्या मानानें हिंदुधर्मीयांची संख्या घटत चालली असून मिशनरी वगैरे लोकांचा बाटविण्याची व्यापार जोरांत सरू आहे. दुष्काळ, प्लेग, वगैरे आपत्ति आल्या म्हणजे तर त्यांच्या बाटविण्याच्या धंद्यास अत्यंत तेजी येते. सारांश, झिजून झिजून सावकाशपणें मरणाऱ्या क्षयरोग्याप्रमाणें हिंदु समाज क्षीण होत चालला असून भीषण मृत्यु त्याला हळुहळु आपल्या पाशांत ओढीत आहे. अशा तऱ्हेची भयंकर स्थिति समाज–धुरीणांच्या, अर्थात् टिळकांच्याहि, पूर्णपणें लक्षांत आलेली होती, व या स्थितीची जाणीव जनतेला करून देण्यासाठीं

त्यांनीं ‘ जागे व्हा किंवा मरा ’ या नांवाचा एक अग्रलेखहि केसरींत लिहिला होता ( केसरी, ता. २६ फेब्रुवारी १९०१ ). हा लेख अत्यंत कळवळ्यानें लिहिलेला असून हिंदुधर्मावर आलेलें प्राणसंकट यांत स्पष्टपणें दाखविलें आहे. आमच्या धर्मास राजाचा व राजशासनाचा आधार पूर्वीं असे. परंतु सध्यां परकी राजसत्तेमुळें तो आश्रय तुटलेला आहे. अशा स्थितींत समाजांतील विद्वानांनीं युक्तिवादानें स्वधर्म स्थापित करावा व परधर्मी उपदेशकांचा पराभव करावा. परंतु आमच्यांतील “ जुन्या पद्धतीनें तयार झालेला विद्वद्वर्ग नाहींसा होत चालला आहे, आणि नवीन पद्धतीनें शिकलेला विद्वद्वर्ग प्रायः उदासीन व क्वचित् पाखंडवादीहि झालेला आहे. ” अशा स्थितींत धंदेवाले मिशनरी लोकांचा सुळसुळाट बराच मातलेला असून त्यांचा प्रवेश खेडेगांवांतूनहि होऊं लागला आहे. “ गेल्या दुष्काळांत २५००० मुलें मिशनरींच्या हातांत पडलेलीं आहेत ! ” अशा तऱ्हेनें दरएक दुष्काळाच्या प्रसंगीं आमच्या धर्मासहि मोठा चट्टा बसूं लागला आहे. “ तेव्हां या विषयाचा सर्वांनीं नीट विचार करावा, व आलेल्या संकटाच्या प्रतिकारार्थ उद्योग करण्यास लागावें ” असें शेवटीं सुचवून लेख पुरा केला आहे. यांतहि पतितपरावर्तनाच्या उपायाचा स्पष्ट निर्देश केलेला नाहीं, परंतु तोच उपाय टिळकांच्या मनांत घोळत असावा असें लेखांतील कांहीं वाक्यांवरून दिसतें.

धर्मचालनेच्या प्रश्नासंबंधीं टिळकांचे विचार काय होते, त्याचप्रमाणें धर्मनियमन करणारीं जीं शंकराचार्यांचीं पीठें त्यांच्याविषयीं टिळकांचें धोरण कोणच्या प्रकारचें होतें हें आपण पाहिलें. पतितपरावर्तनाचा जो प्रश्न सध्यां अधिकाधिक प्रामुख्यानें समाजासमोर येत आहे, त्याविषयींचीं टिळकांचीं मतें कशीं असावींत याचाहि अंदाज लावण्याचा आपण थोडासा प्रयत्न केला. आतां खुद्द धर्माच्या निरनिराळ्या अंगांविषयीं त्यांचीं मतें काय होतीं याचें दिग्दर्शन करण्यास आरंभ करूं.

## धर्माचे दोन विभाग

धर्म म्हणजे कांहीं लहानसान बाबत नाहीं; त्यांतून आम्हां आर्यधर्मानुयायांचा धर्म म्हणजे त्यांत कशाचा समावेश होत नाहीं असें नाहीं. तथापि या लेखांत आपल्याला धर्माचा अर्थ असा व्यापक घ्यावयाचा नाहीं. श्रुतिस्मृतिपुराणोक्त असून हिंदु समाजाच्या धारणाला व पारमार्थिक उन्नतीला कारणीभूत होणारा जो, तो धर्म; अशी आपल्या कामापुरती धर्माची व्याख्या केल्यास चालेल. अशा तऱ्हेच्या धर्माचे स्थूल दृष्टीनें दोन भाग होतील; एक तत्वज्ञान व दुसरा आचार. खरोखर पाहिलें असतां आपल्या धर्मामध्यें सर्वत्र तत्वज्ञान व आचार यांचा मिलाफ झालेला असून आचारनियमांची उभारणी तत्वज्ञानाच्या

पायावर केलेली आहे. तथापि विवेचनाच्या सोयीकरितां असे दोन विभाग करणें बरें. ऋग्वेदादि तीन वेदांमध्यें कर्मकांडाला उपयुक्त असा भाग आहे व तत्वज्ञानहि आहे; तथापि कर्माच्या प्राधान्यामुळें वेदत्रयीला आचारप्रधान मानणेंच सोइस्कर पडतें. त्याचप्रमाणें उपनिषदांत तत्वज्ञान असून उपासनाहि सांगितल्या आहेत. परंतु उपनिषदें हीं तत्वज्ञानाचें आगर असें समजण्याचा प्रचार आहे व तो रास्तहि आहे, तेव्हां तत्वज्ञान व आचार असे दोन भाग करून त्यांविषयीं टिळकांच्या मतांचा विचार करावयाचा.

## टिळकांचें तत्वज्ञान

तत्वज्ञान व आचार असे दोन भाग केले तरी त्यांपैकीं प्रत्येकांत पुनः अनेक पोटविभाग पडतात. उदारणार्थ, तत्वज्ञानांत अध्यात्म ( Metaphysics ), परमार्थ ( Theology ) व व्यावहारिक तत्वज्ञान म्हणजे नीतिशास्त्र ( Ethics ), मानसशास्त्र ( Psychology ) वगैरे असे तीन मुख्य भेद करितां येतील. या सर्व भिन्न भिन्न शाखांचें वर्णन व त्यांविषयींचे टिळकांचे विचार गीतारहस्यांत आलेलेहि आहेत. परंतु ते येथें अगदीं त्रोटकपणानें देणें म्हणजे अशक्यच आहे. तसें करणें म्हणजे एका तऱ्हेनें गीतारहस्याचा सारांशच देणें होय. तो देण्यास पांच पन्नास पृष्टें तरी निदान खर्चीं घालावीं लागतील. तेव्हां येथें टिळकांच्या तत्वज्ञानविषयक विचारांचें अगदीं अल्पसें निदर्शन करून जास्त महत्त्वाच्या अशा धर्माच्या आचाररूपी भागाकडे वळणें श्रेयस्कर होय. तत्वज्ञानांत अगर वेदान्तांत मुख्य गोष्ट लक्षांत ठेवावयाची ती ही कीं, गीतेच्या तात्पर्याविषयीं शंकराचार्य व टिळक यांच्यामध्यें कितीहि मतभेद असला तरी एकंदर अध्यात्मविषयांत टिळक हे शंकराचार्यांचेच पूर्ण अनुयायी आहेत. द्वैत, अद्वैत, विशिष्टाद्वैत व शुद्धाद्वैत असे जे वेदान्तांत मुख्य चार पंथ प्रचलित आहेत त्यांपैकीं टिळक हे पूर्णपणें अद्वैतमताला अनुसरणारे आहेत. 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः ' हीं जीं अद्वैत वेदान्ताचीं मुख्य तत्वें तीं त्यांना पूर्णपणें मान्य आहेत. ' दिक्कालानें अमर्यादित, अमृत, अनादि, स्वतंत्र, एकजिनसी, एक, निरंतर, सर्वव्यापी व निर्गुण ' ( गी. र. पृ. २१० ) असें ' परब्रह्म ' हें नांव दिलें जाणारें तत्व सृष्टीच्या मुळाशीं आहे. हें ब्रह्म आत्मस्वरूपी आहे. हा सर्व दिसणारा सृष्टीचा नामरूपात्मक पसारा मिथ्या असून ब्रह्मतत्वच काय तें खरें ' सत् ' आहे. जीव हा ब्रह्मस्वरूपीच असून त्याच्यापासून भिन्न नाहीं. हीं सर्व शंकराचार्यांनीं आपल्या ब्रह्मसूत्रभाष्यांत प्रतिपादिलेलीं तत्वें टिळकांना पूर्णपणें संमत आहेत. मात्र बाह्यसृष्टि ' मिथ्या ' आहे याचा अर्थ ती ' विनाशी ' आहे असा टिळक करतात. " आचार्य बाह्यसृष्टीला जेव्हां मिथ्या किंवा असत्य म्हणतात तेव्हां बाह्यसृष्टीचें दृश्य नामरूप असत्य म्हणजे विनाशी एवढाच

त्याचा अर्थ समजावयाचा. पण नामरूपात्मक बाह्य देखावा जरी मिथ्या झाला तरी त्याच्या मुळांत कांहीं तरी इंद्रियातीत सत्य वस्तु आहे या सिद्धान्तास त्यानें कांहीं बाध येत नाहीं " ( गीतारहस्य पृ. २१९ ). आतां आचार्यांच्या मिथ्या या शब्दाचा अर्थ टिळकांनीं म्हटल्याप्रमाणें ' विनाशी ' असाच आचार्यांना अभिप्रेत आहे किंवा ' आभासात्मक ', ' असत् ', ' अजीबात खोटें ' असा अभिप्रेत आहे हा वेदान्त्यांनीं विचार करण्यासारखा प्रश्न आहे. असो; शंकराचार्य हेच टिळकांना प्रमाण असल्यानें त्यांचेंच ब्रह्मसूत्रावरील भाष्य व त्यांनीं केलेला सूत्रांचा अर्थ हाच बरोबर म्हणून टिळकांनीं गृहीत धरलेला आहे. उदाहरणार्थ, गी. र. पृ. २६१ मध्यें वेदान्तसूत्र २. १. १४ व १. ४. ३ यांचा शंकराचार्यांनीं दिलेला अर्थ प्रमाण मानून त्यांतील उतारे घेतले आहेत. पुनः—" भागवतधर्मांत ( वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न, अनिरुद्ध ) अशी चतुर्व्यूहरूपी सृष्टीची उत्पत्ति कोणी प्रतिपादन करीत असून दुसरे कित्येक या चार व्यूहांपैकीं तीन, दोन किंवा एक वासुदेवच खरा व्यूह मानणारे आहेत. जीवाच्या उत्पत्ती-बद्दलचीं हीं मतें खरीं नसून अध्यात्मदृष्ट्या जीव सनातन परमेश्वराचाच सनातन अंश होय, असें उपनिषदांच्या आधारें वेदान्तसूत्रांत ठरविलें आहे. ( वे. सू. २. ३. १७, व २. २. ४२–४५ पहा. ) " ( गी. र. पृ. ४२७ ). हा सर्व मजकूर ब्र. सू. शांकरभाष्यास अनुसरून आहे. टिळकांनीं उल्लेखिलेलीं सर्व सूत्रें अत्यंत वादग्रस्त असून त्यांचे भिन्न आचार्यांनीं भिन्न अर्थ केले आहेत. अशीं आणखींहि उदाहरणें देतां येतील. आतां ब्रह्मसूत्रांचा अर्थ निश्चित करणें हा टिळकांचा प्रतिपाद्य विषय नसल्यानें त्यांनीं आपल्यास मान्य असलेला शंकराचार्यांचा अर्थ गृहीत धरून त्याचा उल्लेख केला हें योग्यच झालें.

## गीतेचें तात्पर्य

शंकराचार्यांनीं प्रतिपादिलेलें जें जीवब्रह्मैक्यरूप व जगन्मिथ्यात्वरूप, अध्यात्मिक तत्त्वज्ञान, त्यावरच गीतेच्या कर्मयोगशास्त्राची उभारणी झाली आहे, असें टिळकांनीं दाखविलें आहे. ब्रह्मज्ञान करून घेऊन सिद्धावस्था प्राप्त झालेल्या पुरुषांना दोन ' निष्ठा ' उर्फ वर्तनाच्या रीती गीतेनें सांगितल्या आहेत. ( गीता अ. ३ श्लो. ३ ) एक ज्ञाननिष्ठा व दुसरी कर्मनिष्ठा उर्फ कर्मयोग. पैकीं कर्मयोग हाच श्रेष्ठ असून ज्ञानी झालेला मनुष्य जरी आपल्या इच्छेस अनुसरून कर्मरहित असाहि राहूं शकेल तथापि कर्मयोगाचें आचरण करून लोकसंग्रह करणें व अज्ञ जनांना आपल्या उदाहरणानें धडा घालून देणें हाच दोन्ही मार्गांत प्रशस्ततर मार्ग होय असें गीतेचें म्हणणें आहे, असें टिळकांनीं प्रतिपादन केलें आहे. ब्रह्मात्म्यैक्यज्ञान होऊन सिद्धावस्था प्राप्त झाली म्हणजे तो मनुष्य जसें आचरण करील तसेंच सामान्य लोक करूं लागतात, म्हणून

" जोषयेत् सर्वकर्माणि विद्वान् युक्तः समाचरन् " या न्यायानें त्यानें कर्मयोगाचें आचरण करून लोकांना उदाहरण घालून देणें श्रेयस्कर होय. अशा पुरुषाची व्यवसायात्मक बुद्धि शुद्ध झालेली असल्यामुळें व आत्मौपम्यबुद्धि त्याच्या ठायीं बाणली असल्यानें त्याचें सहजाचरण अत्यंत शुद्ध, पवित्र व धर्म्य असेंच असतें. किंबहुना त्याचें आचरण म्हणजेच कार्याकार्याची व धर्माधर्माची खरी कसोटी होय. कारण त्याची बुद्धि शुद्ध व 'सर्वभूतहितेरत' अशी झालेली असते; आणि शुद्ध बुद्धीनें केलेलें कर्म कधींहि अशुद्ध होऊं शकत नाहीं. पुष्कळांचें पुष्कळ सुख, किंवा उपयुक्ततावाद वगैरेसारख्या कसोट्या नीति, अनीति किंवा कार्य, अकार्य यांचा विवेक करण्यास पुरेशा पडत नाहींत. कारण ह्या कर्माच्या बाह्य परिणामावरून ठरविलेल्या आहेत; आणि कर्माचे बाह्य परिणाम या बाबतींत कधीं निर्णायक मानतां येत नाहींत. एकादा ढोंगी मनुष्य देखील बाह्यतः इष्टपरिणामी असें कृत्य कांहीं वेळ करील. तेव्हां कर्त्याची शुद्ध बुद्धि हेंच कार्याची शुद्धता ठरविण्याचेंहि साधन होय व ब्रह्मज्ञानी कर्मयोग्याची बुद्धि निःसंशय शुद्ध झालेली असल्यामुळें त्याचें आचरण व उपदेश हीच कार्याकार्याची खरी कसोटी होऊं शकते. अशा रीतीनें पाश्चात्य तत्वज्ञांच्या नीतिशास्त्रापेक्षां आत्मौपम्यबुद्धीची कसोटी दाखवून देणारें आमचें गीतेंतील नीतिशास्त्र कितीतरी पटींनीं श्रेष्ठ होय असें टिळकांनीं मोठ्या सुंदर रीतीनें सिद्ध केलें आहे (गीतारहस्य, प्रकरण १२).

आतां सर्व वासनांचा क्षय होऊन वासनात्मक बुद्धि व व्यवसायात्मक बुद्धि शुद्ध होण्याला, त्याचप्रमाणें ब्रह्मज्ञान होऊन सिद्धावस्था प्राप्त होण्याला साधन कोणतें ? फलाशा सोडून चित्तशुद्धिकारक कर्में करीत राहणें हें तर प्राथमिक साधन आहेच; परंतु याबरोबरच उपनिषदांत सांगितलेल्या अव्यक्त प्रतीकांच्या उपासना किंवा गीतेंत व भागवत धर्मांत सांगितलेली सगुण परमेश्वराची भक्ति असेहि दोन मार्ग आहेत. यांपैकीं पहिल्यास अध्यात्मविचार, उपासना अथवा ज्ञानमार्ग ( सिद्धावस्थेंतील ' ज्ञाननिष्ठा ' नव्हे ) अशीं नांवें आहेत व दुसऱ्यास भक्तिमार्ग असें नांव आहे. ( गीतारहस्य पृ. ४११, ४१२ ) यांतील पहिला मार्ग ' क्लेशोधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम् । अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते ' या गीतेंतील ( १२–५ ) श्लोकांत सांगितल्याप्रमाणें क्लेशकारक व अवघड आहे. परंतु भक्तिमार्ग हा त्यांतील प्रेमळपणामुळें, सुलभपणामुळें व अबालवृद्ध स्त्रीशूद्रादिकांस प्राप्य असल्यामुळें जास्त उपयुक्त व प्रशस्त होय, असें भगवंतांच्या वचनास ( गी. ९–२ ) अनुसरून टिळकांनीं प्रतिपादन केलें आहे. किंबहुना ' गीतेंत जो गोडवेपणा, प्रेमळपणा किंवा रस भरला आहे तो त्यांत प्रतिपादन केलेल्या भक्तिमार्गाचाच परिणाम आहे ' ( गी. र. ४१५ ) असेंच टिळकांचें मत आहे.

## तत्त्वज्ञान विषयाचा एक कोशच

गीतारहस्यांतील मुद्याच्या गोष्टींपैकीं कांहीं गोष्टींचा अत्यंत संक्षिप्त व अस्पष्ट असा उल्लेख वर केला. गीतारहस्याखेरीज इतरत्र तात्विक विषयांवर टिळकांनीं कांहीं थोडें बहुत लिहिलें आहे व प्रसंगोपात्त कांहीं व्याख्यानेंहि दिलीं आहेत. हरबर्ट स्पेन्सरसाहेबांच्या मृत्यूनंतर लेख लिहितांना त्यांनीं स्पेन्सरसाहेबांचें तत्त्वज्ञान कांहीं गोष्टींत वेदांताशीं कसें जुळतें व कांहीं गोष्टींत वेदान्ताशीं विरुद्ध कसें आहे हें दाखवून दिलें होतें. त्याचप्रमाणें त्यांचें कांहीं लेख आधुनिक शास्त्रांच्या शोधांनीं आत्म्याचें अस्तित्व व वेदान्त्यांचीं इतर तत्वें पाश्चात्यांना कशीं पटत चाललीं आहेत हें दाखविण्याकरितां लिहिले आहेत. प्रसंगोपात्त गीतारहस्यांत हे विषय व याखेरीज इतर शेंकडों विषय येऊन गेले आहेत. मराठी भाषेंत तत्त्वज्ञान विषयाचा तो एक कोशच ( Encyclopaedia ) बनून राहिला आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

## धर्मांत आचाराचें प्राधान्य

आतां धर्माच्या आचारभागाकडे वळूं. प्रारंभींच हें सांगितलें पाहिजे कीं, आचार हा धर्माचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे हें त्यांना ( टिळकांना ) पूर्णपणें कबूल होतें. म्हणूनच—

**प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु साधनानामनेकता ।**
**उपास्यानामनियमश्चैतद्धर्मस्य लक्षणम् ॥**

हें हिंदुधर्माचें केवळ व्यावर्तक लक्षण पुरेसें न वाटून त्यांनीं त्याला मागाहून आचारांचें आवश्यकत्व दर्शविणारी—

**धर्ममेनं समालम्ब्य विधिभिः संस्कृतस्तु यः ।**
**श्रुतिस्मृतिपुराणोक्तैः क्रमप्राप्तैरथापि वा ॥**
**स्वे स्वे कर्मण्यभिरतः श्रद्धाभक्तिसमन्वितः ।**
**शास्त्रोक्ताचारशीलश्च स वै हिंदुः सनातनः ॥**

अशी पुस्ती जोडली होती. ते स्वतः जरी धर्माचार विशेष अगत्यानें पाळीत नसत तरी आचारांचें महत्त्व त्यांना पूर्णपणें कबूल होतें हें आपण पूर्वी पाहिलेंच आहे. "केवळ गीता किंवा बायबल वाचिल्यानें कोणी हिंदु अगर ख्रिस्ती होऊं शकत नाहीं; तसें होण्यास त्या त्या धर्मांतील विशिष्ट संस्कारविधि किंवा आचारच पाळावे लागतात." ('हिंदुधर्माचें स्वरूपलक्षण' चित्रमयजगत्, जानेवारी १९१५ ). वर दिलेल्या हिंदु मनुष्याच्या श्लोकबद्ध लक्षणावरून टिळकांचीं पुष्कळ मतें समजून येतात. एक तर कोणीहि हिंदु म्हटला म्हणजे तो धार्मिक मानल्या गेलेल्या विधींनीं संस्कृत असला पाहिजे; मग ते विधि श्रुतिस्मृतिपुराणोक्त असोत अथवा क्रमप्राप्त असोत. यावरूनच वेदस्मृतिप्रमाणें पुराणांचा

धार्मिक बाबतींतील अधिकार त्यांस मान्य होता असेंहि स्पष्ट दिसतें. अलीकडे पुराणांच्या अधिकाराविषयीं संशय घेण्यास सुरुवात झाली आहे; तेव्हां हें टिळकांचें मत या कालीं कित्येकांस विचाराई वाटेल. 'क्रमप्राप्तैः' या शब्दावरून धर्माचारांत कालक्रमानें होणारा बदल त्यांस मान्य व संमत होता असें दिसून येतें. तेव्हां धर्माला चालना देऊन त्यांत परंपरेनें अनुसरून योग्य तो बदल करण्याच्या विचारास सामान्यतः त्यांचें अनुकूल मत होतें असें यावरून दिसतें.

धार्मिक विधि व आचार त्यांस आवश्यक वाटत होते व त्यांस अनुसरूनच त्यांनीं हिंदुधर्माचें स्वरूपलक्षण बांधलें होतें. आतां हे धार्मिक आचार सामान्यतः दोन प्रकारचे असतातः—१ पारमार्थिक आचार व २ लौकिक आचार. लौकिक आचारांमध्यें पुनः दोन भेद पाडतां येतील; (१) केवळ व्यक्तीच्या उन्नतीस व शुद्धीस कारणीभूत होणारे आचार व (२) समाजधारण करून समाजाची संघटना कायम ठेवणारे आचार. म्हणजे धार्मिक आचार एकंदर तीन प्रकारचे झाले. आचारांचे अशा रीतीनें भेद करण्याची पद्धत येथेंच नवीन काढली आहे असें नाहीं. वैदिक काळापासून असे तीन तऱ्हेचे धर्माचार चालत आलेले आहेत व प्रत्येक प्रकारच्या आचार–नियमांकरितां निरनिराळे सूत्रग्रंथ अस्तित्वांत आलेले आहेत. वैदिक काळचा पारमार्थिक आचार म्हणजे श्रौत यज्ञयाग–त्यांचें विवरण करणारीं श्रौतसूत्रें प्रसिद्ध आहेत. व्यक्तीच्या व कुटुंबाच्या उन्नतीकरितां सांगितलेले आचार म्हणजे स्थालीपाक, पिण्डपितृयज्ञ, पंचमहायज्ञ व गर्भधानादि सोळा संस्कार वगैरे, या सर्व विषयांचें कथन करणारीं सूत्रें आहेत त्यांस गृह्यसूत्रें असें म्हणतात. याखेरीज केवळ समाजधारणास उपयोगी पडणाऱ्या ज्या ज्या संस्था म्हणजे चातुर्वर्ण्य, जाति, राजा वगैरे, त्यांसंबंधींचे नियम सांगणारीं जीं सूत्रें त्यांस धर्मसूत्रें असें म्हणतात. हीं धर्मसूत्रें सध्यां फारशीं प्रसिद्ध नाहींत. कारण वेदांगांमध्यें त्यांचें पठण करीत नाहींत. तथापि मानवधर्मसूत्र वगैरे कांहीं यांपैकीं उपलब्ध आहेत.

वरील स्पष्टीकरणावरून वेदकालीन आचारविभागांची कांहींशी कल्पना होईल. हेंच विभागाचें तत्व सद्यःकालीन आचारांना लागू केल्यास खालीलप्रमाणें वर्गीकरण करतां येईल.

१ पारमार्थिक आचारः––याच्यामध्यें वैदिक यज्ञयाग व कर्मकांड उपनिषदांचा उपासनामार्ग, भागवतधर्म व भक्तिमार्ग, योगमार्ग, कर्ममार्ग वगैरे निरनिराळे ईश्वरप्राप्ति करून घेण्याचे जे मार्ग प्रसिद्ध आहेत त्यांचा समावेश होईल.

२ गृह्याचार किंवा व्यक्तिविषयक आचारः––यांच्यामध्यें, पंचमहायज्ञ, सोळा संस्कार, श्राद्धपक्ष, व्रतवैकल्य वगैरे सर्व स्मार्त धर्मांचा व प्रसंगविशेषीं पुराणोक्त धर्मांचा समावेश होईल. धर्मसिंधु, व्रतराज वगैरेसारख्या ग्रंथांत सांगितलेले आचार, व्रतें यांचाहि यांतच समावेश होईल.

३ समाजविषयक आचारः—याच्यांत चातुर्वर्ण्य, निरनिराळ्या जाती, त्या जातींमधील परस्पर रोटीबेटीव्यवहार, वगैरे जातिभेदाच्या प्रश्नांशीं संलग्न असलेल्या सर्व बाबींचा समावेश होईल. त्याचप्रमाणें परदेशगमन, भक्ष्याभक्ष्य-निर्बंध, अस्पृश्यविचार वगैरे प्रश्नांचा यांतच समावेश होईल.

## समाजविषयक आचार, चातुर्वर्ण्य व जातिभेद.

आतां शेवटाकडून सुरुवात करून वरील तीनहि मोठ्या विभागांपैकीं प्रत्येका-संबंधीं टिळकांचीं मतें काय होतीं हें थोडक्यांत अजमावून पाहण्याचा प्रयत्न करूं. शेवटचा विभाग समाजधारणा करणाऱ्या आचारांचा होय. यांच्यापैकीं जातिभेद व जातिभेदाचें मूळ स्वरूप चातुर्वर्ण्य हेच काय ते प्रमुख मध्यवर्ती विषय होत. जातिभेद हा सध्याच्या स्वरूपामध्यें व पूर्वींच्या चातुर्वर्ण्याच्या स्वरूपामध्यें समाजधारणाला अत्यंत जरूर असून प्रत्येक जातीनें आपआपलें वैशिष्ट्य कायम ठेवण्यांतच हिंदुसमाजाचा तरणोपाय आहे असें टिळकांना वाटत असे. जातिभेद मोडून टाकूं इच्छिणाऱ्यांचे प्रयत्न त्यांना पसंत नसत. सामाजिक परिषदेविषयीं लिहितांना २४।१२।१८९५ च्या केसरींत ते म्हणतात–" मग सर्व जातिभेद व धर्मभेद मोडून टाकून सबगोलंकार करण्याचा परिषदवाल्यांचा हेतु असल्यास न कळे. " 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः' हा हिंदु-समाजाचा पाया आहे असें त्यांचें मत होतें. आर्य लोक प्रथम येथें आले, त्या वेळीं येथें प्रथम जे कृष्ण वर्णाचे अनार्य लोक होते त्यांच्याशीं आर्यांची भेसळ झाल्यामुळें प्रथम निरनिराळे 'वर्ण' उत्पन्न झाले व जातिभेदाचा प्रादुर्भाव झाला, अशी जातिभेदाची ऐतिहासिक उपपत्ति इतर कांहीं संशोधक पंडितांनीं बसविलेली होती तीच टिळकांनीं मान्य केली होती. याशिवाय आपआपल्या गुणकर्मांचें वैशिष्ट्य राखण्याकरितांहि नवीन जाती उत्पन्न झाल्या असाव्या व जुन्या टिकून राहिल्या असाव्या असें त्यांचें मत होतें. पुढील उतारा जरा लांब आहे खरा, परंतु जातिभेदाची उत्पत्ति, त्याची वाढ व त्याची सध्यांच्या स्थितींत आवश्यकता या सर्व प्रश्नांसंबंधीं टिळकांचीं मतें त्यांत स्पष्टपणें प्रतिबिंबित होत असल्या कारणानें तो येथें देण्याचें साहस केलें आहे. ता. १६ मे १८९३ च्या केसरींत ते म्हणतात— ' वेदकालीं जे आर्य लोक हिंदुस्थानांत आले ते मांसाहार निषिद्ध मानीत नसत. तथापि, त्यांचा आणि हिंदुस्थानांतील मांसाहारी काळे लोकांचा 'वर्ण' एक नसल्यामुळें या दोहोंत जो भेद राहिला, तो अद्यापहि नाहींसा झाला नाहीं. जातिभेदाचें आद्यबीज या वर्णभेदांतच आहे, असें आतां पुष्कळ विद्वानांचें मत झालें आहे.... हिंदुस्थानांत उत्तरेकडून आलेल्या लोकांनीं दस्यूंची पारध केली नाहीं अगर त्यांस ती करतां आली नाहीं, हें आमच्यांतील जातिभेदांचें मूळ बीज होय. शूद्रादिकांस आर्यांचे कांहीं हक्क देऊन त्यांचा

चातुर्वर्ण्यांत समावेश केला व गोडीगुलाबीनें आम्ही त्यांच्याशीं बरींच वर्षें काढलीं....आतां एकदां कोणताहि वृक्ष वाढीस लागला असतां त्यास जशा फांद्या फुटतात त्याप्रमाणें निरनिराळ्या वर्णांच्या उर्फ जातींच्या लोकांमधील वर सांगितलेला भेद वाढत जाऊन त्यास हजारों शाखा फुटल्या व चातुर्वर्ण्याच्या ऐवजीं आज हिंदुस्थानांत हजारों जाती झाल्या आहेत. या सर्व जाती एकवट व्हाव्या अशी आशा करणें म्हणजे बहुतेक अमेरिकेंतल्या युरोपियन लोकांनीं नीग्रोशीं सोयरिकी कराव्या असेंच म्हणण्यासारखें आहे. मानवी स्वभावांत किंबहुना मनुष्याच्या रक्तांत ज्या कांहीं समजुती खिळून गेल्या आहेत त्यांपैकींच वर्णव्यवस्था ही एक समजूत होय....धर्मांतर केलेल्या नेटिवांची खिस्ती राज्यकर्त्यांकडून कशी संभावना होत आहे, हें लक्षांत आणलें म्हणजे रोटीव्यवहार किंवा धर्मैक्य हीं दोन जातींचीं एक जात होण्यास कधींच फारशीं कारणीभूत होत नाहींत हें लक्षांत येईल....याखेरीज दुसरा असाहि प्रश्न आहे कीं, निरनिराळ्या जातींत जे कांहीं विशिष्ट गुण आहेत व जे "चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः" या भगवद्गीतेंतील वचनाप्रमाणें अगदीं सृष्टीच्या आरंभापासून त्या त्या जातींत आढळून येत आहेत ते कायम राखण्यास त्या त्या जातींतील विवाहसंबंध व सोयरिकी जातींतल्या जातींतच झाल्या पाहिजेत. असा प्रतिबंध नसता, तर हिंदुस्थानसारख्या उष्ण प्रदेशांत आमच्या अंगचे गुण केव्हांच लुप्तप्राय होऊन आम्ही अगदीं नीच स्थितीप्रत पावलों असतों असें एका विद्वान् इंग्रज ग्रंथकाराचें म्हणणें आहे....करितां कोणत्याहि गुणाचें येथें संरक्षण करणें झाल्यास तो गुण संभाळून ठेवण्याचें काम विशिष्ट लोकांनीं आपल्या हातांत घेतलें पाहिजे, व हें काम जे लोक हातांत घेतात त्यांची कांहीं दिवसांनीं एक निराळी जातच बनून जाते. वर भगवद्गीतेंतील जें वचन दिलें आहे त्यांत गुणकर्मविभाग जो सांगितला आहे तो हाच होय. ह्यांत मूळच्या आर्यदस्यूंच्या वर्णभेदाची भर घातली म्हणजे हिंदुस्थानांतील हल्लींच्या जातिभेदाची उत्पत्ति व कारणें कळून येतात.'

"हल्लीं आपल्या देशाची स्थिति म्हटली म्हणजे निरनिराळ्या जातींच्या अंगीं असलेले गुण वाढविण्याचा प्रयत्न करून त्यांतूनच होईल तितकें राष्ट्राचें हित करून घ्यावयास पाहिजे आहे. बेटीव्यवहाराखेरीज निरनिराळ्या जाती सारख्या योग्यतेच्या राहूं शकतात हें ब्राह्मण जातींतील पोटभेदावरून दिसून येतें. हाच नियम सर्वत्र लागू केला असतां हिंदुस्थानची उन्नति होण्यास देशांतील सर्व जातींची एक जात होईपर्यंत वाट पहाण्याची कांहींएक जरूर नाहीं असें अनुमान काढण्यास हरकत दिसत नाहीं."

या उताऱ्यावरून, वर्णव्यवस्थेचें व जातिभेदाचें मूळ 'वर्ण' ( colour ) भेदांत किंवा वंश ( race ) भेदांत असल्यामुळें तो नाहींसा करणें शक्य नाहीं

व निरनिराळे विशिष्ट गुण कायम राखण्याकरितां जातिभेदाचें प्रतिपालन करणेंच इष्ट आहे असें टिळकाचें मत असल्याचें स्पष्ट दिसतें. अर्थात् भिन्न जातींमधील रोटीबेटीव्यवहार, निदान बेटीव्यवहार तरी, या स्थितींत इष्ट नाहीं असेंच त्यांचें मत उघड होतें. जातिभेद आहे त्याच स्थितींत कायम ठेवावा असें त्यांस वाटत होतें; यावरून प्राचीन काळच्या चातुर्वर्ण्याचें पुनरुज्जीवन करून शेंकडों जातींच्या चार जाती कराव्या अशी सध्यांच्या काळीं पुढें येत असलेली कल्पना त्यांस फारशी पसंत नसावी असेंहि दिसतें. आतां हे त्यांचे विचार १८९३ सालीं प्रकट झालेले आहेत. तेव्हांपासून १९२० सालापर्यंतच्या दीर्घ अवधीमध्यें त्यांचीं मतें कांहींशीं परिणत झालीं असतील; तथापि १९१५ सालीं लिहिलेल्या 'हिंदुधर्माचें स्वरूपलक्षण' या लेखांत चातुर्वर्ण्याची उत्पत्ति आनुषंगिक रीतीनें कथन करितांना त्यांनीं वरील उताऱ्यांतील विचारांचाच अनुवाद केला आहे. यावरून त्यांच्या मतांत शेवटपर्यंत फारसा फेरबदल झाला होता असें वाटत नाहीं. असें जरी असलें तरी सध्यांच्या जातिव्यवस्थेंत कांहींच सुधारणा होऊं नयेत असें त्यांचें मत नव्हतें. कारण वरील १६ मे १८९३ च्या केसरीच्या अंकांत पुढील-प्रमाणें मर्यादित सुधारणा त्यांनीं सुचविल्या आहेत. "कारकुनी, शिपाईगिरी, व्यापार इ० जे धंदे आहेत ते तूर्त जातिपरत्वें आहेत तसेच कायम ठेवून धंदा बदलण्याची कोणाची इच्छा असल्यास त्यास तसें करतां येण्याची सवड ठेवावी, आणि व्यवहारांत ज्याचा त्याचा मान ज्याच्या त्याच्या योग्यतेवर व गुणांवर अवलंबून रहावा, एवढी व्यवस्था सध्यां होणें इष्ट आहे व शक्यहि आहे. जाति-बंधनें पूर्वीच्या इतकीं आतां कडक रहाणें शक्य नाहीं, ही गोष्ट आम्हांसहि मान्य आहे, व त्यांपैकीं कांहीं बंधनें तर लवकरच नाहींशीं झालीं पाहिजेत असेंहि आमचें मत आहे."

## अस्पृश्यता

अस्पृश्यतेच्या इष्टानिष्टतेविषयीं त्यांचें स्पष्ट मत कोठें प्रकट झालेलें असल्याचा दाखला मिळत नाहीं. मात्र कांहीं वर्षांपूर्वी मुंबई येथें श्री. सयाजीराव महाराज गायकवाड यांचे अध्यक्षतेखालीं सामाजिक परिषद भरली असतां तेथें टिळकांनीं अस्पृश्योद्धाराचे ठरावावर भाषण केलें व त्या भाषणांत "अस्पृश्यता ही वैदिक धर्मास संमत नाहीं" असें सांगितलें असल्याचें स्मरतें. हल्लींचे मराठे हे क्षत्रिय होत कीं नाहींत या प्रश्नासंबंधानें त्यांनीं कोठें स्पष्ट मत दिलेलें दिसत नाहीं. परंतु त्यांनीं वेदोक्त संस्कार करूं नयेत असें केसरींत प्रतिपादन केलेलें आहे. यावरून कदाचित् त्यांचें क्षत्रियत्व त्यांना निर्विवादपणें मान्य नसावें असें दिसतें. परदेश-गमनासंबंधीं त्यांचें निखालस अनुकूल मत होतें. मात्र समाजधारणाकरितां व संपर्कदोषनिरसनाकरितां परदेशास गेलेल्यानें परत आल्यावर प्रायश्चित्त घेतलें

पाहिजे असें आपलें मत त्यांनीं आपल्या कृतीनेंच प्रकट केलें होतें हें सुप्रसिद्ध आहे. भक्ष्याभक्ष्य व पेयापेय निर्बंधांसंबंधानें त्यांचें स्वतःचें आचरण अगदीं निर्मळ होतें व त्यांचें मतहि त्यांच्या आचरणाप्रमाणेंच होतें हें सांगण्याची जरूरी नाहीं. आतां ज्या ज्या जातीस जे जे पदार्थ भक्षण करण्याची शास्त्रास अनुसरून सवलत आहे ते ते पदार्थ त्यांनीं भक्षण केल्यास अर्थातच दोष नाहीं. परंतु आपले वेदकालीन पूर्वज मांस भक्षण करीत असत म्हणून आपणहि केल्यास काय हरकत आहे असें वाह्यात प्रतिपादन त्यांनीं कधीं केलें नाहीं.

## 'कोंकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे'

निरनिराळ्या जातींत शरीरसंबंध सुरू करून सबगोलंकार करावा असें टिळकांचें मुळींच मत नव्हतें, उलट जातींचें प्रतिपालन करणें हेंच त्यांस इष्ट वाटत होतें, हें वर आलेंच आहे. परंतु ज्या लहान लहान पोटजातींचा उद्भव गुणकर्मविभागामुळें झालेला नाहीं, तर केवळ प्रांतभेदामुळें किंवा इतर आनुषंगिक कारणांमुळें झालेला आहे व ज्या जातींमध्यें अन्नोदक व्यवहार सर्रास चालू आहे अशा जातींत परस्पर शरिरसंबंध घडून येण्यास कांहीं हरकत नसावी असें त्यांस वाटत होतें. अशा तऱ्हेच्या पोटजातींचें प्रसिद्ध उदाहरण म्हणजे ब्राह्मण जातींतील कोंकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे यांचें होय. ब्राह्मणांतील या तीन जातींमध्यें विवाहसंबंध घडून यावे असें त्यांचें ठाम मत होतें. केसरी पत्र सुरू झाल्यानंतर १५ दिवसांच्या आंतच या मताच्या समर्थनपर दोन लेख त्यांत प्रसिद्ध झाले होते. त्यानंतर १९०० सालीं 'कोंकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे' याच मथळ्याखालीं दोन अग्रलेख आले आहेत.* अर्थात् हे लेख टिळकांच्या मताचे दर्शक म्हणून निर्विवादपणें मानण्यास कांहीं हरकत नाहीं. "कोंकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे ब्राह्मणांचा त्रिवर्ग भेद देशपरत्वें आहे; शास्त्रोक्त नव्हे." धर्मशास्त्रांत ब्राह्मणांतील पोटजातींचा कोठेंच उल्लेख नाहीं; अर्थात् त्यांच्या एकमेकांमधील विवाहास प्रतिबंध केलेला असणें तर मुळींच शक्य नाहीं. तेव्हां 'सवर्णेभ्यः सवर्णासु जायन्ते हि सजातयः' या व्यापक वचनास अनुसरून या तीनहि ब्राह्मण जातींत परस्पर विवाह होण्यास कांहीं हरकत नाहीं. शास्त्रास अनुसरून हा विचार झाला. व्यावहारिक दृष्टीनें पाहिलें तरी असे विवाह रूढ होणें ब्राह्मण जातीच्या हिताचेंच आहे. सध्यां कित्येक पोटजातींत अनुरूप वर मिळण्याची मुलींच्या बापांस फार पंचाईत पडते. शिवाय शरीरसंबंधाची मर्यादा विस्तृत करणें वैद्यकशास्त्राच्या दृष्टीनेंहि इष्ट असून त्यामुळें पुढील पिढ्यांत अवगुणांचा ऱ्हास होऊन गुणांची वृद्धि होईल. अशा तऱ्हेचा

---

* केसरी १३ नोवेंबर १९००; व २० नोवेंबर १९००.

या लेखांतील एकंदर मथितार्थ असून ज्यांना अशा तऱ्हेचे विवाह इष्ट वाटत असतील त्यांनीं त्याप्रमाणें कृति करून दाखविण्याचा उपक्रम करावा, केवळ शंकराचार्योंकडे अर्ज–विनंत्या करण्यांत काळ दवडूं नये अशी शेवटीं सूचना केली आहे.

## गृह्य संस्कार; वेदोक्त संस्काराबद्दलचा वाद

आतां षोडश संस्कार, पंचमहायज्ञ, श्राद्धपक्ष वगैरे गृह्य किंवा कौटुंबिक आचारांसंबंधीं त्यांचीं काय मतें होतीं याचा थोडक्यांत विचार करूं. या गृह्याचारांच्या आवश्यकतेविषयीं त्यांचे विचार काय होते ते मागें हिंदुधर्माचें स्वरूपलक्षण या लेखांतून उतारा घेतला आहे त्यांत दिग्दर्शित झालेंच आहे. तथापि वे. शा. सं. रा. वामनशास्त्री किंजवडेकरांच्या संस्कारमीमांसा नामक पुस्तकास त्यांनीं जो इंग्रजी उपोद्घात लिहिला आहे त्यांत हीं मतें विशेष स्पष्ट रीतीनें आलीं आहेत. त्या उपोद्घातांत ते म्हणतातः— Every religious Community requires that its members should lead a particular kind of domestic life in order to obtain admission into that religious community and maintain their social and religious status therein. The rites and the acts prescribed in this behalf have thus a clear socio-religious purpose in view. To belong to a particular religion a man must live in a particular way, marry in a particular way, pray in a particular way and be initiated into that community in a specific manner.......According to the terminology of the Vedic writers these (rules) constitute our Grihyasamskaras or what is loosely expressed by translating that phrase into "domestic rites." सर्व गृह्याचार जरी नाहींत तरी सध्यांच्या काळीं संस्कार हे हिंदुमात्रास अगदीं आवश्यक आहेत असें त्यांचें म्हणणें होतें. वैदिक काळीं हे संस्कार त्रैवर्णिकांना विहित होते. पुढें स्मृतिकालीं व पुराणकालीं शूद्रांना देखील हे संस्कार लागू करण्यांत आले. मात्र त्यांना वेदाधिकार नसल्याकारणानें त्यांचे संस्कार वेदोक्त न करतां पुराणोक्त करण्यांत येऊं लागले. सध्यांच्या वेळेपर्यंत हीच पद्धति अमलांत आहे व तीच एकंदरीनें योग्य आहे असें टिळकांचें मत होतें. मध्यंतरीं क्षत्रिय व वैश्य यांचा लोपच झाल्यासारखा झाल्याकारणानें वैदिक मंत्रोच्चार फक्त ब्राह्मणांच्या संस्कारांत होऊं लागला; इतर सर्व जातींचे संस्कार

पुराणोक्तच होऊं लागले. आतां मराठे इत्यादिकांस क्षत्रित्वाचा अभिमान उत्पन्न होऊन आपणास वेदोक्त संस्कार असावे असा आग्रह सुरू झाला आहे. यावर केसरींत प्रसिद्ध झालेलें टिळकांचें म्हणणें पुढीलप्रमाणें होतें.—"वेदोक्त मंत्र संस्काराचे वेळीं म्हटल्यानें कोणत्याहि जातीस श्रेष्ठपणा येतो किंवा संस्कार अधिक शास्त्रोक्त होतो अशी जर कोणाची समजूत असेल तर ती चुकीची आहे. कारण ब्राह्मण जातींत देखील स्त्रियांचे संस्कार, व्रतें, पूजा वगैरे पुराणोक्तच होतात. पण तेवढ्याकरितां ब्राह्मणाच्या सर्व स्त्रिया शूद्र जातीच्या आहेत असें कोणी मानीत नाहीं. सोळा संस्कारांत ज्या निरनिराळ्या क्रिया आहेत त्या चालवितांना वेदोक्त मंत्र म्हणण्याची आवश्यकता आहे असें नाहीं....गर्भाधानापासून अंत्येष्टिपर्यंत शास्त्ररीत्या संस्कार होणें हें जितकें अवश्य, तितकेंच तें वैदिक मंत्रानें झाले पाहिजेत हें अवश्य नाहीं. आणि वैदिक मंत्रांनीं संस्कार झाले म्हणजे मराठे व ब्राह्मण एक जातीचे होतील अशी जर कोणाची कल्पना असेल तर तीहि निर्मूल आहे....दुसरी लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट अशी कीं, मराठे लोकांस आपण खरे क्षत्रिय असें जर वाटत असेल तर आपलें क्षात्रतेज व्यक्त करण्यास वेदोक्त मंत्रांनीं श्रावणी करणें हा कांहीं खरा मार्ग नव्हे. ज्या लोकांच्या पूर्वजांनीं गेल्या शतकांत मुसलमानी राज्याची लाट मागें हटवून हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन केलें, ते जातीनें अस्सल क्षत्रिय असोत कीं नसोत, त्यांची योग्यता स्नानसंध्या करून धर्म राखणाऱ्या ब्राह्मणांपेक्षां कोणत्याहि रीतीनें कमी आहे असें आम्ही मानीत नाहीं." हा उतारा केसरींत १९०१ सालीं "वेदोक्त आणि मराठे" या मथळ्याखालीं दोन लेख प्रसिद्ध झाले होते त्यांपैकीं दुसऱ्या लेखांतून घेतला आहे.* केवळ हा उताराच लक्षांत घेतला तर त्यांतील

---

* केसरी, २२ आक्टोबर व २९ आक्टोबर १९०१. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या "लो. टिळक यांच्या आठवणी व अख्यायिका" या पुस्तकांत रा. सी. के. बोले यांनीं दिलेल्या आठवणींत 'वेदोक्त प्रकरणावरील लेख माझ्या पश्चात् लिहिला गेला' असें टिळकांनीं सांगितल्याचें लिहिलें आहे. प्रस्तुत आठवणींतील मजकूर संदिग्ध व घोटाळ्यांत पाडणारा आहे. ज्या एका 'वेदोक्त प्रकरण' नांवाच्या लेखाचा रा. बोले यांनीं उल्लेख केला आहे तो केव्हां प्रसिद्ध झाला हें त्यांनीं सांगितलेलें नाहीं. १९०१ सालीं लिहिलेले 'वेदोक्त व मराठे' हे दोन लेखच त्यांना अभिप्रेत आहेत असें मानलें तर ते लेख प्रत्यक्ष टिळकांनीं स्वतः लिहिलेले नाहींत एवढेंच फार तर सिद्ध होईल. त्या लेखांतील विचार टिळकांना पसंत नव्हते असें कदापि म्हणतां येणार नाहीं. केसरी टिळकांच्या नांवावर असतांना त्यांत आलेलीं मतें टिळकांचीं असा साधार समज सर्वत्र प्रचलित आहे.

युक्तिवाद मराठ्यांच्या वेदोक्ताच्या मागणीस विरुद्धच आहे. तथापि वरील दोन लेखांतील प्रतिपादन एकंदरीनें जर पाहिलें तर तें वेदोक्ताच्या तितकेसें विरुद्ध नाहीं असें आढळून येतें. आपलीं वेदोक्तासंबंधींचीं मतें दुसऱ्यांवर त्यांच्या खुषीविरुद्ध लादण्याचा आग्रह धरून निष्कारण बखेडा माजविण्याचा जो कित्येकांनीं उपक्रम केला होता त्यावरच या लेखांचा सर्वस्वी रोंख आहे. विशेषतः कित्येक संस्थानिकांनीं आपल्या प्रजाजनांपैकीं कित्येकांना वेदोक्तास संमति न दिल्याबद्दल धाक दाखविण्याचा व त्यांचीं इनामें जप्त करण्याचा राजधर्मानुचित मार्ग स्वीकारला होता त्याचाच या दोन्ही लेखांत मुख्यतः निषेध केला आहे. ता. ५ नोव्हेंबर १९०१ च्या केसरींत याच विषयावर लिहितांना टिळक स्पष्टच म्हणतात कीं, " कोणत्याहि विशिष्ट जातीनें हिंदुधर्मशास्त्रांत आधार असतील तितके हक्क मिळवूं नयेत असें आमचें कधींच म्हणणें नाहीं....कोणास वेदोक्त संस्कार करावयाचा असल्यास तो खुशाल करावा; पण त्याकरितां हातांत सत्ता आहे म्हणून अमक्याचें इनाम जप्त कर, अगर आमक्या देवस्थानच्या वहिवाटींत हात घाल, येथपर्यंत जी कित्येक संस्थानिकांची मजल येऊन ठेपली आहे ती अगदीं चुकीची आहे येवढेंच आमचें सांगणें आहे." तेव्हां टिळक तात्विक दृष्ट्या मराठे वगैरे जातींनीं वेदोक्त संस्कार करण्याच्या विरुद्ध नव्हते असें यावरून दिसतें. त्याचप्रमाणें मराठ्यांचें क्षत्रियत्वहि त्यांस तत्वतः कबूल असावें; परंतु सध्यांच्या वहिवाटींत जबरीनें बदल करून निष्कारण दुही माजवूं नये असें त्यांचें मत असल्या कारणानें वेदोक्ताचें बंड उभारणाऱ्यांच्या विरुद्ध त्यावेळीं केसरींत लेख आलेले आहेत.

खुद्द संस्कारांसंबंधानें पाहतां ते सूत्रोक्त पद्धतीनें करावे अगर नारायणभट्टादिकांच्या प्रयोगग्रंथावरून करावे असा वादविवाद मध्यंतरीं निघाला होता. तथापि या दोहोंपैकीं कोणच्याच पक्षासंबंधानें टिळकांचा आग्रह नव्हता. खुद्द सूत्रोक्त संस्कारांचा अभिनिवेश धरून लिहिलेल्या वे. शा. सं. रा. किंजवडेकर यांच्या 'संस्कारमीमांसा' नामक पुस्तकास प्रस्तावना लिहितांना त्यांनीं पुढीलप्रमाणें केवळ त्रयस्थास शोभेल असा मजकूर लिहिला आहे. "This view of the Dharmashāstra so far as these Samskāras are concerned, has of late, created a desire in many to have the domestic rites in their houses performed in the manner laid down in the Grihyasūtras, and the present treatise is an attempt to supply the desideratum." (Intro. p. 5).

## विवाहविषयक सुधारणा; पुनर्विवाह

सोळा संस्कारापैकीं सध्यां प्रामुख्यानें गर्भाधान, उपनयन, विवाह व अंत्येष्टि असे चारच काय ते प्रचारांत शिल्लक राहिले आहेत. पैकीं पहिल्याविषयीं 'सूत्रांत (म्ह० आश्वलायन सूत्रांत) प्रचलित पद्धतीचा गर्भाधान संस्कार दिलेला नाहीं, तेव्हां तो न केल्यानें वैदिक धर्माविरुद्ध आचरण केलें असें होत नाहीं' असा केसरींत १८८३ सालीं लेख आला होता. तो टिळकांचा असावा असें टिळकचरित्रांत म्हटलें आहे. (टि. च. पूर्वार्ध पृ. १७५). आतां वरील लेख सूत्रग्रंथास अनुसरून लिहिला होता तेव्हां त्याबद्दल म्हणण्यासारखें कांहीं नाहीं. परंतु त्यावेळच्या एकंदर सुधारकांस गर्भाधान या धार्मिक संस्काराची मोठी चीड येत असे असें दिसतें. विशेषतः आगरकर या संस्कारासंबंधीं लिहितांना अगदीं चरफडून जात असत असें त्यांच्या चिरडीस गेलेल्या कित्येक उद्गारांवरून दिसून येतें. विवाहाविषयीं पाहिलें असतां विवाहसमयीं मुलीचें वय १६ व मुलाचें २० असावें अशी सुधारणा टिळकांनीं संमति-बिलाच्या वेळीं तुळशीबागेंत जी सभा झाली तिच्यापुढें स्वतःची प्रतिसूचना मांडून सुचविली होती. शिवाय पुरुषाचें चाळीस वर्षांपुढें लग्न होऊं नये, व लग्न करणें झाल्यास च विधवेशीं करावें वगैरेहि विवाहविषयक सुधारणा त्यांनीं त्याच प्रतिसूचनेंत सुचविल्या होत्या. "विधवेचें वपन करूं नये" असेंहि एक कलम त्यांत होतें. विवाहाचे बाबतींत ते इतक्या सुधारणा करण्यास कबूल होते यावरून ते कट्टया धर्माभिमान्याप्रमाणें सर्वस्वी जुन्याचेच अभिमानी होते असें कदापि म्हणतां येत नाहीं, तथापि धर्मशास्त्रास त्यांनीं सोडलें नव्हतें. मुलीचें सज्ञ वयांत आल्यानंतर करण्यास शंकराचार्यांकडून परवानगी मिळावी किंवा समाजाच्या संमतीनें तशी चाल पडावी अशा मताचे ते होते परंतु; या अतिक्रमाबद्दल शास्त्राप्रमाणें प्रायश्चित्त घेण्यासहि ते कबूल होते हें लक्षांत ठेवलें पाहिजे. मुलगी लहान असतांना लग्न कर्तव्य असल्यास सप्तपदी विवाहसमयीं न करतां गर्भाधानसमयीं करावी म्हणजे वयांत येण्याचे पूर्वी नवरा मेल्यास दुसरें लग्न करण्यास सवड राहील अशी जी कित्येक लोकांनीं मध्यम तऱ्हेची सवलतीची वाट काढली होती ती देखील त्यांना पसंत होती. कारण त्यांत शास्त्रविरुद्ध असें कांहीं नव्हतें.

पुनर्विवाह मात्र त्यांना पसंत नव्हता, व तो शास्त्रसंमत नाहीं असें त्यांचें मत होतें. "पुनर्विवाह शास्त्रनिषिद्ध आहे असें आमचेंच नव्हे, तर या विषयाचें ज्यांनीं चांगलें अवलोकन केलें आहे अशा आमच्या बऱ्याच संस्कृतज्ञ मित्रांचेंहि मत आहे. तथापि ज्यांनीं पुनर्विवाह केला ते ब्राह्मण्यापासून कायमचे भ्रष्ट होतात असें आम्हास वाटत नाहीं" असा त्यांचा अभिप्राय होता. (केसरी, १६ जून १९०३). परंतु या अभिप्रायाच्या विरुद्ध व पुनर्विवाहास

अनुकूल असेंहि त्यांनीं एका प्रसंगीं मत दिलें आहे. संमतिवयाच्या बिलावर चर्चा करण्याकरितां जोशीहॉलांत ता. १ नोव्हेंबर १८९० रोजीं ठळक ठळक गृहस्थांची जी सभा भरली होती त्या सभेंत टिळकांनीं आपल्या सुधारणाविषयक सूचना पुढें मांडल्या. या टिळकांच्या भाषणांचा ता. ४ नोवेंबरच्या केसरींत जो गोषवारा दिलेला आहे त्यांत "पुनर्विवाहासारख्या निर्विवाद सुधारणा इष्ट असून बहुतेक सुधारकांस त्या आपल्या कुटुंबांत अमलांत आणणें अशक्य वाटत आहे. याकरितां...इ० इ०" असे टिळकांचे उद्गार दिलेले आहेत. टिळकांच्या भाषणाचा खुद्द केसरींतील रिपोर्ट हा असल्यामुळें तो अर्थातच विश्वसनीय होय. तेव्हां १८९० सालीं समाजसुधारणेच्या दृष्टीनें पुनर्विवाह त्यांना पसंत होता, तथापि १९०३ सालापर्यंत धर्मशास्त्राचें सांगोपांग अध्ययन होऊन शास्त्राधारानें जेव्हां ते मतप्रतिपादन करूं लागले तेव्हां अर्थातच पुनर्विवाह शास्त्रनिषिद्ध आहे असें प्रतिपादन त्यांनीं केलें असावें, असा या बाबतींत प्रकार झालेला उघड दिसतो.

सामाजिक आचार व वैय्यक्तिक कुटुंबविषयक धर्माचार यासंबंधानें त्यांचीं मतें कशीं होतीं याचें दिग्दर्शन केलें. आतां हे आचार न पाळण्याबद्दल धर्मशास्त्रानें सांगितलेलें प्रत्यवायरूपी जें प्रायश्चित्त त्याविषयीं त्यांचे विचार कसे होते हें पाहूं. स्वतः त्यांनीं पंचहौद मिशनमध्यें खिस्त्यांच्या हातचा चहा घेतल्याबद्दल प्रायश्चित्त घेतलें होतें. विलायतेस जाऊन आल्यावरहि दोषक्षालनार्थ त्यांनीं प्रायश्चित्त घेतलें असल्याचें सुप्रसिद्धच आहे. ग्रामण्यप्रकरण चालू असतांच प्रायश्चित्तसंस्थेबद्दल त्यांनीं पुढील विचार प्रकट केले आहेत. "प्रायश्चित्त म्हणजे पश्चात्ताप नव्हे, तें फक्त पापनाशक कर्म होय. पश्चात्तापानेंहि पापक्षय होतच नाहीं असें मात्र म्हणतां येत नाहीं. शिवाय एकाद्या गोष्टीस प्रायश्चित्त आहे एवढ्यानेंच तो मोठासा गुन्हा आहे असें म्हणतां येत नाहीं. कांहीं रूढाचार न पाळल्याबद्दल त्यांना प्रायश्चित्त हवें. देशकालानुरूप कांहीं आचार सोडावेच लागतात......तर स्पर्शास्पर्श दोषाबद्दल प्रत्याम्नायद्वारां प्रायश्चित्त करीत गेल्यास सामाजिक प्रगति होऊन शिवाय योग्य धर्माभिमान राहूं शकतो." शास्त्रानें विहित नसलेल्या गोष्टी आचरणांत आणावयाच्या असल्यास त्याबद्दल प्रायश्चित्त घेण्याची वहिवाट पाडावी ही टिळकांनीं सुधारणा अमलांत आणण्याची सुचविलेली युक्ति अत्यंत महत्त्वाची आहे.

## पारमार्थिक आचारः–(१) श्रौत यज्ञयाग

सुधारकांनीं नसतें अवडंबर माजवून ठेवलेल्या या रुक्ष विषयाकडून वळून पारमार्थिक आचारांच्या मंगल व उन्नतिप्रद प्रांतांत आपण आतां प्रवेश करूं. खुद्द टिळकांची प्रवृत्ति पाहिली तरी ती अशीच होती. सुधारकांच्या हठाग्रहामुळें

सामाजिक विषयावर जरी त्यांना पुष्कळ वादविवाद खेळावे लागले तरी त्यांतील रुक्ष विवेचनापेक्षां तत्त्वज्ञानाच्या उच्च वातावरणांत भराऱ्या मारणेंच त्यांना अधिक प्रिय असे. सुधारकांचे वादाचे विषय बहुतेक स्त्रीपुरुष-संबंधाचे असावयाचे. अशा विषयांत सभ्यतेच्या मर्यादेबाहेर जाणारे कोटिक्रम व बाष्कळ-पणाचे युक्तिवाद नेहमीं जे चाललेले असत, त्यांचा, त्यांच्या कांहींशा उग्र व निग्रही स्वभास तिटकारा वाटत असे. अशा विषयांवरील त्यांचें लिहिणें नेहमीं भारदस्तपणाचें असेच, परंतु एकंदरीनें 'फुलमानी प्रकरण' किंवा 'दादाजी विरुद्ध रखमाबाई' असल्या प्रकरणांपेक्षां आपले वेदकालीन ऋषिवर्य किंवा उपनिष-त्कालीन तत्ववेत्ते यांचेंच साहचर्य त्यांस जास्त प्रिय असे. असें असल्याकारणानें ते स्वतः कोणच्याहि पारमार्थिक पंथाचे अनुयायी नसतांना किंवा कोणतेहि पारमार्थिक आचार स्वतः पाळीत नसतां बहुतेक सर्व तऱ्हेच्या पारमार्थिक आचारविचारांवर त्यांनीं कोठें ना कोठें तरी आपले विचार प्रकट करून ठेवले आहेत, आणि राजकारणाच्या खालोखाल या बाबतींत ते अधिकारी पुरुष असल्यानें त्यांच्या विचारांची किंमतहि मोठी आहे हें सांगा-वयास नको.

अतिशय प्राचीन व आमच्या वेदकालीन पूर्वजांनीं आचरिलेला जो श्रौतमार्ग तो सध्यां लुप्तच झालेला आहे. संस्कारमीमांसेच्या प्रस्तावनेंत ते म्हणतातः— "The first of these groups (*i.e.* Śrauta rites) gives the rules...of the sacred ceremonial known as Śrauta Yajnas or Vedic sacrifices, the main object of which is to propitiate the Vedic deities and to attain one's welfare in the world of Gods *i.e.* in the next world. These Vedic rites or sacrifices have, however, now fallen into disuse, and though we may now and then hear of the Śrauta Yajnas performed at some religious centres, we may safely say that these Śrauta sacrifices have become obsolete at present." 'आमच्या धर्मांतील यज्ञयाग, श्रौतस्मार्त कर्में वगैरे खिस्ती धर्मांतील जुन्या करारासारखेंच झालेलें आहे '* असें ते म्हणत असत. तथापि यज्ञांतील मूळ कल्पना कांहीं नाहींशी झालेली नाहीं; तिची नाना अवस्थांतून उत्क्रांति झाली आहे. "देवांनीं पुरुषयज्ञ करूनच सृष्टि निर्माण केली. 'यज्ञेन यज्ञमयजंत' असा पूर्वीचा उल्लेख आहे. आपल्याला जी प्रिय वस्तु असते ती कोणत्या तरी मोठ्या उद्देशाकरितां द्यावी लागते हें

* टिळकांचीं गेलीं आठ वर्षें.

यज्ञांतील रहस्य आहे......पशु देणें, द्रव्य देणें, अशी यज्ञाची उत्क्रांति होतां होतां इंद्रियांचा इंद्रियांचे ठिकाणीं संयम करणें म्हणजे यज्ञ करणें वगैरे भगवद्गीतेंत सांगितलेले यज्ञ सुरू झाले, व आपल्यांतील अज्ञानतम याचा ज्ञानाचे ठिकाणीं यज्ञ करावा अशा प्रकारच्या उदात्त कल्पनेचा प्रादुर्भाव होऊन यज्ञाचा विस्तृत व उदात्त अर्थ झाला. उच्च प्रकारचा हेतु साध्य करण्यास आपणास प्रिय असलेली वस्तु बळी दिली पाहिजे हें त्यांतील तत्व आहे. यज्ञ म्हणजे Sacrifice. तुम्ही Self-sacrifice (स्वार्थत्याग) केला पाहिजे."* याप्रमाणें १९०५ सालीं यज्ञकल्पनेचें सुंदर स्पष्टीकरण एका व्याख्यानांत त्यांनीं केलें होतें.

## पारमार्थिक आचारः–(२) उपासना व (३) भक्ति

यज्ञमार्गानंतर व कांहींसा त्याला बाजूस सारून उपनिषत्कालीन उपासनामार्ग प्रादुर्भूत झाला. अध्यात्मचिंतन करणाऱ्या मुनींच्या गहन तत्वविचारांच्या पायावर या उपासनांची इमारत उभारलेली होती. ब्रह्मचिंतन करण्याकरितां कांहीं तरी अव्यक्त (कित्येक प्रसंगीं व्यक्त) असें प्रतीक घेऊन त्याचें ध्यान करावयाचें असें या उपासनांचें स्वरूप असे. छांदोग्यांतील शांडिल्यविद्या (छां. ३. १४) त्याचप्रमाणें प्रतर्दनविद्या, हार्दविद्या, प्राणविद्या वगैरे अनेक विद्या उपनिषदांतून सांगितल्या आहेत, त्या उपासनांच्या स्वरूपाच्याच होत. या उपासनांच्या पाठीशीं केवढेंहि तत्वज्ञान असलें तरी त्या स्वरूपतः आचारात्मकच होत. या उपासनामार्गाचें विवरण गीतारहस्यांत पृ. ४०९ ते ४१३ पर्यंत आलेलें आहे. तेथें या उपासनामार्गास ज्ञानमार्ग असें विशिष्ट नांव दिलें आहे.

अव्यक्त वस्तूचें चिंतन करणें व तिजवर चित्त स्थिर करणें हें मनाच्या चंचलत्वामुळें व इंद्रियांच्या केवळ प्रत्यक्षग्राही वृत्तीमुळें अत्यंत दुर्घट होऊन बसतें, म्हणून अव्यक्ताबदल व्यक्त सगुण व साकार असें प्रतीक पुढें ठेवून उपासना केली म्हणजे तिलाच भक्ति असें म्हणतात. "कांहीं म्हटलें तरी मनाचा हा (चंचलत्वाचा) स्वभाव जोंपर्यंत देहधारी मनुष्याला काढून टाकतां येत नाहीं तोंपर्यंत उपासनेसाठीं म्हणजे भक्तीसाठीं निर्गुणांतून सगुणांत व त्यांतहि अव्यक्त सगुणापेक्षां व्यक्त सगुणांत उतरल्याखेरीज दुसरा मार्ग नाहीं. म्हणून सगुणोपासनेचा मार्ग अनादिकालापासून प्रचारांत आला असून अखेर रामतापनीयादि उपनिषदांतून प्रत्यक्ष मनुष्यरूपधारी व्यक्त ब्रह्मस्वरूपाची

---

* टिळकांचीं गेलीं आठ वर्षें, भाग २ यांतील परिशिष्टांत दिलेला व्याख्यानाचा सारांश

उपासना वर्णिली आहे...या प्रत्यक्ष मार्गासच 'भक्तिमार्ग' असें म्हणतात." (गी. र. पृ. ४१०–११.) या भक्तिमार्गाचें अत्यंत उज्वल व मनोहर असें वर्णन रहस्यांतील 'भक्तिमार्ग' या प्रकरणांत आलें आहे, त्यावरून भागवत धर्माविषयीं व भक्तिमार्गाविषयीं टिळकांचीं मतें स्पष्ट दिसून येतात. सगुणोपासना, मूर्तिपूजा व भक्तीचे नवविधा भेद हे सर्व टिळकांस मान्य होते, इतकेंच नव्हे तर भक्तिमार्ग हा परमेश्वरप्राप्तीच्या सर्व मार्गांमध्यें अत्यंत सुलभ, सुसाध्य व प्रत्यक्ष भगवंतांनीं म्हटल्याप्रमाणें सर्व विद्यांमध्यें व गुह्यांमध्यें श्रेष्ठ होय असें त्यांचें ठाम मत होतें. समर्थ रामदासांखेरीज इतर महाराष्ट्रीय संतांनीं भक्तीचा सुकाळ करून सोडतांना कर्मयोगाचा पुरस्कार केला नाहीं, किंबहुना 'त्यांचा कल थोडासा कर्मत्यागाकडेच होता' (गी. र. पृ. ४९८ पहा) याबद्दल टिळकांचा किंचित् रोष त्यांजवर झालेला दिसतो. तथापि हा रोष केवळ प्रेमाच्याच नात्याचा असून भागवतधर्मी संतांच्या कामगिरीबद्दल त्यांच्या मनांत पूर्ण आदर व पूज्यबुद्धीच वसत होती. (गी. र. पृ. ४३२–३६ व ४९८ पहा) भागवतधर्म पंगू आहे, भागवतधर्मी संतांनीं समाज आळशी व मूढ बनविला, संतमंडळी म्हणजे नुसते टाळकुटे होते–अशा तऱ्हेचे आरोप संतांवर व भागवत धर्मावर त्यांनीं कधीं केले नाहींत. उलटें अशा आरोपांचें खंडनच त्यांनीं कोठें कोठें व्याख्यानांतून केलें आहे.

लोकमान्यांनीं स्वतः कर्मयोगाचें प्रतिपादन केलें परंतु तो कांहीं निराळा पारमार्थिक मार्ग म्हणून नव्हे. परमेश्वरप्राप्तीचा मार्ग कोणताहि असो, परमेश्वरप्राप्तीच्या अगोदर व ईश्वरप्राप्ति होऊन ब्रह्मज्ञान झाल्यानंतरहि स्वधर्मास अनुसरून स्वतःच्या वांट्याला आलेलें जें कर्तव्य असेल तें करीत राहणें हेंच श्रेयस्कर होय असें त्यांनीं प्रतिपादन केलें आहे. यांत त्यांनीं नवीन कोणत्याहि आचारमार्गाचें प्रतिपादन केलें आहे असें नाहीं. तर आजपर्यंतच्या सर्व मार्गांमध्यें विसरलें जाणारें प्रमुख तत्व त्यांनीं दाखवून दिलें आहे. मीमांसकांचा कर्ममार्ग तर त्यांना मुळींच पसंत नव्हता. कर्में हींच अपूर्वद्वारा स्वर्गप्राप्तीला कारण होतात व स्वर्ग म्हणजेच मोक्ष होय हीं मीमांसकांचीं तत्वें त्यांना कधींहि पसंत असणें शक्य नव्हतें. ते पूर्णपणें ब्रह्मवादी व अद्वैत वेदान्तानुयायी होते; आणि अद्वैती असून कर्मयोगी होते, हाच त्यांचा विशेष होता.

## अखंड ईश्वरभक्ति

कर्मयोगी अनसूहि अखंड ईश्वरभक्ति त्यांच्या हृदयांत वसत होती. श्रीसमर्थ रामदासांप्रमाणेंच कार्याचा पसारा महाराष्ट्रभर त्यांनीं पसरला होता व रामदासांप्रमाणेंच त्यांच्या चळवळीला 'भगवंताचें अधिष्ठान' होतें. आतां रामदासांप्रमाणें धर्मजागृति करणें व हरिकथानिरूपण करणें हें टिळकांच्या कार्याचें मुख्य

स्वरूप नव्हतें. सध्यांच्या काळीं रामदासांच्या राजकीय कार्याचाच आपण जरी कितीहि गौरव केला तरी त्यांचें कार्य मुख्यतः धार्मिक स्वरूपाचें, समाजांत श्रीरामोपासना वाढविण्याचेंच होतें हें विसरतां कामा नये. त्याचप्रमाणें टिळकांचें धार्मिक कार्य कितीहि मोठें असलें तरी तें त्यांच्या राजकीय कामगिरीच्या मानानें दुय्यम प्रतीचेंच ठरेल हेंहि आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. तेव्हां याप्रमाणें दोघांच्या कार्यांत महत्त्वाच्या दृष्टीनें धर्मकारणाची व राजकारणाची जरी उलटापालट झालेली दिसली तरी धर्मबुद्धि, आस्तिक्य, विरक्तता, लोकसंग्रहबुद्धि या सर्व बाबतींत टिळकांशीं तुलना करण्यास योग्य असे रामदास व रामदासांशीं तुलना करण्यास योग्य असे टिळक हे एकच दिसतात. धर्मकारण हें रामदासांच्या कार्यांत ज्याप्रमाणें प्रमुख होतें त्याप्रमाणें टिळकांच्या कार्यांत नसल्यामुळें, टिळकांनीं परमेश्वरभक्तीचें इतकें वारंवार व विस्तृत प्रतिपादन केलेलें आढळून येत नाहीं. परंतु रामदास हे जसे अद्वैतवादी असून ईश्वराच्या सगुण स्वरूपाचे उत्कट भक्त होते त्याप्रमाणेंच टिळकांनाहि अद्वैतवाद पसंत असून सगुण भक्तीहि मान्य होती. ईश्वराच्या सगुण स्वरूपावर त्यांची श्रद्धा होती, इतकेंच नव्हे तर श्रीकृष्ण स्वतः परमात्म्याचे पूर्णावतार असून त्यांनीं अर्जुनास स्वतः गीता सांगितली या गोष्टीवर त्यांचा पूर्ण विश्वास होता. ईश्वरस्वरूप परमार्थतः जरी निर्गुण, निराकार असलें तथापि जगाच्या उद्धाराकरितां व भक्तांचें चोज पुरविण्याकरितां परमेश्वरी विभूति जगतीतलावर अवतार घेतात हें तत्व त्यांस मान्य होतें. म्हणूनच " परमेश्वराचे प्रत्यक्ष अवतार श्रीकृष्ण हेच आधीं गीता सांगणारे, आणि त्यांतहि जागोजाग..." सर्व धर्म सोडून देऊन तूं एकटा मला येऊन भज ( गी. १८–६६ )"......असा जो आपल्या प्रथमपुरुषी सगुण व व्यक्त स्वरूपाला अनुलक्षून भगवंतांनीं अर्जुनाला उपदेश केला आहे, त्यामुळें समदृष्टि, परमपूज्य व प्रेमळ अशा पुरुषोत्तमापुढें आपण साक्षात् उभे आहोंत अशी श्रोत्याची भावना होऊन आत्मज्ञानाचे ठायीं त्याची निष्ठा दृढ होते, इतचेंच नव्हे तर एकदां ज्ञान व एकदां भक्ति अशी अध्यायांची पृथक् वांटणी न करितां ज्ञानांत भक्ति व भक्तींत ज्ञान गुंफून दिलें असल्यामुळें ज्ञान व भक्ति यांचा परस्पर विरोध न राहतां परमेश्वराच्या ज्ञानाबरोबरच त्यांतील रसहि अनुभवास येतो, व सर्व भूतांचे ठायीं आत्मौपम्यबुद्धि जागृत होऊन अखेर चित्ताला विलक्षण शांति व समाधानसुख प्राप्त होतें. " ( गी. र. पृ. ४१६ ) असे श्रद्धावान् पुरुषाच्याच तोंडून निघणारे उद्गार गीतारहस्यांत त्यांनीं काढले आहेत.

## अलौकिक यश व कीर्ति हाच ईश्वरी प्रसाद !

जगन्नियंत्याच्या स्वरूपाविषयीं टिळकांचे काय विचार होते त्यांचे दिग्दर्शन केलें. अस्तिक्य व ईश्वरनिष्ठा हीं त्यांच्या हृदयांत कशीं बाणलेलीं होतीं हेंहि

थोडेंसें दाखविलें. सर्व धर्मांचें मूळ, सर्व आचारांचें सार अशी जी अस्तिक्य-बुद्धि ती टिळकांच्या ठायीं उत्कटतेनें वसत होती. या गोष्टींचें महत्त्व जितकें वर्णन करावें तितकें थोडें आहे ! 'लोकमान्यांची शिकवणूक' नामक सुंदर लेखांत केसरीकारांनीं म्हटलें आहे,*–"लो. टिळक यांचें चरित्र भूतकालाला व्यापून पुढील इतिहासावर पसरलेलें दिसत आहे. ह्याचें कारण तत्वज्ञानाचा निदिध्यास, लढत असतांनाहि उज्वल राहण्याइतकी परमेश्वरी भक्ति त्यांच्या अंतःकरणांत अखंड वसत होती, हेंच होय ! गीतारहस्य हें पुस्तक त्या भक्तीचें फळ होय !" हे उद्गार किती खरे आहेत ! याच्याहि पुढें जाऊन भाविक व श्रद्धावान् मनुष्य म्हणेल कीं, महाराष्ट्रांतील कोणत्याहि पुढाऱ्याला मिळालें नाहीं इतकें यश व कीर्ति टिळकांना प्राप्त झाली, आजपर्यंत कोणीं केलें नाहीं इतकें कार्य ते करूं शकले, छाती दडपून टाकणाऱ्या संकटांसहि तोंड देण्याइतकें अलौकिक धैर्य त्यांच्या ठायीं उद्भवलें व सरते शेवटीं कीर्तीच्या परमोच्च बिंदूवर तळपत असतां मरण येण्याचें अलौकिक भाग्य त्यांना लाधलें हें सर्व त्यांच्या दृढ ईश्वरनिष्ठेचेंच फळ होय. आणि कार्यकारणभावातीत अशा गोष्टींवर ज्यांचा विश्वास नाहीं अशांना हा चमत्कार वाटण्यासारखा आहे खराच–कीं महाराष्ट्रांतील इतर पुढारी, ते सर्व आपआपल्या परीनें येवढे धुरंधर असतां कोणत्याना कोणत्या तरी कारणानें त्यांच्या कार्याचा व कीर्तीचा फैलाव टिळकां-इतका होऊं शकला नाहीं. विष्णुशास्त्र्यांसारखा स्वतंत्र बुद्धीचा, देशाभिमानाचा जणूं काय जिवंत पुतळाच असा, अलौकिक धोरणी लोकनायक ! पण त्यांच्या त्या कर्तबगारीला नुकती कोठें सुरुवात होते न होतें तों निर्घृण काळानें त्यांच्यावर झडप कां घालावी ? रानडे इतके महासागराप्रमाणें गंभीर वृत्तीचे, हिमालया-एवढे ज्ञानाचे पुंज, देशप्रेमानें अखंड स्रवत असलेले, परंतु सरस्वती नदीप्रमाणें त्यांचा ज्ञानौघ सरकारी नोकरीच्या वाळवंटांत जिरून गेला ! जो कांहीं थोडा देशबांधवांच्या वांट्यास आला त्यांतला पुष्कळसा नवीन धर्म, नवीन समाज वगैरेंच्या स्थापनेंत पालथ्या घड्यावर ओतलेल्या पाण्याप्रमाणें व्यर्थ गेला. आगरकरांची कळकळ व तडफ हीं केवळ वर्णनीय ! परंतु त्यांना आपला सुधारणेचा रथ इतक्या अवघड व दुर्गम वाटेनें, इतक्या वेगानें हांकण्याची बुद्धि झाली कीं तो मोडून पडला नसता तरच आश्चर्य ! त्यांतून अल्पायुषी-पणानें दावा साधल्यामुळें त्या रथाच्या कर्णधारत्वालाहि ते मुकले. गोखल्यांचा व्यासंग जबरा व कोणतेंहि काम करण्याची टीप फार व्यवस्थेशीर, शिवाय त्यांची व्यक्तिविषयक महत्त्वाकांक्षाहि दांडगी होती. परंतु त्यांची गाडी उत्तरो-त्तर सरकारी चाकोरीवर अधिकाधिक जाऊं लागल्यामुळें तितक्या प्रमाणांत

---

* केसरी, ता. १० आगष्ट १९२०.

ते जनतेच्या मानाला आंचवले. याप्रमाणें अव्वल दर्जाच्या कर्तृत्वशाली व्यक्तींचीं जीं कांहीं नांवें महाराष्ट्रांत घेतां येतात त्यांपैकीं भवितव्यतेमुळें अगर बुद्धिपुरस्सर करणीमुळें कोणाचेंहि कार्य टिळकांच्या कार्याइतकें कीर्तीस, मान्यतेस व यशास पात्र झाल्याचें दिसून येत नाहीं. अशा स्थितींत टिळकांच्या धर्माभिमानाच्या व ईश्वरनिष्ठेच्या योगानेंच त्यांना ईश्वरी प्रसाद म्हणून हें अद्वितीय यश प्राप्त झालें असें श्रद्धाळु मनुष्यास वाटत राहिल्यास त्यांत गैर काय आहे ?

परंतु ईश्वरी कृपेच्या व श्रद्धेनुरूप फलप्राप्ति होत असल्याच्या गोष्टी बाजूला ठेवून सामान्य कार्यकारणभावाच्या दृष्टीनें पाहिल्यास टिळकांच्या असामान्य यशाची व लोकप्रियतेची उपपत्ति त्यांच्या धर्माभिमानावरूनच सुरेख लागते. टिळकांची ईश्वरनिष्ठा व धर्मबुद्धि सतत जागरूक असल्यामुळें, धर्मभावना स्वभावतः अत्यंत प्रिय असलेल्या जनतेला ते अत्यंत प्रिय होऊन राहिले व जनतेनें त्यांचा सदैव पाठपुरावा केला यांत कार्यकारणभावाच्या दृष्टीनें गूढ काय आहे ? टिळकांच्या यशाची गुरुकिल्ली त्यांची लोकप्रियता ही होती. ही लोकप्रियता, धर्माचा कैवार घेणारे व आस्तिक्यबुद्धि सतत जागृत ठेवणारे असे ते एकटेच पुढारी जनतेला आढळल्यामुळें, त्यांना हक्काच्या मिराशीप्रमाणें मिळाली होती. त्यांच्या लोकप्रियतेचीं इतर अनेक कारणें असतील व होतींहि, पण हें एक त्यांपैकीं मुख्य कारण होतें हें विसरतां कामा नये.

## इतर थोर पुरुषांची धर्मबुद्धि

येथें टिळकांच्या गौरवास्तव इतर कोणाहि दिवंगत पुढाऱ्यास निष्कारण लघुत्व आणण्याचा आमचा हेतु नाहीं. आपआपल्या दृष्टींनीं जनतेचे जे जे म्हणून हितकर्ते महाराष्ट्रांत होऊन गेले ते सर्वच आम्हांस वंदनीय आहेत. तथापि टिळकांच्या धर्मभावनेचा व आस्तिक्यबुद्धीचा विचार करीत असतां इतर पुढाऱ्यांचीं धर्मविषयक मतें कशीं काय होतीं याचाहि विचार मनांत आल्याखेरीज रहात नाहीं.

## विष्णुशास्त्री चिपळूणकर

प्रथमतःच विष्णुशास्त्री चिपळुणकरांचें नांव मनासमोर उभें राहातें ' विष्णुशास्त्र्यांचेंच कार्य हातीं घेऊन तें टिळकांनीं पुढें चालवलें ' असें म्हणण्याचा संप्रदाय आहे व तो स्थूल मानानें खराहि आहे. गांधींनीं टिळकांचें कार्य हातीं घेऊन तें पुढें चालवलें आहे असें पुष्कळ लोक पूर्वी म्हणत असत व अजूनहि कांहीं म्हणतात. टिळकांचे व माझे मार्ग भिन्न आहेत असें म्हणून गांधी विचारे थकले परंतु त्यांचें कोणी ऐकलेंच नाहीं ! आतां गांधी टिळकांचें कार्य चालवीत

आहेत असें जें लोक म्हणत असत त्याचा अर्थ एवढाच कीं, टिळकांप्रमाणें गांधींनींहि योग्य मार्गानें देशोद्धारणव्यवसाय चालविला असून टिळकांच्या प्रमाणेंच ते राष्ट्राला स्वातंत्र्याच्या पदाप्रत नेत आहेत. त्यांच्या प्रवृत्ति, त्यांचे मार्ग, त्यांचीं मतें हीं एकसारखीं आहेत असा त्याचा अर्थ नव्हे. त्याचप्रमाणें विष्णुशास्त्र्यांचें कार्य टिळकांनीं पुढें चालविलें याचा अर्थ आपल्या समाजाला स्वाभिमानी, स्वतंत्र व प्रभावशाली बनविण्याचें काम विष्णुशास्त्र्यांप्रमाणेंच टिळकांनींहि केलें इतकाच होय. एरवीं त्यांच्या मनोरचनेंत, गुणसंपत्तींत, स्वभावांत व मार्गांत जो फरक होता तो अशा तऱ्हेच्या सूत्रमय वाक्यानें डोळ्याआड करूं नये. या दोघांमध्यें जो फरक होता त्यांपैकीं मुख्य म्हणजे त्यांच्या धार्मिक भावनांतील फरक होय. टिळक हे धर्माभिमानी, धर्मावर श्रद्धा असलेले व खंबीर आस्तिक्यवादी होते. त्याचप्रमाणें विष्णुशास्त्री हेहि धर्माचे अभिमानी व सश्रद्ध आस्तिक्यवादी होते. विष्णुशास्त्री हे धर्माविषयीं शंकित होते किंवा त्यांची धर्मश्रद्धा लटपटीत होती असें विधान कित्येकांनीं केल्याचें आढळतें.* परंतु त्यांच्या ग्रंथांत प्रकट झालेल्या त्यांच्या मतांवरून तरी तसें दिसत नाहीं. त्यांचा आस्तिक्यवाद व धर्माविषयीं पूज्यबुद्धि ही त्यांच्या निबंधमालेंत अनेक ठिकाणीं प्रकट झालेली आढळते. ( उ०:— नि. मा. चि. शा. आवृत्ति पृ. २०३; २५०, २५१; वेदार्थ यत्न; डाक्तर जानसन पृ. ७२४ ते ७२७). फरक इतकाच कीं, त्यांचें आपल्या धर्माचें, शास्त्राचें व तत्त्वज्ञानाचें ज्ञान परिपक्व झालेलें नसल्यामुळें ‘ द्विर्बद्धं सुबद्धम् ’ या न्यायानें धर्माच्या सर्व अंगांवर असलेली त्यांची श्रद्धा पूर्ण विचारपूर्वक दृढ केलेली नव्हती. जन्मतः प्राप्त झालेला, आपल्या प्रिय भारतवर्षांत प्रचलित असलेला आणि आपल्या वंद्य पूर्वजांनीं श्रद्धापूर्वक पाळलेला म्हणूनच त्यांना हिंदुधर्माबद्दल पूज्यबुद्धि व अभिमान वाटत होता. आपल्या धर्माची सर्वोत्कृष्टता पूर्ण अध्ययनानंतर त्यांना पटली होती म्हणून नव्हे. टिळकांचा धर्माभिमान मात्र केवळ जन्मतः प्राप्त झालेला धर्म म्हणून वाटणारा अभिमान अशा स्वरूपाचा नव्हता. हिंदु धर्माच्या मूळ तत्वांविषयींचें त्यांचें गाढ अध्ययन झालें होतें व ‘ या धर्मांत सांगितलेल्या गोष्टी इतर कोणत्याहि धर्मांत सांगितलेल्या गोष्टींपेक्षां जास्त सयुक्तिक आहेत ’ अशी त्यांची खात्री झालेली होती. व त्याप्रमाणें आपल्या धर्मांतील अनेक गोष्टींचें सयुक्तिकत्व त्यांनीं गीतारहस्यांत व इतरत्र प्रतिपादनहि केलें आहे. या दोघा महापुरुषांच्या धर्मविषयक मनोभूमिकेंतील फरक याप्रमाणें होता. दोघेहि हिंदुधर्माचे अभिमानी; दोघांनींहि यथाशक्ति धर्मदूषकांचें खंडण आपल्या आयुष्यांत केलें, त्याचप्रमाणें दोघांचाहि

---

* केसरी, ३१ जुलै १९२३ के. रा. छापखाने यांचा ‘ लोकमान्यांचें आस्तिक्य ’ हा लेख पहा.

धर्माभिमान स्वदेशाभिमानाच्या अंकित असाच होता, धार्मिक बाब ही दोघांच्याहि आयुष्याचें प्रमुख अंग कधीं बनली नाहीं. तथापि विष्णुशास्त्री यांचा धर्माभिमान, जन्मतः प्राप्त झालेला, स्वदेशबांधवांचा धर्म, म्हणून होता तर टिळकांचा धर्माभिमान या प्रकारचा असूनहि प्रज्ञेच्या अचल पायावर उभारलेला होता. विष्णुशास्त्र्यांनीं धर्मनिंदकांचें खंडन केलें तें कोटिक्रमाच्या व वाक्चातुर्याच्या जोरावर; टिळकांनीं मूळ मुद्यालाच हात घालून युक्तिवादाच्या व शास्त्रशुद्ध प्रमाणांच्या जोरावर प्रतिपक्षास पराभूत करून त्यास तोंड काढावयास जागा ठेवली नाहीं. असो; विष्णुशास्त्री यांनीं अत्यंत अल्पावधींत जें कार्य केलें तें केवळ अलौकिक होय; आयुष्याच्या तेवढ्या अवधींत टिळकांच्या खऱ्या कार्यास आरंभहि झालेला नव्हता हें लक्षांत घेतां त्या विलक्षण पुरुषाच्या कर्तबगारीविषयीं अचंबा वाटावयास लागून मन थक्क होतें !

## न्यायमूर्ति रानडे

यानंतर नांव घेण्यासारखे पुढारी रानडे, आगरकर व गोखले हे राहतात. एका दृष्टीनें पाहिलें असतां हे सर्व एका मालिकेंत गोवण्यासारखे आहेत. कारण हिंदुत्वाचा अभिमान कांहीं अंशीं जरी यांच्या ठिकाणीं वसत होता तरी सुधारकपक्षाचे धुरीण व सनातन धर्माभिमान्यांचे प्रतिपक्षी म्हणूनच हे पुढें आले व यांचें जें कांहीं धर्मविषयक कार्य झालें तें अशाच स्वरूपाचें झालें हें प्रसिद्धच आहे. पैकीं गोखले हे धर्मविषयक बाबतींत आजन्म मुग्धच राहिले, तेव्हां या लेखांत त्यांच्याविषयीं मुग्धता स्वीकारणेंच न्याय्य होईल. बाकी राहिले रानडे व आगरकर; तेव्हां त्यांच्या धर्मबुद्धीविषयीं कांहीं शब्द लिहिणें उचित होईल.

न्यायमूर्ति रानडे हे प्रार्थनासमाजाच्या संस्थापकांपैकीं व पुरस्कर्त्यांपैकीं एक होते ही गोष्ट प्रसिद्धच आहे. तथापि यावरून हिंदुसमाजाविषयीं व परंपरागत हिंदुधर्माविषयीं त्यांना मुळींच अभिमान अगर आपलेपणा वाटत नव्हता असें मानणें न्याय्य होणार नाहीं. धर्ममतासंबंधानें पहातां ते कट्टे आस्तिक, ईश्वरवादी व भक्तिप्रवण मनाचे होते. निसर्गतःच शांत व गंभीर असा स्वभाव आणि त्यांतच ईश्वरचरणीं लीन व भक्तिप्रवण अशा मनोवृत्तीचा मिलाफ झाल्यामुळें त्यांच्या आयुष्यास एक प्रकारचें उदात्तत्व आलें होतें. प्रार्थनासमाज त्यांनीं काढला हें खरें, तथापि हिंदुधर्माचा त्याग करण्याकरितां व समाजाशीं फटकून वागण्याकरितां मात्र नव्हे. हिंदुधर्मांत मूळच्या उदात्त तत्त्वज्ञानापेक्षां विशिष्ट आचारविधींचेंच निरर्थक स्तोम माजलें आहे व त्यामुळें खरी धार्मिकता व मनाची निर्मळता यांची वाढ न होतां लोकांचीं मनें उलटीं संकुचित होतात; तेव्हां खऱ्या धार्मिकतेचा मार्ग दर्शविण्याकरितां मूळ हा समाज काढला होता. आतां या कामांत त्यांना जे मदतनीस व अनुयायी मिळाले

त्यांपैकीं कांहींच्या विचित्र वर्तनामुळें हा जनसमाजांतच राहून धर्मसुधारणा करण्याचा त्यांचा उद्देश सिद्धीस गेला नाहीं. तथापि यामुळें त्यांचा मूळ उद्देश याप्रकारचा नव्हताच असें म्हणणें मात्र बरोबर ठरणार नाहीं. त्यानीं १८९५ सालीं प्रार्थनासमाजाचे वार्षिक समारंभाचे प्रसंगीं जें सुविचारपरिप्लुत असें व्याख्यान दिलें* त्यांत या धर्मांत राहूनच धर्मसुधारणा करण्याच्या आपल्या हेतूंची त्यांनीं स्पष्ट फोड केली आहे. भागवत धर्माची प्रस्थापक जी पूर्वींची संत मंडळी महाराष्ट्रांत होऊन गेली त्यांची उपमा स्वतःस घेऊन त्यांनीं सांगितलें कीं ' ज्ञानेश्वर, रामदास, तुकाराम इत्यादि संतांनीं ज्याप्रमाणें कर्मठपणाचा निषेध करून भक्तिमार्गाचा, समतेचा व खऱ्या धार्मिक बुद्धीचा प्रसार केला त्याप्रमाणेंच आम्हांस सध्यांच्या संकुचित धर्मकल्पनांचा निषेध करून उदार तत्वांचा प्रसार करावयाचा आहे. त्यांचेंच लोण आम्हांपर्यंत आलें आहे व त्यांचेंच कार्य आम्ही पुढें चालविणार आहों. ' अशा तऱ्हेचीं त्यांचीं स्वतःचीं मतें व त्यांचे स्वतःचे उद्देश होते. यावरून ते परंपरागत सनातन धर्मास चिकटून राहणारे नव्हते, तर नवीन पंथ काढून समाजास उदाहरण घालून देऊं इच्छिणारे होते. ते स्वतःस Protestant म्हणवीत असत व पूर्वींचा भागवतधर्म हाहि Protestant पंथासारखाच संत मंडळींनीं नवीन काढलेला पंथ होय अशी त्यांची समजूत होती ! असो; तेव्हां टिळक हे सनातन धर्मलाच चिकटून राहणारे होते, रानडे हे नवीन पंथ काढून त्याला सुधारूं इच्छिणारे होते हाच त्यांच्यातील मुख्य फरक होय. रानड्यांना मूर्तिपूजा, विभूतींचें अनेकत्व, वेदांचें ईश्वरप्रणीतत्त्व व त्यांचें प्रामाण्य; त्याचप्रमाणें जातिभेद, व्यवहारनिर्बंध वगैरे गोष्टी मान्य नव्हत्या. टिळकांना हीं सर्व तत्त्वें मान्य असून त्यांपैकीं प्रत्येकांचा आपआपल्या परीनें व योग्यतेनें धर्मांत व समाजरचनेंत उपयोग आहे असें त्यांचें मत होतें. रानडयांना टिळकांनीं म्हटल्याप्रमाणें एक प्रकारें 'निर्गंध' असा धर्म पाळण्याची इच्छा होती. धर्माचा आचारात्मक भागहि महत्त्वाचा असून आचारहि पाळले पाहिजेत हें मत त्यांना

---

* हें भाषण किंवा भाषणवजा निबंध Hindoo Protestantism या नांवानें रमाबाई रानडे यांनीं १९१५ सालीं प्रसिद्ध केलेल्या Ranade's writings & speeches Vol. I, II या ग्रंथामध्यें प्रसिद्ध झालेलें आहे. त्यांतीलच विचार सारांशरूपानें येथें दिले आहेत. मानकर यांच्या इंग्रजी चरित्रांतहि या भाषणाचा बराच भाग दिलेला आहे. नुकतेंच प्रसिद्ध झालेलें रा. न. र. फाटक यांनीं लिहिलेलें न्यायमूर्ति रानडे यांचें चरित्र, यांत पृ. ५५०–५१ वर या भाषणाचा त्रोटक सारांश दिला आहे.

पटलेलें नव्हतें. शिवाय रानडे यांच्या मनांत भक्तीचा ओलावा जास्त असून त्यांचा स्वभाव शमप्रधान होता तर टिळकांची कर्ममार्गावर विशेष भिस्त असून त्यांचा स्वभाव विशेषतः लढाऊ स्वरूपाचा होता असेंहि म्हणतां येईल. परंतु त्यांची परस्पर विशेष तुलना करण्याचें हें स्थल नव्हे.

### आगरकर

आगरकरांचे स्वभावांत, मनोरचनेंत किंवा धर्ममतांत रानड्यांशीं किंवा टिळकांशीं, कोणाशींच साम्य नव्हतें. धर्ममतांसंबंधानें पाहिलें तर ते अज्ञेयवादी असून स्पेन्सरचे अनुयायी होते. त्यांनीं आपलीं बहुतेक सर्व मतें स्पेन्सर, मिल्ल, कोंट वगैरे अज्ञेयवाद्यांपासूनच उचललीं होतीं. पारमार्थिक गोष्टींविषयीं ते उदासीन व आदरशून्य होते. "**मनुष्यतेचें ऐहिक सुखवर्धन** ह्या सार्वत्रिक भावी धर्माची दीक्षा" त्यांनीं घेतली होती. अर्थात्च हिंदुधर्माविषयीं त्यांना मुळींच आदर किंवा आस्था नव्हती. हिंदुधर्म अजीबात जरी बुडाला तरी जर त्यामुळें त्यांनीं मनानें घेतलेली सुधारणा घडून येण्याचा संभव त्यांना दिसला असता तर त्यांत त्यांनीं आनंदच मानला असता व अशा तऱ्हेचे उद्गार अनेक ठिकाणीं त्यांनीं काढले आहेत. आपल्या प्राचीन वाङ्मयाविषयीं व धर्मग्रंथांविषयीं त्यांना आदर वाटत नसे, इतकेंच नव्हे तर त्यांच्याविषयीं त्यांच्या मनांत एक प्रकारची तुच्छता वसत असे. 'अश्लील व बाष्कळ गोष्टी सांगणाऱ्या भागवता-पेक्षां गिबनचें पारायण तुम्ही करीत चला' असें त्यांनीं आपल्या एका मित्रास सांगितल्याचें सांगतात. सारांश, त्यांचीं या बाबतींतील मतें व मनोभावना हीं सर्वस्वीं टिळकांच्या विरुद्ध होतीं. बहुधा कोणत्याहि बाबतींत दोघांचें जमण्या-सारखें नव्हतें, तेव्हां या दोघांमधील मतभेद प्रथम जरी अगदीं लहानसा भासत होता तरी प्रारंभीं क्षुद्र आळीप्रमाणें दिसणाऱ्या तक्षकानें ज्याप्रमाणें प्रसंग येतांच जगड्व्याळ स्वरूप धारण केलें त्याचप्रमाणें यांच्या मतभेदानेंहि विराट् स्वरूप धारण करून दोघांमधील स्नेहभावाचा फडशा पाडला यांत वस्तुतः अचंबा वाटण्याजोगें कांहीं नाहीं.

आगरकरांचें व टिळकांचें वस्तुतः कोणच्याच बाबतींत जमण्याजोगें नव्हतें; व दोघांनींहि आपल्या मतप्रदर्शनास स्वतंत्र रीतीनें सुरुवात केल्यावर दोघांचें आजन्मांत फारसें जमलेंहि नाहीं. अशी वस्तुस्थिति असतां 'आगरकरांचा व टिळकांचा संबंध अतिशय जिव्हाळ्याचा होता, आगरकरांच्या विचारांचा टिळकांच्या मनावर अत्यंत परिणाम झाला होता व त्या दोघांमध्यें मतभेदाचे प्रश्न फार थोडे असून मतैक्यच फार होतें, ते दोघे सुधारणावादीच असून मतभेद फक्त तपशिलासंबंधींच होता. अशा तऱ्हेचीं विधानें करण्याचा कित्ये-

कांचा* हल्लीं प्रघात पडलेला आहे. केवळ मतःपूत विधानें ठसकेदार रीतीनें ठोकून द्यायाचीं असल्यास त्याबद्दल कोणाचेंच कांहीं म्हणणें नाहीं. परंतु आगरकर व टिळक या दोघांचींहि चरित्रें, उद्गार व लेख काळजीपूर्वक पाहिले तर त्यांमध्यें कोणत्याहि तऱ्हेचा संवादीपणा आढळून येत नाहीं, हें अगदीं सप्रमाण सिद्ध करतां येईल. येथें जास्त विवेचन करण्यास अवकाश नाहीं. आगरकरांची मनोभूमिका व त्यांचीं धार्मिक मतें टिळकांच्याशीं अत्यंत विसदृश कशीं होतीं याचें अल्प दिग्दर्शन वर केलें आहे. " हे भीषण, बीभत्स, अमंगळ हिंदुधर्मा, ...निर्दय वंचका ! ...आजपर्यंत त्वां आम्हांस ज्या असह्य यातना भोगण्यास लाविलें आहेस, व जीं अनन्वित कृत्यें आम्हांकडून करविलीं आहेस त्या सर्वांबद्दल तुझीं पाळेंमुळें खणून काढून विचारकुंडांत पेटलेल्या प्रचंड अग्नीच्या कल्लोळांत तुझी आहुति देणाऱ्या नवीन ऋत्विग्वर्गाचा अवतार नुकताच झाला आहे ! "× याप्रमाणें हिंदुधर्मास शिव्या देऊन भेकडपणानें त्याजवर दात ओंठ खाणाऱ्या गृहस्थाच्या मतांच्या परिणाम पूर्ण धर्माभिमानी टिळकांवर कितपत झाला असावा व दोघांच्या मतांत कितपत साम्य वसत असावें याचा वाचकांनींच विचार करावा.

## जिनसीवाले व टिळक

याप्रमाणें महाराष्ट्रांत अलीकडे कार्यकर्ते व मतप्रवर्तक असे जे नांवाजण्यासारखे पुरुष होऊन गेले त्यांची टिळकांच्या धर्ममतांशीं अगदीं त्रोटक अशी तुलना केली. तथापि धार्मिक बाबतींत व इतरत्रहि टिळकांच्या समवेत ज्यांनीं बरींच वर्षें कार्य केलें अशा एका धर्माभिमानी व आचारशील पुरुषाचा थोडा तरी येथें उल्लेख केल्यावांचून पुढें जाणें योग्य होणार नाहीं. तो पुरुष म्हणजे टिळकांचे मित्र प्रो. जिनसीवाले हे होत. यांच्या सर्व चरित्राचें अवलोकन केलें म्हणजे असें दिसून येतें कीं, अव्वल दर्जाचे कार्यकर्ते होण्यास लागणारे बरेचसे गुण यांचे अंगीं होते; पण धोरण व प्रसंगावधान हे गुण यांच्यांत अगदीं नव्हते. त्यामुळें पुष्कळ ठिकाणीं यांच्या हातून अतिप्रसंग घडला व प्रोफेसरी जाऊन कांहीं सुकाणूं नसलेल्या तारवाप्रमाणें यांचें आयुष्य बनलें. असो; टिळकांचीं व यांचीं धर्ममतें व बहुधा इतर विषयांवरील मतेंहि सारखींच असत. हे मोठे धर्माभिमानी होते व आचरणानें अत्यंत शुचिर्भूत, स्नान-

---

* उदाहरणार्थ 'टिळक आणि आगरकर' हा माडखोलकर यांचा १ आगष्ट १९२२ च्या केसरींतील लेख पहा.

× सुधारकांतील " शहाण्यांचा मूर्खपणा अथवा आमचे प्रेतसंस्कार " या लेखांतील उतारा.

संध्याशील असत. संमतिबिलावरील चळवळ, श्रीगणपत्युत्सव, शिवाजी उत्सव वगैरे अनेक कार्यांमध्यें यांचें टिळकांना अत्यंत साहाय्य होत असे. असा अलौकिक विद्वान् गृहस्थ केवळ कमनशिबानें यावयास पाहिजे तसा पुढें येऊं नये व सध्यांच्या पिढींत तर त्याचें नांवहि विसरलें जावें ही खेदाची गोष्ट होय.

## अवघें देखे जन ब्रह्मरूप

याप्रमाणें महाराष्ट्रांत होऊन गेलेल्या पुढाऱ्यांच्या चरित्रांचा विचार केला म्हणजे ज्याची आस्तिक्यबुद्धि व हिंदुधर्माविषयींचा अभिमान संशयातीत व खंबीर होता व ज्याचें धोरणहि अटोकाट होतें असा टिळक हा एकच पुढारी जनतेला लाभला हें लक्षांत येतें. हृदयांत स्थिर असलेली ईश्वरनिष्ठा, परंपरागत हिंदुधर्माचा अभिमान व जरूर पडेल तेथें धर्माचा कैवार घेण्याची तयारी हे धार्मिक भावनेच्या जनतेशीं तादात्म्य होण्यांत लागणारे गुण अंगीं असल्यामुळें ते जनतेशीं तेव्हांच समरस झाले. पुढें तर जनता हेंच त्यांचें सारसर्वस्व होऊन बसलें होतें.

**ऐसें भाग्य कंई लाहता होईन। अवघें देखें जन ब्रह्मरूप ॥**

या तुकाराम महाराजांच्या उक्तीप्रमाणें सर्व जनतेला परमेश्वरस्वरूपांत पाहण्याचें भाग्य त्यांना लाधलें होतें. जनतेलाच ते परमेश्वर ('श्रीशाय जनतात्मने' गी. र.) किंवा परब्रह्म मानीत असत व ब्रह्माशीं तादात्म्य होऊन स्वतःच ब्रह्मरूप व्हावें, त्याप्रमाणें ते स्वतःच जनतास्वरूप होऊन गेले होते.

हा जो अद्वितीय लोकसंग्रहयोग त्यांना साधला त्याचें मुख्य कारण लोकांना पटण्यासारखी त्यांची धर्मबुद्धि व धार्मिक भावना या होत. या लोकसंग्रहाच्या बळावर त्यांनीं मोठमोठीं राजकीय कार्यें केलीं; तथापि त्या लोकसंग्रहाचें मूळ त्यांच्या धर्मबुद्धींत होतें हेंच त्यांच्या धार्मिक जीवनाचें रहस्य होय.

**इति शम्.**

# निबंध चौथा

( ले.—शंकर दामोदर पेंडसे, एम्. ए; एम्. ओ. एल्.)

लो. टिळक यांचीं धार्मिक मतें काय होतीं, ते आस्तिक होते कीं नास्तिक होते, सुधारक होते कीं पुराणमतवादी होते याबद्दल ते असतांना व नंतरहि बरेंच मतवैचित्र्य दृष्टीस पडतें. धार्मिक बाबतींत टिळकांचे प्रतिपक्षी जसे सुधारक वर्गांत होते तसे पुराणमतवाद्यांतहि होते, व टिळक हे नास्तिक आणि सुधारक आहेत ही गोष्ट ते त्वेषानें प्रतिपादीत असत. प्रसिद्ध समाजसुधारक आगरकर यांनीं ' हे तुमचे पुढारीच नव्हत ' या लेखांत, टिळक हे सुधारक असून जुन्या मताच्या लोकांना ते फसवीत आहेत असा उघड आरोप केला होता. जुन्या मताच्या लोकांतहि ' पुणेंवैभवा ' च्या पक्षांतील लोक टिळकांवर सुधारकत्वाचा आरोप करण्यास मागें पुढें पहात नसत. अगदीं अलीकडे टिळकांना उद्देशून केलेल्या खालील श्लोकांत टिळक हे सनातन धर्माचे विध्वंसक आहेत असा स्पष्ट आरोप त्यांच्यावर केलेला आहे—

" राजसाः कलिमाश्रित्य जायन्ते ब्रह्मयोनिषु ।
राष्ट्रभक्तिमिषेणैव घ्नन्ति धर्मान्सनातनान् ॥"

( कोल्हटकरकृत रहस्यखंडन )

याच्या उलट टिळकाच्या भाविक भक्तांची समजूत, टिळक हे अगदीं जुन्या मताचे आहेत अशी असे व अजूनहि आहे. महाराष्ट्राच्या बाहेर जसजसें जात जावें, तसतसें टिळक हे पुराणमतवादी होते अशीच समजूत सार्वत्रिक असलेली आढळून येते. टिळकांच्या भाविक अनुयायांचीं व प्रतिपक्ष्यांचीं हीं विकृत मतें बाजूला ठेवलीं तर टिळकांची धर्मबुद्धि व धार्मिक मतें काय होतीं हें समजण्याला त्यांनीं लिहिलेले ग्रंथ व लेख यांचेंच साहाय्य घेतलें पाहिजे. आपल्या लेखनांत व आचरणांत ज्या मतांचा त्यांनीं पुरस्कार केला तींच निःसंशय त्यांचीं मतें होत. हीं मतें काय होतीं तें पाहिलें म्हणजे अनायासें त्यांची धर्मबुद्धि कळून येणार आहे.

आंग्लविद्यारूपी वाघिणीचें दूध पिऊन स्वतंत्रपणें विचार करण्याची जी शक्ति तत्कालीन सुशिक्षितांना प्राप्त झाली होती तिच्यामुळें हुरळून जाऊन टिळकांनीं आपलीं धार्मिक मतें बनविण्याची घाई केली नाहीं. ऋषिमुनींनीं आपल्या विचारांनीं भूषविलेला आणि मनुयाज्ञवल्क्यांसारख्या समाजशास्त्रवेत्त्यांनीं आपल्या शासनानें सुव्यवस्थित केलेला जो स्वधर्म, त्यांतील विचार आणि आचार याविषयीं आपलीं मतें निश्चित करण्यापूर्वीं त्यांनीं श्रुति, स्मृति,

पुराणें यांचें अखंड परिशीलन केलें, मनन केलें आणि मग आपलीं मतें निश्चित केलीं. कायद्याच्या अभ्यासक्रमांत हिंदुधर्मशास्त्र हा टिळकांचा आवडता विषय असे व त्याच वेळीं हिंदुधर्मशास्त्रावरील मुख्य ग्रंथ व टीका वगैरेंचा अभ्यास टिळकांनीं फार लक्षपूर्वक केला होता. वेदांचा अभ्यास टिळकांनीं किती सूक्ष्मपणें केला होता हें 'ओरायन' व 'आर्क्टिक होम इन् दि वेदाज्' हे दोन ग्रंथ ज्यांनीं वाचले आहेत त्यांच्या लक्षांत येईल. तसेंच उपनिषदें, ब्रह्मसूत्रें व पुराणें यांजवर त्यांनीं केलेला दीर्घ व्यासंग त्यांच्या गीतारहस्य ग्रंथानें आपल्या निदर्शनास येतो. केवळ इंग्रजी शिक्षण मिळाल्यामुळें, स्वधर्मातील शेंकडों वर्षे प्रचलित असलेल्या आचारविचारांवर उच्छृंखळपणें वाटेल तो अभिप्राय देण्याची योग्यता आली असें न समजतां टिळकांनीं धर्मग्रंथांचा जो हा काळजीपूर्वक अभ्यास केला, त्यामुळेंच त्यांच्या धार्मिक मतांना विलक्षण महत्त्व प्राप्त झालें आहे.

## हिंदुधर्माचें लक्षण

प्रथमतः धर्म आणि नंतर हिंदुधर्म या शब्दांच्या टिळकांना अभिप्रेत असलेल्या व्याख्या पाहून नंतर त्यांच्या धार्मिक मतांकडे वळूं. 'रिलिजन' या शब्दानें जो अर्थ व्यक्त होतो त्यापेक्षां पुष्कळच अधिक अर्थ संस्कृत व प्राकृत वाङ्मयांत धर्म या शब्दानें अभिप्रेत असतो. 'धृ' धारण करणें या धातूपासून धर्म हा शब्द निघालेला आहे. कांहीं विशिष्ट नीतिनियम घालून देऊन धर्म हा समाजाचें धारण व पोषण करीत असतो. पण मनुष्यांनीं खावें, प्यावें, चैन करावी अशा उद्देशानें धर्म ही समाजधारणा करीत नाहीं. आहार, निद्रा, भय इत्यादि विकार पशूंप्रमाणेंच मनुष्याला रागतः प्राप्त असतात. धर्म या पशुवृत्तीला आळा घालण्यास सांगतो. प्रकृतीच्या ताब्यांत न जातां प्रकृतीवर ताबा मिळविण्यांतच खरा पुरुषार्थ आहे, खरी आत्मोन्नति आहे, ही गोष्ट धर्म शिकवितो. आणि आत्मोन्नति, आत्मकल्याण अथवा मोक्ष हें ध्येय पुढें ठेवून, त्याला अनुकूल असें नीतिविषयक नियम धर्म घालून देतो. निःश्रेयस किंवा मोक्ष हें मानवजातीचें परम साध्य प्राप्त करून घेण्याकरितां समाजाला स्वास्थ्य लाभावें, त्याचें धारणपोषण व अभ्युदय व्हावा, असा प्रयत्न धर्म करीत असल्यामुळेंच "यतोऽभ्युदयनिःश्रेयससिद्धिः स धर्मः" अशी धर्माची यथार्थ व्याख्या कणादानें केली आहे. सर्व मानवजातीच्या ऐहिक व पारमार्थिक कल्याणाकरितां अवतीर्ण झालेला जो हा धर्म तो वेदांनीं प्रणीत केलेला असल्यामुळें त्याला वैदिक धर्म म्हणतात; व हिंदुस्थानांतील लोकांनीं त्या धर्माचा स्वीकार केलेला असल्यामुळें त्याला 'हिंदुधर्म' अशीहि संज्ञा आहे.

या धर्माच्या पाठीमागून जे इतर धर्म उदयास आले त्यांपासून हा धर्म भिन्न रीतीनें ओळखण्याचें साधन म्हणून १९०० सालीं टिळकांनीं हिंदुधर्माचें व्यावर्तक लक्षण केलें तें असें:—

**प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु साधनानामनेकता।**
**उपास्यानामनियम एतद्धर्मस्य लक्षणम्॥**

वेदांच्या पौरुषेयत्वासंबंधानें किंवा त्यांतील प्रतिपाद्य विषयासंबंधानें जरी मतभेद असला तरी जोंपर्यंत वेद मूलभूत असून प्रमाण आहेत अशी एखाद्याची समजूत आहे तोंपर्यंत हिंदुधर्मातच त्याचा समावेश केला पाहिजे. वेदप्रामाण्य हें जसें हिंदुत्त्वाचें विशिष्ट लक्षण आहे तसेंच ईश्वरप्राप्तीच्या साधनांचें अनेकत्त्व हें दुसरें लक्षण आहे. इतर धर्मांत फक्त भक्ति हेंच साधन सांगितलें जातें. हिंदुधर्मांत भक्तीप्रमाणेंच ज्ञान, कर्म, योग हीं साधनेंहि सांगितलेलीं आहेत. ख्रिस्ती आणि महंमदी धर्मांपासून हिंदुधर्माची व्यावृत्ति करणारें तिसरें वैशिष्ट्य म्हणजे हिंदुधर्मानें मानलेले विभूतींचें अनेकत्त्व व ईश्वराचें एकत्त्व हें होय. ईश्वर जर मनुष्यजातीचा तारणकर्ता आहे, तर तो किंवा त्याचा अंश मनुष्यजातीबरोबर तरी जन्मास आला पाहिजे. हजारों वर्षेंपर्यंत मनुष्यजातीस तारणाऱ्यावांचून ठेवून नंतर कांहीं थोड्या वर्षांपूर्वी ख्रिस्त किंवा महंमद हे मनुष्यजातीला तारण्याकरितां ईश्वरानें जन्मास घातले हें म्हणणें सयुक्तिक किंवा विश्वासार्ह नाहीं. हिंदुधर्म, अशा तऱ्हेनें ईश्वराची करणी मर्यादित आहे असें मानीत नाहीं. सृष्टीच्या आरंभापासून आतांपर्यंत ईश्वराच्या नानातऱ्हेच्या विभूति उत्पन्न झाल्या आहेत व पुढेंहि होतील असें हिंदुधर्माचें कायमचें मत आहे, आणि म्हणून अमुकच एक उपास्य असलें पाहिजे असा नियम हिंदुधर्मांत नाहीं.

या व्यावर्तक लक्षणानंतर १९१५ सालीं हिंदुधर्माचें स्वरूपलक्षण सांगणारे खालील दोन श्लोक त्यांनीं केले आहेतः—

**"धर्ममेनं समालंब्य विधिभिः संस्कृतस्तु यः।**
**श्रुतिस्मृतिपुराणोक्तैः क्रमप्राप्तैरथापि वा॥**
**स्वे स्वे कर्मण्यभिरतः श्रद्धाभक्तिसमन्वितः।**
**शास्त्रोक्ताचारशीलश्च स वै हिंदुः सनातनः॥"**

वेदांचे ठिकाणीं ज्याची प्रामाण्यबुद्धि आहे, क्रमप्राप्त किंवा श्रुतिस्मृति–प्रतिपादित अशा विधींनीं ज्याचे संस्कार झाले आहेत व चातुर्वर्ण्याप्रमाणें प्राप्त झालेल्या कर्तव्यकर्मांचे व शास्त्रांनीं प्रतिपादिलेल्या आचारांचे जो श्रद्धेनें व भक्तीनें आचरण करीत आहे तो हिंदु होय. वेद अगर बायबल पाठ केलें म्हणजे तेवढ्यानें एखादा मनुष्य हिंदु किंवा ख्रिस्ती होत नाहीं. याच्या उलट वेद अगर बायबल ज्याला वाचतांहि येत नाहीं, त्यांत काय आहे हें ज्याला सांगतां येत नाहीं, तो हिंदु किंवा ख्रिस्ती असूं शकतो हें आपण पाहतों. म्हणून हिंदु किंवा ख्रिस्ती कोणाला म्हणावें याची व्याख्या करतांना निरनिराळ्या धार्मिक मतांचे नुसते तात्विक भेद दाखवून काम भागत नाहीं. त्या त्या धर्मांतील विधि किंवा संस्कार

होहि पाहावे लागतात. हे विधि व संस्कार प्रायः श्रुतिस्मृतिपुराणांतून नमूद केलेले असल्यामुळें हिंदुधर्मास श्रुतिस्मृतिपुराणोक्त म्हणण्याचा प्रघात आहे. तथापि श्रुतिस्मृतिपुराणांतून जे आचार सांगितले आहेत ते सर्वच या काळीं लागू आहेत असें नाहीं. देशकालमानानें आचाराआचारांत आतां फरक पडला आहे. पूर्वींचे कांहीं आचार व संस्कार आतां सुटले असून त्या जागीं कांहीं नवेहि आले आहेत. याचसाठीं या संस्कारांना क्रमप्राप्त असें विशेषण लाविलें आहे. पण श्रुतिस्मृतिपुराणोक्त किंवा क्रमप्राप्त आचारच जर पाळावयाचे तर जे श्रेयस्कर नसतील ते सुटावे कसे असा यावर एक आक्षेप येतो. या आक्षेपाला टिळकांनीं जें उत्तर दिलें आहे तें अनेक दृष्टींनीं महत्त्वाचें आहे. ते म्हणतात, "आचारात्मक हिंदुधर्माचें जें लक्षण वर दिलें त्याखेरीज 'धारणात् धर्मः,यतोऽभ्युदयनिःश्रेयस–सिद्धिः स धर्मः' अशीं हिंदुधर्मशास्त्रकारांनीं स्वीकारलेलीं धर्माचीं जीं दुसरीं लक्षणें आहेत तदनुकूल आचारांत फेरफार करण्याचा हिंदु-धर्मातील शिष्टांस अधिकार हिंदु शास्त्रकारांनीं दिला आहे, आणि हा अधिकार शास्त्रोक्तरीत्या बजावून स्वतःच्या उदाहरणानें परंपरागत आचारांत शिष्ट जो कांहीं फरक करतात तो लोकांसहि मान्य होऊन पुढें तो परंपरागत धर्माचाच एक भाग होत असतो." ( हिंदुधर्माचें स्वरूपलक्षण )

## व्यावर्तक लक्षणावरील आक्षेप

हिंदुधर्माच्या टिळकांनीं केलेल्या व्यावर्तक लक्षणावर मराठी ज्ञानकोशकारांनीं कांहीं आक्षेप घेतले असून त्याचाच अर्थशून्य अनुवाद आणखी कांहींजणांनीं केलेला आहे. या आक्षेपकांचें म्हणणें असें आहे कीं, 'हिंदुधर्म ही वस्तूच अस्तित्वांत नसल्यामुळें टिळकांनीं केलेलें त्याचें व्यावर्तक लक्षणहि बरोबर नाहीं. टिळकांनीं समाजशास्त्राचें अध्ययन केलेलें नसल्यामुळें त्यांच्याकडून ही चूक झाली.'

समाजशास्त्राच्या अगडबंब नांवापलीकडे या आक्षेपांत विशेष तात्पर्य आहे असें दिसत नाहीं. आमचा धर्म हा नुसता धर्म आहे, त्याला लावलेलें 'हिंदु' हें विशेषण हिंदु लोक तो आचरितात म्हणून लावलेलें आहे, ही साधी गोष्ट कळावयास समाजशास्त्राच्या प्रचंड अध्ययनाची आवश्यकता नाहीं. हिंदु हें धर्माचें नांव नसून लोकांचें नांव आहे ही गोष्ट स्वतः टिळकांनींच 'हिंदु' शब्दाचा मूळ अर्थ देतांना स्पष्ट केली आहे. "हिंदु हा सिंधु शब्दाचा अपभ्रंश असावा आणि अनार्य लोक बाहेरून या भरतभूमींत आले तेव्हां त्यांना सिंधु नदी लागून त्या नदीवरल्या व नदीपलीकडल्या लोकांस त्यांनीं हिंदु ही संज्ञा दिली. तत्पूर्वींचें आमचें नांव आर्य हें होय. सारांश, अनार्य म्हणजे म्लेंछ लोकांस आपल्यांहून विलक्षण असे सिंधुनदीपलीकडे जे लोक आढळले ते हिंदु

असा हिंदु शब्दाचा मूळ अर्थ आहे " ( हिंदुधर्माचें स्वरूपलक्षण ). आमचा धर्म हा एखाद्या राष्ट्राचा किंवा जातीचा धर्म नसून सर्व जगाचा धर्म आहे आणि इतर धर्म हे केवळ पंथ आहेत हे म्हणणें तत्वतः बरोबर असलें तरी इतरधर्मीय लोक आपापल्या धर्मांना पंथ मानून या जगाच्या धर्मांत सामील होण्याला जोंपर्यंत तयार नाहींत व आपले विवाहादि संस्कार व इतर आचार जगाचा धर्म स्वीकारलेल्या हिंदु लोकांप्रमाणें ते जोंपर्यंत करीत नाहींत तोंपर्यंत या म्हणण्याला व्यवहारांत यत्किंचितहि किंमत नाहीं. खिस्ती किंवा महंमदी लोक जर आपल्या धर्मांना पंथ मानतील तर इतर अनेक पंथांप्रमाणें या पंथानाहि, हिंदुलोकांनीं स्वीकारलेल्या जगाच्या धर्मांत सहज स्थान मिळेल, पण तसें जोंपर्यंत ते मानीत नाहींत तोंपर्यंत आम्ही मात्र आमचा जो धर्म तो जगाचा धर्म व इतरांचे धर्म ते याच धर्मांतील पंथ असें मानून स्वस्थ बसावें व इतर धर्मीयांनीं हिंदुधर्मांतील लोक आपल्या धर्मांत ओढून घ्यावे हा आत्मघातकीपणाचा प्रकार होय. इतर धर्म जेव्हां अस्तित्वांत नव्हते तेव्हां हिंदुधर्माचें वैशिष्टय दाखविण्याचें कारण नव्हतें, व त्याला 'हिंदुधर्म' म्हणण्याचीहि आवश्यकता नव्हती. आज इतर धर्म अस्तित्वांत आल्यामुळें हिंदुधर्माचें वैशिष्टय दाखविणें शक्य झालें आहे व तेंच टिळकांनीं आपल्या व्याख्येंत दाखविलें आहे.*

## धर्माचे दोन विभाग

धर्माचे सामान्यतः तात्विक व व्यावहारिक असे दोन विभाग पडतात. श्रौतस्मार्त कर्में आणि व्यवहारविषयक नियम हा धर्माचा आचारात्मक भाग होय. हा भाग जें ध्येय पुढें ठेवून सांगितलेला असतो किंवा ज्या तत्वज्ञानावर तो अधिष्ठित असतो तो धर्माचा विचारात्मक किंवा तात्विक भाग होय. मनुष्यजातीचें अंतिम ध्येय काय आहे हें धर्म आपल्या विचारात्मक भागांत ठरवितो, व तें ध्येय साध्य होईल अशा तऱ्हेचे व्यवहार व संस्कार तो आचारात्मक भागांत सांगत असतो. धर्म शब्दांत कशाचा अंतर्भाव होतो हें सांगतांना टिळक लिहितात, " धर्म शब्दांत परमेश्वराच्या ज्ञानाचा व त्याची कृपा संपादन करून घेण्याच्या मार्गांचाच समावेश होतो असें नाहीं तर, त्याबरोबर कांहीं सामाजिक, व्यावहारिक व नैतिक आचारांचा आणि आयुष्यांतील प्रसंगविशेषीं कराव्या लागणाऱ्या विधींचा व संस्कारांचाहि त्यांत समावेश केला जातो. " ( हिंदुधर्माचें स्वरूपलक्षण) " Religion in the true sense of the word means

---

* टीप—या विषयाचें जास्त विवरण प्रस्तुत लेखकानें ता. २० व २७ माहे नोव्हेंबर १९२३ च्या केसरीपत्रांतील 'हिंदुधर्माचें व्यावर्तक लक्षण' या लेखांत केलें आहे.

and includes the Knowledge of the nature of God and soul and of the ways and means by which the human soul can attain salvation" ( १९०१ सालीं हिंदुधर्मावर कलकत्ता येथें दिलेलें व्याख्यान ).

## आध्यात्मिक मतें

धर्माच्या या दोन विभागांपैकीं प्रथमतः टिळकांचीं आध्यात्मिक मतें काय होतीं हें पाहूं. दृश्य सृष्टि, तिला पाहणारा द्रष्टा जीव व सृष्टिकर्ता परमेश्वर, किंवा जगत्, जीव आणि जगदीश्वर, या त्रयीच्या स्वरूपाचा आणि त्यांच्या परस्पराशीं असलेल्या संबंधाचा विचार अध्यात्मशास्त्र करीत असतें. सृष्टीला स्वतंत्र आणि सत्य अस्तित्व आहे कीं नाहीं, जीवाचें स्वरूप काय आहे व जीव आणि शिव यांचा संबंध कोणत्या प्रकारचा आहे, या गोष्टींची चर्चा करून कांहीं सिद्धांत ठरविणें हा अध्यात्मशास्त्राचा विषय आहे. सृष्टींतील विषयांचें ज्ञान इंद्रियांचें साहाय्यानें आपणांला होतें. परंतु हें ज्ञान ज्याला होतें तो ज्ञाता स्वतःच्याच इंद्रियांचा भिन्न रूपानें कधींच विषय होत नाहीं. अर्थात् जो इंद्रियातीत आहे त्याचें मानवी इंद्रियांनीं परीक्षण करणेंहि अशक्य आहे. 'विज्ञातारमरे केन विजानीयात् ।' असें बृहदारण्यकांतहि सांगितलें आहे. अधिभौतिक शास्त्राचे विषय इंद्रियगोचर असतात आणि आध्यात्मिक शास्त्राचा विषय इंद्रियातीत म्हणजे केवळ स्वसंवेद्य अथवा ज्याचा त्यालाच कळणारा आहे. ज्ञात्याचें किंवा आत्म्याचें स्वरूप अशा रीतीनें जरी केवळ स्वानुभवगोचर असलें तरी प्रत्येक पुरुषाच्या मनाची शुद्धि किंवा शक्ति सारखीच नसल्यानें प्रत्येकाचा अनुभव या बाबतींत प्रमाण मानतां येत नाहीं. मनाच्या वृत्तींचा निरोध करून तें एकाग्र कसें करावें हें सांगणाऱ्या योगशास्त्रांत प्रवीण असून ज्यांचीं मनें अत्यंत शुद्ध व विशाल आहेत त्यांचीच प्रतीति या बाबतींत प्रमाण मानली पाहिजे. थोर थोर ऋषींनीं मन अंतर्मुख करून आत्म्याच्या स्वरूपाबद्दलचा आपला अनुभव, किंवा त्यासंबंधानें त्यांच्या शुद्ध व शांत बुद्धीला जें स्फुरण झालें तें, त्यांनीं उपनिषद्-ग्रंथांतून सांगितलें आहे. निरनिराळ्या उपनिषदांत दिसणारा विरोध नाहींसा करून त्यांची एकवाक्यता करण्याचा प्रयत्न ब्रह्मसूत्रांनीं केला असून उपनिषदें व ब्रह्मसूत्रें यांतील धार्मिक तत्वज्ञानाची पूर्णता भगवद्गीतेनें केली आहे. या त्रयीला प्रस्थानत्रयी असें नांव असून या तीन्हींमध्यें ज्या मताचा समावेश करतां येत नाहीं तें मत अगर सांप्रदाय वैदिक धर्मांतील लोक गौण व अग्राह्य मानूं लागल्यामुळें वेदांतांत अद्वैत, विशिष्टाद्वैत, द्वैत, शुद्धाद्वैत वगैरे जीं अनेक भिन्नभिन्न मतें आहेत त्या मतप्रवर्तक आचार्यांनीं किंवा त्यांच्या शिष्यांनीं या प्रस्थानत्रयी-वर भाष्यें लिहून या तिन्ही ग्रंथांवरून आपलेंच मत खरें ठरतें असें दाखविण्याचा

प्रयत्न केला आहे. निरनिराळ्या उपनिषदांची परस्परांशीं, आणि उपनिषदांशीं ब्रह्मसूत्रें व गीता यांची एकवाक्यता करण्याच्या या विलक्षण प्रयत्नांत अर्थाची अनेक ठिकाणीं ओढाताण करावी लागली आहे. अशा तऱ्हेची ओढून ताणून केलेली एकवाक्यता टिळकांना पसंत नाहीं. तत्वज्ञानाच्या दृष्टीनें प्रस्थानत्रयींत जरी एकवाक्यता असली तरी मोक्षप्राप्तीचा अगर आत्मज्ञानाचा एकच मार्ग या तीनहि ग्रंथांतून सांगितला आहे ही गोष्ट त्यांना मान्य नाहीं. बृहदारण्यक किंवा छांदोग्य हीं उपनिषदें संन्यासाचा पुरस्कार करणारीं व निवृत्तिपर आहेत तर ईश आणि कठ हीं उपनिषदें आणि भगवद्गीता हीं कर्मयोगाचा पुरस्कार करणारीं आहेत असें त्यांचें मत आहे. पूर्वग्रहरहित होऊन ते ते ग्रंथ जर आपण वाचून पाहिले तर टिळकांचें मत यथार्थ आहे असें आढळून येईल.

जीव, जगत् आणि जगदात्मा यांचें स्वरूप व परस्परसंबंध यांचें विवेचन करणारीं जीं निरनिराळीं मतें आहेत त्यांपैकीं शंकराचार्यांनीं सुव्यवस्थित केलेल्या अद्वैत मतांतील तात्विक भाग टिळकांना मान्य आहे. आचार्यांच्या मुख्य सिद्धांतांचा सारांश टिळकांनीं पुढीलप्रमाणें दिला आहे.

"१ सृष्टींतील पदार्थांचें नानात्व खरें नसून त्या सर्वांत एकच शुद्ध व नित्य परब्रह्म भरलेलें आहे आणि त्याच्या मायेनें मनुष्यास नानात्वाचा भास होत असतो.

२ मनुष्याचा आत्माहि मुळांत परब्रह्मरूपीच आहे.

३ आत्म्याच्या व परब्रह्माच्या या ऐक्याचें पूर्ण ज्ञान झाल्याखेरीज कोणालाहि मोक्ष मिळणें शक्य नाहीं. कारण एका शुद्ध, बुद्ध, नित्य परब्रह्माखेरीज दुसरी कोणतीहि स्वतंत्र व सत्य वस्तु नाहीं. डोळ्यांना दिसणारें नानात्व हा मानवी दृष्टीचा भ्रम किंवा मायेच्या उपाधीमुळें होणारा आभास आहे." (गी. र. १२).

नैय्यायिक, जगाचें कारण परमाणु मानतात व सांख्य, प्रकृति कारण आहे असें मानतात. पण हीं दोन्हीं तत्वें अचेतन असल्यामुळें त्यांत सृष्टिच्या आरंभीं पहिली प्रवृत्ति उत्पन्न होणें शक्य नसल्यामुळें जगाचें कारण कांहीं तरी चेतन आहे असें मानलें पाहिजे. तें नित्य असल्यानें निर्गुण मानलें पाहिजे. या नित्य, निर्गुण व चेतन कारणालाच ब्रह्म अशी संज्ञा आहे. या नित्य, निर्गुण व चेतन कारणापासून अनित्य, सगुण व अचेतन सृष्टि कशी निर्माण झाली असा प्रश्न निर्माण होतो. कारणांत जे गुण नसतात ते कार्यांत येऊं शकत नाहींत असा सत्कार्यवादाचा सिद्धांत असल्यामुळें या प्रश्नाला उत्तर देणें कठीण जातें. पण वेदांत्यांचें म्हणणें असें आहे कीं, सृष्टीला स्वतंत्र व सत्य अस्तित्वच नसल्यामुळें सत्कार्यवाद या ठिकाणीं लागू पडत नाहीं. ब्रह्म हें सृष्टीचें उपादान कारण आहे हें खरें; पण तें मृत्तिका जसें घटाचें उपादान कारण आहे तसें नसून विवर्तोपादान-

कारण आहे. ब्रह्मावर जगाचा विवर्त, अध्यास किंवा आभास प्रतीत होतो. वस्तुतः जें निर्गुण व नामरूपरहित आहे तें सगुण व नामरूपयुक्त दिसणें हाच मायेचा किंवा अज्ञानाचा प्रभाव आहे. यालाच अध्यास म्हणतात. पाण्यावर ज्याप्रमाणें कसला तरी तवंग यावा त्याप्रमाणें कोणत्या तरी एकाच मूळ द्रव्यावर अनेक नामरूपांचे हे तवंग आले आहेत. हीं नामरूपें मिथ्या असून ज्याच्यावर त्यांचा अध्यास होतो तेंच खरें आहे. अशा रीतीनें जगत् व जगदात्मा यांचें स्वरूप निश्चित केल्यावर जीवाचें स्वरूप सांगावयाचें राहतें. जगाचें कारण किंवा ब्रह्म चेतन मानावें लागतें हें वर सांगितलेंच आहे. जीवात्मा जरी मन व बुद्धि या पलीकडला अथवा इंद्रियातीत असला तरी स्वतःची प्रतीति प्रमाण मानून हा आत्मा जड नाहीं, चैतन्यरूपी आहे असा आपण निश्चय करतों. बुद्ध्यादि उपाधींमुळें या आत्म्याला जीवत्व आलें आहे. वस्तुतः परमात्मा व जीवात्मा चेतन असल्यामुळें "बाह्य सृष्टींतील नामरूपांनीं आच्छादिलेलें अविनाशी तत्व आणि आपल्या शरीरांतील बुद्धीपलीकडचें आत्मतत्व हीं दोन्हीं एकच म्हणजे एक-जिनसी, अमर, अव्यय आहेत, किंवा जें तत्व ब्रह्मांडीं तेंच तत्व पिंडीं म्हणजे मनुष्याच्या देहांतहि वास करीत आहे, हा सिद्धांत आमच्याकडील महर्षींनीं केला आहे." ( गीतारहस्य, पान २२४ )

उपनिषदें हीं अद्वैतप्रतिपादकच आहेत असें टिळकांचें निश्चित मत होतें, व तें खालील शब्दांत त्यांनीं व्यक्त केलें आहेः—" एकंदर उपनिषदांचा बराचसा भाग कापून काढल्याखेरीज उपनिषच्छास्त्राचें अद्वैताशिवाय दुसरें कांहीं रहस्य आहे असें दाखवितां येणें शक्य नाहीं...ज्या थोर महात्म्यांनीं उपनिषदांत 'नेह नानास्ति किंचन'—या सृष्टींत कोणत्याहि प्रकारचा अनेकपणा नाहीं, जें कांहीं आहे तें मुळांत सर्व 'एकमेवाद्वितीयम्' अशी आपली प्रतीति स्पष्ट सांगून 'मृत्योः स मृत्युमाप्नोति य इह नानेव पश्यति',—या जगांत ज्याला नानात्व दिसतें तो जन्ममरणाच्या फेऱ्यांत सांपडतो—असें वर्णन केलें आहे, त्या महात्म्यांचा आशय अद्वैताखेरीज दुसऱ्या कोणत्याहि प्रकारचा असूं शकेल असें आम्हांस वाटत नाहीं." ( गी. र. २३३ )

## शंकराचार्य व टिळक

परमात्मा हेंच जीवाचें स्वरूप असून, स्वतःच्या स्वरूपाचें ज्ञान नसल्यामुळें तो जन्ममरणाच्या फेऱ्यांत सांपडतो. आत्मज्ञान करून घेऊन मोक्ष मिळविणें हेंच जीवाचें अंतिम साध्य आहे. येथपर्यंत शंकराचार्य व टिळक यांचें ऐकमत्य आहे. 'ज्ञानादेव तु कैवल्यम्' हें मत दोघांनाहि मान्य आहे, पण ज्ञान किंवा संन्यासनिष्ठा आचार्यांना प्रिय तर कर्मनिष्ठा टिळकांना प्रिय आहे. कर्म हें चित्त-शुद्धीला उपयोगी पडतें, पण ज्ञानापासूनच मोक्ष मिळत असल्यामुळें मोक्षप्राप्तीस

कर्मांची जरूरी नाहीं; चित्त शुद्ध झालें म्हणजे कर्में निरर्थक होतात आणि तीं स्वभावतःच बंधक म्हणजे ज्ञानाला विरोधी असल्यामुळें ज्ञानोत्तर तीं ज्ञानी पुरुषानें सोडून दिलीं पाहिजेत असें आचार्यांचें मत आहे. याच्या उलट टिळकांच्या मतें संन्यास आणि कर्मयोग या दोन स्वतंत्र निष्ठा असून दोन्हीं सारख्याच निःश्रेयस्कर आहेत. " मुमुक्षूचें चित्त शुद्ध करणें एवढाच काय तो जगांत कर्माचा उपयोग आहे किंवा एवढयाचसाठीं कर्म उत्पन्न झालें आहे असें नाहीं. म्हणून मोक्षाखेरीज अन्य कारणांसाठींहि स्वधर्माप्रमाणें प्राप्त होणारे कर्म-सृष्टींतील सर्व व्यवहार ज्ञानी पुरुषानेंहि निष्कामबुद्धीनें करणें जरूर आहे. " ( गीतारहस्य पृ. २०७ ).

## निष्ठा आणि मार्ग

टिळकांच्या मतें वैदिक तत्त्वज्ञानाचीं ज्ञाननिष्ठा आणि कर्मनिष्ठा हीं दोन प्रमुख अंगें असून ज्ञान किंवा संन्यास; कर्म, भक्ति आणि योग हे ज्ञान-प्राप्तीचे मार्ग आहेत. "साधनावस्थेंत सर्व–कर्म–संन्यासपूर्वक अव्यक्ताची उपासना करणें याला ज्ञान किंवा संन्यास–मार्ग म्हणतात, आणि ज्ञानोत्तर सर्व कर्में सोडून देऊन ज्ञानांतच गढून जाण्याची सिद्धावस्थेंतील स्थिति दाख-विण्यास ' ज्ञाननिष्ठा ' या शब्दाचा उपयोग केला जातो. तसेंच शास्त्रोक्त मर्यादेप्रमाणें चित्तशुद्धीसाठीं प्रथम जें कर्म करावयाचें तो कर्ममार्ग होय. या कर्मानें चित्त शुद्ध होऊन परिणामीं ज्ञान व शांति प्राप्त होते. पण पुढें या ज्ञानांतच गढून न जातां शांतीनें आमरण निष्काम कर्में करूं लागणें म्हणजे ज्ञानयुक्त निष्काम कर्म या अर्थी कर्म हें निष्ठा होऊं शकतें. " अव्यक्तो-पासना करणें सामान्य जनांना शक्य नसल्यामुळें परमेश्वराच्या व्यक्त रूपाची उपासना प्रचारांत आली. हाच भक्तिमार्ग होय. "या मार्गाला एकदां लागल्या-नंतर केव्हां ना केव्हां तरी ' सर्व वासुदेवात्मक आहे ' असें परमेश्वरस्वरूपाचें खरें ज्ञान मनुष्यास प्राप्त होऊन त्या ज्ञानानें त्याला शेवटीं मुक्ति मिळते. " ज्ञानप्राप्तीचें सर्वांना सुलभ असें साधन म्हणून आमरणांत ईश्वरार्पणपूर्वक निष्काम कर्माबरोबरच उत्कट भक्तीचाहि टिळकांनीं पुरस्कार केलेला आहे.

## मूर्तिपूजा

खिस्ती व महंमदी धर्माचे लोक आणि आपल्यांतीलच ब्रह्म, प्रार्थना व आर्यसमाजिस्ट हिंदुधर्मांतील मूर्तिपूजेला तो एक वेडगळ प्रकार आहे असें म्हणत असतात. उत्तर हिंदुस्थानांत आर्यसमाजाचा एखादा प्रचारक ज्यावेळीं मूर्तिपूजेवर बोलूं लागतो तेव्हां त्याचें तें मूर्खपणाचें वाक्पांडित्य ऐकून, पर-धर्मांतील लोक पुरवले पण स्वधर्मांतील पूज्य तत्त्वांचा विपर्यास करून द्वेष वाढविणारे हे लोक जितके दूर असतील तितकें बरें असें वाटूं लागतें. हिंदु

धर्मापासून फटकून निघालेल्या या निरनिराळ्या समाजांत अनेक विचारी लोक होऊन गेले, पण त्यांच्याहि लक्षांत मूर्तिपूजेचें तत्त्व येऊं नये ही मोठ्या खेदाची गोष्ट होय. या दृष्टीनें टिळकांचे मूर्तिपूजेवरील विचार फार महत्त्वाचे आहेत.

" मन स्थिर करून साम्यबुद्धि संपादन करण्यासाठीं परमेश्वराच्या अनेक सगुण विभूतींपैकीं कोणत्याहि विभूतीचें स्वरूप प्रथम मनांत आणणें अथवा प्रतीक म्हणून डोळ्यापुढें ठेवणें हीं साधनें प्राचीन उपनिषदांतूनहि वर्णिलीं आहेत.... प्रतीक दगडाचें, धातूचें किंवा दुसरें कसलेंहि असो, प्रतीकापेक्षां त्याची योग्यता कधींहि अधिक होऊं शकत नाहीं. प्रतीकाचें ठिकाणीं जशी तुमची भावना असेल तसें तुमच्या भक्तीचें फल परमेश्वर -प्रतीक नव्हे- तुम्हांला देत असतो... फल तुमच्या भावाचें आहे, प्रतीकाचें नाहीं. हा सिद्धांत आमच्या सर्व शास्त्रकारांस संमत आहे.... मूर्तीच्या ठायीं परमेश्वराची भावना न ठेवतां मूर्ति म्हणजे केवळ कांहीं विशिष्ट प्रकारच्या आकाराची माती, दगड अगर धातु समजून तिची कोणी पूजा करीत नाहीं, आणि केली तर त्याला मातीची किंवा दगडाचीच गति प्राप्त होईल हें निर्विवाद आहे. प्रतीक आणि प्रतीकांत ठेवलेला भाव यांचा याप्रमाणें भेद केल्यावर प्रतीक कोणतेंहि असलें तरी त्याबद्दल तंटा करण्याचें कारण नाहीं. " ( गी. र. भक्तिमार्ग ) " नुसतां दगड मांडून तोच काय तो देव समजून पूजा केली तर तो उपहास होईल. पण संकेत किंवा चिन्ह म्हणून केल्यास उपहास करण्याचें कारण नाहीं. हल्लींचा काळ असा आहे कीं, कांहींना माणसांचे पुतळे चालतात, पण देवाचे पुतळे चालत नाहींत. " ( १९०३ चें व्याख्यान ).

## भक्तिमार्गावरील जुना आक्षेप

भक्तिमार्गाचा महाराष्ट्रांत प्रसार होत असतांना त्याला जे पहिले आक्षेपक भेटले ते कर्मठ ब्राह्मण होत. चित्तशुद्धीकरतां कराव्या लागणाऱ्या वेदविहित क्रिया सोडून देऊन, गळ्यांत माळ घालून टाळ कुटीत बसणें त्यांना पसंत नव्हतें. अशानें वैदिक क्रिया व संस्कार यांचा लोप होईल अशी त्यांना भीति होती. पण चित्तशुद्धीच्या वैदिक साधनांत एक अपूर्णता होती. ती अशी कीं, वेदविहित क्रियांचा अधिकार फक्त त्रैवर्णिकांसच होता. या तिन्ही वर्गांतील स्त्रिया किंवा समाजाच्या हिताकरितां शेती वगैरे करणाऱ्या इतर स्त्रीपुरुषांस श्रौतकर्मांचा व वेदाध्ययनाचा अधिकार नव्हता. इतकेंच नव्हे तर वेद ऐकणाऱ्या शूद्राच्या कानांत- ' त्रपुजतुभ्यां श्रोत्रे पूरणीये'-शिसें किंवा लाख ओतावी, असे अत्यंत कडक नियम होते. अनेक योग्य आणि अयोग्य कारणांनीं अस्तित्वांत आलेले समाजांतील उच्चनीचतेचे हे भेद मनुष्याच्या दरबारांत जरी मान्य केले गेले तरी

परमेश्वराच्या दरबारांत या भेदांना यत्किंचितहि किंमत नाहीं, ही गोष्ट भक्तिमार्गानें महाराष्ट्रांत प्रथमतः जाहीर केली, आणि मुक्तीचा मार्ग सर्व मनुष्यजातीला खुला करून दिला. यासंबंधींचें आपले विचार टिळकांनीं पुढील सुंदर शब्दांत व्यक्त केले आहेतः–" कोणत्याहि मनुष्याची योग्यता धंद्यावर अगर जातीवर अवलंबून नसून सर्वस्वी त्याच्या अंतःकरणाच्या शुद्धीवर अवलंबून असते... समाजांतील सर्व लोकांना मोक्षाचें द्वार खुलें झाल्यानें जी एक प्रकारची विलक्षण जागृति उत्पन्न होते तिचें स्वरूप महाराष्ट्रांतील भागवत धर्माच्या इतिहासावरून सहज कळून येण्यासारखें आहे. परमेश्वरास स्त्री काय, चांडाळ काय आणि ब्राह्मण काय सारखेंच. ' देव भावाचा भुकेला, प्रतीकाचा नाहीं, काळ्या गोऱ्या वर्णाचा नाहीं आणि स्त्रीपुरुषादि किंवा ब्राह्मण चांडालादि भेदांचाहि नाहीं. '

## भक्तिमार्गावरील नवा आक्षेप

अलीकडील काळांत भक्तिमार्गावरील पहिला जोराचा हल्ला महाराष्ट्रांत इतिहास–संशोधक राजवाडे यांनीं चढविला आणि नंतर ' वारकरी कीं धारकरी ' या लेखमालेंत ' भाला 'कारांनीं हा वाद चांगलाच रंगारूपास आणला. राजवाड्यांचें म्हणणें असें कीं, " या संत मंडळीच्या हातीं विचाराची दिशा जाऊन महाराष्ट्र तीन शतकें पंगू बनून राहिलें. सनातन धर्माला त्रासून महाराष्ट्रांतील लोकांनीं जी धर्मक्रांति केली तिचें स्वरूप हें असें होतें. कालांतरानें यवनांच्या अमलाखालीं पायमल्ली झालेली पाहून मराठ्यांचे डोळे उघडले, या पंगू संताळ्यांचा त्यांना वीट आला आणि सनातन धर्माकडे, गोब्राह्मणप्रतिपालनाकडे व चातुर्वर्ण्याकडे त्यांनीं पुन्हां धांव घेतली. "

महाराष्ट्रांतील साधुसंतांनीं तत्कालीन राजसत्तेविरुद्ध उठावणी करण्याला प्रत्यक्ष प्रोत्साहन दिलें नाहीं, ही गोष्ट कोणालाहि कबूल केली पाहिजे. पण असें असलें तरी त्यांना महाराष्ट्राच्या दुःस्थितीची जाणीव नव्हती, किंवा त्याबद्दल त्यांना कांहींच खेद होत नव्हता, असें अनुमान काढणें बरोबर होणार नाहीं. अडीचशें वर्षांपूर्वी महाराष्ट्रांत जी राज्यक्रांति झाली तिच्या बुडाशीं देशभक्ति नसून धर्मभक्ति होती ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजेच महाराष्ट्रीय संतांच्या कामगिरीचें महत्त्व लक्षांत येईल. शिवाजी महाराजांच्या ' हिंदवी स्वराज्या 'चा उल्लेख असलेल्या, स्वराज्यसंस्थापनेच्या आधींच्या पत्रांत व स्वराज्याच्या शेवटच्या काळांत होळकरानें प्रतिनिधींस लिहिलेल्या पत्रांत स्वराज्य हें हिंदुधर्मरक्षणाकरतां आहे ही एकच भावना दृष्टीस पडते. होळकर लिहितो, " अलीकडे ज्याचे त्याचे दौलतींत गृहकलह होऊन राज्यास विपर्यास पडून हिंदुधर्म नाहींसा होण्यास मूळ झालें....तरच मुळाचें छेदन

होऊन, स्वधर्माचार पूर्वींप्रमाणें चालून हिंदूंची कायमी राहील." या उताऱ्यावरून स्वराज्याच्या आरंभापासून तों अखेरपर्यंत हिंदुधर्माचें संरक्षण हेंच स्वराज्याचें ध्येय आहे, ही भावना कायम होती असें आढळून येईल. ज्या वेळीं महाराष्ट्रांत हिंदुधर्म, हिंदूंचीं मंदिरें व उपासनेच्या मूर्ति ही धोक्यांत आलीं होतीं, आणि यापेक्षांहि खेदाची गोष्ट अशी कीं, परकी अमलाखालीं महाराष्ट्र आपले आचारविचार टाकून देऊन, यावनी आचारविचारांचा स्वीकार करीत होता, ज्या वेळीं महाराष्ट्रांतील शूर लोक स्वधर्माची हीन स्थिति पहात असतांहि यवनांची चाकरी करण्यांत कृतकृत्यता मानीत होते, आणि महाराष्ट्रांतील भाविक लोक मुसलमानी पीरांना भजण्यांत आणि नवस करण्यांत स्वतःला धन्य समजत होते, ज्या वेळीं परतंत्रतेमुळें महाराष्ट्राचें शरीर तर छिन्नभिन्न झालेंच होतें, पण मनहि कुजण्याचें मार्गाला लागलें होतें अशा आणीबाणीच्या प्रसंगीं संतांनीं महाराष्ट्राचें मन शुद्ध करून त्याची जोपासना केली. स्वधर्म, स्वधर्मांतील उपासनामार्ग आणि उपासनेच्या मूर्ति याचें महत्त्व लोकांना समजावून दिलें, भक्तीचा प्रसार करून स्वार्थ व परस्परांचे द्वेष कमी केले, व अशा रीतीनें त्याला राजकीय मोक्षाला सन्मुख केलें याबद्दल या संतांचें महाराष्ट्रानें सदैव ऋणी असलें पाहिजे.

व्यक्तीची शरीरशुद्धि बरेच वेळां मनःशुद्धीवर अवलंबून असते. तशीच गोष्ट राष्ट्राचीहि आहे. राष्ट्रें परतंत्र होतात तीं परक्याच्या बलानें होत नाहींत; स्वतःच्या दुर्गुणांनीं होतात. स्वार्थाकरितां किंवा खासगी द्वेष उगवून घेण्याकरितां वाटेल तें अपकृत्य करण्याला राष्ट्रांतील लोक जेव्हां तयार होतात तेव्हांच तीं आपलें स्वातंत्र्य गमावतात, व हे दुर्गुण जोंपर्यंत कायम असतात तोंपर्यंत तीं परतंत्र राहतात. सध्याच्या आमच्या पतित आणि परतंत्र महाराष्ट्रांत स्वार्थाचा, व्यक्तिद्वेषाचा आणि जातिद्वेषाचा कसा बुजबुजाट झाला आहे हें पाहिलें म्हणजें वरील गोष्टीची सत्यता कळून येईल. महाराष्ट्राची चित्तशुद्धि करणें हें संतांचें कार्यक्षेत्र होतें, आपल्या बाहुबलानें महाराष्ट्राची परक्यांच्या दास्यांतून मुक्तता करून स्वधर्म व स्वधर्मीय यांचें संरक्षण करणारा वीर पुरुष ज्यावेळीं महाराष्ट्रांत वावरूं लागला तेव्हां त्या स्वधर्माभिमानी संतांना किती तरी आनंद झाला असेल. शिवाजीमहाराज जेव्हां तुकारामबोवांकडे आले तेव्हां स्वतःप्रमाणेंच सर्व दिवस परमेश्वराची भक्ति करण्यांत घालविण्याचा उपदेश त्यांनीं महाराजांना केला नाहीं. कारण महाराजांचें कार्यक्षेत्र निराळें असून त्याच क्षेत्रांत त्यांनीं काम केलें पाहिजे हें तुकारामबोवांना समजत होतें, आणि म्हणूनच त्या थोर पुरुषानें महाराजांना रामदासाकडे पाठवून दिलें. रामदास हे ब्राह्मण आहेत हा क्षुद्र विचार त्या महात्म्याला शिवलाहि नाहीं. अथवा पारतंत्र्याच्या नरकांत सदैव कुजत पडण्याचीच ज्यांची योग्यता आहे अशा क्षुद्र किड्यांशिवाय हे क्षुद्र विचार दुसऱ्या कोणत्या मनाला शिवणार आहेत?

धर्मकारण आणि राजकारण या दोन्हीकडे त्या वेळीं महाराष्ट्रानें सारखेंच लक्ष पुरविलें, आणि भागवतधर्मानें राजवाडे म्हणतात त्याप्रमाणें महाराष्ट्राची अवनति केली नसून महाराष्ट्राच्या राजकाणाला योग्य भूमिका तयार केली. हीच विचारसरणी टिळकांनीं खालील शब्दांत व्यक्त केली आहे. " भागवत धर्म कांहीं आजकालचा नाहीं. हा धर्म कोणास पंगू करीत नाहीं. ' मऊ मेणाहूनी आम्ही विष्णूदास । कठिण वज्रास भेदूं ऐसे ॥ ' अशी तुकारामाचीच उक्ति नाहीं काय? आतां ऐहिक सुखाची निवृत्ति होऊन परमार्थाकडे लक्ष लागलेल्या साधुसंतांची प्रत्यक्ष कृति जरी आपल्या नजरेस येत नाहीं तरी त्यांचें अस्तित्व हीच एक मोठी जागृति आहे. त्यांची निरपेक्षता, त्यांचा स्वार्थत्याग, त्यांचें दयालुत्व, इत्यादि गोष्टीच इतर मनुष्यांचे ठिकाणीं स्वधर्म आणि स्वकर्म आचरिण्याची प्रवृत्ति करतात. रामदासानीं जें कार्य केलें त्याला ज्ञानदेवादि पूर्वींच्याच संतांचा पाठिंबा होता, ही गोष्ट विसरतां कामा नये. " ( १९०४ चें व्याख्यान )

खरें पाहिलें तर नुसत्या भक्तीनें दुबळेपणा येत नाहीं, हें भक्तिप्रधान अशा महंमदी व शीख धर्मांच्या उदाहरणावरून आपल्या लक्षांत येईल. वारकऱ्यांप्रमाणेंच हुबेहुब शीखांतहि भजन करण्याची चाल आहे. पण पंजाबांतील शीख आणि महाराष्ट्रांतील वारकरी यांच्या स्वभावांत आज सिंह आणि शेळी यांच्याप्रमाणें जमीन–अस्मानाचें अंतर पडलें आहे. शीख कडवा, तर वारकरी बावळा. स्वधर्मरक्षणाकरितां शीख कृपाण उचलणार, तर वारकरी जुलूम निमूटपणें सहन करणार अशी आजची स्थिति आहे. वस्तुतः शीख आणि वारकरी दोघे भक्तिमार्गी; पण आजचा वारकरी नेभळट बनला यांचें कारण भक्तिमार्ग नसून त्यांत शिरलेलें कर्मसंन्यासाचें तत्व आहे, आणि अशा तऱ्हेचा संन्यास टिळकांना अर्थातच पसंत नाहीं. ते म्हणतात, " कर्मानीं चित्तशुद्धि होऊन ज्ञान झाल्यावर, चतुर्थाश्रम घेऊन ब्रह्मचिंतनांत गढून गेलें काय, किंवा प्रेमानें वासुदेवभक्तींत रंगून गेलें काय, दोन्ही मार्ग कर्मयोगदृष्ट्या एकाच मासल्याचे म्हणजे निवृत्तिपर होत. " ( गी. र. १६ ) असें टिळकांचें मत असल्यामुळेंच भगवद्भक्तांनींहि केवळ भक्तींतच रंगून न जातां निष्काम कर्मयोग आचरला पाहिजे असें त्यांनीं प्रतिपादिलें आहे.

## स्मार्त आणि भागवतधर्म

स्मार्त धर्मांत ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्याशी अशी चार आश्रमांची व्यवस्था करून वृद्धावस्थेंत संन्यासाला स्थान दिलें आहे. टिळकांच्या मतें, " शरीरसामर्थ्य नसतां कोणी समाज सोडून अरण्यांत गेल्यास ती गोष्ट निराळी, व संन्यासाश्रमास वृद्धापकाळाची मर्यादा घालण्यांत मनूचा हाच हेतु असावा. पण पुढें ही श्रेयस्कर मर्यादा अमलांत राहिली नाहीं. "

( गी. र. ३३८ ) स्मार्त धर्मांत संन्यासाला स्थान दिलें आहे तर भागवत-धर्मांत ज्ञानकर्मांचा समुचय केलेला आहे, हाच त्या दोन धर्मांतील फरक होय. टिळक म्हणतात, "मूळ भागवत धर्माचें स्वरूप 'नैष्कर्म्य लक्षण' म्हणजे निष्काम प्रवृत्तिपर होतें असें भागवतांतहि म्हटलें आहे......पण कर्म-योगाचें हें महत्त्व कालांतरानें लुप्त होऊन भगवद्भक्त म्हणजे संसारिक कर्मा-कडे दुर्लक्ष करून, वैराग्यानें केवळ भक्तींतच गढून गेलेला पुरुष अशी अलीकडे भागवतधर्मीयांची सुद्धां समजूत झाली आहे. भागवत धर्मांतिल ब्रह्म म्हणजे खुद्द सगुण भगवान होय. हे भगवान स्वतःच जर जगाची घडामोड चालवितात आणि साधूंच्या रक्षणार्थ व दुष्टांच्या निग्रहार्थ वेळोवेळीं अवतार घेऊन जगाचें धारणपोषण करतात, तर भगवद्भक्तांनींहि लोकसंग्रहार्थ तोच कित्ता गिरविला पाहिजे हें निराळें सांगावयास नको." ( गी. र. ४३३ )

## योग

योगासंबंधानेंहि टिळकांचें हेंच धोरण आहे. मोक्षानुकूल कर्माची बुद्धीला प्रेरणा होण्यास ती सात्त्विक करावी लागते, व ती सात्त्विक होण्याला इंद्रिय-निग्रहरूपी योग आचरावा लागतो. पण टिळकांच्या मतें नेहेमींच योग्याभ्यासांत गढून जाणें चांगलें नव्हे. "कर्मयोग एकसारखा चालवीत असतां, थोडा वेळ नित्य किंवा मधूनमधून कांहीं काळ एकांताचेंहि सेवन करणें जरूर पडतें. पण त्यासाठीं जगाचे व्यवहार सोडावयाला पाहिजेत असें नाहीं. उलट जगाचे व्यवहार निष्काम बुद्धीनें करतां यावे यासाठींच इंद्रियनिग्रहाचा हा अभ्यास करण्यास सांगितला असून तो चालू असतां त्याबरोबरच निष्काम कर्मयोगहि यथाशक्ति प्रत्येकानें आचरिला पाहिजे." ( गी. र. २८० )

## प्रवृत्तिस्वातंत्र्य

ज्ञानप्राप्तीचे हे जे मार्ग सांगितलें त्यांचें आचरण करण्याला मनुष्य स्वतंत्र आहे कीं नाहीं असा एक प्रश्न उत्पन्न होतो. 'बुद्धिः कर्मानुसारिणी' या न्यायानें पाहिलें तर मनुष्य पूर्वकर्मांच्या अथवा प्रकृतीच्या ताब्यांत असून त्याला प्रवृत्तिस्वातंत्र्य यत्किंचितहि नाहीं असें वाटतें. या दैववादाचा स्वीकार कांहीं पाश्चात्य तत्त्वज्ञांनींहि केलेला आहे. टिळकांना हा दैववाद कबूल नसून जीवाला प्रवृत्तिस्वातंत्र्य आहे ही गोष्ट त्यांनीं खालील शब्दांत सांगितली आहे. "नामरूपात्मक सर्व दृश्य सृष्टीला आधारभूत जें तत्व तेंच मनुष्याच्या जड देहांतहि आत्मरूपानें खेळत असल्यामुळें मनुष्याच्या कृत्यांचा जो विचार करावयाचा तो देह आणि आत्मा या दोन्ही बाजूंनीं करावा लागतो. पैकीं आत्म-स्वरूपीं ब्रह्म मुळांत एकलें एकच असल्यामुळें तें कधींच परतंत्र असूं शकत नाहीं. कर्म हें अनित्य व मुळांत परब्रह्माचीच लीला असल्यामुळें......परब्रह्माला तें कधींच गुलाम करूं शकत नाहीं." ( गी. र. २७५ )

## वासनाक्षय

मनुष्याच्या सुखाच्या वासना कधींहि पूर्ण होत नाहींत, आणि त्यामुळें त्याला दुःख होतें. तेव्हां या वासनांचा अजीबात क्षय करून तन्मूलक कर्मेंहि अजिबात टाकून द्यावीं असें कित्येकांचें मत आहे. टिळकांना तें पसंत नाहीं. ते लिहितात, “ अग्नीनें कधीं कधीं घरें जळतात म्हणून त्याचा सर्वस्वीं त्याग करून पाकसिद्धीहि करणें लोकांनीं सोडून दिलें आहे काय ? अग्नीसच काय, पण विद्युच्छक्तीसहि योग्य मर्यादेंत ठेऊन आपण त्यांचा नित्य व्यवहारांत उपयोग करून घेतों, तर तृष्णेची किंवा असंतोषाची त्याचप्रमाणें व्यवस्था लावणें कांहीं अशक्य नाहीं. चातुर्वर्ण्यानें बांधलेल्या समाजांत ब्राह्मणांनीं ज्ञानाची, क्षत्रियांनीं ऐश्वर्याची, आणि वैश्यांनीं धनधान्याची वासना जर सोडली तर तो समाज लवकरच अधोगतीला जाईल. ” ( गी. र. १०८ ) वासना अगर तन्मूलक कर्में हीं दुःखाचें मूळ नसून त्यांमध्यें जो मनुष्य काम अगर आसक्ति ठेवितो, ती दुःखाचें मूळ आहे. ती आसक्ति सोडली म्हणजे वासना अगर तन्मूलक कर्में सोडण्याची जरूरी नाहीं, असा टिळकांचा सिद्धांत आहे.

धर्माचे तात्विक आणि आचारात्मक असे जे दोन भाग त्यांपैकीं तात्विक भागावरील टिळकांचीं मतें बहुतेक त्यांच्याच शब्दांत आतांपर्यंत पाहिलीं. धर्मानें विहित अशीं जीं श्रौतस्मार्त कर्में तो धर्माचा आचारात्मक भाग होय. हीं श्रौतस्मार्त कर्में आणि तीं ज्या चार वर्णांतील लोकांना उद्देशून सांगितलीं आहेत, तें चातुर्वर्ण्य यांसंबंधानें टिळकांचीं मतें काय होतीं हें आतां पहावयाचें आहे.

## यज्ञचक्र आणि निष्काम कर्मयोग

“ एवं प्रवर्तितं चक्रं नानुवर्तयतीह यः ।
अघायुरिंद्रियारामो मोघं पार्थ स जीवति ॥ ”

वैदिक धर्माच्या इतिहासाच्या दृष्टीनें पाहिलें तर प्रथमतः श्रौत किंवा यज्ञयागादिक कर्मांचें विवरण करून मग तत्त्वज्ञानाकडे वळलें पाहिजे. वैदिकधर्म हा प्रथमतः यज्ञप्रधान धर्म होता. उपनिषदांतील तात्विक विचार हे पाठीमागून जन्माला आलेले आहेत. ब्राह्मणग्रंथांत यज्ञयागादि कर्मांचा विचार केलेला असून यज्ञांतील ज्या देवतांना उद्देशून हविर्भाग अर्पण करावयाचे त्या देवतांच्या स्तुतीकरितां संहितेंतील सूक्तांचा विनियोग केलेला आहे. निरनिराळ्या ब्राह्मणग्रंथांतून वर्णिलेल्या यज्ञविधींची संगति लावण्याकरितां जैमिनीनें सूत्रें केलीं असून, ‘ पूर्व–मीमांसा ’ या नांवानें हें शास्त्र प्रसिद्ध आहे. कर्मप्रधान वैदिकधर्म ज्ञानप्रधान कसा झाला हा इतिहास मनोरंजक व बोधप्रद आहे. यज्ञ-

यागादि क्रिया जोरांत असतांनाच केवळ कर्मापासून मनुष्याची आत्यंतिक उन्नति होणें शक्य आहे किंवा नाहीं याचा विचार करणारे लोक निर्माण झाले. जीव, शिव आणि सृष्टि यांच्या स्वरूपाचा खोल विचार करून त्यांनीं निर्णय केला, आणि अनुभविलेले सिद्धांत उपनिषदांत सांगून ठेविले. बहुतेक उपनिषदें जरी ' ब्राह्मण'ग्रंथांना जोडलेलीं आहेत तरी भाषा आणि विचार यांच्या भेदावरून ब्राह्मण व उपनिषदें यांतील कालभेदहि स्पष्ट निदर्शनाला येतो. यज्ञसंस्थेच्या मागून हे आत्मज्ञानाचे विचार अस्तित्वांत आल्यामुळें कर्म हें मुख्य असून आत्मज्ञान गौण व कर्माचें अंग आहे असा कर्मवाद्यांनीं सिद्धांत केला. अशा रीतीनें उपनिषदांतील विचारांना सामावून घेऊन वैदिक कर्ममार्ग आपल्या प्रमुख स्वरूपांत विराजमान असतांना त्याच्यावर पहिला जोराचा हल्ला बौद्धधर्मीयांनीं चढविला. बौद्धांनीं वेद झुगारून दिले, कर्मकांड अमान्य केलें, उपनिषदांतील ' सर्व खल्विदं ब्रह्म ' या आस्तिक सिद्धांताचा तिरस्कार करून ' सर्व शून्यम् ' असा शून्यवादाचा व नास्तिक तत्त्वज्ञानाचा प्रसार केला, वैदिक कर्ममार्गाच्या अगदीं विरुद्ध असा संन्यासधर्म प्रचलित केला आणि पुरुष व स्त्रिया यांना सरसकट भिक्षु व भिक्षुणी करण्याचा तडाखा चालविला. मनुष्यस्वभावाचें इतकें गाढ अज्ञान जगांतील दुसऱ्या धर्मांनीं फार क्वचितच दाखविलें असेल. बौद्धाचें नास्तिक तत्त्वज्ञान आणि त्यांचा संन्यासमार्ग यांचा उदय या भरतभूमींत ज्या दिवशीं झाला तो दिवस शुभ कीं अशुभ हें निश्चितपणें सांगणें कठीण आहे. तथापि, अनेक विचारी पुरुषांचें असें ठाम मत आहे कीं, बौद्धधर्माच्या हिंदुस्थानांतील प्रसारामुळेंच मुसलमानांच्या स्वाऱ्यांचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य हिंदुलोकांत राहिलें नाहीं. तें कसेंहि असलें तरी बौद्धधर्मानें भारतवर्षाच्या अंगांत ओतलेलें नेभळटपणाचें हें विष अजूनहि निःशेष झालेलें नाहीं ही गोष्ट मात्र खरी आहे. बौद्धधर्माचा प्रसार हिंदुस्थानांत फार मोठ्या प्रमाणावर झाला. वेदांचा अधिकार नसलेला खालचा वर्ग आणि स्वभावतःच शांतताप्रिय वैश्यवर्ग यांतील बऱ्याच लोकांनीं या धर्माचा स्वीकार केला. कित्येक क्षत्रिय राजे आणि ब्राह्मणहि या धर्माला भुलले. बौद्धधर्म प्रसाराची ही प्रचंड लाट परतविण्याची महत्त्वाची कामगिरी त्यावेळीं मीमांसकांनीं केली. वैदिक परंपरेचे हे श्रद्धावान् अनुयायी बौद्धधर्मप्रसारानें घाबरून गेले नाहींत, आपल्या धर्माला ते चिकटून राहिले व त्यांनीं आपलें स्वतःचें तत्त्वज्ञान निर्माण केलें. ' सर्व शून्यम् ' या बौद्धांच्या तत्त्वज्ञानाचें खंडन करून ' सर्व जग सत्य आहे ' या तत्त्वज्ञानाचा त्यांनीं प्रसार केला, आणि बौद्धांच्या संन्यासाविरुद्ध वैदिक कर्ममार्गाचें जोरानें समर्थन केलें. अशा रीतीनें कर्मपर वैदिक धर्माच्या पडत्या काळांत त्याला न सोडतां, मीमांसकांनीं त्याची पुन्हा पूर्वीच्या श्रेष्ठ पदावर स्थापना केली आणि बौद्धधर्माला हिंदुस्थानांतून पिंवळ्या

लोकांच्या मुलखांत पिटाळून लावलें. वैदिक धर्माला या प्राणसंकटांतून बचावण्याचें श्रेय जर कोणाला द्यावयाचें असेल तर तें शंकराचार्यांना नसून मीमांसकांना दिलें पाहिजे. बरेंच वेळां ही गोष्ट विसरली जाते म्हणून तिचा येथें मुद्दाम निर्देश केला आहे. शंकराचार्यांचे वेळीं बौद्धधर्म लुप्तप्राय होऊन त्यांचें तत्त्वज्ञान तेवढें शिल्लक उरलें होतें व मीमांसकांचीं मतें तेव्हां सुप्रतिष्ठित झालीं होतीं, ही गोष्ट शंकराचार्यांना बौद्धांप्रमाणेंच मीमांसकांचेंहि खंडण करावें लागलें, यावरून लक्षांत येईल. शिवाय ऐतिहासिक पुराव्यानेंहि हीच गोष्ट स्पष्ट दिसेल. शंकराचार्य उत्पन्न होण्याच्या पूर्वींच ६ व्या शतकांत चालुक्य घराण्यांतील पहिल्या पुलकेशीनें क्षत्रियधर्माला व सत्तेला आवश्यक वाटणारा अश्वमेध केला होता. उत्तरेकडे मगध देशांत बौद्धांचा पाडाव करून तेथें प्राचीन वैदिक धर्माची पुनरपि स्थापना केल्याची खूण म्हणून गुप्तराजांनीं अश्वमेध केल्यानंतर तीन शतकें या यज्ञांचा भर पुनः सुरू झाला तो हर्षकाळापर्यंत चालू होता; आणि हर्षानें त्यांना जरी बंदी केली तरी नेहमींचें जें अग्निहोत्र तें ब्राह्मणांमध्यें हर्षकाळीं सुद्धां जारीनें सुरू असून आहिताग्नि गृहस्थांच्या वृत्तीनें रहाणारे बहुतेक ब्राह्मण अग्निहोत्री असत. इ. स. ५७८ तील बदामीच्या कीर्तिवर्म्याच्या कोरीव लेण्यांतील लेखांत चालुक्य राजांनीं अग्निष्टोम, वाजपेय, पौंडरीक, अश्वमेध इत्यादि याग केल्याचें सांगितलें आहे. ( मध्ययुगीन भारत १५३–५४ ) मीमांसकांना वैदिक परंपरेचा पाठिंबा असल्यामुळें बौद्ध त्यांचा पराभव करूं शकले नाहींत. याच्या उलट बौद्धांनीं वैदिक परंपरेला अजिबात झुगारून दिलें असल्यामुळें मीमांसकांना आपली लोकमतावरील छाप कायम ठेवितां आली, व ते बौद्धांचा पराभव करूं शकले. पण यानंतर त्यांना जो प्रतिपक्षी मिळाला तो मात्र सामान्य नव्हता. उपनिषदें आणि ब्रह्मसूत्रें यांच्या आधारानें शंकराचार्यांनीं मीमांसक आणि त्यांचें कर्मकांड यांविरुद्ध जोराची मोहीम सुरू केली आणि बौद्धांच्या संन्यासवादाची लाट मीमांसकांनीं जरी परतविली तरी स्वधर्मांतूनच उत्पन्न झालेली निवृत्तीची ही लाट मीमांसकांना थांबवून धरतां आली नाहीं. आत्मज्ञानानें मोक्षप्राप्ति करून घेणें हेंच मनुष्याचें ध्येय आहे ही गोष्ट उपनिषदांतील विचारांनीं लोकांच्या मनावर हळूहळू ठसत गेली व नित्य मोक्ष अनित्य कर्मांनीं मिळणें अशक्य आहे असा सिद्धांत करणें ओघानेंच प्राप्त झालें. ‘ स्वर्गकामो यजेत ’ या वेदवाक्याला अनुसरून जर यज्ञ केला तर स्वर्ग मिळेल. पण हा स्वर्गहि अनित्य असल्यामुळें–‘ क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति ’ पुण्य संपल्याबरोबर जीवाला पुन्हा जन्ममरणप्रवाहांत पडावें लागतें, याकरितां फार झालें तर यज्ञयागादिक कर्में निष्कामबुद्धीनें चित्तशुद्धीकरितां करावीं, असें ज्ञानकांडानें ठरविलें. आणि एका काळीं वैदिक धर्मांत अग्रस्थानीं विराजमान झालेलें हें कर्मकांड ज्ञानाच्या दृष्टीनें गौण होऊन बसलें. ज्ञानकांडाला अशा

रीतीनें प्राधान्य आल्यानंतर कर्माविरुद्ध जोराची प्रतिक्रिया सुरूं होऊन, कर्म-त्यागाची–संन्यासाची–प्रवृत्ति बळावली व ज्ञान आणि संन्यास ही जोडी अभेद्य झाली. ही प्रतिक्रिया इतकी जोराची होती कीं, ‘ कर्मकांडाला प्राधान्य देत नसाल तर देऊं नका, पण ज्ञानापूर्वीं तरी कर्म ‘ आवश्यक ’ आहे असें म्हणा ’ ही कर्मकांडाची साधी मागणी सुद्धां आचार्यांनीं मान्य केली नाहीं. ‘ अथातो ब्रह्मजिज्ञासा ’ या सूत्रांतील ‘ अथ ’ शब्दाचा अर्थ काय याची चर्चा करतांना ‘ ननु इह कर्मावबोधानंतर्यं विशेषः ’–कर्मकांडाच्या ज्ञानानंतर ब्रह्मजिज्ञासा करावी–असें मीमांसकांनीं सुचविलें असतां शंकराचार्यांनीं ‘नाहीं’ असें स्पष्ट उत्तर दिलें आहे. ते म्हणतात, ‘ न। धर्मजिज्ञासायाः प्रागपि अधीतवेदान्तस्य ब्रह्मजिज्ञासोपपत्तेः । –धर्मजिज्ञासेच्या पूर्वींहि ब्रह्मजिज्ञासा होणें शक्य असल्यामुळें कर्मकांडाच्या ज्ञानाची आवश्यकताच आहे असें नाहीं. ’ ज्या यज्ञसंस्थेनें हजारों वर्षें वैदिक धर्मीयांच्या मनावर अप्रतिहत अंमल चालविला, त्या यज्ञ-संस्थेला आस्ते आस्ते गौणत्व येऊन तिची जागा ज्ञानकांडानें घ्यावी, व अशा रीतीनें वैदिक धर्माचें मूळ स्वरूप अजिबात पालटून जावें ही विचारक्रान्ति निःसंशय प्रचंड आणि महत्त्वाची आहे. यज्ञसंस्थेचे एकनिष्ठ सेवक व वारसदार या नात्यानें मीमांसकांनीं ज्ञानकांडाच्या वरचढीला अगदीं तळमळून जोराचा विरोध केला ही गोष्ट पौरस्त्य तत्वज्ञानाचा इतिहास लिहिणाराला नमूद करावी लागेल. मीमांसकांच्या या विरोधाचें प्रत्यंतर शंकराचार्यांचे ग्रंथ वाचतांना जागो-जागीं आढळून येते. ‘ तत्तु समन्वयात् ’ या सूत्रावरील भाष्यांत मीमांसकांचें मत आचार्यांनीं जरा विस्तारानें उद्धृत केलें आहे. प्रसिद्ध विद्वान वाचस्पतिमिश्र यांनीं शांकरभाष्यावर लिहिलेल्या ‘ भामति ’ नांवाच्या टीकेंत अध्यात्मसंबंधीं चर्चा चालली असतां मीमांसकांचें त्या विषयावरील मत उद्धृत केलें आहे, त्यावरूनहि मीमासकांच्या तत्त्वज्ञानाची व त्यांनीं केलेल्या विरोधाची कांहीं कल्पना येते. मीमां-सकांचे ग्रंथ रुक्ष असले तरी त्यांचें तत्वज्ञान तेजस्वी आणि आकर्षक आहे यांत शंका नाहीं. शंकराचार्यांच्या प्रतिपक्षांत बौद्ध व जैन यांच्यासारखे वेदाला न मानणारे लोक होते. सांख्यादि इतर प्रतिपक्षी वैदिक वचनांचा आपल्याला अनुकूल अर्थ करीत असत. पण त्यांपैकीं वेदांना डोक्यावर घेऊन नाचणारे कोणीच नव्हते. वैदिक परंपरेचा पाठिंबा आम्हाला आहे असें निश्चयानें त्यापैकीं कोणालाहि म्हणतां येत नसल्यामुळें शंकराचार्यांना त्यांचें खंडण करणें जरा सुलभ गेलें. पण मीमांसकांची गोष्ट तशी नव्हती. वैदिक परंपरेच्या सिंहासनावर ते अधिष्ठित झालेले होते. यज्ञसंस्थेचे ते सम्राट होते. “ आम्नायस्य क्रियार्थत्वात् आनर्थक्यं अतदर्थानाम् ”–वेदवाक्यें हीं कर्माकरितां आहेत; जीं तशीं नाहींत तीं निरर्थक आहेत–हें त्यांचें ब्रीदवाक्य होतें. आणि याच्या जोडीला अखिल वैदिकधर्मीयांच्या मनावर त्यांच्या मतांची विलक्षण छाप होती. अशा सामर्थ्य-

वान् प्रतिपक्ष्यांशीं सामना देऊन आचार्य विजयी झाले, उपनिषदांतील तत्त्वज्ञानाचा त्यांनीं उद्धार केला, आणि सर्वत्र संचार करून लोकमत आपल्या अनुकूल करून घेतलें, या गोष्टी सर्वमान्य आहेत. पण वैदिक कर्मे हीं चित्तशुद्धीला उपकारक आहेत हें म्हणणें आचार्यांना जरी कबूल असलें तरी तीं आवश्यकच आहेत असें त्यांचें मत नसल्यामुळें आणि एकंदरींत कर्मापेक्षां संन्यासाकडेच त्यांचा कल जास्त असल्यामुळें, आचार्यांच्या या विजयानें वैदिक यज्ञसंस्थेविरुद्ध जोराची प्रतिक्रिया सुरू होऊन ती संस्था जवळ जवळ उध्वस्त झाली ही गोष्ट आपणांस कबूल केली पाहिजे.

शंकराचार्य आणि बौद्ध यांच्या तत्वज्ञानांत सकृद्दर्शनीं तरी एक प्रकारचें विलक्षण साम्य दिसतें. बुद्धांच्या तत्वज्ञानांत नित्य आत्मा नाहीं. क्षणिक विज्ञानालाच ते आत्मा मानतात. शिवाय सर्व शून्य आहे, बाह्य जगाला अस्तित्व नाहीं, अशा तऱ्हेचीं मतेंहि त्यांच्या धर्मांत आहेत. याच्या उलट शंकराचार्य नित्य आत्मा मानतात; पण याच्या जोडीला त्यांचा मायावाद असल्यामुळें बौद्धांचा शून्यवाद व शंकराचार्यांचा मायावाद याच्यांत फरक काय हें एकदम लक्षांत येत नाहीं. यापेक्षां दुसरें महत्त्वाचें साम्य म्हणजे कर्मसंन्यास हें होय. शून्यवाद आणि मायावाद यांतील विचारविषयक साम्यापेक्षां बौद्ध भिक्षु आणि आचार्यांचा संन्यासी यांच्या आचारविषयक साम्यामुळेंच आचार्यांना 'प्रच्छन्नबौद्ध' म्हणण्याचा प्रघात पडला असावा. तें कसेंहि असलें तरी ज्ञान व संन्यास यांना प्राधान्य आल्यामुळें आरंभापासून कर्मप्रधान असलेल्या वैदिक धर्माचें मूळ स्वरूप उध्वस्त झाल्याचें पाहून त्या वेळच्या अनेक विद्वान लोकांना हळहळ वाटली असेल यांत शंका नाहीं.

ज्ञान व कर्म यांच्यांत समेट करण्याकरतां 'ज्ञानकर्मसमुच्चय' नांवाचा एक पक्ष अस्तित्वांत आला होता. मोक्षप्राप्तीला ज्ञान व कर्म दोन्हीं आवश्यक आहेत असें या पक्षाचें म्हणणें होतें. पण अनित्य कर्मांपासून नित्य मोक्ष कसा प्राप्त होतो याचें उत्तर या पक्षाला नीटसें देतां आलें नाहीं व त्यामुळें समेट करण्याचा त्याचा उद्देशहि सिद्धीस गेला नाहीं. वैदिक यज्ञसंस्था लुप्तप्राय झाली आणि पुन्हां पूर्वीच्याच स्वरूपांत तिचा उद्धार होण्याची आशा राहिली नाहीं. तथापि, जुन्या स्वरूपांत जरी नाहीं तरी अन्य स्वरूपांत वैदिक कर्ममार्गाचा उद्धार व्हावयाचा होता, व हा उद्धार करावयाचें भाग्य टिळकांना लाभावयाचें होतें. १००० वर्षांवर संन्यास आणि भक्तीच्या निवृत्तिपर मतांनीं हिंदुधर्मीयांच्या मनावर अप्रतिहत सत्ता चालविल्यानंतर टिळकांच्या 'गीतारहस्या'नें पुन्हां प्रचंड विचारक्रांति घडवून आणली आणि प्राचीन कर्ममार्गाचा निराळ्या स्वरूपांत पुनरुद्धार करून वेदपुरुषाची इच्छा पूर्ण केली. टिळकांनीं केलेल्या या विचारक्रांतीचें महत्त्व अजून पुष्कळांच्या नीटसें ध्यानांत आलेलें नाहीं. तें याचें

म्हणून ज्ञानमार्ग आणि कर्ममार्ग यांच्या उत्कर्षापकर्षाचा इतिहास वर जरा सविस्तर दिला आहे. मीमांसकांवर आचार्यांनीं मिळविलेल्या विजयाला जितकें महत्त्व तितकेंच महत्त्व टिळकांनीं आचार्यांच्या संन्यासमार्गावर मिळविलेल्या विजयाला आहे. मोक्ष फक्त ज्ञानानेंच मिळतो ही गोष्ट आचार्यांप्रमाणेंच टिळकांनाहि कबूल आहे. पण ज्ञानापूर्वीं चित्तशुद्धीकरतां व ज्ञानानंतर समाजधारणेकरतां, प्रचलित समाजव्यवस्थेप्रमाणें प्राप्त झालेल्या कर्मांची सदैव आवश्यकता आहे, असें त्यांचें म्हणणें असून गीतेच्या आधारें तें त्यांनीं सिद्ध केलें आहे. अर्थात् जुन्या ज्ञानकर्मसमुच्चयपक्षांत व टिळकांच्या ज्ञानकर्मसमुच्चयपक्षांत थोडा फरक आहे ही गोष्ट चाणाक्ष वाचकांच्या लक्षांत येईलच.

यज्ञसंस्थेचा उद्धार पूर्वींपेक्षां निराळ्या स्वरूपांत टिळकांनीं खालीलप्रमाणें केला आहे. "देवतोद्देशानें तीळ, तांदूळ किंवा पशु यांचें 'इदं अमुक देवतायै न मम' असें म्हणून अग्नींत हवन केल्यानेंच यज्ञ होतो असें नाहीं. प्रत्यक्ष पशु मारण्यापेक्षां प्रत्येकाच्या शरीरांत कामक्रोधादि ज्या पशुवृत्ति आहेत त्यांचा साम्यबुद्धिरूप संयमाग्नींत होम करणें हा यज्ञ अधिक श्रेयस्कर होय. अग्नींत आहुति टाकतांना 'न मम' ही माझी नव्हे असें म्हणून सदर द्रव्यावरील आपली ममत्वबुद्धि सोडणें हेंच यज्ञांतील मुख्य तत्व होय....किंबहुना ज्यांत कांहीं आपला स्वार्थ नाहीं असें कर्म शुद्ध बुद्धीनें केल्यास तो यज्ञच होतो असें म्हटलें तरी चालेल. यज्ञाची ही व्याख्या स्वीकारली म्हणजे बुद्धि निर्मम किंवा निष्काम ठेवून केलेलीं सर्व कर्में हा व्यापक अर्थीं एक मोठा यज्ञच होऊन यज्ञार्थ केलेलीं कर्में बंधक होत नाहींत असा द्रव्यमय यज्ञास लागू होणारा मीमांसकांचा न्याय या सर्व निष्काम कर्मांसहि लागू पडतो, आणि हीं कर्में करतांना फलाशा सोडलेली असल्यामुळें स्वर्गाच्या येरझाऱ्या न घडतां हीं कर्में करूनहि मोक्षरूप सद्गति अखेर प्राप्त होते." (गी. र. २९१–२९२) वैदिक कर्ममार्गाचा पुरस्कार करणाऱ्या टिळकांच्या 'गीतारहस्य' ग्रंथाची हिंदुस्थानांतील कित्येक प्रमुख भाषांत भाषांतरें झालीं असून टिळकांच्या तत्वज्ञानाचे लक्षावधि अनुयायी आज हिंदुस्थानांत पसरले आहेत ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे टिळकांनीं केलेल्या विचारक्रांतीचें महत्त्व कळून येईल. परिणामीं राष्ट्राचा उद्धार करणाऱ्या या विचारक्रांतीबद्दल ज्या आचार्यपक्षीयांना वाईट वाटत असेल त्यांनीं हजार वर्षांपूर्वीं आचार्यांनीं केलेल्या विचारक्रांतीमुळें तत्कालीन मीमांसकांना काय वाटलें असेल याची कल्पना करून आपलें समाधान करून घ्यावें.

## संस्कार

उपनयनविवाहादि संस्कार धर्माचें वैशिष्ट्य दाखवीत असल्यामुळें ते पाळणें आवश्यक आहे असें टिळकांचें मत होतें. किंजवडेकर शास्त्री यांच्या संस्कार-

मीमांसा ग्रंथाला लिहिलेल्या प्रस्तावनेंत टिळक म्हणतात, "A comparative study of different religions will show that every religion enjoins certain rites and ceremonies without the performance of which no one can claim to be included amongst the community of the followers of that religion. In other words, no one who wishes to adopt a particular religion or join a particular religious sect can do so without observing certain rules and regulations, or without performing certain ceremonies prescribed in that behalf." अशा रीतीनें संस्कार पालन करणें अवश्य असलें तरी ते ज्या रीतीनें पाळले जातात त्या रीतींत फरक करणें जरूर असेल तर तो करूं नये असें टिळकांनीं केव्हांहि प्रतिपादिलें नाहीं; उलट बालविवाहाचा त्यांनीं सक्रिय निषेध केला आहे. संमतिवयाच्या बिलाला टिळकांनीं विरोध केला त्या प्रसंगाचा फायदा घेऊन सुधारकांनीं टिळकांच्या सामाजिक मतांचा जाणून बुजून विपर्यास केला. कायद्याच्या साहाय्यानें संभोगाची मर्यादा दहाची बारा करावी, असें मलबारी शेटजींचें म्हणणें होतें. टिळकांनीं त्याला विरोध केला तो १० व्या वर्षीं संभोग करण्यांत त्यांना कांहीं गैर वाटत नव्हतें म्हणून केला, असें जरी त्यांच्या प्रतिपक्षानें भासविलें तरी तें खरें नव्हे. २ डिसेंबर १८९० च्या केसरींतील 'थट्टेच्या पुढें काय?' या अग्रलेखांत त्यांनीं या विरोधाचें कारण दिलेलें आहे. बालविवाहापासून कां दुष्परिणाम होतात तें दाखविल्यावर ते लिहितात—"मलबारी म्हणतात त्याप्रमाणें १२ वर्षेपर्यंत रतिसमागम बंद झाला म्हणून आमची गुलामगिरी बंद होईल असें कोणी समजूं नये. शेंकडा नव्वद गोष्टींमध्यें १२ वर्षांनंतरच पतिपत्निसमागम सुरूं होतो. तेव्हां त्याच्यासंबंधानें कायद्यानें म्हणण्यासारखा कांहींच उपयोग व्हावयाचा नाहीं. फक्त एवढेंच सिद्ध होईल कीं नवराबायकोनें शरीरसंबंध केव्हां सुरूं करावा हें सांगण्याचा हक्क सरकारास आहे......बारा वर्षांच्या कायद्यानें मुलींचें ज्या रीतीनें संरक्षण व्हावयास पाहिजे त्या रीतीनें न होतां पूर्वपद्धति कांहीं अंशानें कायम रहात आहे. अतएव मलबारींचा कायदा आम्हास नको." तात्पर्य, कायद्याचा उद्देश सिद्ध न होतां सरकारचा हात मात्र धार्मिक गोष्टींत शिरणार या दोन मुद्यांवर टिळकांचा विरोध होता. विवाहपद्धतींत फेरफार करावयास नको असें त्यांचें केव्हांहि मत नव्हतें. त्याच लेखांत ते लिहितात, "कालमानाप्रमाणें अवश्य लागणारा फेरफार जर आपण आज केला नाहीं, निदान फेरफार करण्याविषयीं यत्न केला नाहीं, तर न फिरविल्यामुळें घोडा जसा अडतो, त्याप्रमाणें समाज अडेल हें ध्यानांत ठेविलें पाहिजे."

कोणते संस्कार आवश्यक व कोणते अनावश्यक, तसेंच त्यांत कांहीं फेरफार करण्याची जरूरी आहे कीं काय, याचा विचार करण्याचा अधिकार हिंदुधर्मीतील शिष्टांस आहे असें टिळकांचें मत असल्यामुळें त्यांनीं त्या वेळीं खालील सुधारणा सुचविल्या होत्या:—

१ मुलींचें लग्न १६ वर्षांचे आंत करूं नये.

२ वीस वर्षांचे आंत मुलाचें लग्न करूं नये.

३ पुरुषाचें लग्न ४० वर्षांचे पुढें होऊं नये.

४ चाळीस वर्षांपुढें लग्न झाल्यास विधवेशीं करावें.

५ विधवेचें वपन करूं नये.

या सूचना ' परस्पर ' सुधारकांनीं मान्य केल्या नाहींत, ही गोष्ट वेगळी. पण स्वतः टिळकांनीं आपल्या मुलींचे विवाह उशीरां केले ही गोष्ट प्रसिद्धच आहे. इतर संस्कार पाळण्याचीहि टिळक खबरदारी घेत असत. प्रसिद्ध ग्रामण्य-प्रकरण सुरू असतां, त्यांनीं पोथीवरून घरची श्रावणी स्वतः चालविली, आणि श्राद्धाला ब्राह्मण मिळेनात म्हणून तीं चटावर उरकून घेतलीं. ( टिळकचरित्र ३०६–७ ) तसेंच जेव्हां जेव्हां कर्मलोप व संसर्गदोष घडले तेव्हां प्रायश्चित्तें घेतलीं. या प्रायश्चित्तांबद्दल टिळकांवर त्यांचे प्रतिपक्षी व जवळचे आप्त यांजकडून गहजब उडालेला पाहून आश्चर्य वाटतें. अथवा राजकारणांत शरीरदंडाच्या भीतीनें ज्यांची तत्वनिष्ठा वितळून जाते अशा शूरांनीं, दुर्बल भटाभिक्षुकांशीं तत्वनिष्ठा न दाखविल्याबद्दल टिळकांना दोष द्यावा हें अगदीं साहजिक आहे. टिळकांची मनोवृत्ति या टीकाकारांच्या अगदीं उलट होती. सरकारशीं फटकून वागण्यांत त्यांना पुरुषार्थ वाटे. अल्पशा प्रायश्चित्तानें संतुष्ट होणाऱ्या, श्रद्धाळु व टिळकांवर प्रेम करणाऱ्या भिक्षुकवर्गाशीं फटकून वागण्यांत कांहीं पुरुषार्थ आहे असें त्यांना वाटलें नाहीं. उलट प्रायश्चित्त घेऊन कां होईना पण एखादी सुधारणा जर समाजांत तट न पडतां व धर्माभिमान न सोडतां होत असेल तर ती कां करूं नये असें टिळकांचें धोरण असे. प्रायश्चित्तासंबंधानें त्यांनीं स्वतः खालील खुलासा केला आहे. " प्रायश्चित्त म्हणजे पश्चात्ताप नव्हे. तें पापनाशक कर्म होय. पश्चात्तापानेंहि पापक्षय होतच नाहीं असें मात्र म्हणतां येत नाहीं. शिवाय एखाद्या गोष्टीस प्रायश्चित्त आहे एवढ्यानेंच तो मोठा गुन्हा होतो असें म्हणतां येत नाहीं. कांहीं रूढाचार न पाळल्याबद्दल प्रायश्चित्त हवें, पण एकादा रूढाचार मुद्दाम सोडून देण्याकरितां कोणी प्रायश्चित्त घेण्यास तयार झाला तर त्याला जुन्या व नव्या दोन्ही मंडळींनीं शिव्या देण्यास तयार व्हावें, हें दुर्दैव होय. देशकालानुरूप कांहीं आचार सोडावे लागतातच.... खुद्द अग्निहोत्राचा आचार जाणूनबुजून टाकून देऊन वर्षातून एक वेळ श्रावणीच्या वेळीं प्रायश्चित्तानें काम भागतें तर स्पर्शास्पर्श दोषाबद्दल प्रत्याम्नायद्वारा प्रायःश्चित्त

करीत गेल्यास सामाजिक प्रगति होऊन शिवाय योग्य धर्माभिमान राहूं शकतो." (टिळकचरित्र २९७)

## चातुर्वर्ण्य

समाजाच्या धारणपोषणाकरितां चातुर्वर्ण्य–व्यवस्था अंमलांत आली आहे, हें मत खालील शब्दांत टिळकांनीं व्यक्त केलें आहे. "समाजाचे सर्व व्यवहार सुरळीत चालावे व कोणा एका विशिष्ट व्यक्तीवर किंवा मंडळीवरच सर्व भार न पडतां समाजाचें सर्व बाजूंनीं संरक्षण आणि पोषण व्हावें यासाठीं श्रमविभागरूप चातुर्वर्ण्यसंस्था पूर्वींच्या ऋषींनीं घालून दिली होती. (गी. र. ६६). चातुर्वर्ण्य हें जन्मावर अवलंबून ठेवावें, कीं गुणांवर अवलंबून ठेवावें, कीं ज्याच्या त्याच्या इच्छेवर अवलंबून ठेवावें असा वाद बरेच दिवस चाललेला आहे. टिळकांच्या मताप्रमाणें गुणकर्मावर उभारलेल्या चातुर्वर्ण्याच्या जागीं पाश्चात्यांची समाजव्यवस्था घेण्यांत विशेष तात्पर्य नाहीं. ते लिहितात, "युरोपांतील स्वतंत्र देशांत हवा तो धंदा हवा त्यास करण्यास मोकळीक असते. त्यामुळें परस्परांची चढाओढ लागून चांगले तेवढेच लोक पुढें येतात व बाकीच्यास अन्नाचीहि भ्रांत पडते....सारांश, कोणतीहि समाजरचना घ्या. ती सर्वांशी निर्दोष म्हणून कधींहि असावयाची नाहीं." (केसरी, जानेवारी १८९६). टिळकांना चातुवर्ण्या-च्या जागीं दुसरी समाजव्यवस्था नको असली तरी "आपल्या काळीं ज्या समाजव्यवस्था असतील, त्यांत कांहीं न्यून असल्यास श्वेतकेतूप्रमाणें देश-कालानुरूप तें काढून टाकून समाजाची धारणपोषणशक्ति फुटूं न देतां तीच वाढत्या पंथास लागेल" (गी. र. ३३१) असें करणें त्यांच्या मतें जरूर असल्यामुळें त्यांनीं चातुर्वर्ण्यव्यवस्थेंत खालील सुधारणा सुचविली आहे. "कारकुनी, शिपाइगिरी, व्यापार, शेतकी, इत्यादि जे धंदे आहेत ते तूर्त जातिपरत्वें आहेत तसेच कायम ठेवून धंदा बदलण्याची कोणाची इच्छा असल्यास त्यास तसें करतां येण्याची सवड ठेवावी, आणि व्यवहारांत ज्याचा त्याचा मान ज्याच्या त्याच्या योग्यतेवर व गुणांवर अवलंबून राहावा, एवढी सध्या व्यवस्था होणें इष्ट आहे व शक्यहि आहे....जातिबंधनें पूर्वींच्या इतकीं आतां कडक राहणें शक्य नाहीं, ही गोष्ट आम्हांसहि मान्य आहे, व त्यांपैकीं कांहीं बंधनें तर लवकरच नाहींशीं झालीं पाहिजेत, असेंहि आमचें मत आहे." (केसरी, १६ मे १८९३). प्रचलित समाजव्यवस्थेप्रमाणें, स्वतःच्या अभिरुचीप्रमाणें अगर देशकालानरूप जें काम एकदां आपण पत्करिलें तें आयत्या वेळीं कोणत्याहि सबबीवर सोडून देतां कामा नये, ही गोष्ट रामशास्त्र्यांनीं माधवरावांना जो उपदेश केला त्याचा दृष्टांत देऊन टिळकांनीं प्रतिपादिली आहे. (गी. र. ४९२)

## वेदोक्त

संस्कार वैदिक मंत्रांनीं केल्यामुळें एखाद्या जातीला श्रेष्ठता येत नसून त्या जातींत उत्पन्न होणाऱ्या कार्यकर्त्या पुरुषांवर त्या जातीचें श्रेष्ठत्व अवलंबून असल्यानें मराठ्यांनीं वेदोक्ताचा आग्रह धरूं नये असें आपलें मत टिळकांनीं १९०१ सालीं जाहीर केलें होतें. ते लिहितात, " मराठे लोकांस जर आपण खरे क्षत्रिय असें वाटत असेल तर आपलें क्षत्रियत्व व्यक्त करण्यास वेदोक्त मंत्रानें श्रावणी करणें हा कांहीं खरा मार्ग नव्हे. ज्या लोकांच्या पूर्वजांनीं गेल्या शतकांत मुसलमानी राज्याची लाट मागें हटवून हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन केलें, ते जातीनें क्षत्रिय असोत वा नसोत, त्यांची योग्यता स्नानसंध्या करून धर्म रक्षिणाऱ्या ब्राह्मणांपेक्षा कोणत्याहि रीतीनें कमी आहे असें आम्ही मानीत नाहीं. " ( केसरी, २९।१०।१९०१ ).

रा. बापट यांनीं प्रसिद्ध केलेल्या टिळकांच्या आठवणींमध्यें रा. बोले यांनीं एक आठवण दिली आहे. वेदोक्तासंबंधानें वरील लेख प्रसिद्ध झाल्यानंतर त्यांनीं टिळकांची भेट घेतली तेव्हां ' सदर्हु लेख माझ्या पश्चात् लिहिला गेला ' असें टिळकांनीं सांगितलें. टिळकांची एकंदर विचारसरणी पाहिली तर वेदोक्ताला ते विरुद्ध होते ही गोष्ट संभवनीय दिसत नाहीं. वेदोक्तावरील लेख त्यांचेच होते असें जरी मानिलें तरी ते लिहिण्यांत मराठ्यांनीं वेदोक्त कर्म करूं नये असें सांगण्याचा त्यांचा उद्देश नसून, कोणत्याहि राजानें, स्वजातीयांच्या अभिमानानें धार्मिक किंवा सामाजिक पद्धतींत हात घालून, इनामें जप्त करण्यासारखे अन्याय करूं नये हें सांगण्याचा त्यांचा उद्देश होता. वेदोक्तावरील लेखासंबंधानें खुलासा करितांना ता. ५ नोव्हेंबर १९०१ च्या केसरींत त्यानीं स्पष्ट लिहिलें आहे कीं, " कोणास वेदोक्त संस्कार करावयाचा असल्यास तो त्यानें खुशाल करावा; पण त्याकरितां हातांत सत्ता आहे म्हणून अमक्याचें इनाम जप्त कर अगर अमक्या देवस्थानच्या वहिवाटींत हात घाल येथपर्यंत जी कित्येक संस्थानिकांची मजल येऊन ठेपली आहे ती अगदीं चुकीची आहे एवढेंच अम्हांस सांगणें होतें "

## व्यवहार

आतां या चातुर्वर्ण्यांतील लोकांनीं परस्परांशीं कोणत्या धोरणानें व्यवहार करावा याविषयीं ज्या ' सत्यं वद ' ' धर्मं चर ' ( तैत्तिरिय, १।११।१ ) इत्यादि धर्माज्ञा आहेत त्यांसंबंधीं टिळकांचीं सर्वप्रसिद्ध मतें काय होतीं हें थोडक्यांत पाहूं. " अहिंसासत्यमस्तेयं शौचमिंद्रियनिग्रहः । एतं सामासिकं कर्म चातुर्वर्ण्येऽब्रवीन्मनुः ॥ " अहिंसा, सत्य, अस्तेय, कायावाचामनाची शुद्धता व इंद्रियनिग्रह हे नीतिधर्म चार वर्णांनीं पाळावे असें मनूनें सांगितलें आहे. या नीतिधर्मांचें श्रेष्ठत्व टिळकांना कबूल आहे. पण त्यांचें निरपवाद पालन समा-

जाच्या पूर्णावस्थेंतच शक्य आहे. जोंपर्यंत स्वार्थी आणि दुष्ट लोकांनीं हें जग भरलेलें आहे तोंपर्यंत या नियमांचें निरपवाद पालन करणें अनिष्ट आहे, असें त्यांना वाटतें. ज्यांना संसार, व्यवहार करावयाचा अशा लोकांनीं दुष्टांचा प्रतिकार केला नाहीं किंवा दुष्टांचें शासन करण्याचें ज्या क्षत्रियांचें कर्तव्य, ते जर दुष्ट लोकांचे अन्याय सहन करूं लागले तर समाजाची घडी बिघडून जाईल, हें लक्षांत घेऊनच खुद्द मनूनेंहि 'क्रुद्धन्तं न प्रतिक्रुद्ध्येत्' हा नियम गृहस्थाला न सांगतां संन्याशाला सांगितला आहे. याच्या उलट अहिंसा धर्माला 'अततायिनमायान्तं हन्यादेवाविचारयन्' असा अपवाद मनूनेंच सांगितला आहे. टिळक लिहितात, "आपल्याला जें दुःखदायक होईल तें कर्म करून दुसऱ्यास दुखवूं नये हा आत्मौपम्य दृष्टीचा सामान्य नियम खरा; पण परक्यांनींहि आपणांस दुखवूं नये असा याच धर्माच्या पडताळ्याचा जो दुसरा धर्म तो पाळणारे लोक ज्या समाजांत नाहींत त्या समाजांत केवळ एकानेंच हा धर्म पाळून उपयोगी नाहीं असा महाभारतांत निर्णय केला आहे. समता हा शब्दच दोन व्यक्तींशीं संबद्ध म्हणजे सापेक्ष आहे. म्हणून आततायी पुरुषास मारल्यानें अहिंसाधर्म जसा बिघडत नाहीं, तद्वत दुष्टांचें योग्य शासन केल्यानें....निर्वैरी-पणासहि कांहीं कमीपणा येत नाहीं. उलट दुष्टांच्या अन्यायाचा प्रतिकार करून इतरांस बचावण्याचें श्रेय मात्र त्यांस मिळतें." (गी. र. ३९१)

अहिंसेनंतरचा दुसरा महत्त्वाचा धर्म म्हणजे 'सत्य' हा होय. 'यद्भूत-हितमत्यन्तं तत्सत्यमिति धारणा' ही नारदांनीं केलेली सत्याची व्याख्या टिळकांना संमत आहे. ते लिहितात,—"सत्यधर्म केवळ शब्दोच्चारणा-पुरताच निघालेला नसून ज्या वागणुकीनें सर्वांचें कल्याण होतें ती वागणूक, केवळ शब्दोच्चारण अयथार्थ आहे यामुळें, गर्ह्य मानतां येत नाहीं. ज्यानें सर्वांचेंच नुकसान होतें तें सत्य नव्हे व अहिंसाहि नव्हे." (गी. र. ३४) दुष्टाचा प्रतिकार जर शक्य असेल तर प्रथम साधुपणानें करावा. पण तसें शक्य नसेल तर "कंटकेनैव कंटकम् या न्यायानें पोटिसानें बाहेर न निघणारा कांटा सुईनचें बाहेर काढणें जरूर आहे....साधुपणानें निवारण होणें शक्य नसेल तर 'जशास तसें' होऊन दुष्टांचें निवारण करूं नये, त्यांच्या दुष्कृत्यांस साधुलोकांनीं खुशाल बळी पडावें, असें आमच्या धर्मग्रंथकारांनीं कोठेंहि प्रतिपादन केलेलें नाहीं. आपल्या दुष्ट कृत्यानें लोकांचे गळे कापण्यास जो प्रवृत्त झाला त्याला इतरांनीं आपणांबरोबर साधुपणानें वागावें असें म्हणण्याचा कोणताहि नैतिक हक्क राहिलेला नाहीं." (गी. र. ३९५)*

---

* या विषयाचें जास्त विवेचन प्रस्तुत लेखकानें ३ जुलै १९२३ च्या केसरींतील 'टिळक आणि महाराष्ट्रधर्म' या लेखांत केलें आहे.

चारहि वर्णांना समान असलेल्या नीतिधर्मांत इंद्रियनिग्रहाचीहि गणना होते. टिळकांच्या मतें काम, क्रोध, लोभ इत्यादि प्रवृत्तींचा समूळ नाश न करतां त्यांना आळा घालून समाजाच्या धारणपोषणाकरितां त्यांचा उपयोग करणें जास्त इष्ट आहे. " काम व क्रोध हे शत्रु खरे, पण केव्हां ? अनावर राहूं दिल्यास, सृष्टिक्रम चालू राहण्यास योग्य मर्यादेचे आंत त्यांची अत्यंत आवश्यकता आहे ही गोष्ट मन्वादि शास्त्रकारांसहि संमत आहे. सर्व सुधारणा म्हटली म्हणजे या प्रबळ मनोवृत्तींस आळा घालणें ही होय; समूळ नाश करणें नव्हे.... जगाचा व्यवहार चालण्यास नेहमीं क्रोध किंवा तेजहि उपयोगी नाहीं. लोभासहि हाच न्याय लागू आहे. कारण संन्यासी झाला तरी त्याला मोक्ष हवाच असतो. " (गी. र. ४६–४७ )

## स्वधर्मप्रसार

धर्मग्रंथांच्या दीर्घ व्यासंगानें स्वधर्माची श्रेष्ठता टिळकांच्या पूर्णपणें प्रतीतीस आली असल्यामुळें हे सर्व श्रेष्ठ विचार सर्व जगभर प्रसृत केले पाहिजेत असें त्यांना वाटणें अगदीं साहजिक आहे. १९०३ सालच्या एका व्याख्यानांत टिळक म्हणतात, " सांप्रत युरोपियन राष्ट्रें आमच्यावर राज्य करोत; परंतु सर्वांना श्रेष्ठ प्रकारचे धर्मविचार व तत्वज्ञान शिकविण्याचा आशियाखंडाला, विशेषतः हिंदुस्थानला उपजत अधिकार आहे, ही गोष्ट कोणालाहि नाकबूल करतां यावयाची नाहीं....तत्वज्ञानाची योग्यताच अशी आहे कीं, त्यावर राजकीय सत्ता चालू शकणार नाहीं, उलट तें मात्र सर्वत्र आपला अंमल बसवील....ब्राह्मणधर्माचे सिद्धांत जर सत्य असतील तर ते कोणत्या तरी रूपानें कायमच राहतील. मात्र प्रश्न इतकाच कीं, ब्राह्मणधर्माचा अंमल तुम्ही बसविणार किंवा असेंच मरून जाणार ? संकटसमयीं ज्यानें मदत केली असा स्नेही जो आपला धर्म त्याला आपण तसाच टाकूं तर राष्ट्राला व सर्व लोकांना केवढें लांछन येईल याचा आपणच विचार करावा....राज्य कोणतेंहि असलें तरी धर्मकार्य केलेंच पाहिजे....कांहीं काम करूं तर निदान आशिया खंडांतील शंभर कोट लोक तरी ब्राह्मणधर्माचे छत्राखालीं आणतां येतील. ब्राह्मणधर्म जर सर्वस्वीं सत्य असतांहि बुडाला तर त्याचें पातक कोणाला याचा विचार करा. " वरील उद्गारांतील स्वधर्मप्रसाराविषयीं टिळकांची तळमळ पाहिली म्हणजे, ते जर राजकारणांत पडले नसते तर स्वधर्मप्रसाराची प्रचंड चळवळ त्यांनीं केली असती, असें अनुमान काढलें तर तें अस्थानीं होणार नाहीं. ग. भा. वैद्य यांच्या धर्मप्रसाराच्या कल्पनेला टिळकांची पूर्ण सहानुभूति होती हें प्रसिद्ध आहे.

येथपर्यंत टिळकांची विचार व आचारविषयक मतें कोणतीं तीं पाहिलीं. टिळकांना अद्वैत मत मान्य होतें; पण त्याबरोबरचा संन्यास मान्य नव्हता.

भक्तियुक्त कर्ममार्ग आणि कर्मनिष्ठा यांचा त्यांनीं पुरस्कार केला. मूर्तिपूजेचें त्यांनीं समर्थन केलें. मनुष्य हा सर्वस्वीं प्रकृतीच्या ताब्यांत नसून त्याला प्रवृत्ति-स्वातंत्र्य आहे, या सिद्धांताचें त्यांनीं प्रतिपादन केलें. प्राचीन यज्ञचक्राचें निष्काम कर्मयोगाच्या स्वरूपांत त्यांनीं पुनरुज्जीवन केलें. हिंदुत्वाला संस्कार आवश्यक आहेत असें सांगून त्यांत कांहीं फेरफार सुचविले. चातुर्वर्ण्याची समाजव्यवस्था मान्य करून तिच्यांतहि सुधारणा सुचविली. लौकिक व्यवहारांत 'शंठ प्रति शाठ्यं' या तत्वाचा पुरस्कार केला, आणि स्वधर्मप्रसाराची आवश्यकता लोकांच्या निदर्शनास आणली.

## टिळक आणि रामदास

महाराष्ट्राच्या गेल्या तीनशें वर्षांच्या इतिहासांत टिळकांचें ज्यांच्याशी साम्य दाखवितां येईल, असा एकच महापुरुष झाला. तो महापुरुष म्हणजे समर्थ रामदास हे होत. जीव, शिव आणि सृष्टि यासंबंधाचीं अद्वैत तत्वज्ञानाचींच मतें समर्थांनीं प्रतिपादिलीं; टिळकांनींहि त्याच मतांचा पुरस्कार केला. 'सामर्थ्य आहे चळवळीचें। जो जो करील तयाचें। परी तेथें भगवंताचें। अधिष्ठान पाहिजे॥' असें सांगून समर्थांनीं भक्ति आणि कर्म यांची सांगड घातली; टिळकांनींहि "गीतेंत सांगितलेलें अहेतुक कर्म करावयास मनांत सात्विक वृत्तींचा उदय झाला पाहिजे. परमेश्वरावर दृढ भक्ति पाहिजे. आपल्याला करावयाचें काम ईश्वरानें अगोदरच नेमून ठेविलें आहे, असा दृढ भरंवसा पाहिजे" (१९०२ नागपूर येथील व्याख्यान) असें सांगून भक्ति व कर्म यांची जोड घातली आहे. थोडा फरक दाखवायचा झालाच तर समर्थांनीं भक्तीवर जोर दिला व टिळकांनीं कर्मावर जोर दिला असा दाखवितां येईल. 'जेहीं उदंड कष्ट केले। ते भाग्य भोगून गेले। येर ते बोलताचि राहिले। करंटे ना ?॥' असें सांगून समर्थांनीं प्रयत्नवादाचें समर्थन केलें, तर टिळकांनींहि जवाचें प्रवृत्तिस्वातंत्र्य सिद्ध करून प्रयत्नवादाचीच तरफदारी केली. समर्थांनीं 'धटासी आणावा धट। उद्धटासि उद्धट। खटनटासि खटनट। अगत्य करी॥' असें सांगितलें; तर टिळकांनींहि 'शठं प्रति शाठ्यं' याच तत्वाचा पुरस्कार केला. राष्ट्राच्या अवनत स्थितीबद्दल दोघांनाहि सारखेंच वाईट वाटत होतें. तत्त्वज्ञान आणि राजकारण या विषयांचा दोघांनींहि सारखाच खोल विचार केला. जीवानें स्वस्वरूपाचें ज्ञान करून घेऊन मोक्ष मिळविणें हेंच व्यक्तिमात्राचें अंतिम ध्येय आहे ही गोष्ट दोघांनाहि मान्य होती; पण प्रवृत्तिभेद आणि काल-भेद यामुळें एकानें आपल्या आयुष्यांत हरिभक्तीला प्राधान्य दिलें, तर दुसऱ्यानें राजकारणाचा 'कर्मयोग' आचरिला. दोघांनींहि आपले देह 'परोपकारीं झिजवून। कीर्तिरूपें उरविले' व 'कीर्ति करून नाहीं मेले। ते उगेच आले आणि

गेले। ' ही उक्ति सर्वांच्या प्रत्ययास आणली, आणि शेवटीं दोघांनींहि महाराष्ट्राच्या अंतःकरणांत अक्षय स्थान मिळविलें.

## टिळकांची धर्मबुद्धि

टिळकांच्या धार्मिक मतांवरून त्यांच्या ठिकाणीं स्वधर्माविषयीं श्रद्धा, अभिमान व आपलेपणा किती प्रामुख्यानें वसत होता हें लक्षांत येईल. प्रोफेसर जिनसीवाले यांच्या मृत्युलेखांत टिळक लिहितात कीं, "सामान्य प्रतीच्या, निश्चयी पुरुषाच्या बुद्धींतहि इंग्रजी विद्येनें हिंदुधर्म, हिंदुगृहस्थिति यासंबंधानें व्यामोह उत्पन्न होऊन त्याबद्दल त्याच्या मनांत आणि आचारांत द्विधाभाव उत्पन्न होत असतो." (केसरी, २५।८।०३). अशा तऱ्हेचा द्विधाभाव टिळकांच्या बुद्धींत उत्पन्न झालेला केव्हांहि दिसत नाहीं. स्वधर्मांतील तत्वाचें श्रेष्ठत्व त्यांच्या बुद्धीला पूर्णपणें पटलेलें होतें. यामुळें "धर्मग्रंथांचें अध्ययन न करतां केवळ न्यायमीमांसेच्या जोरावर यंव् चांगलें आहे, त्यंव् चांगलें आहे" असें म्हणणाऱ्या लोकांचा तें साहजिक तिरस्कार करीत असत. ते लिहितात, "आमच्या प्राचीन धर्मग्रंथाचें कधींहि अवलोकन केलेलें नसल्यामुळें व लहानपणापासून सर्व शिक्षण व्यावहारिक रीतीनें झालेलें असल्यामुळें इंग्रजी शाळेंतून तयार झालेल्या मनुष्यास धर्म म्हणजे काय, तो कशाकरितां पाहिजे, राष्ट्राच्या उन्नतीस त्याची कांहीं आवश्यकता आहे कीं नाहीं याबद्दल कांहींएक माहीत नसतें." (केसरी १९।१।०४) "आम्हांला धर्माची कांहीं एक परंपरा आहे, त्या परंपरेंत जें ज्ञान आहे तें इतर धर्मांतील ज्ञानाच्या बरोबरीनें किंवा त्याहूनहि श्रेष्ठ आहे आणि ही परंपरा जर आम्ही सोडून दिली तर आमचें असें म्हणण्यासारखें आम्हांस सामान्य बंधन कांहींच राहणार नाहीं, या गोष्टी आम्ही नेहेमीं लक्षांत बाळगल्या पाहिजेत." धर्माकडे बघण्याची टिळकांची दृष्टि ही अशा तऱ्हेची होती, आणि टिळकांनीं धार्मिक बाबतींत ज्या कांहीं सुधारणा सुचविल्या त्या ही दृष्टि न सोडतां सुचविल्या.

टिळकांची चिकित्सक बुद्धि सुप्रसिद्ध आहे. टिळक हे जितके चिकित्सक तितकेच श्रद्धाळूहि होते, हें कोणास सांगितलें तर तें खरेंहि वाटणार नाहीं. पण या चिकित्सक बुद्धीच्या सोसाट्याच्या वाऱ्यांतहि श्रद्धेची शांत ज्योत त्यांच्या हृदयांत सदैव तेवत होती. ते लिहितात, "श्रद्धेवांचून जर नुसती बुद्धीच काम करूं लागली तर तर्कटीपणानें ती कोणीकडे झुकेल याचा नेम नाहीं....श्रद्धादि मनोधर्मांवांचून नुसत्या बुद्धिगम्य ज्ञानाच्या अंगांत कर्तृत्वशक्तीहि उत्पन्न होत नाहीं." (गी. र. ४२३). कोणतीहि सुधारणा करतांना श्रद्धेची किती आवश्यकता आहे हें सांगतांना ते लिहितात, "स्वधर्मावर श्रद्धा, आपलें राष्ट्र पुरातन असून तें ईश्वराच्या कृपेनें जगाच्या इतर राष्ट्रांच्या बरोबरीचें होणें

शक्य आहे असा दृढ विश्वास, अभिमान व भरंवसा आणि या भरंवशास योग्य अशा तऱ्हेचा उद्योग, कळकळीनें काम करण्याची इच्छा किंवा उमेद आणि संवय असल्याखेरीज कोणत्याहि सुधारणेचें कार्य तडीस जाणें अशक्य आहे" (केसरी, ५ मे १९०३).

सुधारणेला आवश्यक असलेले हे धर्मश्रद्धा वगैरे सर्व गुण टिळकांच्या अंगीं होते; आणि म्हणूनच आधुनिक सुशिक्षित ज्या सुधारणांकडे कधींहि पाहणार नाहींत अशा 'पंचांग' आणि 'कीर्तन संस्था' यांच्या सुधारणेकरतां त्यांनीं आपला बहुमूल्य वेळ खर्च केला व गणेशोत्सवासाखी संस्था नांवारूपाला आणून स्वधर्मांतील उपासनामार्ग व उपास्यदैवतें याविषयीं महाराष्ट्रांत श्रद्धा व अभिमान उत्पन्न केला.

## टिळकांची ईश्वरनिष्ठा

टिळकांच्या धर्मबुद्धीविषयीं सांगावयाची शेवटली आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे त्यांची आस्तिक्यबुद्धि अथवा ईश्वरनिष्ठा ही होय. किंबहुना टिळकांच्या दिगंत कीर्तीचें आणि यशाचें सर्व रहस्य जर कोठें शोधावयाचें असेल तर तें त्यांच्या ईश्वरविषयक निष्ठेंत किंवा श्रद्धेंत शोधलें पाहिजे. चिकित्सक बुद्धि तर्काच्या साहाय्यानें ज्या वेळीं ईश्वराचा शोध घेऊं लागते त्या-वेळीं ती गांगरून जाते आणि तर्क तेथें लुला पडतो; किंबहुना तर्काला सर्व-सामर्थ्यसंपन्न अशा ईश्वराचें अस्तित्व सिद्धच करतां येत नाहीं. सुतार ज्याप्रमाणें खुर्चीचें निमित्तकारण आहे, त्याप्रमाणें या सृष्टीचें कांहीं निमित्तकारण असलें पाहिजे. तें निमित्तकारण ईश्वर होय असें तर्क म्हणतो. पण जगांत सज्जन लोक सर्व जन्म दारिद्र्यांत आणि हालअपेष्टांत काढतात, दुर्बल राष्ट्रें शतकेंच्या शतकें गुलामगिरींत लोळत पडतात आणि याच्या उलट दुर्जनांची चंगळ चालते व अन्यायी पण बलिष्ठ राष्ट्रें वैभवसंपन्न होतात. सृष्टींतील ही विष-मता पाहिली म्हणजे परमेश्वर हा निर्घृण—क्रूर असला पाहिजे, असें म्हणावेसें वाटतें. 'वैषम्यनैर्घृण्या'च्या या आक्षेपाला तर्क असें उत्तर देतो कीं, ईश्वर ही सृष्टि स्वतंत्रपणें उत्पन्न करीत नाहीं. ज्याच्या त्याच्या कर्माप्रमाणें त्याला फल देऊन तो ही सृष्टि निर्माण करीत असतो. केवळ कर्मफलाची वांटणी करणारा परमेश्वर आणि पत्रें वांटणारा शिपाई यांमध्यें फरक काय असें विचारलें तर तर्काला कांहीं सांगतां येत नाहीं. ईश्वर जर सर्वज्ञ असेल तर एखाद्याच्या हातून वाईट कर्म घडण्यापूर्वींच त्याला मिळणाऱ्या वाईट फलाचें ज्ञान ईश्वराला झालें पाहिजे. जर हें ज्ञान होत नसेल तर तो सर्वज्ञ नसला पाहिजे. ज्ञान असूनहि जर त्याला मनुष्याला परावृत्त करण्याची शक्ति नसेल तर सर्वशक्तिमान् नसल्या-मुळें तो 'ईश्वर' हें नांव धारण करण्यालाहि लायक नाहीं. सर्वज्ञ आणि सर्व-

शक्तिमान असूनहि जर तो मनुष्याला वाईट कर्मांपासून परावृत्त करीत नसेल, तर तो निःसंशय क्रूर असला पाहिजे. अशा तऱ्हेच्या पेंचांत तर्क सांपडला म्हणजे तो दीन होतो आणि जेथें तर्कांचा प्रदेश संपतो तेथेंच निष्ठेचा, आत्मानुभवाचा किंवा श्रद्धेचा प्रदेश सुरू होतो. ही श्रद्धा, ही अंतःस्फूर्ति मनुष्याला असें स्पष्टपणें सांगत असते कीं, भिऊं नको; सर्वसामर्थ्यसंपन्न, सर्वज्ञ आणि दयाळू असा परमेश्वर या चराचर सृष्टीच्या अध्यक्षस्थानीं अधिष्ठित झालेला आहे. सज्जनांच्या हालअपेष्टा किंवा दुर्बलांची दुर्दशा हें त्यांच्या कर्मांचेंच फल आहे, असें म्हणून स्वस्थ बसण्याइतका तो उदासीन किंवा क्रूर नाहीं. एवढेंच नव्हे तर या सृष्टीवर साधूंच्या परित्राणाकरितां आणि दुष्टांचा विनाश करण्याकरितां वारंवार अवतीर्ण होणें हें त्याचें ब्रीद आहे. दुःखितांचा तो दुःखहर्ता आहे आणि अखिल मानवजातीचा तो उद्धारकर्ता आहे. परमेश्वराविषयींच्या या श्रद्धेनेंच आजपर्यंत अनेक जीवांच्या अंतःकरणाची तळमळ शांत केली आहे. 'सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज। अहं त्वां सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥' हा परमेश्वराचा दिव्य संदेश या श्रद्धेनेंच मनुष्याच्या अंतःकरणापर्यंत आणून पोंचविला आहे. 'न मे भक्तः प्रणश्यति।' हें आश्वासन याच श्रद्धेमार्फत मनुष्याला मिळालें आहे. अशा तऱ्हेच्या श्रद्धेला अशक्य असें या जगांत काय आहे ? या श्रद्धेचें आणि प्रज्ञेचें मधुर मीलन टिळकांचे ठिकाणीं झालें होतें. सर्वज्ञ, सर्वशक्तिमान आणि दयाळू अशा परमेश्वराच्या अस्तित्वासंबंधीं टिळकांची श्रद्धा अचल होती. टिळकांच्या सबंध आयुष्यांत, त्यांच्या श्रद्धामय हृदयाकाशांत संशयाचे ढग केव्हांहि उत्पन्न झाले नाहींत. तत्कालीन पुढाऱ्यांत ही श्रद्धा फक्त न्यायमूर्ति रानडे यांच्यामध्येंच दृष्टीस पडते. विष्णुशास्त्री या बाबतींत संशयी होते, तर आगरकर उघड उघड नास्तिक होते. अर्थात् कित्येक म्हणतात त्याप्रमाणें आगरकरांच्या विचारांचा टिळकांच्या विचारांवर परिणाम होणें अत्यंत असंभवनीय आहे. जगाची एक चालक शक्ति आहे आणि आपल्याला प्राप्त झालेलें देशकार्य करण्याचें सामर्थ्य हें त्या अमानवी शक्तीच्या कृपेचेंच फल आहे, अशी टिळकांची दृढ श्रद्धा होती. या श्रद्धेच्या जोरावरच सर्व हिंदुस्थान त्यांनीं हलवून सोडला. अत्यंत अडचणीच्या किंवा संकटाच्या प्रसंगीं सामान्य जनांच्या ईश्वरविषयक श्रद्धेचे पाय लटपटत असतात. पण टिळकांवर जेव्हां जेव्हां संकटें आलीं तेव्हां तेव्हां ही श्रद्धा लटपटली तर नाहींच पण उलट दृढ झाली असें आपल्याला आढळून येतें. १९०८ सालीं सहा वर्षें काळ्या पाण्याची शिक्षा ऐकल्यानंतरहि, सत्कार्य करीत असतां ईश्वर हीं संकटें कां आणतो अशी शंका टिळकांच्या मनाला शिवलीहि नाहीं पण उलट "There are higher powers that rule the destiny of things and it may be the will of Providence that

the cause which I represent may prosper more by my sufferings than by my remaining free," असेच उद्गार त्यांनीं काढले. १८९७ सालच्या शिक्षेंतून सुटून आल्यानंतर 'पुनश्च हरिः ॐ' म्हणून स्वाध्यायाला सुरुवात करण्यापूर्वी ईश्वरस्मरण करतांना टिळकांनीं जे उद्गार काढले आहेत त्यांवरून टिळकांची ईश्वरनिष्ठा किती जाज्वल्य होती हें लक्षांत येतें. उतारा मोठा असला तरी महत्त्वाचा असल्यामुळें सर्वच येथें देतों:—

"जवळ जवळ दोन वर्षांच्या कर्मलोपानंतर पुन्हा स्वाध्यायास सुरुवात करण्यापूर्वी ज्या जगत्चालकाच्या कृपेनें आजचा दिवस प्राप्त झाला त्याचें अंतःकरणपूर्वक स्मरण करणें हें आमचें पहिलें कर्तव्य आहे. मनुष्य कितीहि कर्मवादी असला व मृत्पिंडांप्रमाणें आपल्या आयुष्याचा क्रम वाटेल तसा बनवितां येईल अशी जरी त्याची उमेद असली, तरी जगांतील पुष्कळ गोष्टी आपल्या हातच्या नसून कोणत्याहि कामांत यश अगर अपयश येणें हें बऱ्याच प्रसंगीं आपल्या हातीं नसलेल्या गोष्टींवर अवलंबून असतें हें कोणालाहि कबूल करावें लागेल. अशा स्थितींत या बाह्य साधनांची सर्वांशीं किंवा त्याहून कांहीं कमी प्रमाणानें अनुकूलता असणें हें ईश्वरी कृपेचेंच फल मानलें पाहिजे. प्रस्तुतच्या लेखकावर अशा तऱ्हेचा प्रसंग पहिल्यानेंच आला होता असें नाहीं. परंतु त्यांतून पार पडून पुन्हा आज आपलें पूर्वकर्तव्य करण्यास त्यास जें सामर्थ्य आलें आहे तें त्याच्या दृष्टीनें तरी कांहीं अमानवी कारणामुळें आलेलें आहे, व त्याबद्दल ज्याच्या कृपेनें या गोष्टी घडून येतात त्याचें पुन्हा एकवार स्मरण केल्याखेरीज....त्याच्यानें राहवत नाहीं." (केसरी, ४ जुलै १८९९.)

जणूं काय ईश्वरी शक्तीचा टिळकांना साक्षात्कार होत आहे आणि ते सद्गदित अंतःकरणानें 'पुनश्च भूयोऽपि नमो नमस्ते' असें म्हणून तिला पुनःपुनः वंदन करीत आहेत असा हा देखावा पाहिला म्हणजे आपलेंहि मन भक्तिपूर्ण होतें, त्या ईश्वरी शक्तीपुढें मस्तक आपोआप नम्र होतें, आणि 'परमेश्वरा, टिळकांच्या या दिव्य श्रद्धेचा एक अंश तरी आम्हाला दे' अशी त्याची करुणा भाकावीशी वाटते. ईश्वराच्या कृपेनें महाराष्ट्रांतील तरुण स्त्रीपुरुषांस त्या दिव्य श्रद्धेचा लाभ घडावा आणि त्या श्रद्धेच्या योगानें, त्यांना "केल्याविण कांहीं होत नाहीं" हें लक्षांत आणून तुम्ही मात्र निष्काम बुद्धीनें कार्यकर्ते व्हा म्हणजे झालें हा लोकमान्याचा उपदेश आचरणांत आणण्याची बुद्धि व सामर्थ्य प्राप्त व्हावें, अशी इच्छा करून हा लेख पुरा करतों.

---

# निबंध पांचवा

## ( ले.—श्रीपाद शंकर नवरे बी. ए. )

१ हिंदुस्थानांतील राजकीय चळवळीचे पुरस्कर्ते व राष्ट्रीयत्वाचे जनक याच नात्यानें कै. लो. टिळकांच्याकडे सर्व जनता जरी प्रामुख्यानें पहात असली; तरी आधुनिक काळांतील एक लोकोत्तर पुरुष अशीहि त्यांच्याबद्दल सर्वसामान्य लोकांची भावना असल्यामुळें राजकारणाहून निराळ्या क्षेत्रांत—विशेषतः धर्म-क्षेत्रांत—त्यांनीं काय कामगिरी बजावली, व त्याबद्दलचीं त्यांचीं मतें काय होतीं याविषयीं तीव्र जिज्ञासा उत्पन्न होणें साहजिक आहे. धर्माचें तत्व अत्यंत गूढ असल्यामुळें ' महाजनो येन गतः स पन्थाः ' असेंच त्याचें अत्यंत सुलभ लक्षण सांगावें लागतें; व लोकमान्य हे अशाच प्रकारचे एक ' महाजन ' असून मनुष्ययोनींत पूर्णावस्थेस पोहोंचलेल्या स्थितप्रज्ञाच्या लक्षणांतील ' दुःखेष्वनु-द्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः ' किंवा ' यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च यः ' अशासारखीं बरींच लक्षणें त्यांच्या अंगीं बाणलीं होतीं असें त्यांच्या विमल चारित्र्यांत वारंवार दृष्टोत्पत्तीस आलें असल्यामुळें धर्मासारख्या अत्यंत जिव्हा-ळ्याच्या प्रश्नासंबंधीं त्यांचें विचार व आचार कळले तर ' किं कर्म किमकर्मेति ' असा संशय पडून मोहित झालेल्या लोकांना या घटकेला बराच उपयोग होईल असें वाटतें. म्हणूनच त्यांच्या चवथ्या पुण्यतिथीच्या निमित्तानें या गोष्टीचा विचार करण्याचें योजिलें आहे.

२ विषयास हात घालण्यापूर्वीं एका गोष्टीचें स्पष्टीकरण करणें जरूर आहे. तें असें कीं धार्मिक मतें सांगतांना त्यांत सामाजिक मतांचाहि अन्तर्भाव करावा लागेल. कारण नैतिक, सामाजिक व धार्मिक असे माणसाच्या आयुष्याचे अत्यंत विलग कप्पे पाडण्याची आपल्या लोकांत पद्धति नाहीं. ' धारणात् धर्मः ' अशी आमची ' धर्म ' शब्दाची व्युत्पत्ति असून समाजधारणा हें त्यांचें मुख्य कार्य आहे व ' अभ्युदय ' आणि ' निःश्रेयस ' हीं त्याचीं परमसाध्यें आहेत. हीं साध्यें प्राप्त होण्याकरितां जन्मल्यापासून मरेपर्यंत, प्रातःकाळीं निजून उठल्यापासून रात्रीं निजेपर्यंत, करावयाच्या हरएक गोष्टींविषयीं आमच्या धर्मानें निर्बंध घालून दिले आहेत, व व्यष्टि आणि समष्टि यांच्या हिताकरितां चार आश्रम व चार वर्ण यांची योजना केली आहे. देशकालपरिस्थित्यनुरूप त्यांनीं पाळावयाचे नियमहि घालून दिले आहेत. या सर्वांचा 'धर्म' या व्यापक शब्दांत अन्तर्भाव होत असल्यामुळें सामाजिक व धार्मिक मतांचा भेद करतां येणें शक्य नाहीं.

३ टिळकांची धर्मबुद्धि व धार्मिक मतें निश्चित रीतीनें अजमावण्यास सुदैवानें भरपूर साधनें उपलब्ध आहेत. पैकीं 'भगवद्गीतारहस्य' हा तत्वज्ञानात्मक ग्रंथ खुद्द त्यांच्या हातचा असून त्याचें "The Hindu Philosophy of Life, Ethics and Religion" असें इंग्रजी नामान्तर त्यांनींच केलेलें असल्यामुळें, हिंदुधर्मशास्त्र, समाजशास्त्र व नीतिशास्त्र यांविषयीं त्यांचे विचार काय होते ते स्पष्टपणें कळण्यास या ग्रंथासारखें दुसरें साधन नाहीं. याशिवाय टिळकांनीं आपल्या 'केसरी' पत्रांतून सामाजिक व धार्मिक विषयांवर आपलीं मतें वेळोवेळीं प्रसिद्ध केलेलीं असून, इतर ठिकाणींहि लेख लिहून व भाषणें करून त्यांनीं आपले विचार जनतेपुढें निःसंदिग्धपणानें व निर्भीडपणानें मांडले आहेत. ते केवळ लिहून किंवा बोलून न दाखवितां स्वतःच्या आचरणामधूनहि त्यांनीं कितपत व्यक्त करून दाखविले होते याविषयीं देखील विश्वसनीय माहिती पुष्कळ सांगण्यासारखी असून सर्वांना—विशेषतः धर्माच्या आचारात्मक अंगाला प्राधान्य देणाऱ्या लोकांना—ती बोधप्रद व मार्गदर्शक झाल्यावांचून राहणार नाहीं.

४ प्रथमतः हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, टिळकांची धर्मबुद्धि 'अंधेनैव नीयमाना यथान्धाः' या अंधकोटींतील नसून ती, स्वतःच्या धर्मग्रंथांचा सांगोपांग अभ्यास, दुसऱ्या धर्मांचें तुलनात्मक परिशीलन, चिकित्सक बुद्धि, शास्त्रीय विवेचक पद्धति व निर्विकार तर्क या भरभक्कम पायावर उभारलेली होती. त्यांचा जन्म जुन्या परंपरेंतल्या एका कुलांत झालेला होता. त्यांच्या सदाचारी, धार्मिक व श्रद्धाळु आईबापांकडून त्यांना नित्य व्यवहारांतलें धर्मशिक्षण लहानपणींच मिळून त्यांची धर्मबुद्धि व पूर्वजांविषयींचा त्यांचा अभिमान तेव्हांपासूनच जागृत झालेला होता. टिळकांना आपल्या वडिलांना निरनिराळे धार्मिक ग्रंथ वाचून दाखवावे लागत व यामुळें स्वाभाविकच त्यांच्या धर्मविषयक विचारांना चालन मिळालें. वयोपरत्वें व ज्ञानपरत्वें ही विचारशक्ति बळावत जाऊन तिला नैसर्गिक संशोधक बुद्धीची जोड मिळाल्यामुळें, आर्यांच्या सर्व प्राचीन वाङ्मयाचा तिनें लवकरच ठाव घेतला, एवढेंच नव्हे, तर आमचें तत्वज्ञान इतर देशांतील व धर्मांतील प्राचीन व अर्वाचीन कोणत्याहि तत्वज्ञानास हार जाणार नाहीं, "उलट तीं सर्व पोटांत घेऊन परमेश्वराप्रमाणें 'दहा अंगुळें' शिल्लक राहील" अशी खात्री करून घेण्याकरितां तिनें दुसऱ्या धर्मांची व तत्वज्ञानात्मक ग्रंथांची कसून छाननी केली. 'ओरायन,' 'आर्क्टिक होम इन् दि वेदाज्' व 'भगवद्गीतारहस्य' हीं त्यांचीं तीन पुस्तकें वरवर चाळणारास देखील वरील म्हणण्याचा प्रत्यय तत्काल आल्यावांचून राहाणार नाहीं. हा अभ्यास करतांना बुद्धीच्या जोडीला श्रद्धा व अभिमान हीं वडिलोपार्जित साधनें त्यांनीं हस्तगत केल्यामुळें खरें धर्मरहस्य कळण्यास त्यांना

जड गेलें नाहीं. "श्रद्धेवांचून नुसती बुद्धीच जर काम करूं लागेल तर तर्कटीपणानें ती कोणीकडे झुकेल याचा नेम नाहीं; जितकी अधिक तीव्र तितकी अधिकच भडकेल. श्रद्धादि मनोधर्मांखेरीज नुसत्या बुद्धिगम्य ज्ञानाच्या अंगांत कर्तृत्वशक्तीहि उत्पन्न होत नाहीं." (रहस्य ४२२) असें त्यांचें म्हणणें असून "...सर्व सृष्टीच्या बुडाशीं असणारें मूलतत्व अनादि, अनंत, सर्वकर्तृ, सर्वज्ञ, स्वतंत्र व चैतन्यरूप आहे हें पूर्णपणें ओळखण्यास बुद्धीच्या गाडीरस्त्यानें शक्य तेवढा मार्ग आक्रमिल्यावर तदनुरोधानें, पण त्याच्या पुढें श्रद्धेच्या व प्रेमाच्या पायरस्त्यानेंच गेलें पाहिजे" (रहस्य ४०७) असें त्यांना वाटत असे.

५ अगदीं अडेल तेथें टिळक श्रद्धेचें साह्य घेत असले तरी त्यांची बुद्धि स्वभावतःच तर्कप्रधान असे. बायबलांतील कित्येक वर्णनें अर्वाचीन आधिभौतिक शास्त्रांच्या कसोटीस उतरलीं नाहींत, तरी तीं अक्षरशः प्रमाण मानणाऱ्या ख्रिस्ती भटांसारखे ते हट्टी नसत. धर्मासारख्या नाजूक विषयांत देखील एखादी बाब बुद्धीस पटत नसेल तर तिची धैर्यानें चिकित्सा केल्याशिवाय ते राहात नसत. दोनच उदाहरणें पुरेत. वेद हे हिंदुधर्मांतील आद्य व मुख्य ग्रंथ असून कांहीं थोडे नास्तिक सोडल्यास आजतागायत सर्व हिंदु लोक त्यांना प्रमाण मानीत आले आहेत, व हिंदुधर्माचें लक्षण करतांना लोकमान्यांनींहि 'प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु' हें पहिलें लक्षण सांगितलें आहे. हें वेदप्रामाण्य अबाधित मान्य होण्यास वेद नित्य, अनादि व अपौरुषेय आहेत ही समजूतच मुख्यतः कारणीभूत झालेली आहे. परंतु टिळकांनीं 'आरोयन' ग्रंथाच्या द्वारें वेदांचा काल ठरविला असून 'आर्य लोकांचें मूलस्थान' भरतखंड नसून उत्तर ध्रुव आहे हें ठरवितांना कोणत्या ऋचा कोठें, कोणी व केव्हां केल्या याचा ऊहापोह केला आहे. "प्रत्यक्ष ईश्वराच्या निःश्वसिताला चिकित्सक बुद्धि व कालगणना लावून टिळकांनीं समर्याद करून अवमानिलेलें" पाहून पुष्कळांच्या संकुचित धर्मसमजुतीस धक्का बसला असेल यांत शंका नाहीं. यावर टिळक स्पष्ट सांगतात कीं, "......शास्त्रीय विवेचनासाठीं ब्रह्मवादीपक्ष व प्राचीन विद्यापंडितांचा पक्ष हे दोन्ही अलग ठेविले पाहिजेत. शास्त्रीय दृष्टीनें केलेला विचार पूर्ण झाल्यावर त्यावरून निघणारीं अनुमानें ब्रह्मवादी पक्षाशीं कितपत जुळतात हें पाहिजे तर मग पहावें." (आर्यलोकांचें मूलस्थान, भाषांतर, ३०३). "तत्वज्ञ मनुष्यानें जगाची पर्वा ठेवून कांहीं उपयोगी नाहीं. किंबहुना, तशी पर्वा न ठेवितां आपणांस सूक्ष्म विचारांतीं जें खरें दिसेल तेंच जगापुढें माडणें हें त्याचें कर्तव्य आहे." (स्पेन्सरवरील मृत्युलेख १५-१२-१९०३). भगवद्गीतेचा कर्मयोगपर अर्थ लावतांना आज कित्येक शतकें सर्वांस पूज्य होऊन बसलेल्या श्रीशंकराचार्यांवर तीव्र हत्यार उपसून धर्मग्रंथांचा स्वतःच्या शोधक बुद्धीला योग्य वाटेल तो अर्थ लावण्याचा हक्क त्यांनीं प्रस्थापित केला

आहे, आणि त्रिकालाबाधित ज्ञान सांगणाऱ्या गीतेसारख्या ग्रंथानें कालभेदानुरूप ' नवें स्फुरण ' आल्यास त्यांत कांहीच वावगें नाहीं असें त्यांनीं रहस्याच्या प्रस्तावनेंत स्पष्ट सांगितलें आहे. मात्र नवीन स्फुरण येणें म्हणजे एकवाक्यता करण्याकरितां विरुद्ध वचनांचा चोळामोळा करून आपलाच अर्थ जबरीनें खरा करावयाचा ही सांप्रदायिक पद्धति नव्हे. कारण " याचा परिणाम असा होतो कीं, वेदसंहितेपासून तों पुराणांपर्यंत एकच अर्थ प्रतिपाद्य मानल्यामुळें वैदिकधर्म हा ज्याच्या त्याच्या सांप्रदायाप्रमाणें एकच उभा सोट आहे, शाखापल्लव फुटून वाढलेला वृक्ष नव्हे, अशी लोकांची समजूत होते, आणि मग दुसऱ्याचा सांप्रदायिक सोट खरा वैदिक नसून माझाच सांप्रदायिक सोट खरा वैदिक होय, असे तंटे उपस्थित होतात......निरनिराळ्या वचनांची एकवाक्यता करतांना एक मुख्य आणि इतर ओढाताणीनें तदर्थक बनविण्यापेक्षां देशकालवर्तमानादि परिस्थितिभेदामुळें एकाच वैदिक बीजापासून निघालेल्या वृक्षास अनेक शाखा फुटणें शक्य आहे, म्हणून असें समजून त्याप्रमाणें सर्व वचनांची व्यवस्था लावणें हें आमच्या मतें ऐतिहासिक दृष्ट्या व धर्मदृष्ट्याहि अधिक समंजस व वस्तुस्थितीला अनुरूप आहे " असें टिळकांनीं गीतारहस्यावरील टीकाकारांस केसरीमधून ( २६ आक्टोबर १९१५ ) उत्तर देतांना म्हटलेलें आहे. सारांश, टिळकांच्या धर्मबुद्धींत युक्ति व श्रद्धा या दोहोंचा योग्य प्रमाणांत मिलाफ झालेला दिसतो.

६ विचारात्मक (तत्वज्ञान) व आचारात्मक या सर्व धर्मांच्या दोन बाजू असतात. यांवरील टिळकांचे विचार आतां आपण अनुक्रमानें पाहूं. पैकीं तत्वज्ञानात्मक विचार गीतारहस्यांत पूर्णपणें प्रगट झालेले दिसतात. गीतारहस्यांत गीतेचे म्हणून जे सिद्धांत टिळकांनीं विशद करून सांगितले आहेत ते त्यांना स्वतःला पूर्ण मान्य आहेत. तसें नसतें तर त्या सिद्धांतांचें समर्थन त्यांनीं केलें नसतें किंवा केलें असतें तरी तें इतकें उत्कृष्ट वठलें नसतें. (गीतारहस्यावरील टीकाकार, केसरी २६।१०।१५ ) " यतोऽभ्युदयनिःश्रेयससिद्धिः स धर्मः " ही शंकराचार्यांची धर्माची व्याख्या टिळकांना कबूल आहे. धर्माचीं हीं दोन अंगें 'पारलौकिक' व 'व्यावहारिक' किंवा 'मोक्षधर्म' आणि 'नीतिधर्म' या पर्यायवाचक शब्दांनीं त्यांनीं गीतारहस्यांत दर्शविलीं आहेत. लोकमान्य पूर्ण अद्वैतवादी असून परमात्म्याचें अमर, श्रेष्ठ, शुद्ध, नित्य व सर्वव्यापी स्वरूप ओळखून त्यांतच लय पावणें हें जीवाचें परमसाध्य आणि खरा मोक्ष तो हाच, असें इतर अद्वैत-वेदांत्यांप्रमाणें त्यांनाहि वाटतें. हें नामरूपात्मक जगत् असत्य व विनाशी असून त्याच्या मुळाशीं असलेलें परमात्मतत्व सत्य व अविनाशी आहे. आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक अशा जगाकडे पहाण्याच्या तीन प्रमुख दृष्टि आहेत. यांत ब्रह्मात्मैक्य होण्यास शेवटचीच दृष्टि उपयोगी पडते. अनादि

कर्माच्या फेऱ्यांतून सुटण्यास सर्वभूतीं एकत्वानें असणाऱ्या परब्रह्माचें अनुभवात्मक ज्ञान होणें एवढा एकच मार्ग आहे आणि तो सर्वत्रांस खुला आहे. कारण "...बंधन हा धर्म कर्माचा नसून मनाचा आहे, म्हणून व्यावहारिक कर्मांच्या फलांत आपली जी आसक्ति असते ती इंद्रियनिग्रहानें कमी कमी करून सदर कर्में शुद्ध म्हणजे निष्काम बुद्धीनें करीत गेल्यानें हळू हळू साम्यबुद्धीरूप आत्मज्ञान देहेन्द्रियांत मुरून जातें व शेवटीं पूर्ण सिद्धि प्राप्त होते." (गी. र. २९८) परंतु ही सिद्धि एकदां प्राप्त झाल्यावर ज्ञानी माणसानें कर्में टाकून न देतां तीं लोकसंग्रहार्थ व उत्तम आचरणाचा आदर्श म्हणून अनासक्त बुद्धीनें करीत जावीं, निष्काम कर्माचा लेप त्याला यत्किंचित् लागत नाहीं, असें गीतेच्या मुखानें लोकमान्य स्वतः सांगतात. व्यक्तीनें स्वतःच्या मोक्षावरच संतुष्ट होऊन न रहातां सामाजिक मोक्षाचीहि अहर्निश काळजी वाहिली पाहिजे हें तत्व टिळकांनीं खालील जोरदार शब्दांत सांगितलें आहे.

"...मी सर्व भूतांत आणि सर्व भूतें माझ्या ठायीं अशा रीतीनें सर्व जगच ज्याला आत्मभूत झालें त्यानें "मला मोक्ष मिळाला; आतां लोक दुःखी असले तरी मला त्याची काळजी कशाला ?" असें म्हणणें म्हणजे स्वमुखानेंच आपल्या ज्ञानाला कमीपणा आणण्यासारखें आहे. ज्ञानी पुरुषाचा आत्मा म्हणून कांहीं स्वतंत्र व्यक्ति आहे काय ? त्याच्या आत्म्यावर जोंपर्यंत अज्ञानाचें पांघरूण होतें तोंपर्यंत 'मी' व 'लोक' हा भेद कायम होता. पण ज्ञानप्राप्तीनंतर सर्व लोकांचा आत्मा हाच त्याचा आत्मा होतो." (गी. र. ३२९)

७ 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' हा सिद्धांत श्रुति व तर्क या दोन्ही दृष्टींनीं खरा असला व 'अध्यात्मज्ञान' हा मोक्षप्राप्तीस अखेरचा एकच दरवाजा खुला असला तरी वर वर्णन केलेल्या कर्मयोग्यांची या असार गणलेल्या जगांतील वागणूक कशी असावी याविषयीं लोकमान्यांनीं केलेलें विवेचन महत्त्वाचें आहे. जगन्मिथ्यात्वाची पोकळ बडबड करून स्वतःच्या योग्यायोग्यतेचा विचार न करितां वेदान्त 'पैशाला पासरी' या भावानें विकतांना धड संन्यासी ना संसारी अशा शद्बशूर आळशांचा बुजबुजाट झालेला चोहोंकडे आपण पहातों-दिडकीच्या कावेनें आपलीं वस्त्रें भगवीं करून समाजांत उजळ माथ्यानें फिरणारे 'साधु' संन्याशांप्रमाणें ज्ञानानें व वैराग्यानें सांसारिक कर्में सोडीत नाहींत, अथवा संसारांत कर्मयोग्याप्रमाणें आपलें कर्महि निष्कामबुद्धीनें करीत नाहींत, अशा लोकांना टिळकांनीं 'तृतीय–प्रकृति,' 'वाचिक संन्यासी' असें नांव दिलें आहे. हे निष्क्रिय असतात; कारण खरें ज्ञान त्यांना झालेलें नसतें. सर्वभूतान्तर्गत आत्मैक्य ज्याच्या देहेंद्रियांत मुरून गेलें, तो पुरुष जग नश्वर आहे कीं नाहीं, याचा विचार करीत न बसतां सर्वभूतहिताच्या उद्योगास आपोआपच प्रवृत्त होऊन सत्याचा पुरस्कर्ता बनतो. गीतेला पुढें करून टिळक बजावतात

कीं, " संसार सुखमय असो वा दुःखमय असो; मनुष्यजन्म प्राप्त झाला हें महद्भाग्य समजून कर्मसृष्टीच्या या अपरिहार्य व्यवहारांत जें जें प्राप्त होईल तें तें अंतःकरणाचा हिरमोड होऊं न देतां ' दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः ' या न्यायानें म्हणजे साम्यबुद्धीनें सहन करणें आणि जगाच्या धारणपोषणार्थ आपल्या अधिकाराप्रमाणें कर्माचा जो भाग शास्त्रतः आपल्या वांट्यास आला आहे, तो अमक्यातमक्यासाठीं नव्हे, तर निष्कामबुद्धीनें आमरणान्त करीत रहाणें, हेंच मनुष्याचें कर्तव्य होय." (रहस्य ४१९) या उताऱ्यांतील प्रत्येक शब्द महत्त्वाचा असून जगाच्या धारणपोषणार्थ प्रत्येक मनुष्यानें कसें वागलें पाहिजे, हें त्यांत उत्कृष्ट रीतीनें दाखविलें आहे. स्वतः टिळकांनीं याप्रमाणें तंतोतंत आचरण करून दाखविलें हें सुप्रसिद्ध आहे.

८ धर्मशास्त्र आणि नीतिशास्त्र यांच्या परस्पर संबंधाविषयीं पाश्चात्य पंडितांमध्यें बराच वाद आहे. त्यांपैकीं पुष्कळांना आत्म्याचें अस्तित्व मान्य नसून, नीति हा धर्माचा पाया आहे व 'पुष्कळांचें पुष्कळ सुख' या बाह्य दृष्टीनें नीति–अनीतीचा म्हणजे धर्माधर्माचा निर्णय करितां येतो असें ते प्रतिपादन करतात. या विचारसरणीचें टिळकांनीं गीतारहस्यांत सविस्तर व सोपपत्तिक खंडन केलेलें आहे. ते म्हणतात कीं, ' पुष्कळांचें पुष्कळ सुख ' ह्या बाह्य प्रमाणाच्या आधारें सिद्ध झालेला कोणताहि नीतिनियम नित्य होऊं शकत नाहीं किंवा आशानें मनुष्याच्या अंतिम ध्येयाचा बरोबर उलगडा होत नाहीं. " दिशा दाखविणारें होकायंत्र किंवा ध्रुवतारा यांचेकडे दुर्लक्ष करून अफाट समुद्रावर लाटा आणि वारा या दोहोंचेंच तारतम्य पाहून गलबतावरील खलाशी दरवेळीं आपल्या गलबताचें सुकाणूं धरूं लागले तर त्यांची जी स्थिति होईल तीच नीतिनियमांचें परमावधिचें स्वरूप लक्षांत न आणतां केवळ देशकालाप्रमाणें वागणाऱ्या मनुष्याची झाली पाहिजे....म्हणून नित्य बदलणारी नीतिधर्माची ही स्थिति टाळणें असल्यास मायासृष्टींतील विषयोपभोग सोडून नीतिधर्माची इमारत " सर्वांभूतीं एक आत्मा " या अध्यात्मज्ञानाच्याच पायावर उभारणें भाग पडतें (रहस्य. ३७५). सर्वभूतात्मैक्याच्या कल्पनेनें मनाला शांति मिळून त्याचें जें शील किंवा जो स्वभाव बनतो तो सदाचरणाचा पाया होय. या धर्मतत्वाचा अंगिकार केल्यास प्रेम, दया, परोपकार, सत्य भाषण, स्वार्थत्याग इत्यादि सात्विक गुणांचा समाजांत प्रसार चांगला होऊं लागतो. दुसरें असें कीं, आधिभौतिक पक्षाचे लोक कर्त्याच्या शुद्ध बुद्धीपेक्षां कर्माच्या बाह्य फलावरच मुख्य भर देतात, म्हणून कित्येक वेळां त्यांची दिशाभूल होऊन नीति अनीति ठरते, व अनीति नीति ठरते. आमच्या धर्मतत्वाची वरील स्थिर कसोटी लावल्यास ही आपत्ति टाळतां येते.

९ सर्वभूतात्मैक्याची गुरुकिल्ली सांपडलेल्या महाभागास 'स्थितप्रज्ञ' म्हणतात व अशा माणसाचें आचरण हाच समाजाचा नैतिक आदर्श होय. या आदर्शांत सदासर्वदा सारखेंच रूप दिसलें पाहिजे, ही गोष्ट जरी खरी असली तरी समाजाच्या अपूर्णावस्थेंत त्यांत निरनिराळे विकार प्रगट झाल्यास बाह्यदृष्टी आधिभौतिकवाद्यांनीं भांबावून जाण्याचें कांहीं कारण नाहीं. "कारण मनुष्याचें ज्ञान कितीहि पूर्ण व त्याची बुद्धि कितीहि साम्यावस्थेस पोहोंचली असली तरी कामक्रोधादिकांच्या कह्यांत सांपडलेल्या अशुद्ध बुद्धीच्या लोकां-बरोबर वागतांना अहिंसा, दया, शांति, क्षमा इत्यादि नित्य व परमावधीच्या सद्गुणांचाच सर्व प्रकारें सर्वदा स्वीकार करून त्याचा निभाव लागावयाचा नाहीं. अर्थात् सर्वच जेथें स्थितप्रज्ञ त्या समाजांतील पराकाष्टेची नीति किंवा धर्माधर्म, आणि लोभी पुरुषांचाच ज्यांत भरणा विशेष त्या समाजांतील धर्मा-धर्म थोडे तरी भिन्न असलेच पाहिजेत; नाहींपेक्षां साधुपुरुषास हें जग सोडून द्यावें लागेल आणि दुष्टांचेंच सर्वत्र साम्राज्य होईल." (गी. र. ३७३). सिद्धावस्थेंतील माणसानें व्यवहारांत कसें वागावें याबद्दलचे टिळकांचे आणखी विचार रहस्यांतील 'सिद्धावस्था व व्यवहार' या सुंदर प्रकरणांत ग्रथित झालेले आहेत. यामध्यें टिळकांचा 'टिळकपणा' पूर्णपणें प्रतिबिंबित झालेला आहे असें आम्हास वाटतें. टिळकांना सत्यासत्याची चाड नव्हती, त्यांच्या चळवळीला भगवंताचें अधिष्ठान नव्हतें, 'शठं प्रति शाठ्यम्' हें त्यांच्या वागणुकीचें कुटिल धोरण असे, असे त्यांच्यावर पुष्कळांकडून जे आक्षेप घेण्यांत येतात त्यांना या ठिकाणीं समर्पक उत्तरें मिळतील, व टिळकांविषयीं झालेला त्यांचा गैरसमज खात्रीनें नाहींसा होईल. या सारभूत प्रकरणांत टिळकांनीं आपलें आत्मचरित्रच रेखाटलें आहे कीं काय असा संशय येतो. "स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे" हें त्यांचें राजकारणांतलें वाक्य आमच्या धर्मास आधारभूत असलेल्या सर्वात्मैक्याच्या सूत्रावरचें भाष्य आहे असें वाटतें. कारण हें त्यांनीं "सर्वांभूतीं एकच आत्मा असल्यामुळें प्रत्येकास या जगांत सुखानें रहाण्याचा सारखाच हक्क असतो" इ० विवरणानें स्पष्ट करून दाख-विलें आहे. हें सर्वच प्रकरण अथपासून इतिपर्यंत मनन करण्यासारखें आहे. टिळकांचें हृद्गत सांगणारे किती तरी उतारे येथें देण्यासारखे आहेत, पण विस्तारभयास्तव आम्हाला हात आखडता घ्यावा लागत आहे. तथापि टिळकांचे विचार शक्य तेवढे त्यांच्याच ओजस्वी वाणीनें कथन करण्याचा आमचा संकल्प असल्यामुळें 'विश्वबंधुत्व' या विषयावरील पुढचा जरा लांब उतारा देण्याचा मोह आम्हाला आवरत नाहीं. लंगड्या पांगळ्या समाजाला त्याच्या शक्तीकडे न पहातां 'विश्वबंधुत्वा'चें गौरीशंकर एकदम चढण्याचा आग्रह करणाऱ्यांना टिळक सांगतात कीं, "आत्मोन्नतीची (वसुधैव कुटुंबकम्) ही

परमावधीची स्थिति जोंपर्यंत सर्वांस प्राप्त झाली नाहीं, तोंपर्यंत इतर राष्ट्रें किंवा समाज यांची स्थिति लक्षांत आणून साधुपुरुषांनीं आपआपल्या समाजांत, तत्तत्कालीं श्रेयस्कर होईल असा देशाभिमानादि धर्मच त्यांस उपदेशिला पाहिजे असें न्यायतःच सिद्ध झालें. शिवाय दुसरें असेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, घराचे वरवरचे मजले बांधून तयार केले तरी खालचे मजले ज्याप्रमाणें काढून टाकतां येत नाहींत, किंवा तरवार हातांत पडली म्हणजे कुदळीची, अगर सूर्य असला म्हणजे अग्नीची जरूर ज्याप्रमाणें नाहींशी होत नाहीं, तद्वत सर्वभूतहिताच्या शेवटच्या पायरीवर पोंचलें तरी देशाभिमानाचीच नव्हे तर कुलाभिमानाचीहि आवश्यकता नाहींशी होत नाहीं. कारण, समाजसुधारणेच्या दृष्टीनें पाहिलें तर कुलाभिमान जें विशिष्ट काम करतो तें केवळ देशाभिमानानें होत नाहीं, आणि देशाभिमानाचें कार्य निव्वळ सर्वभूतात्मैक्य दृष्टीनें सिद्ध होत नाहीं." (गी. र. ३९७). यांत गोंवलेलें 'अधिकार पाहून कार्य सांगणें' हें तत्त्व पुढाऱ्यांनीं लक्षांत ठेवलें तर कोणत्याच चळवळींत सहसा अपयश येणार नाहीं! 'विश्वबंधुत्त्वा'वर 'राष्ट्रीयत्त्वाची कल्पना' (केसरी, २३-४-०१) या लेखांत टिळकांनीं आणखी लिहिलें आहे. त्यांतील दोनच वाक्यें देतों.— "प्रपंच किंवा परमार्थ यांमध्यें मनुष्याच्या कोणत्याहि मानसिक शक्तीचा परिणाम तिला आधारभूत असा विवक्षित हेतु मिळाल्याशिवाय बिलकुल व्हावयाचा नाहीं. उदार प्रेमबुद्धि ही एक चांगली शक्ति आहे, परंतु सर्वच जगाविषयीं समानतेनें आपण प्रेमबुद्धि बाळगूं असें म्हणणाऱ्या सद्भावी परंतु व्यवहारशून्य मनुष्यास आपल्या प्रेमबुद्धिरूप शक्तीचा दृश्य परिणाम जगांत कधींहि करून दाखवितां येणार नाहीं."

१० इ. स. १९०० च्या गणेशोत्सवांत टिळकांनीं हिंदुधर्माचें—

"**प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु साधनानामनेकता।**
**उपास्यानामनियमः श्चैतद्धर्मस्य लक्षणम्॥**"

असें व्यावर्तक लक्षण केलें होतें. इतर कोणत्याहि धर्मापेक्षां हिंदुधर्माचें बरोबर लक्षण करणें फारच कठीण आहे; कारण दुसऱ्या धर्मांत एक धर्मग्रंथ व तो कथन करणारा कोणीतरी एक पुरुष अशी व्यवस्था असल्यामुळें त्यावर विश्वास ठेवणारा जो मनुष्य तो त्या धर्माचा असें ताबडतोब सांगतां येतें, पण हिंदुधर्माचें स्वरूप इतकें व्यापक आहे कीं, त्यांत एक धर्मप्रवक्ता पुरुष व एक धर्मग्रंथ असें दाखवितां येणें शक्य नाहीं. आमचा धर्म अनादि आहे, अशी कल्पना असून सर्वसंग्राहक धोरणामुळें त्याच्या इतका मतामतांचा गलबला इतरत्र कोठेंहि आढळणार नाहीं. तेव्हां हिंदुधर्माचें लक्षण करितांना त्या धर्माखालीं मोडणाऱ्या सर्व जातींचा, वर्णांचा, पंथांचा किंवा मतांचा समावेश होऊन बौद्ध, मुसलमान,

ख्रिस्ती इत्यादि परधर्मीयांचा अंतर्भाव होणार नाहीं, अशी काळजी घेतली पाहिजे. हाच हेतु मनांत धरून लोकमान्यांनीं "प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु" असें हिंदुधर्माचें पहिलें लक्षण बांधलें आहे. "......आर्य लोकांचा इतिहास व वेद हीं समानमूलक असल्यामुळें आर्य लोकांचा धर्म जर पहावयाचा असेल तर त्याचें मूळ वेदाखेरीज दुसऱ्या कोठेंहि सांपडावयाचें नाहीं. वेद तीन माना किंवा चार माना, मंत्र—ब्राह्मणात्मक माना किंवा मंत्रात्मक माना, पौरुषेय माना किंवा अपौरुषेय माना, ऋषी मंत्रद्रष्टे म्हणा किंवा मंत्रकर्ते म्हणा, जोंपर्यंत वेद हे आपल्या धर्माचे मूलभूत किंवा प्रमाणभूत ग्रंथ आहेत असें एकादा मनुष्य कबूल करीत आहे तोंपर्यंत तो 'हिंदु' आहे असेंच म्हटलें पाहिजे" (लो. टिळकांचीं आठ वर्षें, २२३).

११ वेदप्रामाण्य हें हिंदुधर्माचें आद्य लक्षण सांगतांना स्वतः टिळकांचीं वेदांविषयीं काय मतें होतीं हें येथें सांगितलें पाहिजे. वेद हे प्रत्यक्ष ईश्वराचे निःश्वसित असल्यामुळें वंशपरंपरेनें घोकून काढण्यापलीकडे त्यांचें संशोधन करण्याच्या किंवा त्यांचा अर्थ लावण्याच्या भानगडींत आपल्यासारख्या क्षुद्र मानवांनीं पडूं नये, अशा तऱ्हेचे कट्टर शब्दप्रामाण्यवादी ते खास नव्हते, हें त्यांच्या 'ओरायन' व 'आर्क्टिक होम इन् धी वेदाज' या पुस्तकांवरूनच सिद्ध होतें, असें प्रारंभीं दाखविलें आहेच. 'स्थाणुरयं भारहरः किलाभूत् अधीत्य वेदं न विजानाति योऽर्थम्" असें निरुक्तकारांप्रमाणें त्यांनाहि वाटत असे. वाढत्या ज्ञानाच्या आजच्या काळांत एकट्या वेदार्थमीमांसेला अलग रहातां येणार नाहीं, तर्कशास्त्राचे कडक नियम व शास्त्रीय विवेचनपद्धति वेदांनाहि लावली पाहिजे असें त्यांनीं 'आर्य लोकांचें मूलस्थान' या ग्रंथाच्या शेवटीं लिहिलें आहे. टिळकांनीं 'नित्य' व 'अनादि' वेदांचा काळ ठरविला व 'अपौरुषेय' वेदांतील ऋचा कोणीं, केव्हां व कोठें लिहिल्या याबद्दल अनुमानें बांधलीं, तरी परंपरागत कल्पनांना धक्का पोहोंचूं नये व त्या कल्पना तशाच पुढेंहि चालू रहाव्या म्हणून आपल्या शास्त्रीय विवेचनानंतर थोडी 'आंगपलट' करून त्यांनीं 'नित्य,' 'अनादि' व 'अपौरुषेय' शब्दांचे निराळे अर्थ केले आहेत. वेद 'नित्य,' 'अनादि,' व 'अपौरुषेय' याचा अर्थ असा कीं, त्यांचें मूळ हिमांतर कालांत गडप झालेलें आहे, त्यांच्या सूक्तांचा मथितार्थ हिमांतरकालीन असून हिमोत्तर कालीन ऋषींनीं तो फक्त नव्या शब्दांत ग्रथित केला आहे व त्यांचा मानवी कर्ता कोणत्याहि काळीं ज्ञात नव्हता. वेदांना टिळक कोणत्या अर्थानें प्रमाण मानतात हें वरच्या कलमांतील उताऱ्यांत स्पष्ट झालेंच आहे.

१२ 'साधनानामनेकता' हें टिळकांनीं हिंदुधर्माचें दुसरें वैशिष्ट्य सांगितलें आहे. हिंदुधर्मांत अधिकाराप्रमाणें परमेश्वरप्राप्तीचे ज्ञान, भक्ति, कर्म, योग

इत्यादि अनेक मार्ग खुले आहेत. "कारण सर्वव्यापी ईश्वराकडे जाण्यास (इतर धर्मांप्रमाणें) एकच वाट ठेवली आहे असें म्हणणें म्हणजे ईश्वराच्या घराला रानटी मनुष्याच्या घराप्रमाणें एकच दरवाजा आहे असें म्हणण्या-इतकेंच उपहासास्पद आहे" (टि. आठ वर्षें २२४). ज्ञानमार्ग हा सर्व मार्गांत श्रेष्ठ व अखेरचा असला तरी तो इतका क्लेशमय आहे कीं 'इतरे-जनांना' तो चालून जाण्याची बौद्धिक ऐपत नसते. मग ईश्वरप्राप्तीला त्यांना कायमचें मुकावें लागणार काय ? नाहीं. आत्मसाक्षात्कार होण्यास ज्ञानाच्या बालेकिल्ल्याचा अखेरचा दरवाजा जरी सर्वांनाच ओलांडला पाहिजे तरी तो दरवाजा गांठण्यास अवघड उभी चढण टाळून वळणावळणाचे दुसरे सुलभ मार्ग हिंदुधर्मानें सांगितले आहेत. त्यांपैकीं 'भक्ति' हा राजमार्ग असून श्रद्धा व प्रेम एवढी शिधासामुग्री बरोबर असली म्हणजे पांगळा देखील तो हंसत खेळत चालू शकतो. या 'राजविद्ये'ची व 'राजगुह्या'ची महति वर्णन करण्या-करितां लोकमान्यांनीं रहस्यांतील एक सबंध प्रकरण खर्ची घातलें आहे. भक्ति-मार्गाचें आणि ज्ञानमार्गाचें अखेर साध्य एक असून परमेश्वराच्या अनुभवात्मक ज्ञानानेंच अखेर मोक्ष मिळतो हा सिद्धांत दोन्ही मार्गांत कायम रहातो. फरक इतकाच कीं, ज्ञानमार्गांत ज्ञान पहिल्यापासूनच बुद्धीनें आकलन करावें लागतें व भक्तिमार्गांत तें श्रद्धेनें ग्रहण करावें लागतें. निर्गुण, निराकार व अव्यक्त परब्रह्माकडे ज्ञानाच्या दौडीनें जाण्याचें ज्यांना सामर्थ्य नसेल त्यांच्याकरितां हिंदुधर्मानें प्रतीकाचा 'पांगुळगाडा' निर्माण केला आहे. असें आहे तरी "भक्तिमार्गांत मनुष्याला तारण्याची जी शक्ति आहे ती सजीव अगर निर्जीव मूर्तींत किंवा दगडाच्या इमारतींत नसून या प्रतीकापेक्षां श्रेष्ठ अशी जी ईश्वर-भावना सदर प्रतीकाचें ठायीं उपासक आपल्या सोईसाठीं ठेवीत असतो तीच खरी तारक होय." (रहस्य ४१९) निर्गुण परमेश्वराचें आकलन सामान्य जनांना करतां येणें शक्य नसल्यामुळें मन स्थिर करून चित्ताची प्रवृत्ति परमेश्वराकडे वळविण्यास सगुण प्रतीक हेंच योग्य साधन होय, असें टिळकांनीं मूर्तिपूजेचें केलेलें मंडन लक्षांत ठेवण्यासारखें आहे. हिंदुधर्माची वरील निर-निराळीं साधनें लोकमान्यांनीं 'ज्ञानमूलक भक्तिप्रधान कर्मयोग' या आपल्या सूत्रांत गोविलीं असून लोकसंग्रहेच्छु मुमुक्षूंच्या निरनिराळ्या गुणांचा विकास होण्यास तीं सर्व आवश्यक आहेत असें गीतेचें रहस्य सांगतांना त्यांनीं दाखविलें आहे.

१३ 'उपास्यानामनियमः' हें टिळकांच्या मतें हिंदुधर्माचें तिसरें वैशिष्ट्य होय. ख्रिस्ती धर्म फक्त येशूवर विश्वास ठेवण्यास सांगतो, मुसलमान एका महंमदालाच ईश्वराचा प्रेषित समजतात, तर बौद्धांना गौतमबुद्धाखेरीज कोणाचीच मातब्बरी वाटत नाहीं; पण हिंदुधर्म इतका संकुचित नाहीं. 'तत्वमसि'

हें हिंदुधर्माचें 'महावाक्य' असून शास्त्रोक्त 'करणी' केल्यास 'नराचा नारायण' होण्याचा मार्ग सर्वांस मोकळा आहे. "सृष्टीच्या आरंभापासून आतांपर्यंत ईश्वराच्या नाना तऱ्हेच्या विभूति उत्पन्न झाल्या आहेत व पुढेंहि होतील असें हिंदुधर्माचें कायमचें मत आहे. परमेश्वर एक आहे, अनेक नाहींत, हें तत्व आम्ही पूर्णपणें ओळखतों; पण पृथ्वीवर अवतीर्ण झालेली परमेश्वराची विभूति ही एकच आहे, हें तत्त्व आम्हास मान्य नाहीं व युक्तिदृष्ट्याहि तें मान्य करण्यासारखें नाहीं....विभूतींचें अनंतत्व व ईश्वराचें एकत्व ही आमच्या धर्मांतील विशेष गोष्ट आहे." (लो. टि. आठ वर्षें, पृ. २२२) शैव, वैष्णव, गाणपत्य—कोणीहि असो, त्या सर्वांना पुत्रप्रेमानें पोटाशीं धरण्याइतकी वत्सलता हिंदुधर्माजवळ आहे. "...उपासकाची योग्यता, अधिकार व आवड ह्याप्रमाणें उपास्य दैवत स्वीकारण्याची त्यास मोकळीक ठेवून पुढें उत्तरोत्तर त्याच्या अंगीं सात्विक गुणांचा जसा विकास होईल त्याप्रमाणें अधिक योग्यतेच्या सगुण उपास्याची त्याजकडून आराधना करवून त्यास अखेरीस ईश्वरप्राप्ति करून देणें हाच मार्ग अधिक सयुक्तिक व समंजस होय. हिंदुधर्मांत हाच मार्ग सांगितला आहे." (कित्ता)

१४ हिंदुधर्माचें व्यावर्तक लक्षण सांगितल्यानें 'हिंदु' म्हणविणारी व्यक्ति परधर्मीय व्यक्तीपासून कशी ओळखावी ह्याचा नीट बोध होत नाहीं. कारण वरील तिन्ही मतें मनानें मानणारा परधर्मीय मनुष्यहि मग हिंदूंत येऊन बसेल. दुसरें असें कीं, हिंदुधर्माच्या वरील त्रिकाण्डात्मक लक्षणांत फक्त पारलौकिक दृष्टीच ठेवलेली असून ऐहिक किंवा व्यावहारिक दृष्टीचा त्यांत अभाव आहे. या अडचणींचें निराकरण जानेवारी, १९१५ च्या चित्रमयजगत्च्या अंकांत लोकमान्यांनीं केलेलें आहे. त्या ठिकाणीं 'हिंदुधर्मा'च्या ऐवजीं 'हिंदु' या शब्दाची त्यांनीं व्याख्या केली आहे.

**धर्ममेनं समालम्ब्य विधिभिः संस्कृतस्तु यः।**
**श्रुतिस्मृतिपुराणोक्तैः क्रमप्राप्तैरथापि वा॥**
**स्वे स्वे कर्मण्यभिरतः श्रद्धाभक्तिसमन्वितः**
**शास्त्रोक्ताचारशीलश्च स वै 'हिंदु' सनातनः॥**

या व्याख्येंतील 'हिंदु' हा शब्द देशदृष्ट्या, वर्णदृष्ट्या किंवा जन्मज्ञातिदृष्ट्या योजलेला नसून मुख्यत्वेंकरून धर्मदृष्ट्या योजलेला आहे असें प्रथमतः सांगून धार्मिक समाजास नियमबद्धता येण्याकरितां सर्व धर्मांना बाह्य विधींची व संस्कारांची कशी जरूरी आहे हें लोकमान्य दाखवितातः—"थोडक्यांत सांगणें असल्यास असें म्हणावें लागेल कीं, हिंदु, पारशी, मुसलमानी किंवा ख्रिस्ती धर्मांचे कांहीं विशिष्ट विधी, आचार व संस्कार असून ते ते विशिष्ट विधी व संस्कार पाळल्याखेरीज कोणीहि त्या त्या विशिष्ट धर्माचा अनुयायी होऊं

शकत नाहीं. धर्मानुयायित्व हा केवळ बुद्धिगम्य ज्ञानाचा परिणाम नसून त्याला बाह्य संस्कारांची नेहमींच अपेक्षा असते, बाह्य संस्कारांवांचून तत्तद्धर्मानुयायित्व पुरें होत नाहीं, असें यावरून दिसून येतें. हे आचार किंवा संस्कार आयुष्यांत अनेक वेळां करावे लागत असल्यामुळें दरएक वेळीं मी अमुक धर्मातला आहे असें तत्तद्धर्मीयांस कळून येतें व प्रत्येकाच्या धर्मातील ध्येय त्याच्या डोळ्यापुढें येऊन धर्मावरील त्याची श्रद्धा दृढ होत जाते. स्वधर्मावरील श्रद्धा याप्रमाणें दृढ करणें आणि एका धर्मबंधनानें आपण सर्व बांधलेले अहोंत हें त्या त्या धर्माच्या अनुयायांस ज्ञान करून देऊन तत्तद्धर्मीयांची संघशक्ति वाढविणें, हेच या आचारांचे मुख्य उपयोग होत. आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ टिळकांनीं सुप्रसिद्ध आधिभौतिक पंडित ऑगस्ट कॉन्ट् याचें उदाहरण दिलेलें असून, परमेश्वरावर विश्वास नसतांना त्यानें जन्म, विवाह, मरण वगैरे प्रसंगीं कांहीं संस्कार होणें अवश्य आहे असें म्हटलें असल्याचें सांगितलें आहे. हाच विषय अधिक स्पष्ट करण्याकरितां धर्म व तत्त्वज्ञान यांचा लोकमान्यांनीं भेद दाखवून नुसत्या बुद्धिग्राह्य तत्वज्ञानास व नीतिज्ञानास धर्माचें स्वरूप येण्यास या ज्ञानास कांहीं विशिष्ट विधि, आचार व संस्कार यांचा पोषाख चढवावा लागतो, किंबहुना लौकिकांत या पोषाखाचेंच अधिक महत्त्व असतें असें म्हटलें आहे. ‘ आचारप्रभवो धर्मः ’ असें म्हणतात तें याचकरितां. सरस्वतीभूषण किंजवडेकर शास्त्री यांनीं लिहिलेल्या ‘ संस्कारमीमांसा ’ या पुस्तकास प्रस्तावना लिहितांना टिळकांनीं हेच विचार संक्षेपानें मांडले आहेत.

१५ याप्रमाणें प्रत्येक धर्मात जरी कांहीं सर्वसामान्य आचार व संस्कार असले तरी या बाबतींत देखील हिंदुधर्माचें कांहीं वैशिष्ट्य आहे. तें हें कीं, खिस्ती किंवा मुसलमानी धर्मांत ज्याप्रमाणें कांहीं विधी व संस्कार सर्वांना लागू पडण्यासारखे आहेत त्याप्रमाणें हिंदुधर्मात व्यवस्था नाहीं. वैदिक आर्य हिंदुस्थानांत आले त्यावेळीं त्या सर्वांचे विधी व संस्कार एकाच प्रकारचे होते. पण जसजसा त्यांच्यांत अनार्य लोकांचा अन्तर्भाव होऊं लागला तसतशी गुणकर्मविभागशः चातुर्वर्ण्यव्यवस्था अमलांत येऊन विधि–संस्कारांत भिन्नता उत्पन्न होऊं लागली. सारांश, हिंदुधर्मातील विधि–संस्कार परंपरागत पण यथाधिकार भिन्न असतात. ते सर्व ‘श्रुतिस्मृतिपुराणोक्त ’ असले तरी देशकालमानानें शिष्टाचारानुसार त्यांत फरक पडत जातात व यांत वावगें असें कांहींच नाहीं. समाजधारणा करणें हा आमच्या धर्माचा एक प्रमुख उद्देश असल्यामुळें आमच्या शास्त्रकारांनीं आचारांत जरूर तो फेरफार करण्याचा हिंदुधर्मातील शिष्टांस पूर्ण अधिकार दिलेला आहे. थोडक्यांत सांगायचें म्हणजे “ यथाधिकार पारंपर्य क्रमानें जे विधिसंस्कार प्राप्त झाले ते पाळणें व त्यांचें बंधन धर्मदृष्ट्या उत्पन्न

झालें आहे, निव्वळ नीतिदृष्ट्या किंवा राजशासनदृष्ट्या नव्हे, अशी समजूत असणें हें आचारात्मक हिंदुधर्माचें मुख्य तत्व होय."

१६ यावर अशी शंका स्वाभाविक येईल कीं, आर्यसमाज, ब्रह्मसमाज वगैरे अलकिडचे समाज हिंदुधर्मांतील परंपरागत आचारसंस्कारांपैकीं बरेच आचार पूर्णांशानें पाळीत नाहींत. मग ते हिंदु नव्हेत काय ? टिळक उत्तर देतात कीं, "हे विधि व संस्कार जर सनातन हिंदुधर्मांतील परंपरागत विधिसंस्कारांशीं बहुतांशीं सदृश असतील तर त्यांस हिंदु मानण्यास कांहीं हरकत नाहीं.......पण असा प्रकार जेथें नसेल तेथें त्यांस हिंदु म्हणणें धर्मदृष्ट्या तरी युक्त होणार नाहीं. जैन व बौद्ध यांस व्यवहारांत हिंदु म्हणतात याचें कारण हिंदूंचे बरेचसे आचार ते पाळीत असून कांहीं ठिकाणीं जैनांचे व वैष्णवांचे शरीरसंबंधहि होतात हें होय." 'हिंदु' शब्दाचा मुख्यार्थ सोडून त्याचा लाक्षणिक अर्थ काय करावयाचा हें लोकसमजुतींवरून व एकंदर व्यवहारावरूनच ठरविलें पाहिजे; दुसरा मार्ग नाहीं.

१७ चित्रमयजगत्च्या याच लेखांत लोकमान्यांनीं पतितपरावर्तनावर आपले विचार ओझरते व अस्पष्ट प्रकट केलेले आहेत. परधर्मांतील मनुष्य आपल्या धर्माचीं तत्वें मान्य करील किंवा एकादा हिंदु धर्मांतर होऊन पुन्हा स्वधर्मांत येईल तर पूर्वसंस्काराभावामुळें किंवा मध्यंतरीच्या संस्कारलोपामुळें त्याला हिंदु समजावयाचें कीं नाहीं असा प्रश्न स्वतःच करून त्यांनीं त्याचें उत्तर दिलें आहे. त्यांत धर्मक्रांतीच्या वेळीं झालेलें धर्मांतर व शांततेच्या वेळचें धर्मांतर असा त्यांनीं भेद केलेला दिसतो. ते म्हणतात "अशोकाच्या वेळीं किंवा नंतर बौद्धधर्मांत शिरलेले लोक पुन्हा हिंदुधर्मांत घेतले गेले हें खरें; पण एक तर ते पहिले हिंदूच होते व शिवाय हे प्रकार धर्मक्रांतीच्या वेळेचे आहेत, सामान्य कालचे नव्हत, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. शांततेच्या वेळीं काय प्रकार घडतो तें कबीरादिकांच्या उदाहरणांवरून स्पष्ट होतें. परधर्मी मनुष्य हिंदुधर्माचीं तत्वें स्वीकारून ज्ञानी झाला तर आम्ही त्याचा योग्य मान व गौरव करतों, आणि तो साधु असेल तर मरणानंतर त्याचें स्मारक म्हणून कबरस्थान बांधून त्याची पूजाहि करतों; पण तो हिंदु होता कीं नाहीं, असा जेव्हां प्रश्न निघतो तेव्हां त्यास आम्हीं हिंदु म्हणत नाहीं." याच विषयावर ४–७–१९०५ च्या 'केसरी'त दुसऱ्या एका ओघानें टिळकांनीं आपले विचार प्रकट केले होते. आपल्या समर्थनार्थ इंग्लंडांतील 'एलिन्स ॲक्ट' घेऊन त्यांनीं असें लिहिलें होतें कीं, परकी लोक आपल्या ज्ञातींत घेणें किंवा न घेणें हें, ते आपल्यांत मिसळल्यानें आपल्यावर कुरघोडी करतील कीं आपण त्यांस कबजांत ठेऊं, हा मुद्दा लक्षांत घेऊन त्या त्या वेळच्या समाजानें ठरवावयाचें असतें. मोपल्यांचें बंड होऊन पतितपरावर्तनाचा प्रश्न देशापुढें जोरांत विचारार्थ निघाला, त्या वेळीं

लोकमान्य दिवंगत झालेले असल्यामुळें, या विषयावर त्यांचीं निश्चित मतें कळलीं नाहींत. तथापि वरील उताऱ्यांतील गर्भित अर्थावरून पतितपरावर्तनाला ते प्रतिकूल नव्हते एवढें मात्र निश्चित आहे. टिळकांचें धोरण तेंच केसरीचें धोरण असा सर्वसामान्य असलेला समज खरा धरून चाललें तर कै. ग. भा. वैद्यांनीं काढलेल्या 'हिंदु मिशनरी सोसायटी'बद्दल 'केसरी'नें स्वीकारलेल्या अनुकूल धोरणावरून टिळकांच्या निश्चित मतांचें अनुमान देखील करावयास नको. इ. स. १९०३ च्या गणेशोत्सवांत गजाननराव वैद्यांचें 'ब्राह्मणधर्माचें साम्राज्य' या विषयावर व्याख्यान झालें. त्यावेळीं अध्यक्ष या नात्यानें टिळकांनीं विवेकानंदांप्रमाणें परधर्मीय राष्ट्रांत आर्यधर्मप्रसाराचे प्रयत्न करण्यास सुशिक्षितांस पाचारण केलें होतें. परंतु कबीराच्या वरील उल्लेखावरून धर्मप्रसार म्हणजे फक्त तत्वज्ञानप्रसार असून खिस्ती मिशनरी घेतात त्याप्रमाणें परधर्मीय मनुष्यास साक्षात् आपल्या धर्मांत घेतलेंच पाहिजे असें नाहीं, दुसऱ्या धर्मांत राहून हिंदु तत्वज्ञान मान्य असेल तरीहि त्याला औदार्यानें व समतेनें वागविण्यास हिंदुधर्म तयार आहे असा टिळकांचा आशय असलेला स्पष्ट दिसतो.

१८ पतितपरावर्तनाच्याच जोडीनें धर्मसंघटनेच्या प्रश्नाचा देशांत हल्लीं जोरानें खल चालू असल्यामुळें त्या प्रश्नाचा टिळकांच्या भाषेंत येथेंच विचार केल्यास ठीक पडेल. 'लोकमान्य टिळकांचीं गेलीं आठ वर्षें' या पुस्तकाच्या २४६ व्या पानावर १९०४ सालीं टिळकांनीं दिलेल्या एका व्याख्यानांतील एक उतारा दिलेला आहे. त्यांत धर्मैक्यावांचून राष्ट्रैक्य होणें अशक्य आहे या मताचें खंडन केलें असून पुढें असें म्हटलें आहे कीं, "......हिंदुस्थानांतील विद्यमान सर्व धर्म जाऊन एक धर्म होणें शक्य मानणेंच वेडेपणाचें आहे. शिवाय एक धर्म असूनहि समाजाचे तुकडे पडतात हें पहाणें असेल तर युरोपांतील राष्ट्रांकडे लक्ष द्यावें. इतर धर्मांबद्दल द्वेष व विरोध वाढूं न देतां हिंदुधर्माची जागृति व उन्नति करून हिंदुधर्मीयांचा मिलाफ करणें शक्य आहे. हिंदुस्थानांतील मोठ्या जनसमूहाचें ऐक्य करण्यास हें एक मोठेंच साधन आहे." 'टिळकांना धर्मप्रेमापेक्षां धर्मवेडच फार होतें व १८९३ सालीं झालेल्या हिंदुमुसलमानांच्या दंग्याचें प्रमुख कारण केसरींतून हिंदूंना त्यांनीं दिलेली फूस होय,' असा त्यांच्यावर अज्ञानमूलक आक्षेप घेण्यांत येतो. पण वास्तविक प्रकार तसा नसून हिंदूंनीं आपली संघटना करावी व मुसलमानांच्या दांडगाईस न जुमानतां आपलें हक्कसंरक्षण करावें एवढेंच शिकविण्याचा त्यांचा हेतु होता. मुसलमानांचा स्नेह संपादण्याकरतां हिंदूंनीं आपला स्वाभिमान विकूं नये; स्वत्व राखावें, असें ते म्हणत. 'कित्येक वर्षें अल्लिबदानें किटलेली जीभ श्री मंगलमूर्तीच्या नामोच्चारानें पुनः पवित्र' करण्याकरतां त्यांनीं गणपति-उत्सव काढला. हिंदु व मुसलमान यांच्याप्रमाणें सरकारचाहि एक तिसरा पक्ष आहे.

या तिसऱ्या पक्षानें पूर्वापार वहिवाटीस अनुसरून पहिल्या दोन्ही पक्षांच्या हक्कांचें निःपक्षपातीपणानें संरक्षण केलें पाहिजे. मुसलमानी मोहल्यांत शिरून खाटकाच्या घरची गाय सोडवून आणील तर अशा हिंदूस या फाजील धर्माभिमानाबद्दल शिक्षाच झाली पाहिजे. उलट नागपंचमी, गोकुळअष्टमी असल्या सणांत वाद्यें वाजविल्यानें आम्हांस चीड येते असें म्हणणाऱ्या दुराग्रही मुसलमानासहि शिक्षा झाली पाहिजे. ( केळकरकृत टिळकचरित्र, पृ. ३३८ ) अशा समतोल व निर्विकार बुद्धीनेंच ते वागत.

१९ हिंदूंचें तत्वज्ञान, संस्कार व आचार यांचा विचार करून प्रसंगानें पतितपरावर्तन व धर्मसंघटना याविषयींहि टिळकांचीं मतें पाहिलीं. आतां वर्णाश्रमव्यवस्था या हिंदुधर्मांतील अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नाबद्दल टिळकांचें काय म्हणणें आहे तें पाहूं. या प्रश्नाकडे धार्मिक दृष्टीपेक्षां मुख्यत्वेंकरून सामाजिक व औद्योगिक दृष्टीनेंच टिळक पहात. समाजधारणा हा आमच्या धर्माचा मुख्य उद्देश असल्यामुळें समाजाच्या स्वास्थ्याकरितां लागणारी सर्व प्रकारची व्यवस्था आमच्या धर्मांतच गोवून दिलेली आहे. "चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः" यांतील 'मया' चा अर्थ टिळकांनीं फारच मजेचा केलेला आहे. "परमेश्वरच सृष्टि निर्माण करून त्यांतील सर्व व्यवहार करतो असें म्हटलें म्हणजे त्याच सृष्टीचे व्यवहार सुरळीत चालण्यास चातुर्वर्ण्यादि ज्या व्यवस्था आहेत त्या त्याच्याच इच्छेनें निर्माण झाल्या आहेत हें उघड होतें.... अर्थात् ज्यानें त्यानें आपल्या अधिकाराप्रमाणें समाजाचीं हीं कामें करीत राहून लोकसंग्रह करावा ही परमेश्वराचीच इच्छा आहे, आणि सृष्टीचे जे व्यवहार परमेश्वराच्या इच्छेनें चालत आहेत त्यांतील एकादा विशिष्ट भाग मनुष्याला निमित्त करून त्याच्या हातून करविण्यासाठींच परमेश्वर त्याला जन्मास घालतो, व परमेश्वरानें त्यासाठीं योजिलेलें हें काम मनुष्य जर न करील तर परमेश्वराचीच अवज्ञा केल्याचें पाप त्याला लागेल, असेंहि पुढें ओघानेंच प्राप्त होतें" ( रहस्य ४३३ ). चातुर्वर्ण्य ईश्वरनिर्मित कसें याचें अशा रीतीनें विवेचन करून टिळक सांगतात कीं, या व्यवस्थेच्या मुळाशीं श्रमविभागाचें तत्व असल्यामुळें भिन्न जातींचा उच्चनीच भाव कर्मांवर नसून कर्त्याच्या शुद्ध बुद्धीवर आहे, आणि भक्तीच्या सोपानानें परमेश्वर गांठण्याचा मार्ग सर्वांस सर्वदा खुला आहे. याला आधारार्थ वनपर्वांतील व्याधाची कथा त्यांनीं पुढें केली आहे. चातुर्वर्ण्यव्यवस्थेखेरीज भरभराटीस आलेले पुष्कळ समाज पाश्चिमात्य देशांत आहेत. पण ही संस्था नसली तरी चारी वर्णांचे सर्व धर्म ज्ञातिरूपानें नाहीं तर गुणविभागरूपानें तिकडे आढळतातच ( रहस्य ६६ ).

२० सन १८९२ सालीं पुण्याच्या औद्योगिक परिषदेपुढें टिळकांनीं "The Hindu caste from an industrial point of view"

या विषयावर वाचलेल्या निबंधांत व १६–५–९३ च्या 'केसरी'त टिळकांनीं जातिभेदाचें आर्थिक दृष्टया सुंदर समर्थन केलेलें आढळतें. जातिभेदाचें मूळ आर्य–अनार्यांच्या वर्णभेदांत आहे, असें सांगून जातीजातींत बेटीव्यवहार न होऊं देण्याचीं कारणें एका इंग्रज ग्रंथकाराचे आधारानें टिळक अशीं सांगतात कीं, "इंग्लंडसारख्या थंड देशांतील सगळे लोक सगळीं कामें करण्यास ज्याप्रमाणें तयार असतात तशी स्थिति उष्ण देशांत कधींहि रहावयाची नाहीं. करितां कोणत्याहि गुणाचें येथें रक्षण करणें असल्यास तो गुण संभाळून ठेवण्याचें काम कांहीं विशिष्ट लोकांनीं आपल्या हातांत घेतलें पाहिजे, व हें काम जे लोक हातांत घेतात त्यांची कांहीं दिवसांनीं निराळी जातच बनून जाते." वाडवडिलांनीं केलेला धंदा मुलानें पुढें चालविल्यास लहानपणापासून त्याच वातावरणांत वाढल्यानें व आनुवंशिक संस्कारांमुळें त्याला तें काम चांगलें करितां येईल, म्हणून शक्य तोंवर त्यानें त्याच धंद्याला चिकटून रहावें असें टिळकांना वाटत असलें तरी जातिभेद जन्मावर अवलंबून न ठेवतां मूळच्या स्वरूपांत म्हणजे गुणकर्मावर तो अवलंबून असावा व हल्लीं धंदा बदलण्याची सर्वांस सवड असावी असेंहि त्यांना वाटतें. पूर्वींचीं जातिबंधनें परिस्थित्यनुरूप शिथिल झालीं पाहिजेत हें त्यांना कबूल असलें तरी तेवढ्याकरितां रोटीबेटी व्यवहार सुरू केला पाहिजे, नाहींतर राष्ट्रोन्नति होणार नाहीं असें त्यांस वाटत नाहीं ( केसरी १६।५।९३ ). धंदेविभागणी, सहकारिता व परस्परावलंबित्व हीं आमच्या चातुर्वर्ण्यांत असल्यामुळें चढाओढीच्या तत्वावर चाललेल्या युरोपांतील समाजांतल्या प्रमाणें संपत्तीची फाजील विषमता आमच्याकडे कधींच दिसून आली नाहीं ( केसरी १८९६ ). वर नमूद केलेल्या इंग्रजी निबंधांत ते म्हणतात– "Caste must therefore be regarded as secular and social organization amongst the members of the Aryan race, for the preservation of hereditary occupations and for the purposes of mutual help and co-operation, like the institution of Social and Trade Guilds in Europe during the Middle Ages." जातिभेदानें आमच्या समाजाचा घात झाला व म्हणून तो मोडून टाकल्याखेरीज राष्ट्राची प्रगति होणें शक्य नाहीं या आक्षेपाचें टिळकांनीं केलेलें जोरदार खंडन वाचलें म्हणजे समाजसुधारणेची खरी दिशा कोणती असावी याचें बरोबर ज्ञान होतें. 'सामाजिक सुधारणेचे मार्ग' या आपल्या लेखांत शेवटीं ते लिहितात "स्वतंत्रतेचा किंवा राष्ट्रीयत्वाचा अभिमान म्हणून जो कांहीं जोम आहे तो जोंपर्यंत जागृत असतो तोंपर्यंत समाजरचना कशीहि असली तरी त्यांतील दोष राष्ट्राच्या उन्नतीस किंवा भरभराटीस आड येत नाहींत. पण एकदां कां तो जोम नाहींसा झाला,

म्हणजे तेच दोष रावणाच्या धनुष्याप्रमाणें छातीवर बसून जगांत त्या लोकांची उपहास्यता होण्यास कारण होतात. सारांश, समाजरचनेपेक्षां लोकांमध्यें एक प्रकारचा आपल्या संस्थांबद्दल व देशाबद्दल अभिमान जागृत ठेवण्याची प्रत्येक देशकल्याणाकरितां झटणाऱ्या माणसानें आधीं तजवीज ठेविली पाहिजे." आपण ज्या ज्या सुधारणा करूं इच्छितों त्या आयर्लंडांत व ब्रह्मदेशांत पूर्वींच होऊन गेल्या असतां ते देश अजून भरभराटीस कां येत नाहींत असा निरनिराळ्या वेळीं लोकमान्यांनीं आपल्या प्रतिपक्ष्यांस सवाल टाकला आहे.

२१ 'संन्यास व कर्मयोग' या रहस्यांतील प्रकरणांत टिळकांनीं आश्रमव्यवस्थेचा विचार केलेला आहे (पृ. ३३४ ते ३३८ पहा). प्रत्येक व्यक्तीला आपल्या आयुष्यांत ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास या चार पायऱ्या चढून ब्रह्मपदास जातां येतें असें आमच्या स्मार्तधर्मांत सांगितलेलें आहे. "कर्में कर आणि कर्में सोड अशा ज्या वेदाच्या उभय प्रकारच्या परस्परविरुद्ध आज्ञा, त्यांची एकवाक्यता लावण्यासाठीं वयोभेदानुरूप आश्रमांचीहि व्यवस्था स्मृतिकारांनीं केलेली आहे; आणि कर्मांचा स्वरूपतः संन्यास हेंच शेवटचें ध्येय मानलें तर त्या साध्याची पूर्वतयारी म्हणजे साधन म्हणून स्मृतिकारांनीं आंखून दिलेला आयुष्यक्रमणाचा चार पायऱ्यांचा मार्ग कांहीं गैर नाहीं." (गी. र. ३३७) ही आश्रमव्यवस्था तिच्या शुद्ध स्वरूपांत टिळकांना मान्य असून हिचा अवलंब केल्यास व्यवहाराचा लोप न होतां कर्म व ज्ञान यांची चांगली सांगड घालतां येईल असें ते म्हणतात. परंतु कालान्तरानें पहिल्या पायऱ्या बुजाल्यासारख्या होऊन 'ब्रह्मचर्यादेव प्रव्रजेत् गृहाद्वा वनाद्वा' येथपर्यंत मजल येऊन ठेपली व संसार सोडून संन्यास घेणें हीच आयुष्याची इतिकर्तव्यता आहे असे विचार बौद्ध–जैन धर्मांकडून प्रसृत होऊं लागले. शंकराचार्यादिकांकडून या कार्याला प्रोत्साहन मिळालें. ही प्रवृत्ति समाजास फारच घातक झाली असें टिळकांचें म्हणणें आहे. प्रत्येक व्यक्तीनें प्रथम आपलें ऋणत्रय फेडावें व एकंदर समाज निवृत्तिपर व निष्क्रिय न होतां त्यानें प्रवृत्तिपर व्हावें एतदर्थ मन्वादिकांनीं गृहस्थाश्रमाला मुद्दाम अग्रस्थान दिलेलें आहे. असें असतां केव्हां तरी गृहस्थाश्रम सोडून 'कर्मसंन्यास' करा असा उपदेश करण्यांत काय हंशील, असें लोकमान्य विचारतात. "थोड्याबहुत स्वार्थबुद्धीनें वागणाऱ्या सामान्य लोकापेक्षां निष्कामबुद्धीनें वागणारे पूर्ण ज्ञानी पुरुष लोकसंग्रह करण्यास अर्थातच अधिक समर्थ व पात्र असतात. म्हणून ज्ञानानें त्यांच्या अंगचें हें सामर्थ्य ज्यावेळेस पूर्णावस्थेस पोंचतें त्याच वेळीं ज्ञानी पुरुषास समाज सोडून जाण्याची मोकळीक ठेवल्यानें, चातुर्वर्ण्यव्यवस्था ज्याच्या हितासाठीं निर्माण झालेली आहे त्या समाजाचेंच त्यांत अत्यंत नुकसान होत असतें. शरीरसामर्थ्य नसतां कोणी समाज सोडून अरण्यांत गेल्यास गोष्ट

निराळी; व संन्यासाश्रमास वृद्धापकाळाची मर्यादा घालण्यांत मनूचा हाच हेतु असावा. पण ही श्रेयस्कर मर्यादा पुढें अमलांत राहिली नाहीं....” (गी. र. ३३८) यावरून आश्रमाच्या सर्व पायऱ्या क्रमानें चढाव्या पण संन्यास म्हणजे ‘कर्मसंन्यास’ असा अर्थ न घेतां भगवंतांनीं सांगितल्याप्रमाणें ‘काम्यानां कर्मणां न्यास’ असाच घ्यावा किंबहुना गृहस्थाश्रमांत राहूनच हा संन्यास करतां येण्यासारखा असल्यानें संसार अजिबात सोडून देण्याचें कारण नाहीं इतकाच लोकमान्यांचा आशय आहे.

२२ मागें चातुर्वर्ण्यावर टिळकांचे विचार सांगतांना टिळक हे जन्मापेक्षां गुणकर्मालाच अधिक महत्त्व देत व श्रमविभागावर चातुर्वर्ण्याची उभारणी झालेली असल्यामुळें सर्व वर्ण समाजाच्या दृष्टीनें सारख्याच योग्यतेचे आहेत असें त्यांना वाटत असल्याचें सांगितलें होतें. पण समाजांत हल्लीं ब्राह्मणच श्रेष्ठ गणले जातात याची वाट काय? कांहीं अप्रबुद्ध लोकांच्या मतें याचें कारण असें कीं, ब्राह्मणांना वेदोक्त मंत्राचा अधिकार आहे म्हणून ते श्रेष्ठ व मराठे वगैरे इतर लोकांना तो नाहीं म्हणून ते कनिष्ठ; मराठ्यांना वेदोक्ताचा अधिकार दिल्यास ते ब्राह्मण होतील. इ. स. १९०२ च्या १ आक्टोबरच्या केसरींत टिळकांनीं ‘मराठे व वेदोक्त कर्म’ हे लेख लिहून या विषयाची चर्चा केली आहे. केवळ वेदोक्त मन्त्रांनीं ब्राह्मण्य येत नाहीं; ब्राह्मण स्त्रियांचे संस्कार वेदोक्त मंत्रांवांचून होत असूनहि त्या ब्राह्मणांतच मोडतात; मराठ्यांचे वेदोक्त संस्कार झाले तरी ते मराठेच रहाणार; याकरितां ‘क्षतात्किल त्रायत इत्युदग्रः क्षत्रस्य शब्दो भुवनेषु रूढः’ या कालिदासोक्तीप्रमाणें परिस्थिति लक्षांत ठेवून “आपले संस्कार वेदोक्त करण्यास झटण्यापेक्षां खऱ्या क्षात्रधर्मास उचित वर्तन ठेवणें हें खऱ्या क्षत्रियाचें किंबहुना ब्राह्मणांचेंहि कर्तव्य आहे,” अशा झोंकांत त्यांनीं हा विषय मांडला आहे. “...जातीजातींस जो कांहीं मान आहे तो या लक्षणावर (वेदोक्तावर) नसून त्या त्या शतींत कार्यकर्ते पुरुष ज्या प्रमाणावर निपजतात त्या प्रमाणावर आहे ही गोष्ट इतिहासावरून सिद्ध आहे,” अशी सामाजिक उच्चनीचत्वाची त्यांनीं मीमांसा केली आहे. मराठ्यांना वेदोक्त मंत्राचा अधिकार देण्यास ते बिलकूल प्रतिकूल नव्हते. एवढेंच नव्हे तर कोल्हापूरच्या महाराजांना तो मिळावा या सूचनेस त्यांनीं पाठिंबाहि दिलेला होता. त्यांचें म्हणणें इतकेंच असें कीं, “... हल्लीं कित्येक युरोपियन लोकहि जर वेदपठन करतात तर त्याप्रमाणेंच वेदोक्त कर्म करणाऱ्या मराठ्यांची स्थिति होईल. त्यांत कांहीं भूषण नाहीं, बहुमान नाहीं आणि देशकार्यहि नाहीं.” टिळकांनीं जो विरोध केला तो वेदोक्ताला नसून इनामें जप्त करण्याची भीति दाखवून मराठ्यांचें वेदोक्त करण्याबद्दल ब्राह्मणावर जुलूम करण्याची जी शक्कल मागें निघाली होती तिला होय. या कृत्यानें व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा येते असें ते म्हणत.

"I know that every community can freely resort to Vedokta rites if it chooses, but no one can justify the forfeiture of ancient Inams granted by old rulers and under different understandings." असें रँ. परांजपे यांनीं १९२० मध्यें बाँबे क्रॉनिकलमधून टिळकांवर केलेल्या आरोपांस उत्तर देतांना त्यांनीं लिहिलें होतें.

२३ 'टिळक सामाजिक समानतेच्या कितीहि गप्पा मारीत असले तरी अस्पृश्यतेसारखे हिंदुधर्मावरील डाग धुवून काढण्याच्या वेळीं ते मागें पाय घेत असत,' असा त्यांच्यावर सुधारकांचा एक ठरीव आक्षेप होता. पण हाहि निव्वळ भ्रम होय. स्वतः टिळकांनीं अस्पृश्यता कधींच झुगारून दिली होती. त्यांनीं सुरू केलेल्या गणपति उत्सवांत सर्व ज्ञातींना एकत्र बसण्याची मुभा होती. एकदां तर पुण्यांतिल एका चांभाराचा गणपति टिळकांनीं आपल्या स्वतःच्या गाडींत घेतला होता. घरीं त्यांच्या बैठकीवर कोणाहि अस्पृश्याला मज्जाव नव्हता, हें टिळकांच्या परिचितांपैकीं पुष्कळांस महशूर आहे. टिळक विलायतेस जाण्यापूर्वीं मुंबईस सयाजीराव गायकवाड यांचे अध्यक्षतेखालीं अस्पृश्यतानिवारक परिषद भरली होती. या परिषदेंत "अस्पृश्यता ही कोणत्याहि शास्त्रांत सांगितलेली नाहीं. कोणताहि इसम अस्पृश्य आहे असें मानणें हें देवाच्या दृष्टीनें पाप आहे. माझ्या होमरूलच्या चळवळीस एकादा महार येऊन मिळाला व त्यानें अभूतपूर्व कामगिरी केली तर एकाद्या ब्राह्मणापेक्षांहि मी त्याला श्रेष्ठ समजेन" असें लो. टिळक बोलल्याचें आम्हास आठवतें. असें असतां अस्पृश्यता-निवारणार्थ हिंदुस्थानांतील पुढाऱ्यांनीं काढलेल्या एका जाहीरनाम्याला सही देण्याचें त्यांनीं कां नाकारिलें ? वर उल्लेखिलेल्या बाँबे क्रॉनिकलमधील रँ. परांजपे यांच्या पत्रास उत्तर देतांना टिळकांनीं याचा उलगडा केला आहे. ते म्हणतात, "Mr. Paranjapye knows full well that I am for removing all caste distinctions regarding interdining and untouchability. I have said so many a time, but I am not prepared to take up the work of actual propaganda in this matter as my own, and I refused to sign a manifesto which would have clearly thrown that responsibility on me." कोणतीहि सुधारणा घडवून आणावयाची तर पुढाऱ्यांच्या नुसत्या शाब्दिक सहानुभूतीपेक्षां प्रत्यक्ष कृतीची तिला आवश्यकता अधिक आहे, हा लोकमान्यांनीं दिलेला इशारा सुधारकांनीं लक्षांत ठेवला असता तर 'सुधारणेच्या जरिपटक्याचा हत्ती निशाणासह चिखलांत बुडून' मरण्याचे प्रसंग त्यांच्यावर आले नसते !

२४ धर्माशीं संबद्ध पण सामाजिक समजल्या जाणाऱ्या गोष्टींविषयीं टिळकांचें धोरण सामान्यतः 'मध्यम प्रतीच्या उदार मतवादित्वाचें' होतें. आपल्या पूर्वजांविषयीं, धर्माविषयीं, परंपरेविषयीं व रिवाजांविषयीं त्यांना मोठा अभिमान वाटत असे. इंग्रजी शिक्षणाच्या पहिल्या लोंढ्याबरोबर आलेले नवीन विचार व नव्या कल्पना यांच्या बरोबर दुसऱ्या शहाण्यासुर्त्या मंडळींप्रमाणें ते वहात गेले नाहींत अथवा त्यांचा बुद्धिभेदहि झाला नाहीं. उलट ते विचार व त्या कल्पना सर्व पचवून आपल्या समजुतींचा व परंपरेचा त्यांच्याशीं कसा सांधा जोडतां येईल आणि अशा रीतीनें राष्ट्रोन्नतीचा गाडा पुढें कसा ढकलतां येईल याच गोष्टीचा ते विचार करीत असत. अनेक जाती, अनेक पंथ व अनेक धर्म हे आज हिंदुस्थानांत आहेत तसे पूर्वींहि होते. पण हे सर्व भेद एकीकडे सारून सर्वांनीं राष्ट्रकार्याकरितां खांद्याशीं खांदा भिडवून काम करण्याइतकी एकराष्ट्रीयत्वाची उत्कट भावना हल्लीं लोकांत नसल्यामुळें वरलि भेद आम्हाला गांगरून सोडतात. याकरितां प्रचंड राजकीय चळवळ करून परकीयांच्या हल्लयांपासून प्रथम आपल्या घराचें संरक्षण केलें पाहिजे. तें झालें म्हणजे घरांतील अंतस्थ मांडामांड आपल्या सोयीप्रमाणें आपणास स्वस्थपणानें करतां येईल असें त्यांचें म्हणणें असे. 'आशियांतील कारस्थानें' (केसरी, २६-५-१९०३) या हृदयस्पर्शी लेखांत ते म्हणतात कीं, इंग्रजांनीं आमच्या संरक्षणाचा मक्ता घेतलेला आहे. "आपसांतील क्षुद्र भेद विसरून जाण्याला मुख्य कारण जें परशत्रूची भीति त्याचा येथें अभाव असल्यामुळें या अंतर्गत भेदांना फाजील महत्त्व येतें व देशांतील चांगल्या लोकांची बुद्धीहि त्यांतच सुख मानूं लागते. ज्या बुद्धीचा व कर्तृत्वशक्तीचा रोंख जगांत आपल्या राष्ट्राची महति वाढविण्याकडे असावयाचा, त्यांचाच विनियोग ज्ञातिद्वेष, परस्परवैमनस्य आणि आत्ममहत्त्व वाढविण्याकडे होऊं लागतो; आणि तेणेंकरून राष्ट्रामध्यें उत्तरोत्तर अधिक फाटाफूट व विस्खलितपणा उत्पन्न होऊन तें राष्ट्र लवकर विलयास जातें......प्रीतिभोजनें, मिश्रविवाह किंवा सामाजिक परिषदें असल्या शुष्क उपायांनीं हे समाजरोग बरे होत नाहींत. राष्ट्रीय अभिमान प्रदीप्त करण्याला एक परकी शत्रु जशी मदत करतो तशी शेंकडों व्याख्यानें व हजारों पुस्तकें यांनीं होत नाहीं, असें प्रत्येक जिवंत राष्ट्राच्या इतिहासावरून आपणांस आढळतें." टिळकांनीं चळवळीची अमुकच दिशा कां पत्करली या प्रश्नाचें समर्पक उत्तर वरील विचारांत सांपडतें.

२५ यावरून सर्वांनीं राजकीय चळवळच करावी, सामाजिक व धार्मिक सुधारणेकडे ढुंकूनहि पाहूं नये, असें टिळकांना वाटत असे हें अनुमान काढणें चुकीचें होईल. आपला समाज, आपले आचार व आपले रिवाज पूर्णावस्थेस पोंचले आहेत, त्यांत सुधारणा करण्यास यत्किंचित् जागा नाहीं, असें टिळकांनीं

कधींहि म्हटलें नाहीं. "देशकालानुरूप कांहीं आचार सोडावेच लागतात. कुमारिलभट्टानें किंवा शंकराचार्यांनीं सर्व जुन्या श्रौताचारांचा आग्रह धरला नाहीं म्हणूनच हिंदुधर्म जगला; नाहींतर आम्ही सर्व बुद्ध झालों असतों," असें त्यांनींच म्हटलें होतें. आपल्या समाजव्यवस्थेंतील कित्येक दोष पाहून त्यांचेंहि हृदय पिळवटून जात असे, व एकाद्या निरर्थक किंवा ग्राम्य रिवाजाचा तीव्र शब्दांनीं निषेध करण्यास ते केव्हांहि एका पायावर तयार असत. 'केसरी' म्हणतो—"जेव्हां एखादी चाल निरर्थक किंवा ग्राम्य असून तिचा धर्माशीं अज्ञानानें उगाच संबंध जोडलेला असतो (अशा चाली बऱ्याच आहेत व त्यांचा सवडीनुसार विचार करण्याचा आमचा मानसहि आहे) तेव्हां त्यांतील बिंगें बाहेर काढण्यास तो कधींहि मागें पुढें पहाणार नाहीं. मग तेवढ्याकरितां धर्मावर लिहावयास लागलें तरी हरकत नाहीं." या प्रतिज्ञेप्रमाणें 'न्हाणवलीचा शास्त्रदृष्ट्या विचार' 'दत्तविधान' इ० लेख टिळकांनीं केसरींत लिहून त्या त्या चालींचें स्पष्टोक्तिपूर्ण दोषाविष्करण केलें आहे. संमतिवयाच्या बिलाचा विचार करण्याकरितां १८९० सालीं तुळशीबागेंत जी सभा भरली होती, तिच्यांतील मूळ ठरावाला टिळकप्रमुख कांहीं गृहस्थांनीं एक उपसूचना सुचविली होती. तिच्यांत खालील सुधारणा सुचविल्या होत्याः—

मुलीचें लग्न १६ वर्षांचें आंत व मुलाचें २० वर्षांचें आंत करूं नये. पुरुषाचें लग्न ४० वर्षांपुढें होऊं नये व झाल्यास विधवेशीं व्हावें. हुंड्याची चाल बंद करावी. विधवेचें वपन करूं नये. दारू पिणें बंद करावें. प्रत्येकानें आपल्या प्राप्तीचा १० वा भाग सार्वजनिक कामाकडे द्यावा.

या उपसूचनेंत एक महत्त्वाची अट होती. ती ही कीं, त्या सुधारणा ज्यांना तत्त्वतः मान्य असतील त्यांनीं त्या स्वतः आचरणांत आणल्या नाहींत तर त्यांना कडक शिक्षा व्हावी. (केळकृत टिळक–चरित्र, पृ. २५२). याशिवाय इतर धार्मिक–सामाजिक विषयावरील त्यांचे विचारहि प्रसिद्ध आहेत. ऋतुप्राप्त झाल्यावर विवाहास परवानगी दिल्यास निदान अक्षतयोनी बालविधवा मरणार नाहींत. (आठ वर्षें, २१६) "........Though widow remarriage is sanctioned by the later Hindu Law, yet a compromise could be adopted by including it in the forms of marriage sanctioned by Shastras and thus removing, with the sanction of the orthodoxy, all disqualification arising from social ostracism" (रँ परांजपे यांस उत्तर). पटेल यांच्या अंतर्जातीय विवाहबद्दलच्या बिलाला टिळकांनीं केलेला विरोध धार्मिक अगर सामाजिक कारणांकरतां नसून वारसा हक्काच्या मुद्दयावर म्हणजे आर्थिक कारणाकरितां होता. इ. स. १९०० च्या नोव्हेंबरांत 'देशस्थ,

कोंकणस्थ व कऱ्हाडे ' या विषयावर दोन लेख लिहून ब्राह्मणांतील या पोटजातींत शरीरसंबंध होणें धर्मनिषिद्ध नाहीं, म्हणून शंकराचार्यांकडे देखील जाण्याच्या भानगडींत न पडतां लोकांनीं स्वतःच्या उदाहरणानें ही रूढी बंद करावी अशी टिळकांनीं शिफारस केली होती. सारांश, धार्मिक व सामाजिक सुधारणेच्या साध्याच्या बाबतींत टिळक व इतर सुधारक यांच्यामध्यें फारशी तफावत नव्हती.

२६ सदर सुधारणा घडवून आणण्याच्या मार्गांत मात्र फार मतभेद होता. सामाजिक सुधारणेची गोष्ट राजकीय सुधारणेहून फारच भिन्न आहे. " सामाजिक सुधारणा घडवून आणतांना कार्यशकटाच्या चक्रास कमींत कमी घर्षण होईल असेंच धोरण स्वीकारलें पाहिजे. सामाजिक व राजकीय सुधारणा या अवघड किल्ल्यासारख्याच आहेत. राजकीय सुधारणा हस्तगत करणें हीच गोष्ट त्यांतल्या त्यांत अधिक सुसाध्य आहे. कारण या किल्ल्यावर स्वारी करण्याविषयीं सर्व हिंदी प्रजाजनांचें ऐकमत्य असून सर्वांस सारखी उत्सुकता वाटत आहे. सामाजिक सुधारणेची गोष्ट तशी नाहीं. " ( केळ. टि. च. १८० ) श्रमविभागाच्या तत्त्वावर वरील दोन्ही चळवळी निरनिराळ्या पुढाऱ्यांनीं चालविल्या पाहिजेत. एक सुधारणा करतांना सरकारचे आघात सोसावे लागतात व दुसऱ्या सुधारणेंत लोकांचे आघात बसतात. दोन्ही कामें एकच मनुष्य करूं लागेल तर त्याला दोन्हीकडून थपडा बसतील व कांहींच कार्यभाग करतां येणार नाहीं. म्हणून ज्याला राजकीय सुधारणा करावयाची त्यानें लोकांची सहानुभूति गमावतां कामा नये. धर्मासारख्या नाजूक बाबतींत शिक्षणानें व ज्ञानप्रसारानेंच खरी सुधारणा होत असते. कायद्याच्या दंडुक्यानें असलीं कामें कधींच यशस्वी होत नाहींत. परकीय सरकार असेल तेव्हां तर त्याला आपल्या धर्मांत ढवळाढवळ करण्याचा कधींच हक्क देतां कामा नये. संमतिवयाच्या बिलाला टिळकांनीं विरोध केला तो याच तत्त्वावर. शिवाय टिळक असें म्हणत कीं, "......जेव्हां एकादी चाल धर्मांत रूढ होऊन बसलेली असते, तेव्हां त्या चालीच्या गुणावगुणांचा विचार धर्मदृष्टि बाजूला ठेवून कधींहि करतां येत नाहीं. धर्माची बाजू युक्तिदृष्ट्या कदाचित् लंगडी असेल, पण जगांतील सर्व व्यवहार कांहीं युक्तीनेंच होत नाहींत. प्राचीन कालापासून चालत असलेली धर्मपरंपरा युक्तीपेक्षां शतपट प्रबल असते, आणि ही धर्मपरंपरा कशी सुधारावयाची याचा विचार त्या धर्माच्या बाहेरील लोकांनीं करणें व्यवहारदृष्ट्या अगदीं अप्रयोजक होय. " ( केसरी, ४।७।०५ ) याकरितां राजकीय बाबतींत ज्याप्रमाणें सनदशीर चळवळ करतात त्याप्रमाणें सामाजिक बाबतींतहि शास्त्रोक्त चळवळ झाली पाहिजे, असा टिळकांचा कटाक्ष होता. तिसरें असें कीं, प्रत्येक सुधारकानें आपणांस समाजाच्या बाहेरचे समजून दुढ्ढाचार्यासारखा समाजास उपदेश करण्याचा आव न आणतां

ज्या समाजाची सुधारणा करावयाची त्यांतलिच आपण एक घटक आहोंत या सहानुभूतीच्या नात्यानें त्यानें वागलें पाहिजे, आणि सुधारणेच्या कामांत देवाण घेवाण हें तडजोडीचें धोरण स्वीकारलें पाहिजे. "ज्याला केवळ आपल्या डोक्यांतल्या कल्पना अमलांत आणावयाच्या असतील त्यानें सहाराच्या वाळवटांत आपलें झोंपडें बांधून तेथें खुशाल मनःपूत आचरण करावें" (केसरी, ७ जून १८९२). 'प्रार्थनासमाजादि पंचरसी नवे धर्म' काढणारांनीं ही गोष्ट ध्यानांत ठेवली नाहीं, धर्माच्या परंपरेचा उच्छेद करून बहुजनसमाजापासून ते दूर राहिले व त्यामुळें जास्त जास्त फाटाफूट झाली. तात्पर्य, टिळकांना जुन्या पायावर नवी इमारत उठवावयाची होती, तर दुसऱ्या मंडळींना तो पायाहि उखडून टाकून अगदीं नवीन 'फॅशन'चा इमला सजवावयाचा होता!!

२७ येथपर्यंत हिंदु तत्वज्ञान, संस्कार, आचार, समाजव्यवस्था यांवरचे टिळकांचे विचार सांगितले व धार्मिक किंवा सामाजिक सुधारणेच्या बाबींत त्यांच्या धोरणाचाहि उहापोह केला. परंतु पुष्कळ लोकांना असले तात्विक विचार कळत नाहींत. टिळक आपल्या घरांत रोज कसे वागत असत हें जाणून घेण्याची त्यांना स्वाभाविक जिज्ञासा होते. तेव्हां त्याबद्दल थोडी माहिती दिल्याखेरीज हा विषय पूर्ण होणार नाहीं. टिळकांच्या गृहाचारांकडे पाहतांना कर्मनिष्ठतेच्या चष्म्याऐवजीं ज्ञाननिष्ठतेचा चष्मा वापरला पाहिजे. नित्यनैमित्तिक कर्मकर्मांतराच्या पलीकडे कांहीं 'धर्म' नाहीं अशा समजुतीचा एकादा 'कर्मठ' ब्राह्मण टिळकांना घरांत पाहील तर तो तावडतोब त्यांना 'धर्मलंड' ठरवील. पण ही बाह्यदृष्टि टाकून देऊन अंतर्दृष्टी स्वीकारली पाहिजे. लोकसंग्रहाचें कंकण बांधलेल्या 'ज्ञानी' माणसाला नित्य नैमित्तिक फालतुक कर्मांबद्दल जशी अनास्था उत्पन्न होते, तशाच प्रकारची अनास्था टिळकांच्या गृहाचारांत दिसत असे. त्यांत धर्माबद्दलचें औदासिन्य नव्हतें, परंपरेविषयीं तिरस्कार नव्हता किंवा आचारांची अवहेलना नव्हती. टिळक नास्तिक नव्हते तसे कर्मठहि नव्हते. स्नानसंध्या, जपजाप्य, होमहवनें, व्रतवैकल्यें यांकडे ते कधींच लक्ष देत नसत. मूर्तिपूजेचें त्यांनीं मंडण केलेलें असलें तरी घरच्या देवांना त्यांनीं कधीं गंधाक्षता वाहिल्या नाहींत. पूजेचें काम परस्पर कोणातरी ब्राह्मणाकडून होत असे. जनतात्म्याच्या विराट देहाची अहर्निश चिंता वाहाण्यांत व आमरण सेवा करण्यांत मात्र त्यांच्या हातून यत्किंचित् कसूर झाली नाहीं. त्यांनीं आपलें गीतारहस्य 'श्रीशाय जनतात्मने' समर्पण केलें आहे. त्यांनीं एकाद्रा संप्रदाय अगर पंथ काढला नाहीं कीं कोणाला 'गुरु' केलें नाहीं. ते पूर्ण स्वयंप्रज्ञ होते. श्मश्रु करावयास त्यांनीं तिथीची चौकशी केली नाहीं किंवा प्रवासास निघतांना कधीं प्रस्थान ठेविलें नाहीं. शेवटच्या तुरुंगवासांतून परत आल्यावर सातूच्या पुन्या वगैरे खात असल्यामुळें पक्तींत न बसतां माडीवरच ते ताट मागवीत. चित्राहुती नेहमीं घालीतच

असें नाहीं. त्यांचें कृष्णंभट नांवाचे उपाध्ये येऊन जेव्हां सांगत कीं, 'उद्यां श्राद्ध आहे, पक्ष आहे ' तेव्हां ते विधी उरकण्यांत येत. दरसाल श्रावणी मात्र ते नियमानें करीत असत. सर्व आन्हिकांची ती वार्षिक उजळणीच आहे असें ते म्हणत. ग्रामण्याच्या प्रकरणांत त्यांच्या घरावर बहिष्कार पडला असतां आपली श्रावणी एकदां त्यांनीं स्वतः चालवली होती. मुलांस संध्या, पुरुषसूक्त शिकविण्याकरितां त्यांच्या घरीं एक गुरुजी ठेविलेला असे.

२८ टिळक स्वतः अस्पृश्यता पाळीत नसत हें वर सांगितलेंच आहे. त्यांनीं आपली एक मुलगी श्री. बापुसाहेब केतकर या सुधारक व प्रार्थनासमाजिस्ट गृहस्थांच्या मुलाला दिलेली होती. ब्राह्मणेतरांबरोबर पुष्कळ वेळां ते जेवलेले आहेत. ग्रामण्यप्रकरणांत काशीस प्रायश्चित्त घेतल्याचें त्यांनीं जें सांगितलें किंवा विलायतची यात्रा करून आल्यावर त्यांनीं जें प्रायश्चित्त घेतलें तें केवळ अज्ञ भटाभिक्षुकांच्या मोहबतीखातर. त्यांत प्रायश्चित्त घेण्यासारखें कांहीं नव्हतें असेंच त्यांना वाटे. असें सांगतात कीं, विलायतेस निघालेल्या डेप्युटेशन्‌मध्यें पं. मदन मोहन मालवीयांना चलण्याविषयीं त्यांनीं फार आग्रह केला. पण धार्मिक अडचणी दाखवून मालवीयांनीं नकार दिला. त्यावेळीं टिळकांनीं त्यांचा उपहास केला.

२९ टिळकांचीं मतें त्यांच्या सर्व हयातींत एकसारखींच होतीं कीं, कालान्तरानें तीं हळूंहळूं बदलत गेलीं हें पाहिलें पाहिजे. इ. स. १८९० च्या सुमारास धार्मिक व सामाजिक सुधारणेविषयींची त्यांची एकंदर प्रवृत्ति व इ.स. १९२० मध्यें बॉम्बे क्रॉनिकलमध्यें रँग्लर परांजप्यांना त्यांनीं दिलेलें उत्तर, या दोन टोकांचें सूक्ष्म निरीक्षण केल्यास १८९० सालचे टिळक तेच मरण्याच्या सालीं म्हणजे १९२० मध्यें कायम होते हें निःसंशय खरें आहे. याचा अर्थ परिस्थितीप्रमाणें प्रगतिपर राहण्यास टिळक नाकबूल असत असा नसून पूर्वींच त्यांचीं मतें इतक्या परिणत स्वरूपाला गेलेलीं होतीं कीं, तीं बदलण्याइतकी परिस्थिति पुढें गेलेली आहे असें त्यांना शेवटपर्यंत वाटलें नाहीं. वास्तविक स्वतः ते परिस्थितीच्याहि दोन पावलें पुढें असत. पण

**मुलांच्या चालीनें चालावें। मुलांचे मनोगतें बोलावें॥**
**तैसें जनास शिकवावें। हळूं हळूं॥**

अशा प्रकारच्या लोकशिक्षणानें त्यांना आपलें कार्य करावयाचें असल्यामुळें आपण एकटेंच पुढें न जातां समाजाला आपल्यापुढें घालून न्यावयाचा त्यांचा निर्धार होता. " बाजारांत गेल्यानंतर चर्मकारानें आणलेला जोडा पसंत पडला कीं ग्राहक जुना जोडा चट्कन् टाकून देतो, त्याप्रमाणेंच आपल्या चालीरीति एकदम टाकून देतां येतील असें ज्यांस वाटतें ते धन्य होत " ( के. ११-

१२-८८ ) इतकेंच त्यांना वाटत असे. टिळक परागतिक (Reactionary) होते असे जे जे म्हणतात त्यांना टिळकांचें हृद्गत नीट कळलें नाहीं असेंच म्हटलें पाहिजे. लोकशिक्षणानें व सामोपचारानें जीं कामें होतात तीं धाकदपटशानें, आदळ-आपट करून, शिव्या देऊन, किंवा बोटें मोडून होत नसतात, हें गेल्या ३०।४० वर्षांच्या इतिहासावरून सिद्ध झालें आहे. टिळकांच्या प्रगतिपर विचारांची खूण म्हणून आपल्या धर्मसुधारणेकरितां आपल्या धर्मपीठांनीं व सुशिक्षितांनीं काय केलें पाहिजे याबद्दल टिळकांनीं त्यांना केलेला उपदेश सांगून हा लेख आम्ही आटपता घेणार आहोंत.

३० धर्मसुधारणा जी करावयाची ती आपल्या जुन्या धार्मिक संस्था व धर्मपीठें यांना हाताशीं धरूनच केली पाहिजे. याकरितां जुने पण्डित व नवे पण्डित यांनीं आपापला अभिमान टाकून देऊन विचारविनिमयार्थ एकत्र जमलें पाहिजे. आपल्या धर्माचें वजन नवीन सुशिक्षितांवर व परधर्मीयांवर पडावयाचें असेल तर आमच्या शंकराचार्यांनीं इंग्रजी शिकून दुसऱ्या धर्मांचा तुलनात्मक अभ्यास केला पाहिजे. हल्लींचा काळ जाणून हल्लींच्या पद्धतीनेंच धिटाईनें व धडाडीनें त्यांनीं लोकजागृतीचें काम केलें पाहिजे. आपलें उत्पन्न जाईल या भीतीनें निर्जीव स्थितींत राहण्यांत स्वारस्य नाहीं. अंगांत कर्तृत्व असेल तर नवें उत्पन्न चालत येईल. दुसरा प्रश्न असा कीं, मुलांच्या धर्मशिक्षणाची लहानपणापासून काळजी घेतली पाहिजे. ज्या शिक्षणानें पुरुषाचा स्वभाव एक प्रकारचा अभिमानी, श्रद्धाळु, कर्तव्यदक्ष, त्यागी, व सत्यनिष्ठ बनेल तेंच खरें धर्मशिक्षण होय व तेंच विद्यार्थिदशेंत जरूर आहे. आमच्या सुधारक वर्गाची स्थिति पहा. " आमच्या प्राचीन धर्मग्रंथांचें कधींहि अवलोकन केलेलें नसल्यामुळें व लहानपणापासून सर्व शिक्षण व्यावहारिक रीतीनें झालेलें असल्यामुळें इंग्रजी शाळेंतून तयार झालेल्या मनुष्यास धर्म म्हणजे काय; तो कशासाठीं पाहिजे, राष्ट्राच्या उन्नतीस त्याची कांहीं अवश्यकता आहे कीं नाहीं, याबद्दल त्यांस कांहीं एक माहीत नसतें. समाजांत प्रचलित असलेल्या कांहीं सामाजिक किंवा धार्मिक रीतिभाती तो वरपांगीं पाळीत असतो. पण त्यावरील त्याची श्रद्धा बहुतेक समूळ नाहींशी झालेली असल्यामुळें या रीतिभाती जरा कोठें नडूं लागल्या कीं, हे राजश्री त्या झुगारून देण्यास एका पायावर तयार असतात; आणि अशा वेळीं जर कां त्यांस कोणी कांहीं बोललें कीं, मिल्ल, स्पेन्सर, किंवा बेकन, यांच्या जोरावर बरेंच वाक्पांडित्य करण्यास हे तयार असतात. " ( के. १९-१-१९०४ ) इंग्लडांत एम्. ए. झालेले लोक धार्मिक खात्यांत शिरतात, त्याप्रमाणें आमचे इकडील पदवीधरांनीं धर्माचें कार्य आपलें समजून हातांत घेतलें पाहिजे. " आमच्या सामाजिक व धार्मिक वर्तनाच्या तराजूची दांडी हल्लींच्या परिस्थितींत उजू राहण्यास विद्वत्तेनें, आणि स्वतःच्या आचरणानें

२०१ २१५५५ ७८१८१

ही गोष्ट प्रतिपादन करणाऱ्या पुरुषांची आम्हांस अत्यंत जरूर आहे " ( प्रो. जिनसीवाले यांचा मृत्युलेख ).

३१ संपलें! संकल्पाप्रमाणें आमची कामगिरी झाली. लोकमान्यांचीं मतें त्यांनीं स्वतः जशीं मांडलीं तशींच तीं वाचकांपुढें ठेवणें एवढेंच आमचें कर्तव्य होतें. टिळक हिंदुधर्माचे मूर्तिमंत पुतळे होते असें एका वाक्यांत त्यांचें वर्णन करितां येईल. हिंदुधर्मांतील तत्त्वज्ञान त्यांच्या रोमरंध्रांत भिनून गेलें होतें. ' अभयं सत्वसंशुद्धिः ' इ. दैवी संपत्ति त्यांच्याजवळ विपुल होती. त्यांचा बुद्धिमान् व होतकरू पुत्र मृत्युवश झाला असतां ते शांत चित्तानें केसरीचा अग्रलेख लिहावयास बसले. सहा वर्षांच्या काळ्या पाण्याची शिक्षा झालेली ऐकली तरी त्यांना गाढ झोंप येऊं शकली. जगांत अत्यंत नाठाळ व खट्याळ अशा नोकरशाहीशीं त्यांनीं निकराचा संग्राम केला. ' तुका म्हणे तोचि संत। सोशी जगाचे आघात ' या उक्तीप्रमाणें आधुनिक काळचे ते एक मोठे संत होऊन गेले यांत तिळमात्र शंका नाहीं. सुखदुःख, लाभालाभ, जयापजय या द्वंद्वांच्या ते पलीकडे गेलेले होते. लुप्त झालेल्या कर्मयोगाचें पुन्हां पुनरुज्जीवन करून ' तस्मात् असक्तः सततं कार्यं कर्म समाचर ' हें उज्वल ध्येय त्यांनीं फिरून राष्ट्रापुढें ठेविलें. निवृत्तीची काजळी झाडून टाकल्यामुळें आर्य धर्माचा ज्ञानदीप आतां तेजस्वी झाला आहे. या वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध व तपोवृद्ध आर्यधर्माला जगांत काय कार्य करावयाचें आहे, याचें दिग्दर्शन ' आशिया आणि युरोप ' ही केसरींतील लेखमाला पुरी करितांना लोकमान्यांनीं केलें आहे. तें प्रत्येक धर्माभिमानी तरुणानें हृदयावर कोरून ठेवण्यासारखें असल्यामुळें तेवढें सांगून आम्ही वाचकांची रजा घेतों.

" हिंदुस्थानांतील लोक अति प्राचीन काळापासून बुद्धिमत्तेविषयीं प्रख्यात आहेत व हरएक प्रकारच्या विद्येंत व सुधारणेंत इतर राष्ट्रांचे मार्गदर्शक झाले आहेत. शुद्ध आर्यजाती येथें आढळतात व जगांत अति प्राचीन वेद येथेंच आहेत. तात्पर्य, हिंदुस्थानांतील लोकांस आशियांतील ब्राह्मण म्हणण्यास हरकत नाहीं, व ब्राह्मणांचें मुख्य कर्तव्य जें अध्ययन, अध्यापन आणि धर्मसंरक्षण तेंच येथील लोकांनीं सर्व मनुष्यजातीकरितां तीन चार हजार वर्षें केलें आहे. बुद्धिसंग्राम आणि धर्मप्रसार हीं कामें आमच्या अंगवळणीं पडलीं आहेत व तींच पुढें चालविण्याची आम्हास पात्रता आहे.......सर्व जगाला विद्या, तत्वज्ञान व धर्म शिकविणाऱ्या लोकांना अर्धशिक्षित मिशनरींनीं आणि युरोपियन पंडितांनीं उसनें ज्ञान आणून क्षणभर चकवावें हें आम्हास लांछनास्पद नाहीं काय ? मिल्ल, स्पेन्सरच्या ग्रंथांचीं आम्हीं पारायणें करतों, पण त्यांचेपेक्षां फार पुढें गेलेल्या आपल्या पूर्वाचार्यांची आपण ओळखहि विसरून जावें यापेक्षां आमच्या

बुद्धिभ्रंशाची दुसरी कोणती खूण पाहिजे ! ...... युरोपियन लोक हिंदुस्थानांतील जमीन, पर्वत, नद्या जिंकोत; आपण आपल्या विद्येनें त्यांचीं अंतःकरणें स्वाधीन करून घेऊं. हल्लींच हिंदु तत्वज्ञानानें युरोपांतील धर्मविचार डळमळूं लागलेले दिसतात. गोरी फौज आमचे शरीरावर व घरादारावर अंमल करो; पण आपला धर्म युरोपच्या बुद्धीचें आकर्षण करील अशी महत्त्वाकांक्षा आपणांस असली पाहिजे. 'सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं संतरिष्यसि' हा श्रीभगवंतांनीं अर्जुनास केलेला उपदेश हृदयांत बाळगला पाहिजे. हेंच आमचें राष्ट्रीय कर्तव्य, हाच आमचा तरणोपाय व हाच आमचा अभ्युदयाचा मार्ग.... !!"

ॐ !!!

# निबंध सहावा

## ( ले.—काशिनाथ रघुनाथ वैशंपायन )

" विचार व मतें हीं मनाचीं पांघरुणें होत; पण मोठेपणा हा स्वतःसिद्ध किंवा कमाविलेल्या मनांत असतो. "

लो० टिळक.

कविवर्य मोरोपंतांनीं " फारच बरी निरयगति परवशता शतगुणें करी जाच ' असा परवशतेचा महिमा गायिला आहे ! परवशतेच्या प्रसववेदना परवशतेच्या खोल गर्तेंत रुतूं घातलेल्या आणि रुतलेल्या अनुभविक जीवांनाच माहीत. परवशतेंतील आयुःक्रम हा नाइलाजानें विहार करीत असलेल्या नर्ककीटकाप्रमाणें असतो. दुःखाचे आघात परतंत्र जनतेवर होतच असतात व जनता ते सहन करीतच असते व " पुनरपि जननं पुनरपि मरणं " या न्यायानें आघातसहिष्णुतेची आपली परमावधि करीत असते. परंतु जरी स्वातंत्र्यप्रिय देशांत कविकुलगुरूंनीं वर्णिलेल्या यक्षायुष्याप्रमाणें आनंदांत विहार करणारे जीव सांपडतात, तरी स्वतंत्र्यप्राप्तीपूर्वींचा सुखास्वाद त्यांना पारखा झालेला असतो. पारतंत्र्यांत झगडून झगडून स्वातंत्र्यप्राप्ति करून घेण्यांतच जो आनंद असतो तो त्या जीवांना काय ठाऊक !! भगवद्भक्त तुकाराम महाराजांना मोक्षापेक्षां दुःखांतच होणारें " हरिपादसेवनच " जास्त प्रिय होतें, हें त्यांच्या भगवंताजवळील मागणीवरून तेव्हांच ध्यानीं येतें. तेव्हां परवशता ही जरी तिखट सुरी आहे, तरी सुरीखालीं वावरणाऱ्या जीवाचेंच महत्त्व जास्त आहे व म्हणूनच स्वतंत्र देशांतील नामांकित मनुष्यापेक्षां परवशतेंतील हालांत होरपळून आपली प्रभा फांकविणाऱ्या मनुष्याचाच महिमा मोठा असतो. अशा मनुष्याची प्रत्येक गोष्ट जनतेला प्रिय होते व अशा मनुष्यावरून जीव ओंवाळून टाकण्यास जनता सदैव तत्पर असते. या भारतभूमींत–परवशतेच्या गर्तेंत रुतलेल्या भारतभूमींत–जीं अनेक रत्नें मायभूमीला प्रकाशित करण्याला कारणीभूत झालीं त्यांत लोकमान्य टिळकांची गणना पहिल्या प्रतींत केली पाहिजे. महाराष्ट्राला तर ते ललामभूत पुढारीच आहेत–होते–इतकेंच नव्हे तर लोकमान्य म्हणजे महाराष्ट्राचा कलिजाच असें म्हटलें तरी सुद्धां तें खुलूनच दिसेल. तेव्हां महाराष्ट्राच्या या कलिजा-प्राणाचे गोडवे सर्व प्रकारें गावे, असें वाटलें तर ते महाराष्ट्रीयांस शोभेसेंच आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. परदेशांत कोणत्याहि कां करणानें होईना थोडा प्रसिद्ध मनुष्य झाला कीं, त्याचेविषयीं अनेक ग्रंथ निर्माण होतात, अनेक नाटकें व कादंबऱ्या लिहिल्या जातात, त्याच्या प्रत्येक विषयावरील मतांची छाननी केली जाऊन त्यांत

ग्राह्याग्राह्य कोणतें हें ठरविलें जातें ! मग आमच्या जगद्वंद्य पूज्य लोकमान्यांच्या चरित्रावर प्रकाश पाडणारीं कांहींच कां पुस्तकें लिहिलीं जाऊं नयेत ? लोकमान्यांसारख्या अद्वितीय मनुष्याचीं-शिव-रामदासांप्रमाणेंच-एक दोन सुद्धां चरित्रें लिहिलीं जाऊं नयेत काय ? हजारों ग्रंथ निर्माण झाले पाहिजेत व ते कालौघांत होतीलहि. आज ज्या हिंदुधर्माच्या पायावर भारत जगला व ज्या धर्मासाठीं लोकमान्यांनीं अट्टाहास करून हिंदुधर्माविषयींचीं आपलीं मतें जाज्वल्य ठेविलीं, त्या धर्माविषयीं लोकमान्यांचीं मतें कशीं होतीं, याचा विचार प्रस्तुत आपणांस कर्तव्य आहे. परंतु व्यक्तीविषयीं जरूर त्या भावनांना प्रथम वाव देऊन नंतर लोकमान्यांच्या धार्मिक मतांकडे वळणें श्रेयस्कर वाटल्यावरून वरील उपोद्घात केला; आतां आपण आपल्या विषयाकडे वळूं.

## आलोचन

लो० टिळकांच्या धार्मिक मतांचा विचार करण्याचे आधीं लोकमान्यांनीं आपल्या धार्मिक मतांची दिशा कशी ठरवून ठेविली होती, याची अंधुक कल्पना येणें अत्यंत जरूर आहे. त्या योगानें लोकमान्यांचीं जीं कांहीं कांहीं मतें अगदीं सुधारकासारखीं दिसतात, त्यांचा खुलासा होईल व लोकमान्यांविषयींचा गैरसमज डोकावणार नाहीं. प्रथमतः लोकमान्यांच्या धार्मिक मतांच्या कक्षेंत दोन गोष्टींचा मुख्यत्वेंकरून समावेश होतो. तो म्हणजे इतरांप्रमाणें केवळ ‘ जुनें तेंच सोनें ’ म्हणून कवटाळून बसणारे ते नव्हते किंवा नव्याचा विनाकारण उदो उदो करणारेहि नव्हते. इतकेंच नव्हे, पण जर धर्मात केलेल्या सुधारणेमुळें पूर्वकालीन आचारविचारांना विनाकारण धक्का बसत आहे असें त्यांना वाटलें, तर ती सुधारणा ते केव्हांहि होऊं देत नसत. पूर्वजांनीं घालून दिलेले आचार, विचार व संस्कार कांहीं विवक्षित हेतूनींच त्यांनीं घालून दिलेले आहेत असा त्यांचा दृढ समज होता, व म्हणूनच त्या आचारांची किंवा संस्कारांची अवहेलना करणाऱ्यावर ते सपाटून कोरडे ओढीत असत. जाज्वल्य धर्माभिमान हा त्यांचा मोठा गुण होता. तरी पण विचारी असून कट्टे धर्माभिमानी असल्यामुळें जुन्या लोकांच्या प्रेमाला ते कांहीं दिवस पारखे झाले, इतकेंच नव्हे तर जुने लोक त्यांना शत्रु समजून त्यांच्यावर आघातहि करीत. पंचहौद-मिशन प्रकरण हें तर पुराणमताभिमानी लोकांनीं लोकमान्यांवर उठविलेल्या काहूराचें अत्युत्कृष्ट उदाहरण होय. लोकमान्यांत जर कोणत्याहि पक्षावर वजन पाडण्याची जबरदस्त शक्ति असली तर ती संस्कृत भाषेचें अगाध ज्ञान, मार्मिकता हीच होय. मोठमोठ्या पाश्चात्य विद्वानांना जर त्यांनीं तोंडांत बोटें घालावयास लाविलीं असतील तर त्याचें कारण त्यांचें गीर्वाणभाषेचें ज्ञानच होय यांत शंका नाहीं. गीर्वाणभाषेचें ज्ञान व अचाट बुद्धिमत्तेमुळें त्या भाषेंतील सार ग्रहण करून साकल्यानें जनते-

पुढें मांडण्याची त्यांची शैली यामुळें त्यांना अत्यंत मान मिळे व यामुळेंच त्यांची कोणतींहि मतें लोकांना पटत. पुराणमताभिमानी जनतेचा संस्कृत भाषेवर अत्यंत लोभ !! इतका कीं, संस्कृतांत अमुक एक ठिकाणीं अमुक अमुक सांगितलें आहे, असें कोणी सांगितलें कीं जनता त्यावर विश्वास ठेवी. इतर सुधारणावादी धर्मसुधारणेचा डंका जेव्हां जनतेपुढें मांडीत त्या वेळीं त्यांत पाश्चात्य तार्किकता व उपयुक्ततावाद भरलेला असल्यानें त्यांच्या बोलण्यांत किंवा लिहिण्यांत कांहीं चांगला भाग असूनहि जनतेला ते तिरस्करणीय वाटत असत. परंतु लोकमान्यांचे–महाराष्ट्राच्या कलिजाप्राणाचे–मात्र तसें नसे. ते जेव्हां जेव्हां धार्मिक किंवा सामाजिक सुधारणेसंबंधानें बोलत तेव्हां तेव्हां श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं टिळकांच्या चरित्रांत वर्णन केल्याप्रमाणें ते " शास्त्रांतच बसत आणि शास्त्रांतच उठत, " यामुळें जनतेला लोकमान्यांचा विश्वास पटे. कारण साधारणतः नवीन सुशिक्षित मंडळी आपल्या स्वतंत्र ज्ञानाच्या व विचाराच्या घमेंडींत जुन्या शास्त्रांना लाथाडीत–निदान असें वर्तन ठेवीत कीं, साधारण जनता त्यांना अट्टल नास्तिकांत गणीत असे. जुने आचार वेडगळपणाचे आहेत म्हणून ते जुन्या मंडळींची टवाळी करीत. यामुळें हजारों वर्षांच्या संस्कारांना एकदम धक्का बसल्यानें सुधारणावादी, जुन्यांचे मित्र होण्या-ऐवजीं कट्टे शत्रू बनले. लोकमान्यराजाचें तसें नव्हतें. शास्त्रविधि व आचार यांचें मार्मिक परीक्षण करून त्यांत ग्राह्यच अधिक आहे, असें ते प्रतिपादीत व शास्त्रांचा अर्थ लोकांपुढें विशद करून मांडीत, या योगानें जनतेला ते प्रिय झाले. जुन्या नव्याची–जुन्याला मान देऊन जुन्या आचारांचें महत्त्व वर्णन करून–सांगड घालण्याचा त्यांनीं यत्न केला, व त्यांच्या पुराणमताभिमानामुळें, हिंदुधर्माविषयींच्या अलोट प्रेमामुळें, जुने त्यांना मिळाले व युक्तिवाद आणि कोटिक्रम करून सुधारणा कशी असावी हें दाखविल्यामुळें नवे त्यांना सहाय्यक बनले. अशा तऱ्हेची त्यांची विचारदिशा असल्यानें ते जुन्यांना व नव्यांना दोघांनाहि प्रियच झाले.

## सप्रमाण मतविवेचन

आतां अत्यंत महत्त्वाचा मुद्दा व प्रस्तुत निबंधाचा गाभा जो लोकमान्यांचें मत–दिग्दर्शन त्याकडे वळूं. धार्मिक व सामाजिक या मतांचा घोंटाळा न करितां प्रथम त्यांचे धर्म–विचारच सप्रमाण मांडण्याचा माझा विचार आहे, व तदनंतर सामाजिक व धार्मिक या मतांचा विचार करून सामान्य समालोचनांत एकंदर मतांची अनुयायित्वाच्या दृष्टीनें छाननी करावी अशी मनीषा आहे. असो, तेव्हां कांहीं ठोकळ मुद्दे घेऊन त्यांविषयीं लोक-मान्य काय म्हणतात यांचीं प्रमाणें त्यांच्याच भाषेंत देणें बरें. त्या योगानें लोकमान्यांच्या धार्मिक मतांबद्दल असलेली लोकाकांक्षा तृप्त होईल.

## मूर्तिपूजा

इंग्रजी शिक्षणानें बेहोष झालेले लोक प्रथम प्रथम सगुणोपासनेला वेडांत काढूं लागले. सुशिक्षित म्हणविणाऱ्यांच्या मनावर खिश्चन धर्मप्रसारानें जास्त परिणाम होऊन निराकार परमेश्वराचे भक्त म्हणून ते मिरवूं लागले व प्रार्थना-समाजासारखे जुजबी समाज त्यांनीं स्थापन केले. मूर्तिपूजा हें वेड आहे, त्यांत कांहीं अर्थ नाहीं, अशा प्रकारची भावना खिश्चन मिशनरी पसरवून देतच होते; त्यांत या वाघिणीच्या दुधानें उंडारलेल्या सुशिक्षितांची भर पडली व जो तो सुशिक्षित मूर्तिपूजेला पागलपणांत काढूं लागला. पण तितक्यांत बंगाल्यांत स्वामी विवेकानंद, बाबाभारती वगैरे गृहस्थांनीं साकार परमेश्वराची भक्तीच शक्य व श्रेष्ठ आहे, या मताचें प्रवर्तन केलें. लोकमान्य टिळकहि साकार परमेश्वराचीच भक्ति असावी या मताचे कट्टे पुरस्कर्ते होते. सन १९०२ सालीं डॉ. गर्दे यांचे श्रीगणेशोत्सवांत व्याख्यान झालें, त्या वेळीं अध्यक्ष या नात्यानें लोकमान्यांनीं खालील विचार प्रगट केले.

"प्राचीन कालीं चंद्र, सूर्य, वायु, अग्नि, मेघ वगैरेंची उपासना सुरू होती; व पुढें मुख्य ईश्वर एक असून वरील देवता ह्या त्याच्या निरनिराळ्या विभूति समजल्या गेल्या. पुढें ह्या देवतांचीं आयतनें झालीं. अगस्ति ऋषींच्या आश्रमांत राम गेले असतां त्यांनीं अग्नि वगैरेंचीं स्थानें पाहिलीं. त्यावरून रामायण-कालींहि देवायतनें होतीं हें सिद्ध होतें. मनुस्मृतींतहि देवालयांचा उल्लेख आहे। इतर राष्ट्रांतहि फार प्राचीन कालापासून मूर्तिपूजा आहे. इजिप्तमध्यें पांच हजार वर्षांपूर्वीं बांधलेलें सूर्याचें देवालय आहे. महंमद व येशू खिस्त यांचे अनुयायी मूर्तिपूजक नाहींत, तरी पण एका तऱ्हेनें पाहिलें तर ते सुद्धां मूर्ति-पूजकच आहेत असें म्हणावें लागतें. वेदकाळीं सर्व विश्व हें ईश्वराचें शरीर व त्याची उपासना करणें म्हणजेच त्याकालीं मूर्तिपूजा करणें होय. भगवद्गीतेंत श्रीकृष्णांनीं अर्जुनास विश्वरूप दाखविल्याचा उल्लेख आहे; तसाच पुरुषसूक्तांत व अरण्यकांतहि आहे. मूर्तिपूजेला "प्रतीक" असें नांव उपनिषदांत आहे. प्रतीक याचा अर्थ प्रतिनिधि. म्हणजे सर्व विश्व आपल्या डोळ्यांपुढें ठेवतां येत नाहीं म्हणून त्याचा एक भाग आपल्या डोळ्यांपुढें ठेवावयाचा, व अशा रीतीनेंच मूर्तीची कल्पना आली. व्हाइसराय हे जसे बादशहा नव्हेत, पण बादशहांचे प्रतिनिधि आहेत, तसे ईश्वराच्या सर्वव्यापी स्वरूपाची मूर्ति ही प्रतिनिधि आहे. मूर्तिपूजेंत कांहीं सूचक चिन्हेंहि आहेत. जुन्या पैशावरील तराजू हें जसें ईस्ट इंडिया कंपनीचें चिन्ह आहे, तसेंच विष्णूच्या हातांत चक्र ठेविलें आहे, तेंहि त्याच्या हातांत कालचक्र फिरत आहे त्याचें दर्शक आहे. मूर्ति ईश्वराचें चित्र किंवा प्रतीक आहे, अशी खात्री झाल्यावर मूर्तिपूजा करण्यांत कांहीं पातक नाहीं...... "

" पूर्वजांनीं जें केलें तें जर आपणांस समजत नाहीं तर त्यांना वेडे म्हणण्यापेक्षां आपणच वेडे आहोंत असें म्हटलें पाहिजे. मूर्तीबद्दल ग्रंथांतून सोपपत्तिक विवेचन आहे. प्रत्येक मूर्ति अथवा देव श्रेष्ठ असें तो तो भक्त म्हणतो, याचें कारण तो तें तें ईश्वराचें स्वरूप पूर्ण समजतों हें होय......हल्लींचा काळ असा आहे कीं, कांहींना माणसाचे पुतळे चालतात पण देवाचे चालत नाहींत. मूर्तिपूजेबद्दल लोकांचा गैरसमज हळू हळू दूर होत चालला आहे, व परराष्ट्रांतहि या गोष्टीचें शास्त्र म्हणून अध्ययन होत आहे. ज्या हिंदुधर्मांत आपण वाढलों त्याचें तर या गोष्टींचा विचार करण्याचें कर्तव्य आहे. "

ता. ५ फेब्रुवारी १९०८ रोजीं पुणें येथील सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत बाबू देवेंद्रनाथ सेन एम्. ए. या गृहस्थांचें " भक्ति " या विषयावर जें व्याख्यान झालें, त्या वेळीं अध्यक्ष या नात्यानें लोकमान्य टिळकांनीं जें भाषण केलें त्यांत सुद्धां भक्तीचें वर्णन करितांना मूर्तिपूजेचें महत्त्व वर्णन केलें आहे. मूर्तींच्या भिन्नत्वामुळें परंतु एकेश्वरी भावामुळें आमच्या धर्मांतील भक्तिप्रभाव किती उच्च दर्जाचा आहे हें वर्णन करितांना लोकमान्य म्हणतातः—

" भक्ति ही भावना व तिचा विषय हीं इतर धर्म कायम करतात. आमच्या धर्माप्रमाणें कृष्ण, गणपति वगैरेंवर आम्ही सारखाच विश्वास ठेवितों. ही बुद्धि उत्पन्न होणें, जगांतील कर्तव्यें या तत्त्वांत लीन होणें हें खऱ्या भक्तीचें तत्त्व आहे. " अशा तऱ्हेनें मूर्तिपूजेविषयीं लोकमान्यांचें किती विचारशील व पवित्र विचार आहेत, हें दिसून येईल.

## संस्कार व आचार

आमच्या हिंदुधर्मांत जीं आचाराचीं अनेक अंगें आहेत, त्यांकडे तिरस्कारानें न पाहतां पूज्य बुद्धीनें पाहणें अत्यंत अवश्य आहे. स्नानसंध्या, वर्णाश्रमधर्म इत्यादीविषयीं थट्टा करणारे आमच्यांत फारच लोक आहेत, त्यांच्यावर लोकमान्यांचा रोष आहे. संस्कार हे अज्ञानमूलक आहेत इत्यादि विचार ज्यांचे मनांत घोळतात त्यांना हिंदुधर्माचें रहस्यच समजलें नाहीं असें लोकमान्यांचें ठाम मत होतें. त्यांच्या मतें अशा मताचे लोक केवळ पाखंडी बनतात व प्रत्येक बाबतींत त्यांचें 'कां व कसें' सुरू होतें व शेवटीं त्यांच्या समोर निश्चित असें कोणतेंच ध्येय उरत नाहीं. अमक्या धर्मांत अमकें चांगलें आहे, तमक्या धर्मांत तमुक वाईट आहे, तेव्हां चांगलें तें घ्या व वाईट तें टाका अशी या पाखंडी लोकांची स्थिति होऊन प्रार्थनासमाज, ब्रह्मोसमाजासारखे भेसळ समाज उत्पन्न करून हे लोक तोंडघशीं पडतात असें लोकमान्यांचें मत होतें. ज्या विधींना, ज्या हिंदुधर्मांतील संस्कारांना व आचारांना हे सुशिक्षित सुधारक नांवें ठेवितात ते विधि, संस्कार हे वास्तविक हिंदुधर्माचें जीवन होत, एवढेंच नव्हे

तर विधि, संस्कार व आचार हें त्या त्या धर्मांच्या वैशिष्ट्याचें एक लक्षण आहे व या लक्षणाचा त्याग करणें म्हणजे देशस्थिति व लोकस्थिति यांविषयीं अज्ञान प्रगट करून राष्ट्रीय जीविताला धक्का आणण्यासारखें आहे, असें लोकमान्यांचें स्पष्ट मत होतें. सन १९०४ सालीं झालेल्या गणेशोत्सवांतील एका व्याख्यानांत आपले सुंदर विचार लोकांपुढें मांडले त्यावरून त्यांचीं मतें स्पष्ट होण्यासारखीं आहेत, म्हणून त्या व्याख्यानाचा तुटक तुटक भाग मी खालीं देतों.

" कोणत्याहि देशांत सामान्य जनसमूह धर्माचरण केवळ विश्वासानें व श्रद्धेनेंच करतो. धर्मग्रंथांचें विचारपूर्वक परिशीलन करून धर्माची जागृति करणें, त्याचें संरक्षण करणें किंवा त्याची **परंपरा कायम राखून** त्यास योग्य वळण देणें हीं कामें सर्वत्र व सर्व काळीं सुशिक्षितांचींच आहेत....पण आमच्यांतील नवे सुशिक्षित पहावे तर त्यांचा निराळाच पंथ. त्यांस श्रुतिस्मृत्यादिकांचा व संस्कारकर्मांचा धर्म कुचकामाचा वाटला व पंढरपूरचे यात्रेकरूंचा भक्तिपंथहि वेडगळ वाटून सुशिक्षितांची पहिली पिढी संशयवृत्ति (sceptics) बनली. या लोकांची " संशयात्मा विनश्यति " अशीच शेवटीं स्थिति झाली. पुढें कांहीं कालानें पूर्वसंस्कारांचें प्राबल्य व पगडा बसून, ईश्वर म्हणून कोणी आहे, तो सर्वशक्तिमान् असून आपण पंगू आहों, त्याची उपासना करणें जरूर आहे, इतकें त्यांस वाटावयास लागलें. पण एकदां धिःकारलेल्या हिंदुधर्मांत येण्याची त्यास लाज वाटूं लागली. तेव्हां सर्व धर्मांतील सार घेऊन त्यांनीं प्रार्थनासमाजादि पंचरसी नवे धर्म बनविले. पण एकंदरींत या मंडळींनीं धर्माच्या परंपरेचा उच्छेद केल्यामुळें बहुजनसमाजापासून हे दूर राहून जास्तच फाटाफूट झाली."

" थोडेसें शिक्षण मिळवून नौकरींत शिरलेल्या वर्गास धर्मशिक्षण मिळण्याची संधीच नव्हती. हिंदुधर्माचें नांवहि त्यांच्या कानावर विशेषसें येताहि नव्हतें. आलें तर तें मिशनरी वगैरे शाळांतून परधर्मांचेंच येत असे. यामुळें हा वर्ग उदासीन व श्रद्धाहीन बनला. मात्र शेतकरी, कारागीर, व्यापारी या वर्गानें आपली धर्मपरंपरा कायम ठेविली. परमविरक्त, निर्लोभ व महाभगवद्भक्त अशा साधुसंतांनीं घालून दिलेला मार्ग आपल्या ऐहिक व पारलौकिक कल्याणाचा अशा दृढ श्रद्धेनें त्यांनीं तो आजपर्यंत अव्याहत कायम ठेवला आहे...... मिशनरी वगैरे लोक धर्मप्रसाराकरितां केवढा उद्योग करतात, कोणत्या संस्था स्थापतात, ते कसा मोह घालतात, भुरळ पाडतात व लालूच दाखवितात हें सर्वांस माहीत आहेच. परधर्मीयांचा हा कट्टा प्रयत्न व आमची उदासीनता यांमुळें सांप्रत धर्मास कोणी त्राता नाहीं. धर्मावर संकटें कोणतीं आलीं आहेत, हल्ले कोठून येत आहेत, या धर्माचें स्वरूप काय, त्याचें खंडण करितांना धर्माच्या मांडणींत कोणता फरक केला पाहिजे, धर्मजागृति करून ( सुशिक्षित,

नोकरवर्ग, व्यापारी व शेतकरी ) या तीन वर्गांचा मिलाफ कसा होईल या सर्वांचा विचार करून उपाय योजणें हें सुशिक्षितांचेंच कर्तव्य आहे......."

वरील ओजस्वी विचारसरणीवरून विधि, संस्कार आणि आचार यांविषयीं लोकमान्यांच्या मनांत किती आदर व पूज्यभाव वास करीत आहे हें दृग्गोचर होतें; तसेंच हृदयाची कळकळ व सुशिक्षितांचें कर्तव्य कोणतें याविषयींचे त्यांचे जळते विचार किती मननार्ह आहेत हें दिसून येतें. लोकमान्य स्वतां जरी कडक सोंवळ्यांत वावरणारे आजोबा दिसत नव्हते, तरी धर्मावरील पूर्ण श्रद्धेमुळें ते लोकसंग्रहाची मर्यादा कधींहि ओलांडून जात नसत. प्रत्येक संस्काराच्या मुळाशीं विशिष्ट हेतु असून तो धार्मिक संस्कार पाळलाच पाहिजे असें त्यांचें कडक मत होतें, व म्हणूनच प्रायश्चित्तासारखीं कृत्यें त्यांनीं मोठ्या आनंदानें व बिनबोभाट केलीं. राजकारणांतील कार्यव्यापृतत्वामुळें, व तत्त्वविचारांचा कर्माचरणावर परिणाम होऊन ज्ञान्याची कर्माबद्दल अनास्था होते, तशीच त्यांची कर्माबद्दल अनास्था दिसून येत असल्यामुळें ते प्रत्यक्ष कडक आचार पाळणारे दिसले नाहींत, तरी पण प्रत्येक आचार आस्थेनें पाळलाच पाहिजे असें त्यांचें मत होतें, हें वरील उद्धृत केलेल्या त्यांच्या विचारांवरून दिसून येईल.

## राष्ट्रप्रगति व धर्मशिक्षण

राष्ट्राच्या प्रगतीला धार्मिक शिक्षणाची अत्यंत जरूर आहे, असें लोकमान्यांचें ठाम मत आहे. आमचा धर्म दीर्घोद्योग, सहिष्णुता स्वार्थत्याग इत्यादि तत्त्वें उत्तम रीतीनें शिकवितो व आमच्या राष्टीय चळवळीला धर्माचा टेका असल्यावांचून राष्ट्रीय प्रगति अशक्य आहे. धार्मिक शिक्षणामुळें एक प्रकारचें मनोधैर्य मनुष्याच्या अंगांत येतें, व एक प्रकारचा दृढ विश्वास व अभिमानहि मनुष्याच्या मनांत उत्पन्न होतो आणि दृढनिश्चय, अभिमान व भरंवसा आणि या भरंवशास योग्य अशा तऱ्हेचा उद्योग कळकळीनें करण्याची इच्छा किंवा उमेद आणि संवय असल्याखेरीज सुधारणेचें कार्य होणें शक्य नाहीं. लोकमान्य ता. ५ मे १९०३ च्या केसरींत लिहितात.

" जोंपर्यंत मिशनरी लोकांप्रमाणें स्वार्थत्याग करून कळकळीनें समाजास पोटाशीं धरण्याचें काम करण्यास कोणीहि सुधारक तयार नाहीं, जोंपर्यंत समाजांत जो धर्म प्रचलित आहे त्यावर त्यांचा विश्वास नाहीं, तोंपर्यंत केवळ न्यायमीमांसेच्या जोरावर ' यंव चांगलें आहे, त्यंव चांगलें आहे ' असें मुखानें वर्षास एकदां उद्गार काढून आपलें कर्तव्य आपण केलें असें म्हणून तो आपलें समाधान करून घेत आहे, तोंपर्यंत त्याचें किंवा सुधारणेचें पाऊल कधींहि पुढें पडणार नाहीं. " सुधारकवर्ग सुधारणा करण्याचा डंका पिटतो व आम्ही राष्ट्राची प्रगति करूं अशी द्वाही फिरवितो ही गोष्ट खरी. परंतु मूळ जो धर्म

त्या धर्माकडे तो वर्ग मुळींच लक्ष देत नाहीं, आपल्या धर्माचें अध्ययन करीत नाहीं, एवढेंच नव्हे तर ज्या जनसमाजांत जागृति करावयाची त्या जनसमाजाचा धर्म लाथाडण्यासहि तो कमी करीत नाहीं. आपल्या सुधारणांच्या आड धर्म आला तर सुधारकवर्ग त्याला बिनदिक्कत दूर लोटून देतो. अशा रीतीनें जें करायला हवें तें न करितां उंध्या मार्गानें तो वर्ग जातो, त्यामुळें राष्ट्रप्रगतीस धक्काच पोंचतो. लोकमान्य म्हणतात—

" मिशनरी लोकांनीं जागोजाग ख्रिस्ती संस्था स्थापन करून हिंदु लोकांस ख्रिस्ताच्या कळपांत ओढण्यासाठीं ते जारीनें यत्न करीत आहेत, व दुष्काळ हा आम्हांस सहाय्य करण्याकरितांच आकाशांतील बापानें पाठविला, असेंहि सर्वांनीं कृतीनें व कांहींनीं कंठरवानें जगास जाहीर केलें आहे. ही स्थिति हिंदु-धर्माच्या दृष्टीनें शोचनीय आहे, याबद्दल कांहीं मतभेद असेल असें आम्हांस वाटत नाहीं. पण विधवाविवाहाकरितां जितकी ओरड होते तितकी ओरडहि या बाबतींत होत नाहीं; मग उद्योग कोठला ? उलट सर्व देश ख्रिस्ती झाला तर बरेंच होईल, असें मानणारे हल्लींच्या सुधारकवर्गाच्या पुढाऱ्यांत कांहीं लोक आहेत. अशा लोकांनीं सामाजिक सुधारणेबद्दल केलेली ओरड लोकांस ग्राह्य न झाल्यास त्यांत लोकांचा तरी काय दोष ?" ( केसरी, जानेवारी १९०४).

१९०८ सालांतील लोकमान्यांचीं व्याख्यानें वाचलीं तर सहज दिसून येतें कीं, त्यांचा धर्मश्रद्धेवर अत्यंत जोर असे व धर्माशिवाय तरणोपाय नाहीं, असेंच ते कंठरवानें सांगत. तेव्हां राष्ट्रीय प्रगतीला धर्मशिक्षण अत्यंत अवश्य आहे, एवढेंच नव्हे तर धर्मशिक्षणानें देश फुलविल्यावांचून राष्ट्रप्रगतीचा उत्सव साजरा होणें शक्य नाहीं, असेंच त्यांचें मत होतें. एका व्याख्यानांत तर कळवळून लो. टिळक म्हणतात, " आपली स्थिति विपन्न आहे. परमेश्वर आणि धर्म याशिवाय आम्हांला कोणी त्राता नाहीं !! "

## धर्मैक्य

हिंदु-संघटनाचा जो ध्वनि सांप्रत आपल्या कानां कपाळीं येऊन आदळतो आहे व ज्याकरितां आपण झटलें पाहिजे म्हणून आपण जागें झालों आहोंत, ती गोष्ट लोकमान्यांनीं २० वर्षांपूर्वींच ओळखली व केसरींतून त्याची घोषणाहि त्यांनीं केली. राष्ट्राची उन्नति होण्यास धर्मोन्नति अत्यंत आवश्यक आहे ही गोष्ट खरी, परंतु ती धर्मोन्नति होण्यास धर्मैक्याची अत्यंत जरूर आहे असेंच त्यांचें मत होतें. आतां धर्मैक्य म्हणजे सर्व धर्मांचा लोप करून एक सबगोलंकार धर्म तयार करणें असा जर कोणी अर्थ समजत असतील तर तो लोकमान्यांच्या मतानें चुकीचा व या हिंदुस्थानांत अशक्य कोटींतला आहे. " स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावह " ही वृत्ति तर हवीच, परंतु स्वधर्माभिमान व परधर्म-

सहिष्णुता या दोन गोष्टी जर पाळल्या तर हिंदुस्थानांत धर्मैक्य होण्याला वाव आहे, असें लोकमान्यांचें मत होतें. हिंदुस्थानांत ¾ लोक हिंदुधर्माचे आहेत, तेव्हां तो समाज वाळूच्या कणाप्रमाणें विस्कळित न ठेवतां, निदान एवढ्या मोठ्या समाजानें तरी स्पृश्यास्पृश्य इत्यादि पंथभेद विसरून धर्मैक्य करण्यास अवश्य झटलें पाहिजे. १९०४ सालांतील एका व्याख्यानांत लोकमान्य म्हणतात, "नुसती हिंदुधर्माचीच जागृति केली, तर त्याबरोबर इतर धर्माबद्दल तिरस्कार वाटेल, व त्यामुळें राष्ट्रैक्याचा विघात होईल, राष्ट्रैक्य होण्यास सगळे धर्म लोपले पाहिजेत किंवा एक धर्म तरी झाला पाहिजे, असें म्हणणारी अजूनहि कांहीं मंडळी आहेत. पण धर्माचा नायनाट करून व सर्व समाज धर्मशून्य बनल्यामुळें राष्ट्रैक्य किंवा राष्ट्रोन्नति झाल्याचें जगांत एकहि उदाहरण नाहीं. दुसरें असें कीं, हिंदुस्थानांतील विद्यमान सर्व धर्म जाऊन एक धर्म होणें शक्य मानणेंच वेडेपणाचें आहे. शिवाय धर्म एक असूनहि समाजाचे तुकडे पडतात हें पाहणें असेल, तर युरोपखंडांतील राष्ट्रांकडे पहावें. इतर धर्माबद्दल द्वेष व विरोध वाढूं न देतां हिंदुधर्माची जागृति व उन्नति करून हिंदुधर्माचा मिलाफ करतां येणें शक्य आहे. हिंदुस्थानांतील मोठ्या जनसमूहाचें ऐक्य करण्यास हें एक मोठेंच साधन आहे."

धर्मैक्याची आवश्यकता सिद्ध केल्यानंतर तें ऐक्य कसें घडवून आणतां येईल, यासंबंधींचे त्यांचे विचार मनन करण्यासारखेच आहेत. बडोदें येथें भरलेल्या एका जैन श्वेतांबर परिषदेंत त्यांनीं जें भाषण केलें, त्यांत ते म्हणतात "जैन लोकांचें तत्त्वज्ञान जरी आमच्या प्रचारांत नसलें, तरी जैन लोकांच्या अहिंसादि आचारांची छाप आज ब्राह्मणधर्मावर पूर्णपणें बसलेली आहे.......जैन धर्मांत वेद प्रमाण मानीत नाहींत हें खरें, परंतु त्याचें कारण श्रौतधर्मांतील हिंसा होय, वैदिक धर्मपरंपरेबद्दल अनास्था नव्हे ही गोष्ट आम्ही लक्षांत बाळगिली पाहिजे....... जैन धर्म जरी वैदिक धर्माहून भिन्न असला तरी त्यांतील भेद खिस्ती धर्मांतील एस्टाब्लिश्ड चर्च (प्रस्थापित खिस्ती धर्म) आणि डिसेंटर्स किंवा नॉनकन्फरमिस्ट (प्रस्थापित झालेल्या धर्माहून भिन्न) या दोन भेदांप्रमाणें राष्ट्रीय दृष्ट्या गौण आहे. दोन्ही धर्म एकाच शरीराचे डावा उजवा हात आहेत; व दोघांसहि पसंत असलेल्या अहिंसादि तत्त्वांचा जगभर प्रसार करण्याचें काम जर एक विचारानें दोघेहि हातांत घेतील, तर अहिंसा धर्माची ध्वजा पृथ्वींतील सर्व राष्ट्रांत उभी राहण्यास कोणतीहि हरकत येणार नाहीं." धर्मैक्यासंबंधानें भाषण करितांना लोकमान्यांनीं १९०५ सालीं वल्लभ सांप्रदायी गोस्वामी श्रीगोकुळनाथजी हे आले असतां (पुणें येथें) त्यांचा उपदेश ऐकण्यासाठीं जे लोक जमले होते, त्या वेळीं खालील विचार प्रगट केले.

" आमच्यांत शंकराचार्य, मध्वाचार्य, रामानुजाचार्य व वल्लभाचार्य अशांचे निरनिराळे चार पंथ जरी असले, तरी प्रत्येकाला वेद हे प्रमाण असून ईश्वर-प्राप्तीचें मुख्य साधन उपासना किंवा भक्ति आहे, हें कबूल आहे. या चारहि पंथांचें ऐक्य होण्याला या दोन गोष्टी फार चांगल्या आहेत. वेदप्रामाण्य हा बुडखा व भक्ति हा जीव धरला तर वर किती जरी शाखा किंवा फांद्या फुटल्या तरी त्यांत भेद मानण्याचें कांहीं कारण नाहीं. मला वाटतें, एका सांप्रदायांतील लोकांच्या धर्मगुरूनें दुसऱ्या सांप्रदायांतील लोकांना उपदेश केल्याचें निदान माझ्या आठवणींत पुण्यास तरी हें पहिलेंच उदाहरण आहे. धर्माच्या बाबतींत जी लोकांची उदासीनता दिसून येते किंवा मतभेद व संशय वाढत असतात, ते नाहींसे होऊन निरनिराळ्या पंथांचें ऐक्य करण्यास असे प्रसंग फार उपयोगी पडत असतात." ऋग्वेदी, यजुर्वेदी यांच्यांतहि ऐक्य घडवून आणणें शक्य आहे, कारण " वेद तेथून एक आहे. कोणत्याहि याज्ञिकांत एका वेदाच्या मंत्रावर काम भागत नाहीं; तर इतर वेदांच्या मंत्रांची गरज लागते. ऋग्वेद्यांनीं यजुर्वेद्यांचा व यजुर्वेद्यांनीं सामवेद्यांचा द्वेष करणें चांगलें नाहीं. ऋग्वेद, यजुर्वेद वगैरे चार शाखांची मिळून एक वेदशाळा कां निघूं नये, हें समजत नाहीं " असेंहि लोकमान्य टिळकांनीं एकदां सुचविलें होतें. यावरून " धर्मैक्य करा, धर्मैक्य करा " अशी नुसती ओरड न करितां तें कसें करतां येईल याविषयीं बारीकसारीक गोष्टींत सुद्धां लक्ष घालून त्यांत विधायक सूचना करण्यांत ते आपली बुद्धि खर्च करीत असत, ही गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. धर्माचा अभ्यास करून एकदां आपलीं मतें बनवून टाकिल्यावर, एकहि वेळ, एकहि प्रसंग वायां जाऊं न देतां, आपल्या मतांचा प्रसार करण्याची हातोटी लोकमान्यांजवळ अजब होती यांत संशय नाहीं. कोणतीहि सभा होवो, कोणताहि लेखनाचा प्रसंग येवो, आपल्या धर्माविषयींच्या कल्पना सहिष्णुतेनें व व्यवहार्य रीतीनें बिंबवून देण्याचा प्रयत्न करण्यांत त्यांनीं कधींहि कसूर केली नाहीं. निरलसपणें आपल्या धर्माचा प्रसार करण्याची ही बुद्धि खरोखरच प्रशंसनीय होय. आपल्या धर्मैक्यासाठीं अमक्या ठिकाणीं मी कसा बोलूं ? ' मी मोठा ' ही कल्पनाच त्यांना शिवत नसे.

## विद्यार्थी व धर्मशिक्षण

शाळांमधून धर्मशिक्षण अवश्य दिलें पाहिजे. हिंदुस्थानांत अनेक धर्म असल्या-मुळें अमुक एका धर्माचेंच पुस्तक प्रिय होणार नाहीं ही गोष्ट जरी खरी आहे तरी हिंदुसमाज मोठा असल्यानें हिंदुधर्म–सिद्धांतांची ओळख तरी शाळांतून हिंदु मुलांना करून देणें अत्यंत महत्त्वाचें आहे, असें लोकमान्यांचें मत होतें. शिवाय धर्म जरी अनेक असले, तरी " जीं नवीं शास्त्रें निर्माण झालीं आहेत, त्यांच्या साहाय्यानें सर्व धर्मांतील तत्वांचें एकीकरण करून तत्संबंधीं कांहीं सिद्धान्त

काढतां येतील. तसेंच तुलनारूपानें सर्व धर्मांतील तत्त्वें कळूं लागल्यास विद्यार्थ्यांचा कांहीं थोडा फायदा होणार नाहीं," एकदां तर तात्यासाहेब केळकरांजवळ बोलतांना लोकमान्य टिळक म्हणाले कीं, "शाळेंत रसायन, ज्योतिष, पदार्थविज्ञान वगैरे शास्त्रें जशीं शिकवितात, तसेंच शास्त्र म्हणून धर्म कां शिकवीत नाहींत ? कॉलेजांत Political Economy, Trignometry, Chemistry हे विषय शिकवितात पण Theology ( ईश्वरविषयक ज्ञान अथवा धर्म ) कोणी शिकवीत नाहींत. हिंदुधर्मांतील सिद्धांत पुष्कळांना पसंत पडतील व ते शास्त्र म्हणून शिकविण्यास कांहीं हरकत नाहीं " आणखी एके ठिकाणीं ते म्हणतात "लहानपणीं कोंवळ्या अंतःकरणामध्यें सदाचार, स्वाभिमान व स्वधर्मनिष्ठा यांचें बीजारोपण झालें, तरच त्याचा मनुष्याचे वर्तनावर परिणाम होईल. यासाठीं शाळेंत धर्मशिक्षण जरूर असलें पाहिजे, तें देण्यास जरी अनेक साधनें आहेत, तरी शिक्षकांच्या वर्तनाचा कित्ता हें उत्कृष्ट साधन आहे."

मुंबई इलाख्याचे माजी शिक्षण मंत्री रँग्लर परांजपे यांनीं १९०४ सालीं 'East and West' मासिक पुस्तकांत हिंदुधर्मावर एक लेख लिहून "हिंदु धर्म म्हणजे एक वेडगळ समजुतचिा भारा आहे, म्हणून आमच्या शाळांतून धर्मशिक्षण देऊं नये," असें प्रतिपादन केलें होतें. त्याला लोकमान्यांनीं चोख उत्तर दिलें, ते म्हणतातः—

"जीव आणि परमेश्वर यांचा संबंध काय, तो संबंध राखण्याकरितां जीवाचें कर्तव्य कोणतें आणि जीवाची उन्नति होण्यास उपाय काय करावे इत्यादि धर्माचे जे गहन विचार आहेत आणि ज्यांचें हिंदुधर्मग्रंथांपेक्षां दुसऱ्या कोणत्याहि धर्मग्रंथांत अधिक उदात्त विवेचन केलेलें आढळत नाहीं, ते धर्मविचार व तीं धर्मतत्त्वें यांचा प्रिं. परांजपे यांच्या मनावर बिलकुल संस्कार झाला नसल्यामुळें धर्म म्हणजे कांहीं वेड्या समजुतींचा भारा यापलीकडे त्यांची समजूत गेलेली नाहीं; आणि हा त्यांच्या मनाचा ग्रह नीली ग्रहाप्रमाणें बळकट झालेला असल्यामुळें त्यांनीं आपले अप्रगल्भ व अपरिपक्व विचार जगापुढें मांडण्याचें साहस केलें आहे."

अशा तऱ्हेनें प्रतिपक्षाचें आपल्या ज्ञानाच्या विश्वासावर व जोरावर खंडण करून लोकमान्यांनीं धार्मिक शिक्षणाची सानपणापासून कशी आवश्यकता आहे, हें सिद्ध करून दाखविलें.

## धर्म आणि नीति

कित्येकांच्या मतें हा महत्त्वाचा प्रश्न असून प्रि. परांजप्यांसारखे लोक तर नीतीच्या पायावर धर्माची उभारणी आहे असें प्रतिपादन करतात. लोकमान्यांचें

" आमच्यांत शंकराचार्य, मध्वाचार्य, रामानुजाचार्य व वल्लभाचार्य अशांचे निरनिराळे चार पंथ जरी असले, तरी प्रत्येकाला वेद हे प्रमाण असून ईश्वर-प्राप्तीचें मुख्य साधन उपासना किंवा भक्ति आहे, हें कबूल आहे. या चारहि पंथांचें ऐक्य होण्याला या दोन गोष्टी फार चांगल्या आहेत. वेदप्रामाण्य हा बुडखा व भक्ति हा जीव धरला तर वर किती जरी शाखा किंवा फांद्या फुटल्या तरी त्यांत भेद मानण्याचें कांहीं कारण नाहीं. मला वाटतें, एका सांप्रदायांतील लोकांच्या धर्मगुरूनें दुसऱ्या सांप्रदायांतील लोकांना उपदेश केल्याचें निदान माझ्या आठवणींत पुण्यास तरी हें पहिलेंच उदाहरण आहे. धर्माच्या बाबतींत जी लोकांची उदासीनता दिसून येते किंवा मतभेद व संशय वाढत असतात, ते नाहींसे होऊन निरनिराळ्या पंथांचें ऐक्य करण्यास असे प्रसंग फार उपयोगी पडत असतात." ऋग्वेदी, यजुर्वेदी यांच्यांतहि ऐक्य घडवून आणणें शक्य आहे, कारण " वेद तेथून एक आहे. कोणत्याहि याज्ञिकांत एका वेदाच्या मंत्रावर काम भागत नाहीं; तर इतर वेदांच्या मंत्रांची गरज लागते. ऋग्वेद्यांनीं यजुर्वेद्यांचा व यजुर्वेद्यांनीं सामवेद्यांचा द्वेष करणें चांगलें नाहीं. ऋग्वेद, यजुर्वेद वगैरे चार शाखांची मिळून एक वेदशाळा कां निघूं नये, हें समजत नाहीं " असेंहि लोकमान्य टिळकांनीं एकदां सुचविलें होतें. यावरून " धर्मैक्य करा, धर्मैक्य करा " अशी नुसती ओरड न करितां तें कसें करतां येईल याविषयीं बारीकसारीक गोष्टींत सुद्धां लक्ष घालून त्यांत विधायक सूचना करण्यांत ते आपली बुद्धि खर्च करीत असत, ही गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. धर्माचा अभ्यास करून एकदां आपलीं मतें बनवून टाकिल्यावर, एकहि वेळ, एकहि प्रसंग वायां जाऊं न देतां, आपल्या मतांचा प्रसार करण्याची हातोटी लोकमान्यांजवळ अजब होती यांत संशय नाहीं. कोणतीहि सभा होवो, कोणताहि लेखनाचा प्रसंग येवो, आपल्या धर्माविषयींच्या कल्पना सहिष्णुतेनें व व्यवहार्य रीतीनें बिंबवून देण्याचा प्रयत्न करण्यांत त्यांनीं कधींहि कसूर केली नाहीं. निरलसपणें आपल्या धर्माचा प्रसार करण्याची ही बुद्धि खरोखरच प्रशंसनीय होय. आपल्या धर्मैक्यासाठीं अमक्या ठिकाणीं मी कसा बोलूं ? ' मी मोठा ' ही कल्पनाच त्यांना शिवत नसे.

## विद्यार्थी व धर्मशिक्षण

शाळांमधून धर्मशिक्षण अवश्य दिलें पाहिजे. हिंदुस्थानांत अनेक धर्म असल्यामुळें अमुक एका धर्माचेंच पुस्तक प्रिय होणार नाहीं ही गोष्ट जरी खरी आहे तरी हिंदुसमाज मोठा असल्यानें हिंदुधर्म–सिद्धांतांची ओळख तरी शाळांतून हिंदु मुलांना करून देणें अत्यंत महत्त्वाचें आहे, असें लोकमान्यांचें मत होतें. शिवाय धर्म जरी अनेक असले, तरी " जीं नवीं शास्त्रें निर्माण झालीं आहेत, त्यांच्या साहाय्यानें सर्व धर्मांतील तत्वांचें एकीकरण करून तत्संबंधीं कांहीं सिद्धान्त

काढतां येतील. तसेंच तुलनारूपानें सर्व धर्मांतील तत्त्वें कळूं लागल्यास विद्यार्थ्यांचा कांहीं थोडा फायदा होणार नाहीं," एकदां तर तात्यासाहेब केळकरांजवळ बोलतांना लोकमान्य टिळक म्हणाले कीं, "शाळेंत रसायन, ज्योतिष, पदार्थविज्ञान वगैरे शास्त्रें जशीं शिकवितात, तसेंच शास्त्र म्हणून धर्म कां शिकवीत नाहींत ? कॉलेजांत Political Economy, Trignometry, Chemistry हे विषय शिकवितात पण Theology ( ईश्वरविषयक ज्ञान अथवा धर्म ) कोणी शिकवीत नाहींत. हिंदुधर्मांतील सिद्धांत पुष्कळांना पसंत पडतील व ते शास्त्र म्हणून शिकविण्यास कांहीं हरकत नाहीं" आणखी एके ठिकाणीं ते म्हणतात "लहानपणीं कोंवळ्या अंतःकरणामध्यें सदाचार, स्वाभिमान व स्वधर्मनिष्ठा यांचें बीजारोपण झालें, तरच त्याचा मनुष्याचे वर्तनावर परिणाम होईल. यासाठीं शाळेंत धर्मशिक्षण जरूर असलें पाहिजे, तें देण्यास जरी अनेक साधनें आहेत, तरी शिक्षकांच्या वर्तनाचा कित्ता हें उत्कृष्ट साधन आहे."

मुंबई इलाख्याचे माजी शिक्षण मंत्री रँग्लर परांजपे यांनीं १९०४ सालीं 'East and West' मासिक पुस्तकांत हिंदुधर्मावर एक लेख लिहून "हिंदु धर्म म्हणजे एक वेडगळ समजुतचा भारा आहे, म्हणून आमच्या शाळांतून धर्मशिक्षण देऊं नये," असें प्रतिपादन केलें होतें. त्याला लोकमान्यांनीं चोख उत्तर दिलें, ते म्हणतातः—

"जीव आणि परमेश्वर यांचा संबंध काय, तो संबंध राखण्याकरितां जीवाचें कर्तव्य कोणतें आणि जीवाची उन्नति होण्यास उपाय काय करावे इत्यादि धर्माचे जे गहन विचार आहेत आणि ज्यांचें हिंदुधर्मग्रंथांपेक्षां दुसऱ्या कोणत्याहि धर्मग्रंथांत अधिक उदात्त विवेचन केलेलें आढळत नाहीं, ते धर्मविचार व तीं धर्मतत्त्वें यांचा प्रिं. परांजपे यांच्या मनावर बिलकुल संस्कार झाला नसल्यामुळें धर्म म्हणजे कांहीं वेड्या समजुतींचा भारा यापलीकडे त्यांची समजूत गेलेली नाहीं; आणि हा त्यांच्या मनाचा ग्रह नीली ग्रहाप्रमाणें बळकट झालेला असल्यामुळें त्यांनीं आपले अप्रगल्भ व अपरिपक्व विचार जगापुढें मांडण्याचें साहस केलें आहे."

अशा तऱ्हेनें प्रतिपक्षाचें आपल्या ज्ञानाच्या विश्वासावर व जोरावर खंडण करून लोकमान्यांनीं धार्मिक शिक्षणाची सानपणापासून कशी आवश्यकता आहे, हें सिद्ध करून दाखविलें.

## धर्म आणि नीति

कित्येकांच्या मतें हा महत्त्वाचा प्रश्न असून प्रि. परांजप्यांसारखे लोक तर नीतीच्या पायावर धर्माची उभारणी आहे असें प्रतिपादन करतात. लोकमान्यांचें

मत याचे उलट असून धर्माच्या पायावरच नीतीची उभारणी आहे, असें त्यांचे स्पष्ट मत आहे. देह, आत्मा आणि परमेश्वर यासंबंधीं ज्ञान आमच्या धर्मांत आहे व त्यांत यांचा परस्पर संबंध दाखवून, आत्म्याचें अविनाशित्व, परमेश्वराचें सर्वव्यापित्व इत्यादि सिद्ध केलें आहे. " परमेश्वराचें ज्ञान करून घेऊन तत्स्वरूपीं लीन होणें हेंच मनुष्यजन्माचें सार्थक आहे हा आमच्या धर्माचा सिद्धांत असून सत्यभाषण, स्वार्थत्याग, परोपकार, आत्मनीति, राजनीति इत्यादि जे नीतिचे प्रकार प्राचीन कालापासून आमच्यांत मानीत आले आहेत, त्यांचा उगम आमच्या धर्मसिद्धांतांतच आहे " असें लोकमान्यांनीं प्रतिपादन केलें आहे. पाश्चात्य लोक सुद्धां आमच्या धर्मांतील सिद्धांतच ग्राह्य मानूं लागले आहेत व आमच्या धर्मांत सांगितलेली नीति हीच खरी आणि श्रेष्ठ प्रकारची नीति या तत्त्वास ते येऊन मिळूं लागले आहेत.

लोकमान्यांचा कर्मयोग, मोक्ष, सिद्धावस्था, तत्त्वज्ञान इत्यादि गहन विषयांची चर्चा करण्याचें हें स्थळ नव्हे. दुसरें वयाच्या ६० व्या वर्षापर्यंत निरलसपणें अध्ययन करून लोकमान्यांनीं " गीतारहस्य " नांवाचा अद्वितीय ग्रंथ लिहून ठेविला आहे. त्यांत या गहन तत्वांचें सोदाहरण स्पष्टीकरण जिज्ञासूला मिळणें सहज शक्य आहे. ' कर्मफलासक्ति ', ' हिंदुधर्मांतील कर्मफलाची कल्पना ' इत्यादि विषयावर त्यांनीं १९०८ सालांत व्याख्यानें देऊन आपल्या भावी भारतमान्य ग्रंथाची तयारी अगोदरच करून ठेविली होती. लोकमान्यांच्या कर्मयोगशास्त्रावर एक ठराविक अरोप—आणि तो केवळ दुराग्रहानें—केलेला असतो कीं, त्यानीं कर्मयोगाचें महत्त्व गाऊन, ज्ञान, भक्ति यांना अत्यंत कमी प्रतीचें लेखलें आहे. परंतु ही समजूत चुकीची आहे. १९०८ सालांत झालेल्या आपल्या एका व्याख्यानांत त्यांनीं स्पष्ट सांगितलें आहे कीं, ज्ञान, भक्ति, कर्म हीं सर्वच श्रेष्ठ प्रतीचीं आहेत. केवळ दुराग्रहानें त्यांनीं कर्मयोगाचें समर्थन केलें आहे ही समजूत चुकीची आहे. कारण " मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें " या ग्रंथांत भागवत धर्मानें पंगूपणा आला म्हणून इतिहास-संशोधक राजवाडे यांनीं लिहिलें आहे, त्याला लोकमान्यांनीं चोख उत्तर दिलें व शेवटीं लिहिलें कीं, " ऐहिक सुखाची निवृत्ति होऊन परमार्थाकडे लागलेल्या साधुसंतांची प्रत्यक्ष कृति जरी आपल्या नजरेस येत न.हीं, तरी त्यांचें अस्तित्व हीच एक मोठी जागृति आहे. त्यांची निरपेक्षता, त्यांचा स्वार्थत्याग त्यांचें दयालुत्व इत्यादि गोष्टीच इतर मनुष्यांचे ठिकाणीं स्वधर्म व स्वकर्म आचरण्याची प्रवृत्ति करतात. रामदासांनीं जें कार्य केलें त्याला ज्ञानदेवादि पूर्वींच्या संतांचाच पाठिंबा होता ही गोष्ट विसरतां कामा नये." तेव्हां कर्मयोगाबद्दल दुराग्रह नसून भक्तियोग व ज्ञानयोग यांबद्दल लोकमान्यांचा अत्यंत आदरच वसत होता ही गोष्ट निर्विवाद आहे.

तसेंच वेदांताविषयीं त्यांचें मत प्रवृत्तिपरच होतें. सर्व लोक म्हणतात वेदांत व्यवहाराला उपयोगी नाहीं. त्याला लोकमान्यांनीं असें उत्तर दिलें आहे कीं, "वेदांतांत जर नीतीच्या व धर्माच्या सिद्धांतांचा अंतर्भाव होतो व व्यवहारांत जर धर्माला आणि नीतिला मान तर वेदांत व्यवहारोपयोगी नाहीं, असें म्हणण्यापेक्षां तो व्यवहारोपयोगी करणारा मनुष्य नाहीं असेंच म्हटलें पाहिजे." लोकमान्यांनीं श्रीमद्भगवद्गीतेला जें एवढें अतोनात महत्त्व दिलें, त्याच्या मुळाशीं हेंच तत्त्व आहे. गीताग्रंथांत नुसता तत्त्वज्ञानी वेदांत नसून, तो वेदांत व्यवहारांत कसा आणावा हें त्यांत प्रतिपादन केलें आहे. परंतु वेदांती लोकांच्या हातांत या भगवद्गीतानामक अपूर्व व्यवहारोपयोगी तत्वज्ञानात्मक ग्रंथाची बरीच दुर्दशा झाली असें लोकमान्यांचें मत आहे. लोकमान्यांचें म्हणणें असें कीं "सृष्टीच्या बुडाशी जीं अगम्य तत्त्वें आहेत, त्यांचा विचार करून तत्त्ववेत्त्यांनीं आपणास मुक्ति मिळाली म्हणून स्वस्थ बसावयाचें नाहीं. या गूढ तत्त्वांचा विचार करणें तत्त्वज्ञांचें जितकें कर्तव्य आहे. तितकेंच हीं तत्त्वें जगाच्या नजरेस आणून देऊन तीं व्यवहारास कशीं लावावीं व मानवजातीची पूर्णावस्था कशी संपादावी ह्याचा त्यांस बोध करणें हेंहि त्यांचें काम होय."

## सामाजिक आणि धार्मिक

लोकमान्यांच्या धार्मिक मतांत सामाजिक मतांचा संबंध काय, असा प्रश्न उद्भवण्यासारखा आहे. परंतु लोकमान्यांच्याच शब्दांत सांगायाचें म्हणजे हिंदु लोकांच्या समाजसुधारणेचा धर्माशीं विशेष संबंध आहे, आणि त्यामुळेंच लोकमान्यांच्या धार्मिक मतांचा विचार करितांना त्यांच्या सामाजिक मतांचा विचार करणें जरूर आहे. प्रथमतः लोकमान्यांना सामाजिक सुधारणा हव्या होत्या, पण त्या कशा हव्या होत्या याचें एक सूत्र ध्यानांत असलें पाहिजे. त्यांचें म्हणणें असें होतें कीं, "स्त्रीशिक्षण, बालविवाह, पोटशाखेंतील अंतर्विवाह, समुद्रयात्रा इत्यादि बाबतींत समाजाची सुधारणा झाली पाहिजे. परंतु ही सुधारणा हिंदुत्व म्हणून कांहीं विशिष्टपणा राखूनच झाली पाहिजे." तसेंच ज्याला सुधारणा करावयाची त्यानें प्रथमतः "सामान्य लोक ज्या तऱ्हेनें वागतात, त्याहून कांहीं निराळ्या तऱ्हेनें आपण वागतों असें शहाण्या माणसानेंहि त्यांच्या मनांत येऊं देतां कामा नये. एकदम भलतींच मतें सांगून त्यांच्या मनास अस्थिरपणा आणूं नये. चाललीं आहेत तशीं सर्व कृत्यें चालू ठेवून त्यांना न कळत त्यांच्या विचारांत क्रांति घडवून आणली पाहिजे" असें त्यांचें स्पष्ट मत होतें. सामाजिक सुधारणावादी हे नेहमीं जनतेला उपदेश करितांना, हें पहा आम्ही उंच टेकडीवर चढत आहोंत, तुम्ही झपाझप पावलें टाकीत आमच्या पाठीमागें या असें सांगत असतात, त्यामुळें जनता बिचकते. तसेंच जे

सुधारणावादी आहेत, त्यांचें आपल्या हिंदुधर्मशास्त्राचें अध्ययन असायला पाहिजे तितकें नसतें. त्यांचा भर उयुपक्ततावाद व तार्किकता यांवर जास्त असतो. यामुळें ज्या समाजांत त्यांना क्रांति घडवून आणावयाची असते, तो समाज त्यांच्यावर विश्वास ठेवूं शकत नाहीं. परंतु लोकमान्यांचा सामाजिक सुधारणे-कडचा दृष्टिकोण पाहिला, म्हणजे तेव्हांच दिसून येईल कीं, समाजाला बरोबर घेऊन जरूर त्या सुधारणा कराव्या असेंच त्यांचें मत होतें. किंबहुना बौद्ध धर्माचा जारीनें प्रसार होत असतां ज्याप्रमाणें परमपूज्य श्रीमच्छंकराचार्य यांचा अवतार झाला व त्यांनीं बौद्ध धर्माचें खंडण करून हिंदुधर्माचा झेंडा भारतावर फडकविला, त्याचप्रमाणें या बुद्धिवान् सुधारकांच्या काळांत श्रीमच्छंकराचार्य लोक-मान्य टिळकांच्या रूपानेंच अवतरले म्हणून ठीक झालें. समाजाला लागत असलेलें उधें वळण लोकमान्यांनीं आपल्या अगाध विद्वत्तेच्या व अचाट बुद्धिमत्तेच्या जोरावर पार उलटून दिलें, व त्या ठिकाणीं सोज्वल हिंदुधर्माची प्रस्थापना केली. धर्मांत न सांगितलेल्या गोष्टी केवळ तार्किकतेला पटतात म्हणून सुधारणा घडवून आणणें हें मुळींच योग्य नाहीं, असें त्यांनीं जोरानें प्रतिपादन केलें. पारशी लोकांत प्रेतें गिधाडांपुढें टाकावीं कां जाळावीं असा वादविवाद चालू असतां लोकमान्यांनीं लिहिलें कीं " मृतांचे देह पक्ष्यांकडून खावविण्यापेक्षां अग्नींत दहन करणें हें युक्तिदृष्टया जरी अधिक ग्राह्य धरलें, तरी जेव्हां एकादी चाल धर्मांत रूढ होऊन बसलेली असते, तेव्हां त्या चालीच्या गुणावगुणांचा विचार धर्मदृष्टी बाजूला ठेवून कधींहि करतां येत नाहीं. " तेव्हां धर्मदृष्टीचा लोप करून सामा-जिक सुधारणा करूं इच्छिणाऱ्यांवर वेळप्रसंगीं कोरडे ओढण्यास लोकमान्य मुळींच कमी करीत नसत. अगोदरच लोकमान्यांची अपूर्व विद्वत्ता व त्यांत स्पष्ट व निर्भीड लिहिण्याचा त्यांचा स्वभाव यामुळें त्यांच्या पुढें सुधारणावादी कधींच टिकत नसत. आपल्या धर्मशास्त्रांचें फार मार्मिक व सोपपत्तिक अध्ययन लोकमान्यांनीं केलें होतें, त्यामुळें कोणताहि समाजसुधारणावादी आला तरी तो त्यांचे पुढें ढिला पडे व आपली वादविवादसामुग्री घेऊन पलायन करी. शास्त्रांचें व संस्कृत वाङ्मयाचें दांडगें अध्ययन लोकमान्यांइतकें दुसऱ्या कोणाचें असेल असें वाटत नाहीं. लोकमान्यांच्या शास्त्रज्ञानाची परीक्षा जेव्हां त्यांनीं वृद्ध भीष्म डॉ. भांडारकर यांच्याशीं वाद मांडला, त्या-वेळीं पूर्णपणें झाली. डॉ. भांडारकरांसारख्या विद्वानाशीं शास्त्राच्या बाबतींत दोन हात करणें व त्यांच्या शंकांना ताबडतोब उत्तरें देणें ही कांहीं सामान्य गोष्ट नाहीं. संमतिवयाचा कायदा ज्यावेळीं रण माजवून राहिला होता त्यावेळीं आमच्या लोकमान्यांची शास्त्रीय लेखणी व वाणी पहावी !! श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं तर त्यावेळचें लोकमान्यांचें वर्णन " टिळक-चरित्रांत " अप्रतिम केलें आहे. लोकमान्यांच्या विद्वत्तेपुढें तर आमचे बिचारे

महात्मा गांधी गाय होऊन जात. एकादां तर महात्माजी स्वतांच लिहितात कीं, "लोकमान्यांशीं मी वादविवाद करूं लागलों आणि त्यांनीं एकदां कां आपलें संस्कृतचें भांडार उघडलें कीं, माझी भंबेरीच उडत असे." मोठया मोठया विद्वानांशीं टक्कर देण्याची हिंमत व सामर्थ्य लोकमान्यांचें अंगीं होतें, म्हणूनच त्यांनीं तेवढा काळ थोपवून धरला.

संमतिवयाचा कायदा जेव्हां पास होऊं घातला होता त्यावेळीं जीं रणें माजून राहिलीं होतीं, त्यांत हेंच दिसून आलें कीं, लोकमान्यांना धार्मिक बाबतींत परधर्माच्या राजानें हात घालणें हें मुळींच आवडेना, व तात्यासाहेब केळकर यांनीं लिहिल्याप्रमाणें लोकमान्यांना सुधारणा हवी होती ही गोष्ट खरी, परंतु धर्माच्या मुळाला हात घालणारी सुधारणा करणाऱ्यांवर ते तुटून पडत असत. संमतिवयाचा 'कायदा' करून घेणें या गोष्टीच्या ते अत्यंत विरुद्ध होते. कायद्यानें सामाजिक सुधारणा घडवून आणणें ही पाश्चात्य पद्धति आम्हांला नको, असेंच ते कंठरवानें प्रतिपादन करीत असत. आमच्या धर्मांत, आमच्या समाजांत काय काय सुधारणा पाहिजेत, तें आमच्या धर्मांतील लोकांनींच ठरविणें अत्यंत महत्त्वाचें आहे असें त्यांचें म्हणणें होतें. कोणताहि एकादा कायदा करून घेऊन होणाऱ्या सुधारणा या उत्तमच असें नाहीं तर, त्यांच्यापासून होणारे दुष्परिणामहि अनेक असतात, आणि म्हणूनच कायद्याचा हात शिरकावूं देणें म्हणजे धर्महानि आहे, असें त्यांचें स्पष्ट मत होतें. समाजाला बरोबर न घेतां हे समाजसुधारक एक मोठी सुधारणा आपण घडवून आणतों, या गर्वांत घाईघाईनें एकादा कायदा पास करून घेण्याची इच्छा करतात ही गोष्ट गैर आहे, कारण असे कायदे पास करून घेऊन त्यांचा उपयोग होतो, हा भ्रम आहे. समाजांत धर्मानें कैक वर्षेंपर्यंत रूढ झालेली चाल, जर चुटकीसरशी अशी कायद्यानें बदलूं लागली तर मग धार्मिक बंधनाचें पावित्र्य कांहींच नाहीं असें सिद्ध होईल. सामाजिक किंवा धार्मिक सुधारणा करितांना लोकमत अनुकूल आहे किंवा नाहीं हें आपण पाहिलें पाहिजे व जर नसेल तर तसें तें बनविलें पाहिजे; त्यावांचून चिरस्थायी अशी सुधारणा होणें शक्य नाहीं, असेंच ते प्रतिपादन करीत. लोकमत अनुकूल नसतां जबरदस्तीनें एकादा कायदा लोकांवर लादला म्हणजे त्याचा कितपत उपयोग होतो, हें म्हैसूर संस्थानांतील बालविवाहाच्या कायद्या-संबंधाची १९०५ सालची हकीकत वाचली असतां कळून येईल. या कायद्या-अन्वयें त्या सालीं ७८ खटले झाले, तरी लोकांची बालविवाह करण्यासंबंधानें प्रवृत्ति कमी झाली नाहीं, व त्यामुळें या कायद्यानें कांहीं फायदा होत नाहीं अशी ओरड म्हैसूर संस्थानाचे पोलीस–इन्स्पेक्टर–जनरल यांनीं केली आहे. तेव्हां लोकमत अनुकूल नसतां कायदा करून घेणें–आणि तो सुद्धां परकी धर्माच्या राजाच्या हातानें–याच्या लोकमान्य अगदीं विरुद्ध असत, व एवढ्याचसाठीं

ते संमतिवयाच्या बिलाच्या विरुद्ध झगड झगड झगडले व प्रतिपक्षाला वाद-विवादांत त्यांनीं अगदीं चीत करून टाकिलें. शिवाय कायद्यानें सुधारणा झाली म्हणजे तींत कोणतेहि दुष्परिणाम नाहींत हें म्हणणें गैरवाजवी आहे असें लोकमान्यांचें मत असून त्याला त्यांनीं असें उदाहरण दिलें आहे कीं, इंग्लंडांत विवाहाला कराराचें वगैरे स्वरूप प्राप्त झाल्यामुळें इंग्लंडांत विधवांची नाहीं तर कुमारिकांची संख्या वाढून अनेक कुमारिका जन्मभर संसारसुखाला अंतरल्या. तेव्हां " गांव तेथें महारवाडा आहेच " म्हणून लोकमताला धाब्यावर बसवून कोणतीहि धार्मिक किंवा सामाजिक सुधारणा घडवून आणणें शक्य नाहीं.

त्याचप्रमाणें विधवाविवाह वगैरेसंबंधानें लिहितांना सुद्धां त्यांनीं असेंच दाखविलें कीं, सुधारणा हवी तशी योग्य पायावर करा. विधवाविवाह झाला म्हणजे राष्ट्रोन्नति होईल अशा प्रकारच्या गप्पा मारून निवळ तार्किकता किंवा निव्वळ उपयुक्ततावाद लोकांपुढें मांडून फसवून सुधारणा करण्याचा यत्न करूं नका. एकदां तर ते लिहितातः—

" आमचे सुधारक ज्या कांहीं सुधारणा हल्लीं करूं इच्छित आहेत, त्या सर्व आयर्लंडांत झालेल्या आहेत. विधवाविवाह आहे, प्रौढविवाह आहे, जातिभेद नाहीं, मद्यमांससेवन यथेच्छ चालू आहे; पण बिचारें आयर्लंड सात-आठशें वर्षें धडपडत असतांहि अद्याप परवशतेच्या निरय स्थितींतून बाहेर पडत नाहीं. यामुळें सामाजिक सुधारणा नको असें आम्ही म्हणतों, असें कोणीहि समजूं नये. आमचें एवढेंच म्हणणें आहे कीं, डॉ. भांडारकर यांनीं सामाजिक सुधारणेचा व राजकीय हक्कांचा जो हा संबंध जोडला तो अगदीं भ्रांतिमूलक व निराधार आहे...... " सामाजिक सुधारणा केली म्हणजे अमुक होईल, विधवाविवाह केला म्हणजे राजकीय हक्क मिळतील इत्यादि भ्रांतिमूलक विधानांचें निराकरण लोकमान्य त्वरित करीत असत. परंतु एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे आणि ती ही कीं, ते समाजसुधारकांना नेहमीं म्हणत कीं, तुम्हांला खरी सुधारणा करावयास नको आहे; हें समाज-सुधारणेचें नुसतें ढोंग आहे. वेळ आली असतां आचरणांत आणायला मात्र कोणीच तयार होत नाहीं. ही कसली सामाजिक सुधारणा ! ! कोणतीहि गोष्ट लोकांना पटवावयाची म्हणजे ती आपण आचरणांत आणली तरच लोकांना पटते ! ! परंतु ती गोष्ट आचरणांत आणते वेळींहि तिची ग्राह्याग्राह्यताहि पाहिली पाहिजे. नाहीं तर वाटेल ती गोष्ट आचरणांत आणली म्हणून तो मनुष्य वंद्यच ठरतो असा मुळींच प्रश्न नाहीं. समाजाची तयारी न करितां एकाद्यानें मोठी सुधारणा अमलांत आणली तरी तो समाजाच्या तिरस्काराला पात्र होऊन समाज त्याची कोणतीहि गोष्ट ऐकायला तयार होत नाहीं. लोकमान्यांना सुधारणा हवी असे, हें त्यांच्या वर्तणुकीवरून तेव्हांच दिसून येत असे. तात्यासाहेब

केळकरांनीं लिहिलेल्या " टिळक–चरित्रांत " त्यांनीं लिहिलें आहे कीं, संमतिवयाचा हा झगडा चालला असतांना व सामाजिक सुधारणेच्या गप्पा समाजसुधारक मारीत असतांना एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं, ज्यावेळीं लोकमान्यांच्या वडील मुलीचें लग्न करण्याचा प्रसंग आला त्यावेळीं लोकमान्यांनीं आपल्या वडील मुलीचें लग्न १५ व्या वर्षापर्यंत केलें नाहीं आणि सुधारणावादी तेलंगांनीं मात्र वडील माणसें सांगतात या सबबीवर आपल्या मुलीचें लग्न लहानपणींच करून टाकिलें. तेव्हां लोकमान्य हे खरे समाजसुधारणा करूं इच्छिणारे होते, तर हे बाकीचे समाजसुधारक बोलघेवडे व लोकांना देखावा करण्यासाठीं समाजसुधारणेच्या गप्पा झोकणारे होते हेंच सिद्ध होतें.

सामाजिक किंवा धार्मिक सुधारणा घडवून आणण्याच्या बाबतींत लोकमान्यांचा आणखी एक कटाक्ष होता. तो म्हणजे हा कीं, जुने पंडित व नवे पंडित यांचें एकीकरण घडून आलें पाहिजे, त्याशिवाय इष्ट व जरूर त्या सुधारणा घडून येणें शक्य नाहीं हा होय. तसेंच धार्मिक सुधारणा करणें अवश्य आहे, ही जरी गोष्ट खरी तरी त्या परिमाणकारक व सर्वमान्य होण्याकरितां धर्मगुरूंची सुधारणा होणें अवश्य आहे. धर्मगुरूंचें एकीकरण होणें अवश्य आहे, असें त्यांनीं स्पष्ट प्रतिपादन केलें होतें. लोकमान्यांना सुधारणा हव्या होत्या पण त्या इष्ट मार्गानें व धर्मानेंच प्रतिपादन केलेल्या हव्या होत्या एवढें मात्र खरें. मीं प्रथमतः सांगितलें आहे कीं, लोकमान्य फक्त जुन्यालाच कवटाळून बसणारे नव्हते, मात्र नव्या सुधारणावाद्यांसारखा चारगटपणा त्यांच्यांत नव्हता. एकदां लोकमान्यांनीं धर्मगुरूंची सुधारणा अगोदर झाली पाहिजे असा वादविवाद चालला असतांना स्पष्ट सांगितलें होतें कीं " माझ्या मतें धर्मशास्त्रास विरुद्ध नाहींत व थोड्या फरकानें अमलांत आणण्यासारख्या सुधारणा सद्यःस्थितींत फक्त दोन आहेत (१) लग्नांत सप्तपदी करूं नये. सप्तपदी तशीच ठेवून ती गर्भाधानाचे वेळीं करावी, सप्तपदी झाल्याशिवाय विवाहाची पूर्तता होत नाहीं. अर्थात् पूर्वींचे सर्व संस्कार करूं द्यावेत व सप्तपदी मागाहून करावी. (२) ऋतु प्राप्त झाल्यानंतर विवाहास परवानगी द्यावी. हें थोड्या प्रायश्चित्तानें करावें लागेल, पण धर्मशास्त्राच्या कांहीं विरुद्ध नाहीं. या दुसऱ्या सुधारणेनें लोकांस सवलत मिळेल. यानें निदान अक्षतयोनी बालविधवा कांहीं मरणार नाहींत. नवऱ्याचा थोडा जरी समागम झाला तरी लोकांना तितकेंच समाधान वाटेल........" यावरून टिळकांच्या सुधारणेची दिशा कशी धर्मसमंत व धर्मशास्त्राला न दुखवितां अमलांत आणण्याची होती हें दिसून येतें.

'अस्पृश्यतानिवारण' 'Untouchability' यासंबंधानें जी सांप्रत चळवळ दिसून येते, तिचें खरें इंगीत लोकमान्यांनीं कधींच जाणलें होतें व ते धर्मशास्त्राच्या जोरावर असें प्रतिपादन करीत कीं, ज्यांना आपण अस्पृश्य

समजतों, ते सुद्धां हिंदूच आहेत व त्यांचें एकीकरण व संघटन होणें अत्यंत जरूर असें आहे. ता. १५ सप्टेंबर १९०७ रोजीं नायकांच्या गणपतीपुढें झालेल्या व्याख्यानांत त्यांनीं सांगितलें कीं, " आमच्या समाजांत अनेक जाती आहे. कमी जास्त दर्जा असेल, पण महार मांगापासून ब्राह्मणापर्यंत सारे हिंदूंत येतात. धर्मशास्त्र असें सांगतें इतकेंच नाहीं तर, भागवत धर्मांतहि उच्चनीच भाव नाहीं. महार, मांग, चांभार, सोनार हे पंढरीच्या पांडुरंगाला सारखेच प्रिय आहेत. " गणेशोत्सवाचे प्रचारक म्हणून लोकमान्यांचेंच नांव प्रामुख्यानें पुढें येतें, आणि तो उत्सव दृढमूल करावयास लोकमान्यांना अनेक कष्टहि पडले. उत्सव सुरू झाल्यावर त्याच्यावर जे अनेक प्रकारचे आक्षेप आले, त्यांत पहिला सार्वजनिक गणपतीला विटाळ होतो हा मोठा आक्षेप होय. लोकमान्यांना असल्या प्रकारच्या आक्षेपांना उत्तरेंहि समर्पक देतां येत. ते म्हणत कीं, देवाला माणसांचा विटाळ होतो असें म्हणणें म्हणजे ईश्वरानें मनुष्यें उत्पन्न केलींच नाहींत असें म्हणण्यासारखें आहे, व ज्याअर्थीं ईश्वरानें मनुष्यजात निर्माण केली आहे, त्याअर्थीं प्रत्येक मनुष्याला ईश्वर-भक्तीचा सारखाच अधिकार असला पाहिजे हें निर्विवाद आहे. मात्र हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, लोकमान्यांना अस्पृश्यतानिवारण जरी जरूर हवें होतें, तरी तें करितांना मोठया जनसमुदायाचा भयंकर विरोध येईल, तर ते केव्हांहि त्या ठिकाणीं धर्मभावनांच्या आड येऊन आपला हेका पुढें चालवीत नसत. स्वतः ते वेळ आली असतां सुधारणा करून दाखवीत, आचरून दाखवीत, पण लोकांच्या धर्मभावनांना वृथा दुखवून एकदम भलतेंच वळण लावण्याची हाव त्यांनीं धरली नाहीं. तुम्ही इतपत करतां कां ?' ठीक आहे एवढेंच करा ' असें सांगून हळूहळू लोकविचारांत क्रांति घडवून आणीत. हल्लीं अस्पृश्यतानिवारणाचें बहकलेलें वेड बहकलेल्या तरुणांनीं इतकें डोईवर घेतलें कीं, ' सहभोजन करणें ' ' अस्पृश्याबरोबर खाणें ' म्हणजे अस्पृश्यतानिवारणाची परिसीमा असें ते समजूं लागले आहेत. हें एक प्रकारचें वेड आहे. महात्मा गांधी सुद्धां या सह-भोजनाला उचलून धरायला तयार नाहींत ! आणि जरी पुढें मागें झाले तरी हिंदुधर्मीयांनीं त्याच्या अनिष्ट परिणामाचा विचार करणें जरूर आहे. एकदम सहभोजनाकडे धांव घेण्यानें अस्पृश्योद्धार होत नसून, सबगोलंकाराचा वेडगळ प्रयत्न होत आहे, ही गोष्ट विसरतां कामा नये.

लोकमान्यांचें मत सबगोलंकाराच्या सर्वदा विरुद्ध असे. जातिभेदापासून होणारे कांहीं अनिष्ट परिणाम ते जाणत असत, नाहीं असे नाहीं. परंतु सर्व जातींच्या व सर्व धर्मांच्या लोकांचे रोटीबेटीव्यवहार सुरू झाल्याखेरीज राष्ट्राची उन्नति कदापि व्हावयाची नाहीं या मताच्या ते पूर्णपणें विरुद्ध असत. जातींजातींचें एकीकरण करणें हें हिंदुस्थानांत तरी अशक्य आहे, असेंच त्यांचें मत होतें व त्यांनीं एका

लेखांत तर असें म्हटलें आहे कीं, "हिंदुस्थानांतील हजारों जाति एकवट व्हाव्या, अशी आशा करणें म्हणजे बहुतेक अमेरिकेंतल्या लोकांनीं नीग्रोंशीं सोयरिकी कराव्या असेंच म्हणण्यासारखें आहे." जातिभेद हे राष्ट्राच्या उन्नतीच्या केव्हांहि आड येत नाहींत, इतकेंच नव्हे तर कांहीं कांहीं वेळां पोषकच होतात. मात्र जातिमत्सर हाच बरेच वेळां राष्ट्रोन्नतीच्या आड येतो. सांप्रत आपल्यांत अनेक झगडे चालले आहेत. एक म्हणतो जातिभेद मोडावे तोडावे, दुसरा म्हणतो जातिभेद कायम असावे, पण हा झगडा चालविण्यापेक्षां लोकमान्यांचा सल्ला असा आहे कीं, "हल्लीं आपल्या देशाची स्थिति म्हटली म्हणजे निरनिराळ्या जातींच्या अंगीं असलेले गुण वाढविण्याचा प्रयत्न करून त्यांतूनच होईल तितकें राष्ट्राचें हित करून घ्यावयास पाहिजे. बेटीव्यवहाराखेरीज निरनिराळ्या जाती सारख्याच दर्जाच्या राहूं शकतात हें ब्राह्मण धर्मांतील पोटजातींवरून उघड होतें. हाच नियम सर्वत्र लागू केला असतां हिंदुस्थानची उन्नति होण्यास देशांतील सर्व जातींची एक जात होईपर्यंत वाट पहाण्याची कांहीं जरूर वाटत नाहीं, असें अनुमान काढण्यास हरकत दिसत नाहीं." तसेंच श्रीमद्भगवद्गीतेंतच श्रीकृष्णानीं जें "चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः" असें म्हटलें आहे त्याची उपपत्ति लावून लोकमान्य म्हणतात कीं, कोणत्याहि गुणाचें येथें रक्षण करणें असल्यास, तो गुण संभाळून ठेवण्याचें काम कांहीं विशिष्ट जातीनें आपल्याकडे घेतलें पाहिजे, आणि तसें तें घेतलें म्हणजे ती एक विशिष्ट जातच बनून राहते. एक इंग्लिश ग्रंथकार म्हणतो कीं, निरनिराळ्या जातींत जें अगदीं विशिष्ट गुण आहेत व जे सृष्टीच्या आरंभापासून त्या त्या जातींत आढळून येत आहेत, ते कायम राखण्यास त्या त्या जातींतील विवाहसंबंध व सोयरिकी जातींतल्या जातींतच झाल्या पाहिजेत, असा प्रतिबंध नसता तर हिंदुस्थानासारख्या उष्ण प्रदेशांत आमच्या अंगचे गुण केव्हांच लुप्तप्राय होऊन आम्ही अगदीं नीच स्थितीप्रत पावलों असतों. तेव्हां लोकमान्यांचा कटाक्ष जातिभेदाचीं पाळेंमुळें खणून काढण्याकडे मुळींच नव्हता. मात्र कांहीं कांहीं जातिबंधनें नष्ट झालीं पाहिजेत असें त्यांचें मत होतें, व जीं जातिबंधनें सार्वजनिक व राष्ट्रकार्यांत आड येतात तीं काढून टाकणें अगत्याचें आहे, असें तें प्रतिपादन करीत असत.

पण जातिमत्सर माजविण्याकडे जी ब्राह्मणेतर समाजाची प्रवृत्ति दिसून येते तिच्या मात्र ते विरुद्ध असत. त्यांच्या मतें ब्राह्मणांचीं कर्तव्यें क्षत्रियांनीं करावीं ही प्रवृत्ति उत्पन्न करणेंच मुळीं चुकीचें आहे. कारण मराठ्यांनीं जरी वेदाध्ययन केलें तरी ते मराठेच राहणार व ब्राह्मणांनीं वेद न म्हटला ते तरी ब्राह्मणच राहणार! मराठ्यांचें कर्तव्य मराठ्यांनींच करावें व ब्राह्मणांचें कर्तव्य ब्राह्मणांनींच करावें, यांतच खरा मोठेपणा आहे. ज्या लोकांच्या पूर्वजांनीं गेल्या शतकांत

मुसलमानी राज्याची लाट मागें हटवून हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन केलें ते जातीनें अस्सल क्षत्रिय असोत वा नसोत त्यांची योग्यता स्नानसंध्या करून धर्म राखणाऱ्या ब्राह्मणापेक्षां कोणत्याहि रीतीतें कमी आहे असें आम्ही मानीत नाहीं असेंच लोकमान्यांनीं लिहिलें आहे. उलट क्षत्रियांना जर आपण खरे क्षत्रिय म्हणून म्हणवावयाचें असेल तर त्यांनीं क्षात्र कर्मच आचरून दाखविलें पाहिजे. " क्षतात्किल त्रायत इत्युदग्रः । क्षत्रस्य शब्दो भुवनेषु रूढः ॥ " अशी कविकुलगुरु कालिदासानें क्षत्रिय शब्दाची व्याख्या केली आहे ती सांप्रतच्या परिस्थितीप्रमाणें सिद्ध करून व आचरून दाखविली पाहिजे. लोकमान्य म्हणतात " देशाच्या अशा स्थितींत आपले संस्कार वेदोक्त करण्यास झटण्यापेक्षां खऱ्या क्षात्रधर्मास उचित वर्तन ठेवणें हें खऱ्या क्षत्रियाचें किंबहुना ब्राह्मणाचेंहि कर्तव्य आहे हें आम्ही सांगावयास नको. देशाला अनेक प्रकारचीं क्षतें पडलीं आहेत तीं भरून काढण्याची महाराष्ट्रांतील ब्राह्मण व मराठे यांनीं ईर्षा बाळगली पाहिजे. कांहीं मराठे मंडळींनीं हट्टानें जरी वेदोक्त क्रिया केली तरी सामाजिक किंवा राष्ट्रीयदृष्ट्या त्यापासून कांहीं फायदा नाहीं. कारण हल्लीं कित्येक युरोपियन लोकहि जर वेदपठण करितात तर त्याप्रमाणेंच वेदोक्त कर्म करणाऱ्या मराठ्यांची स्थिति होईल. यांत कांहीं भूषण नाहीं, बहुमान नाहीं आणि देशकार्यहि नाहीं. " असो.

लोकमान्य टिळक हिंदुस्थानचे अनभिषिक्त राजे म्हणून संबोधिले जात असत. त्यांची अलौकिक बुद्धिमत्ता, उज्जल स्वदेशप्रीति इत्यादि गुणांनीं ते महाराष्ट्राला आणि सर्व भारताला प्रिय झाले. त्यांच्यासारखा राजकीय तपस्वी उभ्या हिंदुस्थानांत एकतरी सांपडेल कीं नाहीं, याची शंका आहे. तेव्हां अशा पुरुषाच्या मताची चर्चा आपापल्या बुद्धीप्रमाणें करणें हा प्रत्येकाचा हक्क आहे, कर्तव्य आहे. ही एक त्या महापुरुषाची सेवाच आहे. अशा थोर पुरुषांचीं चरित्रें जीं होतात, त्याला प्रत्येक हृदयानें गायलेला राग लागत असतो, त्यावांचून तीं संपूर्णतेला जात नाहींत. महापुरुषांच्या किरकोळ गोष्टीसुद्धां साधारण जनसमूहाला अनुकरणीय अशाच होतात व त्या किरकोळ गोष्टी ऐकण्यास जनता उत्सुक व आतुर असते. महापुरुषांच्या चरित्रकारांनीं त्यांच्या आयुःक्रमांत घडलेल्या किरकोळ गोष्टींचा संग्रह करून जर त्यांचें चरित्र रेखाटलें, तर खात्रीनें तें जिवंत चरित्र होऊन चरित्र लिहिणाऱ्याचा उद्देश सफल होईल. वाचणाऱ्यांतून कांहीं वर्षांनीं कां होईना एकादा चरित्रनायकासारखा वीर उत्पन्न होईल. लोकमान्य टिळकांचीं धार्मिक मतें हा खरोखरच एक महत्त्वाचा मुद्दा होता व तो केसरीतर्फें एका गृहस्थानें लोकांपुढें आणून त्याच्यावर जनतेला विचार करायाला लावलें ही मोठीच कामगिरी होय यांत शंका नाहीं. मीं वर लिहिलेल्या लहानशा निबंधांत लोकमान्यांच्या धार्मिक

मतांविषयीं शक्य तेवढी सविस्तर व सप्रमाण मांडणी केली आहे. अनेकांचे विचार या विषयावर प्रगट होणें जरूर आहे व ते होतीलहि. मी लोकमान्यांच्या सेवेचा माझा वांटा उचललेला आहे, तेव्हां माझें कार्य मीं केलें. आतां लोकमान्यांच्या एक दोन छोटया आख्यायिका देऊन निबंधाचा उपसंहार करतों म्हणजे झालें.

## आख्यायिका

पुणें येथें एकदां गणपतिविसर्जनाची जंगी मिरवणूक चालली होती. विंचूकरांचा गणपति सर्वांत पुढें पालखींत चालला होता. लोकमान्यहि त्या मिरवणुकींत होते. अशा वेळीं रस्त्याच्या बाजूला असलेल्या घराच्या ओटयावर एक चांभाराचें पोर माझा गपणाति न्या म्हणून बापाजळ हट्ट घेऊन रडत होतें. बापालाहि आपल्या अस्पृश्यजातित्वाबद्दल वाईट वाटून मुलाची समजूत करितांना डोळ्यांस पाणी आलें. लोकमान्यांच्या कानावर हा संवाद गेला व त्या चांभाराची ती करुणास्पद स्थिति पाहिली तेव्हां त्यांनाहि गहिंवर आला व झटकन् जाऊन त्या मुलाची त्यांनीं समजूत केली व गणपति आपल्या हातानें उचलून घेऊन विंचूरकरांच्या गणपतीच्या पालखींत नेऊन ठेविला. प्रत्यक्ष सुधारणा ती याला म्हणतात !

१९१७ सालीं भरलेल्या नाशिक येथील प्रांतिक परिषदेला जेव्हां लोकमान्य आले, तेव्हां स्टेशनावर एका बाईनें आपलें मूल त्यांच्या पायावर घातलें. यांत एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे, ती ही कीं, साधारण लोक लोकमान्य टिळकांना राजकीय पुढारी यापेक्षां धर्माचा अभिमानी कट्टा हिंदु, हिंदूचें धर्मशास्त्र म्हणजे जगांत अत्यंत श्रेष्ठ असें मानणारा असेंच समजत असत व त्यामुळें लोकमान्य टिळक म्हणजे देव आहेत अशीच साधारण लोकांची समजूत होती. धर्मविचारांच्या उज्वलतेचा असाच परिणाम असतो.

१९२१ सालीं जेव्हां मुळशी-सत्याग्रह सुरू झाला, तेव्हां श्री. तात्यासाहेब केळकर हे मुळशींतील परिस्थिति पाहण्याकरितां मुळशीला गेले होते. तेव्हां केवळ “ टिळक देवबाप्पाचे ” शिष्य आले आहेत या भावनेनें मावळे व मावळ्यांच्या बायका नारळ व हळदकुंकू घेऊन त्यांची पूजा करायला आल्या.

## उपसंहार

लोकमान्यांचें प्रत्यक्ष आचरण जरी अगदीं कडक नव्हतें, तरी त्यांची धर्मावर पूर्ण श्रद्धा असल्यामुळें लोकसंग्रहाची मर्यादा ते कधींहि उल्लंघून जात नसत, इतकेंच नव्हे तर कर्मत्यागानें समाज भलतीकडे धावतो किंवा कर्माचरणानें

बळकट होतो असें जेव्हां जेव्हां त्यांना दिसे तेव्हां तेव्हां कर्माचरण योग्य असें बजावण्याविषयीं ते बिलकुल हयगय करीत नसत. लोकमान्यांचे विचार धर्माच्या अभ्यासानें ओजस्वी व पवित्र झालेले होते. त्यामुळें राजकारणांतील त्यांची विचारसरणी इतकी ओजस्वी व परिणामकारक होऊं शकली. धर्मश्रद्धा व धर्मांचा अभ्यास या दोन गोष्टी कोणत्याहि अवतारी पुरुषाला अवश्यच असतात. व लोकमान्याचा अवतार अस्ताव्यस्त झालेली महाराष्ट्रजनता एकत्र करण्यासाठींच होता यांत शंका नाहीं. समर्थ रामदासस्वामींच्या अवतारा-विषयीं लोकमान्यांनीं जे उद्गार काढले आहेत, ते त्यांच्याच शब्दांत देऊन आपण हा निबंध पुरा करूं.

" परमेश्वराचे अवतार वारंवार होत नसतात. ते विशिष्ट काळीं, विशिष्ट प्रसंगीं व विशिष्ट ठिकाणीं धारण करावे लागतात. समुद्रांतील वेद गिळणाऱ्या माशाचा संहार करण्यासाठीं ' मत्स्यावतार ' घ्यावा लागला. प्रल्हादाकरितां नारसिंह अवतार स्वीकारावा लागला. परमेश्वराचे लोकस्थितीप्रमाणें व परिस्थिती-प्रमाणें निरनिराळे अवतार होत असतात. अर्थात् महाराष्ट्रावर काढण्याकरतां ज्या गुणांची आवश्यकता होती, तशा गुणांनीं परिपूर्ण अशी विभूति त्यावेळीं अवतीर्ण झाली. "

**श्रीमत्तिलकार्पणमस्तु.**

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

# पुरवणी

## लोकमान्यांचीं ओजस्वी व मार्मिक धार्मिक वचनें !

लोक जमल्यानें देवाला विटाळ होतो म्हणणें म्हणजे देवानें माणसें उत्पन्न केलीं नाहींत, असें म्हणण्यासारखें आहे.

× × × ×

हिंदु धर्मासारखा सहिष्णु धर्म जगांत दुसरा नाहीं.

× × × ×

वेदादि ग्रंथपरंपरा मान्य आहेत तो हिंदु झाला व एका पुरुषाचा अवयव झाला हें त्यानें विसरतां कामा नये.

× × × ×

" वैषम्य आणि नैर्घृण्य यांची प्रसक्ति ईश्वरावर होऊं नये म्हणून पुनर्जन्माची कल्पना आहे. " शंकराचार्यांनीं हें लिहिलें तेव्हां त्यांना ख्रिस्तीधर्म माहीत नव्हता, व ख्रिस्तीधर्माच्या खंडनार्थ त्यांनीं हें लिहिलें नाहीं. धर्माची थट्टा करणें सोपें आहे. पण कोणीहि इसम एकदां शंकराचार्यांच्या विचारसरणींत शिरला कीं त्यांतून बाहेर येणें कठीण पडतें. मोठमोठे बुद्धीमान् पुरुष सुद्धां आचार्यांच्या कोटिक्रमांत गुंग होतात. आचार्यासारख्या पुरुषानें ज्या धर्मांत परिश्रम केले, त्या धर्माची थट्टा करणें पाप आहे.

× × × ×

ज्यानें मोक्ष मिळतो तोच धर्म अशी निदान आमच्या धर्माची तरी व्याख्या नाहीं.

× × × ×

तुम्ही आपल्या कर्माचा पडदा जर स्वच्छ कांचेसारखा कराल तर त्यांतून परमेश्वर दिसेल, गोणपाटाचा कराल तर त्यांतून परमेश्वर दिसायचा नाहीं.

× × × ×

आपल्या बांधवाकरितां अंतःकरण तळमळणें, त्यांना मुक्ति मिळावी अशी इच्छा ठेवणें, त्यांना मोक्ष प्राप्त व्हावा व त्यांना भक्तीचीं साधनें मिळावीं असें वाटणें हें भक्तीचें लक्षण आहे.

× × × ×

जगांतील अत्यंत उदात्त विचारांची जर एकादी शाळा असेल तर ती वेदांताची होय.

× × × ×

आमच्या धर्मतत्त्वांप्रमाणें राजाचा व माझा आत्मा सारखा आहे. राजाच्या विशिष्ट क्रियेनें त्याला अधिकार प्राप्त झालेला आहे. तशी क्रिया केल्यास दुसऱ्याला राजा होतां येतें. मग ज्या धर्मानें परमेश्वर होतां येतें, तो धर्म काय राजा होऊं देणार नाहीं ?

× × × ×

धर्म व राजकारण हीं दोन नाहींत असेंच रामदासांनीं शिकविलें.

× × × ×

उच्च कल्पना, जगांतील अत्युच्च कल्पना लोकांस शिकवून त्यांच्यांत खेळूं देणें, जातीजातींतील भेद नाहींसे करून आपण सारे एक आहोंत असें वाटावयास लावणें हें खरें धर्मशिक्षण होय.

× × × ×

इंग्रज व आपण सारखे आहों. आज विविक्षित कर्म केल्यानें जर इंग्रज राज्य करीत असतील तर आपण तसें कर्म केल्यास आपलें राज्य होईल, हें धर्म शिकवितो.

× × × ×

स्वार्थत्याग करावयास जो मनोनिग्रह लागतो, तो मनोनिग्रह करावयास धर्म शिकवील. धर्मानें मनाचें संकुचितत्त्व जातें.

× × × ×

तत्त्वज्ञानावर राजकीय सत्ता चालूं शकत नाहीं.

× × × ×

राज्य कोणतेंहि असलें, तरी धर्मकार्य केलेंच पाहिजे.

× × × ×

वेदांतांतील तत्त्वज्ञान व्यवहारांत आणण्याचा यत्न करणें जरूर आहे.

× × × ×

धर्मसंबंधीं विचार किंवा ईश्वराची भक्ति ही एकांतांत बसून केली तरी चालते. पण सामान्य जनांच्या जागृतीसाठीं थाटमाट किंवा समारंभ ( Demonstration ) अवश्य पाहिजेत.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १८७६०
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0018169

REFBK-0018169